॥ श्री ॥

ब्रह्मीभूत श्रीनानामहाराज साखरेप्रणीत

सार्थ-ज्ञानेश्वरी.

लेखक

सुप्रसिद्ध सांप्रदायिक

श्रीनानामहाराज जोशी साखरे

यांचे चिरंजीव

विनायक नारायण जोशी साखरे.

मुद्रक व प्रकाशक

त्र्यंबक ह[illegible] ग[illegible]ते.

पुणें येथें सदाशिव पेठेंत "इंदिरा" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केला.

नवी आवृत्ति.

मिति आषाढ शुद्ध १ शके १८३७.

तारीख १३ जुलै सन १९१५.

ज्ञानेश्वरी.

अध्याय बारावा.

जयजय वो शुद्धे। उदारे प्रसिद्धे। अनवरत आनंदे। वर्षतिये १ विषय-व्याळें मिठी। दिधलिया नुठी ताठी। ते तुझिये गुरुकृपादृष्टी। निर्विष होय २ तरि कवणातें तापु पोळी। कैसेनि वो शोकु जाळी। जरि प्रसादरस कल्लोळीं। पुरियेसि तूं ३ योगसुखाचे सोहळे। सेवकां तुझेनि स्नेहाळे। सोहंसिद्धीचे लळे। पाळिसी तूं ४ आधारशक्तीचिया अंकीं। वाढविसी कौतुकीं। हृदयाकाशपल्लकीं। पारियेदेसी निजें ५ प्रत्यक्ज्योतीचीं वोवाळणीं। करिसी मनपवनाचीं खेळणीं। आत्मसुखाचीं बाळलेणीं। लेवविसी ६ सतरावियेचें स्तन्य देसी। अनुहताचा हल्लरु गासी। समाधिबोधें निजविसी। बुझाऊनि ७ म्हणोनि साधकां तूं माउली। पिके सारस्वत तुझिया पाउलीं। या कारणें म ७ भउली। न संडीं तुझी ८ अहो सद्गुरूचिये कृपादृष्टी। तुझें कारुण्य जयातें गुगुलीं। वि। तो सकळ विद्यांचिये सृष्टी। धात्रा होय ९ म्हणोनि अंबे श्रीमंतें। नजजनकल्पलते। आज्ञापीं मातें। ग्रंथनिरूपणीं १० नवरसीं भरवीं सागरु। करवीं उचित रत्नांचे आगरु। भावार्थाचे गिरिवरु। निफजवीं माये ११ साहित्यसोनियाचिया खाणी। उघडवीं देशियेचिया अक्षौणी। विवेकवल्लीची लावणी। हों देईं सैंघ १२ संवादफळनिधानें। प्रमेयाचीं उद्यानें। लावीं म्हणें गहनें। निरंतर १३ पाखांडाचे दरकुटे। मोडीं वाग्वाद अव्हांटे। कुतर्काचीं दुष्टें। सावजें फेडीं १४ श्रीकृष्णगुणीं मातें। सर्वत्र करीं वो सरतें। राणिवे बैसवीं श्रोते। श्रवणाचिये १५ ये मऱ्हाठियेचिया नगरीं। ब्रह्मविद्येचा सुकाळु करीं। घेणें देणें सुखचिवरी। हों देईं या जगा १६ तूं आपुलेनि स्नेहपल्हवें। मातें पांघुरविशील सदैवें। तरि आतांचि हें आघवें। निर्मीन माये १७ इये विनवणीचेसाठीं। अवलोकिलें गुरुकृपादृष्टी। म्हणें गीतार्थेंसीं उठीं। न बोलें बहु १८ तेथ जी जी महाप्रसादु। म्हणोनि साविया जाहला आनंदु। आतां निरोपीन प्रबंधु। अवधान दीजे १९

ज्ञानेश्वरी.

अध्याय बारावा.

[हे गुरुकृपादृष्टे,] तुझा जयजयकार असो. तूं कशी आहेस ? तर निर्मल, उदार, निरंतर आवरणरहित असा आनंदाचा वर्षाव करण्याविषयीं प्रसिद्ध आहेस. १ हे गुरुकृपादृष्टे, विषयरूप सर्पानें मिठी मारल्यावर मूर्च्छित झालेल्या मनुष्याचें विष तुझ्या योगानें उतरतें. २ तुझ्या प्रसादरूपी लाटांचा पूर आला, म्हणजे संसारतापापासून कोणाला त्रास होईल ? व शोकापासून कोण पीडा पावेल ? ३ हे स्नेहाळे, तुझ्यापासून सेवकाला योगसुखाचे चमत्कार प्राप्त होतात; व ' मी ब्रह्म व्हावें ' अशी जी सेवकाची हौस, तीही तूं पूर्ण करतेस. ४ [भक्ताला] तूं आपल्या आधारशक्तीच्या अंकावर कौतुकानें बसवून हृदयाकाशरूपी पाळण्यांत आपल्या उपदेशानें निजवून झोंके देतेस; ५ मन विषयापासून पराङ्मुख करवून व आत्मज्योतीची ओंवळणी करून, मन व पवन यांचीं खेळणीं करतेस, आणि सेवकाकडून आत्मसुखाचीं बाळलेणीं लेववितेस; ६ जीवनकलेचें अमृतपान देऊन ' हंसः सोहं ' या अखंड ध्वनीचा हातांत खुळखुळा देऊन समाधिसुखाचा बोध करून निजवितेस; ७ म्हणून तूं साधकांची आई आहेस, व तुझे पाय धरल्यानें ज्ञानमात्राची प्राप्ति होते;याकरितां, मी तुझा आश्रय सोडीत नाहीं. ८ हे सद्गुरुकृपादृष्टे तुझी ज्याच्यावर दया होते, तो सर्वविद्यारूप सृष्टीचा उत्पन्नकर्ताच होतो. ९ म्हणून, हे श्रीमान् अंबे, तूं सेवकाच्या मनांतील इच्छा पूर्ण करणारी कल्पलताच आहेस. तर या गीतेचा अर्थ सांगण्याची मला आज्ञा दे. १० माते, या माझ्या ग्रंथांत नवरसांचे सागर,अलंकारांच्या खाणी व भावार्थांचे पर्वत निर्माण कर. ११ देश–भाषारूप जमिनींत अलंकाररूप सोन्याच्या खाणी उघडून विचाररूप वेलींची दाट लावणी कर. १२ त्यांत संवादरूप फळांचे ठेवे व मार्मिक–अर्थरूपी सतत राहणाऱ्या अशा पुष्कळ बागा लाव. १३ पाखंडरूपी दरडी, व वितंडवादरूपी आडवाटा मोडून, कुतर्करूपी दुष्ट हिंसक जनावरें नाहींतशीं कर. १४ मला श्रीकृष्णाचे गुण नेहमीं गाण्यास उद्युक्त कर, व श्रोत्यांना श्रवणरूपी राज्यावर वसीव. १५ मराठी भाषारूप नगरांत ब्रह्मविद्या स्वस्त कर, व सर्व लोकांनीं सुखाच्या देण्याघेण्याचा व्यापार करावा असें कर. १६ हे सदैव गुरुकृपादृष्टे माये, तूं आपल्या कृपारूप पदराचें मला पांघरूण घालशील, तर याप्रमाणें ग्रंथनिरूपणादिक सर्व मी उत्पन्न करीन. १७ एवढी विनंती ऐकल्याबरोबर गुरुकृपादृष्टीनें ज्ञानेश्वराकडे अवलोकन करून असें भाषण केलें कीं, तूं आतां पाल्हाळ न लावतां गीतेचा अर्थ सांगण्यास सुरवात कर. १८ तेव्हां ज्ञानेश्वर महाराज मर्यादादर्शक जी जी शब्द म्हणून हा माझ्यावर महाप्रसादच झाला आहे; त्यामुळें आनंद पावून मी आतां गीतेच्या अर्थावरील कविता सांगेन, तिकडे लक्ष द्यावें, अशी त्यांनीं श्रोत्यांची प्रार्थना केली. १९

अर्जुन उवाच:—

एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते । ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के योगवित्तमाः ॥ १ ॥

तरी सकळवीराधिराजु । जो सोमवंशीं विजयध्वजु । तो बोलता जाहला आत्मजु । पांडुनृपाचा २० कृष्णातें म्हणे अवधारिलें । आपण विश्वरूप मज दाविलें । तें नवल म्हणोनि बिहालें । चित्त माझें २१ आणि इये कृष्णमूर्तीची सवे । यालागीं सोय धरिली जीवें । तंव नको म्हणोनि देवें । वारिलें मातें २२ तरि व्यक्त आणि अव्यक्त । हें तूंचि एक निभ्रांत । भक्तीं पाविजे व्यक्त । अव्यक्त योगें २३ या दोनी जी वाटा । तूतें पावावया वैकुंठा । व्यक्ताव्यक्त दारवंठा । रिगिजे यथ २४ पैं जे वानी श्यातुका । तेचि वेगळिये वाला येका । म्हणोनि एकदेशीया व्यापका । सरिसा पाडू २५ अमृताचिया सागरीं । जे लाभे सामर्थ्याची थोरी । तेचि दे अमृतलहरी । चुळी घेतलिया २६ हे कीर माझ्या चित्तीं । प्रतीति आथि जी निरुती । परि पुसणें योगपती । तें याचिलागीं २७ जें देवा तुम्हीं नावेक । अंगीकारिलें व्यापक । तें साचचि कीं कवतिक । हें जाणावया २८ तरि तुजलागीं कर्म । तूंचि जयाचें परम । भक्तीसी मनोधर्म । विकोनि घातला २९ इत्यादि सर्वींपरी । जे भक्त तूतें श्रीहरी । बांधोनियां जिव्हारीं । उपासिती ३० आणि जें प्रणवापैलीकडे । वैखरीयेसि जें कानडें । कायिसयाहि सांगडें । नव्होचि जें वस्तु ३१ तें अक्षर जी अव्यक्त । निर्देश देशरहित सोहंभावें उपासित । ज्ञानिये जें ३२ तयां आणि जी भक्तां । येरयेरांमाजि अनंता । कवणें योगु तत्त्वता । जाणितला सांगा ३३ इया किरीटीचिया बोला । तो जगद्बंधु संतोषला । म्हणे हों प्रश्नु भला । जाणसी करूं ३४

श्रीभगवानुवाच:—

मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते । श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः ॥२॥

तरि अस्तुगिरीचिया उपकंठीं । रिगालिया रवि बिंबापाठीं । रश्मी जैशा किरीटी । संचरती गा ३५ कां वर्षाकाळीं सरिता । जैसी चढों लागें पांडुसुता । तैसी नीच नवी भजतां । श्रद्धा दिसे ३६ परि ठाकिलियाहि सागरु । जैसा मागीलही यावा अनिवारु । तिये गंगेचिये ऐसा पडिभरु । प्रेमभावा ३७ तैसें सर्वेंद्रियांसहित । मजमाजि सूनि चित्त । जे रात्रिदिवस न म्हणत । उपासिती ३८ इयापरी जे भक्त । आपणपें मज देत । तेचि मी योगयुक्त । परम मानीं ३९

अन्वय-(भगवन् ,) एवं सततयुक्ताः ये भक्ताः त्वां पर्युपासते ये अव्यक्तं च अक्षरं अपि (पर्युपासते,) तेषां (मध्ये) के योगवित्तमाः (संति) ॥१॥

अर्थ-अर्जुन, म्हणालाः—देवा, याप्रमाणें एकनिष्ठ होऊन तुझ्या सगुण रूपाची उपासना करितात ते, आणि अव्यक्त व अविनाशी अशा निर्गुण ब्रह्माची उपासना करितात ते, या दोहों प्रकारच्या भक्तांमध्यें भक्तीचें खरें तत्त्व कोणास समजलें आहे ? ॥ १ ॥

सकलवीर्यशिरोमणि, सोमवंशाचा विजयध्वज, व पंडूचा मुलगा जो अर्जुन, तो म्हणालाः—२० हे श्रीकृष्णा, ऐकलें का ? तुम्हीं जें मला विश्वरूप दाखविलें, तें अद्भुत असल्यामुळें माझ्या चित्तास भीति उत्पन्न झाली; २१ आणि तुमच्या या सगुण मूर्तीची संवय असल्यामुळें माझ्या मनानें तिचीच आवड घेतली; परंतु, देवा, तुम्हीं माझा निषेध केला. २२ तरी साकार व निराकार हीं दोन्ही रूपें निःसंशय तुमचींच आहेत. भक्तीनें सगुणरूपाची व योगानें निर्गुणरूपाची प्राप्ति होते. २३ हे वैकुंठनायका श्रीकृष्णा, तुमची प्राप्ति करून घेण्याकरितां या दोन वाटा असून, साकार व निराकार हे दोन उंबरे आहेत. २४ हें पहा—शंभर भार वजनाच्या सोन्याच्या गटास जो कस लागतो, तोच कस त्या गटांतील थोडें सोनें निराळें करून त्यास लाविला तरी लागतो; म्हणून व्यापक अथवा एकदेशीय रूपाची योग्यता सारखीच आहे. २५ अमृताच्या समुदांत जें सामर्थ्य आहे, तेंच चुळकाभर अमृतांतही आहे; २६ आणि माझ्या मनाचा अनुभव खरोखर हाच आहे, पण याचकरितां मला तुम्हांला कांहीं विचारावयाचें आहे; २७ देवा, तुम्ही जें क्षणभर व्यापकरूप धारण केलें होतें, तेंच तुमचें खरें स्वरूप किंवा ती लीला आहे, हें समजण्याची माझी इच्छा आहे. २८ तर, जो आपलीं सर्व कर्में तुमच्याचकरतां करतो; ज्याला तुमच्याशिवाय श्रेष्ठ असें जगतांत दुसरें कांहीं नाहीं; व ज्यानें आपलें सर्व मनोधर्म तुमच्या भक्तीला विकले आहेत; २९ याप्रमाणें, हे श्रीहरी, जे भक्त सर्वतोपरी तुमची मूर्ति हृदयांत धरून उपासना करतात; ३० आणि जें तुमचें स्वरूप ॐकारापलीकडे असून वाणीनें वर्णन करण्यास अशक्य, व कोणच्याही वस्तूवरोबर ज्याची तुलना होत नाहीं; ३१ जें अविनाशी, निराकार, स्थलरहित व नामरहित आहे; आणि ज्याची ज्ञानी लोक हे सोहंभावानें उपासना करितात, ३२ त्या ज्ञान्यांमध्यें व भक्तांमध्यें, हे श्रीअनंता, खरा योग कोणास समजला तें सांगा. ३३ अर्जुनाच्या या बोलण्यानें जगद्बंधु श्रीकृष्ण संतोष पावून म्हणालेः—वाहवा ! प्रश्न करण्याची शैली तुला फार चांगली साधली आहे ! ३४

अन्वय-(अर्जुन, मयि मनः आवेश्य नित्ययुक्ताः (सन्तः) ये परया श्रद्धया उपेताः मां उपासते, ते युक्ततमाः मे मताः. २

अर्थ-श्रीभगवान् म्हणालेः—अर्जुना, माझ्या ठिकाणीं चित्त स्थिर करून नित्ययुक्त होत्साते जे उत्कृष्ट श्रद्धेनें मला भजतात; त्यांनीं भक्तियोग खरा जाणला असें मी मानतो. ॥ २ ॥

हें पहा—अस्तमानच्या समयीं सूर्यबिंब नाहींसें झाल्यावर ज्याप्रमाणें त्याच्या मागें किरण जातात; ३५ किंवा, अर्जुना, पावसाळ्यांत नदी अधिक वाढते, त्याप्रमाणें माझी भक्ति करितांना ज्याच्या ठिकाणीं नित्य नवी श्रद्धा दृष्टीस पडते; ३६ अथवा समुद्रास मिळाल्यावरही जिच्यामध्यें मागून अनिवार लाटा येतच असतात त्या गंगेप्रमाणें ज्यांच्या ठिकाणीं पूर्ण प्रेमभाव उचंबळत असतो; ३७ तसेंच, दिवस व रात्र मनांत न आणितां कायावाचामनेंकरून माझ्याच ठिकाणीं चित्त ठेवून जे माझी उपासना करितात; ३८ आणि याप्रमाणें जे भक्त आपणां स्वतांला माझे ठिकाणीं वाहून घेतात, त्यांनाच मी ' परम योगयुक्त ' असें समजतों; ३९

ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते । सर्वत्रगमचिंत्यं च कूटस्थमचलं ध्रुवम् ॥३॥
संनियम्येंद्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः । ते प्राप्नुवंति मामेव सर्वभूतहिते रताः ॥४॥

आणि येर तेही पांडवा । जे आरूढोनि सोहंभावा । झोंबती निरवयवा । अक्षरासी ४० मनाची नखी न लगे । जेथ बुद्धीची दृष्टी न रिगे । इंद्रियां कीर जोगें । कायि होईल ४१ परि ध्यानाही कुवाडें । म्हणोनि एके ठायीं न संपडे । व्यक्तीसि माजिवडें । कवणेंही नोहे ४२ जया सर्वत्र सर्वपणें । सर्वांही काळीं असणें । जें पावूनि चिंतवणें । हिंपुटी जाहलें ४३ जें होय ना नोहे । जें नाहीं ना आहे । ऐसें म्हणोनि उपाये । उपजतीचिना ४४ जें चळे ना ढळे । सरे ना मैळे । तें आपुलेनीचि बळें । आंगविलें जिहीं ४५ पैं वैराग्यम-हापावकें । जाळूनि विषयांचीं कटकें । अधपलीं तवकें । इंद्रियें धरिलीं ४६ मग संयमाची थाटी । सूनि मुरडिलीं उफराटीं । इंद्रियें कोंडिलीं कपाटीं । हृदयाचिया ४७ अपानींचिया कवाडा । लावोनि आसनमुद्रा सुहाडा । मूळ-बंधाचा हुडा । पन्नासिला ४८ आशेचे लाग तोडिले । अधैर्याचे कडे झाडिले । निद्रेचें शोधिलें । काळवखें ४९ व ब्राह्मीचिया ज्वाळीं । करूनि सप्तधातूंची होळी । व्याधीच्या सिसाळीं । पूजिलीं यंत्रें ५० मग कुंडलिनियेचा टेंभा । आ-धारीं केला उभा । तया चोजवले प्रभा । निमथावरी ५१ नवद्वारांचिया चौ-चकीं । बाणूनि संयतीची आडवंकी । उघडली खिडकी । ककारांतींची ५२ प्राणशक्तिचामुंडे । प्रहारूनि संकल्प मेंढे । मनोमहिषाचेनि मुंडें । दिधली बळी ५३ चंद्रसूर्यां बुझावणी । करूनि अनुहताची सुडावणी । सतराविये चें पाणी । जिंतिलें वेगीं ५४ मग मध्यमा मध्य विवरें । तेणें कोरिवें दादरें । ठा-किलें चवरें । ब्रह्मरंध्र ५५ वरी मकारांत सोपान । तें सांडोनियां गहन । काखे-सूनियां गगन । भरले ब्रह्मीं ५६ ऐसे जे समबुद्धी । गिळावया सोहंसिद्धी । आंगवितांति निरवधी । योगदुर्गें ५७ आपुलिया साटोवाटीं । शून्य घेती उठा-उठी । तेही मातेंचि किरीटी । पावती गा ५८ वांचूनि योगाचेनि बळें । अ-धिक कांहीं मिळे । ऐसें नाहीं आगळें । कष्टचि तया ५९

क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् । अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥५॥

जिहीं सकळभूतांचिया हितीं । निरालंबीं अव्यक्तीं । पसरलिया आसक्ती । भक्तीवीण ६० तयां महेंद्रादि पदें । करिताति वाटवधें । आणि ऋद्धिसिद्धीचीं

अन्वय-ये तु सर्वभूतहिते रताः सर्वत्र समबुद्धयः(सन्तः) इंद्रियग्रामं संनियम्य, अनिर्देश्यं, अव्यक्तं, सर्वत्रगं, अचिन्त्यं, कूटस्थं, अचलं, ध्रुवं च अक्षरं पर्युपासते, ते मां एव प्राप्नुवंति.

अर्थ-प्राणिमात्रांचें हित करण्याविषयीं तत्पर आणि सर्वत्र-समदृष्टि असे जे पुरुष सर्व इंद्रियांचें नियमन करून, अनिर्देश्य, अव्यक्त, सर्वव्यापी, अचित्य, कूटस्थ, अचल व शाश्वत अशा नाशरहित ब्रह्माची उपासना करितात, ते मलाच येऊन मिळतात. ॥ ३-४ ॥

आणि अर्जुना, दुसरे जे माझे ज्ञानी भक्त आहेत, ते, 'आपण ब्रह्म आहों' अशी वृत्ति धरून, निराकार जें ब्रह्म तें प्राप्त करून घेण्याची खटपट करितात, ४० जें मनाला अचिंत्य, व बुद्धीला न समजणारें, तें इंद्रियांना कसें समजेल ? ४१ परंतु ध्यानासही गूढ असल्यामुळें जें एके ठिकाणीं सांपडत नाहीं, व ज्याला कोणचाही आकार नाहीं: ४२ जें सर्व ठिकाणीं सर्वरूपानें नेहमीं असतें, व ज्याची प्राप्ति झाली असतां चिंतन आपोआप थांबतें;४३ जें कधीं झालेंही नाहीं,व होणारही नाहीं; तसेंच,जें आहे असेंही नाहीं,व नाहीं असेंही नाहीं, म्हणजे ज्याच्या प्राप्तीविषयीं उपायच नाहीं; ४४ जें चालत नाहीं व हालतही नाहीं, जें संपत नाहीं व दुषितही होत नाहीं, तें ज्यांनीं आपल्या अंगबळानें स्वाधीन करून घेतलें आहे; ४५ वैराग्यरूप मोठ्या अग्नीनें विषयरूप सैन्य जाळून जे आपली होरपळलेलीं इंद्रियें मोठ्या कष्टानें धारण करतात; ४६ मग आत्मसंयमनाचे पाशानें उरफाटीं करून हृदयाच्या गुहेंत तीं कोंडतात; ४७ अपानवायूच्या द्वाराला आसनाची बळकट मुद्रा लावून मुळबंधाचे बुरूज उभे करतात; ४८ आशेचे संबंध तोडून व अधीरपणाचे कडे दूर करून निद्रारूप अंधार नाहींसा करितात; ४९ मूळबंध आसनाच्या ज्वालाग्नीनें शरीरांतील सप्तधातूंची होळी करून व्याधींचीं शिरें षट्चक्रांस अर्पण करितात; ५० मग कुंडलिनीचा टेंभा अधारचक्रावर उभा करून त्या उजेडांत आनंदानें मस्तकापर्यंत जातात; ५१ नवद्वारांच्या चौकींत इंद्रियनिग्रहाचा आडसर घालून सुषुम्ना नाडीची वाट मोकळी करतात; ५२ प्राणशक्तिरूप चामुंडादेवीप्रीत्यर्थ संकल्परूपी मेंढे मारून मनोरूपी महिषासुराचें मस्तक बळीं देतात; ५३ इडा व पिंगला या नाड्यांचें ऐक्य करून व अनुहस्तध्वनीचा गजर करून जीवनकलेच्या तलावापर्यंत जाऊन ठेपतात; ५४ मग सुषुम्ना नाडीच्या मध्य विवरांतील कोरींव दादरानें वर चढून मस्तकांतील ब्रह्मरंध्रापर्यंत मजल गांठतात; ५५ नंतर मकाराचा कठीण जिना चढून व माया खाकेत मारून ब्रह्मास मिळतात; ५६ याप्रमाणें सर्वत्र सारखी बुद्धि ठेवून ब्रह्मप्राप्ती करून घेण्याकरितां योगादिक कठीण मार्ग वेळ न लागतां स्वाधीन करून घेतात. ५७ अशा प्रकारें, अर्जुना, आपली अदलाबदल निरवयवाशीं करतात, तेही मलाच येऊन मिळतात. ५८ बाकी योगाच्या बळानें त्यांना अधिक कांहीं प्राप्ती होते असें नाहीं; उलट जास्त यातना मात्र सोसाव्या लागतात! ५९

अन्वय-अव्यक्तासक्तचेतसां तेषां अधिकतरः क्लेशः अस्ति; तैः, देहवद्भिः अव्यक्ता गतिः दुःखं अवाप्यते हि. ॥ ५ ॥

अर्थ—निर्गुण ब्रह्माची उपासना करणाऱ्या देहधारी पुरुषांना उपासनेचे कष्ट होऊन, अव्यक्त गति फार प्रयासानें प्राप्त होते. ॥ ५ ॥

प्राणिमात्राला प्रिय, अनाश्रित व अव्यक्त असें जें ब्रह्म, तें भक्तिशिवाय प्राप्त करून घेण्याची जे इच्छा करितात, ६० त्यांना वाटमारीं अशीं जीं इंद्रादिक पदें, तीं माळ घालतात; आणि ऋद्धि-

द्वंद्वें । पडोनि ठाती ६१ कामक्रोधांचे विलग । उठावती अनेग । आणि शून्येंसीं आंग । जुंझवावें कीं ६२ ताहानें ताहानचि पियावी । भुकेलिया भूकचि खावी । अहोरात्र वावीं । मवावा वारा ६३ उनिं दिहाचें पहुडणें । निरोधाचें वेल्हावणें । झाडासि साजणें । चाळावें गा ६४ शीत वेढावें । उष्ण पांघुरावें । वृष्टीचिया असावें । घराआंतु ६५ किंबहुना पांडवा । हा अग्निप्रवेशु नीच नवा । भातारेंवीण करावा । तो हा योगु ६६ एथ स्वामीचें काज । ना बापिकें व्याज । परि मरणेंसीं जुंझ । नीच नवें ६७ ऐसें मृत्यूहूनि तिख । कां घोंटे कढत विख । डोंगर गिळतां मुख । न फाटे काई ६८ म्हणोनि योगाचियां वाटा । जे निगाले गा सुभटा । तयां दुःखाचाचि शेल वांटा । भागा आला ६९ पाहें पां लोहाचे चणे । जैं बोचरिया पडती खाणें । तैं पोट भरणें कीं प्राणें । शुद्धी होय ७० म्हणोनि समुद्र बाहीं । तरणें आथि केंही । कां गगनामाजि पाईं । खोलिजतु असे ७१ वळघलिया रणाची थाटी । आंगीं न लगतां काठी । सूर्याची पाउटी । कां होय गा ७२ यालागीं पांगुळा हेवा । नव्हे वायूसि पांडवा । तेविं देहवंता जीवां । अव्यक्तीं गति ७३ ऐसाही जरी धिंवसा । बांधोनियां आकाशा । झोंबती तरी क्लेशा । पात्र होती ७४ म्हणोनि येर ते पार्था । नेणतीचि हे व्यथा । जे कां भक्तिपंथा । वोटंगले ७५

ये तु सर्वाणि कर्माणि मयि सन्यस्य मत्पराः । अनन्येनैव योगेन मां ध्यायंत उपासते ॥६॥

कर्मेंद्रियें सुखें । करितीं कर्में अशेखें । जिये कां वर्णविशेखें । भागा आलीं ७६ विधीतें पाळित । निषेधातें गाळित । मज देऊनि जाळित । कर्मफळें ७७ ययापरी पाहीं । अर्जुना माझे ठाईं संन्यासूनि नाहीं । करिती कर्में ७८ आणीकही जे जे सर्व । कायिक वाचिक मानसिक भाव । तयां मीवांचूनि धांव । आनौती नाहीं ७९ ऐसे जे मत्पर । उपासिती निरंतर । ध्यानमिषें घर । माझें झालें ८० जयाचिये आवडी । केली मजशीं कुळवाडी । भोग मोक्ष बापुडीं । त्यजिलीं कुळें ८१ ऐसें अनन्ययोगें । विकलें जीवें मनें आंगें । तयांचें कायि एक सांगें । जे सर्व मी करीं ८२

तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् । भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् ॥ ७ ॥

किंबहुना धनुर्धरा । जो मातेचिया ये उदरा । तो मातेचा सोयरा । केतुला म्हं ८३ तेवीं मी तयां । जैसे असती तैसियां । कळिकाळ नोकोनियां । घेतला

सिद्धींची जोडी ब्रह्मप्राप्तीच्या आड येते. ६१ कामक्रोधादि पुष्कळ उपद्रव उत्पन्न होतात, व निराकार परब्रह्माची प्राप्ति करून घेण्याकरितां त्यांना शून्याशीं (आकाशाशीं) झटावें लागतें. ६२ तहान लागली असतां तीच पिऊन तृप्त व्हावें लागतें, भूक लागली असतां तीच खाऊन समाधान करावें लागतें, व रात्रंदिवस हाताच्या वाव्यांनीं निराकाराच्या प्राप्तीकरितां वाराच मोजावा लागतो; ६३ दिवसा उन्हांत निजणें, स्वैर इंद्रियांचा निरोधरूपी उपभोग घेणें, व झाडावरोवर मित्रभावानें खेळणें; ६४ थंडी नेसणें, ऊन पांघरणें व पावसांत बसणें; ६५ किंवहुना, अर्जुना, पतीशिवाय रोज सती जाणें, अशा प्रकारचा हा योग होय. ६६ या ठिकाणीं पतीकरितां अग्नीप्रवेश करण्याचें किंवा हव्यकव्याचें निमित्त नसूनही मृत्युवरोवर नित्य नवी लढाई करावी लागते. ६७ असें मृत्यूहूनही तिखट व कढत जें विष, तें गिळवेल का? अरे! डोंगर गिळतांना तोंड नाहीं का फाटणार? ६८ म्हणून, हे महावीरा, जे असे योगसाधन करण्यास निघाले, त्यांच्या नशीबीं दुःखाचा शेलकाच वांटा आला! ६९ हें पहा—लोखंडाचे चणे जेव्हां बोथऱ्याला खाण्याचा प्रसंग येतो, तेव्हां त्याचें पोट भरेल का प्राण जाईल हें कांहीं समजत नाहीं! ७० म्हणून, समुद्र कोणी वाहूनीं तरून गेला आहे का? किंवा आकाशांत कोणी पायांनीं चालला आहे का? ७१ समरांगणांत गेल्यावर अंगावर समोरून वार न होतां सूर्यलोक प्राप्त होईल का? ७२ यास्तव, अर्जुना, ज्याप्रमाणें पांगळ्याला वायूबरोबर धावण्याची पैज मारतां येणार नाहीं, त्याप्रमाणें देहाभिमानी जीवाला निराकाराची प्राप्ति होणार नाहीं, ७३ असें असूनही मनांत इच्छा धारण करून जे अव्यक्तप्राप्तीविषयीं झटतात, ते क्लेशांस पात्र होतात. ७४

म्हणून, पार्था, ज्यांनीं भक्तिमार्गाचा स्वीकार केला आहे, त्यांना असे कष्ट सोसावे लागत नाहींत. ७५

अन्वय—ये तु मत्पराः (सन्तः) सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य (मां) ध्यायंतः अनन्येन योगेन एव मां उपासते; ६

अर्थ—पण, जे मत्पर होऊन, सर्व कर्में मला अर्पण करून, व माझें ध्यान करून अनन्यभावानें माझी उपासना करतात; ॥ ६ ॥

आपल्या वर्णाश्रमधर्माप्रमाणें जीं कर्में करावयाचीं, तीं सर्व कर्में इंद्रियें सुखानें आचरतात; ७६ सर्व कर्में यथाविधि मला अर्पण करून, व निषिद्ध कर्में टाकून, कर्मांपासून होणारीं फळें जाळून टाकतात; ७७ याप्रमाणें, अर्जुना, सर्व कर्में मला अर्पण करून कर्मनाश करतात; ७८ आणखी कायिक, वाचिक, मानसिक जीं जीं कर्में करण्याचीं इच्छा ज्यांना असते, त्यांनाही माझ्याशिवाय दुसरी सोयच नसते; ७९ असे जे निरंतर माझी सेवा करून मत्पर होतात, ते माझ्या ध्यानाच्या निमित्तानें माझे रहाण्याचें ठिकाण होतात. ८० यांची आवड माझ्याशीं व्यवहार करून, बिचारी मुक्ति व भुक्ति हीं गरीब कुळें टाकून देते; ८१ याप्रमाणें अनन्यभावानें ज्यांनीं आपला जीव, मन व शरीर मला अर्पण केलें, त्यांची एकादी गोष्ट मी करतों असें काय सांगूं? कारण त्यांच्या सर्व इच्छा मलाच पूर्ण कराव्या लागतात. ८२

अन्वय—पार्थ, मयि आवेशितचेतसां तेषां अहं मृत्युसंसारसागरात् न चिरात् समुद्धर्ता भवामि. ॥ ७ ॥

अर्थ—त्या माझे ठिकाणीं चित्त समर्पण केलेल्या भक्तांचा, हे पार्था, मी जन्ममरणयुक्त संसारसमुद्रापासून लवकरच उद्धार करितों. ॥ ७ ॥

किंवहुना, पार्था, जो आपल्या मातेच्या उदरीं जन्म घेतो, तो तिचा कितपत आवडता असतो हें सांगावयास नको. ८३ त्याचप्रमाणें, माझे भक्त कोणी व कसलेही असोत, त्यांना मी आवडता आहें व तेही मला आवडते आहेत; आणि त्यांना जे त्रास देणारे असतील त्यांचा नाश करण्याचा

पट्टा ८४ एऱ्हवीं तरी माझिया भक्तां । आणि संसाराची चिंता । काय समर्थांची कांता । कोरान्न मागे ८५ तैसे ते माझें । कलत्र हें जाणिजे । कायिसेनिही न लाजे । तयांचेनि मी ८६ जन्ममृत्यूचिया लाटीं । झळंबती इया सृष्टी । तें देखोनियां पोटीं । ऐसें जाहलें ८७ भवसिंधूचेनि माजें । कवणासि धाकु नुपजे । तेथ जरीकीं माझें । बिहिती हन ८८ म्हणोनि गा पांडवा । मूर्तींचा मेळावा । करूनि त्यांचिया गांवा । धांवतु आलों८९नामाचिया सहस्रवरी।नावा इया अवधारीं । सजूनियां संसारीं । तारू जाहलों ९० सडे जे देखिले । ते ध्यानकासे लाविले । परिग्रही घातले । तरियावरी ९१ प्रेमाची पेटी । बांधली एकाचिया पोटीं । मग आणिले तटीं । सायुज्याचिया ९२ पारि भक्तांचेनि नांवें । चतुष्पदादि आघवे । वैकुंठींचिये राणिवे । योग्य केले ९३ म्हणोनि गा भक्तां । नाहीं एकही चिंता । तयांतें समुद्धर्ता । आथि मी सदा९४आणि जेव्हांचि कां भक्तीं । दिधली आपुली चित्तवृत्ती । तेव्हांचि मज सूती । त्यांचिये नाटीं९५याकारणें गा भक्तराया । हा मंत्र तुवां धनंजया । शिकिजे जैं यया । मार्गा भजिजे ९६

मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय । निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशयः ॥८॥

अगा मानस हें एक । माझ्या स्वरूपीं वृत्तिक । करूनि घाली निष्टंक । बुद्धि निश्चयेंसी ९७ इयें दोनी सरिसीं । मजमाजि प्रेमेंसीं । रिगालीं तरी पावसी । मातें तूं गा ९८ जे मन बुद्धि इहीं । घर केलें माझ्या ठायीं । तरि सांगें मग काई । मी तूं ऐसें उरे ९९ म्हणोनि दीप पालवे । सवेंचि तेज मालवे । कां रविबिंबासवें । प्रकाशु जाय १०० उचललेया प्राणासरिसीं । इंद्रियेंही निगती जैसीं । तैसा मनोबुद्धिपाशीं । अहंकारु ये १ म्हणोनि माझिया स्वरूपीं । मनबुद्धि इयें निक्षेपीं । येतुलेनि सर्वव्यापी । मीचि होसी २ यया बोला कांहीं । अनारिसें नाहीं । आपली आण पाहीं । वाहतु असें गा ३

अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम् । अभ्यासयोगेन ततो मामिच्छाऽऽप्तुं धनंजय ९

अथवा हें चित्त । मनबुद्धीसहीत । माझ्या हातीं अचुंबित । न शकसी देवों ४ तरि गा ऐसें करीं । यया आठां पाहारांमाझारीं । मोटकें निमिषभरी । देतु जाय ५ मग जें जें कां निमिख । देखेल माझें सुख । तेतुलें अरोचक । विषयीं घेईल ६ जैसें शरत्कालु रिगे । आणि सरिता वोहटूं लागे । तैसें चित्त कोडेल वेगें । प्रपंचौनी ७ मग पुनवेहूनि जैसें । शशिबिंब दिसेंदिसें । हारपत

मीं पतकरच घेतला आहे. ८४ बाकी माझ्या भक्तांना संसाराची चिंता कां असावी ? हें पहा–श्रीमंताच्या वायकोला कधीं कोरान्न मागण्याचा प्रसंग येईल का ? ८५ याचप्रमाणें, माझे भक्त माझ्या कुटुंबापैकींच आहेत असें मी समजतों; अर्थात् त्यांना कोणतेंही संकट आलें तर त्याची लाज मला नाहीं का ? ८६ माझे भक्त या सृष्टींत जन्ममृत्यूंच्या लाटांत बुडताहेत असें पाहून माझ्या पोटांत कसेंसेंच झालें ! ८७ भवसागराच्या लाटांची कोणाला भीति वाटत नाहीं ? अर्थात् त्यांची माझ्या भक्तांनाही भीति वाटतेच; ८८ म्हणून, अर्जुना, रामकृष्णादि अवतार घेऊन या मृत्युलोकीं त्यांच्या गांवीं मी धांव घेतली; ८९ माझ्या सहस्रनामरूपी नावा तयार करून, या संसाररूप सागरांत मी त्यांना तारक झालों असें समज. ९० जे उपाधिरहित होते, त्यांना मीं आपलें ध्यान करण्यास सांगितलें; व जे परिवारासह आले, त्यांना नावेवर बसण्यास सांगितलें [त्यांना नामस्मरण करण्यास सांगितलें.] ९१ कांहीं भक्तांच्या पोटाला प्रेमरूपी सांगड बांधून त्यांना मुक्तिरूप तटाला आणलें ९२ परंतु ज्यांनीं म्हणून आपल्यास माझे भक्त म्हणविलें-मग ते चतुष्पाद का असतना–त्यांना मीं वैकुंठाच्या राज्यावर बसण्यास योग्य केलें. ९३ म्हणून, माझ्या भक्तांना कसलीही चिंता उत्पन्न होत नाहीं; कारण, त्यांना तारणारा मी सदोदित उभा आहें; ९४ आणि ज्या वेळेस भक्त आपली चित्तवृत्ति माझ्या ठिकाणीं अर्पण करितात, त्याच वेळेस ते आपल्या छंदांत मला घालतात; ९५ त्याच कारणास्तव, हे भक्तराया धनंजया, जर तुला या भक्तिमार्गाला लागायचें असेल तर सर्व चित्तवृत्ति मला अर्पण करण्याचा हा मंत्र शीक. ९६

अन्वय–(अर्जुन,) मयि एव मनः आधत्स्व, मयि बुद्धिं निवेशय च; अतः ऊर्ध्वं मयि एव निवसिष्यसि, (अत्र) संशयः न) ॥ ८ ॥

अर्थ–अर्जुना, तूं माझ्या ठिकाणीं मन ठेव; व माझ्याच ठिकाणीं बुद्धीची स्थापना कर. असें केल्यावर तूं माझ्या ठिकाणीं वास करशील यांत संशय नाहीं. ॥ ८ ॥

अरे, मन व बुद्धि हीं निश्चयासहित माझ्या स्वरूपाच्या ठिकाणीं वतनदार करून ठेव. ९७ याप्रमाणें हीं दोन्हीं (मन व बुद्धि)प्रेमानें माझ्या स्वरूपांत बरोबर रीतीनें एकत्र होऊन माझ्या ठिकाणीं प्रविष्ट झालीं, म्हणजे तूं मलाच येऊन मिळशील ९८ कारण, मन व बुद्धि यांनीं माझ्या ठिकाणीं वास्तव केल्यावर, तूं व मी अशा प्रकारचा दुजेपणा उरेल का सांग बरें ? ९९ म्हणून दिवा मालवल्यावरोबर ज्याप्रमाणें त्याचे तेज नाहींसें होतें, किंवा सूर्यबिंब मावळल्यावरोबर प्रकाश नाहींसा होतो, १०० अथवा बाहेर निघूं पहाणाऱ्या प्राणाबरोबर इंद्रियें बाहेर पडतात, त्याप्रमाणें मन व बुद्धि एकत्र होऊन जिकडे जातील तिकडे अहंकार हा त्यांचेबरोबर आपोआप जातो. १ म्हणून, माझ्या स्वरूपाच्या ठिकाणीं मन व बुद्धि हीं दोन्ही कायम ठेव;म्हणजे सर्वव्यापक असा जो मी तोच तूं होशील. २ अर्जुना, मी आपल्या गळ्याची शपथ वाहून सांगतों कीं, या माझ्या बोलण्यांत एक अक्षर देखील खोटें नाहीं. ३

अन्वय–धनंजय, अथ मयि स्थिरं चित्तं समाधातुं न शक्नोषि, ततः अभ्यासयोगेन मां आप्तुं इच्छ. ॥ ९ ॥

अर्थ–धनंजया, जर तूं आपलें चित्त माझ्या स्वरूपीं स्थिर करण्यास समर्थ नसशील, तर अभ्यासाच्या योगानें मला प्राप्त करून घेण्याची इच्छा धर. ॥ ९ ॥

अथवा, जर मन व बुद्धि यांसहित तूं आपलें चित्त माझ्या ठिकाणीं पूर्णपणें अर्पण करण्यास समर्थ नसशील, ४ तर असें कर कीं, या आठ प्रहरांमध्यें एक क्षणभर तरी मन व बुद्धि यांना माझ्याकडे लाव. ५ मग जितका वेळ तुझ्या मनाला माझ्या समागमसुखाचा अनुभव येईल, तितका वेळपर्यंत त्याला विषयाची अरुचि उत्पन्न होईल. ६ मग, ज्याप्रमाणें शरदृतु सुरू झाला म्हणजे नद्यांचें पाणी कमी होऊं लागतें, त्याप्रमाणें, जसजसें माझ्या ठिकाणीं तुझें चित्त गुंतेल, तसतसें तें प्रपंचांतून बाहेर निघेल. ७ अथवा, ज्याप्रमाणें पौर्णिमेपासून चंद्रबिंब दिवसानुदिस कमी होत जा-

अवसे । नाहींचि होय ८ तैसें भोगाआंतूनि निगतां । चित्त मजमाजि रिगतां हळू हळू पांडुसुता । मीचि होईल ९ अगा अभ्यासयोगु म्हणिजे । तो ह एकु जाणिजे । येणें कांहीं न निपजे । ऐसें नाहीं ११० पैं अभ्यासाचेनि बळें एकां गति अंतराळें । व्याघ्र सर्प प्रांजळे । केलें एकीं ११ विष कीं आहारीं पडे । समुद्रीं पायवाट जोडे । एकीं वाग्ब्रह्म थोकडें । अभ्यासें केलें १२ ह्मणोनि अभ्यासासि कांहीं । सर्वथा दुष्कर नाहीं । यालागिं माझ्या ठायीं । अभ्यासें मिळ १३

अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि मत्कर्मपरमो भव । मदर्थमपि कर्माणि कुर्वन्सिद्धिमवाप्स्यसि ॥ १० ॥

कां अभ्यासाही लागीं । कसु नाहीं तुझिया आंगीं । तरी आहासी जया भागीं । तैसाचि असें १४ इंद्रियें न कोंडीं । भोगातें न तोडीं । अभिमानु न संडीं । स्वजातीचा १५ कुळधर्मु चाळीं । विधिनिषेध पाळीं । मग सुखें तुज सरळी । दिधली आहे १६ परि मनें वाचा देहें । जैसा जो व्यापारु होये । तो मी करितु आहें । ऐसें न म्हण १७ करणें कां न करणें । हें आघवें तोचि जाणे । विश्व चळतसे जेणें । परमात्मेनि १८ उणयापुरेंयाचें कांहीं । उरों नेदी आपुलिया ठायीं । स्वजाती करूनि घेईं । जीवित्व आपुलें १९ माळिये जेउतें नेलें । तेउतें निवांतचि गेलें । तया पाणिया ऐसें केलें । होआवेंगा २० म्हणोनि प्रवृत्ती आणि निवृत्ती । इये वोझीं नेघें मती । अखंड चित्तवृत्ती । माझ्या ठायीं २१ एन्हवीं तरी सुभटा । उजू कां अव्हांटा । रथु काई खटपटा । करितु असे २२ आणि जें जें कर्म निपजे । तें थोडें बहु न म्हणिजे । निवांतचि अर्पिजे । माझ्या ठायीं २३ ऐसिया मद्भावना । तनुत्यागीं अर्जुना । तूं सायुज्य सदना । माझिया येसी २४

अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः । सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान् ॥ ११ ॥

ना तरी हेंही तुज । नेदवे कर्म मज । तरी गा तूं बुझ । पांडुकुमरा २५ बुद्धीचिये पाठीं पोटीं । कर्माआदि कां शेवटीं । मातें बांधणें किरीटी । दुवाड जरी २६ तरि हेंही असो । सांडीं माझा अतिसो । परि संयतिसीं वसो । बुद्धि तुझी २७ आणि जेणें जेणें वेळे । घडती कर्में सकळें । तयांचीं तियें फळें । त्यजितु जाय २८ वृक्ष कां वेली । लोटती फळें आलीं । तैसीं सांडीं निपजलीं । कर्में सिद्धें २९ परि मातें मनीं धरावें । कां मजउद्देशें करावें । हें कांहीं नको आघवें । जाऊं दे शून्यीं १३० खडकीं जैसें वर्षलें । कां आगीमाजि पोरिलें । कर्म मानीं देखिलें । स्वप्न जैसें ३१ अगा आत्मजेच्या विषीं ।

ऊन अमावास्येला नाहींसें होतें, ८ ह्याप्रमाणें, अर्जुना, तें चित्त हळू हळू विषयोपभोगांतून निवून माझ्या ठिकाणीं लागतां लागतां शेवटीं मद्रूपच होऊन जाईल ! ९ अरे, अभ्यासयोग ज्याला ह्मणतात तो हाच असें पक्कें समज. यापासून प्राप्त होणार नाहीं अशी कोणतीही वस्तु नाहीं ! ११० अभ्यासाच्या बळानें कोणी अंतरिक्षांत फिरतात, कोणी वाघ,सर्प ह्यांना देखील निर्वैर करतात. ११ विष सुद्धां पचनीं पडतें,समुद्रावरही पायवाट होते, व कोणीं कोणीं तर अभ्यासाच्या योगानें वेदांसही हस्तगत करून घेतलें आहे; १२ म्हणून, अभ्यास केला असतां कोणतीही वस्तु प्राप्त होणारी नाहीं असें नाहीं; याकरितां, अभ्यासाच्या योगातें तूं मला येऊन मीळ, १३

अन्वय–(त्वं) अभ्यासे अपि असमर्थः असि (चेत्) मत्कर्मपरमः भव; मदर्थं कर्माणि कुर्वन् अपि सिद्धिं अवाप्स्यसि. १०

अर्थ–अभ्यास करण्याचें देखील जर तुला सामर्थ्य नसलें; तर माझ्या उद्देशानें कर्में करीत जा. माझ्या उद्देशानें कर्में केलींस तरी तुला मोक्षप्राप्ति होईल. ॥ १० ॥

किंवा अभ्यास करण्याची जर तुझ्या अंगांत शक्ति नसेल तर तुझ्या आचरणाचा जो क्रम असेल तो तसाच चालीव. १४ इंद्रियांना कोंडूं नको, उपभोग कमी करूं नको, आणि आपल्या स्वतांच्या जातीचा अभिमान सोडूं नको; १५ आपलें कुळधर्म कुळाचार यथाविधि कर; जीं कर्में करण्यास योग्य असतील तीं कर; व करण्यास अयोग्य असतील तीं करूं नको. याप्रमाणें सुखानें वागण्याची तुला मोकळीक आहे. १६ परंतु कायावाचामनेंकरून जे व्यापार होतील, ते ' मी करतों ' असें ह्मणूं नको. १७ जो परमात्मा या विश्वाचा चालक आहे. तो कर्माचा कर्ता कोण व कर्म न करणारा कोण हें सर्व जाणतो आहे. १८ अमुक कर्म कमी झालें व अमुक कर्म जास्ती झालें, याविषयीं आपल्या मनांत खेद मानूं नको, कारण जसा प्राचीन संस्कार असेल तशीं तीं घडतील, अशा रीतीनें जीवाच्या ठिकाणीं निश्चय कर,अन्य आग्रह करू नको. १९ ज्याप्रमाणें, माळी नेईल तिकडे पाणी हें निवांतपणें जातें, त्याप्रमाणें मनांतील कर्तृत्वाभिमान टाकून द्यावा. १२० ह्मणजे प्रवृत्तिनिवृत्तींचें ओझें बुद्धी आपल्यावर घेत नाहीं, कारण चित्तवृत्ति माझ्या ठायीं अखंड असते. २१ बाकी, अर्जुना, वाट सरळ आहे किंवा वांकडी आहे, याविषयीं रथाला कांहीं काळजी आहे का ? जिकडे त्यास न्यावें तिकडे तो जातो; २२ त्याचप्रमाणें, जें जें कर्म तूं करशील, तें थोडें किंवा पुष्कळ आहे असें न म्हणतां एकनिष्ठेनें मला अर्पण कर. २३ अर्जुना, अशा प्रकारें तूं सर्व कर्मांविषयीं माझ्याच ठिकाणीं भावना धरलीस, (सर्व कर्में मलाच अर्पण केलींस,) म्हणजे शरीरत्यागानंतर तूं मत्पदालाच येशील. २४

अन्वय–अथ एतत् अपि कर्तुं अशक्तः असि, ततः यतात्मवान् मद्योगम् आश्रितः (सन्) सर्वकर्मफलत्यागं कुरु. ११

अर्थ–आतां, हेंही करण्याला जर तूं असमर्थ असलास, तर मनाचा संयम कर; आणि अन्यभावकरून मला शरण येऊन, सर्व कर्मांच्या फलाचा त्याग कर. ॥ ११ ॥

किंवा, हे पांडुकुमारा, जर तुझ्यानें मला कर्में अर्पण करवणार नाहींत, तर तूं असें समज; २५ कर्म करण्याला उद्युक्त करणारी जी बुद्धि, तिच्या अगोदर किंवा पाठीमागून, अथवा कर्माच्या अगोदर किंवा अंतीं माझी आठवण करणें तुला जर कठीण वाटलें, २६ तर माझी वरचेवर आठवण करणें हेंही एका बाजूस राहूं दे; परंतु तूं आपल्या बुद्धीचा विनियोग इंद्रियनिग्रह करण्यांत कर; २७ आणि ज्या ज्या वेळीं जीं जीं कर्में घडतील त्यांच्या त्यांच्या फलांची आशा धरूं नको. २८ ज्याप्रमाणें वृक्ष किंवा वेली आपल्यास फळें आलीं असतां त्यांची आशा न धरतां तीं टाकून देतात, त्याप्रमाणें जीं जीं कर्में पूर्ण होतील, त्यांच्या त्यांच्या फलांची आशा सोडून दे. २९ परंतु मला मनांत आठवून किंवा मला उद्देशून कोणतींही कर्में करावीं, ही खटपट न करितां सर्व निष्फळ होऊं दे. १३० ज्याप्रमाणें खडकावर पाऊस पडला असतां किंवा अग्नींत वीं पेरलें असतां निष्फळ होतें, त्याप्रमाणें, जें जें कर्म तूं करशील, तें तें स्वप्नवत् मान. ३१ अरे, ज्या-

जिवु जैसा निरभिलाषी । तैसा कर्मीं अशेषीं । निष्कामु होईं ३२ वन्हीची ज्वाळा जैसी । वायां जाय आकाशीं । क्रिया जिरों दें तैसी । शून्यामाजीं३३ अर्जुना हा फलत्यागु । आवडे कीर असलगु । परि योगामाजि योगु । धुरेचा हा ३४ येणें फलत्यागें सांडे । तें तें कर्म न विरूढे । एकचि वेळें वेळुझाडें । वांझें जैसीं ३५ तैसें येणेंचि शरीरें । शरीरा येणें सरे । किंबहुना येरझारे । चिरा पडे ३६ पैं अभ्यासाचिया पाउटीं । ठाकिजे ज्ञान किरीटी । ज्ञानें येइजे भेटी । ध्यानाचिये ३७ मग ध्यानासि खेंव । देती आघवेंचि भाव । तेव्हां कर्मजात सर्व । दूरी ठाके ३८ कर्म जेथ दुरावे । तेथ फलत्यागु संभवे । त्यागास्तव आंगवे । शांति सगळी ३९ क्षणोनि यावया शांती । हाचि अनुक्रमु सुभद्रापती । क्षणोनि अभ्यासुचि प्रस्तुतीं । करणें एथ १४०

श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते । ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छांतिरनंतरम् १२

अभ्यासाहूनि गहन । पार्था मग ज्ञान । ज्ञानापासोनि ध्यान विशेषिजे४१ मग कर्मफलत्यागु । तो ध्यानापासोनि चांगु । त्यागाहूनि भोगु । शांतिसुखाचा ४२ऐसिया या वाटा । इहींचि पेणा सुभटा । शांतीचा माजिवटा । ठाकिला जेणें४३

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च । निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी ॥१३॥

जो सर्व भूतांच्या ठायीं । द्वेषातें नेणेंचि कहीं । आपपरु नाहीं । चैतन्या जैसा ४४ उत्तमातें धरिजे । अधमातें अव्हेरिजे । हें कांहींच नेणिजे । वसुधा जेवीं ४५ कां रायाचें देह चाळूं । रंका परौतें गाळूं । हें न म्हणेचि कृपाळू । प्राणु पैं गा ४६ गाईची तृषा हरूं । कां व्याघ्रा विष होऊनि मारूं । ऐसें नेणेंचि का करूं । तोय जैसें ४७ तैसी आघवियांचि भूतमात्रीं । एकपणें जया मैत्री । कृपेशीं धात्री । आपणाचि जो ४८ आणि मी हे भाष नेणे । माझें कांहींचि न म्हणे । सुख दुःख जाणणें । नाहीं जया ४९ तेवींचि क्षमेलागीं । पृथ्वीसि पवाडु आंगीं । संतोषा उत्संगीं । दिधलें घर १५०

संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः । मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तः स मे प्रियः १४

वार्षियेवीण सागरु । जैसा जळें नित्य निर्भरु । तैसा निरुपचारु । संतोषी जो ५१ बाहूनि आपुली आण । धरी जो अंतःकरण । निश्चया साचपण । जयाचेनि ५२ जीवु परमात्मा दोनी । बैसऊनि ऐक्यासनीं । जयाचिया हृदयभुवनीं । विराजती ५३ ऐसा योगसमृद्धि । होऊनि जो निरवधि । अर्पी मनो-

प्रमाणें पिता आपल्या कन्येविषयीं अभिलाष बाळगीत नाहीं, त्याप्रमाणें जीं जीं कर्में तूं करशील त्यांच्या फलप्राप्तीची इच्छा करूं नको. ३२ ज्याप्रमाणें अग्नीची ज्वाला आकाशांत व्यर्थ जाते, त्याप्रमाणें कर्मापासून उत्पन्न होणारीं फळें व्यर्थ जाऊं दे. ३३ अर्जुना, कर्में करून त्यांच्या फलांची इच्छा न करणें हा जरी सामान्य मार्ग वाटत आहे, तरी सर्व योगांत हा श्रेष्ठ योग आहे. ३४ याप्रमाणें कर्में करून त्यांचा फलत्याग केला, म्हणजे तीं कर्में पुनर्जन्मास कारणीभूत होत नाहींत. जसें वेळूचें झाड एक वेळ व्यालें म्हणजे पुनः वीत नाहीं, ३५ तसें या देहानें (याच जन्मीं) पुनः देह धारण करणें संपतें; किंबहुना जन्ममरणांच्या फेऱ्यांतून मुक्तता होते. ३६ परंतु अर्जुना, अभ्यासाच्या योगानें ज्ञान प्राप्त होतें, व ज्ञानप्राप्ति झाल्यावर ध्यान करतां येतें. ३७ नंतर सर्व मनोवृत्ति व धर्म ध्यानाला आलिंगन देतात; तेव्हां कर्म आपोआप दूर रहातें. ३८ जेव्हां कर्म आपोआप दूर रहातें, तेव्हां फलाची इच्छा नाहींशी होते. असें झाल्यावर सर्व शांति आपल्या अधीन होते. ३९ म्हणून, हे सुभद्रापते, शांति उत्पन्न होण्याचा हाच एक मार्ग आहे; तेव्हां तुला अगोदर अभ्यासच केला पाहिजे. १४०

अन्वय–अभ्यासात् ज्ञानं श्रेयः (अस्ति); ज्ञानात् ध्यानं विशिष्यते; ध्यानात् कर्मफलत्यागः (विशिष्यते); अनंतरं त्यागात् शांतिः (भवति) हि. ॥ १२ ॥

अर्थ–अभ्यासाहून ज्ञान श्रेष्ठ आहे; ज्ञानाहून ध्यान श्रेष्ठ आहे; ध्यानाहून कर्मफलत्याग श्रेष्ठ आहे; कां कीं, कर्मफलत्यागापासून शांति प्राप्त होते. ॥ १२ ॥

पार्था, अभ्यासापेक्षां ज्ञान कठीण, व ज्ञानापेक्षां ध्यान अधिक कठीण आहे. ४१ नंतर कर्माच्या फलांची इच्छा सोडणें हें ध्यानापेक्षांही उत्तम आहे; व त्यागापेक्षांही ब्रह्मरूपप्राप्तीचें सुख विशेष आहे. ४२ हे महावीरा, याप्रमाणें हे ब्रह्मरूपप्राप्तीचे मार्ग असून याच टप्यानें जो शांतीची प्राप्ति करून घेतो; ४३

अन्वय–(यः) सर्वभूतानां अद्वेष्टा, मैत्रः, करुणः च एव, निर्ममः, निरहंकारः, समदुःखसुखः, क्षमी, ॥ १३ ॥

अर्थ–जो कोणाचाही द्वेष करीत नाहीं; जो सर्व भूतांचा मित्र, जो दयाळू, जो ममत्वशून्य, जो निरहंकार, ज्याला सुख व दुःख हीं दोन्ही समान, जो क्षमावान आहे, १३

त्याच्या मनांत भूतमात्राविषयीं द्वेष म्हणून मुळींच वसत नाहीं. (त्याची सर्वत्र समदृष्टि असते.) चैतन्याला जसा आपपरभाव नाहीं; ४४ पृथ्वी ज्याप्रमाणें उत्तम मनुष्याचा भार सहन करावा व अधमाचा करूं नये असा भेद बाळगीत नाहीं; ४५ अथवा कृपावंत प्राणाला, ज्याप्रमाणें राजाचे देहांत रहावें व रंकाच्या देहांत राहूं नये असें वाटत नाहीं; ४६ किंवा पाणी ज्याप्रमाणें गाईची तहान भागवावी व वाघाला विषाप्रमाणें होऊन मारावें असें मनांत आणीत नाहीं, ४७ त्याप्रमाणें, प्राणिमात्रांच्या ठिकाणीं ज्याची सारखी मैत्री असून जो कृपेला आपण आधारभूत होतो, ४८ आणि मी व माझें असें ज्याच्या मनांत उद्भवत नाहीं, व सुख-दुःख हेंही ज्याचे मनांत येत नाहीं; ४९ त्याचप्रमाणें, क्षमेविषयीं ज्याची पृथ्वीसारखी योग्यता आहे, व संतोषाला ज्यानें आपल्या मांडीवर रहाण्यास जागा दिली आहे; १५०

अन्वय–सततं संतुष्टः, योगी, यतात्मा, दृढनिश्चयः, मय्यर्पितमनोबुद्धिः, सः मद्भक्तः, मे प्रियः (अस्ति). ॥१४॥

अर्थ–जो सर्वदा संतुष्ट आहे, जो स्थिरचित्त आहे, ज्याच्या मनाचा संयम झाला आहे, ज्याचा निश्चय बळकट आहे, आणि ज्यानें आपलें मन व बुद्धि हीं मला अर्पण केलीं आहेत, असा जो माझा भक्त, तो मला प्रिय असतो. ॥ १४ ॥

वर्षाऋतूशिवाय देखील जसा समुद्र नेहमीं पाण्यानें भरलेला असतो, तसा आनंदाचे उपचार केल्याशिवायही जो सहज आनंदांत निमग्न असतो; ५१ जो आपलें मन आपलीच शपथ घालून ताब्यांत ठेवतो, व ज्याच्या निश्चयाच्या बळानें निश्चयाला खरेपणा येतो; ५२ ज्याच्या हृदयमंदिरांत एकाच आसनावर बसून जीव व परमात्मा हे दोन्ही विराजमान होतात; ५३ अशा योगसंपत्तीनें पूर्णत्वास पावला असून जो मन व बुद्धि माझ्या ठि-

बुद्धि । माझ्या ठायीं ५४ आंतु बाहेरि योगु । निर्वाळलेयाही चांगु । तरि माझा अनुरागु । सप्रेम जया ५५ अर्जुना तो भक्तु । तोचि योगी तोचि मुक्तु । तो वल्लभा मी कांतु । ऐसा पढिये ५६ हें ना तो आवडे । मज जीवाचेनि पाडें । हेंही एथ थोकडें । रूप करणें ५७ तरी पढियंतयाची कहाणी । हे भुलीची भारणी । इयें तंव न बोलणीं । परी बोलवी श्रद्धा ५८ ह्मणोनि गा आम्हां । वेगा आली उपमा । एऱ्हवीं काय प्रेमा । अनुवादु असे ५९ आतां असा हें किरीटी । पैं प्रियाचिया गोष्टी । दुणा थांव उठी । आवडी गा १६० तयाही वरी विपायें । प्रेमळु संवादिया होये । तिये गोडीसी आहे । कांटाळें मग ६१ ह्मणोनि गा पांडुसुता । तूंचि प्रियु आणि तूंचि श्रोता । वरि प्रियाची वार्ता । प्रसंगें आली ६२ तरि आतां बोलों । भलें या सुखा मीनलों । ऐसें ह्मणतखेवीं डोलों । लागला देवो ६३ मग म्हणे जाण । तया भक्ताचें लक्षण । जया मी अंतःकरण । बैसों घालीं ६४

यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः । हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो यः स च मे प्रियः १५

तरि सिंधूचेनि माजें । जळचरां भय नुपजे । आणि जळचरीं नुबगिजे । समुद्रु जैसा ६५ तेविं उन्मत्तें जगें । जयासि खंती न लगे । आणि जयाचेनि आंगें । न शिणे लोकु ६६ किंबहुना पांडवा । शरीर जैसे अवयवां । तैसा नुबगे जीवां । जीवपणें जो ६७ जगचि देह जाहलें । ह्मणोनि प्रियाप्रिय गेलें । हर्षामर्ष ठेले । दुजेनविण ६८ ऐसा द्वंद्वनिर्मुक्तु । भयोद्वेगरहितु । याही वरि भक्तु । माझ्या ठायीं ६९ तरि तयाचा गा मज मोहो । काय सांगों तो पढियावो । हें असो जीवें जीवो । माझेनि तो १७० जो निजानंदें धाला । परिणामु आयुष्या आला । पूर्णते जाहला । वल्लभु जो ७१

अनपेक्षः शुचिर्दक्षः उदासीनो गतव्यथः । सर्वारंभपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः ॥१६॥

जयाचिया ठायीं पांडवा । अपेक्षे नाहीं रिगावा । सुखासि चढावा । जयाचें असणें ७२ मोक्ष देऊनि उदार । काशी होय कीर । परि वेंचे शरीर । तिये गांवीं ७३ हिमवंतु दोष खाये । परि जीविताची हानि होये । तैसें शुचित्व नोहे । सज्जनाचें ७४ शुचित्वें शुचि गांग होये । आणि पाप तापही जाये । परि तेथें आहे । बुडणें एक ७५ खोलिये पारु नेणिजे । तरी भक्तीं न बुडिजे । रोकडाचि लाहिजे । न मरतां मोक्षु ७६ संताचेनि अंगलगें । पापातें जिणें गंगें । तेणें संतसंगें । शुचित्व कैसें ७७ ह्मणोनि असो जो ऐसा । शु-

काणीं अर्पण करतो; ५४ आणि अंतर्यामीं ध्यानयोगानें व बाहेरून अष्टांगयोगानें जरी सिद्ध झाला, तरी माझी प्रीति जो प्रेमानें करतो. ५५ अर्जुना, तोच भक्त, तोच योगी, आणि तोच मुक्त. फार काय सांगावें ! तो स्त्री व मी पति इतका मला तो आवडता आहे ! ५६ छे, छे, असें नव्हे, तो मला माझ्या जिवापेक्षांही जास्त प्रियकर आहे; परंतु हाही दृष्टांत या ठिकाणीं कमींच होय. ५७ तर, आवडत्याची गोष्ट ही केवळ भुरळ पाडणारी भूलच होय. ही बोलून दाखविण्यासारखी गोष्ट नाहीं. परंतु आवडच आमच्याकडून वदविते; ५८ आणि म्हणूनच आम्ही सहज अशी उपमा देऊन गेलों; बाकी प्रेमाचें वर्णन करतां आलें आहे का ? ५९ अर्जुना, ह्या सर्व गोष्टी बाजूस ठेव; कारण, आवडत्या मनष्याविषयीं गोष्टी निघाल्या असतां आवड दुप्पट वाढते. १६० त्यांतूनही कदाचित् गोष्ट ऐकणाराही प्रेमळच भेटला, तर त्या गोडीला उपमा देतां येईल का ? ६१ म्हणून, अर्जुना, तूंच माझा आवडता असून, तूंच आवडीच्या गोष्टी ऐकणारा आहेस; आणि त्यांतून माझ्या प्रिय भक्तांचीच गोष्ट तुझ्याजवळ बोलण्याचा प्रसंग आला ६२ तर आतां काय होईल तें होवो, मी बोलतोंच; व बोलण्याचा प्रसंग आला हेंही आपलें भाग्यच समजतों. असें म्हणून देव डोलूं लागले. ६३ मग म्हणाले:—ज्यांना मी आपल्या हृदयांत सांठवून ठेवितों त्यांचीं लक्षणें कोणतीं तीं ऐक. ६४

अन्वय—लोकः यस्मात् न उद्विजते, यः च लोकात् न उद्विजते, यः च हर्षामर्षभयोद्वेगैः मुक्तः, सः मे प्रियः (अस्ति).

अर्थ—ज्याच्यापासून लोकांना उद्वेग होत नाहीं, व लोकांपासून ज्याला संताप होत नाहीं, आणि जो [विषयसंबधीं] आनंद, क्रोध, भय व त्रास या सर्वांपासून मुक्त असतो, तो मला प्रिय असतो. ॥ १५ ॥

ज्याप्रमाणें समुद्र क्षोभला असतां जलचरांना त्याची भीति वाटत नाहीं, व जलचरांचा पुष्कळ समुदाय वाढला असतां समुद्रही त्यांचा कंटाळा करीत नाहीं. ६५ त्याचप्रमाणें, उन्मत्त जगाचा ज्याला खेद वाटत नाहीं व ज्याच्या योगानें लोकांनाही त्रास होत नाहीं; ६६ फार काय सांगावें ! शरीर ज्याप्रमाणें अवयवांना कंटाळत नाहीं; त्याप्रमाणें, आपण सर्वांचा जीव आहों असें मानून जो प्राणिमात्राला कंटाळत नाहीं; ६७ जग हेंच शरीर बनल्यामुळें ज्याला आवडती नावडती गोष्ट असा भेद रहात नाहीं, व अशा प्रकारें द्वैतभाव नाहींसा झाला म्हणजे ज्याच्या ठिकाणचे आनंद व क्रोध हे विकार नाहींतसे होतात. ६८ याप्रमाणें सुखदुःखांपासून ज्याला बाधा होत नाहीं; जो भय, उद्वेग इत्यादिकांनीं रहित असतो; आणि इतकी स्थिति प्राप्त झाली असूनही जर तो माझी भक्ति करीत असला, ६९ तर त्याची मला फार आवड असते; त्या प्रेमाचें मी काय वर्णन करूं ? इतकेंच नव्हे, तर तो माझ्या प्राणाचा प्राण आहे. १७० जो आत्मानंदानें तृप्त झाला आहे, व रूपांतर घेऊन जो जन्मास आला आहे, तो पूर्णतारूप तरुण स्त्रीचा पतिच होय. ७१

अन्वय—यः मद्भक्तः अनपेक्षः, शुचिः, दक्षः, उदासीनः, गतव्यथः, सर्वारंभपरित्यागी, सः मे प्रियः. ॥ १६ ॥

अर्थ—जो माझा भक्त निस्पृह, अंतर्बाह्य पवित्र, दक्ष, उदासीन, निर्भय, व फलाच्या इच्छेनें कोणतेही कर्म न करणारा असा असतो, तो मला प्रिय होतो ॥ १६ ॥

त्याच्या ठिकाणीं, अर्जुना, इच्छा अगदीं नसते व त्याच्या वृत्तींत सुखाची नेहमीं भर पडत असते. ७२ काशी क्षेत्र मोक्षप्राप्ति करून देण्याबद्दल प्रख्यात आहे परंतु त्या ठिकाणीं शरीर ठेवल्याशिवाय मोक्ष मिळत नाहीं. ७३ हिमालय पर्वतावर गेलें असतां दोषांचें क्षालन होतें परंतु तेथील हवा न मानवल्यामुळें जीवाची हानि होते; परंतु जे सज्जन आहेत, त्यांच्यापासून जीवाची हानि न होतां पवित्रता प्राप्त होते. ७४ पावन करणाऱ्या गंगेचें उदकही पवित्र आहे, त्यांत स्नान केल्यानें पाप व मनाचा ताप हीं दूर होतात; परंतु त्यांत बुडण्याची भीति असते, ७५ तशी भक्तिरूप नदीची खोली अपार आहे, तरी जो मनुष्य तिच्या मार्गानें जाईल, तो न बुडतां व त्याची प्राणहानि न होतां त्याला अविच्छिन्न मोक्ष प्राप्त होतो. ७६ ज्या संतांच्या समागमानें गंगेचेंही पातक नाहींसें होतें, त्या संतसंगापासून पवित्रता प्राप्त होईल किंवा नाहीं हें कशास विचारावें ? ७७ म्हणून,

चित्वें तीर्थां कुवासा। जेणें उलंघविले दिशां। मनोमळ ७८ आंतु बाहेरि चोखाळु। सूर्य तैसा निर्मळु। आणि तत्त्वार्थांचा पायाळु। देखणा जो ७९ व्यापक आणि उदास। जैसें कां आकाश। तैसें जयाचें मानस। सर्वत्र गा १८० संसारव्यथें फिटला। जो नैराश्यें विनटला। व्याधाहातोनि सुटला। विहंगु जैसा ८१ तैसा सतत जो सुखें। कोणीही टवंच न देखे। नेणिजे गतायुषें। लज्जा जेवीं८२ आणि कर्मारंभालागीं। जया अहंकृती नाहीं आंगीं। जैसें निरिंधन आगी। विझोनी जाय ८३ तैसा उपशमुचि भागा। जयासि आला पैं गा। जो मोक्षाचिया आंगा। लिहिला असे ८४ अर्जुना हा ठावोवरी। जो सोहंभावो सरोभरी। द्वैताच्या पैलतीरीं। निगों सरला ८५ कीं भक्तिसुखालागीं आपणपेंचि दोही भागीं। वांटूनियां आंगीं। सेवकै बाणे ८६ येरा नाम मी ठेवी। मग भजती वोज बरवी। न भजतया दावी। योगिया जो ८७ तयाचें आम्हां व्यसन। आमुचें तो निजध्यान। किंबहुना समाधान। तो मिळे तैं ८८ तयालागी मज रूपा येणें। तयाचेनि मज एथें असणें। तया लोण कीजे जीवें प्राणें। ऐसा पढिये ८९

यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न काङ्क्षति। शुभाशुभपरित्यागी भक्तिमान् यः स मे प्रियः१७

जो आत्मलाभासारिखें। गोमटें कांहींचि न देखे। ह्मणोनि भोगविशेखें। हरिखेजेना१९०आपणाचि विश्व जाहला। तरि भेदभावो सहजचि गेला। ह्मणोनि द्वेषु ठेला। जया पुरुषा ९१ पैं आपुलें जें साचें। तें कल्पांतींही न वचे। हें जाणोनि गताचें। न शोची जो ९२ आणि जयापरौतें कांहीं नाहीं। तें आपणपेंचि आपल्या ठायीं। जाहला यालागीं जो कांहीं। आकांक्षी ना ९३ वोखटें कां गोमटें। हें कांहींचि तया नुमटे। रात्रिदिवस न घटे। सूर्यासि जेवीं ९४ ऐसा बोधुचि केवळु। जो होऊनि असे निखळु। त्याहीवरी भजनशीळु। माझ्या ठायीं ९५ तरि तया ऐसें दुसरें। आम्हां पढियंतें सोयरें। नाहीं गा साचोकारें। तुझी आण ९६

समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः। शीतोष्णसुखदुःखेषु समः संगविवर्जितः १८

पार्था जयाचिया ठायीं। वैषम्याची वार्ता नाहीं। रिपुमित्रा दोहीं। सरिसा पाडु ९७ कां घरिचियां उजियेडु करावा। पारखियां आंधारु पाडावा। हें नेणेचि गा पांडवा। दीपु जैसा ९८ जो खांडावया वावो घाली। कां लावणी जयानें केली। दोघां एकाचि साउली। वृक्षु दे जैसा ९९ नातरी इक्षुदंडु। पाळितया गोडु। गाळी तया कडु। नोहेचि जेवीं २०० अरिमित्रीं तैसा। अर्जुना जया भावो ऐसा। मानापमानीं

जो साधु आहे, तो आपल्या पवित्रपणानें तीर्थालाही आश्रयभूत होऊन मनाचे सर्व विकार दशदिशांत लावतो. ७९ तो सूर्याप्रमाणें अंतर्बाह्य निर्मळ असून, पायाळु मनुष्याला ज्याप्रमाणें द्रव्यदृष्टि असते, त्याचप्रमाणें त्याला ब्रह्मतत्त्व दिसतें. ७२ ज्याप्रमाणें आकाश हें सर्वव्यापक असून अलिप्त आहे, त्याप्रमाणें ज्याचें मन सर्वव्यापक असून कशानेंही लिप्त होत नाहीं; १८० ज्याप्रमाणें पारध्याचे हातून पक्षी सुटून गेल्यावर निर्भय होतो, त्याप्रमाणें जो संसाराच्या काळजीतून दूर होऊन निरिच्छ बनलेला असतो; ८१ मेलेल्या मनुष्यास आपलें अंग उघडें पडलें वहिल जशी लाज वाटत नाहीं, तसा जो नेहमीं सुखी असतो त्याला कोणीही तुच्छ दिसत नाहीं. ८२ आणि कोणतेंही कर्म आरंभ करण्यापूर्वी त्याचे मनांत कर्तृत्वाभिमान विलकूल नसतो. ८३ ज्याप्रमाणें अग्नि सर्पणाशिवाय आपोआप विझून जातो, त्याप्रमाणें मोक्षप्राप्ति करितां सांगितलेल्या अंगांपैकी उपशम (शांति) ज्याच्या वांट्याला आलेला आहे: ८४ अर्जुना, अशा प्रकारें आत्मस्वरूपानें ओतप्रोत भरलेला पुरुष द्वैताच्या पलीकडील तीरावर निघून जातो; ८५ किंवा भक्तिपासून उत्पन्न होणाऱ्या सुखाकरितां आपणच आपली दोन ठिकाणीं वांटणी करून, एकाचें नांव 'सेवक' असें ठेवितो, ८६ व सेवकाहून जो दुसरा त्याचें नांव 'देव' असें ठेवून, जो भक्ति न करणाऱ्या लोकांस भक्तिमार्ग आचरून दाखवितो; ८७ त्याचीच आम्हांला प्रीति, तो आमचें निजध्यान होतो, किंबहुना तो मिळेल तेव्हांच आम्हांस समाधान होतें. ८८ त्याच्याचकरितां मला हे अवतार घ्यावे लागतात; त्याच्याचकरितां मला या ठिकाणीं वास्तव्य करावें लागतें; आणि त्याच्यावरून मी पंचप्राण ओंवाळून टाकतों, इतका तो मला आवडता असतो ! ८९

अन्वय–यः न हृष्यति, न शोचति, न काङ्क्षति, यः शुभाशुभपरित्यागी भक्तिमान् (अस्ति), सः मे प्रियः (अस्ति). १७

अर्थ–जो इष्ट वस्तूच्या लाभापासून आनंद मानीत नाहीं, तो न मिळाल्याचा खेद मानीत नाहीं, तिचा वियोग झाला असतां शोक करीत नाहीं, व ती मला होण्याबद्दल इच्छा करीत नाहीं, आणि शुभाशुभ कर्मांचा त्याग करितो, व माझी भक्ति करतो, तो मला प्रिय होतो ॥१७

जो ब्रह्मप्राप्तीच्या लाभाप्रमाणें उत्तम असें दुसरें कांहींच मानीत नाहीं, त्याला कोणत्याही विशेष उपभोगापासून आनंद होत नाहीं. १९० जो आपणच विश्व झाल्यामुळें सहज दुजा भाव विसरतो, म्हणून ज्या पुरुषाचे मनांतून द्वेष नाहींसा होतो; ९१ जी खरोखर आपली वस्तु आहे, ती कल्पांतीही नाहींशी व्हावयाची नाहीं, असें मनांत पक्कें समजून जो गत गोष्टीचा शोक करीत नाहीं; ९२ ज्या स्वरूपापेक्षां उत्तम वस्तु या जगांत दुसरी कोणतीच नाहीं, तें जो स्वतांच होऊन राहिला, तो कसल्याही गोष्टीची इच्छा करीत नाहीं. ९३ वाईट अगर चांगलें हें कांहींच ज्याला वाटत नाहीं; सूर्याजवळ रात्र व दिवस हा भेद मुळींच नसतो, ९४ त्याप्रमाणें जो केवळ ज्ञानस्वरूप होऊनही माझ्या भजनांत आपला काळ घालवितो, ९५ त्या भक्ताप्रमाणें आम्हांला दुसरें आवडतें असें कोणी नाहीं. हें तुझ्याच गळ्यांशपथ मी खरोखर सांगतों ! ९६

अन्वय–(यः) शत्रौ च मित्रे (च) तथा मानापमानयोः समः, शीतोष्णसुखदुःखेषु समः, संगविवर्जितः च) (अस्ति);

अर्थ–जो शत्रूशीं आणि मित्राशीं सारखा वागतो; मान आणि अपमान सारखा मानतो; शीतऊष्ण व सुख दुःख हीं सारखींच समजतो; व ज्याचा कशावरही आसक्ति नसते; १८

पार्था, ज्याच्या मनांत वांकडेपणाची गोष्टही नसते, आणि जो शत्रु व मित्र या दोघांनाही सारखेंच मानतो; ९७ किंवा अर्जुना, आपल्या घरच्या लोकांनाच उजेड पाडावा, व परक्यांना अंधार पाडावा, हें ज्याप्रमाणें दिवा जाणत नाहीं; ९८ जो आपल्यावर तोडण्याकरितां घाव घालतो, किंवा जो आपल्यास लावतो, त्या दोघांनाही झाड सारखीच सावली करितें; ९९ किंवा ऊंस हा जो पाणी घालून वाढवितो त्यासच गोड, व जो चरकांत घालून गाळतो त्यास कडू असा कधींच लागत नाहीं; २०० त्याप्रमाणें, अर्जुना, शत्रुमित्रभाव ज्याच्या

सारिसा। होतु जाय १ तिहीं ऋतूं समान। जैसें कां गगन। तैसा एकचि मान। शीतोष्णीं जया २दक्षिण उत्तर मारुता। मेरु जैसा पांडुसुता। तैसा सुखदुःखप्राप्तां। मध्यस्थु जो ३ माधुर्यें चंद्रिका। सारिसी राया रंका। तैसा जो सकळिकां। भूतां समु ४ आघविया जगा एक। सेव्य जैसे उदक। तैसें तयातें तीन्ही लोक। आकांक्षिती ५ जो सबाह्यसंग। सांडोनियां लाग। एकाकी असे आंग। आंगीं सूनी ६

तुल्यनिंदास्तुतिर्मौनी संतुष्टो येनकेनचित्। अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः ॥१९॥

जो निंदेतें नेघे। स्तुति न श्लाघे। आकाशा न लगे। लेपु जैसा ७ तैसें निंदे आणि स्तुती। मानु करूनि एके पांती। विचरे प्राणवृत्ती। जनीं वनीं ८ साच लटिकें दोन्ही। बोलोनि न बोले जाहला मौनी। जो भोगितां उन्मनीं। आरायेना ९ जो यथालाभें न तोखे। अलाभें न पारुखे। पाउसेंवीण न सुके। समुद्रु जैसा २१० आणि वायूसि एके ठायीं। बिढार जैसें नाहीं। तैसा न धरीच कहीं। आश्रयो जो ११ आघवाचि आकाशस्थिति। जेविं वायूसि नित्य वसति। तेविं जगचि विश्रांति-। स्थान जया १२ हें विश्वचि माझें घर। ऐसी मती जयाची स्थिर। किंबहुना चराचर। आपण जाहला १३ मग याहीवरी पार्था। माझ्या भजनीं आस्था। तरि तयातें मी माथां। मुकुट करीं १४ उत्तमासि मस्तक। खालविजे हें काय कौतुक। परि मानु करिती तिन्ही लोक। पायवणियां १५ तरि श्रद्धावस्तूसि आदरु। करितां जाणिजे प्रकारु। जरी होय श्रीगुरु। सदाशिवु १६ परि हें असो आतां। महेशातें वानितां। आत्मस्तुति तत्त्वता। संचारु असे १७ ययालागीं हें नोहे। म्हणितलें रमानाहें। अर्जुना मी वाहें। शिरीं तयातें १८ जे पुरुषार्थासिद्धि चौथी। घेऊनि आपुलिया हातीं। रिगाला भक्तिपंथीं। जगा देतु १९ कैवल्याचा अधिकारी। मोक्षाची सोडी बांधी करी। कीं जळाचिये परी। तळवटु घे २२० ह्मणोनि गा नमस्कारूं। तयातें आह्मी माथां मुकुट कुरूं। तयाची टांच धरूं। हृदयीं आह्मी २१ तयाचिया गुणांचीं लेणीं। लेववूं आपुलिये वाणीं। तयाची कीर्ति श्रवणीं। आह्मी लेऊं २२ तो पाहावा हे डोहळे। ह्मणोनि अचक्षूसी मज डोळे। हातींचेनि लीलाकमळें। पुजूं तयातें

मनांत नसतो, व जो मानापमानांचे ठिकाणीं सम-बुद्धि ठेवतो; १ आकाश ज्याप्रमाणें तिन्ही ऋतूंत सारखें असतें, त्याप्रमाणें जो थंडी व उन्हाळा या दोहोंस सारखेंच मानतो; २ अर्जुना, मेरु पर्वत ज्याप्रमाणें दक्षिण व उत्तर या दोन्ही दिशांकडील वाऱ्यास सारखाच मानतो, त्याप्रमाणें सुखदुःख प्राप्त झालें असतां जो आपल्या मनाची समता ढळूं देत नाहीं; ३ रावापासून रंकापर्यंत चांदणें सर्वांस सारखेंच सुखकर असतें, त्याप्रमाणें जो प्राणिमात्रास सारखेंच मानतो; ४ सर्व जगाला पाणी सारखेंच सेव्य आहे, त्याप्रमाणें ज्याची तिन्ही लोक इच्छा करतात; ५ जो अंतर्बाह्य होणाऱ्या विषयांचे संबंध व तसेंच पुढें प्राप्त होणारे संबंध सोडून देतो, व एकांतांत राहून आपलें मन आपल्या मनावरच स्थिर करून सुख मानतो; ६

अन्वय–(यः) तुल्यनिंदास्तुतिः, मौनी, येनकेनचित् संतुष्टः, (भवति) अनिकेतः, स्थिरमतिः, भक्तिमान्, सः नरः मे प्रियः (अस्ति). ॥ १९ ॥

अर्थ–ज्याला निंदा आणि स्तुति समान आहे; जो मौन धारण करितो; यदृच्छया जें कांहीं मिळेल त्यांतच संतुष्ट असतो; ज्याचें कोणतेंही ठिकाण ठरलेलें असतें नाहीं; ज्याची बुद्धि स्थिर आहे; आणि जो माझी भक्ति करितो, तो मनुष्य मला प्रिय असतो. ॥ १९ ॥

जो दुसऱ्यानें आपली निंदा केली असतां राग मानीत नाहीं, व स्तुति केली असतां आपल्यास धन्य मानीत नाहीं; ज्याप्रमाणें आकाश सर्वव्यापक असून त्याला कशाचाही संसर्ग होत नाहीं, ७ त्याप्रमाणें निंदा व स्तुति यांची सारखीच गणना करून जो प्रपंचांत व वनांत आपली वृति सारखी ठेवून वागतो; ८ खरें व खोटें भाषण मुखांतून निघालें असतां संकल्पवृत्ति नसल्यानें त्याचें मौन मोडत नाहीं, व ब्रह्मस्थितीचा उपभोग घेत असतां ज्याला विश्रांती नाहीं. ९ ज्याप्रमाणें पाऊस न पडला तरी समुद्र आटत नाहीं, त्याप्रमाणें आपले इच्छेप्रमाणें जरी गोष्टी घडल्या, तरी जो संतोष मानीत नाहीं, व इच्छेविरुद्ध घडल्या तरी रागावत नाहीं; २१० आणि ज्याप्रमाणें वायूचें एक ठिकाणीं राहणें नसतें, त्याप्रमाणें जो कोठें आश्रय करून राहत नाहीं; ११ ज्याप्रमाणें वायु सर्व आकाशभर नित्य राहतो, त्याप्रमाणें सर्व जग हें ज्याचें विश्रांतिस्थान आहे; १२ हें विश्वच माझें घर आहे अशी ज्याची पक्की समजूत झाली आहे, किंबहुना स्थावरजंगम विश्वच जो आपण बनला आहे; १३ आणि अर्जुना, अशा पूर्णत्वास पोहोंचला असूनही ज्याची माझ्या भजनविषयीं पूर्ण इच्छा आहे, त्याला मी आपल्या मस्तकावर मुगुटाप्रमाणें धारण करितों. १४ जो उत्तम पुरुष आहे, त्याला मस्तक लवविणें यांत कांहीं नवल नाहीं; परंतु तिन्ही लोकचे लोक ज्याच्या पायांचें तीर्थ घेऊन आपल्यास धन्य मानतात, असा जो मी, तो त्याला मस्तकावर धारण करतों. १५ तर ज्याची माझ्या ठिकाणीं पूर्ण श्रद्धा आहे, त्याचा आदरसत्कार कर्ता करावा ही गोष्ट श्रीशंकर गुरु होतील तरच समजणारी आहे. १६ परंतु ही गोष्ट राहूं दे. कारण श्रीशंकराचें वर्णन करूं लागलें म्हणजे खरोखर आपली स्तुति केल्याप्रमाणें होणार आहे. १७ म्हणून, श्रीकृष्ण म्हणतातः—अर्जुना, हा दृष्टांत या ठिकाणीं बरोबर नाहीं; तर अशा माझ्या भक्तांना मी आपल्या मस्तकावर धारण करतों. १८ तो पुरुष चौथी पुरुषार्थसिद्धि जो मोक्ष तो हातांत घेऊन भक्तिमार्गानें जात असतां जगाला कित्ता घालून देतो. १९ तो ब्रह्मप्राप्तीचा पूर्ण अधिकारी असून मोक्षाची बांधसोड करितो, परंतु पाण्याप्रमाणें नम्र असतो. २२० म्हणूनच त्याला आम्ही नमस्कार करितों, आपल्या मस्तकावर धारण करतों, व त्याची टांच म्हणजे श्रीवल्लभांच्छन चिन्ह आम्ही आपल्या हृदयावर धारण करतों. २१ त्याचे गुणरूपी अलंकार आम्ही आपले वाणीकडून धारण करवूं (त्याचे गुणानुवाद आम्ही गाऊं) व त्याचे कीर्तिरूप अलंकार कानांकडून धारण करवूं (त्याचें यश कोणी गाइलें असतां आम्ही ऐकूं); २२ असे जे माझे भक्त आहेत, त्यांना पहावें असे डोहळे आम्हांस झाल्यावरून, नेत्ररहित असा जो मी, तो अवतार धारण करून

२३ दोंवरी दोनी। भुजा आलों घेउनी । आलिंगावयालागुनी। तयाचें आंग २४ तयासंगाचेनि सुरवाडें। मज विदेहा देह धरणें घडे। किंबहुना आवडे। निरुपमु २५ तेणेंसीं आह्मां मैत्र। एथ कायसें विचिल। परि तयाचें चरित्र। ऐकती जे २६ तेही प्राणापरौते। आवडती हें निरुतें । जे भक्तचरित्रातें । प्रशंसिती २७ जो हा अर्जुना साद्यंत । सांगितला प्रस्तुत । भक्तियोगु समस्त । योगरूप २८ जेणें मी प्रीति करीं। कां मनीं शिरसा धरीं । येवढी थोरी। जया स्थितीये २९

ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते । श्रद्दधानाः मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः ॥२०॥

इति श्रीभद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे भक्तियोगो नाम द्वादशोऽध्यायः १२

ते हे गोष्टी रम्य । अमृतधारा धर्म्य । करिती प्रतीतिगम्य । आइकोनि जे २३० तैसीचि श्रद्धेचेनि आदरें । जयांचे ठायीं विस्तरे। जीवीं जयां थारे। जे अनुष्ठिती ३१ परि निरूपिली जैसी। तैसीच स्थिति मानसीं । मग सुक्षेत्रीं जैसी । पेरणी केली ३२ परि मा हें परम करूनि। इये अर्थीं प्रेम धरूनि। हेंचि सर्वस्व मानूनि । घेती जे पैं ३३ पार्था गा जगीं । तेचि भक्त तेचि योगी। उत्कंठा तयांलागीं। अखंड मज ३४ ते तीर्थ ते क्षेत्र। जगीं तेचि पवित्र। भक्तिकथेसि मैत्र। जयां पुरुषां ३५ आह्मी तयांचें करूं ध्यान। ते आमुचें देवतार्चन। तेवांचूनि आन । गोमटें नाहीं ३६ तयांचें आह्मां व्यसन। ते आमुचें निधिनिधान । किंबहुना समाधान । तो मिळे तैं ३७ पै प्रेमळाची वार्ता। जे अनुवादती पांडुसुता । ते मानूं परमदेवता । आपुली आह्मी ३८ ऐसें निजजनानंदें। तेणें जगदादिकंदें। बोलिलें मुकुंदें। संजयो म्हणे ३९ राया जो निर्मळु। निष्कलंक लोककृपाळु । शरणागतां प्रतिपाळु । शरण्यु जो २४० पैं सुरसहायशीळु । लोकलालनलीळु। प्रणतप्रतिपाळु । हा खेळु जयाचा ४१ जो धर्मकीर्ति धवळु । अगाध दातृत्वें सरळु । अतुळबळें प्रबळु । बळिबंधनु ४२ जो भक्तजनवत्सलु । प्रेमळजन प्रांजलु। सत्यसेतु सकळु । कलानिधि ४३ तो श्रीकृष्ण वैकुंठींचा । चक्रवर्ती निजांचा। सांगे येरु दैवाचा । आइकतु असे ४४ आतां ययावरी। निरूपिती परि। संजयो म्हणे अवधारीं। धृतराष्ट्रातें ४५ तेचि रसाळ कथा। मन्हाठिया प्रतिपथा। आणिजेल आतां। अवधारिजो ४६ ज्ञानदेव म्हणे तुम्ही। संत वोळगावेति आह्मीं। हें पढविलों जी स्वामी। निवृत्तिदेवीं २४७

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥ श्लोक २०, ओंव्या २४७.

पाहतों; व नेहमीं आमच्या हातांत असणाऱ्या कमळानें त्यांचें पूजन करतों. २२ दोन हातांवर दुसरे दोन हात धारण करून त्यांना आलिंगन देण्याकरितां मी अवतरलों आहें! २४ त्यांच्या संगतीच्या सुखातिशयानें, निराकार जो मी, त्या मला देह धारण करावा लागला! फार काय सांगावें! ते माझे जीव कीं प्राण अहेत! २५ तेच एक आमचे परम मित्र आहेत असें म्हणण्यांत विशेष गोष्ट ती कोणती? तर इतकेंच नव्हे, परंतु जे त्यांचे चरित्र ऐकतात, २६ व जे माझ्या भक्तांच्याच चरित्राची प्रशंसा करितात, तेही माझ्या प्राणाहून मला जास्त आवडतात. २७ अर्जुना, तुला जो हा पूर्ण रीतीनें योग सांगितला, तो भगवत्प्राप्तीच्या उपायानें भरलेला असा पूर्ण 'भक्तियोग' आहे. २८ ज्या योगाच्या स्थितीची अशा थोरवी आहे कीं, ज्याच्यावर मी प्रीति करतों, आणि ज्याला आपल्या मनांत व मस्तकावर धारण करतों, २९

अन्वय–ये तु श्रद्दधानाः मत्परमाः भक्ताः इदं यथोक्तं धर्म्यामृतं पर्युपासते, ते मे अतीव प्रियाः (सन्ति). ॥ २० ॥

अर्थ–पण माझ्यावर श्रद्धा ठेवून आणि मत्पर होऊन जे माझे भक्त ह्या आतांपर्यंत सांगितलेल्या धर्म्यामृताचें सेवन करितात, ते मला अतिशय प्रिय होतात ॥ २० ॥

त्या ह्या योगाच्या रम्य, अमृत वर्षाव करणाऱ्या व धर्मास अनुकूल अशा गोष्टी ऐकून जे त्यांचा अनुभव घेतात; २३० त्याचप्रमाणें, त्या योगाचे ठिकाणीं पूर्ण श्रद्धा ठेवून ज्यांच्या मनांत तो उत्तम रीतीनें ठसतो, व त्याजविषयीं आपले मनांत पूर्ण विचार करून जे त्याचें आचरण करतात; ३१ व ज्यांच्या मनाची खरोखर अशी स्थिति होते, त्यांना, चांगल्या शेतांत पेरणी केली असतां जसें उत्तम पीक होतें, तसें उत्तम फळ प्राप्त होतें. ३२ परंतु मला परम श्रेष्ठ मानून व माझ्या ठिकाणीं प्रेम धरून, मी सर्वव्यापक आहें असें जे मानतात. ३३ तेच या जगतांत माझे भक्त व योगी होत; आणि म्हणूनच पार्था, त्यांच्याविषयीं मला अतिशय प्रेम असतें. ३४ ज्यांना भक्तिकथा अत्यंत आवडते, तेच या जगतांत आमचें तीर्थ; तेच क्षेत्र व तेच पवित्र पुरुष आहेत. ३५ त्यांचें आम्ही ध्यान करतों, तेच आमचे पूर्णदैवत, व त्यांशिवाय आम्हांला दुसरी आवडती गोष्ट कोणतीही नाहीं, ३६ त्यांचाच आम्हांला नाद लागतो, व तेच आमचा ठेवा होत: फार काय सांगावें! त्यांना पाहिल्याशिवाय आम्हांला समाधान होत नाहीं. ३७ हे पांडुसुता, माझ्या प्रेमळ भक्तांच्या गोष्टी जे सांगतील, तींच आमची परमदेवता असें आम्ही मानूं. ३८ संजय ह्मणतो:–सर्व जगास आनंद देणारा, व सर्व जगाचा उत्पन्न करणारा जो मुकुंद तो याप्रमाणें बोलला. ३९ राजा धृतराष्ट्रा, जो निर्मळ, निष्कलंक, लोकांवर कृपा करणारा, शरणागतांचें रक्षण करणारा, शरण जाण्यास योग्य, २४० देवांना साह्य करणें हेंच ज्याचें शील व लोकांचें लालन करणें हीच ज्याची लीला, व शरणागतांचें रक्षण करणें हाच ज्याचा खेळ आहे. ४१ जो धर्म व कीर्ति यांनीं स्वच्छ शोभणारा दान करण्यांत ज्याचा अगाध सरळपणा आहे, व निरुपम बळवान असून बळीच्या प्रेमबंधनानें बद्ध झाला आहे, ४२ जो भक्तजनाचा कनवाळू, प्रेमळ, जनाशीं मोकळ्या मनानें वागणारा, खऱ्या रीतीनें वागणाऱ्यांचा तारक, आणि चौदा विद्या व चौसष्ट कला यांचा निधि, ४३ तो भक्तांचा राजा वैकुंठनायक श्रीकृष्ण भगवान् दैवशाली अशा अर्जुनास सांगता झाला व त्यानें ऐकलें. ४४ संजय आणखी ह्मणतो:–हे राजा धृतराष्ट्रा, यापुढें कथा सांगण्याचा जो प्रकार आहे तो ऐक. ४५ तींच रसभरीत गोष्ट मराठी भाषेंत आम्ही सांगूं, ती ऐका. ४६ ज्ञानदेव ह्मणतात:–श्रोतेहो, तुम्हांसारख्या संतांना आह्मीं शरण जावें, हेंच आह्मांस आमच्या गुरूंनीं–निवृत्तिनाथांनीं शिकविलें आहे! २४७

ज्ञानेश्वरी.

अध्याय तेरावा.

आत्मरूप गणेशु केलिया स्मरण। सकळ विद्यांचें अधिकरण। तोचि वंदूं श्रीचरण। श्रीगुरूचे १ जयांचेनि आठवें। शब्दसृष्टी आंगवे। सारस्वत आघवें। जिव्हेसि ये २ वक्तृत्वा गोडपणें। अमृतातें पारुखें म्हणे। रस होती वोळंगणें। अक्षरांसी ३ भावाचें अवतरण। अवतरविती खुण। हाता चढे संपूर्ण। तत्त्वभेद ४ श्रीगरूचे पाय। जैं हृदय गिंवसूनि ठाय। तैं येवढें भाग्य होय। उन्मेषासी ५ ते नमस्कारूनि आतां। जो पितामहाचा पिता। लक्ष्मीयेचा भर्ता। ऐसें म्हणे ६

श्रीभगवानुवाचः—

इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते। एतद्यो वेत्ति तं प्राहुः क्षेत्रज्ञ इति तद्विदः ॥१॥

तरी पार्था परिसिजे। देह हें क्षेत्र म्हणिजे। जो हें जाणे तो बोलिजे। क्षेत्रज्ञु एथें ७

क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत। क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम् ॥२॥

तरी क्षेत्रज्ञु जो एथें। तो मी जाण निरुतें। जो सर्व क्षेत्रांतें। संगोपोनि असे ८ क्षेत्र आणि क्षेत्रज्ञातें। जाणणें जें निरुतें। ज्ञान ऐसें तयातें। मानूं आह्मी ९

तत्क्षेत्रं यच्च यादृक्च यद्विकारि यतश्च यत्। स च यो यत्प्रभावश्च तत्समासेन मे शृणु ॥३॥

तरि क्षेत्र येणें नांवें। हें शरीर जेणें भावें। म्हणितलें तें आघवें। सांगों आतां १० हें क्षेत्र कां म्हणिजे। कैसें कें हें उपजे। कवणकवणीं वाढविजे। विकारीं एथ ११ हें औट हात मोटकें। कीं केवढें पां केतुकें। बरड कीं पिके। कोणाचें हे १२ इत्यादि सर्व। जे जे याचे भाव। ते बोलिजती सावेव। अवधान देईं १३ पैं याचि स्थळाकारणें। श्रुति सदां बोबाणे। तर्कु येणेंचि ठी करणें। तोंडाळु केला १४ चाळितां होचि बोली। दर्शनें शेवटा आलीं। तेवींचि नाहीं बुझविलीं। अझुनी द्वंद्वें १५ शास्त्रांचिये सोयरिके। विचळिजे येणेंचि एकें। याचेनि एकवंकें। जगासि वादु १६ तोंडेंसी तोंडा न पडे। बोला बोलेंसी न घडे। इया युक्ति बडबडें। त्राय जाहली १७ नेणों कोणाचें हें स्थळ।

ज्ञानेश्वरी.

अध्याय तेरावा.

आत्मरूप गणेशाचें स्मरण करून, सर्व विद्यांचें आश्रयस्थान असे जे श्रीगुरूंचे चरण, त्यांस माझा नमस्कार असो. १ त्यांचें स्मरण केलें असतां सर्व कविताशक्ति स्वाधीन होते व सर्व विद्या जिव्हाग्रीं येतात, २तसेंच भाषणाला इतकें माधुर्य येतें कीं, तें अमृतासही फिक्कें पाडते; व तोंडांतून निघणाऱ्या प्रत्येक अक्षरास रस अनुकूल होतात; ३ गर्भित अर्थाची रेलचेल होऊन ते एकामागून एक सुचतात, व आत्मज्ञानाचें वर्म समजतें. ४ जर आपल्या मनांत श्रीगुरूंचे चरण नेहमीं आठवले, तर अशा रीतीनें ज्ञानाचा भाग्योदय होतो; ५ त्या गुरुचरणांस वंदन करून, ज्ञानेश्वरमहाराज म्हणतातः—ब्रह्मदेवाचा पिता व श्रीलक्ष्मीचा नाथ जे श्रीकृष्ण भगवान्, ते असें म्हणालेः—६

अन्वय—कौंतेय, इदं शरीरं क्षेत्रं इति अभिधीयते; यः एतत् वेत्ति, तं क्षेत्रज्ञः इति तद्विदः प्राहुः. ॥ १ ॥

अर्थ—श्रीभगवान म्हणालेः—हे कुंतीपुत्रा, या शरीराला 'क्षेत्र' म्हणतात; आणि जो हें जाणतो, त्याला, [क्षेत्र-क्षेत्रज्ञांचें ज्ञान असलेले] तत्त्वज्ञ 'क्षेत्रज्ञ' असें म्हणतात. ॥ १ ॥

पार्था, ऐक. या देहाला क्षेत्र असें म्हणतात; व जो हें क्षेत्र जाणतो, त्याला क्षेत्रज्ञ असें म्हणतात;७

अन्वय—भारत, सर्वक्षेत्रेषु मां अपि च क्षेत्रज्ञं विद्धिः यत् क्षेत्रक्षेत्रज्ञयोः ज्ञानं, तत् ज्ञानं (इति) मम मतं (अस्ति).

अर्थ—हे अर्जुना, सर्व क्षेत्रांमध्यें जो क्षेत्रज्ञ, तोही मीच आहें असें जाण. क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांचें जें ज्ञान, तेंच उत्तम ज्ञान, असा माझा अभिप्राय आहे. ॥ २ ॥

आणि क्षेत्रज्ञ ज्याला म्हणतात व जो सर्व क्षेत्रांचें पोषण करतो, तो मीच होय असें पक्कें समज. ८ ज्या ज्ञानानें क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यथार्थ जाणले जातात, त्यालाच आम्ही ज्ञान असें समजतों. ९

अन्वय—तत् क्षेत्रं यत् च, यादृक् च, यद्विकारि (च) यतः च यत्; सः च यः, यत्प्रभावः च (अस्ति) तत् (त्वं) मे समासेन शृणु. ॥ ३ ॥

अर्थ—तें क्षेत्र काय, कोणत्या प्रकारचें, व कोणत्या विकारांचें आहे, आणि त्यापासून कोणतीं कार्यें उत्पन्न होतात: आणि तो क्षेत्रज्ञ कोण, व त्याचें सामर्थ्य काय आहे, तें सर्व मजपासून संक्षेपानें ऐक. ॥ ३ ॥

तर आतां या शरीराला ज्या अभिप्रायानें 'क्षेत्र' हें नांव दिलें, तो सर्व अभिप्राय आम्ही सांगतों. १० याला क्षेत्र कां म्हणावें, हें कसें व कोठें उत्पन्न होतें, कोणत्या कोणत्या विकारांनीं हें वाढलें जातें, ११ हें लहान जें साडेतीन हातांचें आहे, तें केवढें मोठें व किती वजनदार आहे, तसेंच नापीक किंवा पिकाऊ, कोणाचें आहे, १२ इत्यादि जे जे याचे गुण आहेत, ते यथासांग आम्ही वर्णन करतों, तिकडे तूं लक्ष दे. १३ याच क्षेत्राकरितां श्रुतींची नेहमीं बडबड चालू आहे; व तर्कही याचाच निश्चय करण्याकरितां एकसारखी वाटाघाट करितो; १४ याच गोष्टीचा खल करतां करतां सहा शास्त्रें थकून स्वस्थ बसलीं; आणि म्हणूनच त्यांच्यांत अजून ऐक्य झालें नाहीं; १५ या क्षेत्राविषयीं एकमत स्थापन करण्याकरितां सर्व जगभर शास्त्रसंबंधयुक्त वाटाघाट चालू आहे. १६ पण अजून एकमेकांचीं तोंडें मिळालीं नाहींत, व ऐक्यही झालें नाहीं; आणि याच संबंधानें युक्ति लढवितां लढवितां शिकस्त झाली. १७ हें क्षेत्र कोणाचें आहे हें

परि कैसें अभिलाषाचें वळ । जे घरोघरीं कपाळ । पिटवीत असे १८ नास्तिका घावया तोंड । वेदांचें गाढें बंड । तें देखोनि पाखांड । आनचि वाजे १९ ह्मणती तुम्ही निर्मूळ । लटिकें हें वाग्जाळ । ना म्हणसी तरी पोफळ । घातलें आहे २० पाखांडाचे कडे । नागवीं लुंचिती मुंडें । नियोजिलीं वितंडें । ताळासि येती २१ मृत्युबळाचेनि माजें । हें जाईल वीण काजें । तें देखोनियां व्याजें । निघाले योगी २२ मृत्यूनि आधाधिले । तिहीं निरंजन सेविलें । यमानियमांचे केले । मेळावे पुरे २३ येणेंचि क्षेत्राभिमानें । राज्य त्यजिलें ईशानें । गुंति जाणोनि स्मशानें । वासु केला २४ ऐसिया पैजा महेशा । पांघुरणें दाही दिशा । लांचकरु ह्मणोनि कोळसा । कामु केला २५ पैं सत्यलोकनाथा । वदनें आलीं बळार्था । तरी तो सर्वथा । जाणेचिना २६

ऋषिभिर्बहुधा गीतं छंदोभिर्विविधैः पृथक् । ब्रह्मसूत्रपदैश्चैव हेतुमद्भिर्विनिश्चितैः ॥४॥

एक ह्मणती हें स्थळ । जीवाचेंचि समूळ । मग प्राण हें कूळ । तयाचें एथ २७ जया प्राणाचे घरीं । अंगें राबती भाऊ चारी । आणि मनाऐसा आवरी । कुळवाडीकरू २८ तयातें इंद्रियबैलांची पेटी । न म्हणे अवसीं पाहाटीं । विषयक्षेत्रीं आटी । काढी भली २९ मग विधीची वाफ चुकवी । आणि अन्यायाचें बीज वाफवी । कुकर्माचा करवी । ~~राजशाशीन यत्तज्ञी~~ नयाचिसारिखें । असंभड पाप पिके । मग जन्मकोटी दुःखें तें । जो सर्व क्षेत्रां नातरी विधीचिये वाफे । सत्क्रिया बीज आरोपे । तरी जन्मशत ज्ञान ऐसें । सुखचि मवि ३२ तंव आणिक म्हणती हें नव्हे । हें जिवाचेंचि न म्हणावें । आमुतें पुसा आघवें । क्षेत्राचें या ३३ अहो जीवु एथ उखिता । वस्तीकरु वाटे जातां । आणि प्राणु हा बलौता । ह्मणोनि जागें ३४ अनादि हे प्रकृती । सांख्य जियेतें गाती । क्षेत्र हे वृत्ती । तियेचि जाणा ३५ आणि तियेतेंचि आघवा । आथी घरमेळावा । म्हणोनि ते वाहिवा । घरीं वाहे ३६ बाह्याचिये रहाटी । जे कां मुद्दल तिघे इये सृष्टीं । ते इयेच्याचि पोटीं । जहाले गुण ३७ रजोगुण पेरी । तेतुलें सत्त्व सोकरी । मग एकलें तम करी । संवगणी ३८ रचूनि महत्तत्त्वाचें खळें । मळी एके काळुगेनि पोळें । तेथ अव्यक्ताची मिळे । सांज भली ३९ तंव एकीं मतिवंतीं । या बोलाचिया खंती । म्हणितलें या ज्ञती । अर्वाचीना ४० हां हो परतत्त्वाआंतु । कें प्रकृतीची मातु । हा क्षेत्रवृत्तांतु । उगोंचि आइका ४१ शून्यसेजे शा-

कोणी जाणत नाहीं, परंतु त्याच्या निःपणाबद्दलची काय थोरवी वर्णावी, कीं ज्याच्या योगानें घरोघर याचाच काथ्याकूट केला जातो ! १८ नास्तिकांचें तोंड बंद करण्याविषयीं वेद महान् प्रबळ आहे हें पाहून पाखांड्यांची वेदाविषयीं तिसरीच बडबड सुरू झाली. १९ ते म्हणतात: तुम्ही वेद निर्मूल असून व्यर्थ बडबड करणारे आहां, असें नाहीं म्हणाल तर, तसें सिद्ध करण्याकरितां प्रतिज्ञेची सुपारी टेविली आहे. २० पाखांड्यांचे थवेच्या थवे-कोणी कच्छहीन (कासोट्याविनांचून) बनून केस उपटून काढितात, तरी त्यांनीं ठरविलेले सर्व वितंडवाद आपोआप खालीं बसतात. २१ हें क्षेत्र मृत्यूच्या सपाट्यांत सांपडून निरर्थक जाईल म्हणून [आत्मा ब्रह्मांडीं नेऊन त्याचें संरक्षण करण्याकरितां] योगी पुढें सरसावतात. २२ जे मृत्यूला भितात, ते एकांतवास करून यमनियमांचें साधनसमुदाय जमवितात; २३ याच क्षेत्राच्या विचाराच्या अभिमानाकरितां श्रीशंकरांनीं राज्य सोडिलें; आणि त्यापासून आपल्यास उपाधि लागूं नये, म्हणून ते स्मशानांत जाऊन राहिले. २४ या क्षेत्राचें ज्ञान करून घेणार अशी प्रतिज्ञा करून शंकरांनीं वनांत राहून दाही दिशा हेंच आपलें पांघरूण असें मानलें; व काम हा योगभ्रष्ट करणारा (लांचखाऊ) असें जाणून त्यास जाळून टाकलें. २५ ह्याच गोष्टीचा निश्चय करण्याकरितां ब्रह्मदेवाला जरी चार तोंडें उत्पन्न झालीं, तरी त्यालाही या क्षेत्राची ओळख पटली नाहीं. २६

अन्वय–(इदं क्षेत्रक्षेत्रज्ञज्ञानं) ऋषिभिः बहुधा गीतं, तथा विविधैः छंदोभिः पृथक् गीतं) हेतुमद्भिः विनिश्चितैः ब्रह्मसूत्रपदैः च (गीतं) एव. ॥ ४ ॥

अर्थ–हें क्षेत्रक्षेत्रज्ञज्ञान ऋषींनीं बहुत प्रकारांनीं सांगितलें आहे; ऋग्वेदादि वेदांनीं वेगळें वेगळें सांगितलें आहे; आणि युक्तीनें युक्त व निश्चयरूप अशा ब्रह्मप्रतिपादक सूत्रांनीं व पदांनींही सांगितलें आहे ॥ ४ ॥

जे कर्मवादी आहेत, ते असें म्हणतात कीं, हें सर्व क्षेत्र जीवाच्या ताब्यांत असून त्याची सर्व व्यवस्था प्राणाकडे सोंपविली आहे. २७ ज्या प्राणाच्या वरीं त्याचे चार भाऊ (अपान, व्यान, समान व उदान हे अंगमेहनतीनें झटतात, व त्यांच्यावर मनासारखा देखरेख करणारा कुळवाड-आहे; २८ त्या जीवाजवळ पंचज्ञानेंद्रियें व पंचकर्मेंद्रियें मिळून दहा इंद्रियरूप बैलांची जोडी असून, तो रात्र, दिवस कांहीं न म्हणतां शरीराच्या ठिकाणीं मेहनत करवून घेऊन विषयाचा राब काढतो; २९ मग कर्तव्याची बाफ चुकवून (विहित कर्माचरणाची संधी दवडून) व अन्यायाचें बीज पेरून त्याला वाईट कर्मांचें खत घालतो; ३० त्या योगानें बीजाप्रमाणें अनन्वित पापें पिकून मग कोट्यवधि जन्मपर्यंत जीव दुःखें भोगितो. ३१ किंवा विहित कर्माचरणरूपी बाफ साधून सत्क्रियेचें बीज पेरल्यास कोट्यवधि जन्मपर्यंत सुखच भोगितो. ३२ पण सांख्यमतवाद्यांचें असें म्हणणें नसून ते म्हणतात कीं, क्षेत्र हें जीवाच्या स्वाधीन नाहीं;तें कोणाच्या स्वाधीन आहे तें सर्व आम्हांस पुसा. ३३ अहो, जीव हा उपरा वाटसरू असून वाट चालत असतांना क्षेत्रांत नुसती वस्ती करितो; आणि प्राण हा वतनदार असल्यामुळें जागा रहातो. ३४ ज्या अनादिसिद्ध प्रकृतीची सांख्यमतवादी स्तुति करतात, त्याप्रकृतीची या क्षेत्राचे ठिकाणीं वृत्ति आहे असें समजा; ३५ आणि त्या प्रकृतीच्या घरचा सर्व जमाव असल्यामुळें, क्षेत्राची सर्व वाहिवाट ती घरीं करते. ३६ त्या शेताची मूळ लागवड करणारे या सृष्टींत जे मुख्य तीन गुण, ते तिच्या पोटीं उत्पन्न झाले आहेत. ३७ रजोगुण हा पेरणी करतो, सत्त्वगुण हा राखतो, व मग एकटा तमोगुण सर्व पीक गोळा करतो. ३८ नंतर महत्तत्त्वाचें खळें करून काल नामक जबरदस्त पोळाकडून ती मळणी घालते; मग अव्यक्तरूपी आयतीच संध्याकाळ होते. ३९ इतक्यांत बुद्धिवान् संकल्पवाद्यांना हें बोलणें न रुचून ते म्हणाले कीं, या तुमच्या कल्पना अगदीं अलीकडल्या आहेत ! ४० अहो, ब्रह्मापुढें प्रकृतीची काय बाब ! या क्षेत्राची हकीकत आम्ही सांगतों, ती ऐका तर खरी ! ४१

लिये । सुलीनतेचिये तुळिये । निद्रा केली होती बळियें । संकल्पें येणें ४२ तो अवसांत चेइला । उघमीं सदैव भला । ह्मणोनि ठेवा जोडला । इच्छावशें ४३ निरालंबींची वाडी । होती त्रिभुवनायेवढी । हे तयाचिये जोडी । रूपा आली ४४ मग महाभूतांचें एकवाट । सैरा वेंटाळूनि भाट । भूतग्रामांचे आघाट । चिरिले चारी ४५ यावरी आदी । पांचभूतिकांची मांदी । बांधली प्रमेदीं । पंचभुतिकीं ४६ कर्माकर्माचे गुंडे । बांध घातले दोहींकडे । नपुंसकें बरडें । रानें केलीं ४७ तेथ येरझारेलागीं । जन्ममृत्यूची सुरंगी । सुहाविली निलागी । संकल्पें येणें ४८ मग अहंकारासि एकलाधी । करूनि जीवितावधी । वहाविलें बुद्धी । चराचर ४९ यापरी निराळीं । वाढे संकल्पाची डाहाळी । ह्मणोनि तो मुळीं । प्रपंचा यया ५० ययापरि मत्तमुगुतकीं । तेथ पडिघायिले आणिकीं । म्हणती हांहो विवेकी । कैसे तुम्ही ५१ परतत्त्वाचिया गांवीं । संकल्पसेज देखावी । तरि कां पां न मनावी । प्रकृति तयाची ५२ परि असो हें नव्हे । तुम्ही या न लगावें । आतांचि हें आघवें । सांगिजेल ५३ तरि आकाशीं कवणें । केलीं मेघाचीं भरणें । अंतरिक्ष तारांगणें । धरी कवण ५४ गगनाचा तडावा । कोणें वेढिला केधवां । पवनु हिंडतु असावा । हें कवणाचें मत ५५ रोमां कवण पेरी । सिंधू कवण भरी । पर्जन्याचिया करी । धारा कवण ५६ तैसें क्षेत्र हें स्वभावें । हे वृत्ती कवणाची नव्हे । हें वाहे तया फावे । येरां तुटे ५७ तंव आणिकें एकें । क्षोभें ह्मणितलें निकें । तरि भोगिजे एकें । काळें केविं हें ५८ तरि ययाचा मारु । देखतांति अनिवारु । परी स्वमतीं भरु । अभिमानियां ५९ हें जाणे मृत्यूचा रागिटा । सिंहाडयाचा दरकुटा । परि काय कीजे वांजटा । पूरीजत असे ६० महाकल्पापरौती । कव घालूनि अवचितीं । सत्यलोकभद्रजाती । आंगी वाजे ६१ लोकपाळ नित्य नवे । दिग्गजांचे मेळावे । स्वर्गींचिये आडवे । रिगोनि मोडी ६२ येर ययाचेनि अंगवातें । जन्ममृत्यूचिये गतें । निर्जिवें होऊनि भ्रमतें । जीवमृगें ६३ न्याहाळीं पां केव्हडा । पसरलासे चवडा । करूनियां माजिवडा । आकारगजु ६४ ह्मणोनि काळाची सत्ता । हाचि बोलु निरुता । ऐसे वाद पांडुसुता । क्षेत्रालागीं ६५ हे बहु उखिविखी । ऋषीं केली नैमिषीं । पुराणें इयेविषीं । मतपत्रिका ६६ अनुष्टुभादि छंदें । प्रबंधि जे एवंविधें । तें पत्रावलंबन मदें । करिती अझुनी ६७ वेदींचें बृहत्सामसूत्र । जें देखणेपणें पवित्र । परी त-

लयरूपी पलंगावरील शून्यरूपी बिछान्यावर बलवान् संकल्प निजला होता, ४२ तो अकस्मात जागा झाला, व तो आपल्या व्यापारांत नेहमीं तत्पर होता म्हणून त्याला त्याच्या इच्छेनुरूप ठेवा मिळाला; ४३ आणि त्या संकल्पाच्या निर्गुण स्वरूपाची त्रिभुवन.एवढी वाग त्याच्या खटपटीनें रंगाला आली. ४४ नंतर निरनिराळीं पंचमहाभूतें एकत्र करून, भूतग्रामांचें जारज, स्वेदज, अंडज, व उद्भिज्ज असे चार घाट रचिले; ४५ नंतर प्रथम पंचमहाभूतांचे निरनिराळे पोटभेद करून बांधे तयार केले; ४६ त्या घाटांच्या दोन्ही बाजूंस कर्म व अकर्म यांच्या ताली घातल्या, व त्यामधील नापीक जमिनीची म्हणजे पशुपक्षादिक हीं रानें बनविलीं; ४७ नंतर या संकल्पाच्या योगानें जन्ममृत्यूंच्या येरझारा करण्याकरितां सोपी व कधीं बंद न पडणारी अशी वाट तयार केली; ४८ मग संकल्पानें अहंकारावरोवर ऐक्य करून, बुद्धीकडून चराचरांची वहिवाट करवूं लागला ! ४९ याप्रमाणें चिदाकाशांत संकल्पाची ढाळी वाढल्यामुळें प्रपंचाला तो मूळ कारण झाला. ५० याप्रमाणें संकल्पवाद्यांची मुक्ताफळें रेकून, त्या ठिकाणीं जे दुसरे (स्वभाववादी) होते ते पुढें होऊन म्हणाले कीं, "आपण फार विद्वान् आहां, तरी आपलें मत आपले जवळच ठेवा. ५१ परब्रह्माच्या गांवांत जर संकल्पाचें बिऱ्हाड आहे, असें मानावयाचें, तर मग सांख्याची प्रकृती कां मानूं नये ? ५२ परंतु हें असो, तुम्ही या भानगडींत पडूं नका, हें काय प्रकरण आहे हें अस्मादिक सांगतील. ५३ तर आकाशांतील ढगांमध्यें पाण्याचा भरणा कोण करतो ? व अंतरिक्षांतील चांदण्या खालीं पडत नाहींत, त्यांना कोणाचा आधार आहे ? ५४ आकाशाचें छत मध्यें झोल न येतां जें सारखें ताणलेलें आहे, तें कोणी व केव्हां ताणलें ? आणि वाऱ्यास नेहमीं वाहण्यास कोणी सांगितलें आहे ? ५५ अंगावरील जी लव दिसते तिची पेरणी कोण करतो ? व समुद्र कधींही आटत नाहीं त्यांत पाणी कोण भरतो ? आणि पावसाच्या धारा कोण उत्पन्न करतो ? ५६ या गोष्टीप्रमाणें क्षेत्र हें स्वभावसिद्ध असून याचा कोणीही वतनदार नाहीं. जो यांत खपेल त्यास हें फलद्रूप होईल, व खपणार नाहीं त्यास फलद्रूप होणार नाहीं. " ५७ इतक्यांत दुसरे एक (कालवादी) रागावून म्हणाले कीं, " तुम्ही म्हणतां हें जर खरें आहे, तर या क्षेत्रावर कालाची सत्ता कां आहे ? ५८ तथापि, त्या कालाचा अनिवार सपाटा आहे हें जाणूनही, जे अभिमानी आहेत ते त्यास न जुमानतां आपल्याच मताचें समर्थन करतात. ५९ सिंहाच्या दरीप्रमाणें मृत्यु हा भयंकर आहे, असें समजून जर तुम्हीं या क्षेत्राबद्दल व्यर्थ बडबड केली, तर ती काय पुरी पडणार आहे ? ६० हा काळ महाकल्पापलीकडेहीं मिठी घालून, ब्रह्मदेवाचें स्थान जो सत्यलोक त्यालाही जाऊन मिठी मारतो, ६१ स्वर्गाच्या अरण्यांत शिरून अष्टलोकपाळ नित्य नवे करतो, व आठ दिशांच्या आठ ऐरावतांचा संहार करतो. ६२ याच्या अंगवायूनें जीवरूप मृग जन्ममृत्यूंच्या खळग्यांत पडून निर्जीव होऊन भ्रमण करतात. ६३ या कालानें हाताचा पंजा केवढा मोठा पसरला आहे तो पहा, कीं जगदाकाररूपी जो हत्ती तो यानें आपल्या तळहातांत धरिला आहे. ६४ म्हणून, काळाची सत्ता आहे असें म्हणतात; हीच गोष्ट खरी आहे. " याप्रमाणें, अर्जुना, या क्षेत्राबद्दल मतभेद आहेत. ६५ अशी पुष्कळ भवति न भवति नैमिषारण्याचे ठिकाणीं ऋषींनीं केली, याबद्दल आपल्यास पुराणांचा आधार आहे. ६६ वेदांतील अनुष्टुभादि छंदांत याबद्दल पुष्कळ चर्चा केली असून, या क्षेत्राविषयीं गर्वानें अद्याप ग्रंथ तयार करतात. ६७ वेदांतील बृहत्सामसूत्र—जें ज्ञानदृष्टीनें अति पवित्र आहे, त्यालाही क्षेत्र म्हणजे काय हें

याही हें क्षेत्र । नेणवेचि ६८ आणीक आणीकींही बहुतीं । महाकवीं हेतुमंतीं । ययालागीं मती । वेंचिलीया ६९ परि ऐसें हें एवढें । कीं अमुकेयाचेंचि फुडें । हें कोण्हाही वरपडे । होयचिना ७० आतां यावरी जैसें । क्षेत्र हें असे । तुज सांगों तैसें । साद्यंतु गा ७१

महाभूतान्यहंकारो बुद्धिरव्यक्तमेव च । इन्द्रियाणि दशैकं च पंच चेन्द्रियगोचराः ॥५॥
इच्छा द्वेषः सुखं दुःखं संघातश्चेतना धृति । एतत्क्षेत्रं समासेन सविकारमुदाहृतम् ॥६॥

तरि महाभूतपंचकु । आणि अहंकारु एकु । बुद्धि अव्यक्त दशकु । इंद्रियांचा ७२ मन आणीकही एकु । विषयांचा दशकु । सुख दुःख द्वेषु । संघात इच्छा ७३ आणि चेतना धृती । एवं क्षेत्रव्यक्ती । सांगितली तुजप्रती । आघवीची ७४ आतां महाभूतें कवणें । कवण विषयो कैसीं करणें । हें वेगळालेपणें । एकैक सांगों ७५ तरी पृथ्वी आप तेज । वायु व्योम इयें तुज । सांगितलीं बुझ । महाभूतें पांचें ७६ आणि जागतिये दशे । स्वप्न लपालें असे । नातरी अंवसे । चंद्र गूढु ७७ नाना अप्रौढबाळकीं । तारुण्य राहे थोकीं । कां न फुलतां कळिकीं । आमोदु जैसा ७८ किंबहुना काष्ठीं । वन्हि जेविं किरीटी । तेविं प्रकृतीचिया पोटीं । गोप्यु जो असे ७९ जैसा ज्वरु धातुगतु । अपथ्याचें मिष पहातु । मग जालिया आंतु- । बाहेरी व्यापी ८० तैसी पांचांही गांठी पडे । जैं देहाकारु उघडे । तैं नाचवी चहूंकडे । तो अहंकारु गा ८१ नवल अहंकाराची गोठी । विशेषें न लगे अज्ञानापाठीं । सज्ञानाचे झोंबे कंठीं । नाना संकटीं नाचवी ८२ आतां बुद्धि जे म्हणिजे । ते ऐशिया चिन्हीं जाणिजे । बोलिलें यदुराजें । तें आइकें सांगों ८३ तरी कंदर्पाचेनि बळें । इंद्रियवृत्तीचेनि मेळे । विभांडूनि येती पाळे । विषयांचे ८४ तो सुखदुःखांचा नागोवा । जेथ उगाणों लागे जीवा । तेथ दोहींसी बरवा । पाडु जे धरी ८५ हें सुख हें दुःख । हें पुण्य हे दोष । कां हें मैळ हें चोख । ऐसें जे निवडी ८६ जिये अधमोत्तम सुझे । जिये सानें थोर बुझे । जिया दिठी पारखिजे । विषो जिवें ८७ जे तेजतत्त्वाची आदी । जे सत्त्वगुणाची वृद्धी । जे आत्मया जीवाची संधी । वसवीत असे जे ८८ अर्जुना ते गा जाण । बुद्धि तूं संपूर्ण । आतां आइकें वोळखण । अव्यक्ताची ८९ पैं सांख्याचिया सिद्धांतीं । प्रकृती जे महामती । तेचि एथें प्रस्तुतीं । अव्यक्त गा ९० आणि सांख्ययोगमतें । प्रकृती परिसविली तूतें ।

समजलें नाहीं; ६८ आणखी पुष्कळ दूरदर्शी महाकवि या क्षेत्राबद्दल वादविवाद करून थकले; ६९ परंतु हें एवढें विकट आहे कीं, हें खरोखर कोणाचें आहे हें सांगतां येत नाहीं;व कोणच्याही स्वाधीन होत नाहीं ७० तर आतां क्षेत्र म्हणजे काय आहे याविषयीं साद्यंत विचार तुला मी सांगतों. ७१

अन्वय–महाभूतानि, अहंकारः, बुद्धिः, अव्यक्तं एव च, दश इंद्रियाणि च, एक (मनः), इंद्रियगोचराः पंच च, ॥ ५ ॥ इच्छा, द्वेषः, सुखं, दुःखं, संघातः, चेतना, धृतिः, एतत् सविकारं क्षेत्रं मया समासेन उदाहृतम् ॥ ६ ॥

अर्थ–पंचमहाभूतें, अहंकार, बुद्धि, अव्यक्त आणि दहा इंद्रियें, मन, आणि श्रोत्रादिक ज्ञानेंद्रियांचे पांच विषय; [व वागादि कर्मेंद्रियांचे पांच विषय,] ॥ ५ ॥ इच्छा, द्वेष, सुख, दुःख, संघात [समुदाय], चेतना, व धैर्य एतद्विकारयुक्त असें हें शरीर संक्षेपानें मीं सांगितलें. ॥ ६ ॥

तर पंचमहाभूतें, अहंकार, बुद्धि, प्रकृति, पंचज्ञानेंद्रियें व पंचकर्मेंद्रियें मिळून दहा इंद्रियें,७२ एक मन, ज्ञानेंद्रियांचे पांच व कर्मेंदियाचे पांच असे दहा विषय, सुख, दुःख, द्वेष, संघात,इच्छा, ७३ चेतना (आत्मसत्ता) आणि धृति याप्रमाणें या क्षेत्राचीं छत्तीस तत्त्वें आहेत तीं तुला सर्व सांगितलीं.७४ आतां,महाभूतें कोणतीं, विषय कोणते, इंद्रियें कोणतीं,हें प्रत्येकाचें वर्णन निरनिराळें करून तुला सांगतों.७५ हें पहा–पृथ्वी,अप्, तेज, वायु व आकाश हीं पंचमहाभूतें आहेत असें समज; ७६ –अहंकाराचें रूप दृष्टांतपूर्वक सांगतात–आणि जागृदवस्थेंत जसें स्वप्न गुप्त असतें, किंवा अमावास्येच्या दिवशीं चंद्र जसा गुप्त असतो,७७ अथवा लहान बालकाच्या ठिकाणीं तारुण्य जसें गुप्त असतें, किंवा फुलाची कळी उमलण्याच्या पूर्वी जसा तिच्यांत सुगंध गुप्त असतो; ७८ किंबहुना,अर्जुना, लांकडांत ज्याप्रमाणें अग्नि गुप्त असतो, त्याप्रमाणें मायेच्या पोटांत जो गुप्त असतो; ७९ ज्याप्रमाणें हंडाज्वर हा कुपथ्याचें निमित्त होण्याची वाट पहात असतो, व तेंच झाल्यावर तो शरिराला अंतर्बाह्य व्यापून टाकतो, ८० त्याप्रमाणें पंचमहाभूतांची गांठ पडून ज्या वेळीं देहाचा आकार बनतो, त्या वेळीं त्या देहाला जो चहूंकडे नाचवितो, त्यालाच अहंकार असें म्हणतात. ८१ या अहंकाराची अशी गंमत आहे कीं, तो अज्ञानाच्या पाठीस न लागतां सज्ञानाच्या पाठीस लागून त्याला नानाप्रकारच्या संकटांत घालतो. ८२ यदुराज श्रीकृष्ण म्हणतातः–अर्जुना ! ऐक.आतां, बुद्धि जिला म्हणतात, ती या खुणांनीं जाणावीः ८३ कामाचा जोर उत्पन्न झाल्यावर जी इंद्रियांच्या सहाय्यानें विषयांचे समुदाय जिंकून आणते; ८४ त्या सुखदुःखांच्या लुटीचा जेव्हां जीवास अनुभव घ्यावा लागतो, तेव्हां सुख व दुःख यांत जास्ती योग्यता कोणाची आहे हें जिच्या योगानें समजतें; ८५ हें सुख व हें दुःख,हें पुण्य व हें पाप हें वाईट व हें चांगलें, असें जिच्या योगानें निवडतां येतें;८६जिच्या योगानें उच्च-नीच हें समजतें,लहानमोठें कळतें,व जिच्या दृष्टीनें जीवांना विषय ओळखतां येतात८७जी ज्ञानतत्त्वाचें मूळ,जी सत्वगुणाची वाढती दशा, आणि जी आत्मा व जीव या दोहोंच्या संधींत असते, ८८ अर्जुना, तीच बुद्धि आहे असें समज. आतां अव्यक्ताचीं सर्व लक्षणें तुला सांगतों, ती ऐक. ८९ हे महाबुद्धिमंता, सांख्यांच्या मतानें जिला प्रकृति हें नांव आहे, तेंच तूं सध्यां अव्यक्त असें समज. ९० आणि पूर्वी [सातव्या अध्यायांत] सांख्य व योग या मतांतील प्रकृतीचे दोन प्रकार पुष्कळ विस्तारानें जेथें वर्णिले

ऐसी दोहीं परी जेथें। विवंचिली ९१ तेथ दुजी जे जीवदशा। तिये नांव वीरेशा। येथें अव्यक्त ऐसा। पर्यावो हा ९६ तन्ही पाहालया रजनी। तारा लोपती गगनीं। कां हारपे अस्तमानीं। भूतक्रिया ९३ नातरी देहो गेलिया पाठीं। देहादिक किरीटी। उपाधि लपे पोटीं। कृतकर्माचा ९४ कां बीजमुद्रेआंतु। थोके तरु समस्तु। कां वस्त्रपणें तंतु-। दशे राहे ९५ तैसे सांडूनियां स्थूळधर्म। महाभूतें भूतग्राम। लया जाती सूक्ष्म। होऊनि जेथें ९६ अर्जुना तया नांवें। अव्यक्त हें जाणावें। आतां आइकें आघवे। इंद्रियभेद ९७ तरि श्रवण नयन। त्वचा घ्राण रसन। इयें जाणें ज्ञान-। करणें पांचें ९८ इये तत्त्वमेळापंकीं। सुखदुःखाची उखिविखी। बुद्धि [illegible]रीते मुखीं। पांचें इहीं ९९ मग वाचा आणि कर। चरण आणि अधोद्वार [illegible]षयो १०० प्रकार। पांच आणिक १०० कर्मेंद्रियें म्हणिपती। तीं इयें जाणिती। [illegible] वायु व्यो[illegible]ती। सांगतसे१ पैं प्राणाची अंतौरी। क्रियाशक्ति जे शरीरीं। तियेचि रिगिनिगी द्वारीं। पांचें इहीं २ एवं दाहाही करणें। सांगितलीं देवो म्हणे। परिस आतां फुडेपणें। मन तें ऐसें ३ जें इंद्रियां आणि बुद्धी। माझारिलिये संधीं। रजोगुणाच्या खांदीं। तरळत असे ४ नीळिमा अंबरीं। कां मृगतृष्णा लहरीं। तैसें वायांचि फरारी। वावो जाहलें ५ आणि शुक्रशोणिताचा सांधा। मिळतां पांचांचा बांधा। वायुतत्त्व दशधा। एकचि जाहलें ६ मग तिहीं दाहेभागीं। देहधर्माच्या खैवंगीं। अधिष्ठिलें आंगीं। आपुलाला ७ तेथ चांचल्य निखळ। एकलें ठेलें निढाळ। ह्मणोनि रजाचें बळ। धरिलें तेणें ८ तें बुद्धीसी बाहेरी। अहंकाराच्या उरावरी। ऐसा ठायीं माझारीं। बळियावलें ९ वायां मन हें नांव। एऱ्हवीं कल्पनाचि सावेव। जयाचेनि संगें जीव-। दशा वस्तु ११० जें प्रवृत्तीसि मूळ। कामा जयाचे बळ। जें अखंड सूये छळ। अहंकारासी ११ जें इच्छेतें वाढवी। आशेतें चढवी। जें पाठीं पुरवी। भयासि गा १२ द्वैत जेथें उठी। अविद्या जेणें लाठी। जें इंद्रियांतें लोटी। विषयांमाजी १३ संकल्पें सृष्टी घडी। सर्वांचि विकल्पूनि मोडी। मनोरथांच्या उतरडी। उतरी रची १४ जें भुलीचें कुहर। वायुतत्त्वाचें अंतर। बुद्धीचें द्वार। झांकविलें जेणें १५ तें गा किरीटी मन। या बोला नाहीं आन। आतां विषयाभिधान-। भेदु आइकें १६ तरी स्पर्शु आणि शब्दु। रूप रस गंधु। हा विषयो पंचविधु। ज्ञानेंद्रियांचा १७ इहीं पांचै द्वारीं। ज्ञानासि धांव

आहेत, ९१ यांतील दुसरी जी जीवदशा, तिलाच हे वीरश्रेष्ठा अर्जुना, अव्यक्त असें पर्यायानें ह्मणत आहोंत. ९२ पहांट झाल्यावर ज्याप्रमाणें आकाशांतील नक्षत्रें नाहींतशीं होतात, अथवा अस्तमान झाल्यावर प्राणिमात्राचे व्यापार बंद होतात, ९३ अथवा,अर्जुना, देह नाहींसा झाल्यावर देहापासून वासनेपर्यंत सर्व विकार केलेल्या कर्मांत गुप्त असतात; ९४ किंवा बीजाच्या आकारांत जसा वृक्ष अंतर्गत असतो; अथवा तंतूच्या दशेंत ज्याप्रमाणें वस्त्र अंतर्गत असतें, ९५ त्याप्रमाणें महाभूतें व भूतांचा समुदाय आपला स्थूल धर्म टाकून ज्या ठिकाणीं सूक्ष्म होऊन अंतर्धान पावतात, ९६ त्यालाच अर्जुना, अव्यक्त असें समज. आतां सर्व इंद्रियांचे भेद तुला सांगतों, ते ऐक. ९७ कान, डोळे, त्वचा, नाक, व जिव्हा हीं पांच ज्ञानेंद्रियें आहेत. ९८ या पांच तत्त्वांचें ऐक्य झालें ह्मणजे ह्यांच्याद्वारें बुद्धि ही सुखदुःखांचा विचार करते.९९ वाचा,हात,पाय,गुद व शिश्न हे इंद्रियांचे आणखी पांच प्रकार आहेत.१००श्रीकृष्ण ह्मणतात, "अर्जुना, ज्यांना कर्मेंद्रियें ह्मणतात तीं हीं होत. १ प्राणाची स्त्री क्रियाशक्ति, जी या शरिरांत वास करते, ती त्या पांच कर्मेंद्रियांच्या द्वारानें आंतबाहेर जाण्यायेण्याचा व्यापार करते. २ श्रीकृष्ण ह्मणतातः-याप्रमाणें पंचज्ञानेंद्रियें व पंचकर्मेंद्रियें अशीं दहा इंद्रियें सांगितलीं.आतां मन ह्मणजे काय तें तुला स्पष्टपणें सांगतों, तें ऐक. ३ जें इंद्रियें आणि बुद्धि या दोहोंच्या सांध्यामध्यें रजोगुणाच्या खांदीवर चमकत असतें; ४ ज्याप्रमाणें आकाशाचा नीलवर्ण अथवा मृगजलाच्या लाटा व्यर्थ भासतात; त्याप्रमाणें वायूचें जें व्यर्थ चमकणें, तेंच मन आहे; ५ आणि शुक्र व शोणित यांचें ऐक्य होऊन जेव्हां पंचतत्त्वांचा आधार बनतो, तेव्हां एका त्रयुतत्त्वाचे स्थानभेदानें पांच प्राण व पांच उपप्राण असे दहा प्रकार होतात. ६ मग ते दहा भाग आपापल्या धर्माच्या बळानें देहांतील एक एक भागाच्या ठिकाणीं वस्ती करतात. ७ त्यांमध्यें निखालस चंचलपणा राहिल्यानें त्याचे अंगीं रजोगुणाचें बळ उत्पन्न होतें, ८ तें बुद्धीच्या बाहेर व अहंकाराच्या वरावर अशा मध्यभागांत बलाढ्य होतें. ९ त्याला मन हें व्यर्थ नांव आहे. एरवीं तें मूर्तिमंत कल्पनारूपच होय. ज्याच्या योगानें ब्रह्माला जीवदशा ध्यावी लागली, ११० जें कोणतीही गोष्ट करण्यास मूळ कारण आहे, ज्याच्या योगानें वासना उत्पन्न होते, व जें नेहमीं अहंकाराशीं स्पर्धा करतें, १११ ज्याच्या योगानें इच्छा वाढते; आशा प्रबळ होते, व ज्याच्या योगानें भयाला मदत होते; ११२ ज्याच्या ठिकाणीं द्वैतभाव उत्पन्न होतो व अज्ञान ज्याच्या योगानें जोरावतें, जें इंद्रियांना विषयांत ढकलितें; ११३ जें एका क्षणांत सृष्टि उत्पन्न करतें, व ती लागलीच मोडूनही टाकतें आणि मनोरथांच्या उतरंडी रचतें व उतरतें. ११४ जें भ्रमाचें कोठार व वायुतत्त्वाचा अर्क आहे; व जें बुद्धीचें कांहीं चालूं देत नाहीं ह्मणजे तिला कोंडून टाकतें, ११५ त्यालाच, अर्जुना, मन ह्मणतात हें निःसंशय होय. आतां विषयांचे भेद ऐक. १६ शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध हे पांच ज्ञानेंद्रियांचे पांच विषय आहेत. १७ ज्याप्रमाणें जनावर हिरव्या चाऱ्याकडे धांव घेतें, त्याप्रमाणें ह्या

वाहेरी। जैसा कां हिरवे चारीं। भांबावे पशु १८ मग स्वर वर्ण विसर्गु। अथवा स्वीकार त्यागु। संक्रमण उत्सर्गु। विण्मूत्राचा १९ हे कर्मेंद्रियांचे पांच। विषय गा साच। जे बांधोनियां माच। क्रिया धांवे १२० ऐसे हे दाही। विषय गा इये देहीं। आतां इच्छा तेही। सांगिजैल २१ तरि भूतलें आठवे। कां बोलें कान झांकवे। ऐसियावरि चेतवे। जे गा वृत्ती २२ इंद्रियाविषयांचिये भेटी-। सरसीच जे गा उठी। कामाची बाहुटीं। धरूनियां २३ जियेचेनि उठिलेपणें। मना सैंघ धांवणें! न रिघावें तेथ करणें! तोंडें सुती २४ जिये वृत्तीचिया आवडी। बुद्धी होय वेडी। विषयां जिया गोडी। ते गा इच्छा २५ आणि इच्छिलिया सांगडें। इंद्रियां आमिष न जोडे। जेथ जोडेऐसा जो डावो पडे। तोचि द्वेषु २६ आतां यावरी सुख। तें एवंविध देख। जेणें एकेंचि अशेष। विसरे जिवु २७ मना वाचे काये। जे आपुली आण वाये। देहस्मृतीची त्राये। मोडित जे ये २८ जयाचेनि जालेपणें। पांगुळा होइजे प्राणें। सात्विकासी दुणें। वरीही लाभु २९ कां आघवियाचि इंद्रियवृत्ती। हृदयाचिया एकांतीं। थापट्टनि सुषुप्ति। आणी जें गा १३० किंबहुना सोये। जीव आत्मयाची लाहे। तेथ जें होये। तया नाम सुख ३१ आणि ऐसी हे अवस्था। न जोडतां पार्था। जी जें तेंचि सर्वथा। दुःख जाणें ३२ तें मनोरथसंगें नव्हे। एऱ्हवीं सिद्धि गेलेंचि आहे। हे दोनीचि उपाये। सुखदुःखासी ३३ आतां असंगा साक्षिभूता। देहीं चैतन्याची जे सत्ता। तिये नाम पांडुसुता। चेतना येथें ३४ जे नखौनि केशवरी। उभी जागे शरीरीं। जे तिहीं अवस्थांतरी। पालटेना ३५ मनबुद्ध्यादि आघवीं जियेचेनि टवटवी। प्रकृतिवनमाधवी। सदांचि जे ३६ जडाजडीं अंशीं। राहाटे जे सरिसी। ते चेतना गा तुजसीं। लटिकें नाहीं ३७ पैं रावो परिवारु नेणे। आज्ञाचि परचक्र जिणे। कां चंद्राचेनि पूर्णपणें। सिंधू भरती ३८ नाना भ्रामकाचें सन्निधान। लोहो करी सचेतन। कां सूर्यसंगु जन। चेष्टवी गा ३९ अगा मुखमेळेंविण। पिलियाचें पोषण। करी निरीक्षण। कूर्मी जेवीं १४० पार्था तियापरी। आत्मसंगती इये शरीरीं। सजीवत्वाचा करी। उपेगु जडा ४१ मग तियेतें चेतना। म्हणिपे पैं अर्जुना। आतां धृतिविवंचना-। भेदु आइक ४२ तरी तत्वां परस्परें। उघड जातिस्वभाववैरें। नव्हे पृथ्वीतें नीरें। न नाशिजे ४३ नीरातें आटी तेज।

पांच ज्ञानेंद्रियांच्या द्वारानें ज्ञान बाहेर धांव घेतें. १८ नग स्वर व वर्ण यांचा उच्चार. वस्तु घेणें व टाकणें, चालणें व मलमूत्र विसर्जन करणें १९ हे पांच कर्मेंद्रियाचे पांच विषय आहेत. ज्यांच्या आधारानें क्रिया बाहेर धांव घेते, १२० असे हे ज्ञानेंद्रियांचे व कर्मेंद्रियांचे दहा विषय या देहांत आहेत. आतां इच्छा म्हणजे काय त सांगतों. २१ पूर्वी ज्या पदार्थाचा उपभोग घेतला आहे, त्याची आठवण होणें; आणि कानावर शब्द पडण्यावरोवर जी प्रकाशित होणारी वृत्ति, २२ इंद्रियांची व विषयांची गांठ पडतांक्षणींच कामाचा टेका घेऊन जी लागलीच उत्पन्न होते, २३ ज्या वृत्तीच्या उद्भवण्यानें मन इकडे तिकडे धांवूं लागतें व जिकडे जाऊं नये अशा ठिकाणी इंद्रियें तोंडें घालतात; २४ ज्या वृत्तीच्या संगतीनें बुद्धि वेडी होते व जिची विषयांवर आवड असते, त्या वृत्तीला इच्छा असें म्हणतात; २५ आणि इच्छा उत्पन्न होण्यावरोवर इंद्रियांना विषय उपभोगास मिळाले नाहींत तर त्या वेळीं जी वृत्ति उत्पन्न होते, तिला द्वेष असें म्हणतात. २६ आतां सुख हें या लक्षणांनीं जाणावें कीं, जे प्राप्त झालें असतां इतर सर्व वस्तूंचा जिवाला विसर पडतो. २७ जें काया, वाचा आणि मन यांना आपली शपथ घालून देहाच्या आठवणीचा नाश करतें; २८ जें प्राप्त झाले असतां प्राण लंगडा पडून सात्विक वृत्ति पूर्वीपेक्षा दुप्पट वाढते; २९ सगळ्या इंद्रियांच्या वृत्तींना हृदयाच्या एकांतांत थोपटून जें निद्रा घेण्यास लावतें; १३० फार काय सांगावें! जीवाला ज्या ठिकाणीं आत्म्याचा लाभ होतो, त्यालाच सुख असें म्हणतात; ३१ आणि पार्था, अशी ही स्थिति न लाभतां जी स्थिति असतें, तेंच खरोखर दुःख असें समज. ३२ ज्या ठिकाणीं कल्पना उत्पन्न झाली, त्या ठिकाणीं सुख होत नाहीं. एरव्ही, कल्पना नाहींशी झाल्यावर तें सहजानुसार प्राप्तच आहे. म्हणून, कल्पना नाहींशी होणें, उत्पन्न होणें हींच सुखदुःखांला कारण आहेत. ३३ आतां अर्जुना, अचिंत व सर्वसाक्षिभूत अशा ब्रह्माची (चैतन्याची) जी देहांत सत्ता आहे, तिला चेतना असें म्हणतात. ३४ या शरीरांत जी नखशिखांत नेहमीं जागृत असते, व जागृति, स्वप्न, सुषुप्ति, या तिन्ही अवस्थांमध्यें जिच्यांत फरक पडत नाहीं; ३५ जिच्या योगानें मन, बुद्धि इत्यादिकांना टवटवी असते व जी मायारूप वनाला नेहमीं वसंत ऋतूप्रमाणें प्रफुल्लित ठेवते; ३६ आणि जड व चेतन वस्तूंत जिचा अंशरूपानें सारखा संचार असतो. तिला चेतना असें म्हणतात, यांत संशय नाहीं. ३७ हें पहा—राजा जसा आपल्या लवाजम्यास जाणत नसून, त्याच्या फक्त आज्ञेनेंच त्याची प्रजा परचक्रांस जिंकिते; किंवा चंद्राच्या योगानें जशी समुद्रास भरती येते; ३८ अथवा लोहचुंबकाच्या सान्निध्यानें जसा लोखंडास चंचलपणा येतो; किंवा सूर्याचा प्रकाश जसा सर्व जीवांकडून व्यापार घडवितो; ३९ अथवा स्तनास तोंड लावल्याशिवाय कांसवी ज्याप्रमाणें केवळ नजरेनेंच आपल्या पिलांचें पोषण करते, १४० त्याप्रमाणें, अर्जुना या शरीरांत जी आत्म्याच्या संमतीनें जड वस्तूला सजीवपणा आणते, ४१ तिलाच बाबारे, चेतना हें नांव आहे. आतां धैर्याचे भेद कोणते आहेत ते ऐक. ४२ पंचतत्त्वाचें एकमेकांशीं जातिस्वभावावरून उघड वैर असतें. पहा कीं, पाणी हें पृथ्वीचा नाश करीत नाहीं का? ४३ पाण्याचें शोषण तेज करतें,

तेजा वायूसिं जुंझ । आणि गगन तंव सहज । वायू भक्षी ४४ तेवींचि कोणेही वेळे । आपण कायिसयाही न मिळे । आंत रिघोनि वेगळें । आकाश हें ४५ ऐसीं हीं पांचही भूतें । न साहती एकमेकांतें । कीं तियेंही ऐक्यातें । देहासी येती ४६ द्वंद्वाची उखिविखी । मोडूनि वसती एकी । एकएकातें पोखी । निजगुणें गा ४७ ऐसें न मिळे तयां साजणें । चळे धैर्यें जेणें । तयां नांव ह्मणे । धृती मी गा ४८ आणि जीवेंसी पांडवा । या छत्तिसांचा मेळावा । तो हा एथ जाणावा । संघातु पैं गा ४९ एवं छत्तीसही भेद । सांगितले तुज विशद । यया येतुलेयातें प्रसिद्ध । क्षेत्र म्हणिजे १५० रथांगांचा मेळावा । जेविं रथु म्हणिजे पांडवा । कां अधोर्ध्व अवेवां । नाव देहो ५१ करीतुरंगसमाजें । सेना नाम निफजे । कां वाक्यें ह्मणिपती पुंजे । अक्षरांचे ५२ कां जळधारांचा मेळा । वाच्य होय आभाळा । नाना लोकां सकळां । नाम जग ५३ कां स्नेहसूत्रवन्ही । मेळु एकिचि स्थानीं । धरिजे तो जनीं । दीपु होय ५४ तैसीं छत्तीसही इयें तत्त्वें । मिळती जेणें एकत्वें । तेणें समूहपरत्वें । क्षेत्र ह्मणिपे ५५ आणि वाहतेनि भौतिकें । पाप पुण्य येथें पिके । ह्मणोनि आह्मी कौतुकें । क्षेत्र ह्मणों ५६ आणि एकाचेनि मतें । देह म्हणती ययातें । परि असो हें अनंतें । नामें यया ५७ पैं परतत्त्वाअरौतें । स्थावराआंतौतें । जें कांहीं होतें जातें । तें क्षेत्रचि हें ५८ परि सुर नर उरगीं । घडत आहे योनिविभागीं । तें गुणकर्मसंगीं । पडिलें साते ५९ होचि गुणाविवंचना । पुढां ह्मणिपैल अर्जुना । प्रस्तुत आतां तुज ज्ञाना । रूप दावूं १६० क्षेत्र तंव सविस्तर । सांगितलें सविकार । ह्मणोनि आतां उदार । ज्ञान आइकें ६१ जया ज्ञानालागीं । गगन गिळिताति योगी । स्वर्गाची आडवंगी । उमरडोनि ६२ । न करिती सिद्धीची चाड । न धरिती ऋद्धीची भीड । योगाऐसें दुवाड । हेळसिती ६३ तपोदुर्गें वोलांडित । क्रतुकोटि वोवांडित । उलथूनि सांडित । कर्मवल्ली ६४ नानाभजनमार्गीं । धांवत उघडिया आंगीं । एक रिघताति सुरंगीं । सुषुम्नेचिये ६५ ऐसी जिये ज्ञानीं । मुनीश्वरांची उतान्ही । वेदतरूच्या पानोवानीं । हिंडताती ६६ देईल गुरुसेवा । इया पांडोवा । जन्मशताचा सांडीवा । टाकित जे ६७ जया ज्ञानाची गिवणी । अविद्ये उणें आणी । जीवात्मया बुझावणी । मांडूनि दे ६८ जें इंद्रियांचीं द्वारें आडी । प्रवृत्तीचे पाय मोडी । जें दैन्याचि फेडी । मानसाचें ६९ द्वैताचा दुकाळु पाहे । साम्याचें सुयाणें होये । जया ज्ञा-

तेज वायूवरोवर झगडतें, आणि आकाश हें वायूस सहज भक्षून टाकतें; ४४ त्याचप्रमाणें कधींही कशावरोवर न मिळतां सर्वत्र ओतप्रोत भरलेलें असून आकाश वेगळें असतें; ४५ अशा प्रकारें पंचमहाभूतें एकमेकांशीं विरुद्ध असूनही देहामध्यें एकत्र रहातात. ४६ दुजेपणाचा वादविवाद सोडून एकत्र राहून जीं आपल्या गुणांनीं एकमेकांचें पोषण करतात; ४७ याप्रमाणें न होणारी मैत्री जिच्या योगानें होते, व धैर्य कायम रहातें, त्या वृत्तीला मी धृति असें म्हणतों. ४८ आणि हे पांडवा, जीवासह या छत्तीस तत्त्वांचें जें ऐक्य होतें, त्यालाच संघात असें ह्मणतात. ४९ याप्रमाणें हे छत्तीस भेद तुला स्पष्ट रीतीनें सांगितले, व या सर्वांना मिळून क्षेत्र हें नांव प्राप्त झालें आहे. १५० वा अर्जुना, रथाचे सर्व भाग मिळून जसें रथ हें नांव येतें; किंवा पायापासून डोक्यापर्यंत सर्व अवयव मिळून देह हें नांव येतें. ५१ अथवा हत्ती, घोडे, रथ व पायदळ या सर्वांना मिळून जसें सेना हें नांव येतें, किंवा अक्षरांच्या समुदायाला वाक्य असें म्हणतात; ५२ मेघांच्या सर्व समुदायाला जसें आभाळ म्हणतात; किंवा सर्व लोकांच्या समुदायाला ज्याप्रमाणें जग असें म्हणतात; ५३ अथवा तेल, वात व अग्नि हीं एकत्र मिळालीं म्हणजे ज्याप्रमाणें त्याला दिवा असें लोक ह्मणतात ५४त्याचप्रमाणें, हीं छत्तीस तत्त्वें जेव्हां एके ठिकाणीं मिळतात; तेव्हां त्या सर्वांना मिळून क्षेत्र म्हणतात, ५५ आणि सर्व प्राणी जगतांत राहाटून जी पापाची किंवा पुण्याईची कमाई येथें करतात, तेंच पीक समजून यास आम्ही क्षेत्र (शेत) असें कौतुकानें म्हटलें, ५६ आणि कोणी या क्षेत्रास देह असें ह्मणतात. पण तें असो, याला अनेक नांवें आहेत. ५७ हें पहा–ब्रह्माच्यां अलीकडे ब्रह्मदेवापासून स्थावरजंगमापर्यंत जेवढें कांहीं निर्माण होतें व लय पावतें, तें सर्व क्षेत्रच होय. [हेंच क्षेत्राचें मुख्यलक्षण होय.] ५८परंतु देव, मनुष्य सर्प, असे निरनिराळ्या योनींत जे निर्माण होतात, ते सत्व, रज व तम या गुणांची संगति वडल्यानें उत्पन्न होतात. ५९ अर्जुना, या गुणांचा विचार पुढें [चौदाव्या अध्यायांत] सांगू. सध्यां तुला ज्ञानाचें स्वरूप काय आहे तें सांगतों. १६० क्षेत्राचीं एकंदर सर्व लक्षणें विकारासह तुला सांगितलीं; तर यापुढें ज्यापासून मोक्षप्राप्ति होते त्या उदार ज्ञानाविषयीं तुला सांगतों, तें ऐक. ६१ ज्या ज्ञानाकरितां योगी लोक स्वर्गाचा आडमार्ग ओलांडून ब्रह्मरंध्र आकाश गिळून टाकतात; ६२ सिद्धींची गरज वाळगीत नाहींत, ऋद्धींची मीड धरीत नाहींत, व कठीण असें जें योगसाधन त्याची हेळना करतात; ६३ तपोरूपी किल्ले ओलांडून, कोट्यवधि यज्ञ ओंवाळून टाकून कर्मकांडरूप वस्ती उपटून टाकतात; ६४ पुष्कळ प्रकारचे उपासनामार्ग स्वीकारून कोणी उघड्या अंगानेंच वागतात, व कोणी सुषुम्नेच्या गुप्त मार्गानें जातात; ६५ असें जें ज्ञान, त्याच्या प्राप्तीकरितां सर्व ऋषि उत्कट इच्छा मनांत धारण करून, वेदरूपी झाडाच्या पानांवरून हिंडतात. (वेदांत सांगितलेल्या सर्व मार्गांचें शोधन करतात.) ६६ हे पांडवा, गुरूची सेवा केली असतां त्यापासून ज्ञानप्राप्ति होईल, या बुद्धीनें पुढील येणाऱ्या अनेक जन्मांची गुरुसेवेवरून ओंवाळणी करतात, ६७ ज्या ज्ञानाची प्राप्ति झाली असतां अज्ञान नाहींसें होतें; व जीवाचें आणि आत्म्याचें ऐक्य होतें, ६८ जें ज्ञान इंद्रियांस विषयांची इच्छा होऊं देत नाहीं, कर्माची हाव मोडून टाकितें, व मनाची काळजी दूर करितें; ६९ ज्या ज्ञानाचा लाभ झाला असतां द्वैताचा अभाव होतो,

नाची सोये । ऐसें करी १७० मदाचा ठावोचि पुसी । जें महामोहातें ग्रासी । नेदी आपपरु ऐसी । भाष उरों ७१ जें संसारातें उन्मूळी । संकल्पपंकु पाखाळी । अनावरातें वेंटाळी । ज्ञेयातें जें ७२ जयाचेनि जालेपणें । पांगुळ होइजे प्राणें । जयाचेनि विंदाणें । जग हें चेष्टे ७३ जयाचेनि उजाळें । उघडती बुद्धीचे डोळे । जीवु दोंदावरी लोळे । आनंदाचिया ७४ ऐसें जें ज्ञान । पवित्रैकनिधान । जेथ विटाळलें मन । चोख कीजे ७५ आत्मया जीवबुद्धी । जे लागली होती क्षयव्याधी । ते जयाचिया सन्निधी । निरुजा कीजे ७६ तें अनिरूप कीं निरूपिजे । ऐकतां बुद्धी आणिजे । वांचूनि डोळां देखिजे । ऐसें नाहीं ७७ मग तेचि इये शरीरीं । जैं आपुला प्रभावो करी । तैं इंद्रियांचिया व्यापारीं । डोळांहि दिसे ७८ पैं वसंताचें रिगवणें । झाडांचेनि साजेपणें । जाणिजे तेविं करणें । सांगती ज्ञान ७९ अगा वृक्षासि पाताळीं । जळ सांपडे मुळीं । तें शाखांचिये बाहाळीं । बाहेर दिसे १८० कां भूमीचें मार्दव । सांगें कोंभाची लवलव । नाना आचारगौरव । सुकुलीनाचें ८१ अथवा संभ्रमाचिया आयती । स्नेहो जैसा ये व्यक्ती । कां दर्शनाचिये प्रशस्तीं । पुण्यपुरुष ८२ नातरी केळीं कापूर जाहला । जेविं परिमळें जाणों आला । कां भिंगारीं दीपु ठेविला । बाहेरि फांके ८३ तैसें हृदयींचेनि ज्ञानें । जिये देहीं उमटती चिन्हें । तियें सांगों आतां अवधानें । चांगें आइक ८४

अमानित्वमदंभित्वमहिंसा क्षांतिरार्जवम् । आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः ॥७॥

तरी कवणेही विषयींचें । साम्य होणें न रुचे । संभावितपणाचें । वोझें जया ८५ आथिलेचि गुण वानितां । मान्यपणें मानितां । योग्यतेचें येतां । रूप आंगा ८६ तैं गजबजों लागे कैसा । व्याधें रुंधला मृगु जैसा । कां बाहीं तरतां वळसा । दाटला जेविं ८७ पार्था तेणें पाडें । सन्मानें जो सांकडे । गरिमेतें आंगाकडे । येवोंचि नेदी ८८ पूज्यता डोळां न देखावी । स्वकीर्ती कानां नायकावी । हा अमुका ऐसी नोहावी । सेचि लोकां ८९ तेथ सत्काराची कें गोठी । कें आदरा देईल भेटी । मरणेंसीं साटी । नमस्कारितां १९० वाचस्पतीचेनि पाडें । सर्वज्ञता तरी जोडे । परि वेडिवेमाजि दडे । महिमेभेणें ९१ चातुर्य लपवी । महत्त्व हारवी । पीसेपण मिरवी । आवडोनी ९२ लौकिकाचा उद्वेगु । शास्त्रांवरी उबगु । उगेपणीं चांगु । आथी भरु ९३ जगें अव-

व अद्वैताचा सुकाळ होतो; १७० ज्याच्या योगानें गर्वाचा मागमूस नाहींसा होतो; जें मायेला थारा देत नाहीं, व ज्याच्या ठिकाणीं आपपरभाव उरत नाहीं; ७१ जें संसाराला उपटून टाकितें, संकल्परूपी चिखल धुवून टाकितें, व सर्वव्यापक परब्रह्माची भेट करून देतें. ७२ जें प्राप्त झालें असतां प्राण पांगळा होतो, (इंद्रियांकडून विषयोपभोग मिळविण्याची त्याची हांव बंद होते.) व ज्याच्या सत्तेनें सर्व जगतांतील व्यापार चालत असतात; ७३ आणि ज्याच्या प्रकाशानें बुद्धि प्रौढ होऊन जीव आनंदमय होतो, ७४ असें जें ज्ञान, जें पवित्रपणाचा ठेवा, व जें प्राप्त झालें असतां विषयांनीं बिटाळलेलें मन निर्मळ होतें; ७५ 'मी जीव आहें' असा जो आत्म्याला क्षयरोग लागलेला असतो, तो ज्याच्या प्राप्तीनें लय पावतो, ७६ तें ज्ञान निरूपण करण्यास अशक्य असूनही आम्हीं समजून सांगतों, तर तें ऐकून नीट समजून घे. बाकी तें डोळ्यांसमोर दिसेल अशी वस्तु नाहीं. ७७ मग तेंच ज्ञान ज्या वेळेस या शरीरांत उत्पन्न होतें, त्या वेळीं इंद्रियांच्या आचरणावरून दृष्टोत्पत्तीस येतें. ७८ ज्याप्रमाणें झाडाच्या टवटवीतपणावरून वसंत ऋतू सुरू झाला हें समजतें, त्याप्रमाणें इंद्रियांच्या व्यापारांवरून ज्ञानप्राप्तीची लोकांस ओळख होते,७९. अरे ! झाडाला जमिनींत मुळाशीं पाणी मिळालें म्हणजे फांद्यांच्या विस्तारावरही जशी त्याची टवटवी दिसते, १८० अथवा कोंबाच्या कोंवळेपणावरून जसा जमिनीचा मृदुपणा दिसून येतो, किंवा कुलीन मनुष्याच्या वागण्याच्या पद्धतीवरून त्याचा थोरपणा दिसून येतो; ८१ अथवा आदरातिथ्यावरून जसा स्नेहभाव दृष्टीस पडतो, किंवा एकाद्याचें दर्शन होतांच मनाला प्रशस्तपणा आल्यामुळें हा पुण्यपुरुष आहे असें कळून येतें, ८२ अथवा केळींत उत्पन्न झालेला कापूर जसा वासानें समजून येतो, किंवा तावदानांत ठेविलेल्या दिव्याचा ज्याप्रमाणें बाहेर प्रकाश पडतो, ८३ त्याप्रमाणें, हृदयांत ज्ञानप्राप्ति झाल्यावर जीं शरीरावर त्याचीं लक्षणें दृष्टीस पडतात तीं आतां सांगतों, तीं लक्ष देऊन उत्तम रीतीनें ऐक. ८४

अन्वय—अमानित्वं, अदंभित्वं, अहिंसा, क्षांतिः, आर्जव आचार्य उपासनं, शौचं, स्थैर्य, आत्मविनिग्रहः; ॥ ७ ॥

अर्थ—मनाची इच्छा नसणें, दांभिकपणा नसणें, अहिंसा, क्षांति [शांति] सरळपणा, आचार्योपासन, अंतर्बाह्य शुचिर्भूतपणा, स्थिरता, आणि आत्मसंयम;॥ ७॥

कोणत्याही रीतीनें व्यवहारांत सर्व गोष्टी जुळून येण्याची ज्याला आवड नसते,व लोकांनीं संभावित म्हटलें असतां ज्याला कराकाष्टेचें ओझें वाटतें;८५ असलेले गुण वर्णन केले असतां, लोकांनीं सन्मान केला असतां, किंवा अंगची योग्यता लोकांनीं वर्णन केली असतां, ८६ कसा घाबरा होतो म्हणशील, तर व्याघ्रानें अडविलेला हरिण, किंवा नदी पोहून पलीकडे जात असतांना भोंवऱ्यांत सांपडलेला मनुष्यच ! ८७ अशा प्रकारें, पूर्वी, लोकांनीं सन्मान केला असतां जो कष्टी होतो, व आपल्याकडे मोठेपणा येऊं देत नाहीं;८८ आपल्यास लोकांनीं पूज्य मानलेलें आपण न पहावें, आपली कीर्ति आपल्या कानांनीं न ऐकावी, व आपण अमुक आहों अशी लोकांना आठवण सुद्धां होऊं नये, अशी ज्या पुरुषाची इच्छा असते, ८९ त्या पुरुषाचे ठिकाणीं सत्काराची गोष्ट कशास बोलावी ? व तो आदराचा तरी कसा स्वीकार करणार ? कोणी त्यास नमस्कार केला असतां त्याला तें मरण वाटतें!१९० बृहस्पतीसारखी सर्वज्ञता जरी अंगीं असली,तरी आपलें माहात्म्य लोकांत वाढेल या भीतीनें जो वेड्यासारखा वागतो; ९१ आपल्या अंगचें शहाणपण दाखवीत नाहीं, आपला मोठेपणा सोडून देतो, आणि मोठ्या प्रेमानें वेडेपणा स्वीकारतो; ९२ ज्याला कीर्तीचा कंटाळा असून, प्रवृत्तिशास्त्रावरील वादविवादाची हयगय करून स्वस्थपणें बसण्याचींच फार आवड असते; ९३ लोकांनीं आपला अपमान

ज्ञाचि करावी । संबंधीं सोयचि न धरावी । ऐसी ऐसी जीवीं । चाड बहु ९४ तळौटेपण वाणे । आंगीं हिणावो खेवणें । तें तेंचि करणें । बहुतकरुनी ९५ हा जीतु ना नोहे । लोक कल्पी येणें भावें । तैसें जिणें होआवें । ऐसी आशा ९६ पैं चालतु कां नोहे । कीं वारेनि जातु आहे । जना ऐसा भ्रमु जाये । तैसें होइजे ९७ माझें असतेपण लोपो । नामरूप हारपो । मज झणें वासिपो । भूत-जात ९८ ऐसी जयाचीं नवसियें । जो नित्य एकांता जातु जाये । नामेंचि जो जिये । विजनाचेनि ९९ वायू आणि तया पडे । गगनेसीं बोलों आवडे । जीवें प्राणें झाडें । पडियंतीं जया २०० किंबहुना ऐसीं । चिन्हें जया देखसी । जाण तया ज्ञानेंमीं । शेज जाहली १ पैं अमानित्व पुरुषीं । तें जाणावें इहीं मिषीं । आतां अदंभाचिया वोळखीसी । सौरसु देवों २ तरि अदंभित्व ऐसें । लोभियाचें मन जैसें । जीवु जावो परि नुमसे । ठेविला ठावो ३ तयापरी किरीटी । पडिलाही प्राणसंकटीं । परि सुकृत न प्रकटी । आंगें बोलें ४ खडाणे आला पान्हा । पळवी जेवीं अर्जुना । कां लपवी पण्यांगना । वडिलपण ५ आढचु आतुडे आडवीं । मग आढचता जेविं हारवी । नातरी कुळवधू लपवी । अवे-वांतें ६ नाना कृषीवळु आपुलें । पांघुरवी पोरिलें । तैसें झांकी निपजलें । दान-पुण्य ७ वरिवरी देहो न पूजी । लोकांतें न रंजी । स्वधर्मु वाग्ध्वजीं । बांधों नेणे ८ परोपकारु न बोले । न मिरवी अभ्यासिले । न शके विकूं जोडलें । स्फीतीसाठीं ९ शरीरभोगाकडे । पहातां कृपणु आवडे । एऱ्हवीं धर्मविषयीं थोडें । बहु न म्हणे २१० घरीं दिसे सांकड । देहींची आयती रोड । परि दानीं जया होड । सुरतरूसीं ११ किंबहुना स्वधर्मीं थोरु । अवसरीं उदारु । आत्म-चर्चे चतुरु । एऱ्हवीं वेडा १२ केळींचें दळवाडें । हळू पोकळ आवडे । परि फळोनियां गाढें । रसाळ जैसें १३ कां मेघाचें आंग झील । दिसे वारेनि जैसें जाईल । परि वर्षती नवल । घनवट तें १४ तैसा जो पूर्णपणीं । पाहतां धाती आयणी । एऱ्हवीं तरी वाणी । तोचि ठावो १५ हें असो या चिन्हांचा । नट-नाचु ठायीं जयाच्या । जाण ज्ञान तयाच्या । हातां चढे १६ पैं गा अदंभपण । ह्मणितलें तें हें जाण । आतां आईक खुण । अहिंसेची १७ तरि अहिंसा बहुतीं परी । बोलिली असे अवधारीं । आपुलालिया मतांतरीं । निरूपिली १८ परि ते ऐसी देखा । जैशा खांडुनियां शाखा । मग तयाचिया बुडुखा । कुंप

करावा, व आप्तवर्गांनीं आपली संगती धरूं नये अशा प्रकारची ज्याच्या मनाला फार आवड असते, ९४ अगांत नम्रपणा पूर्ण भरलेला असून हीनपणा हें आपलें भूषण होईल अशाच गोष्टी तो बहुतकरून करतो; ९५ आपण जीवंत आहों किंवा नाहीं असें लोकांस वाटावयाजोगें आपलें वर्तन असावें, अशी जो इच्छा करतो; ९६ हा आपल्या पायांनीं चालत आहे किंवा वाऱ्यानें ढकलाला जात आहे असें लोकांस वाटावें असें जो इच्छितो; ९७ प्राणिमात्राला माझ्यापासून कदाचित् भय वाटेल म्हणून माझ्या अस्थित्वाचा लोप होवो, माझें नांवरूप नाहींसें होवो, ९८ असे ज्याचे देवापाशीं नवस असतात; जो नित्य एकांतवास करतो, व एकादी जागा निर्जन आहे असें ऐकल्यावरोबर आनंद पावतो; ९९ वायूच्या अनुरोधानें जो वागतो, व आकाशाबरोबर ज्याला बोलणें आवडतें, व ज्याला झाडेंच जीव कीं प्राण आहेत; २०० किंबहुना हीं लक्षणें ज्याच्या अगांत आहेत, असें दृष्टीस पडेल, तोच ज्ञानाच्या बिछान्यावर आहे म्हणजे त्यालाच ज्ञान हस्तगत झालें आहे असें समज. १ म्हणून [अमानित्व] जो मनुष्य अभिमानरहित आहे, तो या लक्षणांनीं ओळखावा. आतां अदांभिकत्व ओळखण्याचे अभिप्राय सांगतों. २ तर अदंभित्व असें असतें कीं, ज्याप्रमाणें कृपणाचें मन; त्याचा जीव गेला तरी तो आपल्या पुरून ठेवलेल्या पैशाचें ठिकाण कोणालाही सांगावयाचा नाहीं. ३ त्याप्रमाणें, अर्जुना आपल्या प्राणावर येऊन बेतली तरी तो आपलें सुकृत स्वत: बोलून दाखवीत नाहीं. ४ ज्याप्रमाणें खोडकर गाय आलेला पान्हा पळविते, किंवा वेश्या आपलें प्रौढ वय लपविते; ५ एकाद्या धनवान् मनुष्याला अरण्यांत चोरट्यांनीं गांठलें असतां तो ज्याप्रमाणें आपली श्रीमंती प्रगट करीत नाहीं; किंवा कुलीन मुलगी आपले विशेष अवयव वस्त्रांनीं आच्छादित करिते; ६ अथवा, धान्य पेरल्यावर त्याच्यावर कुळवानें माती ओढून शेतकरी ज्याप्रमाणें तें झांकून टाकतो, त्याप्रमाणें, आपण केलेलें दान व पुण्य जो कोणासही कळूं देत नाहीं; ७ आपल्या देहास सुशोभित करीत नाहीं, लोकांचें आजिव करीत नाहीं, आणि आपल्या दानधर्माविषयीं आपणच टिमकी वाजवीत नाहीं ! ८ तसेंच, लोकांवर उपकार केलेले बोलून दाखवीत नाहीं; आपल्यास येत असलेल्या विद्येची प्रौढी मिरवित नाहीं; व प्रतिष्ठेसाठीं आपल्या विद्येचा विक्रय करित नाहीं; ९ आपल्या शरीराच्या उपभोगाकरितां कृपणाप्रमाणें कांहीं खर्च करीत नाहीं; बाकी धर्माची बाब आली म्हणजे थोडा फार न म्हणतां हवा तेवढा खर्च करीतो; २१० घरांत पाहिलें असतां सर्व प्रकारें अडचण असून स्वत:चें शरीर पाहूं गेलें असतां रोड असावयाचें; परंतु दान करण्याची वेळ आली म्हणजे कल्पवृक्षालाही मागें हटविते; ११ फार काय सांगावें ! स्वधर्माचें आचरण करण्यांत जो गंभीर असून प्रसंग आला असतां अति उदार असतो, आणि त्याचप्रमाणें आत्मानात्मविचाराच्या गोष्टी निघाल्या असतां जो वादविवादांत महाचतुर असतो, बाकी इतर बाबतींत पाहूं लागलें असतां वेड्यासारखा दिसतो; १२ केळीचीं सोंपटें हलकीं व पोकळ दिसलीं तरी त्यांचीं फळें मोठीं रसाळ असतात. १३ किंवा मेघ ज्याप्रमाणें दिसण्यांत हलके असून सहज वाऱ्यानें जातील असें दिसतात, परंतु वर्षाव होऊं लागला म्हणजे ते भरींव आहेत असा निश्चय होतो. १४ त्याप्रमाणें, ज्याची पूर्णता पाहिली असतां बुद्धीला समाधान वाटतें व वाणीला वर्णन करण्यास ठिकाण तोच असतो १५ हें असो; ह्या चिन्हांचा ज्याच्या ठिकाणीं धुमाकूल दृष्टीस पडतो, त्याच्या हातीं ज्ञान आलें असें समज. १६ अदांभिकत्व ज्याला म्हणतात, तें हें होय. आतां अहिंसेचीं लक्षणें सांगतों, तीं ऐक. १७ हें पहा— अहिंसेचें पुष्कळ प्रकारच्या मतवाद्यांनीं आपापल्या मताप्रमाणें वर्णन केलें आहे, तें ऐक. १८ परंतु ती अहिंसा इतकी चमत्कारिक आहे कीं, ज्याप्रमाणें झाडांच्या फांद्या तोडून त्या झाडाच्या बुध्या-

कीजे १९ का वाहु तोडोनि पचाविजे। मग भुकेची पीडा राखिजे। नाना देऊळ मोडूनि कीजे। पौळी देवा २२० तैसी हिंसाचि करूनि अहिंसा। निफजविजे हा ऐसा। पैं पूर्वमीमांसा। निर्णो केला २१ जे अवृष्टीचेनि उपद्रवें। गादलें विश्व आघवें। ह्मणोनि पर्जन्येष्टी करावे। नाना याग २२ तंव तिये इष्टीचिया बुडीं। पशुहिंसा रोकडी। मग अहिंसेची थडी। कैंची दिसे २३ पेरिजे नुसधी हिंसा। तेथ उगवैल काय अहिंसा। परी नवल बापा धिंवसा। या याज्ञिकांचा २४ आणि आयुर्वेदु आघवा। तो याच मोहोरा पांडवा। जे जीवाकारणें करावा। जीवघातु २५ नानारोगें अहाळलीं। लोळती भूतें देखिलीं। ते हिंसा निवारावया केली। चिकित्सा कां २६ तंव ते चिकित्से पहिलें। एकाचे कंद खणविले। एका उपडाविलें। समूळीं सपत्नीं २७ एकें आड मोडविली। अजंगमाची खाल काढविली। एकें गर्भिणी उकडविली। पुटामाजीं २८ अजातशत्रु तरुवरां। सर्वांगीं देवविल्या शिरा। ऐसे जीव घेऊनि धनुर्धरा। कोरडे केले २९ आणि जंगमाही हात। लाऊनि काढिलें पित्त। मग राखिले शिणत। आणिक जीव २३० अहो वसतीं धवळारें। मोडूनि केलीं देव्हारें। नागवूनि वेव्हारें। गवादी घातली ३१ मस्तक पांघुरविलें। तंव तळवटीं उघडें पडलें। घर मोडोनि केले। मांडव पुढें ३२ नाना पांघुरणें। जाळूनि जैसें तापणें। कां जालें आंगधुणें। कुंजराचें ३३ नातरी बैल विकूनि गोठा। पुंसा लावोनि बांधिजे गांठा। इया करणी कीं चेष्टा। काइ हंसों३४ एकीं धर्माचिया वाहणी। गाळूं आदरिलें पाणी। तंव गाळितया आहाळणी। जीव मेले ३५ एक न पचवितीचि कण। इये हिंसेचे भेण। तेथ कदर्थले प्राण। तेचि हिंसा ३६ एवं हिंसाचि अहिंसा। कर्मकांडीं हा ऐसा। सिद्धांतु सुमनसा। वोळखें तूं ३७ पाहिलें अहिंसेचें नांव। आह्मी केलें जंव। तंव स्फूर्ति बांधली हांव। इये मती ३८ तरि कैसेनि ययातें गाळावें। ह्मणोनि पाडलें बोलावें। तेवींचि तुवांही जाणावें। ऐसा भावो ३९ बहुतकरूनि किरीटी। हाचि विषयो इये गोठी। एऱ्हवीं कां आडवाटीं। धांविजैल २४० आणि स्वमताचिया निर्धारा-। लागोनियां धनुर्धरा। प्राप्ता मतांतरां। निर्वेचु कीजे ४१ ऐसी हे अवधारीं। निरूपिती परी। आतां ययावरी। मुख्य जें ४२ तें स्वमत बोलिजैल। अहिंसे रूप किजैल। जिया उठलिया आंतुल।

भोंवतीं त्यचेंच कुंपण घालणें, १९ किंवा आपले हात तोडून ते शिजवून आपली भूक शमन करणें, अथवा देऊळ मोडून त्याच सामानानें देवाभोंवतीं आवार बांधणें, २२० त्याप्रमाणें यज्ञादिकर्मांत हिंसा करून मग तिच्यापासून अहिंसा उत्पन्न करावयाची असा चमत्कारिक कर्मकांडकारांनीं निर्णय केला आहे. २१ कारण, पावसाच्या अवर्षणामुळें सर्व जग गांजून गेलें म्हणून पर्जन्याकरितां काकारिरी इत्यादि याग करितात. २२ तों त्या यागाच्या मुळाशीं पाहूं गेलें असतां पशूची हिंसा ही स्पष्ट घडून येते; मग अहिंसेचा जो पलीकडील कांठ, तो त्या ठिकाणीं कसा दृष्टीस पडणार? २३ जर केवळ हिंसाच पेरली, तर त्या ठिकाणीं अहिंसा उगवेल काय? परंतु अर्जुना, या याज्ञिकांच्या हौसेची कमाल आहे! २४ वा पांडवा, सर्व वैद्यकग्रंथ अशाच तऱ्हेचे आहेत कीं, एका जीवाचें रक्षण करण्याकरितां दुसऱ्या जीवाचा घात करावा! २५ नानाप्रकारच्या रोगांनीं ग्रस्त होऊन पुष्कळ जीव लोळत आहेत, असें पाहून ह्या घडत असलेल्या हिंसेच्या निवारणार्थ रोगाची परीक्षा करून औषधांची योजना करितात; २६ त्या औषधांच्या योजनेकरितां प्रथम एका झाडाचें मूळ खणून आणतात, व दुसऱ्या झुडपाला मुळासकट उपटून आणतात; २७ एक झाड मध्येंच मोडतात, एका मोठ्या झाडाची साल काढून आणतात, व गाभण असलेला जीव खाली वर आच्छादन घालून उकडून काढतात. २८ ज्याला शत्रुभाव मुळींच नाहीं अशा झाडाच्या सर्वांगावर घाव घालून त्यांतून निघणारा चीक काढून घेतात याप्रमाणें, धनुर्धरा, सर्व वनस्पतींचें सत्व नाहींसें करून तीं झाडें वठवितात; २९ आणि सजीवांच्या अंगांत हात घालून त्यांचें पोटांतील पित्त काढून घेतात, व त्यामुळें पीडित झालेले पुष्कळ जीव रक्षण करतात. २३० अहो, नांदतीं घरें मोडून त्यांचे देव्हारे किंवा देऊळें केलीं, सावकार बुचाडून अन्नसत्रें घातलीं, ३१ डोक्याला वस्त्र गंडाळल्यामुळें खालचें अंग उघडें पडलें, पुढील आंगण उघडें होतें त्यावर घर मोडून मांडव घातले; ३२ अथवा पांघरुणें जाळून शेकुटी केली ती जशी व्यर्थ, किंवा हत्तीला स्नान घालणें व्यर्थ, कारण हत्तीला स्नान घालून स्वच्छ धुऊन काढल्यावर पाण्यांतून वर येतांच पुनः तो सोंडेनें चिखल घेऊन आपलें अंग भरवितो; ३३ किंवा बैल विकून टाकून त्या पैशांचा गोटा बांधणें, अथवा राघू हांकून देऊन मग त्याच्याकरितां पिंजरा तयार करणें, याचें नांव काम कीं चेष्टा! आणि यास काय हंसावें कीं रडावें! ३४ कोणी धर्मसंप्रदायाप्रमाणें पाणी गाळून पिऊं लागतात, तों चिरगुटांतील पाणी पिऊन घेतेवेळीं जीव मरतात; ३५ कोणी हिंसा होईल या भीतीनें धान्य न शिजवितां उपाशींच रहातात, त्यामुळें त्यांचे प्राण व्याकूळ होतात हीही हिंसाच होते; ३६ याप्रमाणें, हे प्रसन्न मनाच्या अर्जुना, हिंसेलाच कर्मकांडांत अहिंसा मानून सिद्धांत केला आहे, तो नीट समजून घे. ३७ पहिल्या प्रथम अहिंसेचीं लक्षणें सांगावीं असें जेव्हां आम्ही मनांत आणलें, तेव्हां आमच्या बुद्धीला असें वाटलें कीं, अगोदर खऱ्या अहिंसेचीं लक्षणें सांगावीं. ३८ परंतु वर वर्णन केलेल्या नांवाच्या मात्र अहिंसा यांना कशा गाळाव्या, म्हणून त्यांचें वर्णन करावें लागलें, त्याचप्रमाणें तुलाही कळावें असा आमच्या अंतःकरणांत भाव होता. ३९ अर्जुना, मुख्यत्वेंकरून हाच हेतु मनांत येऊन आम्हीं तुला अहिंसेचीं लक्षणें सांगितलीं. बाकी आडमार्गानें कोणी उगीच धांवेल का? ३४० आणि अर्जुना, आपलें मत स्थापन करण्याकरितां दुसऱ्यांच्या मतांविषयीं विचार करावा लागतो. ४१ ह्याप्रमाणें आपलें मत स्पष्ट सांगण्याची ही रीत आहे; तर आतां यापुढें आमचें जें मुख्य मत आहे, तें ऐक. ४२ तें आमचें मत स्पष्ट सांगून अहिंसेचीं लक्षणें सांगूं. जी अहिंसा अंतः-

ज्ञान दिसे ४३ परि तें अधिष्ठिलेनि आंगें । जाणिजे आचरतेनि बागें । जैसी कसवटी सांगे । वानियातें ४४ तैसें ज्ञानामनाचिये भेटी । सरिसेंसि अहिंसेचें बिंब उठी । तेंचि ऐसें किरीटी । परिस आतां ४५ तरि तरंगु नोलांडितु । लहरी पायें न फोडितु । सांचलु न मोडतु । पाणियाचा ४६ वेगें आणि लेसा । दिठी घालूनि आंविसा । जळीं वकु जैसा । पाउल सुये ४७ कां कमळावरी भ्रमर । पाय ठेविती हळुवार । कुचंबैल केसर । इया शंका ४८ तैसें परमाणु पां गुंतले । जाणूनि जीव सानुले । कारुण्यामाजि पाउलें । लपवूनि चाले४९ ते वाट कृपेची करितु । ते दिशाचि स्नेहभरितु । जीवातळीं आंथरितु । आपुला जीवु २५० ऐसिया जतना । चालणें जया अर्जुना । हें अनिर्वाच्य परिमाणा पुरिजेना ५१ पैं मोहाचेनि सांगडें । लासी पिलीं धरी तोंडें । तेथ दांतांचे आगरडे । लागती जैसे ५२ कां स्नेहाळु माये । तान्हयाची वास पाहे । तिये दिठी आहे । हळूवार जें ५३ नाना कमळदळें । डोलेविजती ढाळें । तो जेणें पाडें बुबुळें । वारा घेपे ५४ तैसेनि मार्दवें पाय । भूमीवरी न्यसीतु जाय । लागती तेथ होय । जीवां सुख ५५ ऐसिया लघिमा चालतां । कृमि कीटक पांडुसुता । देखे तरि माघौता । हळूचि निघे ५६ म्हणे पावो धडफडील । तरि स्वामीची निद्रा मोडैल । रचलेपणा पडैल । झोती हन ५७ इया काकुळती । वाहणी घे माघौती । कोणेही व्यक्ती । न वचे वरी ५८ जीवाचेनि नांवें । तृणातेंही नोलांडावे । मग न लेखितां जावें । हे कें गोठी ५९ मुंगिये मेरु नोलांडवे । मशका सिंधु न तरवे । तैसें भेटालियां न करवे । अतिक्रमु २६० ऐसी जयाची चाली । कृपाफळीं फळा आली । देखसी जियाली । दया वाचे ६१ स्वयें श्वसणोंचि तें सुकुमार । मुख मोहाचें माहेर । माधुर्या जाहले अंकुर । दशन तैसे ६२ पुढां स्नेह पाझरे । माघां चालती अक्षरें । शब्द पाठीं अवतरे । कृपा आधीं ६३ तंव बोलणेंचि नाहीं । बोलों म्हणे जरी कांहीं । तरि बोल कोणाही । खुपेल कां ६४ बोलतां अधिकुही निघे । तरि कोण्हाही वर्मीं न लगे । आणि कोण्हासि न रिघे । शंका मनीं ६५ मांडिली गोठी हन मोडैल । वासिपैल कोणी उडैल । आइकोनि वोवांडिल । कोण्ही जरी ६६ तरि दुवाळी कोणा नोहावी । भंवई कवणाची नुचलावी । ऐसा भावो जीवीं । ह्मणोनिया ६७ मग प्रार्थिला विपायें । जरि लोभें बोलों जाये । तरि परिसतया होये । माय-

करणांत उत्पन्न झाली असतां स्पष्ट ज्ञान दिसतें, ४३ परंतु ती अहिंसा ज्याच्या आंगावर पूर्ण बाणली आहे, ती त्याच्या आचरणावरून समजून येते ज्याप्रमाणें सोनें कसास लावलें म्हणजे त्याचा दर लावतां येतो, ४४ त्याप्रमाणें खरोखर ज्ञानमनाची भेट झाली तरच (ज्ञान झालें तरच) अहिंसेचा मनावर ठसा उमटतो; अर्जुना, तो ठसा कसा उमटतो तें ऐक. ४५ पाण्याच्या लाटा न विवडूं देतां व पाण्याचें स्थिरपण न मोडतां ४६ वेगानें हळूच आपलें खाद्य जो मासा, त्यावर नजर ठेवून बगळा ज्याप्रमाणें पाण्यांत पाऊल टाकतो, ४७ किंवा आंतील केसर दुखावेल या भीतीनें भुंगा कमळावर हळूच पाय ठेवतो, ४८ त्याप्रमाणें, परमाणूंत सुद्धां अति सूक्ष्म जीव भरलेले आहेत, असें जाणून ते न मरावे अशी मनांत करुणा उत्पन्न होऊन तो जमिनीवर वेतानें पावलें ठेवून चालतो; ४९ तो ज्या वाटेनें जातो तिकडे कृपादृष्टीनें पहात चालून व ज्या दिशेस जातो तिकडे स्नेहभाव धरून, कोणाही प्राण्यास उपद्रव होऊं नये म्हणून आपल्या जिवापेक्षां त्याच्या जिवाला जपतो; २५० अर्जुना, अशा रीतीनें जपून जे चालतात, त्यांच्या अहिंसेचें माप शब्दांनीं करतां येत नाहीं. ५१ मायेच्या योगानें मांजरी आपल्या तोंडांत पिलास धरिते, त्या वेळेस ज्याप्रमाणें तिचे दांत त्यास लागत नाहींत, ५२ किंवा ज्याप्रमाणें ममताळू आईची आपल्या मुलाच्या वाटेकडे दृष्टि लागली असतां त्या दृष्टींत प्रेम असतें; ५३ अथवा कमळाच्या पानानें वारा वेऊं लागलें असतां ज्याप्रमाणें डोळ्यांच्या बुबुळांस समाधान होतें, ५४ त्याप्रमाणें तो जमिनीवर पाय हळूच टेंकून चालतो; व ते ज्या जीवांना लागतात त्यांना त्रास न होता, जपून टाकल्यामुळें उलट सुख होतें. ५५ अर्जुना, याप्रमाणें तो हळू चालत असतां जमिनीवर किडा किंवा मुंगी दृष्टीस पडली, तर तो हळूच माघारा फिरतो. ५६ जर आपण पाय आपटीत चाललों, तर स्वामींच्या निद्रेचा भंग होईल, व त्यांच्या प्रकृतीच्या स्वस्थपणास धक्का बसेल, ५७ अशी दया मनांत उत्पन्न होऊन, कोणत्याही प्राण्याचें उल्लंघन न करतां माघारा फिरतो; ५८ जीवाचा नाश होईल म्हणून गवतावरही पाय देऊन जात नाहीं, मग एकादा प्राणी दृष्टीस पडून त्याला न जुमानतां त्याची प्राणहानि होईल असें मनांत न आणितां तो वाट चालेल, ही गोष्ट त्याचे हातून कशी घडेल ? ५९ ज्याप्रमाणें मुंगीला मेरु पर्वत ओलांडून जातां येत नाहीं, अथवा चिलटाला समुद्र तरून जातां येत नाहीं, त्याप्रमाणें प्राण्याची गांठ पडली असतां ज्याच्यानें त्याचें उल्लंघन करवत नाहीं; २६० अशी ज्याची वागणूक कृपारूप फळांनीं फळास येऊन वाणींतही मूर्तिमंत दया जगली आहे; ६१ स्वतः श्वासोच्छ्वास टाकावयाच तोही शेजारच्या मनुष्यास त्रास न होईल अशा वेतानें हळू टाकतो; व त्याचें मुख पाहिलें असतां केवळ प्रेमाचें माहेरघर असें दिसतें; तसेंच त्याचे दांत माधुर्याला अंकूर फुटल्याप्रमाणें दिसतात; ६२ त्याच्या तोंडांतून अक्षरें बाहेर पडण्याचे अगोदर तोंडावर स्नेहभाव दृष्टीस पडूं लागतो; व पोटांत अगोदर दया उत्पन्न होऊन नंतर कृपेनें भरलेले असे शब्द बाहेर पडतात. ६३ तो होतां होईतोंपर्यंत कोणाशीं बोलतच नाहीं; कदाचित् त्यानें बोलण्याचें मनांत आणलें, तर आपलें बोलणें कोणास लागेल कीं काय अशी त्यास भीति वाटते; ६४ बोलतांना जर आपल्या तोंडांतून कमीजास्त शब्द निघाले, तर ते कोणाच्या वर्मीं न लागावे व त्यापासून कोणाच्याही मनांत शंका उत्पन्न होऊं नये; ६५ त्यापासून कोणाचा ठरलेला बेत मोडेल, कोणास भीति वाटेल, व कोणी दचकून जागें होईल; आणि जरी कोणी आपल्या बोलण्याचा तिरस्कार केला, ६६ तरी कोणाला पीडा होऊं नये व कोणी भिंवया चढवून आपलेकडे पाहूं नये, असें मनांत आणून जो बोलत नाहीं; ६७ मग कदाचित् कोणी प्रार्थना केली, व लोभानें जर बोलूं लागला, तर ऐकणारास त्याचें बोलणें आई-

वापु ६८ कां नादब्रह्माचि मुसे आलें। कीं गंगापय असललें। पतिव्रते आलें। वार्धक्य जैसें ६९ तैसे साच आणि मवाळ। मितले आणि रसाळ। शब्द जैसे कल्लोल। अमृताचे २७० उरोधुवादुबळु। प्राणिपापढाळु। उपहासु वाळु। वर्मस्पर्शु ७१ आटु वेगु विंदाणु। आशा शंका प्रतारणु। हे संन्यसिले अवगुणु। जया वाचा ७२ आणि तयाचि परी किरीटी। थाउ जयाचिये दिठी। सांडिलिया भृकुटी। मोकळिया ७३ कां जे भूतीं वस्तु आहे। तिये रूपों शके विपायें। ह्मणोनि वासु न पाहे। बहुतकरूनि ७४ ऐसाही कोणे एके वेळे। भीतरले कृपेचेनि बळें। उघडोनि डोळे। दृष्टी घाली ७५ तरि चंद्रबिंबौनि धारा। निघतां नव्हती गोचरा। परि एकसरें चकोरां। निघती दोंदें ७६ तैसें प्राणियांसि होये। जरी तो कही वासु पाहे। तया अवलोकनाची सोये। कूर्मीही नेणें ७७ किंबहुना ऐसी। दिठी जयाची भूतांसी। करही देखसी। तैसेचि ते ७८ तरी होऊनियां कृतार्थ। राहिले सिद्धांचे मनोरथ। तैसे जयाचे हात। निर्व्यापार ७९ अक्षमें आणि संन्यासिलें। कां निरिंधन आणि विझालें। मुकेनि घेतलें। मौन जैसें २८० तयापरी कांहीं। जयां करां करणें नाहीं। जे अकर्तयाच्या ठायीं। बैसों येती ८१ आसुडैल वारा। नख लागेल अंबरा। इया बुद्धी करां। चळों नेदी ८२ तेथ आंगावरिलीं उडवावीं। कां डोळां रिगतें झाडावीं। पशुपक्ष्यां दावावी। त्रासमुद्रा ८३ इया केउतिया गोठी। नावडे दंडु काठी। मग शस्त्राचें किरीटी। बोलणें कें ८४ लीलाकमलें खेळणें। कां पुष्पमाळा झेलणें। न करी म्हणे गोफणें। ऐसें होईल ८५ हालवतील रोमावळी। यालागीं आंग न कुरवाळी। नखांची गुंडाळी। बोटांवरी ८६ तंव करणेयाचाचि अभावो। परि ऐसाही पडे प्रस्तावो। तरि हातां हाचि सरावो। जे जोडिजती ८७ कां नाभिकारा उचलिजे। हातु पडिलिया देइजे। नातरि आर्तातें स्पर्शिजे। अळुमाळु ८८ हेंही उपरोधें करणें। तरी आर्तभय हरणें। नेणती चंद्रकिरणें। जिव्हाळा तो ८९ पावोनि तो स्पर्शु। मळ। यानिळु खरपुसु। येणें मानें पशु। कुरवाळणें २९० जे सदा रिते मोकळे। जैशीं चंदनांगें निसळें। न फळतांही निर्फळें। होतीचि ना ९१ आतां असो

बापाप्रमाणें आनंददायक व्हावें; ६८ किंवा मधुर वें, २८० तसें ज्याच्या हातांना कांहींएक करावनाद हा मूर्तिमंत पुढें उभा राहिला आहे, अथवा यांचें उरलें नसतें, व जे कांहींएक व्यापार न कस्वच्छ गंगोदक उसळलें,आहे,किंवा पतिव्रता स्त्रीला रतां स्वस्थ असतात; ८१ वाऱ्याला धक्का लागेल वृद्धपण प्राप्त झालें आहे.६९ त्याप्रमाणें खरे आणि किंवा आकाशाला नख लागेल, असें वाटून जो मऊ, परिमित व प्रेमळ असे अमृताच्या लाटांप्र- आपले हात हालवीत नाहीं, ८२ तेथें आंगावर माणें त्याच्या तोंडांतून शब्द निघतात; २७० जे बसलेली माशी उडवावी, किंवा डोळ्यांत जाणारीं शब्द व्याजस्तुतीनें भरलेले आहेत, ज्यापासून वाद धुंगुरटीं एकीकडे करावीं अथवा पशुपक्ष्यांना डोउत्पन्न होतो व दुसऱ्यास त्रास उत्पन्न होतो,तसेंच ळ्यांनीं भीति दाखवावी, ८३ या गोष्टी कोठून ज्यापासून निंदा व छळ होतो व जे दुसऱ्याच्या घडणार ? हे किरीटी, त्याला हातांत दंड किंवा वर्मीं लागतात;७१ आणि ज्यांत अडखळणें, अति काठी घेणेंही जर आवडत नाहीं, तर मग शस्त्रांवेगानें बोलणें, अवसान कपट, आशा, शंका व ची गोष्ट कशाला पाहिजे ! ८४ हातांत लीलेनें ठकवाजी हीं ज्याच्या वाणींत नाहींत; ७२ त्याच- कमळ घेऊन फिरविल्यास अथवा फुलांचा हार घेप्रमाणें, अर्जुना ज्याची दृष्टि स्थिर असून भिंवया लल्यास ते गोफणीप्रमाणें एकाद्या जीवास लागून मोकळ्या असतात; म्हणजे ज्याच्या कपाळावर आ- त्यास इजा होईल अशा समजुतीनें हेही व्यापार ठ्या दृष्टीस पडत नाहींत; ७३ कारण, प्रत्येक जो हातानें करीत नाहीं; ८५ अंगावरील लवेस इजा प्राण्यांत ब्रह्म भरलेलें आहे, त्याला कदाचित् त्रास होईल म्हणून जो अंगावरून हात फिरवीत नाहीं; होईल म्हणून जो वहुतकरून कोणाकडेही पहात व वोटाचीं नखें काढिलीं असतां हिंसा होईल नाहीं; ७४ असें असतांही एकाद्या वेळीं आंतल्या म्हणून जो तीं वाढवितो; ८६ अगोदर कोणती कृपेच्या बळानें जर डोळे उघडून कोणाकडे पाही- गोष्ट हातानें करावयाचीच नाहीं, परंतु जर प्रसंग ल, ७५ तर चंद्रबिंबांतून निघणाऱ्या अमृताच्या आलाच तर हात जोडण्याशिवाय दुसरा अभ्यासच धारा जरी कोणाच्या दृष्टीस पडत नाहींत, तरी ज्याला ठाऊक नाहीं: ८७ किंवा हातानें व्यापार चकोरपक्ष्यांना त्या कळतात, म्हणजे त्यांना आनंद केलाच तर दुसऱ्यास हात उचलून अभय वचन होतो. ७६ त्याप्रमाणें, ज्या प्राण्याकडे तो आपल्या देणें किंवा एकादा कोणी पडत असल्यास त्यास दृष्टीनें पाहील, त्याला समाधान होतें; त्याच्या अ- हातानें सांवरणें, अथवा पीडित मनुष्याच्या अंगावलोकनांत किती प्रेम आहे, हें कासवीलाही मा- वरून हळूच हात फिरविणें, ८८ ह्या गोष्टी मोठ्या हीत नाहीं. (कासवीच्या केवळ कृपादृष्टीनेंच तिचीं संकटानें जो करितो, तथापि पीडित मनुष्याची मुलें वाढतात असे तिच्या दृष्टींत प्रेम, पोसण्याचें चिंता तो हस्तस्पर्शानें दूर करतो, या त्याच्या करसामर्थ्य आहे.) ७७ किंबहुना जो भूतमात्राकडे ण्यानें जो कृपेचा पाझर सुटतो, तसा चंद्रकिरणाअशा प्रेमळ दृष्टीनें पहातो, त्याच्या हाताचे गुण पासून सुटणें कठीण आहे. ८९ मलय पर्वतावपाहूं गेलें असतां तेही दृष्टीप्रमाणेंच आहेत. ७८ रील वाऱ्यानें पीडित मनुष्यास जसा आनंद होतो, ज्याप्रमाणें ब्रह्मनिष्ठाचे मनोरथ पूर्ण झालेले अस- त्याप्रमाणेंच ज्याच्या हाताच्या कुरवाळण्यानें पशूस तात, त्याप्रमाणें, ज्याचे हातांस कांहींएक कर- आनंद होतो. २९० जे हात नेहमीं मोकळे असण्याची इच्छा नसून ते निर्व्यापार असतात; ७९ तात, आणि चंदनाच्या झाडाचा कोणताही भाग जन्मांधानें ज्याप्रमाणें पहाण्याची क्रिया सोडावी, थंडगार असतो, व त्याला फळें न येतांही तो निकिंवा अग्नीस पेटवण नसून तो जसा विझावा, ष्फळ आहे असें कोणास वाटत नाहीं; ९१ आतां अथवा मुक्या मनुष्यानें जसें मौनव्रत धारण करा- हें वाक्पांडित्य राहूं दे; सज्जनाचें शील व स्वभाव

हें वाग्जाळ । जाणें तें करतळ । सज्जनांचें शीळ । स्वभाव जैसे ९२ आतां मन तयाचें । सांगों ह्मणों जरी साचें । तरी सांगितले कोणाचे । विलास हे९३ काइ शाखा नव्हे तरु । जळेंवीण असे सागरु । तेज आणि तेजाकारु । आन काई ९४ अवयव आणि शरीर । हे वेगळाळे काय कीर । कीं रसु आणि नीर । सिनानीं आथी ९५ ह्मणोनि हे जे सर्व । सांगितले बाह्यभाव । तें मनाचि गा सावयव । ऐसें जाणें ९६ जें बीज भुईं खोंविलें । तेंचि वरी रूख जाहलें । तैसें इंद्रियद्वारीं फांकलें । अंतरचि कीं ९७ पैं मानसींचि जरी । अहिंसेची अवसरी । तरी कैंची बाहेरी । वोसंडेल ९८ आवडे ते वृत्ती किरीटी । आधीं मनोनीचि उठी । मग ते वाचे दिठी । करांसि ये ९९ वांचूनि मनींचि नाहीं । तें वाचेसि उमटेल काई । बींवीण भुईं । अंकुर असे ३०० ह्मणोनि मनपण जैं मोडे । तैं इंद्रिय आधींचि उबडें । सूत्रधारेंवीण साइखडें । वावो जैसें १ उगमींचि वाळूनि जाये । तें वोघीं कैचें वाहे । जीवु गेलिया शरीरांचे चेष्टा देहीं २ तैसें मन हें पांडवा । मूळ या इंद्रियभावा । हेंचि राहटे आघवा । द्वारीं इहीं ३ परि जिये वेळीं जैसें । जें होऊनि आंतु असे । बाहेरि ये तैसें । व्यापाररूपें ४ यालागीं साचोकारें । मनीं अहिंसा थांवे थोरें । जैसी पिकली द्रुती आदरें । बोभात निघे ५ ह्मणोनि इंद्रियें तेचि संपदा । वेचितां हीं उदावादा । अहिंसेचा धंदा । करितें आहाती ६ समुद्रीं दाटे भारितें । तैं समुद्राचि भरी तरियांतें । तैसें स्वसंपत्ति चित्तें । इंद्रियां केलें ७ हें बहु असो पंडितु । धरूनि बाळकाचा हातु । वोळी लिही व्यक्तु । आपणचि ८ तैसें दयालुत्वा आपुलें । मनें हातापायां आणिलें । मग तेथ उपजविलें । अहिंसेतें ९ याकारणें किरीटी । इंद्रियांचिया गोठी । मनाचियेचि राहाटी । रूप केलें ३१० ऐसा मनें देहें वाचा । सर्व संन्यासु दंडाचा । जाहला ठायीं जयाचा । देखशील ११ तो जाण वेल्हाळ । ज्ञानाचें वेळाउळ । हें असो निखिळ । ज्ञानचि तो १२ जे अहिंसा कानें ऐकिजे । ग्रंथाधारें निरूपिजे । ते पाहावी हें उपजे । तैं तोचि पाहावा १३ ऐसें म्हणितलें देवें । तें बोलें एकें सांगावें । परि फांकला हें उपसाहावें । तुम्ही मज १४ ह्मणाल हिरवे चारीं गुरूं । विसरे मागील मोहर धरूं । कां वारेलगे पाखिरूं । गगनीं भरे १५ तैसिया प्रेमाचिया स्फूर्ती । फांवलिया संवृत्ती । वाहविला मती । आकळेना १६ तरि तैसें नोहे अवधारा । कारण

हीं जशीं असतात, तसेंच त्याच्या हातांचें आचरण असतें. ९२ आतां त्याचें मन कसें आहे म्हणून जर सांगावयाचें म्हटलें तर ह्या ज्या गोष्टी वर्णन केल्या, ती कृति कोणाची आहे ? ९३ झाडांच्या फांद्या ह्मणजे झाडें नाहींत काय ? पाण्याशिवाय समुद्र आहे काय ? तेज आणि सूर्य हीं निराळीं आहेत का ? ९४ अवयव आणि शरीर हीं निराळीं आहेत का ? किंवा पाणी व पाण्याची गोडी हीं कांहीं निराळीं का आहेत ? ९५ म्हणून हे जे सर्व इंद्रियांचे बाह्य व्यापार सांगितले ते मनाचेच आहेत असें समज. ९६ जें बीज जमीनींत पेरलें असतें, तेंच वर झाडाच्या रूपानें दृष्टीस पडतें; त्याचप्रमाणें, इंद्रियांकडून जे व्यापार घडतात, ते मनाच्याच प्रेरणेनें होतात. ९७ परंतु मनांत जर अहिंसेचा उदय झाला नसेल, तर इंद्रियांकडून ती बाहेर कशी पडेल ? ९८ अर्जुना, कोणतीही वृत्ति अगोदर मनाच्या ठिकाणींच उत्पन्न होते; आणि मग तीच वाचेनें, दृष्टीनें व हातांनीं घडते. ९९ बाकी जी गोष्ट मनांत येत नाहीं, ती तोंडानें बोलली जाईल का ? हें पहा—बीजाशिवाय जमीनींत अंकूर उत्पन्न होईल का ? ३०० म्हणून, ज्याप्रमाणें सूत्रधाराशिवाय कळसूत्री बाहुली हालत नाहीं, त्याप्रमाणें; मन जेव्हां कोणाचाही व्यापार करण्यास प्रवृत्त होत नाहीं, तेव्हां इंद्रियें अगोदर निर्बल होतात. १ जें पाणी उगमापाशींच आटून जातें, तें नदीच्या ओघांत कोठून वाहणार ? हें पहा—प्राण गेल्याबरोबर देहाकडून कांहीं व्यापार घडतात का ? २ त्याप्रमाणें, पार्था, मन हें या इंद्रियांच्या व्यापारास मूळ कारण आहे व हेंच सर्व इंद्रियांकडून व्यापार करवितें. ३ परंतु ज्या वेळीं मनांत जशी वासना उत्पन्न होते, तसे इंद्रियांकडून बाहेर व्यापार घडतात; ४ ह्याकरितां, ज्याप्रमाणें पिकलेल्या फळाचा वास आपोआप चहूंकडे पसरतो; त्याप्रमाणें खरोखर मनांत अहिंसा बळकट कायम असली म्हणजे इंद्रियांच्या व्यापारांत अहिंसाच दृष्टीस पडते. ५ म्हणून, इंद्रियें हीं, अहिंसा हीच आपली संपत्ति असें पूर्णपणें मानून तिचीच देवघेव म्हणजे व्यापार करीत असतात. ६ ज्याप्रमाणें समुद्राला भरती आली म्हणजे समुद्राच्या पाण्यानें खाड्या भरतात; त्याप्रमाणें मनांत अहिंसेचें आलेलें भरतें इंद्रियांच्या व्यापारांतही दृष्टीस पडतें. ७ फार काय सांगावें ! पंतोजी ज्याप्रमाणें लहान मुलाचा हात धरून त्याजकडून सुरेख अक्षर लिहवितो, ८ त्याप्रमाणें, आपले ठिकाणीं पूर्णवास आलेली दया, हस्तपादादि इंद्रियांचे ठिकाणीं आणून मन हें त्या ठिकाणीं अहिंसा उत्पन्न करवितें (त्या इंदियांकडून अहिंसेचें आचरण घडतें.) ९ ह्याकरितां, अर्जुना, इंद्रियांकडून घडणाऱ्या अहिंसेच्या ज्या गोष्टी सांगितल्या त्या मनाच्याच आहेत असें समज. १० अशा प्रकारें ज्यानें कायावाचामनेंकरून हिंसेचा त्याग केला आहे असें तूं पहाशील, ११ तो पुरुष ज्ञानाचा विलासी व वसतिस्थान आहे असें समज. फार तर काय, तो मूर्तिमंत ज्ञानच आहे. १२ ज्या अहिंसेचें वर्णन आपण कानांनीं ऐकतों, व ग्रंथाच्या आधारानें जिचें निरूपण करितों, ती अहिंसा प्रत्यक्ष पहावीसें वाटल्यास त्याच पुरुषाचें दर्शन घ्यावें. १३ ज्ञानदेव म्हणतात:—असें जें श्रीकृष्णांनीं अर्जुनास सांगितलें, तें मी तुह्मांला एका शब्दांत सांगावयास पाहिजे होतें; परंतु त्याचा फार विस्तार झाला, ह्याबद्दल तुह्मी मला क्षमा करा. १४ तुह्मी ह्मणाल कीं, जनावर हिरवें गवत खाऊं लागलें ह्मणजे खात खात पुढें जातां जातां मागील क्रम सोडतें; किंवा पक्षी आकाशांत उडूं लागल्यावर वाऱ्याच्या वेगानें पुढेंच भराऱ्या मारीत जातो, १५ त्याचप्रमाणें प्रेमाच्या भरांत रसवृत्ति पसरून माझी बुद्धि मलाच आवरेनाशी झाली, १६ असें आपण संतजन म्हणाल, पण तशांतला कांहीं प्रकार

असे विस्तारा। एऱ्हवीं पद तरी अक्षरां। तिहींचेंचि १७ अहिंसा म्हणतां थोडी। परि ते तैंचि होय उघडी। जैं लोटिजती कोडी। मतांचिया १८ एऱ्हवीं प्राप्तें मतांनरें। थातंवूनि आंगभरें। बोलिजैल तें न सरे। तुह्मांपाशीं १९ रत्नपारखियांच्या गांवीं। जाईल गंडकी तरि सोडावी। काश्मीरीं न करावी। मिडगण जेवीं ३२० काइसा वासु कापुरा। मंद जेथ अवधारा। पिठाचा विकरा। तियेसातें २१ ह्मणोनि इये सभे। बोलकेपणाचेनि क्षोभें। लाग संरू न लभे बोला प्रभु २२ सामान्या आणि विशेषा। सकळै कीजेल देखा। तरि कानाचेया मुखा-। कडे न्याल ना तुह्मी २३ शंकेचेनि गदळें। जैं शुद्ध प्रमेय मैळे। तैं मागुतिया पाउलीं पळे। अवधान येतें २४ कां करूनि बाबुळियेची बुंथी। जळें जियें ठाती। तयांची वास पाहाती। हंस काई २५ कां अभ्रापैलीकडे। जैं येत चांदिणें कोडें। तैं चकोरें चांचुवडें। उचलीतना २६ तैसें तुम्ही वास न पाहाल। ग्रंथु नेघा वरि कोपाल। जरी निर्विवाद नव्हैल। निरूपण २७ न बुझावितां मतें। न फिटे आक्षेपाचें लागतें। तें व्याख्यान जी तुमतें। जोडूनि नेदी २८ आणि माझें तंव आघवें। ग्रंथन येणेंचि भावें। जे तुम्ही संतीं होआवें। सन्मुख सदां २९ एऱ्हवीं तरी साचोकारें। तुम्ही गीतार्थाचे सोइरे। जाणोनि गीता एकसरें। धरिली मियां ३३० जे आपुलें सर्वस्व घाल। मग इयेतें सोडवूनि न्याल। ह्मणोनि ग्रंथु नव्हे वोल। साचचि हे ३१ कां सर्वस्वाचा लोभु धरा। वोलीचा अव्हेरु करा। तरि गीते मज अवधारा। एकचि गती ३२ किंबहुना मज। तुमचिया कृपा काज। तियेलागीं व्याज। ग्रंथाचें केलें ३३ तार तुम्हां रसिकांजोगें। व्याख्यान शोधावें लागे। ह्मणूनि जी मतांगें। बोलों गेलों ३४ तंव कथेसि पसरु जाहला। श्लोकार्थु दूरि गेला। कीजो क्षमा यया बोला। अपत्या मज ३५ आणि घांसाआंतिल हरळु। फेडितां लागे वेळु। तें दूषण नव्हे खडळु। सांडावा कीं ३६ कां संवचोरां चुकवितां। दिवस लागलिया माता। कोपावें कीं जीविता। जिताणें कीजे ३७ परि यावरील हें नव्हे। तुम्ही उपसाहिलें तेंचि बरवें। आतां अवधारिजो देवें। बोलिलें ऐसें ३८ म्हणे उन्मेखसुलोचना। सावध होईं अर्जुना। करूं तुज ज्ञाना। बोळखी आतां ३९ तरि ज्ञान गा तें एथें। वोळख तूं निरुतें। आक्रोशेंवीण जेथें। क्षमा असे ३४० अगाधसरोवरीं। कमळिणी जियापरी। कां सदैवाचिया घरीं।

नसून, विस्तार करण्याला कारण आहे. बाकी अहिंसा शब्द तीनच अक्षरांचा आहे. १७ पाहूं गेलें तर अहिंसेचें वर्णन थोडक्यांत करतां येईल; परंतु ज्या वेळेस हिंसेलाच अहिंसा म्हणणाऱ्या बहुमतांचें खंडण करावें, तेव्हांच ती स्पष्ट करतां येईल. १८ बाकी अहिंसेसंबंधानें जीं उपलब्ध मतें आहेत, तीं जशींच्या तशींच ठेवून जर मी अहिंसा सांगितली. तर तुम्हांला माझें बोलणें आवडणार नाहीं. १९ रत्नपारख्यांच्या गांवांत शालिग्राम शिळा जर विकल्या जातील, तरच त्यांचें गांठोडें सोडावें. सरस्वतीच्या पुढें जशी कोणाची वक्तृत्व करण्याची शक्ति नाहीं. ३२० ज्या ठिकाणीं पिठाचीच विक्री कमी होते, त्या ठिकाणीं कापराच्या वासाला कोण विचातो ? २१ ह्मणून श्रोतेहो, तुमच्या समेमध्यें मी मोठा वक्ता आहे असा जर अभिमान बाळगला, तर माझें बोलणें तुम्हांस रुचणार नाहीं. २२ सामान्य व विशेश गोष्टी जर सरसकट करून सांगितल्या,तर त्या तुझी आपल्या कानाच्या मुखाकडे सुद्धां नेणार नाहीं. (कानावरसुद्धां पडूं देणार नाहीं.) २३ जर कोणत्याही वस्तूचें खरें स्वरूप सांगतांना शंकेस जागा राहील, तर तुझी जें मजकडे लक्ष देत आहां,तें मागच्या पावलांनींच नाहींसें होईल !२४ ज्या पाण्यावर शेवाळें पसरलेलें असतें,त्या पाण्याकडे हंस पक्षी जातात काय ?२५ किंवा अभ्राच्या पलीकडे जर सुंदर चांदणें पडलें असलें तर तें भक्षण करण्याकरितां चकोर पक्षी चोंच उघडीत नाहींत; २६ त्याप्रमाणें जर निरूपण निर्दोष झालें नाहीं,तर तुझी माझ्याकडे पाहणार नाहीं,(ग्रंथ हातांत धरणार नाहीं.)इतकेंच नाहीं तर उलट रागवाल.२७ अहिंसेवरील निरनिराळीं मतें समजून सांगतांना जर आक्षेपांचें निरसन होणार नाहीं, तर तें व्याख्यान मला तुमचा लाभ जोडूं देणार नाहीं; (तुझी माझें व्याख्यान ऐकत वसणार नाहीं;) २८ आणि माझें हें सर्व प्रतिपादन तरी तुझी संतजनांनीं नेहमीं प्रसन्न व्हावें ह्याकरितांच आहे. २९ बाकी खरोखर पाहूं गेलें असतां तुम्ही गीतेच्या अर्थाचे भोक्ते आहां, असें समजून मी एकदम गीताच व्याख्यानास घेतली, ह्मणजे गीताच घरून टेविली. ३३० त्या गीतेकरितां तुझी आपलें वाटेल ती हानी पत्करा्ल, परंतु गीता सोडवून घ्याल. ह्मणून, हा ग्रंथ नव्हे, तर तुमच्या कृपेचा जामीनच आहे. ३१ इतक्याकरतां सर्वस्वाचा लोभ धरून ह्या गीताग्रंथरूपी जामिनाचा अव्हेर कराल, तर गीतेची जी गती तीच माझी गती असें समजा. ३२ तात्पर्य काय कीं, तुमच्या कृपाप्रसादाची मला जरूर असल्यामुळेंच मीं गीतेचा अर्थ सांगण्याचें निमित्त केलें आहे. ३३ तेव्हां तुमच्यासारख्या रसिक श्रोत्यांना रुचेल असें व्याख्यान केलें पाहिजे, ह्मणून अहिंसेवरील वेगळीं वेगळीं मतें तुह्मांस सांगितलीं.३४ यामुळें कथेचा विस्तार होऊन श्लोकाचा अर्थ वाजूला राहिला, त्याची मज लेंकराला आपण क्षमा करा. ३५ जेवतांना घांसांत खडा लागला,तर तो काढण्यास लागलेला वेळ व्यर्थ गेला हा दोष नव्हे, कारण, तो खडा काढून टाकलाच पाहिजे. ३६ आपला मुलगा गांवांहून येत असतांना जर चोरांना चुकवून येण्याकरितां त्यास वेळ लागला, तर आईनें त्याच्यावर रागवावें, का तो जिवंत घरीं आला ह्मणून त्याच्यावरून लिंबलोण उतरून टाकावें ? ३७ परंतु हे दाखले देण्याचें कांहीं कारण नाहीं. माझ्या वाढलेल्या व्याख्यानावदल मला क्षमा केलीत हें चांगलेंच झालें, ह्मणून श्रीकृष्ण हे अर्जुनास काय ह्मणाले तें ऐका. ३८ भगवान् ह्मणाले:–हे ज्ञानोत्तमनयना अर्जुना,सावध हो. तुला ज्ञानाची आतां चांगली ओळख करून देतों. ३९ हें पहा–ज्ञान ह्मणून जें आहे, तें ज्या ठिकाणीं खेदावांचून क्षमा वास करिते, त्याच ठिकाणीं खरोखर आहे असें समज. ३४० जल कितीही असलें तरी त्याच्यावर कमलें असतात, किंवा दैव-

संपत्ति जैसी ४१ पार्था तेणें पाडें । क्षमा जयातें वाढे । तेही लक्षे तें फुडें । लक्षण सांगों ४२ तरि पढियंतें लेणें । आंगीं भावें जेणें । धरिजे तेविं साहणें । सर्वांचि जया ४३ त्रिविध मुख्य आघवे । उपद्रवांचे मेळावे । वारि पडिलिया नव्हे । वांकुडा जो ४४ अपेक्षित पावे । तें जेणें तोषें मानवें । अनपेक्षिताही करवे । मानु तोचि ४५ जो मानापमानातें साहे । सुखदुःख जेथ सामाये । निंदास्तुती नोहे । दुखंडु जो ४६ उन्हाळेनि जो न तपे । हिमवंतीं न कांपे । कायसेनिही न वासिपे । पातलेया ४७ स्वशिखरांचा भारु । नेणे जैसा मेरु । कीं धरा यज्ञसूकरु । बोझें न म्हणे ४८ नाना चराचरीं भूतीं । दाटणी नव्हे क्षिती । तैसा नाना द्वंद्वीं प्राती । घामेजेना ४९ घेउनी जळाचे लोट । आलिया नदीनदांचे संघाट । करी वाड पोट । समुद्र जेवीं ३५० तैसें जयाचिया ठायीं । न साहणें कांहींचि नाहीं । आणि साहतु असे ऐसेंही । स्मरण नुरे ५१ आंगा जें पातलें । तें करूनि घालीं आपुलें । तेथ साहतेनि नवलें । घेपिजेना ५२ हे अनाक्रोश क्षमा । जयापाशीं प्रियोत्तमा । जाण तेणें महिमा । ज्ञानासि गा ५३ तो पुरुषु पांडवा । ज्ञानाचा वोलावा । आतां परिस आर्जवा । रूप करूं ५४ तरि आर्जव तें ऐसें । प्राणाचें सौजन्य जैसें । आवडे तयाही दोषें । एकाचि गा ५५ कां तोंड पाहूनि प्रकाशु । न करी जेविं चंडांशु । जगा एकुचि अवकाशु । आकाश जैसें ५६ तैसें जयाचें मन । माणुसप्रती आन आन । नव्हे आणि वर्तन । ऐसें पैं तें ५७ जें जगेंचि सनोळख । जगेंसीं जुनाट सोयरिक । आप पर हे भाख । जाणणें नाहीं ५८ भलतेणेंसीं मेळु । पाणिया ऐसा ढाळु । कवणोविखीं आडळु । नेघे चित्त ५९ वारियाची धांव । तैसे सरळ भाव । शंका आणि हांव । नाहीं जया ३६० मायेपुढें बाळका । रिगतां न पडे शंका । तैसें मन देतां लोकां । नालोची जो ६१ फांकलिया इंदीवरा । परिवारु नाहीं धनुर्धरा । तैसा कोनकोंपरा । नेणोचि जो ६२ चोखाळपण रत्नाचें । रत्नावरी किरणाचें । तैसे पुढां मन जयाचें । करणें पाठी ६३ आलोचूं जो नेणे । अनुभवचि जोगावणें । धरी मोकली अंतःकरणें । नव्होचि जया ६४ दिठी नोहे विषयी । बोलणें नाहीं संदिग्धीं । कवणेसीं हीनबुद्धी । सहटीजे ना ६५ दा-

वानाच्या घरीं लक्ष्मी वास करिते,४१ त्याप्रमाणें, पार्था ज्यांच्या योगानें क्षमा वृद्धिंगत होते, ती ल क्षणें सांगतों, म्हणजे ती पूर्णपणें लक्षांत येतील. ४२ आव ःत्या मुलाच्या आंगावर आईबापानें घातलेले दागिने तें मूल जसें उदास वृत्तीनें धारण करितें, त्याप्रमाणें सर्व भोग उदासवृत्तीनें धारण करितो.४३ कितीही दुःखप्रसंग असले तरी त्याचे आध्यात्मिक, आधिदैविक आणि आधिभौतिक असे तीन भेद आहेत.तितकेही एकदम प्राप्त झाले तरी त्यांच्या भारानें जो वांकत नाहीं, ४४ अपेक्षित वस्तु प्राप्त झाली असतां ज्या मानानें संतोष होतो, तेंच प्रमाण अनिच्छित वस्तुविषयीं असतें. ४५ जो मानापमान सहन करतो, सुखदुःखांनाही जागा देतो, आणि निंदेनें किंवा स्तुतीनें मनाची समता भंगूं देत नाहीं; ४० जो उन्हाच्या तापानें तप्त होत नाहीं, व थंडीनें कांपत नाहीं, म्हणजे शीतोष्ण सहन करितो, आणि कसलाही प्रसंग आला असतां भीत नाहीं;४७ मेरु पर्वताला जसा आपल्या शिखरांचा भार होत नाहीं, किंवा यज्ञवराह जसा दंताग्रीं धारण केलेली पृथ्वी जड आहे असें म्हणत नाहीं; ४८ अथवा स्थावरजंगम भूतांचें ज्याप्रमाणें पृथ्वीला ओझें होत नाहीं, त्याप्रमाणें, अनेक प्रकारचीं सुखदुःखें प्राप्त झालीं तरी ज्याच्या अंतःकरणाला घाम येत नाहीं; ४९ नदी व नद हे पाण्याचे लोटच्या लोट घेऊन जरी आले तरी त्यांना कोठें ठेवावें अशी चिंता न करितां ज्याप्रमाणें समुद्र त्यांना आपल्या पोटांत सहज सामावून घेतो, ३५० त्याप्रमाणें, ज्याला सहन होत नाहीं असें कांहींच नसून, आपण सर्व गोष्टी सहन करतों ही आठवण करण्याइतका अभिमानही नसतो. ५१ देहाला ज्या ज्या गोष्टी प्राप्त होतात, त्या सर्व आपणच आहों, म्हणून आपण सर्व गोष्टी सहन करतों असा ज्याला अभिमान उत्पन्न होत नाहीं; ५२ अशा प्रकारची खेदरहित क्षमा ज्या पुरुषापाशीं वास करिते. त्या पुरुषाच्या योगें, अर्जुना, ज्ञानासही मोठेपणा येतो. ५३ हे पांडवा, असा जो पुरुष, तो ज्ञानाचा खरोखर जिव्हाळाच होय. आतां आजव (सरळपणा) ह्याविषयींचें वर्णन करतों. तें ऐक. ५४ वाटेल त्या उद्देशानें जरी मनुष्यानें कांहींही आचरण केलें, तरी ज्याप्रमाणें त्याला प्राण अनुकूळ असतो, ५५ किंवा सूर्य जसा हा चांगला, हा वाईट, अशी भेदबुद्धि न ठेवतां प्रकाश करितो, तोंडाकडे पाहून प्रकाश पाडीत नाहीं, किंवा आकाश हें ज्याप्रमाणें सर्व जगाला सारखाच अवकाश देतें. ५६ त्याप्रमाणें ज्याचें मन प्राण्यागणिक निरनिराळें नसून त्याचें वर्तन असें असतें कीं, ५७ सर्व जग जसें ओळखीचेंच असून सर्व जगाबरोबर जसाकाई सोयरिकीचाच संबंध आहे, आणि ज्याला आपपरभावाची ओळखच नाहीं; ५८ ज्याची वाटेल त्याबरोबर मैत्री होते; पाण्याला ज्याप्रमाणें ढाळ असतो, त्याप्रमाणें ज्याचा स्वभाव आहे; व कोणतीही गोष्ट करण्याविषयीं ज्याचें मन आड येत नाहीं; ५९ वाऱ्याच्या वेगाप्रमाणें ज्याचे मनाचा सरळपणा आहे; आणि ज्याला शंका व इच्छा मुळींच नाहीं; ३६० ज्याप्रमाणें आईचे मांडीवर बसण्यास मुलाला शंका येत नाहीं, त्याप्रमाणें जो दुसऱ्यास आपलें मत देण्याविषयीं विचार करीत बसत नाहीं; ६१ हे धनुर्धरा, फुललेल्या कमळास ज्याप्रमाणें आपला सुवास दावून ठेवतां येत नाहीं, त्याप्रमाणें आंत एक व बाहेर एक असे विचार ज्याचे मनांत नाहींत; ६२ ज्याप्रमाणें रत्नाचा सुरेखपणा दृष्टीस पडण्याच्या पूर्वी त्याचें तेज फांकतें,त्याप्रमाणें,कोणतीही गोष्ट करण्याच्या अगोदर ज्याच्या मनाची धांव पुढें असते; व व्यवहार पाठीमागून असतो. ६३ ज्याला चिंतन करणें हें माहीत नाहीं, व सदोदित तृप्त असणें हाच ज्याचा अनुभव आहे; अमुक गोष्ट करावयाची व अमुक गोष्ट करावयाची नाहीं, असा ज्याच्या अंतःकरणांत विचार नसतो; ६४ ज्याची दृष्टि लाचलुचपत खाणारी नाहीं, व ज्याचें बोलणें संदिग्ध नाहीं; आणि जो कोणाबरोबरही वाईट बुद्धीनें वागत नाहीं; ६५ ज्याचीं

हाही इंद्रियें प्रांजळें । निष्प्रपंचें निर्मळें । पांचही पालव मोकळे । आठही पाहर ६६ अमृताची धार । तैसें उजू अंतर । किंबहुना जो माहेर । या चिन्हांचें ६७ तो पुरुष सुभटा । आर्जवाचा आंगवटा । जाण तेथेंचि घरटा । ज्ञानें केला ६८ आतां यथावगी । गुरुभक्तीची परी । सांगों गा अवधारीं । चतुरनाथा६९ आघवीयाची दैवां । जन्मभूमि हे सेवा । जे ब्रह्म करी जीवा । शौच्यातेंही३७० ते आचार्योपास्ती । प्रकटिजैल तुजप्रती । बैसों दे एकपांती । अवधानाची७१ तरि सकळ जळसमृद्धी । घेऊनि गंगा निघाली उदधी । कीं श्रुति हे महापदीं । पैठी जाहाली ७२ नाना वेंटाळूनि जीवितें । गुणागुण उखितें । प्राणनाथा उचितें । दिधलें प्रिया ७३ तैसें सबाह्य आपुलें । जेणें गुरुकुळीं वोपिलें । आपणपें केलें । भक्तीचें घर ७४ गुरुगृह जये देशीं । तो देशुचि वसे मानसीं । विरहिणी कां जैसी । वल्लभातें ७५ तियेकडोनि येतसे वारा । देखोनि धांवे सामोरा । आड पडे म्हणे घरा । बीजें कीजो । ७६ साचा प्रेमाचिया भुली । तया दिशेसीचि आवडे बोली । जीवु थानापती करूनि घाली । गुरुगृहीं जो ७७ परि गुरुआज्ञा धरिलें । देह गांवीं असे एकलें । वांसरुवा लाविलें । दावें जैसें ७८ म्हणे कैं हें बिरडें फिटेल । कैं तो स्वामी भेटेल । युगाहूनि वडिल । निमिष मानी ७९ ऐसेया गुरुग्रामींचें आलें । कां स्वयें गुरूनींचि धाडिलें । तरी गतायुष्या जोडलें । आयुष्य जैसें ३८० कां सुकतया अंकुरा- । वरि पडलिया पीयूषधारा । नाना अल्पोदकींचा सागरा । आला मासा ८१ नातरी रंकें निधान देखिलें । कां आंधळिया डोळे उघडले । भणंगाचिया आंगा आलें । इंद्रपद ८२ तैसे गुरुकुळाचेनि नांवें । महासुखें अति थोरावे । जे कोडेंही पोटाळवे । आकाश कां ८३ पैं गुरुकुळीं ऐसी । आवडी जया देखसी । जाण ज्ञान तयापासीं । पाइकी करी ८४ आणि अभ्यंतारिलियेकडे । प्रेमाचेनि पवाडें । श्रीगुरूचें रूपडें । उपासी ध्यानीं ८५ हृदयशुद्धीचिया आवारीं । आराध्यु तो निश्चल ध्रुव करी । मग सर्व भावेंसी परिवारीं । आपण होय ८६ कां चैतन्याचिये पोवळीं । माजि आनंदाचिया राउळीं । श्रीगुरुलिंगा ढाळी । ध्यानामृत ८७ उदयिजतां बोधार्का । बुद्धीची डाळ सात्त्विका । भरोनियां त्र्यंबका । लाखोली वाहे ८८ काळशुद्धी लिकाळीं । जीवदशा धूप जाळी । ज्ञानदीपें वोंवाळी । निरंतर ८९ सामरस्याची रससोय । अखंड अर्पितु जाय । आपण भ-

दहा इंद्रियें व पंचप्राण सदासर्वदा निष्कपट बुद्धीनें वर्तन करीत असतात; ६६ अमृताच्या धारेप्रमाणें ज्याचें मन सरळ आहे; किंबहुना जो वाचिन्हाचें माहेरघरच आहे: ६७ हे वीरा, तो पुरुष मूर्तिमंत आर्जवच होय; आणि त्याच्याच ठिकाणीं ज्ञानानें आपलें बिऱ्हाड ठेविलें आहे हें ध्यानांत असूं दे. ६८ हे चतुरश्रेष्ठा, आतां यापुढें तुला गुरुभक्तीचे पर्याय सांगतों, ते ऐक. ६९ ही गुरुसेवा ह्मणजे सर्व भाग्यांची जन्मभूमि वरें;कारण शोकानें ग्रस्त झालेल्या जीवास ही ब्रह्मस्वरूप करते. ३७० अशी ही जी गुरुसेवा, ती तुला समजून सांगतों, तिकडे तुझें पूर्ण लक्ष असूं दे. ७१ हें पहा—ज्याप्रमाणें आपलें सर्व उदक घेऊन गंगा समुद्रास मिळते किंवा सर्व अभिप्रायांसह श्रुति ब्रह्मपदीं प्रविष्ट होते; ७२ अथवा पतिव्रता स्त्री आपलें जीवित व गुणावगुण हे सर्व आपल्या प्रिय पतीस अर्पण करिते, ७३ त्याप्रमाणें ज्यानें आपलें सर्व कांहीं गुरुकुलाचे ठिकाणीं अर्पण केलें आहे; आणि आपलें शरीर ह्मणजे गुरुभक्तीचें आगरच केलें आहे; ७४—कसें ह्मणशील तर—ज्याप्रमाणें विरहिणी पतिव्रता नेहमीं पतीचेंच चिंतन करिते, त्याप्रमाणें ज्या देशांत आपल्या गुरूंचें घर असेल तोच देश ज्याचे मनांत नेहमीं घोळत असतो; ७५ त्या दिशेनें येणाऱ्या वाऱ्यासही सामोरा जाऊन त्यास जो साष्टांग नमस्कार घालतो; आणि माझ्या घरीं वस्तीला यावें अशी प्रार्थना करितो; ७६ खऱ्या प्रीतीनें वेडावून जाऊन, गुरु ज्या दिशेस रहातात त्या दिशेशींच ज्याला बोलणें आवडतें; व जो गुरूच्या घरीं आपला जीव वतनदार करून ठेवतो; ७७ परंतु ज्याप्रमाणें वांसराला दावें लावलें असल्यामुळें त्याचें सर्व लक्ष गाईकडे लागलेलें असलें तरी त्याचें शरीर गोठ्यांतच असतें, त्याप्रमाणें केवळ गुरूंच्या आज्ञेमुळेंच ज्याचा देह मात्र आपल्या गांवीं असून ७८ त्याला असें वाटत असतें कीं, आपल्या गव्याचें हें गुर्वाज्ञारूप पेंड केव्हां सुटेल, व गुरूंची भेट केव्हां होईल; अशा चिंतेत त्याला एक एक क्षणही युगापेक्षां मोठा भासत असतो. ७९ तशांत जर आपलें गुरूंचे गांवांहून कोणी मनुष्य आला, किंवा स्वतः गुरूंनीच एकादा मनुष्य पाठविला, तर, गतायुषी माणसाला आणखी आयुष्य मिळावें, ३८० किंवा वाळलेल्या अंकुरावर अमृताच्या धारा पडाव्या,अथवा डबक्यांतील मासा समुद्रांत यावा, ८१ नाहीं तर एकाद्या दरिद्र्यानें द्रव्याचा ठेवा पहावा, किंवा जन्मांधास एकाएकीं दृष्टि यावी, अथवा भिकाऱ्याच्या बांध्यास इंद्रपद यावें, ८२ त्याप्रमाणें गुरूंच्या कुळाचें नांव ऐकतांच तो महासुखानें अतिशय थोरावतो; इतका कीं, कौतुकानें आकाशही त्याला सहज कवटळतां येईल. ८३ हें बघ—गुरुकुलाच्या ठिकाणीं ज्याची अशी प्रीति असलेली तुझ्या नजरेस येईल, त्याच्याजवळ ज्ञान हें सेवा करीत राहिलेलें असतें असें समज. ८४ आणि अंतःकरणांत अत्यंत प्रेमयुक्त होऊन, श्रीगुरूंच्या मूर्तीची जो ध्यानोपासना करतो; ८५ शुद्ध हृदय हेंच देवळाच्या तटाच्या भोंवतालचें आवार; व आपलें जें आराध्यदैवत श्रीगुरु, त्यांची त्या आवारांत स्थापना करून मग आपल्या भावनेनें आपणच पूजासाहित्य बनतो; ८६ अथवा ज्ञानरूपी तटांत आनंदरूप देऊळ बनवून, त्यांत श्रीगुरुरूप शिवलिंगाची स्थापना करून त्याच्यावर ध्यानरूपी अमृतानें अभिषेक करितो; ८७ बोधरूप सूर्य उगवल्यावर सात्विकबुद्धिरूप मसुराच्या डाळीची ओंजळ भरून जो शिवरूपी गुरूला लाखोली वहातो; ८८ उत्तम वेळ हेच शिवाच्या पूजेचे तीन्ही काल असें मानून, त्यांत देहाभिमानरूपी धूप जाळतो; व ज्ञानरूप दिव्यानें जो नेहमीं गुरुरूपी श्रीशंकरास ओंवाळतो; ८९ गुरूंशीं ऐक्य हाच नैवेद्य गुरूंला नेहमीं अर्पण करून, आपण पुजारी बनून गुरूंस शंकराचे ठिकाणीं मानून स्त-

राडा होय । गुरु तो लिंग ३९० नातरी जीवाचिये सेजे । गुरु कांतु करूनि भुंजे । ऐसी प्रेमाचेनि भोजें । बुद्धी वाहे ९१ कोणेएके अवसरीं । अनुरागु भरे अंतरीं । कीं तया नाम करी । क्षीराब्धी ९२ तेथ ध्येयध्यान बहु सुख । तेचि शेषतुळिका निर्दोख । वारि जळशयन देख । भावी गुरु ९३ मग वोळगती पाय । ते लक्ष्मी आपण होय । गरुड होऊनि उभा राहे । आपणाचि ९४ नाभीं आपण जन्मे । ऐसें गुरुमूर्तिप्रेमें । अनुभवी मनोधर्मे । ध्यानसुख ९५ एकाधिये वेळे । गुरु माय करी भावबळें । मग स्तन्यसुखें लोळे । अंकावरी ९६ नातरी गा किरीटी । चैतन्यतरुतळवटीं । गुरु धेनु आपण पाठीं । वत्स होय ९७ गुरुकृपास्नेहसलिलीं । आपण होय मासोळी । कोणे एके वेळीं । हेंचि भावीं ९८ गुरुकृपामृताचें वडप । आपण सेवावृत्तीचें होय रोप । ऐसेसे संकल्प । विये मन ९९ चक्षुपक्षेंवीण । पिलूं होय आपण । कैसें पैं अपारपण । आवडीचें ४०० गुरूतें पक्षिणी करी । चारा घे चांचूवरी । गुरु तारू धरी । आपण कास १ ऐसे प्रेमाचेनि थावें । ध्यानाचि ध्यानातें प्रसवे । पूर्णसिंधू हेलावे । फुटती जैसे २ किंबहुना यापरी । श्रीगुरुमूर्ती अंतरीं । भोगी आतां अवधारीं । बाह्यसेवा ३ तरि जीवीं ऐसें आवांके । म्हणे दास्य करीन निकें । जैसेनि गुरु कौतुकें । माग म्हणती ४ तैसिया साचा उपास्ती । गोसावी प्रसन्न होती । तेथ मी विनंती । ऐसी करीन ५ म्हणेन तुमचा देवा । परिवारु जो आघवा । येतुले रूपें होआवा । मीचि एकु ६ आणि उपकरतीं आपुलीं । उपकरणें आथि जेतुलीं । माझीं रूपें तेतुलीं । होआवी स्वामी ७ ऐसा मागेन वरु । तेथ हो म्हणती श्रीगुरु । मग तो परिवारु । मीचि होईन ८ उपकरणजात सकळिक । तें मीचि होईन एकैक । तेव्हां उपास्तीचें कौतुक । देखिजेल ९ गुरु बहुतांची माये । परि एकलौति होऊनि ठाये । तैसें करूनि आण वाये । कृपे तिये ४१० तया अनुरागा वेधु लावीं । एकपत्नीव्रत घेववीं । क्षेत्रसंन्यासु करवीं । लोभाकरवीं ११ चतुर्दिक्षु वारा । न लाहे निघों बाहिरा । तैसा गुरुकृपे पांजिरा । मीचि होईन १२ आपुलिया गुणांचीं लेणीं । करीन गुरुसेवे स्वामिणी । हें असो होईल गंवसणी । मीचि भक्तीसी १३ गुरुस्नेहाचिये वृष्टी । मी पृथ्वी होईन तळवटीं । ऐसिया मनोरथांचिया सृष्टी । अनंता रची १४ म्हणे श्रीगुरूचें भुवन । आपण मी होईन । आणि दास होऊनि करीन । दास्य तेथिंचें १५ निर्गमाममीं दातारें । जे बोलां-

वन करतो; ३९० अथवा आपल्या जीवाची शेज करून गुरु हे आपले पति आहेत असें समजून जो त्यांचा उपभोग घेतो; आणि अशा प्रकारें प्रेमाच्या योगानें जो आपल्या बुद्धींत अशीं कौतुकें धारण करतो; ९१ एकादे वेळेस मनांत गुरुविषयीं प्रीतीचा उमाळा आला असतां त्यालाच क्षीराब्धि असें मानतो; ९२ त्या ठिकाणीं गुरुध्यानापासून होणाऱ्या बुद्धसुखरूप शेषशय्येवर गुरु हे भगवान् विष्णूच निजलेले आहेत असें मानतो: ९३ मग, पाय रगडणारी जी लक्ष्मी, ती आपणच होतो; आणि गरुडही आपणच होऊन पुढें हात जोडून उभा राहतो; ९४ नाभीपासून उत्पन्न होणारा जो ब्रह्मदेव, तोही आपणच होऊन गुरुमूर्तीच्या प्रेमानें आपल्या मनांत ध्यानसुखाचा अनुभव घेतो; ९५ एखादे वेळेस भक्तीच्या प्रेमानें गुरूला आई असें कल्पून, स्तनपानापासून होणाऱ्या सुखाचा अनुभव घेत तिच्या अंकावर लोळतो, ९६ किंवा, अर्जुना, ज्ञानरूप वृक्षाच्या खालीं गुरु हीच कोणी गाय असें मानून, आपण तिच्या पाठीस लागलेलें वांसरूं बनतो; ९७ गुरुकृपेच्या स्नेहरूप उदकांत आपण मासोळी झालों आहों, अशीच एकादे वेळीं भावना करतो; ९८ गुरुकृपा हीच अमृताची वृष्टि आणि आपण गुरुसेवावृत्तिरूप रोप आहों, असे निरनिराळे संकल्प त्याच्या मनांत उत्पन्न होतात; ९९ त्याच्या आवडीचें अपारपण कसें आहे तें पहा कीं, डोळे व पंख या शिवायच आपण पिल्लें होतो; ४०० मग गुरूला पक्षिणी करून त्या पक्षिणीच्या चोंचीवरील चारा आपण घेतो; किंवा गुरु तारू आहेत असें समजून आपण त्यांच्या कासेस लागतो. १ अशा प्रकारें, ज्याप्रमाणें समुद्राला भरती आल्यावर लाटांपासून लाटा उत्पन्न होतात, त्याप्रमाणें प्रेमाच्या बळानें गुरुध्यानापासून अनेक ध्यानें उत्पन्न होतात. २ असे बहुत प्रकार किती सांगावे!

तर याप्रमाणें गुरूंची मूर्ति अंतर्यामीं धारण करून तो ध्यानसुखाचा अनुभव घेतो. आतां तो श्रीगुरूंची बाह्यसेवा कशी करतो तें ऐक. ३ तो मनांत असा निश्चय करतो कीं, मी गुरूंची इतकी उत्तम सेवा करीन कीं, गुरूंनी संतोष पावून मला 'कांहीं तरी माग' असें म्हणावें. ४ अशा प्रकारच्या माझ्या शुद्ध सेवेनें गुरु प्रसन्न होतील, तेव्हां मी त्यांची प्रार्थना करून असें ५ म्हणेन कीं, "हे प्रभो, आपला जेवढा परिवार आहे, त्या सर्व परिवाराचीं रूपें मींच एकट्यानें व्हावीं; ६ आणि आपल्या उपभोगास लागणारीं जितकीं साधनें आहेत तितक्या सर्वांचीं रूपें मींच एकट्यानें व्हावीं." ७ याप्रमाणें मी वर मागितल्यावर श्रीगुरु म्हणतील, 'हो' मग त्यांचा सर्व परिवार मीच होईन. (मीच त्यांची सर्व प्रकारें सेवा करीन.) ८ त्यांच्या उपयोगीं पडणाऱ्या जेवढ्या म्हणून वस्तु आहेत, त्यांपैकीं प्रत्येक वस्तु मीच होईन; त्या वेळेस माझ्या सेवेचा चमत्कार दृष्टीस पडेल. ९ गुरु हे जरी पुष्कळ भक्तांची माउली आहेत, तरी त्या गुरूंच्या कृपेस मी आपली शपथ घालून माझी एकट्याची माउली करून घेईन; ४१० गुरूंच्या प्रेमास आपलें वेड लावून, त्यांच्याकडून एकपत्नीव्रत आचरवीन;आणि गुरूंच्या लोभाकडून माझेच ठिकाणीं वास करण्याविषयीं क्षेत्रसंन्यास घेववीन; ११ वारा किती जरी वाहूं लागला तरी तो चारी दिशांच्या आंतच वाहतो; त्याप्रमाणें गुरूंच्या कृपेस सर्व बाजूंनीं मीच पिंजरा होईन. १२ माझी स्वामिनी जी गुरुसेवा, तिला मी आपल्या गुणांचीं लेणीं करीन. फार तर काय, पण गुरुभक्तीला मीच गंवसणी होईन; (आपल्याशिवाय दुसऱ्या कोणासही गुरुसेवा करूं देणार नाहीं;) १३ आणि गुरुस्नेहरूप वृष्टीखालीं मी पृथ्वी होईन. याप्रमाणें नानाप्रकारच्या कल्पना जो मनांत करतो; १४ आणि म्हणतो कीं, मी श्रीगुरूंचें राहण्याचें घर होईन; आणि दास होऊन त्यांची त्या ठिकाणीं सेवा करीत राहीन, १५ जातां येतां

डिजती उंबरे । ते मी होईन आणि द्वारें । द्वारपाळु १६ पाउवा मी होईन । तियां मीचि लेववीन । छत्र मी आणि करीन । वारीपण १७ मी तळ उपरु जाणविता । चंवरधरु हातु देता । स्वामीपुढें खोलता । होईन मी १८ मीचि होईन सगळा । करूं सुईन गुरुळां । सांडिती तो नेपाळा । पडिघा मीचि १९ हडप मी वोगळेन । मीचि उगाळु घेईन । उळिग मी करीन । आंघोळीचें४२० होईन गुरूचें आसन । अळंकार परिधान । चंदनादि होईन । उपचार ते २१ मीचि होईन सुआरु । वोगरीन उपहारु । आपणपें श्रीगुरु । वोंवाळीन २२ जे वेळीं देवो आरोगिती । तेव्हां पांतीकरु मीचि पांतीं । मीचि होईन पुढती । देईन विडा २३ ताट मी काढीन । सेज मी झाडीन । चरणसंवाहन । मीचि करीन २४ सिंहासन होईन आपण । दारि गुरु करिती आरोहण । होईन पुरेपण । वोळगेचें २५ श्रीगुरूचें मन । जया देईल अवधान । तो मी पुढां होईन । चमत्कारु २६ तया श्रवणाचे आंगणीं । होईन शब्दांचिया अक्षौहिणी । स्पर्श होईन घसणी । आंगाचिया २७ श्रीगुरूचे डोळे । अवलोकनें स्नेहाळें । पाहाती तियें सकळें । होईन रूपें २८ तिये रसने जो जो रुचेल । तो तो रसु म्यां होइजेल । गंधरूपें कीजेल । घ्राणसेवा २९ एवं बाह्यमनोगत । श्रीगुरुसेवा समस्त । वेंटाळीन वस्तुजात । होऊनियां ४३० जंव देह हें असेल । तंव वोळगी ऐसी कीजेल । मग देहांतीं नवल । बुद्धि आहे ३१ इये शरीरींची माती । मेळवीन तिये क्षिती । जेथ श्रीचरण उभे ठाती । श्रीगुरूचे ३२ माझा स्वामी कवतिकें । स्पर्शींजति जियें उदकें । तेथ लया नेईन निकें । आपीं आप ३३ श्रीगुरु वोंवाळिजती । कां भुवनीं जे उजाळिजती । तयां दीपांचिया दीप्तीं ठेवीन तेज ३४ चंवरी हन विंजणा । तेथ लयो करीन प्राणा । मग आंगाचा वोळंगणा । होईन मी ३५ जिये जिये अवकाशीं । श्रीगुरु असती परिवारेंसीं । आकाश लया आकाशीं । नेईन तिये ३६ परि जीतु मेला न संडीं । निमेषु लोकां न घडीं । ऐसेनि गणावया कोडी । कल्पांचिया ३७ येतुलेवरी धिंवसा । जयाचिया मानसा । आणि करूनियांहि तैसा । अपारु जो ३८ रात्र दिवस नेणे । थोडें बहु न म्हणे । ज्ञाणियाचेनि दाटपणें । साजा होय ३९ तो व्यापारु येणें नांवें । गगनाहूनि थोरावे । एकला करी आघवें । एकेचि काळीं ४४० हृदयवृत्ती पुढां । आंगाचि घे दवडा । काज करी होडा । मानसेंशीं ४१ एखादियां

जे उंबरे गुरु ओलांडतात, ते मीच होईन आणि दारेंही मीच होऊन, द्वारपाळही मीच होईन; १६ मी गुरूंच्या पादुका होऊन, त्या पादुका गुरूंच्या पायीं मीच लेववीन;आणि छत्रही मीच होऊन मीच तें गुरूंवर धरीन. १७ या ठिकाणीं खोल खळगा आहे, या ठिकाणीं उंचवटा आहे, अशी इशारत देणारा मी गुरूंचा चोपदार होईन; आणि गुरूंवर चवरी धरणारा, गुरूंस हात देणारा, व गुरूंपुढें पळणारा हुजऱ्याही मीच होईन; १८ गुरूंची झारी हातांत घेणारा शागिर्द मी होईन; व गुरूंला चूळ भरण्यास पाणीही मीच देईन; व चूळ टाकण्याचें निर्मळ तस्तही मीच देईन; १९ गुरूंची हस्तवी मी आपल्या खांद्यावर बाळगीन; व मी उटणें घेऊन गुरूंला स्नान घालण्याचें काम करीन, ४२० गुरूंचें आसन, अलंकार, वस्त्रचंदनादिक सर्व उपचार हे सर्व मीच होईन, २१ मीच आचारी होऊन गुरूंला फराळाचे पदार्थ वाढीन, आणि आत्मत्वानें श्रीगुरूंला ओंवाळीन; (गुरूंवरून अलईवलई उतरीन.) २२ ज्या वेळेस गुरुमहाराज भोजन करतील, त्या वेळेस त्यांचे पंक्तीचाही लाभ घेईन; आणि मीच पुढें होऊन त्यांस विडा देईन; २३ गुरूंचें उष्टें मीच काढीन, गुरूंचा बिछाना मीच झाडीन; व गुरूंची पादसेवाही मीच करीन; २४ आणि गुरूंचें सिंहासनही मीच होईन; व मग त्यावर गुरु आरोहण करतील. याप्रमाणें सर्वप्रकारें गुरूंची सेवा करीन. २५ ज्या चमत्काराकडे श्रीगुरूंचें लक्ष लागेल, तो चमत्कारही मीच होईन; २६ गुरूंच्या श्रवणरूप अंगणांत शब्दांचे असंख्य समुदाय मीच होईन; आणि गुरूंचें ज्या ठिकाणीं अंग लागेल, तें ठिकाणही मीच होईन. २७ श्रीगुरूंचे डोळे प्रेमळपणानें अवलोकन करतील तीं सर्व रूपें मीच होईन; २८ त्यांच्या जिव्हेस जो जो पदार्थ आवडेल, तो तो मीच होईन; मीच सुवासरूप होऊन त्यांच्या घ्राणेंद्रियाची सेवा करीन; २९ याप्रमाणें गुरूंची बाह्यसेवा सर्व प्रकारें करून, गुरूंना लागणाऱ्या सर्व वस्तु मीच होऊन व्यापून टाकीन." ४३० महाराज म्हणतात:—जोपर्यंत हा देह आहे, तोपर्यंत गुरूंची अशीच सेवा करीन म्हणतो; मग देह पडल्यावर त्याची बुद्धि सेवेविषयीं आस्था धरिते, तें नवल ऐका. ३१ तो म्हणतो:—"या शरिराची माती पृथ्वीच्या त्या भागांत मिळवीन, कीं ज्या ठिकाणीं श्री-गुरूंचें चरण उभे रहातील! ३२ मी आपल्या शरीरांतील उदकाचा भाग खरोखर त्या उदकाला नेऊन मिळवीन, कीं ज्या उदकाला माझे स्वामी कौतुकानें स्पर्श करतील! ३३ आपल्या देहांतील तेज त्या दिव्यांत नेऊन मिळवीन, कीं ज्या दिव्यांनीं लोक श्रीगुरूंना ओंवाळतील, अथवा जे दिवे श्रीगुरूंच्या मंदिरांत प्रकाश करीत असतील! ३४ मी आपल्या देहांतील प्राणवायूचा लय त्या ठिकाणीं करीन कीं, ज्या ठिकाणीं श्रीगुरूंना पंख्यानें व चंवरीनें वारा घातला जात असेल! ३५ मी आपल्या शरीरांतील आकाशाचा भाग त्या ठिकाणीं मिळवीन कीं, ज्या अवकाशांत (पोकळींत) श्रीगुरु आपल्या परिवारासह असतील! ३६ परंतु जिवंत असतांना व मेल्यावरही श्रीगुरूंची सेवा केल्याशिवाय रहाणार नाहीं; आणि एक पळभरही दुसऱ्यास गुरूंची सेवा करूं देणार नाहीं. याप्रमाणें कल्पचे कल्प गुरुसेवा करीन." ३७ अशा प्रकारची पूर्ण इच्छा ज्याचे मनांत आहे; आणि त्या आपल्या इच्छेप्रमाणेंच अपार गुरुसेवा करूनही जो ३८ गुरुसेवेला रात्र-दिवस किंवा थोडी-फार ह्मणत नाहीं; आणि तशांत जर गुरूंनीं काम करण्याची आज्ञा केली, तर त्याला जास्त स्फुरण येतें; ३९ गुरूंची सेवा अशा प्रकारें करण्यास जो गगनाएवढा होतो, व तें काम एकटाच एकदम करतो; ४४० मनाच्या धांवेपेक्षां याच्या अंगाची धांव पुढें असते; व याची काम करण्याची इच्छा मनाशीं पैज बांधिते; ४१ एकादे वेळेस श्रीगुरूंच्या लीलांना

वेळां । श्रीगुरूचिया खेळा । लोण करी सकळा । जीवितार्चे ४२ जो गुरुदास्यें कृशु । जो गुरु प्रेमें सपोषु । जो गुरुआज्ञेनिवासु । आपणाचि जो ४३ जो गुरु कुळें सुकुलीनु । जो गुरुबंधुसौजन्यें सुजनु । जो गुरुसेवाव्यसनें सव्यसनु । निरंतर ४४ गुरुसंप्रदायधर्म । तेचि जयाचे वर्णाश्रम । गुरुपरिचर्या नित्यकर्म । जयाचें गा ४५ गुरु क्षेत्र गुरु देवता । गुरु माता गुरु पिता । जो गुरुसेवेपरौता । मार्गु नेणे ४६ श्रीगुरूचें द्वार । तें जयाचें सर्वस्व सार । गुरुसेवकां सहोदर । प्रेमें भजे ४७ जयाचें वक्त्र । वाहे गुरुनामाचे मंत्र । गुरुवाक्यावांचूनि शास्त्र । हातीं न शिवे ४८ शिवतलें गुरुचरणीं । भलतैसें हो पाणी । तया सकळ तीर्थें आणी । त्रैलोक्यींचीं ४९ श्रीगुरूचें उशिटें । लाहे जैं अवचटें । तैं तेणें लाभें वेटे । समाधीसी ४५० कैवल्यसुखासाठीं । परमाणु घे किरीटी । उधळती पायांपाठीं । चालतां जे ५१ हें असो सांगावें किती । नाहीं पारु गुरुभक्ती । परी गा उत्क्रांतमतीं । कारण हें ५२ जया इये भक्तीची चाड । जया इये विषयींचें कोड । जो हे सेवेवांचून गोड । न मनीं कांहीं ५३ तो तत्वज्ञानाचा ठावो । ज्ञाना तेणेंचि आवो । हें असो तो देवो । ज्ञानभक्तु ५४ हें जाण पां साचोकारें । तेथ ज्ञान उघडेनि द्वारें । नांदत असे जगा पुरे । इया रीती ५५ जिये गुरुसेवेविखीं । माझा जीव अभिलाखी । ह्मणोनि सोयचुकी । बोली केली ५६ एऱ्हवीं असतां हातीं खुळा । भजनावधानीं आंधळा । परिचर्येलागीं पांगुळा । पासूनि मंदु ५७ गुरुवर्णनीं मुका । आळशी पोशिजे फुका । परि मनीं आथी निका । सानुरागु ५८ तेणेंचि पैं कारणें । हें स्थूळ पोसणें । पडलें मज म्हणे ज्ञानदेवो ५९ परि तो बोलु उपसाहावा । आणि वोळगे अवसरु देयावा । आतां म्हणेन जी बरवा । ग्रंथार्थाचि ४६० परिसा परिसा श्रीकृष्णु । जो भूतभारसहिष्णु । तो बोलतसे विष्णु । पार्थु ऐके ६१ म्हणे शुचित्व गा ऐसे । जयापाशीं दिसे । आंग मन जैसें । कापुराचें ६२ कां रत्नाचें दळवाडें । जैसें सबाह्य चोखडें । आंत बाहेरि एके पाडें । सूर्यु जैसा ६३ बाहेरीं कर्में क्षाळला । भीतरीं ज्ञानें उजळला । इहीं दोहीं परी आला । पाखाळा एका ६४ मृत्तिका आणि जळें । बाह्य येणें मेळें । निर्मळु होय बोलें । वेदाचेनी ६५ भलतेथ बुद्धी बळी । रज आरिसा उजळी । सौंदणी फेडी थिगळी । वस्त्रांचिया ६६ किंबहुना वियापरी । बाह्य चोख अवधारीं । आणि ज्ञानदीपु अंतरीं । म्हणौनि शुद्ध ६७ एऱ्हवीं तरी

आपल्या जीवितांचें लिंबलोण करितो: (त्यांच्या लीलांवरून आपलें जीवित उतरून ठेवितो;)४२ जो गुरूंच्या सेवेनें कृश असतो, व गुरूंच्या प्रेमानें पुष्ट असतो, आणि गुरूंच्या आज्ञेला आपणच स्थान असतो, ४३ जो गुरुकुलाच्या योगें आपणास कुलीन असें मानतो; जो आपल्या गुरुबंधूंच्या बरोबर सौजन्यानें वागून सुजन असतो, व जो गुरुसेवारूप व्यसनानें निरंतर व्यसनी असतो; ४४ गुरूंचे परंपरा चालत आलेले धर्म तेच ज्याचे वर्णाश्रमधर्म होत; व गुरूंची सेवा करणें हेंच ज्याचें नित्यनैमित्तिक कर्म होय; ४५ ज्याचें गुरु हेंच क्षेत्र, गुरु हेंच दैवत, गुरुच आई व गुरुच बाप; आणि ज्याला गुरुसेवेशिवाय दुसरें कांहींएक माहीत नाहीं; ४६ गुरूंचें जें द्वार तेंच ज्याचें सर्व धर्मांचें सार होय; आणि गुरुसेवकावर आपल्या सख्या भावाप्रमाणें जो प्रेम करितो. ४७ ज्याच्या वाणींतून रात्रंदिवस गुरुनामाचा उच्चार चालत असतो; व जो गुरुवाक्यांवांचून दुसरें कोणतेंही शास्त्र हातीं धरीत नाहीं; (म्हणजे मानीत नाहीं.)४८ ज्या पाण्यास गुरूंचे चरण लागले आहेत तें पाणी कसलेंही असलें तरी तें इतकें मोठें तीर्थ समजतो कीं, त्यांत त्रैलोक्यांतील सर्व तीर्थें तीर्थयात्रेकरितां येतात. ४९ अकस्मात् श्रीगुरूंचा उच्छिष्ट प्रसाद मिळाला तर त्या लाभापुढें जो समाधिसुखालाही तुच्छ मानतो; ४५० गुरु चालत असतां मार्गें जे गुरूंचे पदरजःकण उडतात ते जो आपले मस्तकावर धारण करितो, व त्या लाभापुढें मोक्षसुख तुच्छ मानितो; ५१ हें असो; गुरुभक्तीचा महिमा किती म्हणून सांगावा ! कारण, त्याला पार नाहीं. परंतु माझ्या बुद्धीला गुरुभक्तीची उकळी फुटल्यामुळें सांगणें भाग पडलें ! ५२ ज्याला या गुरुभक्तीची इच्छा आहे, व ज्याला याच गुरुभक्तीचें कौतुक वाटतें, आणि ज्याला या गुरुसेवेवांचून दुसरें कांहींही गोड लागत नाहीं, ५३ तो ब्रह्मज्ञानाचें माहेरघर असून ज्ञानाला त्याच्याच योगानें शोभा येते; फार तर काय ! गुरुची सेवा करणारा देव व ज्ञान हें त्याचा भक्त आहे. ५४ ज्याला खरोखर गुरुभक्तीची आवड आहे, त्याचे घरीं जगाला पुरून उरेल इतकें ज्ञान भरलेलें असतें. ५५ महाराज म्हणतात:-गुरुसेवेविषयीं माझ्या मनांत खरी उत्कंठा आहे म्हणून मीं त्या गुरुभक्तीचें अमर्याद असें वर्णन केलें. ५६ एरव्ही मी हात अमून थोटा, पोळे असून भजनाविषयीं अंधळा, व पाय असून गुरुसेवा करण्याविषयीं पांगळ्यापेक्षांही पांगळा:५७ आणि गुरूंचें वर्णन करण्याविषयीं मुका व आळशी आहे;इतका अवगुण असूनही फुकट पोषण करीत आहें. परंतु तशी गुरुभक्ति होण्याविषयीं माझी उत्कट इच्छा आहे. ५८ महाराज म्हणतात: एवढ्याच कारणाकरितां मला शरीराचें पोषण करणें भाग पडलें. ५९ परंतु मी एवढें अमर्याद गुरुसेवेविषयीं वर्णन केलें, तें सहन करून मलातुमची सेवा करण्यास संधि द्या,म्हणजे मी ग्रंथार्थ उत्तम रीतीनें सांगेन. ४६० साधुजनहो, ऐका ऐका, भूतांचा भार सहन करणारा विष्णूचा अवतार जो श्रीकृष्ण भगवान्, तो सांगत असून पार्थ ऐकतो आहे. ६१ कापूर अंतर्बाह्य शुद्ध असतो, तसें ज्याचें शुचित्व स्वच्छ दिसतें तेंच खरें सुचित्व होय; ६२ किंवा रत्नाचें खोड जसें अतर्बाह्य चकचकीत असतें, अथवा सूर्य जसा आंत व बाहेर लकलकीत दिसतो; ६३ कर्मांच्या योगानें ज्याची बाह्यशुद्धि झाली असून ज्ञानाच्या योगें ज्याची अंतःशुद्धि झालेली आहे; आणि अशा दोन्ही प्रकारांनीं जो शुद्ध झाला आहे; ६४ वेदांत सांगितल्याप्रमाणें मंत्रोच्चार करून मृत्तिका व पाणी वाहेरून लाविलीं असतां जशी बाह्यशुद्धि होते; ६५ ज्याप्रमाणें वाटेल तेव्हां बुद्धीच्या योगानें आरसा धुळीनें स्वच्छ करतां येतो, किंवा परटाच्या सतेलांत वस्त्र धुतल्यानें त्याचा डाग नाहींसा होतो; ६६ फार काय सांगावें ! याप्रमाणें जो बाहेर निर्मळ झाला आहे, आणि अंतर्यामीं ज्ञानाचा उजेड झाल्यामुळें खरोखर अंतर्बाह्य शुद्ध झाला आहे; ६७ बाकी, अर्जुना, अंतर्यामीं

पांडुसुता । आंत शुद्ध नसतां । बाहेरि कर्म तो तत्त्वतां । विटंबु गा ६८ मृत जैसा शृंगाग्रिला । गाढव तीर्थीं न्हाणिला । कडुदुधिया माखिला । गुळें जैसा ६९ वोसगृहीं तोरण बांधिलें । कां उपवासी अन्नें लिंपिलें । कुंकुमसेंदुर केलें । कांतहीनेलें ७० कळस ढिमाचे पोकळ । जळो वरील ते झळाळ । काय करूं चित्रींव फळ । आंतु शेण ७१ तैसें कर्म वारिचिलेकडां । न सरे थोर मोलें कुडा । नव्हे मदिरेचा घडा । पवित्र गंगें ७२ झणोनि अंतरीं ज्ञान व्हावें । मग बाह्य लाभेल स्वभावें । वरि ज्ञानें कर्म संभवे । ऐसें कें जोडे ७३ यालागीं बाह्य भागु । कर्में धुतला चांगु । ज्ञानें फिटला वंगु । अंतरींचा ७४ तेथ अंतर-बाह्य गेलें । निर्मळत्व एक जाहलें । किंबहुना उरलें । शुचित्वाचि ७५ म्हणोनि सद्भाव जीवगत । बाहेरि दिसती फांकत । स्फटिकगृहींचे डोलत । दीप जैसे ७६ विकल्प जेणें उपजे । नाथिली विकृति निपजे । अप्रवृत्तीचीं बीजें । अंकुर घेती ७७ तें आइके देखे अथवा भेटे । परि मनीं कांहींचि नुमटे मेघरंगें न कांटे । व्योम जैसें ७८ एन्हवीं इंद्रियांचेनि मेळें । विषयांवरी तरी लोळे । परि विकाराचेनि विटाळें । लिंपिजेना ७९ भेटलेया बाटेवरी । चोखी आणि माहारी । तेथ नातळे तियापरी । राहाटों जाणे ८० कां पतिपुत्रांतें आलिंगी । एकचि ते तरुणांगी । तेथ पुत्रभावाच्या आंगीं । न रिगे कामु ८१ तैसें हृदय चोख । संकल्पविकल्पीं सनोळख । कृत्याकृत्य विशेख । फुडें जाणे ८२ पाणियें हिरा न भिजे । आधणीं हरळु न शिजे । तैसी विकल्पजातें न लिंपिजे । मनोवृत्ती ८३ तया नांव शुचिपण । पार्था गा संपूर्ण । हें देखसी तेथ जाण । ज्ञान असे ८४ आणि स्थिरता साचें । घर रिगाली जयाचें । तो पुरुष ज्ञानाचें । आयुष्य गा ८५ देह तरी वारिचिलीकडे । आपुलिया परि हिंडे । परि बैसका न मोडे । मानसींची ८६ वत्सावरूनि धेनूचें । स्नेह राना न वचे । नव्हती भोग सतियेचे । प्रेमभोग ८७ कां लोभिया दूर जाये । परि जीव ठेविलाचि ठाये । तैसा देहो चाळितां नव्हे । चळुचित्ता ८८ जातया अभ्रासवें । जैसें आकाश न धांवे । भ्रमणचक्री न भंवे । ध्रुव जैसा ८९ पांथिकाचिया येरझारा । सवें पंथु न वचे धनुर्धरा । कां नाहीं जेवीं तरुवरां । येणें जाणें ९० तैसा चळणवळणात्मकीं । असोनि ये पांचभौतिकीं । भूतोमीं एकीं । चळिजेना ९१ वाहुटोळीचेनि बळें । पृथ्वी जैसी न ढळे । तैसा उपद्रवउमाळें ।

शुद्ध न होतां जो बाह्यात्कारीं कर्में करितो, त्याची सर्वत्र विटंबना होते; ६८ ज्याप्रमाणें प्रेतावर दागिने घालून त्याला शृंगारावें, किंवा गाढवास तीर्थांत न्हाऊं घालावें, अथवा कडु दुध्या भोपळा गुळानें माखावा, ६९ किंवा ओसाड घराला तोरण बांधावें, अथवा उपाशी मनुष्याच्या पोटावर अन्न लिंपावें, किंवा गतभर्तृकेनें कुंकूं व शेंदूर लावावा, ४७० मुलाम्याच्या कळसाचा पोकळ डेरा जरी किती चकचकीत दिसला, तरी तो व्यर्थ होय; तसेंच, चित्तांतील फळ किती जरी उत्तम दिसलें, तरी त्यांत शेणच भरलेलें असतें; ७१ त्याप्रमाणें बाह्यात्कारीं कर्म करणाराची स्थिति आहे! हिणकट पदार्थाला पुष्कळ मेल येत नाहीं; किंवा मद्य भरलेली घागर गंगेंत नेऊन ठेविली तरी पवित्र होत नाहीं; ७२ म्हणून अंतर्यामीं ज्ञानप्राप्ति झाली असतां बाहेरची कर्मशुद्धि सहजच होईल, परंतु ज्ञानपूर्वक बाह्यकर्माचरण कोठें आहे? ७३ याकरितां बाह्यात्कारीं कर्मांचें आचरण करून जो शुद्ध झाला आहे, व ज्ञानप्राप्तीमुळें ज्यांचें अंतर्याम निर्मळ झालें आहे, ७४ त्या ठिकाणीं आंत व बाहेर हा भेद न राहतां सर्वत्र शुद्धि होऊन त्याचे ठिकाणीं केवळ शुचित्वच वास करितें. ७५ म्हणून, अंतर्यामीं शुद्ध वासना झाली म्हणजे बाहेर इंद्रियांत ती तशीच दिसून येते. ज्याप्रमाणें स्फटिकाच्या घरांत लावलेल्या दिव्याचा प्रकाश आंतल्याप्रमाणें बाहेरही लकलखीत दिसतो; ७६ ज्या योगानें संशय उत्पन्न होतात, नसत्या विकृति जडतात, व कुकर्माकडे प्रवृत्ति होते, ७७ असे विषय जरी भेटले, अथवा कानानें ऐकले, किंवा प्रत्यक्ष पाहिले, तरी ज्याच्या मनावर त्यांचा कांहींच ठसा उमटत नाहीं; ज्याप्रमाणें आकाशाला मेघांच्या रंगामुळें कोणत्याही प्रकारची बाधा होऊं शकत नाहीं; ७८ एऱ्हवीं, ज्याचीं इंद्रियें विषयोपभोग घेत असलीं तरी विषयांच्या विकारानें ज्याच्या मनावर कोणत्याही रीतीचा पगडा बसत नाहीं; ७९ वाटेनें जात असतां एकाद्यास पवित्र अथवा अपवित्र स्त्री भेटल्यानें तिजविषयीं त्याच्या मनांत जसा विकार उत्पन्न होत नाहीं, अशा रीतीनें जो संसारांत राहटत असतां इंद्रियांच्या विकारांचें प्राबल्य आपल्या मनावर होऊं देत नाहीं; ४८० एकादी तरुण स्त्री आपल्या पतीला व पुत्रालाही आलिंगन देते, परंतु पुत्राला आलिंगन देते वेळीं तिच्या मनांत कामवासना उत्पन्न होत नाहीं, ८१ त्याप्रमाणें ज्यांचें मन निर्मळ असून चांगल्या व वाईट विकारांचीं ज्याला ओळख असते, ८२ व योग्यायोग्य कर्म जाणण्याचें ज्याला ज्ञान असतें; ज्याप्रमाणें पाण्यांत हिरा भिजत नाहीं, व अवणांत वाळू शिजत नाहीं, त्याप्रमाणें ज्याच्या मनोवृत्तीला विकारांची बाधा होत नाहीं; ८३ पार्था, ह्याच आचरणाचें नांव शुचित्व; व ज्याचे ठिकाणीं हें दृष्टीस पडतें तेथें ज्ञान आहे असें समज. ८४ आणि स्थिरपणा ज्याच्या मनांत आपण होऊन पूर्णपणें प्राप्त झाला आहे, तो पुरुष ज्ञानाचें जीवनच होय. ८५ जरी तो वरकांति देहानें वाटेल तिकडे हिंडत असतो तरी त्याच्या मनाची बैठक कायम असते. ८६ ज्याप्रमाणें गाय रानांत चरावयास गेली असतां तिचें वांसरावरील प्रेम रानांत जात नाहीं, अथवा पतिव्रता स्त्रीस सहगमनसमयींचे भोग प्रेमदायक नसतात; ८७ किंवा कृपण घर सोडून लांब गेला तरी त्याचें चित्त पुरून ठेवलेल्या द्रव्याजवळ असतें, त्याप्रमाणें देहाचे व्यापार जरी चालू असले, तरी ज्याचें चित्त स्थिरच असतें; ८८ धांवणाऱ्या ढगांबरोबर ज्याप्रमाणें आकाश धांवत नाहीं, अथवा फिरणाऱ्या नक्षत्रांबरोबर ध्रुव फिरत नाहीं, ८९ अर्जुना, प्रवास करणाऱ्या मनुष्यावरोबर ज्याप्रमाणें रस्ता चालत नाहीं किंवा झाडें जात येत नाहींत, ४९० त्याप्रमाणें पंचमहाभूतात्मक शरीराची जरी इंद्रियांच्या संबंधानें हालचाल होत असली, तरी ज्याचें मन कोणत्याही विकाराच्या लहरीनें ढळत नाहीं, ९१ वावटळीच्या योगानें ज्याप्रमाणें पृथ्वी हालत नाहीं, त्याप्रमाणें विकारांच्या योगानें ज्याचें मन ढळत

न लोटे जो ९२ दैन्यदुःखीं न तपे । भयशोकीं न कंपे । देहमृत्यु न वासिपे । पातलेनी ९३ आर्ति आशा पडिभरे । वय व्याधीं गजरें । उजू असतां पाठिमोरे । नव्हे चित्त ९४ निंदा निस्तेज दंडी । कामलोभा वरपडी । परी रोमा नव्हे वांकुडी । मानसाची ९५ आकाश हे वोसरो । पृथ्वी वरि विरो । परि नेणे मोहरों । चित्तवृत्ती ९६ हाती हाला फुलीं । पासवणा जेवीं न घाली । तैसा न लोटे दुर्वाक्यशेलीं । सलिला सांता ९७ क्षीरार्णवाचिया कल्लोळीं । कंपु नाहीं मंदराचळीं । आकाश न जळे जाळीं । वणवियाच्या ९८ तैशा आल्या गेल्या ऊर्मी । नव्हे गजबज मनोधर्मीं । किंबहुना धैर्य क्षमी । कल्पांतींही९९ पैं स्थैर्य ऐसी भाष । बोलिजे जे सविशेष । ते हे दशा गा देख । देखणेया ५०० हें स्थैर्य निधडें । जेथ आंगें जीवें जोडे । तें ज्ञानाचें उघडें । निधान साचें १ आणि इसाळु जैसा घरा । कां द्वंद्वीं हतियेरा । न विसंबे भांडारा । बद्धकु जैसा २ कां एकलौतिया बाळका । वरि पडौनि ठाके अंबिका । मधुविषीं मधुमक्षिका । लोभिणी जैसी ३ अर्जुना जो यापरी । अंतःकरण जतन करी । नेदी उभें ठाको द्वारीं । इंद्रियांच्या ४ म्हणे काम बागुल ऐकेल । हे आशा सियारी देखैल । तरी जीवा टेंकैल । म्हणोनि बिहे ५ बाहेरी धीट जैसी । दाटुगा पति कळासी । करी टेहणी तैसी । प्रवृत्तीसीं ६ सचेतनीं वाणेपणें । देहासकट आटणें । संयमावरी करणें । बुझूनि घाली ७ मनाचिया महाद्वारीं प्रत्याहाराचिया ठाणांतरीं । जो यमदम शरीरीं । जागवी उभे ८ आधारीं नाभीं कंठीं । बंधत्रयाची घरटी । चंद्रसूर्य संपुटीं । सुये चित्त ९ समाधीचे शेजेपासीं । बांधोनि घाली ध्यानासी । चित्त चैतन्य समरसीं । अतुर तें ५१० अगा अंतःकरणनिग्रहो जो । तो हा हें जाणिजो । हा आथी तेथ विजयो । ज्ञानाचा पैं ११ जयाची आज्ञा आपण । शिरीं वाहे अंतःकरण । मनुष्याकारें जाण । ज्ञानचि तो १२

इंद्रियार्थेषु वैराग्यमनहंकार एव च । जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शनम् ॥८॥

आणि विषयांविखीं । वैराग्याची निकी । पुरवणी मानसीं कीं । जिती आथी १३ वमिलिया अन्ना । लाळ न घोटीं रसना । कां आंग न सूये आलिंगना । प्रेताचिया १४ विष खाणें नागवे । जळत घरीं न रिघवे । व्याघ्रविवरा न वचवे । वस्ती जेवीं १५ घडाडीत लोहरसीं । उडी न घालवे जैसी । न करवे

नाहीं; ९२ दारिद्र व दुःख यांपासून जो पीडित होत नाहीं, भीति व शोक यांपासून जो व्याकुळ होत नाहीं, व देहास मृत्यु आला असतांही जो भीत नाहीं; ९३ एकाद्या वस्तूची बलवत्तर आशा, वार्धक्य, तशांत व्याधि यांचा भर अंगावर प्राप्त झाला असतां ज्याचें चित्त डगमगत नाहीं. ९४ निंदा, अपमान, दंड, काम व लोभ यांचा वरपगडा झाला असतांही ज्याचे मनाचा कैस मुद्दां वांकडा होत नाहीं;९५ आकाश तुटून पडलें किंवा पृथ्वी विरून गेली तरी ज्याची चित्तवृत्ति मागारी फिरत नाहीं; ९६ हर्त्ताला फुलानें मारिलें असतां त्याचा मार जसा त्याचे पासंगालाही नसतो, तसा सलण्यासारख्या शब्दाचा प्रहार केला असतांही ज्याला ते सलत नाहींत.९७ क्षीराब्धीच्या लाटांनीं ज्याप्रमाणें मंदराचल हालत नाहीं किंवा वणव्याच्या ज्वालांनीं आकाश जळत नाहीं, ९८ त्याप्रमाणें इंद्रियांवर विषयविकारांच्या कितीहि लाटा आल्या किंवा गेल्या तरी ज्याचें मन गडबडत नाहीं, किंवा कल्पांतींही जो धैर्य सोडीत नाहीं, ९९ हे डोळसा अर्जुना, स्थैर्य म्हणून ज्याला म्हणतात, व जें या नांवानें प्रसिद्ध आहे, त्याचीं हीं अशीं लक्षणें आहेत, ५०० हेंच अविनाशी स्थैर्य ज्याच्या अंगीं अंतर्बाह्य बाणलें आहे तो ज्ञानाचा उघड उघड ठेवाच आहे. येथून अंतःकरणनिग्रहाचें लक्षण दृष्टांतपूर्वक सांगतात—१ आणि साप जसें आपली खोडी करणाऱ्या मनुष्याचें घर किंवा योद्धा आपलें हत्यार, अथवा कृपण आपला ठेवा विसरत नाहीं; २ किंवा ज्याप्रमाणें एकुलत्या एक मुलावर त्याची आई जीव कीं प्राण करून असते, अथवा मधमाशी मधाविषयीं आसक्त असते, ३ त्याप्रमाणें, अर्जुना, जो आपलें अंतःकरण संभाळून इंद्रियांच्या दारांतही उभें राहूं देत नाहीं; ४ तो म्हणतो, आपण अंतःकरण ताब्यांत ठेवलें हें कामरूप बागुलबोवा ऐकेल, व आशारूप डाकीण अंतःकरणाची अशी स्थिति पाहून त्याचा आपल्या पाशांत गुंतवील, म्हणून तो फार भिऊन असतो. ५ ज्याप्रमाणें व्यभिचारिणी स्त्रीला तिचा दांडगा नवरा बाहेर फिरकूं न देतां घरांत कोंडून ठेवतो, त्याप्रमाणें आपल्या मनोवृत्तीला जो इंद्रियाकडे जाऊं न देतां अंतर्यामीं कोंडून ठेवतो; ६ जिवंतपणीं देहाची पर्वा न करितां देह झिजवून इंद्रियांचा निग्रह करितो, ७ मनाच्या दरवाजांत व प्रत्याहाराच्या जागेंत जो यम व दम अनुक्रमें रात्रंदिवस पहारेकरी उभे करितो, ८ मूळबंध, ओढियाण बंध व जालंधर बंध हे तिन्ही स्थिर करून इडा व पिंगला यांच्यामध्यें असणाऱ्या सुषुम्नेंत चित्ताचा लय करितो,९ समाधीच्या शेजेजवळ जो ध्यानाला बांधून टाकतो, आणि चित्त,चैतन्यांत ऐक्य होण्याविषयीं आतुर असतें. ५१० अशी जी चित्ताची स्थिती, त्याला अंतःकरणनिग्रह असें म्हणतात. आणि असा अंतःकरणनिग्रह ज्याच्या ठिकाणीं आहे, त्याच्या ठिकाणीं ज्ञानाचा विजय आहे असें समज. ११ ज्या साधकाची आज्ञा, त्याचें मन शिरसा वंद्य मानतें, तो जरी मनुष्याच्या आकाराचा दिसला, तरी तो मूर्तिमंत ज्ञानच आहे, असें जाण. १२

अन्वय–इंद्रियार्थेषु वैराग्यं, अनहंकारः एव, जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शनम्, ॥ ८ ॥

अर्थ–विषयांविषयीं विरक्ती, अहंपणाचा अभाव आणि जन्म, मृत्यु, वृद्धपणा व शरीरव्यथा यांचे ठिकाणीं दोषदृष्टीनें पाहणें. ॥ ८ ॥

आणि विषयांविषयीं ज्याच्या मनांत वैराग्याची जिवंत मदत आहे; १३ ओकलेलें अन्न फिरून खाण्याविषयीं जिव्हेला इच्छा होत नाहीं;अथवा प्रेताला आलिंगन देण्याविषयीं इच्छा होत नाहीं; १४ विष खाल्लें असतां जशी नागवण खास होते, जळत्या घरांत ज्याप्रमाणें फिरण्याचें धैर्य होत नाहीं, किंबहुना व्याघ्राच्या गुहेंत ज्याप्रमाणे वस्ती करवत नाहीं, १५ सळसळीत लोखंडाचें रसांत उडी घालवत नाहीं, किंवा अजगराची उशी कर-

उशीशी । अजगराची १६ अर्जुना तेणें पाडें । जयासी विषयवार्ता नावडे । नेदी इंद्रियांचेनि तोंडें । कांहींच जावों १७ जयाचे मनीं आलस्य । देहीं अतिकार्श्य । शमदमीं सौरस्य । जयासि गा १८ तपोव्रतांचा मेळावा । जयाचे ठायीं पांडवा । युगांत जया गांवा- । आंतु येतां १९ बहु योगाभ्यासीं हांव । विजनाकडे धांव । न साहे जो नांव । संघाताचें ५२० नाराजांचीं आंथुरणें । पूयपंकीं लोळणें । तैसें लेखी भोगणें । ऐहिकींचें २१ आणि स्वर्गीतें मानसें । ऐकोनि मानी ऐसें । कुहिलें पिशित जैसें । श्वानाचें कां २२ तें हें विषयवैराग्य । जें आत्मलाभाचें सभाग्य । येणें ब्रह्मानंदा योग्य । जीव होती २३ ऐसा उभयभोगीं त्रासु । देखसी जेथ बहुवसु । तेथ जाण रहिवासु । ज्ञानाचा तूं २४ आणि सचाडाचिये परी । इष्टापूर्तें करी । परी केलेंपण शरीरीं । वसों नेदी २५ वर्णाश्रमपोषकें । कर्में नित्यनैमित्तिकें । यामाजि कांहीं न ठके । आचरतां २६ परि हें मियां केलें । कीं हें माझेनि सिद्धी गेलें । ऐसें नाहीं ठेविलें । वासनेमाजी २७ जैसें अवचितपणें । वायूसि सर्वत्र विचरणें । कीं निरभिमान उदैजणें । सूर्याचें जैसें २८ कां श्रुति स्वभावता बोले । गंगा काजेंविण चाले । तैसें अवष्टंभहीन भलें । वर्तणें ज्याचें २९ ऋतुकाळीं तरी फळती । परी फळलों हें नेणती । तयां वृक्षांचिये ऐसी वृत्ती । कर्मीं सदा ५३० एवं मनीं कर्मीं बोलीं । जेथ अहंकारा उखी जाहली । एकावळीची काढिली । दोरी जैसी ३१ संबंधेवीण जैसीं । अभ्रें असती आकाशीं । देहीं कर्में तैसीं । जयासि गा ३२ मद्यपाआंगींचें वस्त्र । कां लेपाहातीचें शस्त्र । बैलावरी शास्त्र । बांधलें आहे ३३ तया पाडें देहीं । जया मी आहें हे सेचि नाहीं । निरहंकारता पाहीं । तया नांव ३४ हें संपूर्ण जेथें दिसे । तेथेंचि ज्ञान असे । इयेविषीं अनारिसें । बोलों नये ३५ जन्ममृत्यु जरा दुःखें । व्याधिवार्धक्यकलुषें । तियें आंगा न येतां देखे दुरूनि जो ३६ साधकु विवासिया । कां उपसर्गु योगिया । पावे उणेयापुरेया । वोथंबा जेवीं ३७ वैर जन्मांतरींचें । सर्पा मनौनि न वचे । तेविं अतीता जन्मांचें । उणें जो वाहे ३८ डोळां हरळ न विरे । घाईं कोत न जिरे । तैसें काळींचें न विसरे । जन्मदुःख ३९ म्हणे पूयगर्तें रिगाला । अहा मूत्ररंध्रें नि-

वत नाहीं, १६ त्याप्रमाणें अर्जुना, ज्याला विषयांचे नांव घेतलेलें देखील खपत नाहीं; तो, इंद्रियांची व विषयांची गांठ पडूं देत नाहीं. १७ ज्याच्या मनांत विषयसेवनाविषयीं आळस भरलेला आहे, व जो विषयसेवन केल्यामुळें रोड झाला आहे, परंतु ज्याच्या मनाचें इंद्रियनिग्रहाशीं एकरूप आहे; १८ हे पांडवा, जे नहमीं तपें व व्रतें एकसारखीं करतो; व ज्याला मनुष्याच्या वस्तींत येणें, म्हणजे प्रळयकाळाप्रमाणें दुःख होतें; १९ ज्याची योगाभ्यासाविषयीं फार इच्छा असते; व अरण्यांत रहाणें ज्याला फार आवडतें, आणि मंडळींत मिसळण्याचें नुसतें नांवही ज्याला सहन होत नाहीं. ५२० बाणांच्या शय्येवर निजणें, अथवा पूजांच्या चिखलांत लोळणें, याप्रमाणें जो ऐहिक भोगांची योग्यता समजतो; २१ आणि स्वर्गप्राप्तीची गोष्ट काढल्यावर जो त्याला कुत्र्याच्या कुजलेल्या मांसाप्रमाणें मानतो; २२ ज्याला विषयवैराग्य असें म्हणत तें हें होय; व हेंचआत्मप्राप्तीचें भाग्य असून त्याच्याच योगानें जीव ब्रह्मानंदाचें सुख भोगण्यस योग्य होतात. २३ याप्रमाणें इहपरलोकींच्या सुखोपभोगांचा ज्याला पूर्ण कंटाळा आहे, तेथेंच ज्ञानाची वस्ती आहे असें पक्कें समज. २४-येथून निरभिमानाचें वर्णन दृष्टांतपूर्वक करितात.-आणि जो आस्थापूर्वक यज्ञ करणें व तलाव, बाग वगैरे बांधणें हीं कर्में करितो; परंतु कर्तृत्वाच्या अभिमानाचा लेश सुद्धां आपल्या आंगीं वसूं देत नाहीं; २५ वर्णाश्रमाचें पोषण करणारीं जीं नित्यनैमित्तिक कर्में तीं ज्याच्या आचरणांत रहात नाहींत, २६ परंतु हें कर्म मीं केलें किंवा मीं केल्यामुळें सिद्धीस गेलें, असें मुळींच मनांत आणीत नाहीं; २७ ज्याप्रमाणें वायु हा सहज सर्वत्र फिरतो, किंवा सूर्य निरभिमानानें सर्वत्र प्रकाश पाडतो; २८ अथवा श्रुतिही स्वभावतः सर्वांस इष्ट अशाच गोष्टींचें वर्णन करिते, किंवा गंगा अमुकच ठिकाणीं जाण्याचें मनांत न धरितां सहज ओघानें जाते, त्याप्रमाणें, ज्याचें नेहमींचें वर्तन अभिमानशून्यतेचें आहे; २९ वृक्षास यथाकालीं फळें येतात, परंतु त्यांची त्यास आठवणही नसते, त्या वृक्षाप्रमाणेंच कर्में करीत असतांना कर्मफलप्राप्तीविषयीं ज्याची वृत्ति उदासीन असते; ५३० ज्याप्रमाणें हारांतील दोरी काढून घेतल्यावर त्याचें ऐक्य नाहींसें होतें, त्याप्रमाणें मनांत, आचरणांत व बोलण्यांत ज्यानें अहंकाराचा नाश केला आहे; ३१ अभ्रांचा आकाशाशीं संबंध नसतांही ज्याप्रमाणें तीं आकाशांत आपल्या दृष्टीस पडतात, त्याप्रमाणें जो देहानें कर्माचें आचरण करीत असतां त्यापासून अलिप्त रहातो; ३२ मद्यप्याला ज्याप्रमाणें आपल्या अंगावरील वस्त्राची आठवण नसते, किंवा चित्राच्या हातीं दिलेल्या शस्त्राचा उपयोग त्याला कांहीं नसतो, अथवा बैलावर बांधलेल्या शास्त्रांचा त्याला उपयोग नसतो, ३३ त्याप्रमाणें जो आपल्या देहाविषयीं निरभिमान असतो, त्यालाच निरअहंकार असें म्हणतात. ३४ हें चिन्ह ज्याचे ठिकाणीं पूर्णपणें दृष्टीस पडतें, त्याचेच ठिकाणीं ज्ञान वास करितें, त्याजबद्दल बिलकूल शंका नाहीं. ३५ जो जन्म, मृत्यु, जरा, दुःखें, व्याधि, वार्धक्य व पातकें ही येण्याचे पूर्वी तीं दूर आहेत तोंच आतां प्राप्त झालीं आहेत अशी कल्पना करून जो सावध रहातो; ३६ ज्याप्रमाणें आपल्यास पिशाच्च बाधा होऊं नये, म्हणून मांत्रिक अगोदर व्यवस्था करतो अथवा आपल्यास दुसऱ्याचा उपसर्ग लागूं नये, म्हणून योगी अगोदर तजवीज करतो, किंवा गवंडी हा भिंत बांधते वेळीं ओळंबा लावून ती मागें पुढें जाऊं देत नाहीं.- येथून जन्माविषयींचा विचार दृष्टांतपूर्वक सांगतातः-३७ सर्पाचे मनांतून ज्याप्रमाणें जन्मांतरींचेंही वैर नाहींसें होत नाहीं, त्याप्रमाणें जो पूर्वजन्मींचें दुःख आठवून पुनः जन्म न होऊं देण्याबद्दल उद्योग करतो; ३८ ज्याप्रमाणे डोळ्यांत खडा गेला असतां तो विरत नाहीं, किंवा शस्त्राच्या घावांत भाला सहन होत नाहीं, त्याप्रमाणें या जन्मीं रोज होणारीं दुःखें जो विसरत नाहीं, ३९ व म्हणतो कीं, अरेरे, मी मूत्रद्वारांतून पूंवाच्या खाड्यांत गेलेल्या रेतापासून जन्मलों आहें

घाला । कटारें मियां चाटिला । कुचस्वेदु ५४० ऐसऐसिया परी । जन्माचा कांटाळा धरी । म्हणे आतां तें मी न करी । जेणें ऐसें होय ४१ हारी उमचावया । जुंवारी जैसा ये डाया । कीं वैरा बापाचेया । पुत्र जचे ४२ मारिलियाचेनि रागें । पाठीचा जेवीं सूड मागे । तेणें आक्षेपें लागे । जन्मापाठीं ४३ परि जन्मती ते लाज । न सांडी जयाचें निज । संभाविता निस्तेज । न जिरे जेवीं ४४ आणि मृत्यु पुढां आहे । तोचि कल्पांतीं कां पाहे । परि आजीच होये । सावधु जो ४५ माजि अथाव म्हणतां । थडियेचि पांडुसुता । पोहणार आइता । कासे जेवीं ४६ कां न पवतां रणाचा ठावो । सांभाळिजे जैसा आवो । वोडण सुइजे घावो । न लागतांचि ४७ पाहेचा पेणा वाटवधा । तंव आजीचि होइजे सावधा । जीवु न वचतां औषधा । धांविजे जेवीं ४८ एन्हवीं ऐसें घडे । जो जळत घरीं सांपडे । तो मग न पवाडे । कुहा खणों ४९ चोंढिये पाथरु गेला । तैसेनि जो बुडाला । तो बोंबेहीसकट निमाला । कोण सांगे ५५० म्हणोनि समर्थैसीं वैर । जया पडिलें हाडखाइर । तो जैसा आठही पाहर । परजूनि असे५१ नातरी केळवली नोवरी । कां संन्यासी जयापरी । तैसा न मरतां जो करी । मृत्युसूचना ५२ पैं गा जो ययापरी । जन्मेंचि जन्म निवारी । मरणें मृत्युमारी आपण उरे ५३ तया घरीं ज्ञानाचें । सांकडें नाहीं साचें । जया जन्ममृत्यूचें । निमालें शल्य ५४ आणि तयाचिपरी जरा । न टेकतां शरीरा । तारुण्याचिया भरा- । माजि देखे ५५ म्हणे आजिच्या अवसरीं । पुष्टि जे शरीरीं । ते पाहे होईल काचरी । वाळली जैसी ५६ निदैवाचे व्यवसाय । तैसे ठाकती हातपाय । अमंत्र्या राज्याची परी आहे । बळा यया ५७ फुलांचिया भोगा- । लागीं प्रेमटां गा । तें करेयाचा गुडघा । तैसें होईल ५८ वोढाळाच्या खुरीं । आखरुआतें बुरी । ते दशा माझ्या शिरीं । पावेल गा ५९ पद्मदळेंसीं इसाळें । भांडताति हे डोळे । ते होती पडवळें । पिकलीं जैसीं ५६० भंवईचीं पडळें । वोमथती शिनसाळें । उरु कुहिजेल जळें । आंसुवांचेनी ६१ जैसें बाभुळीचें खोड । गिरबडूनि जाती सरड । तैसें पिचडीं तोंड । सरकेटिजेल ६२ रांधवणी चुलीपुढें । पन्हे उन्मादती खातवडे । तैसींचि यें नाकाडें । बिडबिडती ६३ तांबूलें वोंठ राऊं । हांसतां दांत दाऊं । सनागर मिरऊं । बोल जेणें ६४ तयाचि पाहें या तोंडा । येईल जळंबटाचा लोंढा । इया उमळती दाढा । दांतांसहित ६५ कुळवाडी रिणें

व मातेचें स्तनपान करतेवेळीं माझे तोंडांत स्तनावरील घामही गेला आहे ! ५४० याप्रमाणें जो जन्माचा कंटाळा करतो; व असें ह्मणतो कीं,ज्या योगानें मला अन्य जन्म पुनः प्राप्त होईल तें कर्म मी करणार नाहीं; ४१ ज्याप्रमाणें जुगारी हा डाव हारल्यावर तो फेडण्याकरितां पुनः सावधगिरीनें खेळतो, किंवा मुलगा आपल्या बापाचें वैर उगवतो; ४२ अथवा एकाद्यास कोणीं मारिलें असतां त्याचा पाठिराखा जसा सूड उगवतो; तसा हा जन्म पुनः न यावा ह्मणून जो काळजीनें त्याचे पाठीस लागून दक्ष असतो; ४३ ज्याप्रमाणें संभाविताला अपकीर्ति सहन होत नाहीं, त्याप्रमाणें ज्याच्या मनांतून अशा अमंगल जन्माची लज्जा नाहींशी होत नाहीं.--येथून मृत्युविषयींचा विचार दृष्टांतपूर्वक सांगतातः—४४ पुढें येणारा मृत्यु कल्पांतीं का असेना, पण जो त्याच्याविषयीं आजच सावध राहतो; ४५ अर्जुना, नदीच्या मध्यभागीं अतिशय खोल पाणी आहे, असें कोणी सांगितल्याबरोबर पोहणारा पुरुष कांठावर उभा असतांच सहजच कांस बांधतो ४६ किंवा रणांत जाण्याचे पूर्वीच जो आपलें अवसान संभाळून असतो किंवा जो घाव लागण्याचे पूर्वीच ढाल पुढें करतो; ४७ उद्यांच्या मुक्कामाला कांहीं दगा होईल असें समजल्यावर जो आजच सावध राहतो; अथवा प्राण जाण्याचे पूर्वीच औषधाची योजना करतो. ४८ नाहीं तर जळत्या घरांत सांपडल्यावर मग विहीर खणण्याचा प्रयत्न जसा व्यर्थ. ४९ अरे, डोहाचे तळाशीं जाणाऱ्या दगडाप्रमाणें जो या संसारसागरांत बुडतो, तो बोंबेसह बुडाला ह्मणून कोण सांगणार ?५५० ह्मणून बलवंताबरोबर ज्याचें हाडवैर पडलें आहे, तो जसा रात्रंदिवस शस्त्र परजून असतो; ५१ किंवा उपवर झालेली नोवरी लवकरच दुसऱ्याच्या घरीं खास जाणार असल्यामुळें ती घरांत असूनही नाहीं असें तिचा बाप समजतो, अथवा संन्यास घेतल्यावर ज्याप्रमाणें तो मरणास तयार असतो, त्याप्रमाणें जो जिवंत असूनही आतांच मृत्यु प्राप्त झाला आहे, अशाबद्दल विचार करतो; ५२ जो याप्रमाणें जिवंत असतांनाच पुनर्जन्माचें निवारण करतो, या देहाच्या मृत्यूनें मृत्यूलाच मारून टाकून आपण ब्रह्मरूपानें उरतो. ५३ आणि अशा प्रकारें ज्याला जन्ममृत्यूचें दुःख राहिलें नाहीं; त्याला ज्ञानाची कधींही उणीव नसते.५४ आणि त्याचप्रमाणें शरीरास म्हातारपण आलें नाहीं, तोंच ऐन तारुण्याच्या भरांतच जो म्हातारपणचा विचार करतो, ५५ तो म्हणतोः आजमितीस माझ्या शरीरांत जी शक्ति आहे, तें शरीर जरा प्राप्त झाल्यावर वाळलेल्या काचरीसारखें होईल. ५६ दैवहीनाच्या खटपटी व्यर्थ होतात, किंवा एकाद्या राजास प्रधान नसला ह्मणजे त्याची जशी स्थिति होते, तसे माझे हातपाय चालेनातसे झाले ह्मणजे या माझ्या शक्तीची स्थिति होईल; ५७ फुलांचा वास घेणारें नाक तें उंटाच्या गुडघ्याप्रमाणें बधिर होईल; ५८ आषाढ महिन्यांत पावसाच्या झडींत, ज्याप्रमाणें ओढाळगुराचे पाय चिखलानें कुजतात, त्याप्रमाणें माझें हें शरीर होईल; ५९ जे माझे डोळे सांप्रत कमलपत्राशीं स्पर्धा करीत आहेत, तेच पुढें पिकलेल्या पडवळाप्रमाणें निस्तेज होऊन खोल जातील; ५६० भूंवया वाळलेल्या सालीप्रमाणें डोळ्यांवर लोंबतील, व डोळ्यांतून वाहणाऱ्या पाण्यामुळें ऊर कुजून जाईल; ६१ ज्याप्रमाणें सरड हा वाभऱ्याच्या खोडावरून खालीं वर आल्यागेल्यामुळें तें डिंकानें बुळबुळीत होतें, त्याप्रमाणें थुंकीनें तोंड भरून जाईल; ६२ स्वयंपाकाच्या चुलीपुढें खणलेल्या चरांत ज्याप्रमाणें पाणी सांचून बुडबुडे येतात, त्याप्रमाणें नाक शेंवडानें बरबटून जाईल; ६३ ज्या ह्या तोंडाचे ओंठ मी तांबुलानें रंगवितो, हंसतांना दांत दाखवितो, व ज्याच्या योगानें मला उत्तम भाषण करतां येतें; ६४ त्याच या तोंडाला लाळेचा लोंढा येईल, व दातांवर दाढा पडतील; ६५ कर्ज झाल्यावर

दाटलीं । कां वांकडिया ढोरें बैसलीं । तैसी नुठी कांहीं केली । जीभचि हे ६६ कुसळें कोरडीं । वारेनें जाती बरडीं । तैसी आपदा तोंडीं । दाढियेसी ६७ आपाढींचेनि जळें । जैसीं झिरपती शैलाचीं मौळें । तैसे खांडीहूनि लाळे । पेटती पुर ६८ वाचेसि अपवाडु । कानीं अनुघडु । पिंड गरुवा माकडु । हे ईल हा ६९ तृणाचें बुझवणें । आंदोळे वारेनगुणें । तैसें येईल कांपणें । सर्वांगासी ५७० पायां पडती वेंगडी । हात वळती मुरकुंडी । बरवेपणा बागडी । नाचवि जैल ७१ मळमूत्रद्वारें । होऊनि ठाती खोंकरें । नवासियें होती इतरें । माझिया निधनीं ७२ देखोनि थुंकील जगु । मृत्यूचा पडैल पांगु । सोइरियां उबगु । येईल माझा ७३ स्त्रिया म्हणती विवसी । बाळें जाती मूर्च्छीं । किंबहुना चिळसी । पात्र होईन ७४ उभळीचा उजगरा । सेजारिया सोइलिया घरा । शिणवील म्हणती म्हातारा । बहुतांतें हा ७५ ऐसी वार्धक्याची सूचणी । आपणिया तरुणपणीं । देखे मग मनीं । विटे जो गा ७६ म्हणे पाहे हें येईल । आणि आतांचें भोगितां जाईल । मग काय उरेल । हितालागीं ७७ ह्मणोनि नाइकणें पावे । तंव आइकोनि घाली आघवें । पंगु न होतां जावें । तेथ जाय ७८ दृष्टी जंव आहे । तंव पाहावें तेतुलें पाहे । मूकत्वा आथीं वाचा वाहे । सुभाषितें ७९ हात होती खुळे । हें पुढील मोटकें कळे । तंव करूनि घाली सकळें । दानादिकें ५८० ऐसी दशा येईल पुढें । तैं मन होईल वेडें । तंव चिंतूनि ठेवी चोखडें । आत्मज्ञान ८१ जैं चोर पाहे झोंबती । तंव आजीचि रुसिजे संपत्ती । कां झांकाझांकि वाती । न वचतां कीजे ८२ तैसें वार्धक्य यावें । मग जें वायां जावें । तें आतांचि आघवें । सवतें करी ८३ आतां मोडूनि ठेलीं दुर्गें । कां वळित धरिलें खगें । तेथ उपेक्षूनि जो निघे । तो नागवला कीं ८४ तैसें वृद्धाप्य होय । आलेपण तें वायां जाय । जे तो शतवृद्ध आहे । नेणों कैंचा ८५ झाडिलींचि कोळें झाडी । तया न फळे जेवीं बोंडी । जाहला अग्नि तरी राखोंडी । जाळील काई ८६ ह्मणोनि वार्धक्याचेनि आठवें । वार्धक्या जो नागवे । तयाच्या वायां जाणावें । ज्ञान आहे ८७ तैसेंचि नाना रोग । पडिघाती ना जंव पुढां

शतकरी जसा बुडतो, किंवा पावसाच्या झडींत जनावरांना उठवत नाहीं, तशी जीभ कांहीं केल्यानें हालतच नाहीं; ६६ जशीं वाळलेल्या गवताचीं कुसळें वाऱ्यानें उडून जातात, तशी दशा दाढीचे केसांस येऊन लहान मुलें तीं उपटावयास लागतील. ६७ आषाढ महिन्यांतील पावसाच्या झडीनें ज्याप्रमाणें पर्वतांचीं शिखरें पाझरतात, त्याप्रमाणें शरीरावरील खबंदांतून पाण्याचे पूर लोटतात. ६८ तोंडांतून शब्दांचा उच्चार होणार नाहीं, व कानांनीं स्पष्ट ऐकूं येणार नाहीं, अशी या शरीराची वृद्ध माकडाप्रमाणें स्थिति होईल. ६९ शेतांतील पांखरांकरितां उभें केलेलें गवताचें बुजगावणें जरी वाऱ्यानें सहज हालतें, तसें सर्वांग सहज हालूं लागेल; ५७० पायांत पाय आडकतील व हात कांपूं लागतील, याप्रमाणें सर्व शरीराच्या चेष्टांचें सोंग होईल! ७१ मलमूत्रद्वारेंही फुटक्या मडक्यासारखी होऊन आपल्या अवसानावाहेर जातील आणि माझा अंत केव्हां होईल म्हणून जवळची मंडळी देवास नवस करतील! ७२ माझी अशी अवस्था पाहून जग माझा धिःकार करील, मृत्यु लवकर येणार नाहीं, आणि सोयऱ्याधायऱ्यांना माझा कंटाळा येईल. ७३ बायका मला पिशाच म्हणतील, आणि तें ऐकून मुलांना माझी फार भीति वाटेल; फार काय सांगावें! मी सर्व प्रकारें लोकांना चिळस येण्यास पात्र होईन. ७४ खोकल्याची उभळ रात्रभर ऐकून शेजारच्या घरांतील निजलेलीं माणसें म्हणूं लागतील कीं, हा म्हातारा कितीकांना त्रास देईल न कळे! ७५ याप्रमाणें म्हातारपणीं आपली स्थिति होईल, असें मनांत आणून जो तारुण्यांतच त्या स्थितीबद्दल मनांत खंती बाळगतो, ७६ व असें म्हणतो कीं, पुढें आपल्यास म्हातारपण येईल, आणि हल्लींचें तारुण्य विषयोपभोगांत नाहींसें होईल, मग आपलें हित होण्याकरितां आपल्याजवळ काय राहील? ७७ म्हणून कान बधिर झाले नाहींत, तोंपर्यंतच आत्मानात्मविचाराच्या सर्व गोष्टी ऐकून घेतो; आणि जोंपर्यंत शरीर स्वाधीन आहे, तोंपर्यंतच तीर्थयात्रा करून येतो; ७८ दृष्टि शाबूद आहे, तोंपर्यंतच शास्त्रानें पाहण्यास योग्य म्हणून सांगितलें तें पाहून घेतो; आणि जोंपर्यंत वाणी कायम आहे, तोंपर्यंतच ईश्वराचे गुणानुवाद गाऊन घेतो; ७९ पुढें आपले हात खुळे होतील हें ओळखून, ते शाबूत आहेत तोंच सर्व दानधर्म करून घेतो; ५८० याप्रमाणें पुढें दशा आल्यावर मन शुद्धीवर राहाणार नाहीं म्हणून अगोदरच शुद्ध आत्मज्ञानाचा पूर्ण विचार करून ठेवतो; ८१ उद्यां आपल्यास चोर लुटतील, असें समजून जो आजच आपले जवळील संपत्तीची व्यवस्था लावून अलिप्त राहतो, किंवा दिवा जाण्याच्यापूर्वी सर्व जिनसा व्यवस्थित ठेवतो, ८२ त्याप्रमाणें म्हातारपण आल्यावर तारुण्यांत ज्ञानप्राप्ति न करून घेतल्यामुळें जे जन्ममृत्यूंच्या फऱ्यांत पडून व्यर्थ जावें, त्यापेक्षां जन्ममृत्यु देणाऱ्या सर्व गोष्टी आपल्यापासून दूर कराव्या. ८३ ज्या वाटेंत पुष्कळ डोंगर, किल्ले, वगैरे आहेत असें समजून किंवा पक्षी आपापल्या घरट्यांकडे परत जात आहेत तेव्हां संध्याकाळ झाली असें समजून, जो आपल्याजवळ कांहींएक ऐवज न घेतां सडा जातो, त्यास चोर कसे लुटतील? ८४ त्याप्रमाणें, वार्धक्य आल्यानंतर आत्मज्ञानावांचून फुकट जावें, असा विचार करून ज्यानें तारुण्यांतच आत्मचिंतन करून ठेवलें आहे, तो वृद्धापेक्षांही वृद्ध आहे असें कसें समजूं नये? ८५ तिळाच्या झाडाचीं झाडलेलीं बोंडें पुनः झाडलीं तरी जसे तीळ सांपडावयाचे नाहींत; अथवा मोठा अग्नी जरी झाला तरी जी मूळची राखोंडी आहे तिला पोळील काय? ८६ म्हणून वार्धक्याचा ज्यानें अगोदरच विचार केलेला आहे त्याची वार्धक्यापासून हानि होत नाहीं आणि त्याच्याच ठिकाणीं ज्ञान आहे असें समजावें. ८७—येथून रोगाविषयीं दृष्टांतपूर्वक सांगतातः—त्याचप्रमाणें, नाना प्रकारचे रोग जोंपर्यंत शरीरास जडले नाहींत, तोंपर्यंतच शरीराच्या आरोग्याचा आत्मज्ञा-

आंग । तंव आरोग्याचे उपेग । करूनि घाली ८८ सापाच्या तोंडीं । पडिली जे उंडी । ते लाऊनि सांडी । प्रबुध्दु जैसा ८९ तैसा वियोगें जेणें दुःखें । विपत्ति शोक पोखे । तें स्नेह सांडूनि सुखें । उदासु होय ५९० आणि जेणेंजेणें कडे । दोष मूतील तोंडें । तयां कर्मरंध्रीं गुंडे । नियमाचे दाटी ९१ ऐसऐसिया आइती । जयाची परी असती । तोचि तो ज्ञानसंपत्ती । गोसावी गा ९२ आतां आणीकही एक । लक्षण अलौकिक । सांगेन आइक । धनंजया ९३

असक्तिरनभिष्वंगः पुत्रदारगृहादिषु । नित्यं च समचित्तत्वमिष्टाऽनिष्टोपपत्तिषु ॥९॥

तरि जो या देहावरी । उदासु ऐसिया परी । उखिता जैसा बिढारीं । बैसला आहे ९४ कां वृक्षाची साउली । वाटे जातां मीनली । घरावरी तेतुली । आस्था नाहीं ९५ साउली सरिसीच असे । परी असे हें नेणिजे जैसें । स्त्रियेचें तैसें । लोलुप्य नाहीं ९६ आणि प्रजा जे जाली । तिये वस्ती कीर आलीं । कां गोरुवें बैसलीं । रुखातळीं ९७ जो संपत्तीमाजि असतां । ऐसा गमे पांडुसुता । जैसा कां वाटे जातां । साक्षी ठेविला ९८ किंबहुना पूंसा । पांजरियामाजि जैसा । वेदाज्ञेसी तैसा । बिहूनि असे ९९ एऱ्हवीं दारागृहपुत्रीं । नाहीं जया मैत्री । तो जाण पां धात्री । ज्ञानासि गा ६०० महासिंधू जैसें । ग्रीष्म वर्षीं सरिसें । इष्टानिष्टीं तैसें । जयाच्या ठायीं १ कां तिन्ही काळ होतां । त्रिधा नव्हे सविता । तैसा सुखदुःखीं चित्ता । भेदु नाहीं २ जेथ नभाचेनि पाडें । समत्वा उणें न पडे । तेथ ज्ञान रोकडें । वोळख तूं ३

मयि चाऽनन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी । विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि ॥१०॥

आणि मीवांचूनि कांहीं । आणीक गोमटें नाहीं । ऐसा निश्चयोचि पाहीं । जयाचा केला ४ शरीर वाचा मानस । पियालीं कृतनिश्चयाचा कोश । एक मीवांचूनि वास । न पाहती आन ५ किंबहुना निकट निज । जयाचें जाहलें मज । तेणें आपणयां आम्हां सेज । एकी केली ६ रिगतां वल्लभापुढें । नाहीं आंगीं जीवीं सांकडें । तिये कांतेचेनि पाडें । एकसरला जो ७ मिळोनि मिळतचि असे । समुद्रीं गंगाजळ जैसें । मी होऊनि मज तैसें । सर्वस्वें भजती ८ सूर्याच्या होण्या होइजे । कां सूर्यासवेंचि जाइजे । हें विकलेपण साजे । प्रभेसि जेवीं ९ पैं पाणियाचिये भूमिके । पाणी तळपे कौतुकें । ते लहरी म्हणती लौकिकें । एऱ्हवीं तें पाणी ६१० जो अनन्यु यापरी । मी जाहलाही मातें वरी ।

नाकडे उपयोग करितो. ८८ ज्याप्रमाणें मापाच्या तोंडांतून पडलेली पिठाची उंडी शहाणा मनुष्य टाकून देतो, ८९ त्याप्रमाणें, ज्या मुखाच्या विषयोगापासून दुःख. विपत्ति व शोक प्राप्त होतात, त्यांच्यावरील प्रेम अगोदरच टाकून जो उदासीन वृत्तींत रहातो; ५९० आणि ज्या ज्या योगानें आपल्याला दोष लागतील, तीं कर्मे करीत नाहीं; व कर्मेंद्रियाच्या मार्गांनीं दोष आंत जाऊं नयेत म्हणून नियमरूपी धोंडे आड बसवून त्या वाटा बंद करतो. ९१ याप्रमाणें जो वागतो, तोच ज्ञानसंपन्न पुरुष असें समज. ९२ आतां अर्जुना, तुला त्या ज्ञानवंताचें आणखी एक अलौकिक लक्षण सांगतों, तें ऐक. ९३

अन्वय—असक्तिः, पुत्रदारगृहादिषु अनभिष्वंगः इष्ट निष्टोपपत्तिषु नित्यं समचित्तत्वं च, ॥ ९ ॥

अर्थ—सर्वत्र उदासीनता; पुत्र, स्त्री, गृह इत्यादिकांच्या ठिकाणीं पूर्ण अनासक्ति; आणि इष्ट अथवा अनिष्ट कांहीं प्राप्त झालें तरी आपल्या चित्ताचें समाधान नेहमीं कायम ठेवणें; ॥ ९ ॥

हें पहा—जो आपल्या शरीराविषयीं उदास असतो; जसा एक वाटसरू दुसऱ्या वाटसरानें आपले स्वाधीन कांहीं वेळ केलेलें गाठोडें अभिलाष न धरितां तो वाटसरू परत येईपर्यंत जतन करितो; ९४ किंवा वाटेनें जातांना ऊन टाळण्याकरितां ज्याप्रमाणें एकादा मनुष्य झाडाचे सावलींत बसतो, तितकीसुद्धां आस्था ज्याची घराविषयीं नसते; ९५ ज्याप्रमाणें मनुष्याची पडछाया त्याचेबरोबर असूनही ती आहे हें त्याच्या गांवींही नसतें, त्याप्रमाणें नेहमीं सन्निध असणाऱ्या स्त्रीविषयीं ज्याला प्रेम वाटत नाहीं; ९६ बरें, संततीविषयीं म्हटलें तर ती संतति म्हणजे ज्याप्रमाणें वाटसरू धर्मशाळेंत वस्तीस राहतात, किंवा गुरें दोनप्रहरीं झाडाखालीं सावलींत वसतात, त्याप्रमाणें माननो; ९७ अर्जुना, जो श्रीमंत असतांनाहीं ज्याप्रमाणें कोणीं मनुष्य वाटेनें जातांना रस्त्यांतील एकाद्या गोष्टीविषयीं केवळ साक्षिभूत असतो, त्याप्रमाणें संपत्तीविषयीं उदास असतो; ९८ किंवा पिंजऱ्यांतील राघू जसा बालगंधारांच्या आलाप बानतो, त्याप्रमाणें जो वेदाज्ञेचें उल्लंघन करीतनाहीं. ९९ बरी स्त्री, पुत्र, वर यांजविषयीं जो प्रीति बाळगीत नाहीं. तो ज्ञानाचें अधिष्ठान आहे असें जाण. ६०० समुद्र जसा ग्रीष्मकाळीं कमी होत नाहीं, व वर्षाकाळीं वाढतही नाहीं, तशी ज्याला लाभ व हानि यांपासून बाधा होत नाहीं. १ किंवा तिन्ही कालांत सूर्याचे ज्याप्रमाणें तीन प्रकार होत नाहींत, त्याप्रमाणें ज्याच्या मनाला सुखदुःखांपासून भेद होत नाहीं; २ आणि ज्याच्या ठिकाणीं आकाशाप्रमाणें समतेंत कमीपणा पडत नाहीं, त्याचे ठिकाणीं ज्ञान प्रत्यक्ष वास करीत आहे असें समज. ३

अन्वय—मयि च अनन्यवोगेन अव्यभिचारिणी भक्तिः, विविक्तदेशसेवित्वं, जनसंसदि अरतिः ॥ १० ॥

अर्थ—आणि माझ्या ठिकाणीं अनन्यभावेंकरून निर्दोष भक्ति असणें, एकांतांत राहण्याची आवड असणें, व लोकसमुदायांत राहण्याची आवड नसणें; ॥ १० ॥

ज्यानें कायावाचामनेंकरून असा निश्चय केला आहे कीं, परमात्म्यावांचून या जगतांत दुसरी चांगली वस्तु नाहींच. ४ ज्याच्या शरीरानें, वाचेनें व मनानें अशा कृतनिश्चयाची शपथ वाहिली आहे कीं, या जगतांत माझ्यावांचून दुसरें कांहीं पाहण्यासारखें नाहीं; ५ फार काय सांगावें! ज्यानें आपलें मन माझ्या स्वरूपीं लीन केलें, त्यानेंच आपलें व माझें ऐक्य करून, जणू काय माझ्या स्वरूपाचा बिछानाच केला. ६ ज्याप्रमाणें आपले पतीशीं समागम करण्यास जातेवेळीं स्त्रीचे मनांत मुळींच शंका येत नाहीं, त्याप्रमाणें माझ्यावरोवर ऐक्य करण्यास ज्याला शंका येत नाहीं; ७ ज्याप्रमाणें गंगा समुद्रास एकदा मिळाल्यावरही त्यांतच मिळून असते, त्याप्रमाणेंच माझें ऐक्य पावल्यावरही जे सर्वभावेंकरून मलाच भजतात; ८ सूर्याचे प्रभेचा सूर्यावरोवर उदय होतो, व अस्तावरोवर लय होतो, हें ऐक्य जसें प्रभेसच शोभतें; ९ तसेंच वाऱ्यानें पाण्यावर जें पाणी उसळून वर येतें, त्यास लोक लाटा असें म्हणतात; परंतु पाहूं गेलें असतां तें खरोखर पाणीच असतें; ६१० याप्रमाणें एकनिष्ठ होऊन जो माझी सेवा करतो, तोच

तोचि तो मूर्तिधारी । ज्ञान पैं गा ११ आणि तीर्थें धौतें तटें । तपोवनें चोखटें । आवडती कपाटें । वसवूं जया १२ शैलकक्षांचीं कुहरें । जळाशय परिसरें । अधिष्ठी जो आदरें । नगरा नये १३ बहु एकांतावरी प्रीति । जया जनपदाची खंती । जाण मनुष्याकारें मूर्ती । ज्ञानाची तो १४ आणिकही पुढती । चिन्हें गा सुमती । ज्ञानाचिये निरुती- । लागीं सांगों ॥१५॥

अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम् । एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा ॥११॥

तरी परमात्मा ऐसें । जें एक वस्तु असे । तें जया दिसे । ज्ञानास्तव १६ तें एकवांचूनि आनें । जियें भवस्वर्गादि ज्ञानें । तें अज्ञान ऐसा मनें । निश्चयो केला १७ स्वर्गा जाणें हें सांडी । भवविषयीं कान झाडी । दे अध्यात्मज्ञानीं बुडी । सद्भावाची १८ भंगलिये वाटे । शोधूनियां अव्हांटे । निधिजे जेविं निटें । राजपंथें १९ तैसें ज्ञानजातां करी । आघवेंचि एकीकडे सारी । मग मन बुद्धि मोहरी । अध्यात्मज्ञानीं ६२० म्हणे एक हेंचि आथी । येर जाणणें ते भ्रांती । ऐसी निकुरेंसीं मती । मेरु होय २१ एवं निश्चयो जयाचा । द्वारीं अध्यात्मज्ञानाचा । ध्रुव देवो गगनींचा । तैसा राहिला २२ तयाचिया ठायीं ज्ञान । या बोला नाहीं आन । जे ज्ञानीं बैसलें मन । तेव्हांचि ते तो मी २३ तरि बैसलेपणें जें होये । तें बैसतांचि बोलें न होये । तरि ज्ञाना तया आहे । सरिसा पाडु २४ आणि तत्त्वज्ञान निर्मळ । फळे जें एक फळ । ते ज्ञेयही वरी सरळ । दिठी जया २५ एऱ्हवीं बोधा आलेनि ज्ञानें । जरी ज्ञेय न दिसेचि मनें । तरि ज्ञानलाभुही न मने । जाहला सांता २६ आंधळेनि हातीं दिवा । घेऊनि काय करावा । तैसा ज्ञानानिश्चयो आघवा । वायांचि जाय २७ जरि ज्ञानाचेनि प्रकाशें । परतत्त्वीं दिठी न पैसे । ते स्फूर्तींचि असे । अंध होउनी २८ म्हणोनि ज्ञान जेतुलें दावी । तेतुली वस्तुचि आघवी । ते देखे ऐसी व्हावी । बुद्धि चोख २९ यालागीं ज्ञानें निर्दोखें । दाविलें ज्ञेय देखे । तैसेनि उन्मेषें । आथिला जो ६३० जेवढी ज्ञानाची वृद्धी । तेवढीच जयाची बुद्धी । तो ज्ञान हें शब्दीं । करणें न लगे ३१ पैं ज्ञानाचिये प्रभेसवें । जयाची मती ज्ञेयीं पावे । तो हातधरणिया शिवे । परतत्त्वातें ३२ तोचि ज्ञान हें बोलतां । विस्मयो कवण पांडुसुता । काय सवितयातें सविता । म्हणावें असे ३३ तंव श्रोते म्हणती असो । न संग तयाचा अतिसो । ग्रंथोक्ती तेथ आडसो । घालि-

मूर्तिमंत ज्ञान होय. ११ अशा मनुष्यास पवित्र तीर्थें, उत्तम तपोवनें व गुहा या ठिकाणीं राहण्याची आवड असते. १२ पर्वताच्या गुहा व सरोवरांचीं तीरें या ठिकाणीं रहावयाची ज्याला विशेष आवड असते, व ज्यास शहरांत राहण्याचें आवडत नाहीं; १३ ज्याला एकांतवासाची फार आवड असते, व मनुष्यवस्तींत राहण्याचा कंटाळा असतो, तो ज्ञानाची मनुष्यरूपी मूर्तिच होय. १४ हे सुबुद्धिमंता, तुला ज्ञानाच्या स्पष्टीकरणार्थ आणखी कांहीं लक्षणें पुढें सांगतों. १५

अन्वय–अध्यात्मज्ञाननित्यत्वं, तत्त्वज्ञानार्थदर्शनं, एतत् ज्ञानं इति प्रोक्तं, यत् अतः अन्यथा (तत्) अज्ञानं (प्रोक्तं).

अर्थ–अध्यात्मज्ञानांत निमग्न असणें, व पारमार्थिक ज्ञानाचा साक्षात्कार होणें, हीं लक्षणें ज्ञानप्राप्ति करून देणारीं आहेत, म्हणून यांना ज्ञान असें म्हटलें आहे; आणि यांहून जें उलट, तें अज्ञान होय. ॥ ११ ॥

हें पहा–परमात्मा म्हणून जी एक वस्तु आहे ती ज्या ज्ञानानें दिसते, १६ त्या एका ज्ञानाशिवाय, संसार व स्वर्ग ज्या ज्ञानापासून प्राप्त होतात तीं सर्व ज्ञानें अज्ञानच आहेत असें ज्याच्या मनानें पक्कें घेतलें आहे; १७ म्हणून तो स्वर्गास जाण्याची इच्छा सोडून देतो, संसाराविषयीं कंटाळा करतो, व अध्यात्मज्ञानाचे ठिकाणीं सद्भावानें बुडी मारतो; १८ ज्याप्रमाणें एकादा वाटसरू ज्या ठिकाणीं अनेक वाटा फुटतात त्या ठिकाणीं नीट शोध करून आडमार्ग सोडून सरळ राजमार्गानें जातो, १९ त्याप्रमाणें, ज्ञानमात्राविषयीं विचार करून इतर ज्ञानें टाकून देऊन आपलें मन व बुद्धि अध्यात्मज्ञानाकडेसच लावतो; ६२० त्याच प्रमाणें, इतर ज्ञान भ्रांतिमूलक आहे म्हणून जो आपली बुद्धि मेरुपर्वताप्रमाणें स्थिर करून अध्यात्मज्ञानाकडेसच लावतो; २१ ज्याप्रमाणें आकाशांतील नक्षत्राप्रमाणें ध्रुव केव्हांही हालत नाहीं, त्याप्रमाणें अध्यात्मज्ञान संपादन करण्याविषयीं ज्याचा निश्चय ढळत नाहीं; २२ त्याच्याच ठिकाणीं ज्ञान वास्त करतें यांत शंका नाहीं; आणि अशा प्रकारें त्याचे मनांत तें ज्ञान पूर्णपणें बिंबल्यावरोबर तो मद्रूप होतो. २३ ज्याप्रमाणें कोणी मनुष्य जेवणाकरितां पानावर बसला असतां, जेवण्यास सुरवात केल्याशिवाय तो जेवावयास बसला असें म्हणतां येत नाहीं, त्याप्रमाणें, ज्ञानाचे प्राप्तीची इच्छा झाल्यावर ज्ञान मिळाल्याशिवाय त्याला ज्ञानी असें नांव प्राप्त होत नाहीं; तरी त्याची त्यासारखीच योग्यता आहे. २४ आणि तत्त्वज्ञानापासून जें एक फळ प्राप्त होतें, तें ज्ञेय होय. त्याच्यावरच त्याची सरळ दृष्टि जाते. २५ एरवीं ज्ञानाचा लाभ झाल्यावर जर ज्ञेय हातीं लागलें नहीं, तर ज्ञानाचा लाभ होऊनही न झाल्याप्रमाणेंच आहे, असें आम्ही समजूं. २६ अंधळ्यानें हातीं दिवा घेतला असतां त्याचा त्याला काय उपयोग आहे ? त्याप्रमाणें, ज्ञानाचा नुसता निश्चय करून जर आत्मदर्शन झालें नाहीं, तर तें व्यर्थ होय. २७ जर ज्ञानाचे प्रकाशानें परमात्म्याची प्राप्ति होत नाहीं तर ती बुद्धि अंधळ्याप्रमाणें निरर्थक होय. २८ म्हणून, त्या ज्ञानानें जिकडे पहावें तिकडे परमात्माच दृष्टीस पडतो, अशी ज्याची बुद्धि स्वच्छ झाली आहे, २९ म्हणून त्या निर्दोष ज्ञानानें दाखविलेलें ज्ञेय जो पहातो, त्याच ज्ञानानें जो संपन्न झाला आहे; ६३० आणि ज्ञान जितकें मोठें आहे तितकीच ज्याची बुद्धीही मोठी आहे, तो ज्ञानसंपन्न आहे हें शब्दांनीं सांगावयास नको. ३१ ज्याची बुद्धि ज्ञानाचे प्रकाशावरोबर ज्ञेयास झोंबते, तो हातोहात परतत्त्वाची प्राप्ति करून घेतो. ३२ अर्जुना, तोच ज्ञानरूप आहे असें झटलें असतां त्यांत आश्चर्य तें कोणतें ? हें पहा, सूर्याला सूर्य असें म्हणावें लागतें काय ? ३३ तेव्हां श्रोते म्हणूं लागले, " आतां ज्ञान्याविषयीं अतिशयोक्ति करून चालू

तासी कां ३४ तुझा हाचि आह्मां थोरु । वक्तृत्वाचा पाहुणेरु । जे ज्ञानविषो फारु । निरोपिला ३५ रसु होआवा अतिमात्रु । हा घेतासि कविमंत्रु । तरी अवंतूनि शत्रु । करितोसि कां गा ३६ ठायीं बैसतिये वेळे । जे रससोय घेऊनि पळे । तियेचा येरु बोडव सिळे । कोणा अर्थी ३७ आघवाचि विषयीं भादी । परि सांजवर्णीं टेकों नेदी । ते खुरतोंडी नुसधी । पोषी कवण ३८ तैसी ज्ञानीं मती न फांके । येर जल्पती नेणों कौतुकें । परि तें असो निकें । केलें तुवां ३९ जया ज्ञानलेशोद्देशें । किजती योगादि सायासें । तें धणीचें आणि तुझिया ऐसें । निरूपण ६४० अमृताची सातवांकुडी । लागो कां अनुघडी । सुखाच्या दिवसकोडी । गणिजतु कां ४१ पूर्णचंद्रेसीं राती । युग एक असोनि पाहाती । तरि काय न पाहत आहाती । चकोर ते ४२ तैसें ज्ञानाचें बोलणें । आणि येणें रसाळपणें । आतां पुरे कोण म्हणे । आकर्णितां ४३ आणि सभाग्यु पाहुणा ये । सुभगाचि वाढती होये । तैं सरों नेणें रससोये । ऐसें आथी ४४ तैसा जाहला प्रसंगु । जे ज्ञानीं आह्मांसि लागु । आणि तुजही अनुरागु । आथि तेथ ४५ ह्मणोनि यया वाखाणा- । पासीं से आली चौगुणा । न ह्मणों नयेसी देखणा । होसी ज्ञानी ४६ तरी आतां ययावरी । प्रज्ञेच्या माजघरीं । पदें साच करीं । निरूपणीं ४७ या संतवाक्यासारिसें । ह्मणितलें निवृत्तिदासें । माझेंही जी ऐसें । मनोगत ४८ यावरी आतां तुम्हीं । आज्ञापिला स्वामी । तरि वायां वाग् मी । वाढों नेदी ४९ एवं इयें अवधारा । ज्ञानलक्षणें अठरा । श्रीकृष्णें धनुर्धरा । निरूपिलीं ६५० मग म्हणे या नांवें । ज्ञान एथ जाणावें । हें स्वमत आणि आघवें । ज्ञानियेही म्हणती ५१ करतळावरी वाटोळा । डोलतु देखिजे आंवळा । तैसें ज्ञान आह्मी डोळां । दाविलें तुज ५२ आतां धनंजया महामती । अज्ञान ऐसी वदंती । तेही सांगों व्यक्ती । लक्षणेंसीं ५३ एऱ्हवीं ज्ञान फुडें जालिया । अज्ञान जाणवे धनंजया । जें ज्ञान नव्हे तें अपैसया । अज्ञानचि ५४ पाहें पां दिवसु आघवा सरे । मग रात्रीची वारी उरे । वांचूनि कांहीं तिसरे । नाहीं जेवीं ५५ तैसें ज्ञान जेथ नाहीं । तें अज्ञानचि पाहीं । तरी सांगों कांहीं कांहीं । चिन्हें तियें ५६ तरि संभावने जिये । जो मानाची वाट पाहे । सत्कारें होये । तोषु जया ५७ गर्वें पर्वताचीं शिखरें । तैसा महत्त्वावस्थनि नुतरे । तयाचिया ठायीं पुरें । अज्ञान आहे ५८ आणि स्वधर्माची मां-

प्रकरणांत अडथळा कां घालितोस ? ३४ तूं अध्यात्म ज्ञानाविषयीं विस्तारें करून निरूपण केलेंस हाच तुझा आह्मांस वक्तृत्वाचा पाहुणचार आहे! ३५ इतर कवि कोणत्याही वस्तूचें वर्णन करूं लागले असतां,त्या वस्तूविषयीं वर्णन न करतां तिच्या उपांगांविषयीं मोठ्या कौतुकानें फाजील वर्णन करितात, हा कवींचा मंत्र तूं आपले वर्तनांत आणतुकाप्रमाणें कां घुसडतोस ? ३६ एकाद्या स्त्रीनें जेवावयास बोलावून व पाटरांगोळ्यांचा थाट करून, मंडळी पानावर बसल्यावर जर तयार असलेलें अन्न त्या ठिकाणावरून लांबविलें, तर तिनें बोलाविलेल्या मंडळीचें आणखी कितीही आदरातिथ्य केलें तरी त्यांना त्याचा काय उपयोग ? ३७ सर्व गुणांनीं युक्त असून जी गाय धार काढतेवेळीं कासेंत हात घालूं न देतां लाथा मारते, तिला फुकट कोण पोशिल ? ३८ त्याप्रमाणें, ज्ञानाविषयीं न बोलतां इतर कवि हवें तेवढें वर्णन करितात, तसें तूं न करतां आह्मांस खऱ्या ज्ञानाची पूर्णपणें ओळख करून दिलीस हें चांगलें केलेंस. ३९ ज्या ज्ञानाच्या थोड्या प्राप्तीकरितां लोक योगादि साधनें मोठ्या कष्टानें करतात, अशा तन्हेच्या बुद्धीला तृप्त करून टाकणारें ज्ञान तुझ्या सारख्यानें वर्णन केलें. ६४० अशा तन्हेच्या अमृताच्या वृष्टीचें जरी सारखें सातरें लागलें तरी त्याला कोणी कंटाळेल काय ? व सुखाचे कोट्यवधि जरी दिवस गेले,तरी ते मोजीत बसून त्यांचा कोणी कंटाळा करतील काय ? ४१ पौर्णिमेच्या चंद्राच्या रात्री, एक युग पर्यंत असल्या, तरी चकोर त्याच्याकडे पहात नाहींत काय ? ४२ त्याप्रमाणें तुझ्यासारख्या रसाळ वक्त्याकडून ज्ञानाचें बोलणें चाललें असतां, तें ऐकतांना,आतां पुरे, असें कोण म्हणेल ? ४३आणि भाग्यवान् पाहुण्याला, चतुर वाढण्करीण असल्यावर, त्याच्या मनांत जसे पदार्थ सरूं नयेत, अशी इच्छा असते,४४त्याप्रमाणें आजचा हा प्रसंग आहे. कारण आम्हांला ज्ञानाविषयीं श्रवण करण्याची आवड असून तुलाही तें सांगण्याविषयीं प्रेमच आहे. ४५ या कारणामुळें तुझ्या व्याख्यानास चांगलें वळण आलें आहे, तर तुला आम्ही ' ज्ञानाविषयीं तूं परिपूर्ण आहेस ' असें म्हटल्यावांचून कसें राहूं ? ४६ तर आतां, यापुढें, बुद्धीचे माजघरांत, ज्ञानाच्या अठरा लक्षणांविरुद्ध जें अज्ञान त्याचें वर्णन कर. " ४७ हें संतांचें भाषण ऐकल्यावर, निवृत्ति महाराजांचे दास ज्ञानदेव म्हणाले कीं, माझेही मनांत अज्ञानाविषयींच वर्णन करावयाचें होतें. ४८ तशांत, गुरो, तुम्ही मला आज्ञा केली; तेव्हां आतां मी व्यर्थ शब्द वाढूं देणार नाहीं. ४९ हें पहा—याप्रमाणें श्रीकृष्णांनीं अर्जुनास ज्ञानाचीं अठरा लक्षणें सांगितलीं. ६५० मग देव म्हणाले, हीं लक्षणें ज्याचे ठिकाणीं दृष्टीस पडतील, त्याचे ठिकाणीं ज्ञान वास करतें, हें माझें स्वतःचें मत असून सर्व ज्ञानीही असेंच म्हणतात. ५१ आम्हीं तुला तळहातावरील आंवळ्याप्रमाणें ज्ञान स्पष्ट दाखविलें. ५२ हे महाबुद्धिमंता अर्जुना, आतां अज्ञान ज्याला म्हणतात तेंही त्याच्या लक्षणांसह स्पष्ट करून सांगतों: ५३ धनंजया, ज्ञान समजल्यावर अज्ञान सहज ओळखतां येतें. कारण, जें ज्ञान नव्हे तेंच अज्ञान होय. ५४ हें पहा—दिवस संपल्यावर मग रात्रीचीच पाळी उरते, कारण रात्र व दिवस या दोहोंवांचून तिसरा प्रकारच नाहीं; ५५ त्याप्रमाणें, ज्या ठिकाणीं ज्ञान नाहीं, तेंच अज्ञान आहे असें समज. तथापि अज्ञानाचीं कांहीं लक्षणें तुला सांगतों. ५६ आपली प्रतिष्ठा व्हावी म्हणून लोक आपल्यास मान केव्हां देतील, याची जो वाट पहात असतो, व लोकांकडून सत्कार झाला तरच जगतो व संतोष पावतो; ५७ व तसा मान मिळाला म्हणजे गर्वानें पर्वताचे शिखराइतका चढून जाऊन कधींही खालीं उतरत नाहीं, अशा पुरुषाचे ठिकाणीं पूर्ण अज्ञान वास करतें असें समज. ५८ आणि स्वधर्माचर-

गळी। बांधे वाचेच्या पिंपळीं। उभिला जैसा देउळीं। जाणोनि कुंचा ५९ घाली विद्येचा पसारा। सुये सुकृताचा डांगोरा। करी तेतुलें मोहरा। स्फीतीचिया ६६० आंग वरिवरी चर्चीं। जनातें अभ्यर्चितां वंची। तो जाण पां अज्ञानाची। खाणी एथ ६१ आणि वन्ही वनीं विचरे। तेथ जळती जैसीं जंगमेंस्थावरें। तैसें जयाचेनि आचारें। जगा दुःख ६२ कौतुकें जें जें जल्पे। तें साबळाहूनि तीख रुपे। विषाहूनि संकल्पें। मारकु जें ६३ तयातें बहु अज्ञान। तो अज्ञानाचें निधान। हिंसेमि आयतन। जयाचें जिणें ६४ आणि फुंके भाता फुगे। रोचिलिया सवेंचि उफगे। तैसा संयोगवियोगें। चढे वोहटे ६५ पडली वारयाचिया धाळसां। धुळी चढे आकाशा। हरिखा वळघे तैसा। स्तुतीवेळे ६६ निंदा मोटकी आइके। आणि कपाळ धरूनि ठाके। थेंबें विरे वारेनि शोखे। चिखलु जैसा ६७ तैसा मानापमानीं होये। जो कोण्हीचि ऊर्मी न साहे। तयाच्या ठायीं आहे। अज्ञान पुरें ६८ आणि जयाचिया मनीं गांठी। वरिवरी मोकळी वाचा दिठी। आंगें मिळे जीवें पाठी। भलतया दे ६९ व्याधाचें चारा घालणें। तैसें प्रांजळ जोगावणें। चांगाचीं अंतःकरणें। विरु करी ६७० गार शेवाळें गुंडाळली। कां निंबोळी जैसी पिकली। तैसी जयाची भली। बाह्यक्रिया ७१ अज्ञान तयाचिया ठायीं। ठेविलें असे पाहीं। या बोला आन नाहीं। सत्य मानीं ७२ आणि गुरुकुळीं लाजे। जो गुरुभक्ती उमजे। विद्या घेऊनि माजे। गुरूसींचि जो ७३ तयाचें नाम घेणें। तें वाचे शूद्रान्न होणें। पारि घडलें लक्षणें। बोलतां इयें ७४ आतां गुरुभक्ताचें नांव घेवों। तेणें वाचेसी प्रायश्चित्त देवों। गुरुसेवका नांव पावों। सूर्य जैसा ७५ येतुलेनि पांगु पापाचा। निस्तरेल हे वाचा। जो गुरुतल्पगाचा। नामीं जाला ७६ हा ठायवरी। तया नामाचें भय हरी। मग म्हणे अवधारीं। आणिकें चिन्हें ७७ तरी आंगें कर्में ढिला। जो मनें विकल्पें भरला। अडवींचा अवगळला। कुहा जैसा ७८ तया तोंडीं कांटिवडें। आंतु नुसधीं हाडें। अशुचि तेणें पाडें। सबाह्य जो ७९ जैसें पोटालागीं सुणें। उघडें झांकलें न म्हणे। तैसें आपलें परावें नेणे। द्रव्यालागीं ६८० इया ग्रामसिंहाचिया ठायीं। जैसा मिळणी ठावो अठावो नाहीं। तैसा [illegible]विषयीं कांहीं। विचारीना ८१ कर्माचा वेळु चुके। कां नित्य नैमित्तिक

णाविषयीं पिंपळाचीं मुंज केल्यावर त्यास जो दोर बांधतात, त्याप्रमाणें, किंवा पार बांधतात, त्याप्रमाणें, अथवा देवळांतील कुंचा वाटेल त्याच्या उपयोगास येतो, त्याप्रमाणें लोकांत आपले कृतकर्माची प्रसिद्धी करतो; ५९ आपल्यास येत असलेल्या विद्येची आपल्या मुखानें प्रसिद्धी करतो; व आपले हातून घडलेल्या सत्कृत्याचा पसारा मांडून लोकांत डांगोरा पिटतो; याप्रमाणें ज्या कृत्यांपासून आपली प्रतिष्ठा वाटेल तीं कृत्यें नेहमीं करीत असतो: ६६० आणि दिवसांतून तीनदा स्नान करून अंगास अत्तर वगैरे लावून शरीर नटवितो, परंतु प्राण्यांचें पूजन करण्याविषयीं कंटाळा करतो, तो अज्ञानाची खाण आहे असें समज ६१ ज्याप्रमाणें रानांत वणवा पेटल्यावर स्थावर जंगम सर्व जळतें, त्याप्रमाणें, ज्याच्या सहज आचरणानें जगास दुःख होतें; ६२ तो सहजगत्या जें भाषण करतो तें मनुष्याचें हृदयास तीक्ष्ण पहारीचे टोंकाप्रमाणें भेदतें; व ज्याचे सर्व बेत इतर जनांस विषाहूनही घातक असतात,६३ त्याचे ठिकाणीं अज्ञान आहे. फार काय सांगावें! तो अज्ञानाचें माहेरघरच होय; आणि त्याचें जिणें म्हणजे हिंसेचें आश्रयस्थान होय. ६४ आणि भाता फुंकला म्हणजे जसा तो वाऱ्यानें फुगतो, व तोच वारा नाहींसा झाला म्हणजे लागलीच दवतो,तसा लाभ झाला असतां जो चढून जातो व हानि झाली असतां लगेच दुःखमग्न होतो; ६५ वावटळींत सांपडलेली धूळ ज्याप्रमाणें आकाशापर्यंत उंच उडते, त्याप्रमाणें लोकांनीं स्तुति केली असतां जो हर्षानें फुगतो; ६६ थेंबभर पाण्यानें ज्याप्रमाणें चिखल ओला होतो आणि वारा सुटल्यावर हडकतो, त्याप्रमाणें कोणीं थोडी निंदा केली असतांही जो वाईट वाटून कपाळ धरून बसतो; ६७ तसेंच ज्याला मान व अपमान हे दोन्ही सहन होत नाहींत,त्याचें ठिकाणीं पूर्ण अज्ञान वास करतें, असें समज.६८ जो मनांत एक असून तोंडानें दुसरेंच बोलून दाखवितो, व एकास वचन देऊन त्याचे उलट दुसऱ्यास मदत करतो; ६९ पारधी मृगादिकांना जसा दुष्ट बुद्धीनें चारा घालतो, दुसऱ्याशीं प्रांजळपणें वागण्या सारखें दाखवून उत्तम लोकांशींही अंतःकरणानें वैर करितो. ६७० शेवाळानें झांकलेली शिळा वरकांतीं हिरवीगार दिसते, किंवा निवोळ्या पिवळ्या चमक दिसतात, त्याप्रमाणें ज्याचीं कृत्यें बाह्यात्कारी मात्र उत्तम दिसतात, ७१ त्या मनुष्याचे ठिकाणीं अज्ञान निःसंशय आहे हें तूं पक्कें समजून ठेव. ७२ आणि गुरुकुलाचें नांव व्यावयास ज्याला लाज वाटते, गुरुसेवेचा जो तिरस्कार करतो, आणिज्या गुरुपासून आपल्यास विद्या प्राप्तझाली आहे त्यालाही जो मानीत नाहीं, ७३ अशा मनुष्याचें नांव घेणें म्हणजे शूद्राच्या घरीं अन्न सेवन केल्याप्रमाणें होय! पण काय करावें; अज्ञानाचीं लक्षणें सांगतांना त्याचा उच्चार करावा लागला! ७४ तेव्हां आतां ज्या गुरुभक्ताचें नांव सूर्याचे तेजाप्रमाणें सर्व अज्ञानांधकार नाहींसा करणारें आहे, त्याचें नांव घेऊन, वाचेनें घडलेले पापास प्रायश्चित्त देतो! ७५ इतक्यानेंच गुरुनिंदकाच्या नामोच्चारणानें वाचेस झालेल्या महान् दोषाचें निरसन होईल. ७६ गुरुनिंदकाच्या नामोच्चारणापासून उत्पन्न होणारीं महान् भयें हीं निवृत्त करण्याचें सामर्थ्य गुरुभक्ताच्या नामोच्चारांत आहे. असो. अज्ञानाचीं आणखीं चिन्हें ऐका:—७७ जो स्वतः कर्में करीत नाहीं, व मनांत संशय धारण करतो, तो रानांतल्या गाळानें व कांद्यानें भरलेल्या विहिरीप्रमाणें होय. ७८ ती विहीर कशी असते? तर, तिचे तोंडावर काटेरी झाडें उगवलेलीं असतात, व आंत पुष्कळ प्राणी पडून मेल्यामुळें हाडें सांचलेलीं असतात; त्याप्रमाणें जो मनुष्य अंतर्बाह्य अशुद्ध असतो; ७९ ज्याप्रमाणें अन्न उघडें आहे किंवा झांकलेलें आहे हें न पाहतां कुत्रें तें खातें, त्याप्रमाणें आपलें किंवा दुसऱ्याचें याचा विचार न करितां जो द्रव्याचा अभिलाष करतो ६८० कुत्र्याच्या ठिकाणीं जसा स्त्रीसंग करण्याविषयीं एकांत किंवा चव्हाट्याची जागा यांचा विधिनिषेध नाहीं, तसा जो स्त्रीसंगाविषयीं निर्लज्ज असतो; ८१ स्व-

ठाके । तें जया न दुखे । जीवामाजीं ८२ पापीं जो निसुगु । पुण्याविषयीं अति निलागु । जयाचिया मनीं वेगु । विकल्पाचा ८३ तो जाण निखिळा । अज्ञानाचा पुतळा । जो बांधोनि असे डोळा । वित्ताशेतें ८४ आणि स्वार्थें अळुमाळें । जो धैर्यापासोनि चळे । जैसें तृणबीज ढळे । मुंगियेचेनि ८५ पावो सूदलिया सवें । जैसें थिल्लर कालवे । तैसा भयाचेनि नांवें । गजबजे जो ८६ मनोरथांचिया धारसा । वाहणें जयाचिया मानसा । पूरीं पडिला जैसा । दुधिया पाहीं ८७ वायूचेनि सावायें । धू दिगंतरा जाये । दुःखवार्ता होये । तैसें जया ८८ वाउधणाचिया परी । जो आश्रो केहींचि न धरी । क्षेत्रीं तीर्थीं पुरीं । थारों नेणें ८९ का मानलिया सरडा । पुढती बुडुख पुढती शेंडा । हिंडण वारा कोरडा । तैसा जया ६९० जैसा रोंविल्याविणें । रांजणु थारों नेणे । तैसा पडे तैं राहणें । एऱ्हवीं हिंडे ९१ तयाच्या ठायीं उदंड । अज्ञान असे वितंड । जो चांचल्यें भावंड । मर्कटाचें ९२ आणि पैं गा धनुर्धरा । जयाचिया अंतरा । नाहीं वोढावारा । संयमाचा ९३ लेंडिये आला लोंढा । न मनीं वाळुवेचा वरवंडा । तैसा निषेधाचिया तोंडा । बिहेना जो ९४ व्रतातें आड मोडी । स्वधर्मु पायें वोलांडी । नियमाची आश तोडी । जयाची क्रिया ९५ नाहीं पापाचा कंटाळा । नेणे पुण्याचा जिव्हाळा । लाजेचा पेंडवळा । खाणोनि घाली ९६ कुळेंसीं जो पाठमोरा । वेदाज्ञेसीं दुऱ्हा । कृत्याकृत्यव्यापारा । निवाडु नेणे ९७ वसू जैसा मोकाटु । वारा जैसा अफाटु । फुटला जैसा पाटु । निरंजनीं ९८ आंधळें हातिरूं मातलें । कां डोंगरीं जैसें पेटलें । तैसें विषयीं सुटलें । चित्त जयाचें९९ पैं उबधडां काय न पडे । मोकाटु कोणां नातुडे । ग्रामद्वारींचें आडें । नोलांडी कोण ७०० जैसें सत्रीं अन्न जालें । कां सामान्या बीक आलें । वाणसियेचें उभविलें । कोण न रिगे १ तैसें जयाचें अंतःकरण । तयाच्या ठायीं संपूर्ण । अज्ञानाची जाण । ऋद्धि आहे २ आणि विषयांची गोडी । जो जीतु मेला न संडी । स्वर्गीहीं खावया जोडी । एथूनीचि ३ जो अखंड भोगा जचे । जया व्यसन काम्यक्रियेचें । मुख देखोनि विरक्ताचें । सचैल करी ४ विषो शिणोनि जाये । परि न शिणे सावधु नोहे । कुहिला हातीं खाये । कोढी जैसा ५ खरी टेंको नेदी उडे । लातौनि फोडी नाकाडें । तऱ्ही जेविं न काढे । माघौता खरु ६ तैसा जो विषयांलागीं । उडी घाली जळतिये आगीं । व्यसनाचीं आंगीं ।

धर्माप्रमाणें कर्म करण्याची वेळ चुकत आहे किंवा नित्यनैमित्तिक कर्में करावयाचीं तीं रहात आहेत, त्याच्याबद्दल ज्याचे मनांत खेद वाटत नाहीं; ८२ पापाचरणाबद्दल जो निःसंग व पुण्यकर्माचें आचरण करावें अशी ज्याच्या मनांत कल्पनाही येत नसून, ज्याच्या मनांत अतिशय विकल्प येतात, ८३ आणि जो द्रव्यप्राप्तीविषयीं पापपुण्याची चाड बाळगीत नाहीं, तो केवळ अज्ञानाचा पुतळाच आहे असें समज. ८४ ज्याप्रमाणें गवताच्या काडीवर मुंगी चढली तरी तो गवताची काडी लवते, त्याप्रमाणें जो अल्प लाभाकरितांही बुद्धीच्या स्थिरपणापासून ढळतो; ८५ डबक्यांत पाय पडल्यावरोबर जसें त्यांतील पाणी गढूळ होतें, तसा जो भयाचें नांव ऐकल्याबरोबर घाबरा होतो; ८६ पुरांत पडलेला भोंपळा जसा हवा तिकडे वहात जातो, तसा तो मनोरथाच्या पुरांत वहात जातो; ८७ वाऱ्याचे साह्यानें धूर जसा गगनापर्यंत उंच जातो, तसा जो दुःखाची गोष्ट ऐकल्याबरोबर गडबडतो; ८८ वावटळ ज्याप्रमाणें कोठेंही स्थिर होत नाहीं, त्याप्रमाणें जो क्षेत्राचे, तीर्थाचे किंवा शहराचे ठिकाणीं कोठेंही कायम रहात नाहीं, ८९ किंवा माजलेल्या सरडास ज्याप्रमाणें वरून खालीं व खालून वर जाण्याचा व्यर्थ नाद लागतो; ६९० ज्याप्रमाणें पाण्याचा रांजण पुरल्याशिवाय जाग्यावर ठरत नाहीं, त्याप्रमाणें जो निद्रेशिवाय एके ठिकाणीं न रहातां चोहोंकडे हिंडतो; ९१ व ज्याची माकडाप्रमाणें नेहमीं चळवळ असते, त्याचे ठिकाणीं अज्ञान पूर्णपणें वास करतें. ९२ आणि अर्जुना, ज्याचे अंतर्यामीं आत्मसंयमनाचा वाराही नसतो; ९३ ज्याप्रमाणें एकादे ओहोळास लोंढा आला म्हणजे तो वाळूच्या बांधास जुमानीत नाहीं, त्याप्रमाणें जो शास्त्रनिषिद्ध गोष्टींस भीत नाहीं; ९४ जो व्रतें पाळीत नाहीं, स्वधर्मास लाथेनें झुगारतो, व शास्त्रानें घालून दिलेल्या नियमांविरुद्ध ज्याची क्रिया असते; ९५ ज्याला पापाचरणाचा कंटाळा नसतो, पुण्याचरणाचा लेशही नाहींत नसतो, आणि जो लज्जेची मर्यादा खणून टाकतो; ९६ जो कुलधर्म ओळखीत नाहीं, वेदांतील आज्ञा मानीत नाहीं, व ज्याला वन्या वाईट गोष्टींची चाड नसते; ९७ ज्याप्रमाणें पोळ मोकळा सुटलेला असतो, किंवा ारा अफाट वाहतो, अथवा रानांतील फुटलेल्या पाटाचें पाणी वाटेल तिकडे जातें; ९८ आंबळा हत्ती माजावा, किंवा डोंगरास वणवा लागावा, याप्रमाणें ज्याचें मन विषयांविषयीं बहकलेलें असतें. ९९ हें पहा, उकिरड्यावर काय टाकीत नाहींत? पोळाला कोण आंवरतो? आणि वेशीच्या उंबऱ्यावरून कोण जात नाहीं? ७०० ज्याप्रमाणें अन्नसत्रांत वाटेल त्यानें जेवावें, किंवा साधारण मनुष्यास अधिकार प्राप्त झाल्यावर त्यानें तो वाटेल तसा गाजवावा, अथवा वाण्याचे दुकानांत कोणीही जावें, १ त्याप्रमाणें, ज्यांचें अंतःकरण चंचल आहे, त्याचे ठिकाणीं संपूर्ण अज्ञानाची वृद्धि होते असें समज. २ आणि जो जिवंत असतांना व मेल्यावरही विषयांची इच्छा सोडीत नाहीं; व ज्या योगानें स्वर्गांतही विषयोपभोग प्राप्त होतील त्या मार्गांचें आचरण ह्या लोकीं करतो; ३ ज्याचे सर्व श्रम विषयोपभोगांचे प्राप्तीकरतां असतात, व ज्याला सकाम कर्मांशिवाय इतर कर्में आवडत नाहींत; आणि विरक्तांचें दर्शन झालें असतां जो सचैल स्नान करतो; ४ ज्याप्रमाणें कोड असलेल्या मनुष्यास आपल्या कुचक्या हातानें अन्न खाण्यास खंती वाटत नाहीं, त्याप्रमाणें ज्याचा विषयांस जरी कंटाळा आला तरी तो त्यांस कंटाळत नाहीं, व कर्मफलांविषयीं निरिच्छ होत नाहीं; ५ गाढवीच्या पाठीस गाढव लागल्यावर तिनें लाथा झाडून त्याचें नाक फोडलें तरी तो मागें न वळतां तिच्याच पाठीस लागतो, ६ त्याप्रमाणें, जो विषयांकरतां जळत्या आगींतही उडी घालण्यास मागेंपुढें पहात नाहीं, आणि आपलें व्यसन हें

लेणीं मिरवी ७ फुटोनि पडे तंव । मृग वाढवी हांव । परि न म्हणे ते माव । रोहिणीची ८ तैसा जन्मोनि मृत्यूवरी । विषयीं त्रासितां बहुतीं परी । तन्ही त्राम नेघे धरी । आधिकें प्रेम ९ पहिलिये वाळदशे । आई वा हेंचि पिसें । तें सरे मग स्त्रीमांसें । भुलोनि ठाके ७१० मग स्त्री भोगितां थावो । वृद्धाप्य लागे येयों । तेव्हां तोचि प्रेमभावो । बाळकासि आणी ११ आंधळें व्यालें जैसें । तैसा वाळें परिवसे । परी जीवें मरे तों न त्रासे । विषयांसि जो १२ जाण तयाच्या ठायीं ! अज्ञानासि पारु नाहीं । आतां आणीक कांहीं चिन्हें । सांगों १३ तरि देह हाचि आत्मा । ऐसेया जो मनोधर्मा । वळघोनियां कर्मा । आरंभु करी १४ आणि उर्णें कां पुरे । जें जें कांहीं आचरे । तयाचेनि आविष्करें । कुंथों लागे १५ डोइये ठेविलेनि भोजें । देवलविसें जेवीं फुंजे । तैसा विद्यावयसा माजे । उताणा चाले १६ म्हणे मीचि एकु आथीं । माझ्याचि घरीं संपत्ती । माझी आचरती रिती । कोणा आहे १७ नाहीं माझेनि पाडें वाडु । मी सर्वज्ञु एकुचि रूढु । ऐसा गर्वतुष्टीगंडु । घेऊनि ठाके १८ व्याधि लागलिया माणुसा । नयेचि भोग दाऊं जैसा । निकें न साहे जो तैसा । पुढिलांचें १९ पैं गुणु तेतुला खाय । स्नेह कीं जाळितु जाय । जेथ ठेविजे तेथ होय । मसीऐसें ७२० जीवनें शिंपिला तिडपिडी । वीजिला प्राण सांडी । लागला तरी काडी । उरों नेदी २१ आळुमाळ प्रकाशु करी । तेतुलेनीच उबारा धरी । तैसिया दीपाचिया परी । सुविद्यु जो २२ औषधाचेनि नांवें अमृतें । जैसा नवज्वरु आंबुथे । कां विषाचि होऊनि परते । सर्पा दूध २३ तैसा सद्गुणी मत्सरु । व्युत्पत्ती अहंकारु । तपोज्ञानें अपारु । ताठा चढे २४ अंत्यु राणिवे बैसविला । आरें धारणु गिळिला । तैसा गर्वें फुगला । देखसी जो २५ जो लाटणें ऐसा न लवे । पाथरु तेविं न द्रवे । गुणियासि नागवे । फोडसें तैसें २६ किंबहुना तयापासी । अज्ञान आहे वाढिसी । हें निकरें गा तुजसीं । बोलत असों २७ आणीपाही धनंजया । जो गृहदेह सामग्रिया । न देखे कालचेया । जन्मातें गा २८ कृतघ्ना उपकारु केला । कां चोरा व्यवहारु दिधला । निसुगु स्तविला । विसरे जैसा २९ वोढाळितां लाविलें । तें तैसेंचि कान पूंस वोलें । कीं बुढती वोढाळूं आलें । सुणें जैसें ७३० बेडूक सापाचिया तोंडीं । जातसे सबुडबुडीं । तो माक्षिकांचिया कोडी । स्मरेना कांहीं ३१ तैसीं नवही द्वारें स्रवती ।

दूषण नसून भूषणच आहे असें मानतो; ७ मृग-जलाच्या लालसेनें धांवतां धांवतां जरी मृगाचा ऊर फुटला, तरी त्याची हांव कमी न होतां अधिकच वाढते, पण हें मिथ्या आहे असें तो मानीत नाहीं. ८ त्याप्रमाणें, जन्मापासून मरेपर्यंत विषयप्राप्ति करतां सारखे श्रम करतो, तथापि त्याबद्दल त्यास तिटकारा न येतां उलटें अधिकच प्रेम सुटतें; ९ बालपणीं मातापितरांचें वेड असतें; व तें संपल्यावर तारुण्यदशेत स्त्रीचें वेड लागतें;७१० नंतर स्त्रीचा उपभोग पूर्ण झाल्यावर म्हातारपण येतें, तेव्हां तेंच प्रेम तो मुलांबाळांवर करूं लागतो ११ जन्मांध जसा घर सोडून जात नाहीं, तसा जो मुलांबाळांतच कालक्रमण करतो, परंतु ज्यास मरेपर्यंत विषयाचा तिटकारा येत नाहीं, १२ त्यांचे ठिकाणीं अज्ञानास पार नाहीं असें समज. आतां आज्ञानाचीं आणखी कांहीं लक्षणें सांगतों. १३ हें पहा– जो आपले देहालाच आत्मा असें समजून कर्में करूं लागतो; १४ आणि जर एकादे कर्माचें आचरण कमी किंवा जास्त झालें तर अभिमानानें फुगून जाऊन कुंथूंही लागतो. १५ देवाचा प्रसाद डोक्यावर ठेवतांच जसा देवाचा भगत घुमूं लागतो, तसा जो विद्येच्या जोरावर व वयाचे मानावर अभिमानाचा ताठा धरून उताणा चालतो;१६आणि सर्व जगांत काय तो मीच शहाणा, मीच श्रीमंत, माझेप्रमाणें चालरीत कोणाची आहे? १७ माझे बरोबरीचा दुसरा कोणी नाहीं, मी सर्वज्ञ असून मी एकटाच या जगांत ज्ञाता आहे, याप्रमाणें सर्व गोष्टींबद्दल गर्व बाळगतो; १८ व्याधिग्रस्त माणसाला ज्याप्रमाणें कोणताही भोग सहन होत नाहीं. त्याप्रमाणें दुसऱ्याचें चांगलें झालेलें ज्याला सहन होत नाहीं; १९ हें पहा–दिवा हा गुण (वात) तेवढाच खाऊन टाकून स्नेह (तेल) जाळून टाकतो; आणि ज्या जागीं ठेवावा ती जागा काळीकुट्ट करून टाकतो; ७२० पाण्याचा थेंब पडला तर तडतडतो; बाऱ्यानें विझतो. वरास लागला तर काडी देखील उरूं देत नाहीं. २१ आणि कोठें उगीच थोडासा प्रकाश करतो तर तेवढ्यानेंही उष्मा करावयास लागतो,हा त्याच्या अल्प गुणांप्रमाणें ज्याच्याजवळ विद्या अल्प व दोष बहुत आहेत! २२ नवज्वर झालेल्या रोग्यास दूध हें औषध म्हणून जरी दिलें, तरी तें त्याचा ताप विकोपास नेतें; किंवा सापास दूध पाजलें असतां तें विष होऊन तो ओकतो, २३ त्याप्रमाणें, गुणवान मनुष्याचा जो मत्सर करतो, व्युत्पत्तीबद्दल अहंपणा बाळगतो, व तपाचरणानें ज्याचे अंगीं ताठा भरतो; २४ अंत्यजाला गाऱ्यावर बसविलें असतां तो जसा अभिमानानें फुगतो, अथवा अजगरानें खांब गिळल्यावर तो जसा ताठतो, तसा ज्याच्या अंगीं गर्वाचा ताठा भरलेला पहाशील; २५ आणि जो लाटण्याप्रमाणें केव्हांही लवत नाहीं व दगडाप्रमाणें ज्याला घाम येत नाहीं आणि फुरसें जसें गारोड्याचे मंत्रानेंही उतरत नाहीं, २६ फार काय सांगावें,अशी ज्याची स्थिति असते, त्याचे जवळ अज्ञान वाढीस लागलें आहे, हें तुला निश्चयानें सांगतों. २७हे पहा धनंजया, जो आपलें वरदार, संपत्ति देह व आपला विद्यमान जन्म यांजविषयीं कांहीं सुद्धां विचार करीत नाहीं; २८ कृतघ्नावर उपकार केला असतां, अथवा चोरास व्यापाराकरितां भांडवल दिलें असतां, किंवा निर्लज्ज मनुष्याची स्तुति केली असतां, ते ज्याप्रमाणें केलेले उपकार विसरतात; २९ द्राड कुत्र्याचे कान आणि शेपूट कापून त्यास घरांतून हांकून लाविलें, तरी तें रक्त गळत असतांच जसें पुनः त्याच घरांत शिरतें;७३० सापाचे तोंडांत सांपडून गिळला जात असतांही बेडूक कौतुकानें देखील माशा गिळण्याची इच्छा धरीत नाहीं काय? ३१ त्याप्रमाणें अंगांत लूत भरून नवद्वारें वहात असतांही ज्याचे मनांत आ-

आंगीं देहाची जुती जिती। जेणें जाली तें चित्तीं। सलेना जया ३२ मातेव्या उदरकुहरीं। पचूनि विष्टेच्या दाथरीं। जठरीं नवमासवरी। उकडला जो ३३ ते गर्भींची जे व्यथा। कां जें जालें उपजतां। तें कांहींचि सर्वथा। नाठवी जो ३४ मलमूत्रपंकीं। जें लोळतें बाळ अंकीं। तें देखोनि जो न थुंकी। त्रासु नेघे ३५ कालचि ना जन्म गेलें। पाहेच पुढती आलें। ऐसें हें कांहीं वाटलें। नाहीं जया ३६ आणि पैं तयाचि परी। जीविताची फरारी। देखोनि जो न करी। मृत्युचिंता ३७ जिणेयाचेनि विश्वासें। मृत्यु एक एथ असे। हें जयाचेनि मानसें। मानिजेना ३८ अल्पोदकींचा मासा। हें नाटे ऐसिया आशा। न वचेचि कां जैसा। अगाध डोहां ३९ कां गोरीचिया भुली। मृग व्याधादृष्टि न घाली। गळु न पाहतां गिळिली। उंडी मीनें ७४० दीपाचिया झगमगा। जाळील हें पतंगा। नेणवेचि पैं गा। जयापरी ४१ गव्हारु निद्रासुखें। घर जळत असे तें न देखे। नेणतां जेवी विखें। रांधिलें अन्न ४२ तैसा जीविताचेनि मिषें। हा मृत्युचि आला असे। हें नेणेचि राजसें। सुखें जो गा ४३ शरीरींचि वाढी। अहोरात्रांची जोडी। विषयसुखप्रौढी। साचचि मानी ४४ परि बापुडा ऐसें नेणे। जें वेश्येचें सर्वस्व देणें। तेंचि तें नागवणें। रूप एथ ४५ संवचोराचें साजणें। तेंचि तें प्राण घेणें। लेपा स्नपन करणें। तोचि नाशु ४६ पांडुरोगें आंग सुटलें। तें तयाचि नांवें खुंटलें। तैसें नेणें भुलले। आहारनिद्रा ४७ सन्मुख शूला। धांवतया पायें चपळा। प्रतिपदींये जवळा। मृत्यु जेवीं ४८ तेविं देहा जंव जंव वाढु। जंव जंव दिवसांचा पवाडु। जंव जंव सुरवाडु। भोगाचा या ४९ तंव तंव अधिकाधिकें। मरण आयुष्यातें जिंके। मीठ जेविं उदकें। घांसिजत असे ७५० तैसें जीवित्व जाये। तयास्तव काळु पाहे। हें हातोहातींचें न होये। ठाउकें जया ५१ किंबहुना पांडवा। हा आंगींचा मृत्यु नित्य नवा। न देखे जो मावा। विषयांचिया ५२ तो अज्ञानदेशींचा रावो। या बोला महाबाहो। न पडे गा ठावो। आणिकांचा ५३ पैं जीविताचेनि तोषें। जैसा कां मृत्यु न देखे। तैसाचि तारुण्यें पोखे। जरा न गणी ५४ कडाडीं लोटला गाडा। कां शिखरौनि सुटला धोंडा। तैसा न देखे जो पुढां। वार्धक्य आहे ५५ कां आडवोहळा पाणी आलें। कां जैसें म्हैसयाचें जुंझ मातलें। तैसें तारुण्याचें चढलें। भुरें जया ५६ पुष्टि लागे विघरीं।

पली अशी स्थिति होण्याचें कारण काय याचा खेद सुद्धां वाटत नाहीं; ३२ आईच्या गर्भाशयामध्यें विष्टेच्या थरांत नऊ महिनेपर्यंत जो उकडला जातो, ३३ तो त्या गर्भांतील दुःख किंवा उदरांतून बाहेर निघते समयीं ते दुःख यांविषयीं कांहींच स्मरण बाळगीत नाहीं; ३४ मांडीवर घेतलेले मूल मलमूत्रांच्या चिखलांत लोळत असतांना पाहूनही ज्याला चिडस न येऊन त्रासही उत्पन्न होत नाहीं; ३५ हल्लीं ज्या जन्मांत आपण आहों तो, व पुढें येणारा जन्म, यांविषयीं ज्याचे मनांत कांहींही विचार उत्पन्न होत नाहीं; ३६ आणि त्याचप्रमाणें आपले तारुण्याचे भरांत पुढें येणारे मृत्यूबद्दल जो कांहींही काळजी गाळगीत नाहीं; ७ आपल्या जीवितावर पूर्ण विश्वास ठेवून आपल्यास पुढें मृत्यू येणार आहे, याजबद्दल ज्याचे मनांत बिलकूल विचार नसतो; ३८डवकें आटगार नाहीं अशा समजुतीनें जसा त्यांतील मासा मोठ्या डोहांत जात नाहीं; ३९ किंवा पारध्याच्या गाण्यास भुलून मृग जसा पारध्याकडे पहात नाहीं; अथवा मासा हा गळास लावलेल्या आमिषाचें आंत गळ आहे असे न समजतां तें खाऊन मरतो; ७४० किंवा दिव्याच्या ज्योतीनें आपण जळून जाऊं असें न समजतां पतंग त्यावर झडप घालतो; ४१ घर जळत असतांही एकादा मूर्ख निद्रेच्या भरांत तिकडे लक्ष देत नाहीं; किंवा ज्या अन्नांत विष घातलें आहे तें अन्न न समजतां एकादा निर्धास्तपणानें खातो, ४२ त्याप्रमाणें, जीविताचे रूपानें हा मृत्यूच आला असें जो विषयसुखाचे भरांत जाणत नाहीं; ४३ आपल्या शरीराचा पुष्टपणा, रात्र व दिवस यांचा उपयोग, आणि विषयसुख हीं मोठ्या प्रौढीनें सत्य मानतो; ४४ परंतु बिचारा असें समजत नाहीं कीं, वेश्या आपल्यास तनमन अर्पण करिते,त तिचें करणें वरकांतीं असून,उलट आपणास बुचाडण्याचाच तो मार्ग आहे!४५वाटेनें जातांना संचोरांची गांठ पडल्यावर त्यानें आपल्यास वरकांतीं मैत्री दाखविणें म्हणजे ती खरोखर मैत्री नसून रानांत नेल्यावर आपला प्राण घेणेंच होय; व मातीचे चित्र स्नान वगैरे वाहून पूजन करणें म्हणजे त्याचा नाश करणेंच होय; ४६ पंडरोगानें मनुष्य लठ्ठ झाला म्हणजे तो सशक्त नसून त्याचें आयुष्य संपलें असें समजावें; त्याप्रमाणें, जो आहार व निद्रा यांत गर्क होऊन, त्यांपासून आपला नाश आहे असें समजत नाहीं; ४७ मुक्ती देण्याकरितां नेत असलेला मनुष्य सनोर सूळ पाहिल्यावर त्याकडे धांवत जाऊं लागला म्हणजे तो आपल्या प्रत्येक पावलास मृत्यु जवळ करतो; ४८ त्याप्रमाणें, देह जों जों वाढेल, आयुष्य जों जों वृद्धिगत होईल, व जों जों या विषयसुखांत निमग्न होईल, ४९ तों तों मरण आयुष्यास जिंकील; आणि मीठ ज्याप्रमाणें पाण्यांत टाकल्यावर विरघळतें,७५० त्याप्रमाणें जों जों आयुष्य वाढेल तों तों तें काळ जवळ आणील,व तो आपल्यास हातोहात घेऊन जाईल,हें ज्याला समजत नाहीं.५१ अर्जुना,आयुष्याच्या वृद्धीपासून आपला मृत्यु रोज जवळ जवळ येत आहे हें ज्याला विषयांच्या भुलीनें समजत नाहीं, ५२ तो, हे महाबाहो अर्जुना, अज्ञानरूप देशचा राजा या म्हणण्यांत कांहीं शंका नाहीं. ५३ ज्याप्रमाणें तो आयुष्याच्या भरांत पुढें येणाऱ्या मृत्यूबद्दल विचार करीत नाहीं त्याचप्रमाणें तारुण्याच्या भरांत पुढें येणाऱ्या म्हातारपणाबद्दलही काळजी करीत नाहीं. ५४ डोंगराच्या कड्यावरून गाडी लोटल्यावर किंवा पर्वताच्या शिखरावरून घोंडा सुटल्यावर त्याला ज्याप्रमाणें आपलें पुढें काय होईल हें माहीत नसतें, त्याप्रमाणें जो आपल्यास वार्धक्य येऊन आपली काय स्थिति होईल याकडे लक्ष देत नाहा, ५५ किंवा आडरानांतील ओढ्यास लोंढा आल्यावर त्यांतून पलीकडे जातां येत नाहीं; इतक्या जोरानें तो वाहतो अथवा रेड्यांची टक्कर लागल्यावर ते उन्मत्त होऊन दुसऱ्यास जवळ येऊं देत नाहींत, त्याप्रमाणें ज्याच्या अंगावर तारुण्याची धुंदी चढलेली असते; ५६ शरीरसंपत्ति कमी होते, अंगावरील तेज

कांति पाहे निसरों। मस्तक आदरीं शिरो। भागीं कंप ५७ दाढी साऊळ धरी। मान हालौनि वारी। तरी जो करी। प्रायेचा पैसु ५८ पुढील उरीं आदळे। तंव न देखे जेविं आंधळें। कां डोळ्यावरलेनि गळें। आळशी तोषे ५९ तैसें तारुण्य आजिचें। भोगितां वृद्धाप्य पाहेचें। न देखे तेचि साचें। अज्ञानु गा ७६० देखे अक्षमें कुब्जें। कीं विटावूं लागे फुंजें। परि न म्हणे पाहें माझें। ऐसेंचि भवे ६१ आणि आंगीं वृद्धाप्यनेची। संज्ञा ये मरणाची। परि जया तारुण्याची। भुली न फिटे ६२ तो अज्ञानाचें घर। हें साचचि घे उअरे। तेवींचि परियेसीं थोर। चिन्हें आणिक ६३ तरि बाघाचिये अडवे टे ऐ[illegible]ळ आला चरोनि दैवें। तेणें विश्वासें पुढती धांवे। वसू जैसा ६४ भुली। [illegible]- आंतु। अवचटें ठेवा आणिला स्वस्थु। येतुलियासाठीं निश्चितु, दीपा[illegible]तवु होय ६५ तैसेंचि अवचटें हें। एकदोनीवेळां लाहे। एथ रोग एवहारु [illegible]। हें मानीना जो ६६ वैरिया नीद आली। आतां द्वंद्वें माझीं सरलीं। हेन ४२[illegible] तो सपिलीं। मुकला जेवीं ६७ पैसी आहारनिद्रेची उजरी। रोग निवांतु सुखेरी। तंव जो न करी। व्याधीं चिंता ६८ आणि स्त्रीपुत्रादिमेळें। संपत्ति [illegible]चा जंव फळे। तेणें रजें डोळे। जाती जयाचे ६९ सवेंचि वियोगु पडेल। [illegible]ळौनि विपत्ति येईल। हें दुःख पुढील। देखेना जो ७७० तो अज्ञान गा पांडवा। आणि तोही तोचि जाणावा। जो इंद्रियें अव्हासवा। चारी एथ ७१ वयसेचेनि उवायें। संपत्तीचेनि सावायें। सेव्यासेव्य जाये। सरकटितु ७२ न करावें तें करी। असंभाव्य मनीं धरी। चिंतूं नये तें विचारी। जयाची मती ७३ रिघे जेथ न रिघावें। मागें जें न घ्यावें। स्पर्शें जेथ न लागावें। आंग मन७४ न जावें तेथ जाये। न पाहावें तें जो पाहे। न खावें तें खाये। तेवींचि तोषे ७५ न धरावा तो संगु। न लगावें तेथ लागु। नाचरावा तो मार्गु। आचरे जो ७६ नायकावें तें आइके। न बोलावें तें बके। परि दोष होतील हे न देखे। प्रवर्तता ७७ अगा मनासि रुचावें। येतुलेनि कृत्याकृत्य नाठवे। जो करणेयाचेनि नांवें। भलतेंचि करी ७८ परि पाप मज होईल। कां नरकयातना येईल। हें कांहींचि पुढील। देखेना जो ७९ तयाचेनि आंगलगें। अज्ञान जगीं [illegible]। जें सज्ञानाहीसंगें। झोंबों सके ७८० परी असो हें आइक। अज्ञान

लोपतें, व डोकें मानेवरोवर हालूं लागतें; ५७ दाढी पांढरी होऊन मान नाहीं नाहीं म्हणण्याप्रमाण ती गीच हालते, अशी स्थिति झाली असतांही जो आशा वाढवितो. ५८ अंधळ्याला ज्याप्रमाणें पुढें असलेला खांब उरावर आदळेपर्यंत समजत नाहीं, किंवा डोळ्याजवळ झाडावरून पडलेले जांभुळ दुसऱ्यानें तोंडांत घातलें असतां संतोष पावतो, परंतु आपण खटपट करीत नाहीं, ५९ त्याप्रमाणें तारुण्याचा उपभोग घेत असतां पुढें येणाऱ्या हातारपणाबद्दल जो विचार करीत नाहीं, तो केवळ अज्ञानरूपच होय. ७६० तारुण्याचें भरांत. कोणीं अंधळा अगर कुबड वांकलेला मनुष्य दिसला, तर तो त्यास वेडावून दाखवितो; परंतु पुढें आपलीही अशीच स्थिति होईल असें मनांत आणीत नाहीं; ६१ आणि मरणाची खूण जें म्हातारपण, तें जरी प्राप्त झालें, तरी जो तरुण्याची घमेंडी सोडीत नाहीं, ६२ तो पुरुष अज्ञानाचें घर आहे असें पक्कें समज. त्याचप्रमाणें, अज्ञानाचीं आणखी कांहीं ठोकळ लक्षणें सांगतों, तीं ऐक. ६३ वाघाचे रानांतून एक वेळ बैल चरून निशिबाने सुखरूप घरीं परत आला असतां विश्वासानें तो ज्याप्रमाणें त्या रानांत फिरून चरावयास जातो; ६४ अथवा ज्या घरांतील संपत्तीवर सर्प बसला आहे. त्यांतील ठेवा सर्पदंश न होतां एकाद्यानें आणिला ह्मणजे तो 'संपत्तीवर सर्प वसतो' या गोष्टीवर विश्वास ठेवीत नाहीं; ६५ त्याप्रमाणें, कांहीं कालपर्यंत आपलें शरीर निरोगी आहे एवढ्या घमेंडीवर पुढे रोग येतील हे सत्य मानीत नाहीं, ६६ आपला वैरी निजला आहे, तेव्हां आतां त्याचें व आपलें वैर संपलें असें जर कोणीं मानील. आणि त्या भरंवशावर स्वस्थ बसेल तर तो वैरी जागृत झाल्यावर, तो ज्याप्रमाणें आपल्या मुलांबाळांसह जीवास मुकेल, ६७ त्याप्रमाणें, जोंपर्यंत भूक व झोंप चांगली लागत आहे, व जोंपर्यंत रोगराई वगैरे कांहीं झालें नाहीं, तोंपर्यंत, आपल्यास वृद्धापकाळीं रोग वगैरे जडतील याची जो काळजी बाळगीत नाहीं; ६८ आणि स्त्रीपुत्रादि व संपत्ति हीं जों जों जास्त मिळूं लागतात, तों तों ज्याच्या डोळ्यांवर अधिकाधिक धूर चढून डोळे धुंद होतात, ६९ आणि स्त्रीपुत्रादिकांचा वियोग एका क्षणांत होईल व एका क्षणांत संपत्ति जाऊन विपत्ति येईल. हें पुढील दुःख जो पहात नाहीं. ७७० तो अज्ञानी होय. आणि अर्जुना, जो या मृत्युलोकीं इंद्रियांना स्वस्थ चरूं देतो, [स्वैर वर्तन करूं देतो] तोही केवळ अज्ञानरूपच समजावा. ७१ जो तारुण्याचे भरांत संपत्तीच्या मदानें भव्याभव्य वस्तूंचा विचार न करितां सरसकट त्यांचा उपभोग घेतो; ७२ जी गोष्ट करूं नये ती करतो, असंभाव्य गोष्टींची हांव धरितो, आणि ज्या गोष्टींबद्दल विचार करूं नये अशा गोष्टी नेहमीं मनांत आणितो; ७३ जेथें प्रवेश करूं नये तेथें शिरकाव करतो, जी वस्तु घेऊं नये ती मागतो, आणि ज्या गोष्टी मनांत सुद्धां आणू नयेत किंवा ज्यांस स्पर्शही करूं नये, त्या करतें; ७४ जेथें जाऊं नये तेथें जातो, पहूं नये तें पहातो, खाऊं नये तें खातो, आणि याप्रमाणें वर्ज केलेल्या गोष्टी केल्यानेंच ज्याचा संतोष होतो; ७५ ज्याचीं संगत धरूं नये त्याची संगत धरतो, ज्या ठिकाणीं संबंध असूं नये त्या ठिकाणीं संबंध ठेवतो, आणि ज्या मार्गाचें आचरण करूं नये तो मार्ग आचरतो; ७६ जें ऐकूं नये तें ऐकतो, बोलूं नये तें बडबडतो, परंतु या गोष्टी केल्यानें आपल्या हातून दोष घडतील असें मनांतहीं आणीत नाहीं; ७७ आपल्या मनांत येईल व आपल्यास सुखावह होईल, तीच गोष्ट करण्याकडे लक्ष असल्यामुळें, जो बरी वाईट गोष्ट करण्याबद्दल मुळींच विचार करीत नाहीं; आणि यामुळें भलत्याच गोष्टींचें आचरण करितो; ७८ परंतु आपले हातून पाप घडेल, किंवा आपल्याला नरकयातना सोसाव्या लागतील, या पुढील गोष्टींबद्दल जो विचार करीत नाहीं, ७९ त्या धर्मभ्रष्टाच्या संगतीनें सर्व जगांत अतिशय अज्ञान पसरतें; आणि तें इतकें वाढतें कीं, ज्ञानासही तें आपल्या बळानें मागें हटवूं शकतें. ७८० पण

चिन्हें आणिक । जेणें तुज सम्यक । जाणवे तें ८१ तरी जयाची प्रीति पुरी । गुंतली देखसी घरीं । नवगंधकेसरीं । भ्रमरी जैसी ८२ साकरेचिया राशीं । बैसली नुठे माशी । तैसेनि स्त्रीचित्त आवेशी । जयाचें मन ८३ ठेला बेडूक कुंडीं । मशक गुंतला शेंबुडीं । जैसा ढोरु सवुडबुडीं । रुतला पंकीं ८४ तैसें घरींहूनि निघणें । नाहीं जीवें मनें प्राणें । जया साप होऊनि असणें । भाटीं तिये ८५ प्रियोत्तमाचिया कंठीं । प्रमदा घे आटी । तैशी जीवेंसी कोंपटी । धरूनि ठाके ८६ मधुरमादोशें । मधुकर जचे जैसें । गृहसंगोपन तैसें । करी जो गा८७ म्हातापणीं जालें । मा आणिक एक उपाइलें । तयाचें कां जेतुलें । मातापितरां८८ तेतुलेनि पाडें पार्था । घरीं जया प्रेमआस्था । आणि स्त्रीवांचूनि सर्वथा । जाणेना जो ८९ तैसा स्त्रीदेहीं जो जीवें । पडोनियां सर्वभावें । कोण मी काय करावें । कांहीं नेणें ७९० महापुरुषाचें चित्त । जालिया वस्तुगत । ठाके व्यवहारजात । जयापरी ९१ हानि लाज न देखे । परापवादु नाइके । जयाचीं इंद्रियें एकमुखें । स्त्रिया केलीं ९२ चित्त आराधी स्त्रियेचें । आणि तियेचेनि छंदें नाचे । माकड गारुडियाचें । जैसें होय ९३ आपणपेंही शिणवी । इष्टमित्र दुखवी । मग कवडाचि वाटवी । लोभी जैसा ९४ तैसा दानपुण्यें खांची । गोत्रकुटुंबा वंची । परी गारी भरी स्त्रियेची । उणी हों नेदी ९५ पूजितीं दैवतें जोगावी । गुरूतें बोलें झकवी । मायबापां दावी । निदारपण ९६ स्त्रियेच्या तरी विखीं । भोगुमंपत्ति अनेकीं । आणि वस्तु निकी । जे जे देखे ९७ प्रेमाथिलेनि भक्तें । जैसेनि भजिजे कुळदैवतें । तैसा एकाग्रचित्तें । स्त्री जो उपासी९८ साच आणि चोख । तें स्त्रियेसीचि अशेख । येरांविषयीं जोगावणूक । तेही नाहीं ९९ इयेतें हन कोणी देखैल । इयेसी वेखासें जाईल । तरि युगचि बुडैल ऐसें जया ८०० नायट्यांभेण । न मोडिजे नागांची आण । तैसी पाळी उणखुण । स्त्रियेची जो १ किंबहुना धनंजया । स्त्रीचि सर्वस्व जया । आणि तियेचिया जालियां- । लागीं प्रेम २ आणिकही जें समस्त । तियेचें संपत्तिजात । तें जीवाहूनि आप्त । मानी जो कां ३ तो अज्ञानासी मूळ । अज्ञाना त्याचेनि बळ । हें असो केवळ । तो तेंचि रूप ४ आणि मातलिया सागरीं । मोकलिलिया तरी । लाटांच्या येरझारीं । आंदोळे जेवीं ५ तेविं प्रिय वस्तु पावे । आणि [illegible] जो उंचावे । तैसाचि अप्रियासवें । तळवटु घे ६ ऐसेनि जयाचे चित्तीं ।

हें असो. ज्या योगानें तुला अज्ञानाचें स्वरूप स्पष्ट समजेल अशीं त्याचीं आणखी कांहीं लक्षणें सांगतों, तीं ऐक. ८१ ज्याप्रमाणें भ्रमराचें चित्त नवीन उमललेल्या कमळाच्या केसरावर आसक्त असतें, त्याप्रमाणें ज्याची प्रीति घरावर जडलेली असते, ८२ ज्याप्रमाणें साखरेच्या राशीवरून माशी उठत नाहीं, त्याप्रमाणें ज्याचें मन स्त्रीवर आसक्त झालेलें असतें; ८३ ज्याप्रमाणें बेडूक पाण्याच्या कुंडांतून बाहेर पडत नाहीं, माशी शेवडांत गुंतल्यावर बाहेर पडूं शकत नाहीं किंवा जनावर चिखलांत रुतल्यावर बाहेर निघूं शकत नाहीं, ८४ त्याप्रमाणें ज्याचें मन घरावरून दूर होत नाहीं. व जो मरणानंतर आपल्या वखळींत साप होऊन बसतो; ८५ एकादी स्त्री आपल्या जिवलगाच्या गळ्यांत मिठी मारून बसते, . त्याप्रमाणें जो आपलें खोंपट जिवाशी धरून बसतो; ८६ मधाचे संरक्षणार्थ मधमाशा जाच सोसतात, त्याप्रमाणें जो हवीं तीं संकटें सोसून आपल्या घराचें संरक्षण करतो; ८७ म्हातारपणीं झालेलें, आणि त्यांतही एकुलतें एक असें मूल असलें म्हणजे त्याच्या आईबापांचें जितकें त्याच्यावर प्रेम असतें, ८८ तितकें ज्याचें प्रेम घरावर असतें; आणि अर्जुना, ज्याला स्त्रीवांचून जगतांत दुसरी प्रिय वस्तु नाहीं; ८९ त्याचप्रमाणें, जो जिवाभावानें स्त्रीवर प्रेम करितो, आणि आपण कोण आहों, व आपलें सार्थक कशानें होईल हें कांहीं जाणत नाहीं; ७९० ज्याप्रमाणें सिद्ध पुरुषाचें चित्त ब्रह्मस्वरूपीं लीन झाल्यावर त्याचे सर्व व्यवहार थांबतात, ९१ त्याप्रमाणें ज्यानें आपलें सर्वस्व स्त्रीला विकलें आहे, तो आपली हानि, लोकलज्जा किंवा लोकांनीं केलेली निंदा इकडे लक्ष देत नाहीं. ९२ ज्याप्रमाणें माकड गारोड्याचे ताब्यांत रहातें, त्याप्रमाणें जो मनांत स्त्रीचा ध्यास धरून तिचेच छंदानें वागतो; ९३ आणि ज्याप्रमाणें आपण अतिशय कष्ट सोसून आम्ह मंडळींना सुखवून कृपण मनुष्य द्रव्यच वाढवितो, ९४ त्याप्रमाणें दानशूरपणा न करितां आपल्या कुटुंबांतील इतर मंडळींनाही फसवतो, परंतु आपल्या कुटुंबाची विषयेच्छा तृप्त करण्यांत उणेपणा होऊं देत नाहीं. ९५–तेवढ्याकरितां कोणाला कसें फसवितो तें पहा–आपल्या आराध्यदेवतेची साधारण सेवा करतो, गुरूला भाषा देतो, व आईबापांनीं दैवें सांगितले तर त्यांस ' शिलक नाहींत ' म्हणून सांगतो: ९६ पण स्त्रीविषयीं झटलें तर जी जी उत्तम वस्तु पाहील, ती ती तिच्या उपभोगाकरितां वेऊन येतो: ९७ ज्याप्रमाणें प्रेमळ भक्त आपल्या इष्ट देवतेस भजतो, त्याप्रमाणें जो स्त्रीची एकाग्र चित्तानें सेवा करतो; ९८ जेवढ्या उत्तम व मूल्यवान् वस्तु, तेवढ्या सर्व स्त्रीलाच देतो, आणि कुटुंबांतील बाकीच्या माणसांना निर्वाहापुरत्या सुद्धां जिनसा देत नाहीं; ९९ स्त्रीकडे जर कोणी वांकड्या नजरेनें पहिलें किंवा तिच्या विरुद्ध जाईल, तर ज्याला युगाचा अंत झाल्याप्रमाणें वाईट वाटतें; ८०० नायटे होतील या भीतीनें ज्याप्रमाणें नागांचे नवस फेडितात, त्याप्रमाणें जो स्त्रीची थुंकी झेलतो; १ अर्जुना, फार काय सांगावें ! ज्याला स्त्री हेंच दैवत वाटतें, व जो निजपासून झालेल्या पुत्रादिकांवर विशेष प्रेम करितो; २ आणखी तिचे जेवढे आप्तसंबंधी असतील त्यांना आपल्या जिवापलीकडील समजतो, ३ तो अज्ञानाचें मूळ आहे, व त्याच्याचमुळें अज्ञानाची वृद्धि होते. फार काय सांगावें ! तो केवळ अज्ञानरूपच होय. ४ ज्याप्रमाणें खवळलेल्या समुद्रांत घातलेली नौका लाटांमुळें हेलकावे खाते, ५ त्याप्रमाणें जो आवडती वस्तु प्राप्त झाली असतां सुखाच्या शिखरावर चढतो, व नावडती वस्तु मिळाली असतां खालीं आपटतो; ६ याप्रमाणें, हे महाबुद्धिमंता अर्जुना, ज्याचे चित्तांत वस्तुच्या

वैषम्यसाम्याची वाखती । वाहे तो महामती । अज्ञान गा ७ आणि माझ्या ठायीं भक्ती । फळालागीं जया आर्ती । धनोद्देशें विरक्ती । नटणें जेवीं ८ नातरी कांताच्या मानसीं । रिगोणि स्वैरिणी जैसी । राहाटे जारेंसीं । जावयालागीं ९ तैसी मातें किरीटी । भजती गा पाउटी । करूनि जो दिठी । विषो सूये ८१० आणि भजिन्नलियासवें । तो विषो जरी न पावे । तरी सांडी म्हणे आघवें । टवाळ हें ११ कुणबट कुळवाडी । तैसा आन आन देव मांडी । आदिलाची परवडी । करी तया १२ तया गुरुमार्गा टेंके । जयाचा सुगरवा देखे । तरी तयाचा मंत्रु शिके । येरु नेघे १३ प्राणिजातेंसी निष्ठुरु । स्थावरीं बहु भरु । तेवींची नाहीं एकसरु । निर्वाहो जया १४ माझी मूर्ति निफजवी । ते घराचे कोनीं बैसवी । आपण देवो देवी । यात्रे जाय १५ नित्य आराधन माझें । काजीं कुळदेवता भजे । पर्वविशेषें कीजे । पूजा आना १६ माझें अधिष्ठान घरीं । आणि वोवसे आनाचे करी । पितृकार्यावसरीं । पितरांचा होय १७ एकादशीच्या दिवसीं । चेतुला पाडु आह्मांसी । तेतुलाचि नाग़ांसी । पंचमीच्या दिवशीं १८ चौथ मोटकी पाहे । आणि गणेशाचाचि होये । चावदसी म्हणे माये । तुझाचि वो दुर्गे १९ नित्य नैमित्तिकें कर्में सांडी । मग बैसे नवचंडी । आदित्यवारीं वाढी । बहिरवां पात्रीं ८२० पाठी सोमवार पावे । आणि बेलेंसीं लिंगा धांवे । ऐसा एकलाचि आघवे । जोगावी जो २१ ऐसा अखंड़ भजन करी । उगा नोहे क्षणभरी । अवघेन गांवद्वारीं । अहेव जैसी २२ ऐसेनि जो भक्तु । देखसी सैरा धांवतु । जाण अज्ञानाचा मूर्तु । अवतार तो २३ आणि एकांतें चोखटें । तपोवनें तीर्थें तटें । देखोनि जो गा विटे । तोहि तोचि २४ जया जनपदीं सुख । गजबजेचें कवतिक । वानूं आवडे लौकिक । तोहि तोचि २५ आणि आत्मा गोचरु होये । ऐसी जे विद्या आहे । ते आइकोनि डौर वाहे । विद्वांसु जो २६ उपनिषदांकडे न वचे । योगशास्त्र न रुचे । अध्यात्मज्ञानीं जयाचें । मनचि नाहीं २७ आत्मचर्चा एकी आथी । ऐसिये बुद्धीची भिंती । पाडूनि जयाची मती । वोढाळ जाहली २८ कर्मकांड तरी जाणे । मुखोद्गत पुराणें । ज्योतिषीं तो म्हणे । तैसेंचि होय २९ शिल्पीं अति निपुण । सूपकर्मीही प्रवीण । विधि आथर्वण । हातीं आथी ८३० कोकीं नाहीं ठेलें । भारत करी म्हणितलें । आगम आफाविले । मूर्त होती ३१ नीतिजात सुझे । वैद्यकही बुझे

लाभालाभांपासून चिंता उत्पन्न होते, तो अज्ञानी होय. ७ आणि जो माझी भक्ति करतो, परंतु मनांत फलाची इच्छा धरतो; आणि बाहेरून विरक्तपणा दाखविणारा मनुष्य ज्याप्रमाणें अंतर्यामीं धनाची इच्छा करतो, ८ किंवा व्यभिचारिणी स्त्री आपलें जारकर्म चालविण्याकरितां पतीच्या पुढें पुढें करून त्याची मर्जी संपादिते, ९ त्याप्रमाणें, हे किरीटी, मजवर भक्ति आहे असें दाखवून जो विषयांकडे दृष्टि ठेवितो, ८१० आणि विषयप्राप्तीकरितां माझी भक्ति करून विषयप्राप्ति झाली नाहीं तर माझी भक्ति सोडून देऊन 'ईश्वर खोटा आहे' अशी माझी टवाळी करितो, ११ कुणबी जशी आपली शेतकी वाढवितो, तसा हा पुष्कळ देवांची सेवा करितो; व पहिल्या देवाप्रमाणेंच दुसऱ्या देवांचीही परवड करितो, १२ ज्याचे ठिकाणीं विशेष थाटमाट आहे अशा गुरूवर भक्ति ठेवून त्याजपासून गुरुमंत्र घेतो, व इतरांला विचारीत नाहीं; १३ प्राणिमात्रावरोबर कठीण शब्द बोलून त्यांचा तिरस्कार करतो, व पाषाणाच्या मूर्तीवर विशेष प्रेम करितो; तसेच ज्याला एकनिष्ठपणानें भक्ति करून रहावत नाहीं; १४ माझी मूर्ति तयार करून तिची घराच्या एका कोंपऱ्यांत स्थापना करतो, आणि आपण इतर देवांच्या यात्रा करीत हिंडतो; १५ रोज माझी पूजा करितो; कार्यप्राप्तीकरितां कुलदेवतेची पूजा करितो; आणि एकादी पर्वणी आली असतां तिसऱ्याच देवाची पूजा करितो; १६ मी घरांत असतांना दुसऱ्या देवाला नवस करितो, खेट्या घालतो, व श्राद्धकाळीं पितरांची पूजा करितो, १७ एकादशीच्या दिवशीं जशी माझी भक्ति करितो, तसाच नागपंचमीच्या दिवशीं नागास भजतो; १८ चतुर्थीचे दिवशीं गणपतीची पूर्ण भक्ति करितो व चतुर्दशीचे दिवशीं देवीचें पूजन करून, 'हे अंबे, मी तुझा आहे,' अशी तिची प्रार्थना करितो, १९ नित्यनैमित्तिक कर्में अवश्य केलीं पाहिजेत तीं टाकून देऊन नवरात्रांत नवचंडीचा पाठ एके जागीं बसून करितो; आदित्यवार आला ह्मणजे बहिरे वाऱ्या नांवानें खिचडा वाटतो; ८२० पुढें सोमवार आला ह्मणजे बेल वेऊन शंकरास वाहण्याकरितां जातो; व याप्रमाणें जो एकटाच सर्व देवांची सेवा करितो; २१ ज्याप्रमाणें गांवांतील वेश्या आपली प्रीति दाखवून सर्वांचें मन आकर्षण करून घेते, त्याप्रमाणें जो क्षणभरही स्वस्थ न बसतां विषयप्राप्तीकरितां सर्व देवांचें पूजन करितो; २२ याप्रमाणें जो देवांची भक्ति करीत चोहोंकडे धांवत असतो, तो अज्ञानाचा अवतारच होय; २३ आणि उत्तम एकांतस्थानें, तपोवनें, तीर्थें व तटें हीं पाहून ज्यांचें मन विटतें, तोही केवळ अज्ञानरूपच होय. २४ ज्याला शहरांत रहाण्यानें सुख होतें, पुष्कळ मंडळींत बसणें आवडतें, व लौकिकांतील गोष्टी सांगण्याची हौस वाटते; तोही केवळ अज्ञानरूपीच होय. २५ आणि जो अशा प्रकारचा विद्वान् असतो कीं, ज्या विद्येपासून आत्म्याची प्राप्ति होते ती ऐकूं आली असतां उपहास करून ती कानीं पडूं देत नाहीं. २६ उपनिषदांकडे जो पहात नाहीं, योगशास्त्र ज्याला आवडत नाहीं, व अध्यात्मज्ञानाकडे ज्याचें लक्ष जात नाहीं; २७ ज्या बुद्धीपासून आत्मानात्म निरूपण होतें, ती बुद्धि टाकून ज्याचें मन इतर सर्व शास्त्रांकडे ओढ घेतें; २८ जो कर्मकांड पूर्णपणें जाणतो, ज्याला पुराणें मुखोद्गत आहेत, आणि ज्योतिषांत तर इतका निपुण आहे कीं, तो म्हणेल तसेंच व्हावयाचें! २९ जो कलाकौशल्यशास्त्रांत अति निष्णात आहे, पाकशास्त्रांत प्रवीण आहे, आणि जारण, मारण, उच्चाटन व वशीकरण हीं ह्मणजे केवळ ज्याचा हातचा मळ आहेत; ८३० कामशास्त्रांत जो पक्का दर्दी आहे, एकादी गोष्ट ऐकली असतां तिजविषयीं भरताप्रमाणें व्याख्यान करतो; व शास्त्रें ज्याचेपुढें मूर्तिमंत उभीं रहातात; ३१ जो नीतिजात उत्तम जाणतो, वैद्यशास्त्रांत जो निपुण आहे,

काव्यनाटकीं दुजें । चतुर नाहीं ३२ स्मृतींची चर्चा । दंशु जाणे गारुडियाचा । निघंटु प्रज्ञेचा । पाइकी करी ३३ पैं व्याकरणीं चोखडा । तर्कीं अतिगाढा । परि एक आत्मज्ञानीं फुडा । जात्यंधु जो ३४ तें एकवांचूनि आघवां शास्त्रीं । सिद्धांत निर्माणधात्री । परि जळो तें मूळनक्षत्रीं । न पाहें गा ३५ मोराआंगीं अशेषें । पिसें असती डोळसें । परि एकली दृष्टि नसे । तैसें तें गा ३६ जरी परमाणूएवढें । संजीवनीमूळ जोडे । तरी बहु काय गाडे । भरणें येरें ३७ आयुष्यावीण लक्षणें । सिसेंवीण अळंकरणें । बोहरेवीण वाधावणें । तो विटंबु गा ३८ तैसें शास्त्रजात जाण । आघवेंचि अप्रमाण । पार्था आध्यात्मज्ञानेंविण । एकलेनी ३९ यालागीं अर्जुना पाहीं । अध्यात्मज्ञानाच्या ठायीं । जया नित्यबोधु नाहीं । शास्त्रमूढा ८४० तया शरीर जें जालें । तें अज्ञानाचें बीं विरूढलें । तयाचें व्युत्पन्नत्व गेलें । अज्ञानवेलीं ४१ तो जें जें बोले । तें अज्ञानाचि फुललें । तयाचें पुण्य जें फळलें । तें अज्ञान गा ४२ आणि अध्यात्मज्ञान कांहीं । जेणें मानिलेंचि नाहीं । तो ज्ञानार्थु न देखे काई । हें बोलावें असे ४३ ऐलीचि थडी न पवतां । पळे जो माघौता । तया पैलद्वीपीची वार्ता । काय होय ४४ कां दारवंठाचि जयाचें । शीर रोंविलें खांचे । तो केविं परिवरींचें । ठेविलें देख ४५ तेविं अध्यात्मज्ञानीं जया । अनोळख धनंजया । तया ज्ञानार्थु देखावया । विषो काई ४६ ह्मणोनि आतां विशेषें । तो ज्ञानाचें तत्त्व न देखे । हें सांगावें आंखेंलेखें । न लगे तुज ४७ जेव्हां सगभें वाढिलें । तेव्हांचि पोटींचें धालें । तैसें मागिले पदें बोलिलें । तेंचि होय ४८ वांचूनियां वेगळें । रूप करणें हें न मिळे । जेविं अवांतिलें आंधळें । तें दुजेनसीं ये ४९ एवं इये उपरतीं । अज्ञानचिन्हें मागुती । अमानित्वादि प्रभृति । वाखाणिलीं ८५० जे ज्ञानपदें अठरा । केलियां येरी मोहरां । अज्ञान या आकारा । सहजें येती ५१ मागां श्लोकाचेनि अर्धार्धें । ऐसें सांगितलें श्रीमुकुंदें । ना उफराटीं इयें ज्ञानपदें । तेंचि अज्ञान ५२ ह्मणोनि इया वाहणी । केली म्यां उपलवणी । वांचूनि दुधा मेळऊनि पाणी । फार कीजे ५३ तैसें जी न बडबडी । पदाची कोर न सांडीं । मूळध्वनींचिये वाढी । निमित्त जाहलों ५४ तंव श्रोते म्हणती राहें । कें परिहारा ठावो आहे । बिहिसी कां वायें । कविपोषका ५५ तूतें श्रीमुरारी । ह्मणितलें प्रगट करीं । जे अभिप्राय गव्हरीं । झांकिले आह्मीं ५६ तें देवाचें मनोगत ।

आणि काव्यनाटकांत ज्याचा हात कोणी धरूं शकत नाहीं; ३२ स्मृतींची जो चर्चा करितो, गारोड्यांची मंत्रविद्या जाणतो, वेदांतील शब्दांचा कोश तर जणूं काय याचा सेवकच! ३३ आणखी जो व्याकरणांत निपुण आहे, व न्यायशास्त्रांत ज्याची मति गहन आहे, परंतु एक आत्मज्ञानाविषयीं जो जन्मांध आहे; ३४ तो त्या एका आत्मज्ञानाशिवाय इतर सर्व शास्त्रांतील सिद्धांतांना आधारभूत असेल. पण जळो तें त्याचें ज्ञान! तें म्हणजे सर्व लक्षणांनीं संपन्न असलेल्या पण मूळ नक्षत्रावर जन्मलेल्या मुलांप्रमाणें होय. तूं तिकडे मुळींच लक्ष देऊं नको. ३५ ज्याप्रमाणें मोराच्या सर्वांगावरील पिसाऱ्यावर डोळे असतात, परंतु त्यांस एक दृष्टि नाहीं, त्याप्रमाणें त्याची ती सर्वविद्यासंपन्नता होय. ३६ मेलेल्या मनुष्यास जिवंत करणारी मुळी जर परमाणू एवढीही सांपडली, तर मग इतर गाडाभर मुळ्या करावयाच्या आहेत काय? ३७ उत्तम लक्षणें असून अल्पायुष्य असणें, किंवा मस्तकाशिवाय अलंकार घालणें, अथवा वर वर असल्या वांचून वरवावा काढणें ही विटंबना होय; ३८ त्याप्रमाणें, पार्था, एक अध्यात्मज्ञानावांचून इतर सर्व शास्त्रें अप्रमाण होत. ३९ यास्तव, अर्जुना, तूं हें ध्यानांत धर कीं, ज्या पढतमूर्खाला आत्मज्ञानाचा नित्यावबोध नाहीं, ८४० त्या मनुष्याचें शरीर म्हणजे अज्ञानाचें वाढलेलें बीजच होय; आणि त्याची व्युत्पन्नता म्हणजे अज्ञानाच्या वेली होत. ४१ तो जें बोलतो, तें अज्ञानाचें फूलच होय; व तो जें पुण्यमार्गाचें आचरण करितो, तें अज्ञानाचें फल होय; ४२ आणि ज्याची अध्यात्मज्ञानावर श्रद्धा नाहीं, त्याला ज्ञानार्थ (तत्त्वार्थ) प्राप्त होत नाहीं हें बोलूनच का दाखविलें पाहिजे? ४३ नदीच्या अलीकडील कांठापर्यंतही न येतां जो माघारी जातो, त्याला पलीकडच्या कांठची बातमी कशी बरें कळेल? ४४ किंवा घरांत शिरतांना उंबऱ्यांतच ज्याचें मस्तक कापून खांचेंत पडलें, तो घरांत काय ठेवलें आहे हें कसें पाहील? ४५ त्याप्रमाणें, अर्जुना, अध्यात्मज्ञानाची व ज्याची ओळखही नाहीं, त्याला ज्ञानार्थ (तत्त्वार्थ) पहावयास कसा विषय होईल? ४६ म्हणून, अशा मनुष्यास ज्ञानाचें तत्त्व कळत नाहीं, हें तुला विशेषेंकरून खडे मांडून सांगण्याचें कारण नाहीं. ४७ सवतीवर स्त्रीला वाढलें तेव्हांच तिच्या उदरांतील गर्भाची तृप्ति झाली; त्याप्रमाणें, पूर्वी जीं ज्ञानाचीं लक्षणें सांगितलीं, तद्विरुद्ध ज्या गोष्टी तेंच अज्ञान होय. ४८ अंधळ्यास जेवणाचें आमंत्रण दिल्यावर ज्याप्रमाणें त्यावरोवर दुसरा मनुष्य येतोच, त्याप्रमाणें, ज्ञानाचीं लक्षणें सांगितल्यावर अज्ञानाचेंही लक्षण आपोआप होतेंच ४९ याप्रमाणें अमानित्वादिकांच्या उलट अज्ञानाचीं लक्षणें सांगितलीं, ८५० तीं ज्ञानाचीं अठरा लक्षणें उलटपक्षीं लाविलीं असतां सहज अज्ञानाचीं लक्षणें सिद्ध होतात. ५१ मागें अकराव्या श्लोकाच्या उत्तरार्धाच्या दुसऱ्या अर्धामध्यें श्रीमुकुंदांनीं सांगितलें कीं "हीं ज्ञानाचीं लक्षणें; आणि यांचे उलट जीं लक्षणें, तें अज्ञान होय" ५२ म्हणूनच या प्रकारानें मीं अज्ञान लक्षणांचा विस्तार केला. एव्हवीं दुधांत पाणी मिळवून दूध वाढवून काय करावयाचें? ५३ त्याचप्रमाणें, एक अक्षरही न सोडतां आणि व्यर्थ बडबड न करितां, मुळांत जो अर्थ होता, तोच मीं विस्तारानें सांगितला. ५४ तेव्हां श्रोते म्हणतात, "हे कविपोपका, तुला परिहार देण्यास तुझ्याकडून असा काय अन्याय झाला आहे! ५५ तुला श्रीमुरारीनींच सांगितलें आहे कीं, 'आम्हीं जे अभिप्राय गुप्तस्थळीं झांकून ठेविले आहेत, ते तूं प्रकट कर.' ५६ तें देवांचें मनोगत आम्हांला तूं स्पष्ट करून सांगितलेंस असें जरी

दावित आहासी तूं मूर्त । हेंही म्हणतां चित्त । दाटेल तुझें ५७ म्हणोनि असो हें न बोलों । परि साबिया गा तोषलों । जे ज्ञानतरिये मेळविलों । श्रवणसुखाचिये ५८ आतां इयावरी । जे तो श्रीहरी । बोलिला तें करीं । कथन वेगां ५९ इया संतवाक्यासरिसें । म्हणितलें निवृत्तिदासें । जी अवधारा तरी ऐसें । बोलिलें देवें ८६० म्हणती तुवां पांडवा । हा चिन्हसमुच्चयो आघवा । आयकिला तो जाणावा । अज्ञानभागु ६१ इया अज्ञानविभागा । पाठी देऊनि पैं गा । ज्ञानविखीं चांगा । दृढा होइजे ६२ मग निर्वाळिलेनि ज्ञानें । ज्ञेय भेटेल मनें । तें जाणावया अर्जुनें आस केली ६३ तंव सर्वज्ञांचा रावो । म्हणे जाणोनि तयाचा भावो । परिमें ज्ञेयाचा अभिप्रावो । सांगों आतां ६४

ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वाऽमृतमश्नुते । अनादिमत्परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्यते ॥ १२ ॥

तरि ज्ञेय ऐसें म्हणणें । वस्तु तें येणेंचि कारणें । जें ज्ञानेंवांचूनि कवणें । उपायें नये ६५ आणि जाणितलेयावरौतें । कांहींच करणें नाहीं जेथें । जाणणेंचि तन्मयातें । आणी जयाचें ६६ जें जाणितलेयासाठीं । संसार काढूनियां कांठीं । जिरोनि जाइजे पोटीं । नित्यानंदाच्या ६७ तें ज्ञेय गा ऐसें । आदि जया नसे । परब्रह्म आपैसें । नाम जया ६८ जें नाहीं म्हणों जाइजे । तंव विश्वाकारें देखिजे । आणि विश्वचि ऐसें म्हणिजे । तरि हे माया ६९ रूप वर्ण व्यक्ती । नाहीं दृश्य द्रष्टा स्थिती । तरि कोणें कैसें आथी । म्हणावें पां ८७० आणि साचचि जरी नाहीं । तरि महदादि कोणें ठाईं । स्फुरत कैचें काई । तेणेंवीण असे ७१ म्हणोनि आथी नाथी हे बोली । जें देखोनि मुकी जाहली । विचारेंसीं मोडली । वाट जेथें ७२ जैसी भांडघटशरावीं । तदाकारें असें पृथ्वी । तैसें सर्व होऊनियां सवीं । अजे जे वस्तु ७३

सर्वतःपाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम् । सर्वतःश्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ॥ १३ ॥

आघवांचि देशीं काळीं । नव्हतां देशकाळांवेगळी । जे क्रिया स्थूळास्थूळीं । तेचि हात जयाचे ७४ तयातें याकारणें । विश्वबाहु ऐसें म्हणणें । जें सर्वाचि सर्वपणें । सर्वदा करी ७५ आणि समस्तांही ठायां । एके काळीं धनंजया । आलें असे म्हणोनि जया । विश्वांघ्रि नाम ७६ पैं सवितया आंग डोळे । नाहींत वेगळे वेगळे । तैसें सर्वद्रष्टें सकळें । स्वरूपें जें ७७ म्हणोनि विश्वतश्चक्षु । हा अचक्षूच्या ठायीं पक्षु । बोलावया दक्षु । जाहला वेदु ७८ जें सर्वांचे शि-

आम्हीं म्हटलें, तरी तुला त्यापासून माहिवर येईल! ५७ म्हणून आम्ही आतां या सर्व गोष्टी सोडून देतों; पण सध्यां तूं श्रवणसुखाची ज्ञाननौका आम्हांस प्राप्त करून दिलीस, त्यायोगानें आम्हांस फार संतोष झाला आहे. ५८ आतां यापुढें "श्रीहरि काय बोलले तें आम्हांस लवकर कथन कर." ५९ हें संतांचें वाक्य ऐकल्यावरोबर निवृत्तिदास ज्ञानदेव म्हणाले, तर ऐका. देव असें बोलले. ८६० काय बोलले? तर ते म्हणाले, "अर्जुना, हीं जीं तूं सर्व लक्षणें ऐकलींस, तीं अज्ञानाचीं होत. ६१ ह्या अज्ञानभागाकडे दुर्लक्ष करून तूं ज्ञानप्राप्तीविषयीं आपला निश्चय दृढ कर. ६२ मग त्या शुद्ध ज्ञानाच्या योगें तुला ज्ञेयाची प्राप्ति होईल." हें ऐकतांच अर्जुनानें तें जाणण्याविषयीं मनःपूर्वक इच्छा केली. ६३ तेव्हां सर्वज्ञांचा राजा श्रीकृष्ण यानें अर्जुनाच्या मनांतील भाव जाणून त्यास म्हटलें कीं, आतां तुला ज्ञेय म्हणजे काय तें सांगतों, ऐक.६४

अन्वय--यत् ज्ञेयं यत् ज्ञात्वा (जीवः) अमृतं अश्नुते तत् प्रवक्ष्यामि. तद् अनादिमत् परं ब्रह्म सद् न असद् च न इति उच्यते. ॥ १२ ॥

अर्थ--जें ज्ञेय म्हणजे जाणण्यास योग्य, जें जाणल्यानें जीवाला मोक्ष मिळतो, तें तुला मी आतां सांगतों. ज्याला आदि नाहीं, तें सर्वोत्कृष्ट ब्रह्म, सत् म्हणतां येत नाहीं व असत्ही म्हणतां येत नाहीं. ॥ १२ ॥

हें पहा, ज्ञेय म्हणजे परमात्मवस्तु-त्याला ज्ञेय म्हणण्याचें कारण इतकेंच कीं, तें ज्ञानाशिवाय इतर कोणत्याही उपायानें प्राप्त होत नाहीं; ६५ आणि तें समजल्यावर मुमुक्षूस कांहीं कर्तव्य उरत नाहीं. कारण, ज्याचें ज्ञानच मुमुक्षूला तद्रूपतेला आणतें (तें जाणल्याबरोबर तो तद्रूप होतो.)६६ जें जाणलें असतां मुमुक्षूंनीं संसाराचा त्याग करून नित्यानंदांत निमग्न व्हावें, ६७ तें ज्ञेय असें आहे कीं, त्याला आदि नाहीं आणि त्याला साहजिकतःच परब्रह्म हें नांव आहे. ६८ तें नाहीं म्हणावयास जावें तर विश्वरूपेंकरून दृष्टीस पडतें; आणि विश्वच परब्रह्म असें म्हणावें, तर ही आहे माया! ६९ त्याला रूप, वर्ण, आकार हीं नाहींत; तसेंच तें दृष्टीस पडणारें नाहीं, व तें कशास पहातही नाहीं; तेव्हां 'तें आहे' असें कोणीं व कसें म्हणावें? ८७० वरें, तें नाहीं असें धरून चाललें, तर हीं महत्तत्त्वादि कोठून स्फुरण पावलीं? आणि यावांचून दुसरें आहे तरी काय? ७१ म्हणून त्यासंबंधानें 'आहे' 'नाहीं' असें कांहींच बोलतां न येऊन वेदांचीही वाणी मुकी झाला; आणि त्याच्या ठिकाणीं विचारासह वाट खुंटली! ७२ ज्याप्रमाणें मातीपासून तयार केलेले डेरे, घागरी, परळ इत्यादिकांच्या आकारांमाणें पृथ्वी दिसते, [परंतु त्यांपासून निराळी आहे,] त्याप्रमाणें ब्रह्म आपणच सर्व जग नटलेलें असून जगांत ओतप्रोत भरलेलें आहे; [तथापि तें त्याहून भिन्न आहे.] ७३.

अन्वय--तत् सर्वतः पाणिपादं, सर्वतः अक्षिशिरोमुखं, सर्वतः श्रुतिमत् (अस्ति), सर्वं च आवृत्य तिष्ठति. ॥१३॥

अर्थ--या जगांत त्याला सर्व बाजूंनीं हात व पाय आहेत; सर्व बाजूंनीं नेत्र, मस्तक व मुखें आहेत, सर्व बाजूंनीं कान आहेत; आणि तें सर्वाला व्यापून राहिलें आहे. ॥ १३ ॥

सर्व देशांत सर्व कालीं स्थूल व सूक्ष्म वस्तूंपासून जी क्रिया होते ती त्याच्या सत्तेनें होते,कारण तें सर्वत्र व्यापक आहे, म्हणून क्रियेचे हात तेंच आहे. ७४ त्या ब्रह्माला या कारणामुळेंच 'विश्वबाहु' असें म्हटलें आहे; कां कीं, तें सर्वत्र सर्वप्रकारें सर्वदा क्रिया करवीत असतें; म्हणजे त्याच्या सत्तामात्रेंकरून क्रिया होतात. ७५ आणि अर्जुना, तें सर्व ठिकाणीं एकसमयावच्छेदेंकरून असतें, म्हणूनच त्याला 'विश्वांघ्रि' हें नांव प्राप्त झालें आहे. ७६ ज्याप्रमाणें सूर्याला अंग व डोळे हे अवयव वेगळे वेगळे नाहींत, त्याप्रमाणें जें सर्व आपल्या स्वप्रकाशानें पहातें म्हणजे भासवतें, ७७ म्हणूनच त्यास डोळे नाहींत, तरी वेदानें त्याला मोठ्या शहाणपणानें 'विश्वतश्चक्षु' असें म्हटलें आहे; ७८ जें सर्वांपेक्षां उंच व सर्व प्रकारें नित्य

रावरी । नित्य नांदें सर्वांपरी । ऐसिये स्थितीवरी । विश्वमूर्धा म्हाणेपे ७९ पैं गा मूर्ति तेंचि मुख । हुताशना जैसें देख । तैसें सर्वपणें अशेख । भोक्तें जें ८८० यालागीं तया पार्था । विश्वतोमुख हे व्यवस्था । आली वाक्पथा । श्रुतीचिया ८१ आणि वस्तुमात्रीं गगन । जैसें असे संलग्न । तैसे शब्दजातीं कान । सर्वत्र जया ८२ म्हणोनि आम्ही तयातें । म्हणों सर्वत्र आइकतें । एवं जें सर्वांतें । आवरूनि असें ८३ एन्हवीं तरी महामती । विश्वतश्चक्षु इया श्रुती । तयाचिये व्याप्ती । रूप केलें ८४ वांचूनि हस्त नेत्र पाये । हे भाष तेथ कें आहे । सर्व शून्याचा न साहे । निष्कर्षु जे ८५ पैं कल्लोळातें कल्लोळें । ग्रसिजत असें ऐसें कळें । परि ग्रसितें ग्रासावेगळें । असे काई ८६ तैसें साचाचि जें एक । तेथ कें व्याप्यव्यापक । परि बोलावया नावेक । करावें लागे ८७ पैं शून्य जैं दावावें जाहलें । तैं बिंदुलें एक केलें । तैसें अद्वैत सांगावें बोलें । तें द्वैत कीजे ८८ एन्हवीं तरी पार्था । गुरुशिष्यसत्पथा । आडळु पडे सर्वथा । बोल खुंटे ८९ म्हणोनि गा श्रुती । द्वैतभावें अद्वैतीं । निरूपणाची वाहती । वाट केली ८९० तेंचि आतां अवधारीं । इयें नेत्रगोचरें आकारीं । तें ज्ञेय गा जयापरी । व्यापक असे ९१

सर्वेंद्रियगुणाभासं सर्वेंद्रियविवर्जितम् । असक्तं सर्वभृच्चैव निर्गुणं गुणभोक्तृ च ॥१४॥

तरि तें गा किरीटी ऐसें । अवकाशीं आकाश जैसें । पटीं पटु होऊनि असे । तंतु जेवीं ९२ उदक होऊनि उदकीं । रसु जैसा अवलोकीं । दीपपणें दीपकीं । तेज जैसे ९३ कर्पूरत्वें कापुरीं । सोरभ्य असे जयापरी । शरीर होऊनि शरीरीं । कर्म जेवीं ९४ किंबहुना पांडवा । सोनेंचि सोनयाचा रवा । तैसे जे या सर्वां । सर्वांगीं असे ९५ परी असे रवेपणामाजिवडे । तंव रवा ऐसे आवडे । वांचूनि सोनें सांगडें । सोनया जेवीं ९६ पैं गा वोघुचि वांकुडा । परि पाणी उजू सुहाडा । वन्हि आला लोखंडा । लोह नव्हे कीं ९७ घटाकारें वेंटाळें । तेथ नभ गमे वाटोळें । मठीं तरी चौफळें । आयें दिसे ९८ परि ते अवकाश जैसे । नोहिजतीचि कां आकाशें । जें विकार होऊनि तैसें । विकारी नोहे ९९ मन मुख्य इंद्रियां । सत्त्वादि गुणां ययां । सारिखें ऐसें धनंजया । आवडे कीर ९०० पैं गुळाची गोडी । नोहे बांधया सांगडी । तैसीं गुण इंद्रियें फुडीं । नाहीं तेथ १ अगा क्षीराचिये दशे । घृत क्षीराकारें असे । परि क्षीरचि नोहे

आहे, म्हणूनच ज्याला 'विश्वमूर्धा' असें म्हणतात; ७९ हें पहा—अग्नीची जी मूर्ति तेंच त्याचें मुख होय; त्याचप्रमाणें, जें ब्रह्म सर्व वस्तूंचा उपभोग घेतें;८८० पार्था, याच कारणास्तव श्रुतींना ब्रह्माला 'विश्वतोमुख' असें म्हटलें आहे. ८१ आणि आकाश ज्याप्रमाणें सर्व वस्तूंत ओतप्रोत भरलें आहे, त्याप्रमाणें शब्दमात्रावरोबर त्याचे श्रवण आहेत, ८२ म्हणूनच त्या ब्रह्माला आह्मी 'सर्वत्र ऐकणारें' असें म्हणतों. कारण, तें या जगतांत सर्वांला व्यापून आहे. ८३ हे महामते अर्जुना, वास्तविक विश्वतश्चक्षु इत्यादि श्रुतींनीं परमात्म्याच्या नेत्रादि अवयवांचें वर्णन जें केलें आहे, तें परमात्म्याला अवयव आहेत असें सिद्ध करण्याकारितां नाहीं, तर परमात्म्याचें व्यापकत्व दाखविण्याचा त्यांचा मुख्य अभिप्राय आहे. ८४ वास्तविक, सर्व पदार्थांच्या अभावालाही जो सहन करीत नाहीं, त्याच्या ठिकाणीं नेत्र, हात, पाय इत्यादि अवयवांची गोष्टच नको. ८५ आतां लोकदृष्ट्या एकादी मोठी लाट लहान लाटेचा नाश करते असें दिसतें, परंतु ती थोरली लाट त्या लहान लाटेपासून पाण्याच्या दृष्टीनें वेगळी आहे काय ? ८६ त्याप्रमाणें, खरोखरीच जर ब्रह्म सर्वत्र भरलेलें आहे, तर त्याचे ठिकाणीं व्याप्य-व्यापकभाव कोठून येणार ? मग शास्त्र व्याप्यव्यापकभावाचें प्रतिपादन कां करितें, असें म्हणशील तर, शिष्याला यथार्थ बोध होण्याकरितां तसें वर्णन करावें लागतें. ८७ ज्याप्रमाणें हिशोब शिकतांना बाकी शून्य दाखविण्याची वेळ येते त्या वेळेस शून्याबद्दल वर्तुलाकृति काढतात, त्याप्रमाणें अद्वैत स्पष्ट करून सांगावयाचें म्हटलें, म्हणजे द्वैताचा स्वीकार करूनच स्पष्टीकरण करावें लागतें.८८ नाहीं तर, अर्जुना, गुरुशिष्यसंप्रदाय चहूंकडे बंद पडेल; आणि अद्वैताविषयीं सर्व भाषण बंद होईल. ८९ म्हणून श्रुतींनीं द्वैताच्या रूपानें अद्वैताचें प्रतिपादन करण्याचा राजमार्ग सुरू केला. ८९० तेव्हां आतां, आपल्या नेत्रांनीं जें अंकार दिसतो, त्यांत तें ब्रह्म कसें व्यापक आहे, तें ऐक. ९१

अन्वय—(तत्) सर्वेन्द्रियगुणाभासं, सर्वेन्द्रियविवर्जितं, असक्तं सर्वभृत् च एव निर्गुणं गुणभोक्तृ च [इति]. १४

अर्थ—तें सर्व इंद्रियांना त्यांच्या विषयांचें ज्ञान करून देणारें असून, सर्वेंद्रियरहित आहे; तें कोठेंही सक्त नसून सर्वांचें भरण करणारें आहे; आणि गुणरहित असून गुणांचा उपभोग घेणारें आहे. ॥ १४ ॥

हें पहा—अर्जुना. तें ब्रह्म म्हणजे, ज्याप्रमाणें पोकळींत सर्व आकाश भरलेलें असतें, किंवा तंतु हे वस्त्रामध्यें वस्त्ररूप होऊन असतात;९२ हें बघ, रस ज्याप्रमाणें उदकामध्यें उदकरूप होऊन असतो, तेज ज्याप्रमाणें दीपामध्यें दीपपणानें असतें; ९३ सुगंध जसा कापुराच्या रूपानें कापुरांत भरलेला असतो, व क्रिया शरीराच्या रूपानें शरीरांत दृष्टीस पडते;९४ किंबहुना,अर्जुना, सोनें ज्याप्रमाणें सोन्याच्या रव्याच्या रूपानें दृष्टीस पडतें, त्याप्रमाणें जें या सर्व जगाचें आदिकारण असून सर्वांत दृष्टीस पडतें; ९५ तें सोनें ज्यावेळेस रव्याच्या रूपानें दृष्टीस पडतें, त्या वेळेस आपल्यास तो रवा आहे असें वाटतें,परंतु सोनें या दृष्टीनें पाहूं गेलें असतां तो रवा सोनेंच होय.९६ अर्जुना, पाण्याचा ओघ वांकडा असला ह्मणजे पाणी वांकडें दिसतें, परंतु तें खरोखर वांकडें नाहीं; लोखंड तापवून लाल झाल्यावर त्याचा आकार दृष्टीस पडतो, तो अग्नीचा नसून लोखंडाचा आहे; ९७ घटाच्या आकारानें आकाश वाटोळें दिसतें, व तेंच घराचे चौकांत पाहिलें म्हणजे चौकोनी दिसतें; ९८ परंतु तोच मठ व घट नाश पावल्यावर आकाशाचा नाश होत नाहीं, त्याप्रमाणें जें ब्रह्म मायेचे उपाधीनें विश्वमय होतें, परंतु मायेंत नसतें; ९९अर्जुना,तें ब्रह्म मन इत्यादि इंद्रियांप्रमाणें व सत्त्वादि गुणांप्रमाणें आकारास आलें आहे असा भास होतो, ९०० परंतु ज्याप्रमाणें गुळाची गोडी ही गुळाच्या आकारांत नसतें, त्याप्रमाणें इंद्रियें व गुण यांत ब्रह्म नसतें. १ हे कपिध्वजा, ज्याप्रमाणें दुधाच्या अवस्थेंत तूप दुधा-

जैसें । कपिध्वजा २ तैसें जें इये विकारीं । विकार नोहे अवधारीं । पैं आकारा नाम भोंवरी । यर सोनें तें सोनें ३ इया उघड मऱ्हाटिया । तें वेगळेपण धनंजया । जाण गुणइंद्रियां- । पासोनियां ४ नामरूपसंबंधु । जातिक्रियाभेदु । हा आकारासीच प्रबादु । वस्तूसि नाहीं ५ तें गुण नव्हे कहीं । गुणा तया संबंधु नाहीं । परि तयाच्याचि ठाईं । आभासती ६ येतुलेयासाठीं । संभ्रांताच्या पोटीं । ऐसें जाय किरीटी । जें हेंचि धरी ७ तरि तें गा धरणें ऐसें । अभ्रातें जेविं आकाशें । कां प्रतिवदन जैसें । आरसेनि ८ नातरी सूर्य प्रतिमंडळ । जैसेंनि धरी सलिल । कां रश्मिकरीं मृगजळ । धरिजे जेवीं ९ तैसें गा संबंधेंविण । यया सर्वांतें धरी निर्गुण । परि तें वायां जाण । मिथ्याद्दष्टी ९१० आणि यापरि निर्गुणें । गुणातें भोगणें । रंका राज्य करणें । स्वप्नीं जैसें ११ ह्मणोनि गुणाचा संगु । अथवा गुणभोगु । हा निर्गुणीं लागु । बोलों नये १२

बहिरंतश्च भूतानामचरं चरमेव च । सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं दूरस्थं चांतिके च तत् ॥ १५ ॥

जें चराचर भूतां- । माजि असे पांडुसुता । नाना वन्हीं उष्णता । अभेदें जैसी १३ तैसेनि अविनाशभावें । जें सूक्ष्मदशे आघवें । व्यापूनि असे तें जाणावें । ज्ञेय एथ १४ जें एक आंतुबाहेरी । जें एक जवळ दुरी । जें एकवांचूनि परी । दुजी नाहीं १५ क्षीरसागरींची गोडी । माजि बहु थडिये थोडी । हें नाहीं तया परवडी । पूर्ण जें गा १६ स्वेदजप्रभृती । वेगळाल्या भूतीं । जयाचिये अनुस्यूती । खोमणें नाहीं १७ पैं श्रोतेमुखटिळका । घटसहस्रा अनेका- । माजि बिंबोनि चंद्रिका । न भेदे जेवीं १८ नाना लवणकणाचिये राशी । क्षारता एकचि जैसी । कां कोडी एकीं उसीं । एकचि गोडी १९

अविभक्तं च भूतेषु विभक्तमिव च स्थितम् । भूतभर्तृ च तज्ज्ञेयं ग्रसिष्णु प्रभविष्णु च १६

तैसें अनेकीं भूतजातीं । जें आहे एकी व्याप्ती । विश्वकार्या सुमती । कारण जें गा ९२० म्हणोनि हा भूताकारु । जेथोनि तेंचि या आधारु । कल्लोळा सागरु । जियापरी २१ बाल्यादि तीन्ही वयसीं । काया एकचि जैसी । तैसें आदिस्थितिग्रासीं । अखंड जें २२ सायंप्रातर्मध्यान्ह । होतां जातां दिनमान । जैसें कां गगन । पालटेना २३ अगा सृष्टीवेळे प्रियोत्तमा । जया नांव म्हणती ब्रह्मा । व्यासि जें विष्णुनामा । पात्र जाहलें २४ मग अकारु हा

च्या आकारानें असतें, परंतु तें दूध म्हणजे तूप नव्हे, २ त्याप्रमाणें जें ब्रह्म विश्वांत भरलेलें असून तें विश्व नव्हे. कारण, सुवर्णाचे अलंकार बनविल्यावर त्यांस आपण फूल, बांकी अशीं नांवें देतों, बाकी सुवर्णदृष्टीनें सोनें तें सोनेंच! ३ याप्रमाणें मीं उघड मराठी भाषेंत सांगतों: अर्जुना, ब्रह्म हें गुण व इंद्रियें यांपासून वेगळें आहे ४ नांव, रूप संबंध, जाति, क्रिया, भेद हे सर्व प्रकार आकाशास च लागू आहेत, ब्रह्माला नाहींत. ५ तें ब्रह्म गुण नाहीं, व त्याचा आणि गुणांचा संबंध नाहीं, परंतु त्याचेच ठिकाणीं ते भासतात. ६ या कारणावरून अर्जुना, अज्ञान्याच्या मनांत असें येतें कीं, गुण हे ब्रह्माचे व आहेत. ७ परंतु ब्रह्माच्या ठिकाणीं गुण अ हेत असें मानणें, म्हणजे ज्याप्रमाणें ढग आकाशांत दृष्टीस पडतात म्हणून त्यांना आकाश धारण करतें, किंवा आरशांत पाहिलें असतां जें प्रतिबिंब दृष्टीस पडतें ते आरशाचेंच आहे, असें ह्मणण्याप्रमाणें होय ८ किंवा सूर्याचें प्रतिबिंब पाणी धारण करितें, अथवा सूर्यरश्मी मृगजल धारण करितात, असें वास्तविक नसतांना लोक समजतात. ९ गुणाचा व ब्रह्माचा संबंध नसतांनाही ब्रह्म गुणाला धारण करितें असा जो निश्चय, तो भ्रांतिमुळें व्यर्थ आहे. ९१० ज्याप्रमाणें भिकारी मनुष्य स्वप्नांत राज्याचा उपभोग घेतो हें मिथ्या होय, त्याप्रमाणें ब्रह्म स्वतः निर्गुण असतां गुणाचा भोग घेतें, हें म्हणणें व्यर्थ होय. ११ म्हणून, ब्रह्म गुणांचा संग करतें अथवा गुणांचा उपभोग घेतें, असे म्हणतां येत नाहीं. १२

अन्वय–तत् भूतानां बहिः अंतः च (अस्ति), अचरं चरं च एव अस्ति; सूक्ष्मत्वात् अविज्ञेयं (अस्ति) दूरस्थं च अंतिके च (अस्ति) ॥ १५ ॥

अर्थ–तें [सर्व] भूतांच्या बाहेर असून आंतही आहे; स्थिर असून हालणारें आहे; अत्यंत सूक्ष्म असल्यामुळें जाणतां येत नाहीं; आणि दूर असून जवळही आहे. ॥ १५ ॥

हे पांडुसुता, अग्नीचे निखारे जरी पुष्कळ आकारांचे निरनिराळे असले, तरी त्यांतील उष्णता ज्याप्रमाणें एकच होय, त्याप्रमाणें चराचर भूतांमध्यें ब्रह्म व्यापक आहे. १३ याप्रमाणें, जें अविनाशी असून सूक्ष्मपणानें सर्व जगांत व्यापून आहे, तें प्रस्तुतचें ज्ञेय आहे, १४ जें शरिराचे आंत असतें व बाहेरही असतें; तसेंच जें पाहिलें असतां जवळ आहे व दूरही आहे; व जें एक असून दुसरा प्रकारच नाहीं; १५ श्रीरसागराची गोडी कांठाशीं थोडी व मध्यभागीं पुष्कळ अशी नसते, त्याप्रमाणें जें सर्वत्र व्यापक असून पूर्ण आहे; १६ जारज, अंडज, स्वेदज व उद्भिज या सर्व वेगळाल्या भूतांच्या ठिकाणीं ज्याच्या अखंड व्याप्तीला हानी नाहीं, १७ हे श्रीतुशिरोमणे, हजारों घटांच्या निराळ्या आकारांत चंद्राचें बिंब निराळें दिसत, परंतु त्याला जसा भेद नाहीं; १८ मिठाच्या पुष्कळ राशी जरी असल्या तरी सर्वांचा खारटपणा जसा एक असतो, अथवा मोळीभर ऊंस जरी असले तरी त्या सर्वांची गोडी जशी एकच असते, १९

अन्वय–तत् ज्ञेयं अविभक्तं भूतेषु च विभक्तं इव स्थितम्, भूतभर्तृ च ग्रसिष्णु च प्रभविष्णु च (अस्ति). १६

अर्थ–तें ब्रह्म सृष्टींत विभागलें नसून प्रत्येक प्राण्याच्या ठिकाणीं विभागल्यासारखें दिसतें; आणि तें सर्व भूतांना धारण करणारें, सर्वांचा नाश करणारें, व सर्वांची उत्पत्ति करणारें आहे. ॥ १६ ॥

तशी अनेक भूतमात्रांत ज्याची एकत्वानें व्याप्ति आहे; आणि अर्जुना, विश्वाच्या रचनेंत जें आदिकारण आहे; ९२० म्हणून ज्याप्रमाणें लाटा समुद्रापासून उत्पन्न होऊन लाटांना आधार समुद्रच असतो, त्याप्रमाणें प्राणिमात्राच्या उत्पत्तीला जो हेतु तोच त्याचा आधार आहे, २१ बाल्यावस्था, तारुण्यावस्था व वृद्धावस्था, ह्यांना जसें एकच शरीर अधारभूत असतें, तसें उत्पत्ति, स्थिति व लय ह्या तिन्ही अवस्थांस जें आधारभूत आहे; २२ प्रातःकाळ मध्यान्हकाळ व सायंकाळ हे दिवसाचे तिन्ही काळ जरी गेले, तरी आकाशांत जसा पालट नसतो; २३ हे प्रियोत्तमा, सृष्टीच्या उत्पत्तिकाळीं ज्याला आपण ब्रह्मदेव ह्मणतो, व व्याप्ति काळीं म्हणजे स्थितिकाळीं ज्याला विष्णु हें नांव देतों, २४ मग लय करते वेळेस ज्याला आपण रुद्र अशें म्हणतो, व हीं तिन्ही कार्यें ज्या वेळेस लोप पावतात, त्या

हारपे। तेव्हां रुद्र जें म्हणिपे। तेंही गुणत्रय जेव्हां लोपे। तैं जें शून्य २५ नभाचे शून्यत्व गिळून। गुणत्रयातें नुरऊन। तें शून्य तें महाशून्य। श्रुतिवचनसंमत २६

ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमसः परमुच्यते । ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य धिष्ठितम् ॥१७॥

जें अग्नीचें दीपन । जें चंद्राचें जीवन । सूर्याचे नयन । देखती जेणें २७ जयाचे उजियेडें । तारांगण उभडें । महातेज सुरवाडें । राहाटे जेणें २८ जें आदीची आदी । जें वृद्धीची वृद्धी । बुद्धीची जें बुद्धी । जीवाचा जीवु २९ जें मनाचें मन । जें नेत्राचे नयन । कानाचे कान । वाचेची वाचा ९३० जें प्राणाचा प्राण । जें गतीचे चरण । क्रियेचें कर्तेपण । जयाचेनि ३१ आकारु जेणें आकारे । विस्तारू जेणें विस्तारे । संहारू जेणें । संहारे । पांडुकुमरा ३२ जें मेदिनीची मेदिनी । जें पाणी पिऊनि असे पाणी । तेजा दिवेलावणी । जेणें तेजें ३३ जें वायूचा श्वासोश्वासु । जें गगनाचा अवकाशु । हें असो आघवाचि आभासु । आभासे जेणें ३४ किंबहुना पांडवा । जें आघवेंचि असे आघवा । जेथ नाहीं रिगावा । द्वैतभावासी ३५ जें देखिलियाचिसवें । दृश्य द्रष्टा हें आघवें । एकवाट कालवे । सामरस्यें ३६ मग तेंचि होय ज्ञान । ज्ञाता ज्ञेय हन । ज्ञेय गामिजे स्थान । तेंहि तेंचि ३७ जैसें सरलियां लेख । आंख होती एक । तैसें साध्यसाधनादिक । ऐक्यासि ये ३८ अर्जुना जिये ठायीं । न सरे द्वैताची वही । हें असो जें हृदयीं । सर्वांच्या असे ३९

इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं चोक्तं समासतः । मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते ॥१८॥

एवं तुजपुढां । आदीं क्षेत्र सुहाडा । दाविलें फाडोवाडां । विवंचुनी ९४० तैसेंचि क्षेत्रापाठीं । जैसेनि देखसी दिठी । तें ज्ञानही किरीटी । सांगितलें ४१ अज्ञानाही कौतुकें । रूप केलें निकें । जंव आयणी तुझी टेंके । पुरे म्हणे ४२ आणि आतां हें रोकडें । उपपत्तीचेनि पवाडें । निरूपिलें उघडें । ज्ञेय पैं गा ४३ हे आघवींच विवंचना । बुद्धी भरोनि अर्जुना । मत्सिद्धिभावना । माझिया येती ४४ देहादि परिग्रहीं । संन्यासु करूनियां जिहीं । जीवु माझ्या ठाईं । वृत्तिकु केला ४५ ते मातें किरीटी । होंचि जाणोनियां शेवटीं । आपणपयां साटोवाटीं । मीचि होती ४६ मीचि होती परी । हे मुख्य गा अवधारीं । सोहोपी सर्वांपरी । रचिलीं आम्हीं ४७ कडां पायरी कीजे । निराळीं माचु बांधिजे । अथावीं सुइजे । तरी जैसी ४८ एऱ्हवीं अवघेंचि आत्मा । हें सांगों

वेळेस जें शून्य असतें त्याला प्रकृती असें म्हणतों; २५ आणि आकाशाचें शून्यत्व मिळून गुणत्रय नाहींसें करणारें जें प्रकृतिशून्य. त्याला जें नाहींसें करतें, तें श्रुतींनीं वर्णन केलेलें महाशून्य तेंच आमचें ज्ञेय होय. २६

अन्वय—तत् ज्योतिषां अपि ज्योतिः (अस्ति); तमसः परं उच्यते ज्ञानं, ज्ञेयं, ज्ञानगम्यं (अस्ति : सर्वस्य च हृदि विष्ठितम् (अस्ति). ॥ १७ ॥

अर्थ—तें ब्रह्म चंद्रसूर्यादिकांनाही प्रकाश देणारें आहे; तें अज्ञानरूप अंधकाराच्या पलीकडे आहे असें म्हणतात; तें ज्ञानस्वरूप आहे, ज्ञेयस्वरूप आहे, व ज्ञानानें मिळण्याजोगें आहे; आणि तेंच सर्वांच्या हृदयामध्ये विद्यमान आहे. ॥ १७ ॥

जें ब्रह्म अग्नीला दीपन करण्याची शक्ति देतें. ज्या चंद्रापासून जगतांत अमृताची प्राप्ति होते त्याला जें अमृत देतें, ज्या सूर्याचे उजेडापासून सर्व जग व्यवहार करितें, त्याला ज्याचेपासून दृष्टि प्राप्त होते, २७ ज्याचे तेजानें तारांगणांस तेज प्राप्त होतें; तसेंच महातेज ज्याचे तेजानें तेजस्वी होतें; २८ जगतांत जे मूळ पदार्थ म्हणून आहेत, त्यांचेहा जें मूळ म्हणजे आदि, जें बुद्धीची बुद्धी, तसेंच बुद्धीची बुद्धी व जीवाचा जीव; २९ जें मनाचें मन. डोळ्याचा डोळा, कानाचा कान व वाचेची वाचा; ९३० जें प्राणाचें जीवन, गतीचें चरण व ज्याच्यामुळें क्रियेस कर्तेपणा येतो; ३१ हे पांडुकुमरा, ज्याच्यामुळें आकार, विस्तार व संहार यांना आपापलें रूप प्राप्त होतें; ३२ जें पृथ्वीस धारण करणारें, जें पाण्याचें जीवन, व ज्याचे योगानें तेज प्रकाशमान होतें; ३३ जें वायूस वाहण्याची शक्ति देतें व ज्यांत आकाश सामावतें; फार काय सांगावें, सर्व भासमान वस्तु ज्याचे तेजानें भासल्या जातात ३४ हे पांडवा, या सर्व जगतांत सर्व पदार्थांच्या रूपानें सर्वपणानें आहे, आणि ज्याच्या ठिकाणीं द्वैतभावाचा प्रवेशच नाहीं, ३५ ज्याचें दर्शन होण्याबरोबर द्रष्टा, दृश्य व दर्शन ही त्रिपुटी ब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणीं ऐक्यभावाला येते, ३६ मग तेंच ज्ञान, ज्ञेय आणि ज्ञान ही त्रिपुटी होऊन ज्याचे योगानें ब्रह्म कळतें, तेंही तेंच होय. ३७ ज्याप्रमाणें हिशेबाचा ताळा जमल्यावर हिशेबाच्या कच्चा कागदांचें काम संपतें, त्याप्रमाणें ब्रह्मप्राप्ति झाल्यावर साध्य व साधक हे भाव नाहींतसे होतात. ३८ अर्जुना. ब्रह्माचे ठिकाणीं द्वैताचा संबंधही राहात नाहीं; आतां हें राहूं दे. तें सर्वांच्या हृदयांत वास करतें. ३९

अन्वय—इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं च समासतः उक्तं; मद्भक्तः एतत् विज्ञाय मद्भावाय उपपद्यते. ॥ १८ ॥

अर्थ—याप्रमाणें क्षेत्र, ज्ञान आणि ज्ञेय ह्यांचें संक्षेपानें तुला सांगितलें. ह्या ज्ञानानें माझा भक्त माझ्या स्वरूपाला मिळतो. ॥ १८ ॥

याप्रमाणें, हे प्रियमित्रा, तुला क्षेत्र म्हणजे काय हें खडे मांडून विस्तारानें कळविलें. ९४० त्याचप्रमाणें, अर्जुना, त्या क्षेत्रानंतर, तुला उघड दृष्टीनें पहातां येईल अशा रीतीनें ज्ञानही समजून सांगितलें. ४१ त्याप्रमाणेंच, तुझे बुद्धीची तृप्ति होऊन तूं पुरे म्हणेपर्यंत अज्ञानाच्याही लक्षणांचें कौतुकानें निरूपण केलें. ४२ आणि आतांच दृष्टांत देऊन तुला ज्ञेय म्हणजे काय तें स्पष्ट करून सांगितलें. ४३ अर्जुना, या सर्व गोष्टींचा विचार करून, माझ्या प्राप्तीची इच्छा धरून माझे भक्त मद्रूप होतात. ४४ देहादिक परिवाराचा त्याग करून जे माझे ठिकाणीं आपलें चित्त बतनदार करतात, ४५ हे किरीटी, ते माझे भक्त आपलें चित्त मला अर्पण करून व माझें चित्त आपलेकडे घेऊन मद्रूप होतात. ४६ अशा रीतीनें मद्रूप होण्याचा सर्वांत सुलभ मार्ग मीं मुमुक्षूंकरितां तयार करून ठेवला आहे. ४७ कड्यावर चढून जाणें झाल्यास जशा पायऱ्या कराव्या लागतात, किंवा अंतराळीं चढून जाणें असल्यास जसा पहाड बांधावा लागतो, किंवा खोल पाण्यांतून तरून जावयाचें असल्यास जशी नांव घालावी लागते; ४८ एन्हवीं हे वीरोत्तमा, सर्वत्र आत्मा आहे असें जर तुला वर्णन क-

जरी वीरोत्तमा । परी तुझिया मनोधर्मा । मिळेल ना ४९ म्हणोनि एकचि संचलें । चतुर्धा आम्हीं केलें । जें अदळपण देखिलें । तुझिये प्रज्ञे ९५० पैं बाळ जैं जेवविजे । तैं घांसु विसा ठायीं कीजे । तैसें एकचि हें चतुर्व्याजें । कथिलें आम्हीं ५१ एक क्षेत्र एक ज्ञान । एक ज्ञेय एक अज्ञान । हे भाग केले अवधान । जाणोनि तुझें ५२ आणि ऐसेनही पार्था । जरी हा अभिप्रावो तुज हाता । नये तरी हे व्यवस्था । एक वेळ सांगों ५३ आतां चौठायीं न करूं । एकही म्हणोनि न सरूं । आत्मानात्मया धरूं । सरिसा पाडु ५४ परि तुवां येतुलें करावें । मागौनि तें आम्हां देआवें । जे कानाचें नांव ठेवावें । आपणपैं गा तें ५५ या श्रीकृष्णाचिया बोला । पार्थु रोमांचितु जाहला । तेथ देवो म्हणती भला । उचंबळेना ५६ ऐसेनि तो येतां वेगु । धरूनि म्हणे श्रीरंगु । प्रकृतिपुरुषविभागु । परिसें सांगों ५७ जया मार्गातें जगीं । सांख्य ह्मणती योगी । जयाचिये भाटिवेलागीं । मी कपिल जाहलों ५८ तो आईक निर्दोखु । प्रकृतिपुरुषविवेकु । म्हणे आदिपुरुखु । अर्जुनातें ५९

प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादी उभावपि । विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसंभवान् ॥१९॥

तरि पुरुष अनादि आथी । आणि तैंचि लागोनि प्रकृती । संसारिसीं दिवोरातीं । दोनी जैसीं ९६० कां रूप नोहे वायां । परी रूपा लागली छाया । निकणु वाढे धनंजया । कणसीं कोंडा ६१ तैसीं जाण जवटें । दोन्ही इयें एकवटें । प्रकृतिपुरुष प्रकटें । अनादिसिद्धें ६२ पैं क्षेत्र येणें नांवें । जें सांगितलें आघवें । तेंचि एथ जाणावें । प्रकृति हे गा ६३ आणि क्षेत्रज्ञु ऐसें । जयातें ह्मणितलें असे । तो पुरुष हें अनारिसें । न बोलों घेईं ६४ इयें आनानें नांवें । परि निरूप्य आन नोहे । हें लक्षण न चुकावें । पुढतपुढती ६५ तरी केवळ जे सत्ता । तो पुरुषु गा पांडुसुता । प्रकृतीतें समस्ता । क्रिया नाम ६६ बुद्धि इंद्रियें अंतःकरण । इत्यादि विकारभरण । आणि ते तीन्ही गुण । सत्वादिक ६७ हा आघवाचि मेळावा । प्रकृती जाहला जाणावा । हेचि हेतु संभवा । कर्माचिया ६८

कार्यकरणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते । पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुरुच्यते ॥२०॥

तेथ इच्छा आणि बुद्धी । घडवी अहंकारेंसीं आधीं । मग तिया लाविती वेधीं । कारणाच्या ६९ तेंचि कारण ठाकावया । जें सूत्र धरणें उपाया । तया नांव धनंजया । कार्य पैं गा ९७० आणि इच्छा मदाच्या थावीं । लागली म-

रून सांगू लागलों, तर तुला तें स्पष्ट कळणार नाहीं. ४९ ह्मणून, तुझी बुद्धी जड आहे असें पाहून, तें एकच ब्रह्म चार विभाग करून सांगितलें. ९५० ज्याप्रमाणें मुलाला जेऊं घालावयाचें असलें ह्मणजे जो आपण एक घास घेतों तोच त्याला बीस वेळ थोडथोडा द्यावा लागतो, त्याप्रमाणें ब्रह्म हें चार प्रकारांनीं तुला मीं स्पष्ट करून सांगितलें. ५१ तुझी अवधानशक्ति पाहून एक क्षेत्र, एक ज्ञान, एक ज्ञेय व एक अज्ञान असे त्या ब्रह्माचे चार भाग केले. ५२ आणि पार्था, इतकें करून जर ब्रह्म तुला नीट कळत नसलें, तर तुला दुसऱ्या रीतीनें आणखी एकदा स्पष्ट करून सांगतों. ५३ आतां त्याचे चार भाग न करितां, तसेंच तें एकही न मानतां, आत्मा व अनात्मा (पुरुष व प्रकृति) असे दोन भाग करून तें तुला सांगतों. ५४ परंतु तूं एक गोष्ट कर कीं, आम्ही मागूं तें आम्हांस दे. तें काय ह्मणशील, तर तूं लक्षपूर्वक कान देऊन आम्ही सांगूं तें ऐक. ५५ असें श्रीकृष्णांचें वचन ऐकून पार्थाचे अंगावर रोमांच उभे राहिले. तेव्हां देव ह्मणाले कीं, याचे मनांत ही गोष्ट पूर्णपणें बिंबली आहे. ५६ याप्रमाणें श्रीकृष्णालाही वेग आला; परंतु तो आंवरून धरून ते म्हणतातः—अर्जुना, तुला ब्रह्माचे प्रकृति व पुरुष असे दोन भाग स्पष्ट करून सांगतों, ते ऐक. ५७ प्रकृति व पुरुष यांचें ज्यांत विवेचन आहे, त्या मार्गाला योगी लोक 'सांख्यमार्ग' असें ह्मणतात; व ज्याचें पूर्णपणें वर्णन करण्याकरितां मीं कपिलावतार घेतला, ५८ तो प्रकृति व पुरुष यांचेविषयीं निर्दोष विचार ऐक, असें श्रीकृष्ण परमात्मा अर्जुनास म्हणाले. ५९

अन्वय—(त्वं) प्रकृतिं पुरुषं च उभौ अपि अनादी एव विद्धि; विकारान् च गुणान् च प्रकृतिसंभवान् एव विद्धि. १९

अर्थ—प्रकृति आणि पुरुष हे दोन्ही अनादि आहेत, असें तूं समज; आणि विकार व गुण हे प्रकृतीपासूनच उत्पन्न झाले आहेत, असें तूं समज. ॥ १९ ॥

तरी पुरुष हा अनादि आणि तेव्हांपासून त्याला लागूनच प्रकृतिही आहे. ज्याप्रमाणें दिवस व रात्र यांची जोड आहे; ९६० छाया ही रूप नव्हे, परंतु तो रूपाबरोबर असते; तसेंच, हे धनंजया, बीं पेरल्यावर त्याचे बरोबर ज्याप्रमाणें कण व कोंडा हीं दोन्ही बरोबरच उत्पन्न होतात, ६१ त्याप्रमाणें प्रकृति व पुरुष ह्यांचें अनादिसिद्ध जोडपें प्रसिद्ध आहे. ६२ तर क्षेत्र या नांवानें तुला जें सांगितलें त्यालाच या ठिकाणीं प्रकृति म्हणून समजावें; ६३ आणि क्षेत्रज्ञ म्हणून ज्याला ह्मणतात. तो पुरुष हें आम्ही निःसंशय सांगतों, असें समज. ६४ यांचीं जरी हीं निरनिराळीं नांवें आहेत, तरी त्यांजविषयीं निरूपण निराळें नाहीं, ही गोष्ट तूं बरचेवर पूर्णपणें लक्षांत ठेव. ६५ हे पांडुसुता, ज्या सत्तेला कधींही नाश नाहीं; तिला पुरुष असें समजावें व सत्तेच्या योगानें ज्या क्रिया घडतात, त्यांना प्रकृति असें ह्मणावें. ६६ बुद्धि, इंद्रियें, अंतःकरण इत्यादि ज्यांपासून विकार उत्पन्न होतात—आणि सत्व, रज व तम हे तिन्ही गुण ६७ या सर्वांची प्रकृतीपासून उत्पत्ति होते व याचेपासून सर्व कर्में होतात. ६८

अन्वय—प्रकृतिः कार्यकरणकर्तृत्वे हेतुः उच्यते; पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुः उच्यते. ॥ २० ॥

अर्थ—प्रकृति ही कार्य म्हणजे शरीर व करण ह्मणजे तेरा इंद्रियें यांच्या उत्पत्तीला कारण आहे; आणि पुरुष हा सुखदुःखांच्या भोक्तेपणास कारण आहे. ॥ २० ॥

त्या ठिकाणीं इच्छा व बुद्धि यांपासून अहंकार उत्पन्न होतो; व त्यामुळें ती इच्छा व बुद्धि फलप्राप्तीकरितां इंद्रियांना आपापलीं कार्यें करण्याकरितां नादीं लावतात, ६९ तेंच फल प्राप्त होण्याकरितां जो उपाय करावयाचा, त्यास, हे धनंजया, कार्य असें म्हणतात. ९७० तीच इच्छा

नातें उठवी । तें इंद्रियें राहाटवी । हें कर्तृत्व पैं गा ७१ म्हणोनि तीन्ही या जाणा । कार्यकर्तृत्वकारणा । प्रकृति मूळ हे राणा । सिद्धांचा म्हणे ७२ एवं तिहींचेनि समवायें । प्रकृति कर्मारूप होये । परि जया गुणा वाढे त्राये । त्याचि सारिखी ७३ जें सत्त्वगुणें अधिष्ठिजे । तें सत्कर्म म्हणिजे । रजोगुणें निपजे । मध्यम तें ७४ जें कां केवळ तमें । होती जियें कर्में । निषिद्धें अधर्में । जाण तियें ७५ ऐसेंनि संतासंतें । कर्में प्रकृतीस्तव होतें । तयापासोनि निर्वाळनें । सुखदुःख गा ७६ असंतीं दुःख उपजे । सत्कर्मीं सुख निफजे । तया दोहींचा बोलिजे । भोगु पुरुषा ७७ सुखदुःखें जंववरी । निफजती साचोकारीं । तंव प्रकृति उद्यमु करी । पुरुषु भोगी ७८ प्रकृतिपुरुषांची कुळवाडी । सांगतां असंगडी । जे आंबुली जोडी । आंबुला खाय ७९ आंबुला आंबुलिये । संगती ना सोये । कीं आंबुली जग विये । चोज ऐका ९८०

पुरुषः प्रकृतिस्थो हि भुंक्ते प्रकृतिजान् गुणान् । कारणं गुणसंगोऽस्य सदसद्योनिजन्मसु २१

जे अनंगु तो पैंधा । निकवडा नुसधा । जीर्णु अतिवृद्धा । पासोनि वृध्दु ८१ तया आडनांव पुरुषु । एन्हवीं स्त्री ना नपुंसकु । किंबहुना एकु । निश्चयो नाहीं ८२ तो अचक्षु अश्रवणु । अहस्तु अचरणु । रूप ना वर्णु । नाम आथी ८३ अर्जुना कांहींचि जेथ नाहीं । तो प्रकृतीचा भर्ता पाहीं । कीं भोगणें ऐसयाही । सुखदुःखाचें ८४ तो तरी अकर्ता । उदासु अभोक्ता । परि इया पतिव्रता । भोगविजे ८५ जियेतें अळुमाळु । रूपा गुणाचा चाळढाळु । ते भलतैसाही खेळु । लेखा आणी ८६ इये प्रकृती तंव । गुणमयी हेंचि नांव । किंबहुना सावेव । गुण तेचि हे ८७ हे प्रतिक्षणीं नित्य नवी । रूपा गुणाचीच आघवी । जडातेंही माजवी । इयेचा माजु ८८ नामें इयें प्रसिद्धें । स्नेहो इया स्निग्धें । इंद्रियें प्रबुद्धें । इयेचेनि ८९ कायि मन हें नपुंसक । कीं तें भोगवी तिन्ही लोक । ऐसें ऐसें अलौकिक । करणें इयेचें ९९० हे भ्रमाचें महाद्वीप । हे व्याप्तीचें रूप । विकार उमप । इया केले ९१ हे कामाची मांडवी । हे मोहवनींची माधवी । इये प्रसिद्धचि दैवी । माया हें नाम ९२ हे वाङ्मयाची वाढी । हे साकारपणाची जोडी । प्रपंचाची धाडी । अभंग हे ९३ कळा येथूनि जालिया । विद्या इयेच्या केलिया । इच्छा ज्ञान क्रिया । वियाली हे ९४ हे नादाची टांकसाळ । हे चमत्काराचें वेळाऊळ । किंबहुना सकळ । खेळु इयेचा ९५ जे उत्पत्ति प्र-

प्रबळ होऊन मन जागृत करते, व त्याजकडून सर्व व्यहार करविते. ७१ म्हणून कार्य, कर्तृत्व व कारण या त्रिपुटीस प्रकृति मूळ होय, असें सिद्धांचा राणा जो श्रीकृष्ण परमात्मा तो म्हणाला. ७२ याप्रमाणें तिन्ही एकत्र झाल्यावर प्रकृति क्रियारूप होते; परंतु ज्या गुणाचा विशेष जोर होईल, त्या गुणाप्रमाणें ती क्रिया घडते. ७३ जें कर्म सत्त्वगुणापासून उत्पन्न होतें, तें सत्कर्म होय. रजोगुणापासून उत्पन्न होतें, तें मध्यम, ७४ आणि जीं कर्में केवळ तमोगुणापासून उत्पन्न होतात, तीं निषिद्ध म्हणजे धर्मविरुद्ध कर्में होत. ७५ याप्रमाणे प्रकृतीपासून चांगलीं व वाईट कर्में घडतात, व त्या कर्मांपासून सुखदुःख प्राप्त होतें: ७६ वाईट कर्मांपासून दुःख उत्पन्न होतें, सत्कर्मांपासून सुख उत्पन्न होतें, व त्या दोहोंचा उपभोग पुरुषास घ्यावा लागतो. ७७ जोंपर्यंत सुख व दुःख सत्यत्वानें उत्पन्न होतें, तोंपर्यंत व्यापार प्रकृतीचा व भोग पुरुषाचा. ७८ प्रकृति व पुरुष यांचा व्यापार इतका विसंगत आहे कीं, स्त्रीनें मिळवावें व नवऱ्यानें स्वथ बसून खावें. ७९ काय चमत्कार आहे पहा कीं, या स्त्रीपुरुषांचा कधींहि संग न घडतां स्त्रीपासून जगाची उत्पत्ति होते. ८८०

अन्वय–पुरुषः प्रकृतिस्थः (सन्) प्रकृतिजान् गुणान् भुंक्ते हि; गुणसंगः अस्य सदसद्योनिजन्मसु कारणं (अस्ति). २१

अर्थ–पुरुष प्रकृतीशीं संबंध ठेवून प्रकृतीच्या गुणांचा उपभोग घेतो; व गुणसंबंध हाच पुरुषाच्या बऱ्या–वाईट जन्माला कारण होतो ॥ २१ ॥

जो पुरुष ब्रह्म निराकार असून उदासिन आहे, तसेंच निर्धन असून, केवळ एकटा आहे आणि जीर्ण असून, या जगांत जी अति वृद्ध वस्तु असेल तिच्यापेक्षांही वृद्ध आहे. ८१ त्याला आडनांव पुरुष हें आहे. एन्हवीं तें स्त्री किंवा नपुंसक यांपैकीं निश्चयानें कोणतेंच संगतां येत नाहीं. ८२ त्याला डोळे, कान, हात, पाय, रूप, वर्ण व नांव हें कांहींएक नाहीं. ८३ अर्जुना त्याला कोणतेही अवयव नाहींत, असा हा प्रकृतीचा नवरा असून त्यालाही सुखदुःख भोगावें लागतें. ८४ तो कर्म न करणारा, उदासीन व उपभोग न घेणारा असा जरी आहे, तरी ही पतिव्रता प्रकृति त्याला उपभोग घेण्यास लावते. ८५ जी प्रकृति आपल्या गुणांच्या व रूपाच्या अनुरोधानें विलक्षण खेळ करून दाखविते, ८६ म्हणून या प्रकृतीला गुणमयी असें नांव दिलें आहे; किंबहुना ही मूर्तिमंत गुणच आहे. ८७ ही क्षणोक्षणीं नित्य नवी असून रूप व गुण यांनीं युक्त आहे: व ही जड वस्तूकडूनही आपले कर्तबगारीनें कर्म करविते. ८८ नांव, प्रीति, इंद्रियें या सर्वांचे व्यापाराला ही कारण आहे. ८९ पाहूं गेलें असतां मन हें नपुंसक असूनही त्याला तिन्ही लोकांत हिंडविते. याप्रमाणें इची अलौकिक करणी आहे. ९९० ही भ्रमाचें केवळ महाद्वीप, स्वयमेव व्याप्ति करणारी व अमर्याद विकार उत्पन्न करणारी अशी आहे. ९१ ही कामरूप वेलीचा मांडव असून मोहरूप वनाचा वसंत ऋतु आहे; व ही दैवी माया या नांवानें प्रसिद्ध आहे. ९२ ही शब्दमय शास्त्राची वाढी आहे, ही निराकाराला आकार देणारी आहे, व प्रपंचाची सतत धाड घालणारी आहे. ९३ सर्व कला हिच्यापासून उत्पन्न झालेल्या असून, सर्व विद्याही हिनेंच केलेल्या आहेत; आणि इच्छा, ज्ञान व क्रिया यांसही हीच व्यायली आहे. ९४ ही नादाची (छंदाची) टांकसाळ आहे; ही चमत्कारांचें घर आहे. फार काय सांगावें ! हा सर्व खेळ हिचाच आहे. ९५ जगाची उत्पत्ति आणि प्रळय

लयो होत । ते इयेचे सायंप्रात । हें असो अद्भुत । मोहन हे ९६ हे अद्व-
याचें दुसरें । हे निःसंगाचें सोयरें । हें निराळेंसि घरें । नांदतु असे ९७ इयेतें
येतुलावरी । सौभाग्यव्याप्ती थोरी । ह्मणोनि तया आवरी । अनावरातें ९८ त-
याच्या तंव ठायीं । निपटूनि कांहींचि नाहीं । कीं तया आघवेंही । आपणचि
होय ९९ तया स्वयंभाची संभूतीं । तया अमूर्ताची मूर्ती । आपण होय स्थिती ।
ठावो तया १००० तया अनार्ताची आर्ती । तया पूर्णाची तृप्ती । तया अकु-
ळाची जाती । गोत होय १ तया अचर्चाचें चिन्ह । तया अपाराचें मान । तया
अमनस्काचें मन । बुद्धी ही होय २ तया निराकाराचा आकारु । तया निर्व्या-
पाराचा व्यापारु । निरहंकाराचा अहंकारु । होऊनि ठाके ३ तया अनामाचें
नाम । तया अजाचें जन्म । आपण होय कर्म । क्रिया तया ४ तया निर्गुणाचे
गुण । तया अचरणाचे चरण । तया अश्रणाचें श्रवण । अचक्षूचे चक्षु ५ तया
भावातीताचे भाव । तया निरवयवाचे अवयव । किंबहुना होय सर्व । पुरु-
षाचें हे ६ ऐसेनि इया प्रकृती । आपुलिया सर्व व्याप्ती । तया अविकारातें वि-
कृती- । माजी कीजे ७ तेथ पुरुषत्व जें असे । तें इये प्रकृतिदशे । चंद्रमा अं-
वसे । पडिला जैसा ८ विदळ बहु चोखा । मीनालिया वाला एका । कसु होय
पांचका । जयापरी ९ कां साधूतें गोंधळी । संचरोनि सुये मैळीं । नाना सुदि-
नाचा आभाळीं । दुर्दिनु कीजे १०१० जेवीं पय पशूच्या पोटीं । कां वन्हि
जैसा काष्ठीं । गुंडूनि घेतला पटीं । रत्नदीपु ११ राजा पराधीनु जाहला । कीं
सिंहु रोगें रुंधला । तैसा पुरुष प्रकृतीं आला । स्वतेजा मुके १२ जागता नरु
सहसा । निद्रा पीडूनि जैसा । स्वप्नींचिया सोसा । वश्यु कीजे १३ तैसें प्र-
कृति जालेपणें । पुरुषा गुण भोगणें । उदास अंतुरीगुणें । आतुडे जेवीं १४
तैसें अजा नित्या होये । आंगीं जन्ममृत्यूचे घाये । वाजती जैं लाहे । गुण-
संगातें १५ परि तें ऐसें पंडुसुता । तातलें लोह पिटितां । जेवीं वन्हीसीचि घाता ।
बोलती तया १६ कां आंदोळलिया उदक । प्रतिमा होय अनेक । तें नानात्व
म्हणती लोक । चंद्रीं जेवीं १७ दर्पणाचिया जवळिका । दुजेपण जैसें ये मुखा ।
कां कुंकुमें स्फटिका । लोहितत्व ये १८ तैसा गुणसंगमें । अजन्मा हा जन्मे ।
पावतु ऐसा गमे । एऱ्हवीं नाहीं १९ अधमोत्तम योनी । यासि ऐसिया मानी ।
जैसा संन्यासी होय स्वप्नीं । अंत्यजादि जाती १०२० ह्मणोनि केवळा पुरुषा ।

जे होतात ते हिचे सायं-प्रातः काल होत. हें असो; ही जगाला अद्भुत मोह घालणारी आहे. ९६ ही अद्वयाची दुसरी मूर्ति आहे; ही संगरहिताची सोबतीण आहे; आणि हिचें वास्तव्य शून्यांत असून त्या ठिकाणीं ही नांदते. ९७ याप्रमाणें हिच्या सौभाग्याचा महिमा आहे. म्हणूनच अनावर असें जें ब्रह्म त्याला ही आंवरते. ९८ वस्तुतः ब्रह्माचे ठिकाणीं कोणतेच विकार नाहींत; परंतु त्याचे ठिकाणीं ही आपण स्वतः विकार बनते. ९९ त्या स्वयंभूला उत्पत्ति, त्या निराकाराला आकार, स्थिति व ठिकाण आपणच बनते. १००० त्या इच्छारहिताची इच्छा, त्या पूर्णाची तृप्ति, त्या कुलरहिताची जात व गोतही आपणच होते १ त्या अवर्णनीयाचें लक्षण, त्या अपाराचें प्रमाण, आणि अमनस्काचें मन व बुद्धिही आपणच होते. २ त्या निराकाराचा आकार, निर्व्यापाराचा व्यापार, व निरहंकाराचा अहंकारही आपणच होऊन रहाते.३ त्या नामरहिताचें नांव, व त्या जन्मरहिताचे जन्म आणि कर्म व क्रिया आपणच होऊन रहाते.४ त्या निर्गुणाचे गुण, त्या आचरणाचे चरण, त्या अश्रवणाचे कान व अचक्षूचे नेत्र आपण होऊन रहाते. ५ त्या भावातीताचे भाव, निरवयवाचे अवयव, किं बहुना माया आपण स्वतःच पुरुषाचे सर्व विकार बनते. ६ याप्रमाणें प्रकृती आपल्या सामर्थ्यानें त्या अविकारी ब्रह्माला विकारवश करते. ७ ज्याप्रमाणें आमावास्येच्या दिवशीं चंद्राचें तेज लोपतें, त्याप्रमाणें ब्रह्माचें तेज या प्रकृतीच्या पुढें पडत नाहीं. ८ उत्तम प्रकारच्या सोन्यांत जर वालभर अन्य धातु मिसळली, तर त्या सर्व सोन्याचा कस जसा कमी लागतो, ९ अथवा सदाचारी मनुष्यही संध्याकाळीं अपवित्र जागेंत गेला असतां त्यास पिशाचबाधा होऊन तो जसा वेडा होतो; अथवा ढग जसे दोन प्रहरच्या वेळीं स्वच्छ आकाशांत निबिड अंधकार करून सुदिनाचा दुर्दिन करतात: १०१० ज्याप्रमाणें गाईचे पोटांत दूध किंवा लांकडांत अग्नि असतो, अथवा उत्तम रत्नाचें तेज वस्त्रांत गुंडाळून घेतल्यावर बाहेर पडत नाहीं; ११ राजा पराधीन झाल्यावर किंवा सिंह रोगग्रस्त झाल्यावर ज्याप्रमाणें त्याचें तेज लोपतें. त्याप्रमाणें, पुरुष प्रकृतीच्या अधीन झाल्यावर त्याचें तेज पडत नाहीं. १२ झोंप जशी जागृत अवस्थेंत असलेल्या पुरुषाला तो निजल्यावर सहज स्वप्नांतील सुखदुःख भोगावयास लावते. १३ त्याप्रमाणें, प्रकृतीच्या आधीन झाल्यामुळें पुरुषाला गुण भोगावे लागतात. ज्याप्रमाणें उदासीन पुरुष असला तरी स्त्रीच्या अधीन झाला म्हणजे तिच्या नादानें अगदींच वेडा होऊन जातो, १४ त्याप्रमाणें, तें ब्रह्म अज आणि नित्य आहे, तरी तें प्रकृतीच्या अधीन होऊन त्याला गुणसंग झाला म्हणजे जन्ममृत्यूचे घाव सोसावे लागतात. १५ परंतु अर्जुना, हें कसें आहे म्हणशील, तर तापलेल्या लोखंडावर घाव घालतेवेळीं ते घाव अग्नीवर बसतात असें लोक म्हणतात; १६ किंवा पाणी हाललें म्हणजे त्यांत चंद्राचीं अनेक बिंबें दृष्टीस पडतात; व त्यायोगें लोक चंद्राचे ठिकाणीं अनेकत्व कल्पितात; १७ आरशांत तोंड पाहिल्यावर ज्याप्रमाणें दोन तोंडें दृष्टीस पडतात, किंवा कुंकुवावर स्फाटिक मणि ठेविला म्हणजे तो लाल दिसतो, १८ त्याप्रमाणें, गुणांच्या संगतीनें, जन्मरहित जो पुरुष तो जन्म घेतो असें वाटतें; परंतु खरोखर पाहूं गेलें असतां तशी गोष्ट नाहीं. १९ पुरुष उत्तम व वाईट योनींत जन्म घेतो असें वाटतें, पण ज्याप्रमाणें संन्यासी हा स्वप्नांत आपण अंत्यजादि जातींत प्रविष्ट झालों आहों असें पहातो, पण तें सत्य नसतें; त्याप्रमाणें असें वाटणें हा केवळ भास होय.१०२०

नाहीं होणें भोगणें देखा । येथ गुणसंगुचि अशेखा- । लागी मूळ २१

उपद्रष्टाऽनुमंता च भर्ता भोक्ता महेश्वरः । परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन्पुरुषः परः ॥२२॥

हा प्रकृतिमाजीं उभा । परि जुई जैसा वोथंवा । इया प्रकृति पृथ्वीनभा । तेतुला पाडु २२ प्रकृतिसरितेच्या तटीं । मेरु होय हा किरीटी । माजि बिंबे परी लोटी । लोटों नेणें २३ प्रकृति होय जाये । हा तो असतुचि आहे । ह्मणोनि आब्रह्माचें होये । शासन हा २४ प्रकृति येणें जिये । याचिया सत्ता जग विये । इयालागीं इये । वरपेतु हा २५ अनंतें काळें किरीटी । जिया मिळति इया सृष्टी । तिया रिगती ययाच्या पोटीं । कल्पांतसमयीं २६ हा महद्ब्रह्मगोसावी । ब्रह्मगोल लाघवी । अपारपणें मवी । प्रपंचातें २७ पैं या देहामाझारीं । परमात्मा ऐसी जे परी । बोलिजे ते अवधारीं । ययातेंचि २८ अगा प्रकृतिपरौता । एकु आथी पंडुसुता । ऐसा प्रवादु तो तत्त्वता । पुरुषु हा पैं २९

य एवं वेत्ति पुरुषं प्रकृतिं च गुणैः सह । सर्वथा वर्तमानोऽपि न स भूयोऽभिजायते ॥२३॥

जो निखिळपणें येणें । पुरुषा यया जाणे । आणि गुणाचें करणें । प्रकृतीचें तें १०३० हें रूप हे छाया । पैल जळ हे माया । ऐसा निवाडु धनंजया । जेवीं कीजे ३१ तेणें पाडें अर्जुना । प्रकृतिपुरुषविवंचना । जयाचिया मना । गोचर जाहली । ३२ तो शरीराचेनि मेळें । करू कां कर्में सकळें । परि आकाश धुई न मैळे । तैसा असें ३३ आथिलेनि देहें । जो न घेपे देहमोहें । देह गेलिया नोहे । पुनरपि तो ३४ ऐसा तया एकु । प्रकृतिपुरुषविवेकु । उपकारु अलौकिकु । करीं पैं गा ३५ परि हाचि अंतरीं । विवेक भानूचियापरी । उदैजे ते अवधारीं । उपाय बहुत ३६

ध्यानेनात्मनि पश्यंति केचिदात्मानमात्मना । अन्ये सांख्येन योगेन कर्मयोगेन चाऽऽपरे २४

कोणी एकु सुभटा । विचाराचा आगिटा । आत्मानात्माकिटा । पुटें देउनी ३७ छत्तीसही वानी भेद । तोडोनियां निर्विवाद । निवडिती शुद्ध । आपणपें ३८ तया आपणपयाच्या पोटीं । आत्मध्यानाचिया दिठी । देखती गा किरीटी । आपणपेंचि ३९ आणिक पैं दैवबगें । चित्त देती सांख्ययोगें । एक ते अंगलगें । कर्माचेनि १०४०

अन्ये त्वेवमजानंतः श्रुत्वाऽन्येभ्य उपासते । तेऽपि चातितरंत्येव मृत्युं श्रुतिपरायणाः ॥२५॥

ह्मणून, जो पुरुष, त्याला जन्ममृत्यु हे भोगावे लागत नाहींत; परंतु तसें वाटतें याला सर्व कारणें, प्रकृतीच्या गुणांची संगत होय. २१

अन्वय–उपद्रष्टा, अनुमंता, भर्ता, भोक्ता, महेश्वरः अपि च परमात्मा इति उक्तः परः पुरुषः अस्मिन् देहे अस्ति) २०

अर्थ–साक्षिभूत, प्रवृत्तीला अनुकूल असणारा, धारण करणारा, उपभोग घेणारा, परमेश्वर, आणि ज्याला परमात्मा असें म्हटलें आहे, असा श्रेष्ठ पुरुष या देहामध्यें विद्यमान आहे. ॥ २२ ॥

हा पुरुष प्रकृतीचे ठिकाणीं आहे; पण जुईच्या झाडाला टेंका देण्याकरितां उभा केलेला खांब ज्याप्रमाणें त्या झाडाच्या सर्व विकारांपासून अलिप्त असतो, त्याप्रमाणें अलिप्त आहे; आणि प्रकृतींत व यांत जमीन अस्मानाचें अंतर आहे, २२ अर्जुना, हा प्रकृतिरूप नदीच्या तीरावर मेरु पर्वताप्रमाणें अचल उभा असतो, आणि याचें प्रतिबिंब जरी नदींत पडलेलें असतें, तरी तिच्या प्रवाहानें हा वाहून जात नाहीं. २३ प्रकृति उत्पन्न होते व लयही पावते; तथापि हा कायमच असतो, ह्मणून सर्व जगताचा हा शास्ता आहे. २४ प्रकृति याचे योगानें वांचते व याच्याच सत्तेनें ती जग निर्माण करिते, ह्मणून हा प्रकृतीचा भर्ता होय. २५ हे किरीटी, अनंत कालापासून चालत आलेली सृष्टि कल्पांतसमयीं याचे ठिकाणीं लय पावते. २६ हा प्रकृतीचा स्वामी आहे; व या ब्रह्मांडाचा सूत्रधार असून आपल्या थोरपणानें प्रपंचाला आजमावणारा आहे; २७ व या देहांत परमात्मा ह्मणून जो ह्मणतात, तो हाच होय, असें समज. २८ हे पांडुसुता, प्रकृतीच्या पलीकडे एक पुरुष आहे असें जें ह्मणतात, तो खरोखर हा होय. २९

अन्वय–यः एवं पुरुषं गुणैः सह प्रकृतिं च वेत्ति, सः सर्वथा वर्तमानः अपि भूयः न अभिजायते. ॥ २३ ॥

अर्थ–जो याप्रमाणें परमात्म्याला आणि गुणांसह प्रकृतीला जाणतो, तो सर्व प्रकारांनीं कर्मे करीत असला तरी पुनः जन्म पावत नाहीं. ॥ २३ ॥

जो या पुरुषाला याप्रमाणें पूर्णपणें जाणतो, आणि तसेंच, सर्व गुण व कर्मे प्रकृतीचीं आहेत हें जाणतो; १०३० हे धनंजया, हें रूप, ही छाया, हें पलीकडील सत्य जल, व हें पलीकडील मृगजल असा निश्चय त्याप्रमाणें शहाणा मनुष्य करितो. ३१ त्याप्रमाणें अर्जुना, ज्यानें आपले मनाचीं प्रकृति व पुरुष यांच्या स्वरूपाचा यथार्थ विचार त्याच्या मनाला कळला आहे, ३२ तो शरीरानें जरी सर्व कर्मे करीत असला, तरी आकाश जसें फूल उंच उडाल्यानें मळत नाहीं, तसा तो प्रकृतीच्या कर्मानें लिप्त होत नाहीं. ३३ जिवंतपणीं जो देहाच्या मोहांत पडून प्रकृतीच्या आधीन होत नाहीं, तो देह गेल्यावर पुनः जन्म पावत नाहीं, ह्मणजे जन्ममरणापासून मुक्त होतो. ३४ अशा तऱ्हेचा अलौकिक उपकार प्रकृतिपुरुषांच्या यथार्थ विचारापासून होतो. ३५ आतां, अंतःकरणामध्यें हाच विचार सूर्याप्रमाणें उदय करून देतील असे उपाय पुष्कळ आहेत, ते ऐक. ३६

अन्वय केचित् ध्यानेन आत्मनि आत्मानं पश्यंति; अन्ये सांख्येन योगेन आत्मानं पश्यंति ; अपरे च कर्मयोगेन आत्मानं पश्यंति). ॥ २४ ॥

अर्थ–कोणी ध्यानाच्या योगानें शुद्ध झालेल्या मनानेंच आपल्या ठिकाणीं आत्म्याला पाहतात; कोणी सांख्य विचारानें, आणि कोणी कर्मयोगानें आपल्या ठिकाणीं आत्म्याला पाहतात. ॥ २४ ॥

हे सुभटा, कोणी विचाररूप शेगडींत श्रवणमननिदिध्यासरूपी पुटें देऊन आत्म्यावरील अनात्मरूप किडाळ काढून टाकून आत्मरूप सुवर्ण शुद्ध करतात; ३७ छत्तीस भेदरूपी हिणकस जाळून आपलें शुद्ध तत्त्व निवडून घेतात; ३८ मग, अर्जुना, त्या आत्मस्वरूपाचे पोटांत आत्मज्ञानाच्या दृष्टीनें आत्मस्वरूप पहातात; ३९ आणि कोणी भक्तीमार्गानें, कोणी विचाराच्या योगानें व कोणी कर्मयोगाचे आधारानें आत्मस्वरूपाची ओळख करून घेतात. १०४०

अन्वय–अन्ये तु एवम् अजानंतः अन्येभ्यः श्रुत्वा उपासते, ते श्रुतिपरायणः च अपि मृत्युं अतितरंति एव. ॥२५॥

अर्थ–पण, याप्रमाणें ज्यांना आत्म्याचें ज्ञान नाहीं असे दुसरे लोक गरुमुखानें आत्म्याचें ज्ञान ऐकून आत्म्याची उपासना करितात; व ते श्रवणानुरूप उपासना करणारेही जन्ममृत्यु तरून जातात. ॥ २५ ॥

येणें येणें प्रकारें। निस्तरती साचोकारें । हें भवभिउरें। आघवेंचि ४१ परि ते करिती ऐसें । अभिमानु दवडूनि देशें। एकाचिया विश्वासें । टेंकती बोला ४२ जे हिताहित देखती । हानि कणवा घेपती। पुसोनि शिणु हरिती। देती सुख ४३ तयांचेनि मुखें जें निघे। तेतुलें आदरें चांगें। ऐकोनियां आंगें। मनें होती ४४ तया ऐकणेयाचि नांवें । ठेविती गा आघवें । तया अक्षरांसी जीवें। लोण करिती ४५ तेही अंतीं कपिध्वजा। इया मरणार्णवसमाजा-। पासूनि निघती वोजा। गोमटिया ४६ ऐसेसे हे उपाये । बहुवस एथें पाहें। जाणावया होये । एकी वस्तु ४७ आतां पुरे हें बहुत। पैं सर्वार्थांचें मथित। सिद्धांतनवनीत । देऊं तुज ४८ येतुलेनि पंडुसुता । अनुभव लाहाणा आयिता। येर तंव तुज होतां । सायास नाहीं ४९ म्हणोनि बुद्धि रचूं। मतवाद हे खांचूं। सोलींव निर्वचूं। फालितार्थुचि १०५०

यावत्संजायते किंचित्सत्त्वं स्थावरजंगमम् । क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगात्तद्विद्धि भरतर्षभ ॥२६॥

तरी क्षेत्रज्ञ येणें बोलें। तुज आपणपें जें दाविलें । आणि क्षेत्रही सांगितलें । आघवें जें ५१ तया येरयेरांच्या मेळीं । होइजे भूतीं सकळीं । अनिलसंगें सलिलीं। कल्लोळ जैसे ५२ कां तेजा आणि उखरा। भेटी जालिया वीरा। मृगजळाचिया पूरा। रूप होय ५३ नाना धाराधरधारीं। झळंबलिया वसुंधरीं। उठिजे जेवीं अंकुरीं । नानाविधीं ५४ तैसें चराचर आघवें । जें कांहीं जीवु नांवें । तें तों उभययोगें संभवे। ऐसें जाण ५५ इयालागीं अर्जुना। क्षेत्रज्ञा प्रधाना । पासूनि न होती भिन्ना। भूतव्यक्ति ५६

समं सर्वेषु भूतेषु तिष्ठंतं परमेश्वरम् । विनश्यत्स्वविनश्यंतं यः पश्यति स पश्यति ॥२७॥

पैं पटत्व तंतु नव्हे। तरि तंतूसीचि तें आहे। ऐसें खोलीं डोळां पाहें। ऐक्य हें गा ५७ भूतें आघवींचि होतीं । एकाचीं एक आहाती । परी तूं प्रतीती । यांची घे पां ५८ ययांची नामेंही आनानें। अनारिसीं वर्तनें। वेषही सिनानें। आघवेयांचे ५९ ऐसें देखोनि किरीटी। भेद सूसी हन पोटीं। तरि जन्माचिया कोटी । न लाहसी निघों १०६० पैं नानाप्रयोजनशीळें। दीर्घें वक्रें वर्तुळें। होती एकीचींच फळें । तुंबिणीयेचीं ६१ होतु कां उजू वांकुडे । परि बोरीचे हें न मोडे । तैसीं भूतें अवघडें । परि वस्तु उजू ६२ अंगारकणीं बहुवसीं। उष्णता समान जैसी। तैसा नाना जीवराशी। परेशु असे ६३ गगनभरी घारा।

अशा प्रकारानें खरोखर या संसाररूप सागरांतून सर्व तरून जातात. ४१ पण ते असें करितातः कोणी अभिमान टाकून श्रद्धेनें एकाच्या शब्दावर विश्वास ठेवतात. ४२ कोणाच्या शब्दावर विश्वास ठेवतात असें म्हणशील तर-जे पुरुष प्राणिमात्राचें हित कशांत आहे व अहित कशांत आहे हें यथार्थ जाणतात, आणि कळकळीनें ज्यांची ज्यांत हानि असेल ती आपण होऊन विचारून नाहींशी करितात. व त्यास सुख देतात. ४३ मग त्या पुरुषाच्या मुखांतून जे जे शब्द निघतील त्यांचा उत्तम रीतीनें आदर करून श्रवण केल्यावर, आपलें तनमन त्याचे ठिकाणीं अर्पण करितात. ४४ आणि त्या श्रवण करण्यालाच दान, धर्म, तप इत्यादि नांवें ठेवतात, फार काय सांगावें, त्याच्या मुखांतून निघणाऱ्या अक्षरावरून जीवाचें निंबलोण उतरून टाकतात. ४५ हे कपिध्वजा, अशा रीतीनें जे वागतात, ते अंतीं हा मृत्युरूप समुद्रांतून उत्तम प्रकारें पार पडतात. ४६ याप्रमाणें ब्रह्मवस्तु जाणण्याचे या मृत्युलोकीं पुष्कळ मार्ग आहेत. ४७ पण आतां हे बहुत उपाय राहूं दे. त्या सगळ्यांचें मंथन करून सिद्धांतरूप नवनीत तुला देतों. ४८ त्यामुळें अर्जुना, तुला सहज अनुभव येऊन ब्रह्मरूप होण्यास श्रम पडणार नाहींत, ४९ म्हणून मतवाद्यांचें खंडन करून सिद्धांत ठरवून केवळ शुद्धतत्त्व तुला सांगतों. १०५०

अन्वय—भरतर्षभ, यावत् किंचित् स्थावरजंगमं वा संजायते, तत् क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगात् (संजायते इति त्वं विद्धि. ॥ २६ ॥

अर्थ—हे भरतश्रेष्ठा स्थावर अथवा जंगम असा जो कोणताही प्राणी उत्पन्न होतो तो क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांच्या संयोगानें उत्पन्न होतो, असें तूं समज. ॥ २६ ॥

तरी 'क्षेत्रज्ञ' या शब्दानें जें तुला आम्हीं दाखविलें, आणि 'क्षेत्र' म्हणून जें सर्व कांहीं सांगितलें, ५१ त्या परस्परांच्या ऐक्यापासून या सर्व सृष्टीची उत्पत्ति होते; वाऱ्याच्या संयोगानें ज्याप्रमाणें उदकांत लाटा उत्पन्न होतात; ५२ किंवा, हे वीरा, नाळ जमिनीवर सूर्यकिरण पडल्यावर जशा मृगजलाच्या लाटांवर लाटा निर्माण होतात; ५३ अथवा पावसाच्या धारा पृथ्वीवर पडल्यावर ज्याप्रमाणें कोठ्यावधि अंकूर जमिनीवर उत्पन्न होतात, ५४ त्याप्रमाणें, सर्व चराचर—ज्याला मिळून 'जीव' असें नांव आहे, तें या दोघांच्या संयोगापासून उत्पन्न होतें, असें समज. ५५ यास्तव, अर्जुना, पुरुष व प्रकृति यांहून भूतव्यक्ति भिन्न नाहींत. ५६

अन्वय—समं सर्वेषु भूतेषु तिष्ठंतं अविनश्यंतं परमेश्वरं पश्यति, सः पश्यति. ॥ २७ ॥

अर्थ—जो नाशरहित अशा सर्व भूतांच्या ठिकाणीं सारखेपणानें राहणारा आणि नाश न पावणारा परमेश्वर आहे असें जाणितो, तोच खरा ज्ञानी होय. ॥ २७ ॥

हें पहा—वस्त्र हें जरी तंतु नव्हे, तरी ते तंतूंचेच केलेलें आहे; याप्रमाणें जो पूर्ण दृष्टि देऊन पुरुष आणि प्रकृति यांच्यामधील ऐक्य पहातो; ५७ हीं सर्व भूतें एकापासून एक निर्माण झालेलीं आहेत; पण तूं यांचा अनुभव असा घे; ५८ त्याचप्रमाणें यांचीं नांवें निरनिराळीं असून, वर्तनहीं भिन्न असतें; आणि सर्वांचे वेषही तऱ्हेतऱ्हेचे असतात, ५९ असें पाहून जर तूं मनांत अशी गांठ मारलीस कीं, आत्मा व भूतें यांचे ठिकाणीं भेद आहे. तर, अर्जुना, तूं या संसारांतून कोट्यावधि जन्मपर्यंत पार पडणार नाहींस. १०६० ज्याप्रमाणें एकाच भोंपळ्याच्या वेलाला जसजसा आधार असेल तसतसे लांब वाटोळे व वांकडे असे भोपळे येतात; ६१ बोरीचे झाडाची फांदी सरळ असो किंवा वांकडी असो, तिला बोरीचीच म्हणतात; याप्रमाणें जीवमात्र जरी वेडेवांकडे असले तरी त्यांतील आत्मा म्हणून जी वस्तु आहे ती सरळच आहे. ६२ पुष्कळ निखारे जरी असले तरी त्यांची उष्णता सारखीच असते; त्याप्रमाणें पुष्कळ जीवराशी जरी असल्या, तरी त्यांतील परमात्मा एकच आहे. ६३ वीरा अर्जुना, सर्व गगनांतून जरी पा-

परि पाणी एकचि वीरा । तैसा या भूताकारा । सर्वांगीं तो ६४ हे भूतग्राम विषम । परि वस्तु ते एथ सम । घटमठीं व्योम । जियापरी ६५ हा नाशतां भूताभासु । एथ आत्मा तो अविनाशु । जैसा केयूरादिकीं कसु । सुवर्णाचा ६६ एवं जीवधर्महीनु । जो जीवेंसीं अभिन्नु । देखे तो सुनयनु । ज्ञानियां-माजीं ६७ ज्ञानाचा डोळा डोळसा- । माजि डोळस तो वीरेशा । हे स्तुति नोहे बहुवसा । भाग्याचा तो ६८

समं पश्यन्हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम् । न हिनस्त्यात्मनात्मानं ततो याति परां गतिम् २८

हे गुणेंद्रिय धोकोटी । देह धातूंची त्रिकुटी । पांचमेळावा वोखटी । दारुण हे ६९ हे उघड पांचवेउली । पंचधा आगी लागली । जीवपंचानना सांपडली हरिणकुटी हे १०७० ऐसा असोनि इये शरीरीं । कोण नित्यबुद्धीची सुरी । अ-नित्यभावाच्या उदरीं । दाटीजिना ७१ परि इये देहीं असतां । जो नयेचि आ-पणया घाता । आणि शेखीं पंडुसुता । तेथेंचि मिळे ७२ जेथ योगज्ञानाचिया प्रौढी । वोलांडूनियां जन्मकोडी । न निगों इया भाषा बुडी । देती योगी ७३ जें आकाराचें पैल तीर । जें नादाची पैल मेर । तुर्येचें माजघर । परब्रह्म जें ७४ मोक्षासकट गती । जेथें येती विश्रांति । गंगादि अपांपती । सरिता जेवीं ७५ तें सुख येणेंचि देहें । पाय पाखाळणिया लाहे । जो भूतवैषम्यें नोहे । विषम-बुद्धी ७६ दीपांचिया कोडीं जैसें । एकचि तेज सारिसें । तैसा जो असतचि असे । सर्वत्र ईशु ७७ ऐसेनि समत्वें पंडुसुता । जिये जो देखत साता । तो मरणा आणि जीविता । नागवे फुडा ७८ ह्मणोनि तो दैवागळा । वानीत असों वेळोवेळां । जे साम्यसेजे डोळा । लागला तया ७९

प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः । यः पश्यति तथात्मानमकर्तारं स पश्यति ॥२९॥

आणि मनोबुद्धिप्रमुखें । कर्मेंद्रियें अशेखें । करी प्रकृतीचि हें देखे । साचें जो गा १०८० घरींची राहटती घरीं । घर कांहीं न करी । अभ्र धांवे अंबरीं । अंबर तें उगें ८१ तैसी प्रकृति आत्मप्रभा । खेळे गुणीं विविधारंभा । येथ आत्मा तो बोथंबा । नेणे कोण ८२ ऐसेनि येणें निवाडें । जयाच्या जीवीं उजिवडें । अकर्तयातें फुडें । दोखिलें तेणें ८३

वसाच्या धारा पडत असल्या, तरी त्यांतील पाणी एकच अहे; त्याप्रमाणें, हे भूतांचे आकार जरी निरानिराळे असले तरी सर्वांचे ठिकाणीं परमात्मा ह्मणून जो आहे तो एकच आहे. ६४ घट अथवा मठ यांमधील आकाश जरी निराळ्या आकाराचें असलें, तरी तें आकाशरूपानें एकच असतें; त्याप्रमाणें, भूतें जरी निराळीं असलीं, तरी त्यांतील आत्मा ह्मणून जी वस्तु आहे ती एकच आहे ६५ सुवर्णाचे बाहुभूषणें इत्यादि अलंकार जरी पुष्कळ असले, तरी सर्वांतील सोन्याचा कस एकच असतो; त्याप्रमाणें, भूतांचा भास नाशवंत असून त्या सर्वांतील आत्मा हा अविनाशी आहे. ६६ याप्रमाणें व्यावहारिक जीवधर्मांहून वेगळा आणि पारमार्थिक जिवाशीं अभिन्न असा परमात्मा आहे असें ज्ञानी लोकांत जो बघतो, तोच उत्तम डोळस होय. ६७ ज्ञानाच्या डोळ्यामुळें जे डोळस आहेत, त्यांच्यांतीलही हा मुख्य डोळस होय. अर्जुना, ही त्याची स्तुति करितों असें समजूं नको. फार काय सांगू, परमभाग्यवान पुरुष तोच. ६८

अन्वय– यः) सर्वत्र समवस्थितम् ईश्वरं समं पश्यन् आत्मन आत्मानं न हिनस्ति (सः ; ततः परां गतिं याति. २८

अर्थ–सर्व भूतांचे ठिकाणीं परमात्मा समदृष्टीनें आहे असें पाहून जो आपल्या आत्मस्वरूपाचा नाश करीत नाहीं, तो उत्तम गतीस पोहोंचतो. ॥ २८ ॥

हें शरीर ह्मणजे गुण व इंद्रियें यांची धोकटी आहे; वात, पित्त व कफ या धातूंनीं हें भरलेलें आहे वाईट अशा पंचतत्त्वांनीं बनलेलें असून हें बलवान आहे; ६९ हें उघड उघड पांच नांग्यांची इंगळीच होय; याला पांच प्रकारचे अग्नि लागले आहेत, व जीवरूप सिंहाला शरीररूपी हरिणाचें खोपट सांपडलें आहे. वास्तविक सिंहाला ज्याप्रमाणें हरिणाच्या कोपटीचा नाश करून टाकण्यास कांहींच प्रयास नाहीं, त्याप्रमाणें जीवानें अनित्य शरिरादिकांचा नाश करून टाकण्यास कांहींच अडचण नाहीं, तथापि काय चमत्कार सांगावा! कोणीही त्याच्या नित्यभावाची सुरी अनित्य जे देहादिक यांच्या पोटांत घालून नाश करीतच नाहींत. १०७०।७१ तथापि अर्जुना, जो ज्ञानी आहे, तो या देहांत असूनही आपला घात करून न घेतां शेवटीं ब्रह्मपदालाच जाऊन मिळतो. ७२ ज्या पदाला योगज्ञानाच्या द्रौढीनें कोट्यवधि जन्म ओलांडून 'पुनः जन्म घेणार नाहीं' असें ह्मणून या ठिकाणीं योगी लोक वुडी देतात; ७३ तें ठिकाण शोभणें ह्मणशील तर, जें आकाराच्या व नाडाच्या पलीकडील व तूर्येचें जें मध्यवर, ज्याला परब्रह्म असें ह्मणतात; ७४ आणि गंगादि नद्या समुद्राला जाऊन विश्रांति पावतात, त्याप्रमाणें मोक्षासहवर्तमान सर्व गती ज्या ठिकाणीं विश्रांतीला येतात. ७५ अशा तन्हेचें सोय ज्या पुरुषांना भूतांच्या ठिकाणीं सत्यत्वेंकरून विषम बुद्धि नाहीं त्या पुरुषास याच देहामध्यें पाय धुण्यास मिळतें. ७६ पुष्कळ दिवे जरी असले, तरी त्या सर्वांचें तेज एकच असतें; याप्रमाणें, पूर्वीपासून अनादि असा जो परमात्मा, तो सर्वत्र भरलेला आहे. ७७ हे पांडुसुता, याप्रमाणें ज्याचें जीव व आत्मा याविषयीं समत्व आहे, तो जन्ममरणांच्या सपाट्यांत सांपडत नाहीं. ७८ जो साम्यरूप बिछान्यावर स्वस्थ निजला आहे, म्हणून त्याचें भाग्यवान् असें वरचेवर वर्णन करितो, ७९

अन्वय–यः च प्रकृत्या एव कर्माणि सर्वशः क्रियमाणानि (संति इति) पश्यति, तथा आत्मानं अकर्तारं पश्यति, सः पश्यति.

अर्थ–प्रकृतीच्या योगानेंच सर्व प्रकारें कर्में कलीं जातात, आणि आत्मा हा कर्ता नाहीं असें जो पाहतो, तोच खरा ज्ञानी होय. ॥ २९ ॥

आणि मन, बुद्धि इत्यादि पांच कर्मेंद्रियें यांचेपासून होणारीं कर्में हीं प्रकृतीचीं कर्में होत, असें पूर्णपणें जाणतो. १०८० घरांतील रहाणारीं माणसें सर्व व्यापार करतात, परंतु घर कांहींएक करीत नाहीं; तसेंच आकाश तट्ट धांवतांना दृष्टीस पडले, तरी आकाश ज्याप्रमाणें स्थिर असतें, ८१ त्याप्रमाणें प्रकृति आत्म्याचे प्रकाशानें गुणांनीं युक्त होऊन पुष्कळ खेळ खेळते, तथापि आत्मा हा खांबाप्रमाणें अचल असून तिनें केलेलें कर्म जाणीत नाहीं. ८२ याप्रमाणें अनुभव घेऊन ज्यानें आपल्या हृदयांत प्रकाश पाडला आहे, त्यानें अकर्त्या आत्म्याला पूर्णपणें जाणलें, असें समज. ८३

यदा भूतपृथग्भावमेकस्थमनुपश्यति । तत एव च विस्तारं ब्रह्म संपद्यते तदा ।३०॥

एऱ्हवीं तैंचि अर्जुना । होईजे ब्रह्मसंपन्ना । जैं या भूताकृती भिन्ना । दिसती एकी ८४ लहरी जैसिया जळीं । परमाणुकणिका स्थळीं । रश्मीकरमंडळीं । सूर्याच्या जेवीं ८५ नातरी देहीं अवेव । मनीं आधवेचि भाव । विस्फुलिंग सावेव । वन्हीं एकीं ८६ तैसे भूताकार एकाचे । हें दिठी रिगे जैं साचे । तैंचि ब्रह्मसंपत्तीचें । तारूं लागे ८७ मग जया तया कडे । ब्रह्मेंचि दिठी उघडे । किंबहुना जोडे । अपार सुख ८८ येतुलेनि तुज पार्था । प्रकृतिपुरुषव्यवस्था । ठायें ठावो प्रतिपथा- । माजीं जाहलीं ८९ अमृत जैसें ये चुळा । कां निधान देखिजे डोळां । तेतुला जिव्हाळा । मानावा हा १०९० जी जाहलिये प्रतीती । घर बांधणें जें चित्तीं । तें आतां ना सुभद्रापती । इयावरी ९१ तरि एक दोन्ही ते बोल । बोलिजती सखोल । देईं मनातें वोल । मग तें घेईं ९२ ऐसें देवें म्हणितलें । मग बोलों आदरिलें । तेथें अवधानाचेंचि केलें । सर्वांग येरें ९३

अनादित्वान्निर्गुणत्वात्परमात्माऽयमव्ययः । शरीरस्थोऽपि कौंतेय न करोति न लिप्यते ॥३१॥

तरि परमात्मा म्हणिपे । तो ऐसा जाण स्वरूपें । जळीं जळें न लिंपे । सूर्यु जैसा ९४ कां जे जळा आदीं पाठीं । तो असतुचि असे किरीटी । माजि बिंबे तें दृष्टी । आणिकांचिये ९५ तैसा आत्मा देहीं । आथि म्हणिपे हें कांहीं । साचें तरी नाहीं । तो जेथिंचा तेथें ९६ आरिसां मुख जैसें । बिंबालिया नाम असे । देहीं वसणें तैसें । आत्मतत्त्वा ९७ तया देहा म्हणती भेटी । हे सपायी निर्जिव गोठी । वारिया वाळुवे गांठी । केंही आहे ९८ आगी आणि कापुसा । दोरा सुवावा कैसा । केउता सांदा आकाशा । पाषाणेंसीं ९९ एक निघे पूर्वेकडे । एक तें पश्चिमेकडे । तिये भेटीचेनि पाडें । संबंधु हा ११०० उजियेडा आणि अंधारेया । जो पाडु मृता उभया । तोचि गा आत्मया । देहा जाण १ रात्री आणि दिवसा । कनका आणि कापुसा । अपाडु कां जैसा । तैसाचि यासी २ देह तंव पांचांचें जालें । हें कर्माचे गुणीं गुंथलें । भवंतसें चाकीं सूदलें । जन्ममृत्यूच्या ३ हें काळानळाच्या तोंडीं । घातली लोणियाची उंडी । माशी पांखुं पाखडी । तंव हें सरे ४ हें विपायें आगींत पडे । तरि भस्म हो-

अन्वय यदा भूतपृथग्भावं एकस्थं च ततः एव च विस्तारं अनुपश्यति तदा ब्रह्म संपद्यते ॥ ३० ॥

अर्थ–जेव्हां मनुष्य सर्व भूतांचा वेगळेपणा एका परमेश्वराचे ठिकाणीं पहातो, आणि परमेश्वरापासूनच या जगाचा विस्तार झाला आहे असें जाणतो तेव्हां तो ब्रह्मसंपन्न होतो. ॥ ३० ॥

अर्जुना, ज्या वेळेस भिन्न भिन्न असलेलीं भूतें एकरूपानें पाहील त्या वेळेसच तो ब्रह्मसंपन्न झाला असें म्हणावें. ८४ ज्याप्रमाणें पाण्यावरील लाटा, किंवा जमिनीवरील परमाणूंचे कण, अथवा सूर्यमंडळातील सूर्यकिरण, ८५ अथवा देहांतील सर्व अवयव, मनांतील सर्व भाव, व विस्तारापासून निघणाऱ्या सर्व ठिणग्या, या सर्व गोष्टी आपल्या उत्पत्तिस्थानापासून भिन्न दिसल्या, तरी ज्या भूमिकेपासून त्या उत्पन्न झाल्या आहेत, त्यांच्याशीं त्या साम्यत्वानेंच असतात. ८६ त्याप्रमाणें, प्राणिमात्र एकच आत्म्यापासून उत्पन्न झाले आहेत, अशी ज्याच्या मनाची खरोखर खात्री झाली आहे, त्यालाच ब्रह्मरूप संपत्तीचें जहाज सांपडलें, असें म्हणतां येईल. ८७ मग तो जिकडे पाहील तिकडे त्याला सर्व ब्रह्ममयच दिसतें. फार काय सांगावें, त्याला अपार सुख होतें. ८८ पार्था, याप्रमाणें तुला प्रकृति व पुरुष यांची व्यवस्था अनुभवसिद्ध दाखले देऊन सांगितली, ती समजली ना? ८९ ज्याप्रमाणें अमृत हातांत यावें, किंवा ठेवा दृष्टीस पडावा, त्या योग्यतेचा हा लाभ आहे असें मान. ९० हे सुभद्रापते, या आलेल्या अनुभवावरून तूं आपलें मनांत जो एक कायम विचार करणार असशील, तो इतक्यांत करूं नको. कारण, यावर ९१ तुला आणखी एक दोन गहन विचार मी सांगणार आहें ते तूं आपलें मन मला जामीन दिल्यावर मग सांगेन. ९२ याप्रमाणें भगवंतांनीं बोलून सांगण्यास आरंभ केला, तों आपलें सर्वांग अवधानमय करून अर्जुन ऐकण्यास तयार झाला. ९३

अन्वय–कौन्तेय, अयं परमात्मा अनादित्वात्, निर्गुणत्वात्, अव्ययः अस्ति; (अतः) सः शरीरस्थः (सन्) अपि न करोति, न (च) लिप्यते. ॥ ३१ ॥

अर्थ–हे कौंतेया, हा परमात्मा अनादि व निर्गुण असल्यामुळें अविनाशी आहे; आणि यामुळें तो शरीरांत असला तरी कांहीं करीत नाहीं, व कशानेंही लिप्त होत नाहीं. ॥ ३१ ॥

ज्याप्रमाणें सूर्याचें प्रतिबिंब पाण्यांत पडलें असतां त्याजपासून अलिप्त असतें. त्याप्रमाणें, परमात्मा म्हणून ज्याला म्हणतात, तो असा-शरीरांत असूनही शुद्धस्वरूपच-असतो, असें जाण. ९४ हे किरीटी. सूर्य पाणी उत्पन्न होण्याचे अगोदर व मागूनही, पूर्वी होता त्याप्रमाणेंच कायम असतो; परंतु अज्ञानी लोकांच्या दृष्टीनें पाण्यांत दृष्टीस पडल्यावर त्यांस तें प्रतिबिंब सूर्यच भासतें; ९५ त्याप्रमाणें आत्मा देहांत आहे हें ज्ञानेंकरून खरें नसून, देह उत्पन्न होण्याचे पूर्वीपासून तो जेथें होता तेथेंच नंतरही असतो. ९६ ज्याप्रमाणें आरशांत आपलें स्वरूप आहे असा भास होतो, त्याप्रमाणें आत्मा देहांत वास करतो हें म्हणणें मिथ्या होय. ९७ ज्या देहाचा व आत्म्याचा संबंध आहे हें म्हणणें सर्वथैव व्यर्थ होय. हें पहा-वारा व वाळू यांची कधीं गांठ मारता येईल काय? कारण, एक अदृश्य व दुसरें जड वस्तु आहे. ९८ तसेंच, अग्नि आणि कापूस हीं दोन्ही दोऱ्यांत कशीं ओवतां येतील? आणि आकाश व पाषाण यांचा जोड कसा करतां येईल? ९९. एकाच ठिकाणाहून निघून एक मनुष्य पूर्वेकडे जावयास निघाला, आणि एक पश्चिमेकडे जावयास निघाला, मग त्यांची गांठ पडावी, त्याप्रमाणें हा संबंध आहे! ११०० उजेड व अंधेर, मेलेला व जिवंत मनुष्य यांच ज्याप्रमाण एकमेकांशीं संबंध नाहीं, त्याचप्रमाणें आत्मा व शरीर यांचा संबंध नाहीं, असें समज. १ रात्र व दिवस, सोनें आणि कापूस यांचा ज्याप्रमाणें संबंध नाहीं, त्याचप्रमाणें आत्मा व देह यांचा संबंध नाहीं. २. पाहूं गेलें असतां शरीर हें पंचतत्त्वांचें बनलेलें आहे, कर्माच्या दोऱ्यांत गोवलेलें आहे, व जन्ममृत्यूच्या भवचक्रांत फिरत आहे; ३ कालरूपी अग्नीच्या तोंडांत लोण्याच्या उंडी माण घातलेलें असून, माशीचा पंख हालण्यास जितका वेळ लागतो तितक्या थोड्या वेळांत हें शरीर नाहींसें होतें. ४ हा देह

ऊनि उडे । जाहलें श्वाना वरपडें । तरि ते विष्ठा ५ या चुके दोहीं काजा । तरि होय कृमींचा पुंजा । हा परिणामु कपिध्वजा । कश्मलु गा ६ या देहाची हे दशा । आणि आत्मा तो एथ ऐसा । पैं नित्य सिद्ध अपैसा । अनादिपणें ७ सकळु ना निष्कळु । अक्रियु ना क्रियाशीळु । कृश ना स्थूळु । निर्गुणपणें ८ आभासु ना निराभासु । प्रकाशु ना अप्रकाशु । अल्प ना बहुवसु । अरूपपणें ९ रिता ना भरितु । रहितु ना सहितु । मूर्तु ना अमूर्तु । शून्यपणें १११० आनंदु ना निरानंदु । एकु ना विविधु । मुक्त ना बध्दु । आत्मपणें ११ येतुला ना तेतुला । आइता ना रचिला । बोलता ना उगला । अलक्षपणें १२ सृष्टीचा होणा न रचे । सर्वसंहारें न वेंचे । आथी नाथी या दोहींचें । पंचत्व तो १३ मवे ना चर्चे । वाढे ना खांचे । विटे ना वेंचे । अव्ययपणें १४ एवंरूप पैं आत्मा । देहीं जें ह्मणती प्रियोत्तमा । तें मठाकारें व्योमा । नाम जैसें १५ तैसें तयाचिये अनुस्यूती । होती जाती देहाकृती । तो घे ना सांडी सुमती । जैसा तैसा १६ अहोरात्रें जैशीं । येती जाती आकाशीं । आत्मसत्ते तैसीं । देहे जाण १७ म्हणोनि इये शरीरीं । कांहीं करवी ना करी । आयताही व्यापारीं । सज्ज न होय १८ यालागीं स्वरूपें । उणा पुरा न घेपे । हें असो तो न लिंपे । देहीं देहा १९

यथा सर्वगतं सौक्ष्म्यादाकाशं नोपलिप्यते । सर्वत्रावस्थितो देहे तथात्मा नोपलिप्यते ॥३२॥

अगा आकाश कें नाहीं । हें न रिघेचि कवणे ठायीं । परि कायिसेनि कहीं । गादिजेना ११२० तैसा सर्वत्र सर्व देहीं । आत्मा असतुचि असे पाहीं । परी संगदोषें एकेही । लिप्त नोहे २१ पुढतपुढती एथें । हेंचि लक्षण निरुतें । जे जाणावें क्षेत्रज्ञातें । क्षेत्रविहीना २२

यथा प्रकाशयत्येकः कृत्स्नं लोकमिमं रविः । क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत ३३

संसर्गें चेष्टिजे लोहें । परि लोह भ्रामक नोहे । क्षेत्रक्षेत्रज्ञां आहे । तेतुला पाडु २३ दीपकाची अर्चीं । राहाटी वाहे घरींची । परि वेगळीक कोडीची । दीपा आणि घरा २४ पैं काष्ठाच्या पोटीं । वन्हि असे किरीटी । परि काष्ठ नोहे या दृष्टी । पाहिजे हा २५ अपाडु नभा आभाळा । रवि आणि मृगजळा । तैसाचि हाही डोळां । देखसी जरी २६ हें आघवेंचि असो एकु । गगनौनि जैसा अर्कु ।

कदाचित् अग्नींत पडला, तर त्याची राख होऊन उडून जातें, व कुत्र्याच्या तावडींत सांपडला तर त्याची विष्ठा बनते. ५ हे कपिध्वजा, या दोन प्रकारांतून जर देह चुकला तर ज्या ठिकाणीं हा पडेल त्याठिकाणीं यामध्यें किडे व आळ्या यांचे पुंजक्याच्या पुंजके सांपडतात, अशा रीतीनें त्याचा वाईट परिणाम होतो. ६ या देहाची ही अशी वाईट दशा होते, परंतु आत्मा तर नित्य, सिद्ध व अनादित्व नें सहज आहे. ७ तो निर्गुण असल्यामुळें पूर्णही नाहीं, व अपूर्णही नाहीं; क्रिया करणारा नाहीं व क्रिया न करणाराही नाहीं, तसेंच रोडका नाहीं, व लठ्ठही नाहीं, ८ तो निराकार असल्यामुळें दृश्य नाहीं व अदृश्यही नाहीं, तो प्रकाशमान नाहीं व निस्तेजही नाहीं आणि थोडा नाहीं व पुष्कळही नाहीं. ९ तो शून्य असल्यामुळें रिकामा नाहीं व भरलेलाही नाहीं; कशाविरहित अथवा कशासहितही नाहीं, आणि तो साकार नाहीं व निराकारही नाहीं, १११० तो आत्मरूपानें असल्यामुळें त्याला आनंदही नाहीं, व दुःखही नाहीं, तो एकही नाहीं व अनेकही नाहीं, आणि तो कशापासून मुक्त नाहीं, व कशानें बद्धही नाहीं, ११ तो लक्षणरहित असल्यामुळें एवढा किंवा तेवढा, आयता किंवा बनलेला, आणि बोलका किंवा मुका असाही नाहीं. १२ सृष्टीच्या होण्याबरोबर हा होत नाहीं, व सृष्टीचा संहार झाल्यावर तो जात नाहीं, आणि हा असणें व नसणें या दोन्ही स्थितींचें लयस्थान होय. १३ हा अव्यय असल्यामुळें मोजतां व वर्णन करितां येत नाहीं, हा वाढत अथवा कमी होत नाहीं, आणि हा विटत नाहीं किंवा खर्च होत नाहीं. १४ हे प्रियोत्तमा, असें ज्या आत्म्याचें स्वरूप आहे. तो देहांत आहे असें जे म्हणतात, त्यांचें तें म्हणणें—मठांत असलेल्या आकाशाला आकार आहे हा म्हणण्याप्रमाणें आहे. १५ तसें व आत्म्याच्या व्यापक स्थितींत देहाकृति उत्पन्न होतातच जातात, देह उत्पन्न झाला म्हणून तो देह धारण करीत नाहीं, व नाश पावला असतां तो देह टाकीत नाहीं, तो आपल्या स्वरूपानें जसा आहे तसाच असतो. १६ ज्याप्रमाणें आकाशांत दिवस व रात्र येतात व जातात, त्याप्रमाणें आत्म्याला आश्रयावर देह येतात व जातात १७ म्हणून या शरीरांत तो कांहीं करीत नाहीं. व करवीतही नाहीं व शरीराच्या कोणत्याही व्यापारांत कर्तेपणानें तयार होत नाहीं. १८ यास्तव त्याचे स्वरूपांत कमी अगर जास्त कांहीं होत नाहीं, इतकेंच नव्हे, तर तो देहांत असूनही देहाच्या सर्व व्यापारापासून अलिप्त असतो. १९

अन्वय—यथा सर्वगतं आकाशं सौक्ष्म्यात् न उपलिप्यते, तथा सर्वत्र देहे अवस्थितः आत्मा न उपलिप्यते ॥ ३२ ॥

अर्थ- जसें सर्वव्यापक आकाश सूक्ष्मपणामुळें कशानेंही लिप्त होत नाहीं, तसा सर्व देहाचे ठिकाणीं अधिष्ठित असलेला आत्मा देहादिकांच्या कर्मांनीं लिप्त होत नाहीं

अर्जुना, आकाश कोठें नाहीं ? व त्याचा कोठें रिघाव होत नाहीं ? म्हणजे हें सर्वत्र आहे; परंतु याला कशापासूनही पीडा होत नाहीं. ११२० त्याप्रमाणें सर्वत्र सर्व देहांत आत्मा जरी आहे, तरी देहाच्या कोणत्याही उपाधींपासून तो लिप्त होत नाहीं. २१ तर वारंवार शुद्धत्वाचें हेंच लक्षण तूं ध्यानांत ठेव कीं, क्षेत्र म्हणजे शरीर किंवा त्याचे धर्म यांहून क्षेत्रज्ञ म्हणजे आत्मा अगदीं निराळा आहे. २२

अन्वय—भारत, यथा एकः रविः इमं कृत्स्नं लोकं प्रकाशयति, तथा क्षेत्री कृत्स्नं क्षेत्रं प्रकाशयति. ॥ ३३ ॥

अर्थ—हे भारता, जसा एकट सूर्य या सर्व जगताला प्रकाशित करितो तसाच क्षेत्रज्ञ हा सर्व क्षेत्रांना प्रकाशित करितो ॥ ३३ ॥

आत्म्या या संबंधानें शरीरादिकांच्या ठिकाणीं चेष्टा दिसल्या तरी देह आत्मा नव्हे. लोहचुंबकाच्या संसर्गानें लोखंड हालतें, परंतु लोखंड हें लोहचुंबक नव्हे. तीच व्यवस्था आत्मा व देह यांस लागू आहे. २३ दीपज्योतीच्या उजेडानें घरांतील सर्व व्यवहार करितां येतात, परंतु दिवा आणि घर यांत कोटिशः अंतर आहे; २४ हे किरीटी, लांकडाच्या पोटांत अग्नि आहे, परंतु तो लांकूड नव्हे अशा दृष्टीनें पहावा. २५ आकाश व अभ्र किंवा सूर्य व मृगजल यांच्यांत ज्या मानानें अंतर आहे, त्याच मानानें देह व आत्मा यांजमधील अंतर मार्गे दिलेले दृष्टांत एके बाजूला ठेवून पाहिलें, तर २६

प्रगटवी लोकु । नांवें नांवें २७ एथ क्षेत्रज्ञु तो ऐसा । प्रकाशकु क्षेत्राभासा । यावरुतें हें न पुसा । शंका नेघा २८

क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवमंतरं ज्ञानचक्षुषा । भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुर्यांति ते परम् ॥३४॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे क्षेत्रक्षेत्रज्ञयोगो नाम त्रयोदशोऽध्यायः१३

शब्दतत्त्वसारज्ञा । पैं देखणी तेचि प्रज्ञा । जे क्षेत्रक्षेत्रज्ञा । अपाडु देखे२९ इया दोहींचें अंतर । देखावया चतुर । ज्ञानियांचें द्वार । आराधिती ११३० याचिलागीं सुमती । जोडिती शांतिसंपत्ती । शास्त्रांची दुमतीं । पोसिती घरीं ३१ योगाचिया आकाशा । बळविजे येवढाचि धिंवसा । याचियाचि आशा । पुरुषासि गा ३२ शरीरादि समस्त । मानिताति तृणवत । जीवें संतांचे होत । वाहणधरु ३३ ऐसैसियापरी । ज्ञानाचिया भरोवरी । करूनियां अंतरीं । निरुते होती ३४ मग क्षेत्रक्षेत्रज्ञांचें । जें अंतर देखती साचें । ज्ञानें उन्मेखतयांचें । वोवाळूं आम्ही ३५ आणि महाभूतादिकीं । प्रभेदलीं अनेकीं । पसरलीसे लटिकी । प्रकृति जे हे ३६ जे शुकनळिकान्यायें । न लगति लागली आहे । हें जैसें तैसें होये । ठाउवें जयां ३७ जैसी माळा ते माळा । ऐसीचि देखिजे डोळां । सर्पबुद्धि टवाळा । उखी होउनी ३८ कां शुक्ति ते शुक्ती । हे साच होय प्रतीती । रुपयाची भ्रांती । जाऊनियां ३९ तैसी वेगळी वेगळेपणें । प्रकृति जे अंतःकरणें । देखती ते मी म्हणे । ब्रह्म होती ११४० जें आकाशाहूनि वाड । जें अव्यक्ताची पैल कड । जें भेटलिया अपाडा पाड । पडों नेदी ४१ आकारु जेथ सरे । जीवत्व जेथें विरे । द्वैत जेथ नुरे । अद्वय जें ४२ तें परमतत्त्व पार्था । होती ते सर्वथा । जे आत्मानात्मव्यवस्था । राजहंसु ४३ ऐसा हा जी आघवा । श्रीकृष्णें तया पांडवा । उगाणा दिधला जीवा । जीवाचिया ४४ येर कलशीचें येरीं । रिचविजें जयापरी । आपणपें तया श्रीहरी । दिधलें तैसें ४५ आणि कोणा देता कोण । तो नर तैसा नारायण । वरि अर्जुनातें श्रीकृष्ण । हा मी म्हणे ४६ परि असो तें नाथिलें । न पुसतां कां मी बोलें । किंबहुना दिधलें । सर्वस्व देवें ४७ कीं तो पार्थु जी मनीं । अझुनी तृप्ती न मनी । अधिकाधिक उतान्ही । वाढवीतु असे ४८ स्नेहाचिया भरोवरी । आंबुथिला दीपु घे थोरी । चाड अर्जुना अंतरीं । परिसतां तैसी ४९ तेथ सुगारिणी आणि उदारे । रसज्ञ आणि जेवणारे । मिळती मग अवतरे ।

गगनांत सूर्य एकटा असून ज्याप्रमाणें निरनिराळ्य सर्व लोकांना प्रकाशित करितो, २७ त्याप्रमाणें आत्मा हा सर्व देहांत प्रकाश पाडणारा आहे, असें कळून येईल. यापुढें आत्मा व देह यांविषयीं पुनः शंका घेऊन विचारूं नको. २८

अन्वय–ये एवं ज्ञानचक्षुषा क्षेत्रक्षेत्रज्ञयो. (ज्ञानं) भूतप्रकृतिमोक्षं च विदुः, ते परं यान्ति. ॥ ३० ॥

अर्थ—जे याप्रमाण क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांच्यामधील अंतर, आणि सर्व भूतांची प्रकृतीपासून सुटका कशी होते, हें जाणतात, ते ब्रह्माला पावतात ॥ ३० ॥

हे शब्दतत्त्वसारज्ञा, तीच बुद्धि जाणती म्हणावी कीं, जिच्या योगानें शरीर व आत्मा या दोहोंमधील अंतर समजतें. २९ या दोहोंमधील अंतर समजण्याकरितां चतुर (मुमुक्षु) लोक हे ज्ञानीजनांच्या घराच्या उंबऱ्याची साल काढतात; ११३० आणि अर्जुना, हेंच समजण्याकरितां शांतिरूप संपत्ति स्वाधीन करून घेऊन शास्त्ररूपी दुभत्या गाई घरीं पाळतात. (नेहमीं शास्त्राध्ययन करितात. ३१ तेंच समजण्याकरितां पुरुष योगरूपआकाश चढून जाण्याची मनांत हांव धरितात; ३२ शरीर आदिकरून सर्व तृणप्राय मानतात, आणि संतांच्या पादुका आपल्या डोक्यावर घेतात. ३३ या मार्गे ज्ञानाचीं साधनें करून अंतर्यामीं खात्री करून घेतात. ३४ नंतर शरीर व आत्मा यांमधील खरें अंतर त्यांच्या दृष्टीस पडतें, तेव्हां भगवान म्हणतातः—आम्ही आपलें ज्ञान त्यांच्या ज्ञानावरून ओंवाळून टाकतो ३५ आणि या पृथ्वीवर प्राण्यांच्या भिन्न भिन्न रूपाने जी ही लटकी माया पसरलेली आहे; ३६ जी शुकनलिकान्यायानें जीवांच्या मार्गे न लागतां लागली आहे असें दिसतें, अशी ही वस्तुस्थिती ज्याला पूर्णपणें माहीत आहे; ३७ ज्याप्रमाणें माळेवरील लटकी सर्पबुद्धि नष्ट झाली म्हणजे माळ ती माळच दिसावी; ३८ अथवा शिंपीच्या चकाकण्यामुळें ति जवरील रुप्याचा भास जाऊन ती केवळ शिंपीच आहे असें प्रत्ययास यावें, ३९ त्याप्रमाणें, आत्म्यापासून प्रकृति वेगळी आहे, असें जे आपल्या अंतःकरणांत पहातात, ते ब्रह्मरूप होतात असें मी म्हणतों. ११४० जें ब्रह्म आकाशाहूनही व्यापक आहे, जें प्रकृतीची पैलथडी आहे, व जें प्राप्त झालें असतां आपल्यापासून दूर करीत नाहीं, ४१ या ब्रह्माचे ठिकाणीं प्रकृतीच्या अनुरोधानें आलेला आकार नाहींसा होतो, जीवपणा विरून जातो, आणि द्वैतभाव नाहींसा होतो, असें जें अद्वय आहे; ४२ पार्था, असें हें परमतत्त्व तेच पुरुष स्वतः होतात, कीं जें दूध व पाणी निराळें करणाऱ्या राजहंसाप्रमाणें आत्मा व प्रकृति यांचा फाड करितात! ४३ महाराज म्हणतातः—याप्रमाणें श्रीकृष्णांनीं अर्जुनाला प्रकृति व आत्मा यांजविषयीं अनुभव आणून दिला. ४४ ज्याप्रमाणें एका भांड्यांतील पाणी दुसऱ्या भांड्यांत ओतावें, त्याप्रमाणें श्रीहरींनीं आपल्या हृदयांतील हें ज्ञान अर्जुनाच्या हृदयांत ओतलें. ४५ आणि यांत विशेष तें काय झालें? कारण, जो नर तोच नारायण असल्यामुळें, ज्ञान कोणीं कोणास दिलें? तर श्रीकृष्ण अर्जुनाकडे बोट दाखवून 'हा तो मीच आहें' असें म्हणाले. ४६ परंतु ही गोष्ट मला कोणीं विचारल्याशिवाय सांगण्याचें कारण नाहीं. असो. फार काय सांगावें! देवांनीं अर्जुनास आपलें सर्वस्व दिलें. ४७ परंतु भगवंतांनीं इतकें जरी सांगितलें, तरी अर्जुन आपले मनांत तृप्त न होतां त्यांनीं अधिक सांगावें अशी हांव करूं लागला. ४८ दिव्यांत जों जों तेल घालावें, तों तों अधिकाधिक प्रकाश पडतो; त्याप्रमाणें, श्रीकृष्ण जों जों जास्ती सांगूं लागले, तों तें अर्जुनाचे मनांत ऐकण्याविषयीं इच्छा वाढत चालली! ४९ ज्याप्रमाणें एकादी सुगरण बायको असून वाढण्यांत सढळ हाताची असली व जेवणारे चतुर असून भोक्ते असले म्हणजे दोघांनाही वाढ-

हातु जैसा ११५० तैसें जी होतसे देवा। तया अवधानाचिया लवलवा। पाहातां व्याख्यान चढलें थांवा। चौथुनें घरी ५१ सुवायें मेघु सांवरे। जैसा चंद्रें सिंधु भरे। तैसा मातला रसु आंतरे। श्रोतयांचेनि ५२ आतां आनंदमय आघवें। विश्व कीजेल देवें। तें रायें परिसावें। संजयो म्हणे ५३ एवं जे महाभारतीं। श्रीव्यासें अप्रांतमतीं। भीष्मपर्वसंमतीं। म्हणितली कथा ५४ तो श्रीकृष्णार्जुनसंवादु। नागरी बोली विशदु। सांगोनि दाऊं प्रबंधु। वोंवियेचा ५५ नुसधीचि शांतिकथा। आणिजेल कीर वाक्पथा। जे शृंगाराच्या माथां। पाय ठेवी ५६ दाऊं वेल्हाळे देशी नवी। जे साहित्यातें वोजावी। अमृतातें चुकी ठेवी। गोडसपणें ५७ बोल ओल्हावतेनि गुणें। चंद्रासि घे उमाणे। रसरंगी भुलवणें। नादु लोपी ५८ खेचराचियाही मना। आणी सात्त्विकाचा पान्हा। श्रवणासवें सुमना। समाधि जोडे ५९ तैसा वाग्विलास विस्तारूं। गीतार्थेंसी विश्व भरूं। आनंदाचे आवारूं। मांडूं जगा ११६० फिटो विवेकाची वाणी। हो काना मनाची जिणी। देखो आवडे तो खाणी। ब्रह्मविद्येची ६१ दिसो परतत्त्व डोळां। पाहो सुखाचा सोहळा। रिघो महाबोध सुकाळा। माजिं विश्व ६२ हें निफजेल आतां आघवें। ऐसें बोलिजेल बरवें। जे अधिष्ठिला असें परमदेवें। श्रीनिवृत्ति मी ६३ ह्मणोनि अक्षरीं सुमेदीं। उपमा श्लोक कोंदाकोंदी। झाडा देईन प्रतिपदीं। ग्रंथार्थासी ६४ हा ठावोवरी मातें। पुरतया सारस्वतें। केलें असे श्रीमंतें। श्रीगुरुरायें ६५ तेणें जी कृपासावायें। मी बोलें तेतुलें सामाये। आणि तुमचिये सभे लाहें। गीता ह्मणों ६६ वरि तुम्हां संतांचे पाये। आजि मी लाधलों आहें। ह्मणोनि जी नोहे। अटकु कांहीं ६७ प्रभु काश्मिरीं मुकें। नुपजे हें काय कौतुकें। नाहीं उणीं सामुद्रिकें। लक्ष्मीयेसी ६८ तैसी तुम्हां संतांपासीं। अज्ञानाची गोठी कायसी। यालागीं नवरसीं। वरुषेन मी ६९ किंबहुना आतां देवा। अवसरु मज देयावा। ज्ञानदेव म्हणे बरवा। सागेन ग्रंथु ११७०

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ श्लोक ३४, ओंव्या ११७०.

ण्याची व जेवणाची परस्पर हौस उत्पन्न होते, १५० त्याप्रमाणें अर्जुनाची ऐकण्याची चळवळ पाहून देवांची स्थिति झाली, व त्यांचें व्याख्यान चौपट वाढलें.५१ ज्याप्रमाणें अनुकूल वाऱ्यानें मेघ सांवरून वृष्टि होते,किंवा चंद्रोदय झाला म्हणजे समुद्रास भरती येते, त्याप्रमाणें ऐकणाराच्या आदरबुद्धीनें वक्त्यास बोलण्याचें स्फुरण येतें.५२ संजय म्हणतो:- धृतराष्ट्र राजा, याप्रमाणें अर्जुनाची ऐकण्याची इच्छा पाहून, देव हे जरा आपल्या वक्तृत्वानें सर्व विश्व आनंदभरित करितील, तें वक्तृत्व ऐक. ५३ याप्रमाणें महाभारतांत भीष्मपर्वाच्या संगतींत श्रीव्यास मुनींनीं आपल्या अमर्याद बुद्धीनें जी कथा सांगितली आहे, ५४ तो कृष्णार्जुनांचा संवाद उत्तम मराठी भाषेंत ओंवी छंदानें सांगतों. ५५ मी आतां मतिप्रमाणें शांतिरसकथा सांगेन, पण ती शृंगारादि रसांच्या वरचढ होईल. ५६ ही देवभाषा साहित्याला शिकविणारी असून, आपल्या गोडीनें अमृतलाही फिकें पाडील. ५७ ज्या चंद्राचे उदयापासून चंद्रकांत मण्याला पाझर फुटतात, त्या चंद्रालाही माझे बोलापासून पाझर फुटेल. तसेंच, माझे वाक्याचे रसानें नादब्रह्म देखील लोपून जाईल; ५८ अज्ञानांच्या मनास देखील सात्त्विकतेचा पान्हा फुटेल, आणि जो अधिकारी आहे, त्याला तर ऐकण्याबरोबर समाधि लागेल! ५९ गीतेचा अर्थ असा सांगेन कीं, तो सर्व जगभर पसरून सर्व जगास आनंददायक होईल ११६० त्यामुळें विचारांचें दैन्य फिटून मन आणि श्रवण हीं जगतील, फार काय सांगावें, आज वाटेल त्यानें ब्रह्मविद्येचा स्वामीच पहावा. ६१ ब्रह्म डोळ्यांनीं पाहून सुखाचा सोहळा दृष्टीस पडावा, व सर्व जगांत आनंदाचा सुकाळ व्हावा. ६२ नजवर श्रीनिवृत्तिमहाराजांचा अनुग्रह असल्यामुळें, मी आतां असें म्हणण करीन कीं, या सर्व गोष्टी आपल्या अनुभवास येतील. ६३ म्हणून प्रत्येक अक्षराचे ठिकाणीं कवित्व आणि उपमा यांची गर्दी करून सोडीन; आणि ग्रंथाच्या प्रत्येक पदांतील अर्थाचा झाडा देईन; एक पदही सोडणार नाहीं.-ज्ञानेश्वरमहाराज आपल्या गर्वोक्तीचा परिहार करितात.- ६४ येथपर्यंत मला आमच्या श्रीमंत अशा गुरूंनीं सर्व शास्त्रांत निपुण केलें आहे, ६५ आणि मी जें भाषण करतों तें आपण मान्य करितां, व आपणासारख्या संतमंडळींच्या सभेंत गीतेचा अर्थ सांगण्याची मला योग्यता आली आहे, हें तरी त्यांच्याच कृपेचें ऐश्वर्य आहे! ६६ संत तुमच्यासारख्या संतांचे पाय आज माझ्या दृष्टीस पडले आहेत, म्हणून मला कसलीही अडचण पडत नाहीं. ६७ प्रभो, सरस्वती जी सर्वांस बोलण्याची शक्ति देणारी आहे, तिला मुकें मूल होणार नाहीं ह्यांत कांहीं कौतुक का आहे? लक्ष्मीच्या हातावर सामुद्रिक चिन्हांचा उणीव असूं शकणार नाहीं; ६८ त्याप्रमाणें, तुह्मां संतांच्या पुढें कोणीही आला असतां तो अज्ञानी राहील अशी गोष्ट कशी होईल? तेव्हां मी आतां बोलण्यांत नवरसांची रेलचेल करून देईन. ६९ तर, हे प्रभो, आतां मला थोडा वेळ द्या, म्हणजे मी उत्तम रीतीच्या कथा सांगेन, असें ज्ञानदेव म्हणाले. ११७०

ज्ञानेश्वरी.

अध्याय चौदावा.

जयजय आचार्या । समस्तसुरवर्या । प्रज्ञाप्रभासूर्या । सुखोदया १ जयजय सर्वविसांवया । सोहंभावसुहावया । नाना लोक हेलावया । समुद्रा तूं २ आइकें गा आर्तबंधू । निरंतरकारुण्यसिंधू । विशदविद्यावधू- । वल्लभा जी ३ तूं जयाप्रति लपसी । तया विश्व हें दाविसी । प्रकट तैं करिसी । आघवेंचि तूं ४ कीं पुढिलाची दृष्टि चोरिजे । हा दृष्टिबंधु निफजे । परी नवल लाघव तुझें । जें आपणपें चोरे ५ जी तूंचि तूं सर्वा यया । मा कोणा बोधु कोणा माया । ऐसिया आपेंआप लाघविया । नमों तुज ६ जाणों जगीं आप वोलें । तें तुझिया बोला सुरस जालें । तुझेनि क्षमत्व आलें । पृथ्वीयेसी ७ रविचंद्रादि शुक्ति । उदय करिती त्रिजगतीं । तें तुझिया दीसी- । तेज़ तेजां ८ जें चळवळिजे अनिळें । तें दैविकेनि जी निजबळें । नभ तुजमाजी खेळे । लपिथपि ९ किंबहुना माया असोस । ज्ञान जी तुझेनि डोळस । असो वानणें सायास । श्रुतीसि हें १० वेद वानूनि तंवचि चांग । जंव न दिसे तुझें आंग । मग आम्हां तया मुग । एके पांतीं ११ जी एकार्णवाचे ठाईं । पाहतां थेंबाचा पाडु नाहीं । मा महानदी काई । जाणिजती १२ कां उदयलिया भास्वतु । चंद्र जैसा खद्योतु । आम्हां श्रुती तुज आंतु । तो पाडु असे १३ आणि दुजया थांवो मोडे । जेथ परेशीं वैखरी बुडे । तो तूं मा कोणें तोंडें । वानावासी १४ यालागीं आतां । स्तुति सांडूनि निवांता । चरणीं ठेविजे माथा । हेंचि भलें १५ तरी तूं जैसा आहासि तैसिया । नमों जी श्रीगुरुराया । मज ग्रंथोद्यमु फळावया । वेव्हारा होईं १६ आतां कृपाभांडवल सोडीं । भरीं मति माझी पोतडी । करीं ज्ञानपद्यजोडी । थोरा मातें १७ मग मी संसरेन तेणें ।

ज्ञानेश्वरी.

अध्याय चौदावा.

हे गुरो, तुम्ही सकल देवांत श्रेष्ठ असून आनंदवृक्षाचे मूळ आहां. प्रभेचा उदय करणारे सूर्य आहां. तुमचा जयजयकार असो. १ तुम्ही सर्वांचे विश्रांतिस्थान असून सर्वांच्या हृदयांत अहंब्रह्म हें तत्त्व घालणारे आहां; किंवा तुम्ही समुद्ररूपी असून तुमच्यांत चौदा लोक लाटांप्रमाणें हेलकावे खातात. तुमचा जयजयकार असो. २ तुम्ही दीनदयाळ असून निरंतर करुणेचे सागर आहां, आणि ब्रह्मविद्यावधूचे वर आहां. ३ जे कोणी तुह्मांला जाणत नाहींत, त्यांना हें सर्व विश्व खरें भासतें; व जे कोणी तुह्मांला जाणतात, त्यांना सर्व विश्वांत तुमच्याशिवाय कांहीं दिसत नाहीं. ४ नजरबंद खेळांत गारोडी दुसऱ्याची दृष्टि चोरतो असा दिसतो, म्हणजे त्याला स्वतःला लपवितां येत नाहीं, परंतु आपण स्वतःच लपवून राहण्याचें आपलें चातुर्य विलक्षण आहे. ५ महाराज, या सर्व जगांत तुम्ही कोणाला ज्ञानाचा बोध करतां, व तुम्हीच कोणाला मायेच्या सपट्यांत गुंतवितां, असा तुमचा आपल्याच ठिकाणीं सहज खेळ सुरू आहे. अशा तुम्हाला नमस्कार असो. ६ जगतांत ज्याला पाणी असें म्हणतात, त्याला जी गोडी आहे, ती तुमच्यामुळें आली आहे; व पृथ्वीला जी सहन करण्याची शक्ति आहे, तिला तुमचीच शक्ति कारण आहे. ७ चंद्र व सूर्य हे केवळ मोठ्या शिंपल्यांप्रमाणें निस्तेज आहेत; परंतु त्यांचा जो तिन्ही लोकांवर उजेड पडतो, तो तुमच्या तेजाच्या शक्तीचा प्रभाव आहे. ८ चहूंकडे फिरणारा वायु हाही तुमच्याच शक्तीमुळें फिरत असतो; व आकाश जरी मोठें दिसतें तरी त्याचा समावेश तुमच्यांत होऊन तें लपंडावाप्रमाणें तुमच्या एका कोपऱ्यांत लपतें. ९ फार काय सांगावें ! सर्व माया ही तुमच्याच ठिकाणीं असून, ज्ञानही तुमच्याच शक्तीनें चहूंकडे पहातें; इतकेंच नव्हे, तर तुमच्या स्वरूपाचा पार न लागल्यामुळें तें श्रुतीला वर्णन करण्याचे श्रम झाले. १० वेद वर्णन करण्यांत चतुर खरा. परंतु जोंपर्यंत तुमचें दर्शन झालें नाहीं, तोंपर्यंतच वेद तुमचें वर्णन करूं शकतात, परंतु तेंच आपलें दर्शन झाल्यावर आमची व त्यांची एकच दशा होते, व दोघांसही स्वस्थ बसावें लागतें. ११ सर्व जलमय झाल्यावर त्यांत एका थेंबाची किंमतगणती नसतेच, परंतु मोठी नदी तरी ओळखतां येते काय ? १२ किंवा सूर्य उगवल्यावर चंद्र जसा काजव्याप्रमाणें होतो म्हणजे सूर्यापुढें चंद्र आणि काजवा ह्यांची किंमत एक, त्याप्रमाणें तुमच्या स्वरूपापुढें माझी आणि श्रुतींची किंमत एक. १३ आणि ज्या ठिकाणीं द्वैताचा ठव मोडून परेसह वैखरी—वाणी स्तब्ध राहाते, त्या तुमचें कोणत्या तोंडानें वर्णन करावें, म्हणजे कोणालाही वर्णन करता येणार नाहीं, १४ म्हणून आतां तुमची स्तुति करण्याचें सोडून मुकाट्यानें तुमच्या चरणांवर मस्तक ठेवावें हाच उत्तम मार्ग होय. १५ तर, हे गुरुराया, तुम्ही जसे आहां तशाच तुम्हांला मी नमस्कार करतों. तुम्ही माझ्या गीतार्थकथनरूपी व्यापारांत मला नफा करून देण्याकरितां माझे सावकार व्हां. १६ तर आतां आपल्या कृपारूप भांडवलाच्या थैलीची गांठ सोडून माझी मतिरूप पोतडी भरा; आणि आपण थोर आहां, तेव्हां मला ज्ञानदाची (ज्ञानरूप नफ्याची) जोड करून द्या. १७ मग मी या व्या-

करीन संतांसी कर्णभूषणें । लेववीन सुलक्षणें । विवेकाचीं १८ जी गीतार्थ-निधान । काढू माझें मन । सुयीं स्नेहांजन । आपलें तूं १९ हे वाक्सृष्टि एके वेळे । देखतु माझे बुद्धीचे डोळे । तैसा उदैजो जी निर्मळें । कारुण्य बिंबें २० माझी प्रज्ञावेली वेल्हाळ । काव्यें होय सफळ । तो वसंतु होय स्नेहाळ । शिरोमणी २१ प्रमेय महापूरें । हे मतिगंगा ये थोरे । तैसा वरिष उदारें दिठी-वेनी २२ अगा विश्वैकधामा । तुझा प्रसाद चंद्रमा । करू मज पूर्णिमा । स्फुर्तींची जी २३ जी अवलोकिलिया मातें । उन्मेषसागरीं भारितें । वोसंडेल स्फूर्तीतें । रसवृत्तीचे २४ तंव संतोषोनि श्रीगुरुराजें । म्हणितलें विनंतिव्याजें । मांडिलें देखोनि दुजे । स्तवनमिषें २५ हें असो आतां वांजटा । तो ज्ञानार्थ करूनि गोमटा । ग्रंथु दावीं उत्कंठा । भंगों नेदीं २६ हो कां जी स्वामी । हेंचि पाहत होतों मी । जे श्रीमुखें म्हणा तुम्ही । ग्रंथ सांग २७ सहजें दूर्वेचा डिरु । आंगेंचि तंव अमरु । वरी आला पुरु । पीयूषाचा २८ तरि आतां येण प्रसादें । विन्यास विदग्धें । मूळशास्त्रपदें । वाखाणीन २९ परि जीवा आंतुलीकडे । जैसी संदेहाची डोणी बुडे । ना श्रवणीं तरि चाडे । वाढी दिसे ३० तैसी बोली साचारी । अवतरो माझी माधुरी । भाले मागूने घरीं । गुरुकृपेच्या ३१ तरी मागां त्रयोदशीं । अध्यायीं गोठी ऐसी । श्रीकृष्ण अर्जुनेंसीं चावळले ३२ जे क्षेत्रक्षेत्रयोगें । होइजे येणें जगें । आत्मा गुणसंगें । संसारिया ३३ आणि हाचि प्रकृतिगतु । सुखदुःखभोगीं हेतु । अथवा गुणातीतु । केवळु हा ३४ तरि कैसा पां असंगा संगु । कोण तो क्षेत्रक्षेत्रज्ञायोगु । सुखदुःखादि भोगु । केविं तया ३५ गुण ते कैसे किती । बांधती कवणे रीती । नातरी गुणातीतीं । चिन्हें काई ३६ एवं इया आघवेया । अर्थारूप करावया । विषो एथ चौदाविया । अध्यायासी ३७ तरि तो आतां ऐसा । प्रस्तुत परियेसा । अभिप्रावो विश्वेशा । वैकुंठाचा ३८ तो म्हणे गा अर्जुना । अवधानाची सर्व सेना । मेळऊनि इया ज्ञाना । झोंबावें हो ३९ आह्मी मागां तुज बहुतीं । दाविलें हें उपपत्ती । तरि आह्मुनी अप्रतीती । कुशीं न निघे ४०

श्रीभगवानुवाचः—

परं भूयः प्रवक्ष्यामि ज्ञानानां ज्ञानमुत्तमम् । यज्ज्ञात्वा मुनयः सर्वे परांः सिद्धिमितो गताः १

म्हणौनि गा पुढती । सांगिजेल तुजप्रती । पर म्हण म्हणोनि श्रुतीं । डा-

पारावर सांवरून संतांच्या कानांत सुंदर अशी वि चररूप कर्णभूषणें तयार करून घालीन. १८ महाराज, गीतार्थरूपी ठेवा बाहेर काढण्याविषयीं म इया मनांत जी इच्छा उत्पन्न झाली आहे, ती सफल करण्याकरितां तुम्ही आपलें स्वरूप अंजन माझ्या डोळ्यांत घाला. १९ माझ्या बुद्धिरूप डोळ्यांना एक वेळ शब्दमय सृष्टि पहातां येईल, अशा तन्हेचा आपल्या करुणारूप सूर्यबिंबाचा निर्मळ प्रकाश पाडा २० माझी बुद्धिरूप वेली पुष्कळ वाढून तिला काव्यरूपी फळें येण्याकरितां वेलींना प्रफुल्लि। करण्याची कृपा करण्यामध्यें श्रेष्ठ असा जो वसंत, तो तुम्ही व्हां. २१ आपल्या कृपादृष्टीचा इतका औदार्यानें वर्षाव करा कीं, त्यानें माझ्या बुद्धिरूप गंगेस अर्थरूपी सिद्धांतरूपी) महापूर यावा २२ हे विश्वैकधामा, आपला प्रसादचंद्रमा मला स्फूर्तीची पौर्णिमा करोः (पूर्णचंद्रोदयानें पौर्णिमा शोभते, त्याप्रमाणें आपल्या कृपेनें मला पूर्ण स्फूर्ति येवो.) २३ ती पौर्णिमा मी अवलोकन केली, (आपला कृपाप्रसाद झाला.) म्हणजे माझ्या ज्ञानसमुद्राला भरतें येईल; आणि नवरस हे स्फूर्ति भरून सांडूं लागतील ! २४ असें ज्ञानदेवाचें भाषण ऐकून श्रीगुरु निवृत्तिनाथ महाराज संतोष पावून म्हणाले कीं, तूं स्तुतीच्या मिषानें द्वैत व्यर्थ वाढवितोस. २५ तर आतां ही व्यर्थ स्तुति राहूं दे; जो जाणण्याचा विषय आहे, तो चांगला तयार करून ग्रंथ सांग. उत्कंठेचा भंग होऊं देऊं नको. २६ तेव्हां महाराज म्हणालेः—प्रभो, तुम्ही आपल्या मुखानें ग्रंथ सांग,हेंच म्हणण्याची मी वाट पहात होतों. २७ अगोदरच हरळीची मुळी अमर, त्यांत तिजवर अमृताचा वर्षाव झाला, मग काय विचारतां ! २८ आतां गुरुप्रसाद झाल्यामुळें गीतेतील मूळ शास्त्राच्या प्रत्येक पदाचें सविस्तर व स्पष्ट वर्णन करीन. २९ कीं ज्ञें ऐकल्यामुळें मनांतील सर्व संशय नाहींसा होऊन श्रवणाची इच्छा दुणावेल. ३० माझ्या मधुर वाणीतून असे उत्तम शब्द निघावे एवढेंच तुमच्या पायांशीं माझें मागणें आहे. ३१ असो: पूर्वी तेराव्या अध्यायांत श्रीकृष्णांनीं अर्जुनास अशी कथा सांगितली ३२ कीं, आत्मा व प्रकृति यांच्या संयोगानें हें जग निर्माण होतें; व गुणांच्या अनुरोधानें आत्मा संसारांत निमग्न होतो; ३३ सारासारार्थानें खालच सुखदुःख भोगावें लागतें; व तोच गुणसंगरहित झाला म्हणजे मुक्त होतो, ३४ पर संगरहित असा जो आत्मा, त्याला प्रकृतीचा संग व्हायाच कसा ? आत्मा व प्रकृति यांचा संयोग होतो तो कोणता ? त्याला सुखदुःखादिभोग व्हावा कसा ? ३५ ते गुण कसे व किती आहेत ? त्या गुणांची बाधा कशा रीतीनें होते, आणि पुरुष गुणातीत झाला म्हणजे त्याचीं लक्षणें कोणतीं, ३६ अशा प्रकारें या सर्व गोष्टींचें वर्णन करणें हाच विषय या चौदाव्या अध्यायांत आहे. ३७ तर आतां त्या वैकुंठनिवासी विश्वेशांचा अभिप्राय काय आहे, तो ऐका. ३८ ते म्हणालेः—अर्जुना, श्रवण करण्याची सर्व सामग्री जमवून तूं या ज्ञानाला झोंब बरें का ! ३९ पूर्वी तुला आम्हीं हें ज्ञान अनेक प्रकारें स्पष्ट करून सांगितलें, परंतु तुझें अज्ञान अजून पूर्ण नाहींसें होत नाहीं. ४०

अन्वय—यत् ज्ञात्वा सर्वे मुनयः इतः परां सिद्धिं गताः, (तत्) ज्ञानानां उत्तमं परं ज्ञानं भूयः (अहं ते) प्रवक्ष्यामि. १

अर्थ श्रीभगवान् म्हणालेः—ज्या ज्ञानाला जाणून सर्व मुनि या जन्मांतून मोक्षसिद्धि पावले, तें सर्व ज्ञानांत उत्तम व श्रेष्ठ असें ज्ञान मी तुला पुनः सांगतों. ॥ १ ॥

म्हणून बाबारे, 'पर' या शब्दाचा महिमा श्रुतींनीं जो वर्णन केला आहे, तो तुला आम्ही

हारिलें जें ४१ एऱ्हवीं ज्ञान हें आपुलें । परि पर ऐसेनि जालें । जे आवडोनि घेतलें । भवस्वर्गादिक ४२ अगा याचि कारणें । हें उत्तम सर्वांपरी मी म्हणें । जे वन्हि हें तृणें । येरें ज्ञानें ४३ जियें भवस्वर्गातें जाणती । यागचि चांग म्हणती । पारखी फुडी आथी । भेदीं जयां ४४ तियें आघवींचि ज्ञानें । केलीं येणें स्वप्नें । जैशा वातोर्मी गगनें । गिळिजती अंतीं ४५ कां उदितें रश्मिराजें । लोपिलीं चंद्रादि तेजें । नाना प्रळयांबुमाजें । नदी नद ४६ तैसें येणें पाहलेया । ज्ञानजात जाय लया । म्हणोनियां धनंजया । उत्तम हें ४७ अनादि जे मुक्तता । आपली अमे पंडुसुता । तो मोक्षु हाता येता । होय जेणें ४८ जयाचिया प्रतीती । विचारवीरीं समस्तीं । नेदिजेचि संसृती । माथा उधऊं ४९ मनें मन घालूनि मागें । विश्रांति जालिया आंगें । ते देहीं देहाजोगे । होतीचि ना ५० मग तें देहाचें बेळें । वोलांडूनि एकेचि वेळे । संवतुकी कांटाळें । माझें जाले५१

इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः । सर्गेऽपि नोपजायंते प्रलये न व्यथंति च ॥२॥

जे माझिया नित्यता । तेणें नित्य ते पंडुसुता । परिपूर्ण पूर्णता । माझियाचि ५२ मी जैसा अनंतानंदु । जैसाचि सत्यसिध्दु । तैसेचि ते भेदु । उरेचि ना ५३ जें मी जेव्हढें जैसें । तेंचि ते जाले तैसें । घटभंगीं घटाकाशें । आकाश जेवीं ५४ नातरि दीपमूळकीं । दीपशिखा अनेकीं । मीनलिया अवलोकीं । होय जैसें ५५ अर्जुना तयापरी । सरली द्वैताची वारी । नांदे नामार्थ एकाहारीं । मीतूंविण ५६ येणेंचि पैं कारणें । जैं पाहिलें सृष्टीचें जुंपणें । तेंही तया होणें । पडेचिना ५७ सृष्टीचिये सर्वादी । जयां देहाची नाहीं बांधी । ते कैंचें प्रळयावधी । निमतील पां ५८ म्हणौनि जन्मक्षयां । अतीत ते धनंजया । मी जाले ज्ञाना इया । अनुसरोनि ५९ ऐसी ज्ञानाची वाडी । वानिली देवें आवडी । तेविंचि पार्थाही गोडी । लावावया ६० तंव तया जालें आन । सर्वांगीं निघाले कान । सपाई अवधान । आतला पां ६१ आतां देवाचिया ऐसें । जाकळीजत असे वोरसें । जे निरूपण आकाशें । वेंटाळेना ६२ मग म्हणे गा प्रज्ञाकांता । उजवली आजि वक्तृत्वता । जे बोलायेवढा श्रोता । जोडलासी ६३ तरि एकु मी अनेकीं । गोंविजे देहपाशकीं । त्रिगुणीं लुब्धकी । कवणेपरी ६४ कैसा क्षेत्रयोगें । वियें इयें जगें । तें परिस सांगें । कवणेपरी ६५ पैं क्षेत्र येणें व्याजें । यालागीं हें बोलिजे । जे मत्संगबीजें । भूतीं पिके ६६

पुनः सांगतों. ४१ आपल्याच आत्मज्ञानास 'पर' असणें म्हणण्याचें कारण संसार व स्वर्ग हेच आपल्या स्वरूपाप्रमाणें आवडले म्हणून झालें आहे. ४२ अरे, याच कारणास्तव आत्मज्ञान सर्वापेक्षां उत्तम असें मीं म्हणतों. कारण, हें अग्निरूप असून इतर ज्ञानें ह्याच्यापुढें तृणरूपी आहेत. ४३ कारण, ज्या ज्ञानाची मजल संसार व स्वर्ग या सुखांपर्यंतकडे नसते, ज्याला यज्ञयागादि कर्मेंच उत्तम वाटतात, व ज्याला द्वैताशिवाय दुसऱ्या कशाची ओळख नसते, ४४ तीं सर्व ज्ञानें आत्मज्ञानापुढें स्वप्नवत् भासतात. ज्याप्रमाणें गगनांत उत्पन्न झालेला वायु कितीही मोठा असला तरी त्याचा त्यांतच लय होतो, ४५ किंवा सूर्य उगवल्यावर जसें चंद्रादि नक्षत्रांचें तेज लोपतें, अथवा प्रलयकालचें पाणि वाढल्यावर ज्याप्रमाणें नदी, नद हा भेद रहात नाहीं, ४६ त्याप्रमाणें आत्मज्ञानाचा उदय झाल्यावर इतर सर्व ज्ञानें लय पावतात. म्हणून, अर्जुना, याला आम्ही 'उत्तम' असें म्हणतों. ४७ हे पांडुसुता, अनादिकालापासून आपल्याजवळ सहज असणारी जी आपली मुक्तता किंवा मोक्ष ह्या ज्ञानाच्या प्राप्तीपासून आपल्या हातास येतो. ४८ ज्याचा अनुभव आला असतां, सर्व ज्ञाते संसाराला वर डोकें काढूं देत नाहींत; ४९ आपल्या मनाची विषयांकडे जाणारीं धांव मागें हटवून त्याला जागच्या जागीं बसविल्यावर, सहज विश्रांति प्राप्त होते, असें झाल्यावर ते देही असूनही नसल्यासारखे होतात. ५० नंतर ते देहद्वयाचें बेळकें एकदम ओलांडून माझ्याच योग्यतेस पावतात. ५१

अन्वय-(ये) इदं ज्ञानं उपाश्रित्य मम साधर्म्यं आगताः (ते) सर्गे अपि न उपजायन्ते, प्रलये च न व्यथन्ति. ॥ २ ॥

अर्थ-ह्या ज्ञानाचा आश्रय करून जे माझ्या साम्यज्याला प्राप्त झाले, ते सृष्टीच्या उत्पत्तिकालींही जन्मत नाहींत. आणि प्रलयकालींही नाश पावत नाहींत. ॥२॥

कारण, अर्जुना, जे माझ्या नित्यतेनें नित्य आणि माझ्या परिपूर्णतेनें पूर्ण आहेत, ५२ आणि ज्याप्रमाणें मी जसा नेहमीं अनंत असून महानंदरूप असतों, व सच्चिद्रूप असतों, त्याप्रमाणेंच ते असतात; त्यांच्या व माझ्यांत भेद मुळींच रहात नाहीं. ५३ ज्याप्रमाणें मी अनंत आहे, त्याप्रमाणें तेही होतात; ज्याप्रमाणें घटाचा नाश झाल्यावर घटाकार महाकाशरूप होते; ५४ किंवा मूळ दिव्यापासून लावलेल्या पुष्कळ वाती एकत्र केल्या म्हणजे त्या मूळ दिव्यांतच तेज मिळतें ५५ त्याप्रमाणें, अर्जुना, द्वैतभाव नाहींसा होऊन मी व तूं हे भेद एकच पंक्तीला बसून एकत्र नांदतात. ५६ याच कारणामुळें, ज्या वेळीं समूळ सृष्टीला आरंभ होतो, त्या वेळीं त्याला जन्म द्यावा लागत नाहीं. ५७ मग, ज्यांना सृष्टीच्या उत्पत्तीबरोबर देह द्यावा लागत नाहीं, त्यांचा प्रलयकाळीं नाश कोठून होणार? ५८ म्हणून, धनंजया, जे आत्मज्ञानाला अनुसरून मद्रूप झाले आहेत, ते जन्म-मरणातीत आहेत. ५९ याप्रमाणें आत्मज्ञानाची प्रौढी देवांनीं आपल्या आवडीनें वर्णन केली, आणि अर्जुनालाही त्या ज्ञानाविषयीं आवड उत्पन्न व्हावी अशा हेतूनें ही प्रौढी वर्णन केली. ६० तों अर्जुनाची अशी स्थिति झाली कीं, त्याच्या सर्वांगालाच कान फुटले, म्हणजे अर्जुन नखशिखांत अवधानरूप बनला. ६१ आपलें सांगणें आकाशासही आंवरलें जाणार नाहीं, तें अर्जुन धारण करतो आहे, असें पाहून देवांनाही प्रेमाचें भरतें आलें; त्यांची सांगण्याची हौस गगनांत मावेना. ६२ मग भगवान् म्हणालेः—अर्जुना, माझ्या वक्तृत्वरूपी कन्येस तूं बुद्धिरूप वर मिळाल्यामुळें तो आज उजवली! कारण माझ्या बोलण्याच्या हौसेप्रमाणें तूं उत्तम श्रोता मिळालास! ६३ तर आतां, मी एक असून, त्रिगुणरूपी पारधी हे देहरूपी पाश टाकून मला अनेक रूपें कशीं ध्यावयास लावतात, ६४ व मायेच्या उपाधीनें माझ्यापासून हें जग कसें उत्पन्न होतें तें सांगतों, ऐक. ६५ हें पहा—माझ्या संगरूपी बीजापासून प्राणिमात्र उत्पन्न होतात, याच कारणामुळें प्रकृतीला क्षेत्र असें म्हणावयाचें. ६६

मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहम् । संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत ॥३॥

एऱ्हवीं तरी महद्ब्रह्म । यालागीं हें ऐसें नाम । जे महदादिविश्राम । शालिका हें ६७ विकारां बहुवस थोरी । अर्जुना हेंचि करी । म्हणोनि अवधारीं । महद्ब्रह्म ६८ अव्यक्तवादमतीं । अव्यक्त ऐसी वदंती । सांख्याचिया प्रतीतीं । प्रकृति हेचि ६९ वेदांतीं इयेतें माया । ऐसें म्हणिजे प्राज्ञराया । असो किती बोलों वायां । अज्ञान हें ७० आपला आपणपेयां । विसरु जो धनंजया । तेंचि रूप यया । अज्ञानासी ७१ आणिकही एक असे । जें विचारावेळे न दिसे । वातीं पाहतां जैसें । आंधारें कां ७२ हालविलिया जाय । निश्चळीं तरी होय । दुधीं जैसी साय । दुधाची ते ७३ पैं जागरु ना स्वप्न । ना स्वरूप अवस्थान । ते सुषुप्ति कां घन । जैसी होय ७४ कां न वियतां वायूतें । वांझें आकाश रितें । तया ऐसें निरुतें । अज्ञान गा ७५ पैल खांब कां पुरुखु । ऐसा निश्चयो नाहीं एकु । परि काय नेणो आलोकु । दिसत असे ७६ तेविं वस्तु जैसी असे । तैसी कीर न दिसे । परि कांहीं अनारिसें । देखिजेना ७७ ना राती ना तेज । ते संधि जेविं सांज । तेविं विरुद्ध ना निज । अज्ञान आथी ७८ ऐसी कोण्ही एकी दशा । तिये वादु अज्ञान ऐसा । तया गुंडलिया प्रकाशा । क्षेत्रज्ञु नाम ७९ अज्ञान थोरिये आणिजे । आपणपें तरी नेणिजे । तें रूप जाणिजे । क्षेत्रज्ञाचें ८० हाचि उभय योगु । बुझें बापा चांगु । सत्तेचा नैसर्गु । स्वभावो हा ८१ आतां अज्ञानासारिखें । वस्तु आपणपांचि देखे । परि रूपें अनेकें । नेणों कोणें ८२ जैसा रंकु भ्रमला । म्हणे जारे मी रावो आला । कां मूर्च्छितु गेला । स्वर्गलोका ८३ तेविं लचकलिया दिठी । मग देखणें जें जें उठी । तया नाम सृष्टी । मीचि वियें पैं गा ८४ जैसें कां स्वप्न मोहा । तो एकाकी देखे बहुवा । तोचि पाडु आत्मया । स्मरणेंवीण असे ८५ हेंचि अनिभ्रांती । प्रमेय उपलवूं पुढती । परि तूं प्रतीती । याची घे पां ८६ तरी माझी हे गृहिणी । अनादि तरुणी । अनिर्वाच्यगुणी । अविद्या हे ८७ इये नाहीं हेंचि रूप । ठाणें हें अति उमप । हें निद्रितां समीप । चेतां दुरी ८८ पैं माझेनिचि आंगें । पहुडल्या हे जागे । आणि सत्तासंभोगें । गुर्विणी होय ८९ महद्ब्रह्माउदरीं । प्रकृति आठै विकारीं । गर्भाची करी । पेलोवेली ९० उभयसंगु पहिलें । बुद्धितत्त्व प्रसवलें । बुद्धितत्त्वें भारैलें । होय मन ९१ तरुणी म-

अन्वय भारत, महद्ब्रह्म मम योनिः (अस्ति ; तस्मिन् अहं गर्भं दधामि; ततः सर्वभूतानां संभवः भवति. ॥ ३ ॥

अर्थ–हे भारता, महद्ब्रह्म [प्रकृति] हें माझें गर्भ ठेवण्याचें ठिकाण आहे; त्याजमध्यें मी गर्भ ठेवितों, आणि त्यापासून सर्व भूतांची उत्पत्ति होते. ॥ ३ ॥

ही माया महतत्त्वादिकांचें मूळ विश्रामस्थान म्हणजे लयस्थान आहे. अर्थात सर्व जगापेक्षां मोठी आहे, म्हणून हिला 'महद्ब्रह्म' असें नांव दिलें आहे. ६७ तसेंच अर्जुना, हिच्या योगानें विकार व गुण हे वृद्धि पावतात, म्हणून हिला महद्ब्रह्म असें म्हटलें आहे. ६८ अव्यक्त मतवाद्यां या मतें हिला अव्यक्त असें नांव आहे. व सांख्यमतवादी हिलाच "प्रकृति "असें म्हणतात.६९हे प्राज्ञशिरोमणे वेदांती हिला 'माया' असें म्हणत त.असो;उगीच फार काय बोलावें ! अज्ञान जें तें हेंच. ७० हे धनंजया; आपल्या आत्मस्वरूपाचा आपल्यास जो विसर पडतो, तेंच या अज्ञानाचें रूप. ७१ आणखी एक असें आहे कीं, ज्याप्रमाणें हातांत दिवा घेऊन अंधार शोधूं लागलें असतां तो दिसत नाही,त्याप्रमाणें आत्मस्वरूपाचा विचार केला कीं तें दिसेनासें होतें. ७२ दूध घोंटीत वसलें म्हणजे जशी त्यावर साय येत नाहीं, व तेंच घोंटलें नाहीं म्हणजे त्यावर साय येते, ७३ किंवा मनुष्य ज्या वेळेस जागृत अवस्थेंत अथवा स्वप्नावस्थेंत नसतो, किंवा समाधिस्थ नसतो, त्या वेळेस जशी गाढ झोंप लागते; ७४ किंवा वायू उत्पन्न झाला नसतां म्हणजे ज्याप्रमाणें आकाश मात्र एकटें असतें, त्याप्रमाणें इतर अवस्था, शिवाय जी निवांत निद्रावस्था, तेंच अज्ञान होय. ७५ ज्या वेळेस आपल्या समोर एकादा झाडाचा बुडखा असून तो खांब आहे, किंवा पुरुष आहे असें निश्चयानें सांगतां येत नाहीं, परंतु कांहीं तरी दिसत आहे, असा भास होतो; ७६ त्याप्रमाणें आत्म्याचें निवळ स्वरूप ज्या वेळेस खरोखर दिसत नाहीं, व दुसरी कांहीं वस्तु आहे, असाही निश्चय होत नाहीं; ७७ रात्र नाहीं व दिवस नाहीं या दोहोंच्या संधीला जसा सायंकाळ म्हणतात, त्याप्रमाणें आत्मा व जगत् याच्या ज्ञानाच्या अभावाच्या स्थितीला अज्ञान असें म्हणतात. ७८ जशी जी एक दोहोंमधील अनिर्वचनीय स्थिति तिला 'अज्ञान असें म्हणत त: व त्या अज्ञानानें आवरण झालें जें चैतन्य, त्यालाच क्षेत्रज्ञ असें म्हणतात. ७९ आपलें शुद्धस्वरूप न जाणतां जें अज्ञान वाटतें, तें क्षेत्रज्ञाचें (जीवात्म्याचें) रूप होय.८०हा माया व चैतन्य यांचा योग नीट लक्षांत आण. कारण,मूळ स्वरूपावर मायेचा स्वभावच असा आहे.८१ याप्रमाणें मायेच्या अनुरोधानें चैतन्य आत्मस्वरूप विसरून अनेक रूपें घेतें. ८२ ज्याप्रमाणें दरिद्री मनुष्याला भ्रम झाला असतां, तो रस्त्यानें जाऊं लागला म्हणजे इतर लोकांस 'आमचा राजाची स्वारी आली' असें म्हणतो, किंवा मूर्छा आलेला मनुष्य ज्याप्रमाणें 'स्वर्ग पाहून आलों' असें म्हणतो, ८३ त्याप्रमाणें एकदा दृष्टि आत्मस्वरूपावरून चळली म्हणजे जी जी कल्पना उत्पन्न होते, तिला सृष्टि असें म्हणतात. ती माझ्यापासूनच उत्पन्न होते, ८४ मनुष्य एकटा असून स्वप्नाच्या भ्रांतीनें पुष्कळ वस्तु पहातो, तोच प्रकार चैतन्याला आत्मस्वरूपाचा विसर पडला म्हणजे होतो. ८५हीच भ्रांति पुनः शुद्ध स्वरूपावर आलेली अन्य प्रकारानें तुला पुढें सांगूं. परंतु मूळ स्वरूपावर हें मायेचें रूप आहे ही गोष्ट तूं विसरूं नको. ८६ तर, माया ही माझी स्त्री असून अनंतरहित, तरुण,अलौकिक व गुणवान् आहे. ८७ हिचें रूप पाहूं गेलें असतां कांहीं नाहीं हेंच हिचें रूप.हिची आकृति फार व्यापक आहे. ही अज्ञान्याच्या सन्निध असते, व ज्ञान्यापासून दूर रहाते. ८८ परंतु ही माया माझ्या आत्मस्वरूपावर निजल्यामुळें आत्मसत्तेच्या संभोगानें गर्भ धारण करते. ८९ मग जीवभूता प्रकृतीच्या उदरीं प्राकृत अष्ट विकाररूप गर्भाची ही वृद्धि करिते. ९० आत्मा व प्रकृति यांच्या संयोगापासून प्रथम बुद्धितत्त्व उत्पन्न होतें, व तीच बुद्धि बळावल्यावर मन होतें. ९१ मना-

मता मनाची। ते अहंकार तत्त्व रची। तेणें महाभूतांची। अभिव्यक्ति होय९२ आणि विषयेंद्रियां गौसी। स्वभावें तंव भूतांसी। म्हणोनि येती सरिसीं। तियेंही रूपा ९३ जालेनि विकारक्षोभें। पाठीं त्रिगुणाचें उभें। तेव्हां ये वासनागर्भें। ठायेंठावो ९४ रुखाचा आवांका। जैसी बीजकणिका। जीवीं बांधे उदका। भेटतखेंवो ९५ तैसी माझेनि संगें। अविद्या नाना जगें। आर घेवों लागे। अणियाची ९६ मग गर्भगोळा तया। कैसें रूप तें ये आया। तें परियेसें राया। सुजनांचिया ९७ पैं मणिज स्वेदज। उद्भिज जारज। उमटती सहज। अवयव हे ९८ व्योमवायुवशें। वाढलेनि गर्भरसें। मणिजु उससे। अवयव तो ९९ पोटीं सूनि तमरजें। आगळिकां तोय तेजें। उठितां निपजे। स्वेदजु गा १०० आपपृथ्वी उत्कटें। आणि तमोमात्रें निकृष्टें। स्थावरु उमटे। उद्भिजु हा १ पांचां पांचही विरजीं। होती मनबुद्ध्यादि साजीं। हीं हेतु जारजीं। ऐसे जाण २ ऐसे चारी हे सरळ। करचरणतळ। महाप्रकृति स्थूळ। तेंचि शिर ३ प्रवृत्ति पेललें पोट। निवृत्ति ते पाठी नीट। सुर योनी आंगें आठ। उर्ध्वांचीं ४ कंठु उल्हासता स्वर्गु। मृत्युलोकु मध्यभागु। अधोदेशु चांगु। नितंबु तो ५ ऐसें लेंकरूं एक। प्रसवली हें देख। जयाचें तिन्ही लोक। बाळसें गा ६ चौऱ्यांयशीं लक्ष योनी। तियें कांडा पेरां सांदणीं। वाढे प्रतिदिनीं। बाळक हें ७ नाना देह अवयवीं। नामाचीं लेणीं लेववी। मोहस्तन्यें वाढवी। नित्य नवें ८ सृष्टी वेगवेगळीया। तिया करांघ्रीं आंगोळियां भिन्नाभिमान सूदलिया। मुदिया तेथें ९ हें एकोलतें चराचर। अविचारित सुंदर। प्रसवोनि थोर। थोरावली ११० पैं ब्रह्मा प्रातःकाळु। विष्णु तो मध्यान्ह वेळु। सदाशिव सायंकाळु। बाळा यया ११ महाप्रळयसेजे। खेळोनि निवांत निजे। विषमज्ञानें उमजे। कल्पोदयीं १२ अर्जुना इयापरी। मिथ्यादृष्टीच्या घरीं। युगानुवृत्तीची करी। चोज पाउलें १३ संकल्पु जयाचा इष्टु। अहंकारु तो विनटु। ऐसिया होय शेवटु। ज्ञानें यया १४ आतां असो हे बहु बोली। ऐसें विश्व माया व्याली। तेथ साह्य जाली। माझी सत्ता १५

सर्वयोनिषु कौंतेय मूर्तयः संभवंति याः। तासां ब्रह्म महद्योनिरहं बीजप्रदः पिता ॥४॥

याकारणें मी पिता। महद्ब्रह्म हे माता। अपत्य पंडुसुता। जगडंबरु १६ आतां शरीरें बहुतें। देखोनि न भेदें हो चित्तें। जें मनबुद्ध्यादि भूतें। एकेंचि

ची स्त्री ममता हिच्यापासून अहंकार उत्पन्न होतो, व त्याच्या योगानें पंचमहाभूतांची उत्पति होते; ९२ आणि विषय व इंद्रियें यांचा भूतांसह संबंध असल्यामुळें त्यांचीही यांचेबरोबर उत्पत्ति होते. ९३ विषय व इंद्रियें यांचा क्षोभ झाल्यावर पाठोपाठ सत्त्व, रज, तम हे तीन गुण असावयाचेच. त्यायोगानें वासना होईल त्याप्रमाणें जीव हा जागोजागीं जन्म घेतो. ९४ ज्याप्रमाणें बीजाची व पाण्याची गांठ पडल्याबरोबर त्यास अंकूर फुटून झाडाचें अवसान येतें, ९५ त्याप्रमाणें माझ्या संगानें मायेला अनेक प्रकारचे विश्वांकूर फुटूं लागतात. ९६ हे सुजनश्रेष्ठा, मग त्या गर्भाला कसें रूप येतें, तें ऐक. ९७ हें पहा- अंडज, स्वेदज, उद्भिज्ज आणि जारज असे अंकूर तिला साहजिक फुटतात. ९८ आकाश व वायु यांचा ज्यांत जास्त अंश असतो असा जो गर्भरस, त्याला मणिज असें नांव आहे; हा एक त्याचा अवयव होय. ९९ तम व रज या गुणांनीं युक्त असून ज्यांत जल व तेज यांचा अधिक अंश असतो, त्याला स्वेदज म्हणतात. १०० जल व पृथ्वी यांचा विशेष अंश असून, केवल ज्यांत तमोगुण दृष्टीस पडतो, ते उद्भिज्ज होत. १ पंचज्ञानेंद्रियें, व पंचकर्मेंद्रियें हीं ज्यांत समान असतात, व मन आणि बुद्धि यांची ज्याला जोड असते, ते जारज होत. २ याप्रमाणें हे—जारज, अंडज, स्वेदज व उद्भिज्ज असे- चार देह म्हणजे दोन हात व दोन चरणतळ असून अष्टधा प्रकृति हें ज्याचें शिर आहे; ३ प्रपंच हें ज्याचें मोठें पोट असून, निवृत्ति ही ज्याची पाठ आहे; व बेंबीवरील भागांत आठ देवसर्ग आहेत; ४ वरील स्वर्गलोक हा कंठ, मृत्युलोक हा मध्यभाग, व पाताळलोक हा कमरेखालील भाग होय; ५ असें एक लेंकरूं या मायेस झालें. तीन लोकचा विस्तार हें या मुलाचें बाळसें होय. ६ चौऱ्यांयशीं लक्ष योनि म्हणजे त्याच्या बोटांचीं पेरीं व सांधे असून, हें मूल प्रतिदिनीं वृद्धिंगत होतें. ७ नानाप्रकारचे देह, अवयव व नामें हे अहंकार घालून माया ही त्या मुलाला मोहरूप स्तनपान देऊन वाढविते. ८ वेगवेगळ्या सृष्टि ह्या त्याचीं बोटें व करंगळ्या होत. आणि निरनिराळ्या प्रकारचे देह ह्या त्यांमधील अंगठ्या होत. ९ असें एकुलतें एक विश्वरूपी लेंकरूं अज्ञानरूपी प्रकृतीस जन्मल्यावर, आपण भाग्यवान् आहों, असें तिला वाटलें. ११० ब्रह्मा हा या बाळाचा प्रातःकाल, विष्णु हा माध्यान्हकाल व सदाशिव हा सायंकाल म्हणजे उत्पत्ति, स्थिति व लय हे तीन काल होत; ११ आणि महाप्रलय हेंच याचें आंथरूण होय. त्यावर खेळ खेळून हें निवांत निजतें, व पुनः कल्पाचा उदय झाल्यावर विपरीत ज्ञानानें जागें होतें. १२ अर्जुना, याप्रमाणें मिथ्या ज्ञानाच्या व्यवहारांत कालगतीच्या योगानें हें लेंकरूं पाऊल टाकूं लागतें. १३ ज्याचा संकल्प हा आवडता स्नेही असून अहंकार ही शोभा आहे, अशा या बालकाला आत्मज्ञान झालें म्हणजे मरण येतें. १४ असो; आतां विशेष वर्णन न करतां इतकेंच सांगतों कीं, याप्रमाणें मायेपासून हें विश्व माझ्या सत्तेच्या साह्यानें उत्पन्न झालें. १५

अन्वय—कौन्तेय सर्वयोनिषु याः मूर्तयः सम्भवन्ति, तासां योनिः महद् ब्रह्म (अस्ति); अहं बीजप्रदः पिता (अस्मि). ४

अर्थ—हे कौंतेया, चौऱ्यांयशी लक्ष योनीमध्यें ज्या व्यक्ति उत्पन्न होतात, त्या सर्वांचें कारण महद्ब्रह्म [प्रकृति] आहे; आणि त्या प्रकृतीत बीजारोपण करणारा पिता मी आहें. ॥ ४ ॥

यास्तव, अर्जुना, मी बाप, माया ही आई, व हें जग आमचें लेंकरूं आहे. १६ या जगांत पुष्कळ शरीरें दृष्टीस पडल्यामुळें, जग माझें आपत्य असून माझें व त्याचें ऐक्य नाहीं, अशी शंका तुझ्या मनांत येऊं देऊं नको. कारण, सर्व भूतांची उत्पत्ति, मन, बुद्धि वगैरे पंचेंद्रियांपासूनच

येथें १७ हां गा एकचि देहीं । काय अनारिसें अवयव नाहीं । तेविं विचित्र विश्व पाहीं । एकचि हें १८ पैं उंचा नीचा डाहाळिया । विषमा वेगळालिया । येकाचि जेवीं जालिया । बीजाचिया १९ आणि संबंधु तोही ऐसा । मृत्तिके घटु लेंकु जैसा । कां पटत्व कापुसा । नातू होय १२० नाना कल्लोळपरंपरा । संतती जैसी सागरा । आम्हां आणि चराचरा । संबंधु तैसा २१ म्हणोनि वन्हि आणि ज्वाळ । दोन्ही वन्हीचि केवळ । तेविं मी गा सकळ । संबंधु वावो २२ जालेंनि जगें मी झांकें । तरि जगत्वें कोण फांके । किळेवरी माणिकें । लोपिजे काई २३ अळंकारातें आलें । तरि सोनेंपण काइ गेलें । कीं कमळ फांकलें । कमळत्वा मुके २४ सांग पां धनंजया । अवयवीं अवयविया । आच्छादिजे कीं तया । तेंचि रूप २५ कीं विरूढलिया जोंधळा । कणिसाचा निर्वाळा । वेंचला कीं आगळा । दिसतसे २६ म्हणोनि जग परौतें । सारूनि पाहिजे मातें । तैसा नोहें उखितें । आघवें मीचि २७ हा तूं साचोकारा । निश्चयाचा खरा । गांठी बांध वीरा । जीवाचिये २८ आतां मियां मज दाविला । शरीरीं वेगळाला । गुणीं मीचि बांधला । ऐसा आवडें २९ जैसें स्वप्नीं आपण । उठूनियां आत्ममरण । भोगिजे गा जाण । कपिध्वजा १३० कां कवळातें डोळे । प्रकाशूनि पिंवळें । देखती तेही कळे । तयांसीचि ३१ नाना सूर्यप्रकाशें । प्रकटी तैं अभ्र भासे । तो लोपला हेंही दिसे । सूर्यांचि कीं ३२ पैं आपणपेनि जालिया । छाया गा आपुलिया । बिहोनि बिहालिया । आन आहे ३३ तैसीं इयें नाना देहें । दाऊनि मी नाना होयें । तेथ ऐसा जो बंधु आहे । तेंही देखें ३४ बंधु कां न बंधिजे । हें जाणणें मज माझें । नेणणेनि उपजे । आपलेनि ३५ तरि कोणें गुणें कैसा । मजचि मी बंधु ऐसा । आवडे तें पारियेसा । अर्जुन देवा ३६ गुण ते किती किं धर्म । कायि ययां रूपनाम । कें जालें हें वर्म । अवधारीं पां ३७

सत्त्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसंभवाः । निबध्नंति महाबाहो देहे देहिनमव्ययम् ॥ ५ ॥

तरी सत्त्वरजतम । तिघांसि हें नाम । आणि प्रकृति जन्म- । भूमिका ययां ३८ येथ सत्त्व तें उत्तम । रज तें मध्यम । तिहींमाजीं तम । सावियाधारें ३९ हें एकेचि वृत्तीच्या ठायीं । त्रिगुणत्व आवडे पाहीं । वयसात्रय देहीं । येकीं जेविं १४० कां मीनलेनि कीडें । जंवजंव तूक वाढे । तंवतंव सोनें हीन पडे । पांचिका कसीं ४१ पैं सावधपण जैसें । वाहविलें आळसें । सु-

आहे १७ हें पहा कीं, एकाच शरीराला निरनिराळे अवयव नाहींत का? त्याप्रमाणें या जगांत जरा पुष्कळ देह दृष्टीस पडले तरी सर्व एकरूप आहेत. १८ हें बघ झाडास लांब, आंखूड, जाड व बारीक अशा खांद्या एकाच बीजापासून उत्पन्न झालेल्या असतात. १९ ह्मणून जगत् व मी यांचा संबंध असा आहे ज्याप्रमाणें, मातीपासून उत्पन्न झालेला घट मातीचें लेंकरूं होय, किंवा वस्त्र हें कापसाचें नातवंड होय; (कारण कापसाचें सूत बनल्यावर त्यापासून वस्त्र तयार होतें; १२० अथवा समुद्रावर उत्पन्न होणाऱ्या असंख्य लाटा, ज्याप्रमाणें समुद्राची संतति आहे,त्याप्रमाणेंच चराचर व मी यांचा संबंध आहे २१ म्हणून अग्नि व ज्वाला हीं दोन्ही ज्याप्रमाणें अग्नीचींच स्वरूपें होत. त्याप्रमाणें मी व जगत् हीं दोन्ही एकच स्वरूपें असून मजपासून जगाची उत्पत्ति असा संबंध म्हणणें व्यर्थ होय २२ जगाच्या उत्पत्तीमुळें जर माझें स्वरूप लोपतें म्हणावें तर हें जगत् कोणाच्या तेजानें प्रकट होतें? हें पहा माणकाच्या तेजानें माणीक झांकलें जातें का? २३ तसेंच सोन्याचे अलंकार बनविल्यानें त्यांतील सुवर्णत्व नाहींसें होतें क? अथवा कमल उमल्यावर त्याचें कमलत्व नाहींसें होतें कीं काय? २४ अर्जुना, अवयव धारण करणारा अवयवानें झांकला जातो किंवा अवयवांसहवर्तमान असणें हेंच त्याचें रूप आहे, सांग बरें? २५ जोंधळ्याचें वीं पेरल्यावर त्याला कणीस आलें म्हणजे तो कमी झाला ह्मणावा का वाढला ह्मणावा? २६ म्हणून, जगाला बाजूस सारून मला पाहूं म्हणशील, तर मी निराळा दिसणार नाहीं; कारण मीच सर्व जगद्रूप आहें. २७ हे वीरा, या सिद्धांताची तूं आपल्या मनांत खरोखर पूर्णपणें गांठ बांधून ठेव.२८ आतां मी जरी पुष्कळ शरीरांनीं वेगळा दृष्टीस पडलों, तरी तीं सर्व शरीरें एकाच गुणांनीं बांधलेलीं आहेत, असें समज. २९ हे कपिध्वजा, ज्याप्रमाणें मनुष्य स्वप्नामध्यें आपण मेलों आहों, अशी कल्पना करतें, १३० किंवा कांहीं काळ झालेला मनुष्याचे डोळे पिवळे होऊन, तो जी जी वस्तु पहातो ती ती त्यास त्याच डोळ्यांनीं पिवळी दिसते, ३१ अथवा सूर्याच्या प्रकाशानें जसें अभ्र दिसतें व तो अभ्राच्छादित झाला हेंही त्याच्याच तेजानें दिसतें; ३२ किंवा हें पहा-आपल्यामुळेंच पडलेली आपली छाया पाहून जो भितो, तो ज्या छायेला भ्याला त्या छायेहून निराळा आहे का? ३३ त्याचप्रमाणे, जगांत जरी पुष्कळ देह दृष्टीस पडले, तरी तितक्या अनंत रूपानें मीच बनलों आहें. त्या ठिकाणीं अनेकत्वाचा जो बंध आहे त्यालाही मीच जाणतों. ३४ बंध किंवा मोक्ष हे माझ्याच ठिकाणीं मद्रूपानें जाणणें आहे. अज्ञान्याला आपलें स्वरूप न समजल्यामुळें बंध, मोक्ष त्याच्या ठिकाणीं उत्पन्न होतात. ३५ अर्जुना, मीच मला बंध कोणच्या गुणांनीं कमी आहेसा वाटतों, तें ऐक. ३६ आतां अगोदर गुण किती आहेत व त्यांचे धर्म काय आहेत, आणि त्यांचें स्वरूप व त्यांचीं नांवें, आणि ते कोठें झाले, ह्याचें वर्म सांगतों, ऐक. ३७

अन्वय-महाबाहो, सत्त्व, रजः तमः इति गुणाः प्रकृतिसंभवाः संति; ते) देहे अव्ययं देहिनं निबध्नंति. ॥ ५ ॥

अर्थ-हे महाबाहो सत्त्व, रज व तम हे तीन गुण प्रकृतीपासून उत्पन्न झालेले आहेत; ते या देहांत अविनाशी आत्म्याला बांधून टाकतात. ॥ ५ ॥

तरी सत्व, रज, तम अशी गुणांचीं तीन नांवें आहेत, व ते मायेपासून उत्पन्न झाले आहेत. ३८ त्यांत सत्त्वगुण हा उत्तम, रजोगुण हा मध्यम, व तमोगुण कनिष्ठ होय. ३९ हे तिन्ही गुण एकाच अंतःकरणवृत्ताच्या ठिकाणीं उत्पन्न होतात. त्यामुळें अंतःकरणही त्रिगुण आहे असें वाटतें. ज्याप्रमाणें एकाच देहास बाल्य, तारुण्य, व वार्धक्य या तिन्ही अवस्था येतात; १४० किंवा उत्तम सोन्यांत किडाळ सोनें मिळविल्यावर जों जों त्याचें वजन वाढतें तों तों सोनें फिकें दिसून कसास कमी उतरतें; ४१ ज्याप्रमाणें आळस आल्यावर जागृति

घुसि बैसे । वगावोनी ४२ तैसी अज्ञानांगीकारें । निघाली वृत्ति विखुरे । ते सत्त्वरजद्वारें । तमही होय ४३ अर्जुना गा जाण । ययां नाम गुण । आतां दाखऊं खुण । बांधिती ते ४४ तरी क्षेत्रज्ञदशे । आत्मा मोटका पैसे । हें देह मी ऐसें । कुमुहूर्त करी ४५ आजन्ममरणांतीं । देहधर्मीं समस्तीं । ममत्वाची सूती । घे ना जंव ४६ जैसी मीनाच्या तोंडीं । पडेना जंव उंडी । तंव गळ आसुडी । जळपारधी ४७

तत्र सत्त्वं निर्मलत्वात्प्रकाशकमनामयम् । सुखसंगेन बध्नाति ज्ञानसंगेन चानघ ॥ ६ ॥

तेविं सत्त्वें लुब्धकें । सुखज्ञानाचीं पाशकें । वोढिजती मग खुडके । मृगु जैसा ४८ मग ज्ञानें चडफडी । जाणिवेचे खुरखोडी । स्वयं सुख हें धाडी । हातींचें गा ४९ तेव्हां विद्यामानें तोखे । लाभमात्रें हरिखे । मी संतुष्ट हेंही देखे । श्लाघों लागे १५० म्हणे भाग्य ना माझें । आजि सुखियें नाहीं दुजें । विकाराष्टकें फुंजे । सात्त्विकाचेनि ५१ आणि येणेंही न सरे । लांकण लागे दुसरें । जें विद्वत्तेचें भरे । भूत आंगीं ५२ आपणचि ज्ञानस्वरूप आहे । तें गेलें हें दुःख न वाहे । कीं विषयज्ञानें होये । गगनायेवढा ५३ रावो जैसा स्वप्नीं । रंकपणें निघे धानीं । तो दों दाणा मानी । इंद्रु ना मी ५४ तैसें गा देहातीता । जालेया देहवंता । हों लागे पंडुसुता । बाह्यज्ञानें ५५ प्रवृत्तिशास्त्र बुझे । यज्ञविद्या उमजे । किंबहुना सुझे । स्वर्गवरी ५६ आणि म्हणे आजि आन । मीवांचूनि नाहीं सज्ञान । चातुर्यचंद्रा गगन । चित्त माझें ५७ ऐसें सत्त्व सुखज्ञानी । जीवासि लाऊनि कानीं । बैलाची करी वानी । पांगुळाचिया ५८ आतां हाचि शरीरीं । रजे जियापरी । बांधिजे ते अवधारीं । सांगिजेल ५९

रजो रागात्मकं विद्धि तृष्णासंगसमुद्भवं । तन्निबध्नाति कौंतेय कर्मसंगेन देहिनम् ॥ ७ ॥

हें रज याचि कारणें । जीवातें रंजऊं जाणे । हें अभिलाखाचें तरुणें । सदाचि गा १६० हें जीवीं मोटकें रिगे । आणि कामाच्या मदीं लागे । मग वारया वळघे । तृष्णेचिया ६१ घृतें आंबुखूनि आगिआळें । वडवाग्नीचें सादुकलें । आतां बहु थेंकुलें । आहे तेथ ६२ तैसी खवळे चाड । होय दुःखासकटं गोड । इंद्रश्रीहि सांकड । गमों लागे ६३ तैसी तृष्णा वाढनलिया । मेरुही हाता आ-

नाहींशी होऊन झोंप वाढते, ४२ त्याप्रमाणें. अज्ञानाचा स्वीकार केल्यावर जी वृत्ति व दते तिला सत्व, रज, तम असें म्हणतात. ४३ अर्जुना, ज्यांच्या योगानें वृत्ती निरनिराळ्या तऱ्हेची होते, त्यांना गुण असें म्हणतात. आतां ते आत्म्याला कसें बंधन करितात, तें सांगतों. ४४ तर जीवात्मा ज्या वेळेस देहाचा अभिमान धारण करतो, त्याच वेळेस त्याला वाईट शकून होतो, असें समज. ४५ वाईट शकुनाचें फल काय म्हणशील तर, देहाच्या ठिकाणीं हा देह माझा आहे, इतका अभिमान धारण केल्याबरोबर जन्मापासून मरणापर्यंत सर्व देहधर्मांचीं दुःखें भोगण्याचा प्रसंग येतो. ४६ ज्याप्रमाणें गळास लाविलेलें अमिष मासा धरतो न धरतो, इतक्यांत मासे धरणारा गळाला हिसडा मारून प्राण घेतो. ४७

अन्वय अनघ तत्र अनामय प्रकाशक सत्त्व निर्मलत्वात् (आत्मान सुखसंगेन ज्ञानसंगेन च बध्नाति ॥ ६ ॥

अर्थ–हे निष्पाप अर्जुना, त्यांमध्यें निर्दोष आणि प्रकाशक असा जो सत्त्वगुण, तो निर्मल असल्यामुळें आत्म्याला सुखसंबंधान व ज्ञानसंबंधानें या देहांत बांधून ठेवतो. ॥ ६ ॥

त्याप्रमाणें सत्वगुण हाच कोणी पारधी सुख व ज्ञान या पाशांनीं जीवास ओढतो; व ज्याप्रमाणें मृग पारध्याच्या पाशांत सांपडल्यावर तडफडतो, ४८ त्याप्रमाणें जीव सत्वगुणाच्या सपाट्यांत सांपडल्यावर, मी ज्ञानी आहें अशी वल्गना करतो. आणि माझ्याप्रमाणें कोणी जगांत ज्ञाता नाहीं अशी घमेंड बाळगतो, याकारणानें आत्मज्ञानापासून होणारें सुख आपल्या हातचें दवडतो. ४९ मग विद्वान् म्हणून कोणी आपला बहुमान केला असतां आनंद पावतो, व थोड्या लाभानेंही हर्ष मानतो. माझ्याप्रमाणें कोणी जगांत सुखी नाहीं असे मानतो, १५० व माझ्यासारखा या जगांत दुसरा कोणी सुखी नाहीं हें माझें केवढें भाग्य आहे, असें मानून अष्टसात्विक भावांनीं ताठतो. ५१ आणि एवढ्यानेंच आटोपत नाहीं, तर जगांत कायतो मी विद्वान् हें अहंकाराचें दुसरें एक लचांड त्याच्या पाठीस लागतें. ५२ आपण स्वतः ज्ञानरूपी आहों, याचें ज्ञान नाहींसें झाल्याबद्दल त्यास दुःख वाटत नाहीं, परंतु उलट विषयज्ञानाच्या भरांत तो गगनाएवढा फुगतो. ५३ ज्याप्रमाणें एकादा राजा स्वप्नांत भिकारी होऊन भिक्षा मागण्यास निघाल्यावर इतरांपेक्षां थोडी जास्त भिक्षा मिळाल्यामुळें आपण इंद्र ह्मणजे मोठे भाग्यवान् आहों असें मानीत नाहीं का? ५४ त्याप्रमाणें, अर्जुना, जीवात्म्यानें देहाचा अभिमान धरल्यावर ब्रह्मज्ञानानें त्याची स्थिति होते, ५५ प्रवृत्तिशास्त्रांत तो निपुण होतो, यज्ञविद्येंत तो निष्णात बनतो, किंबहुना तो स्वर्गातीलही बातमी जाणतो. ५६ आणि मजवांचिवाय या जगांत दुसरा कोणी ज्ञानवान् नाहीं व चातुर्यरूपी चंद्रास प्रकाश करण्यास माझें चित्त गगनरूपी आहे, असें मानतो. ५७ याप्रमाणें सत्त्वगुण हा, जीवात्म्यास सुख व ज्ञान यांच्या दोऱ्या कानास लावून पांगूळ जसा बैलास ओढतो, त्याप्रमाणें आपल्या तात्पर्यांत आणतो. ५८ आतां, रजोगुणही या जीवास या शरीराचे ठिकाणीं कसें बंधन करतो, तीं लक्षणें ऐक. ५९

अन्वय–कौन्तेय, रागात्मकं रजः तृष्णासंगसमुद्भवं; विद्धि; तत् देहिन कर्मसंगेन निबध्नाति. ॥ ७ ॥

अर्थ–हे कौंतेया, प्रीतिस्वरूप जो रजोगुण, तो आशा व आसक्ति याच्या संबंधान उत्पन्न झाला आहे; तो आत्म्याला कर्मा-या आसक्तीनें या देहांत बांधून ठेवतो. ७॥

या गुणापासून जीवाचें नेहमीं रंजन होतें, व कामवासना सदैव जागृत रहाते, ह्मणून त्यास रजोगुण असें म्हणतात. ६० जीवाच्या ठिकाणीं याचा थोडा शिरकाव होतांक्षणीं हा त्याला कामाच्या नादीं लावतो, मग मनाच्या इच्छा वाऱ्याप्रमाणें वाहूं लागतात. ६१ मग, अग्निकुंडांत अग्नीवर तूप घातलें ह्मणजे जसा वज्राग्नि भडकतो, व त्याला लहान व मोठी वस्तु यांचें भान न रहातां तो सर्वांचा नाश करतो, ६२ त्याप्रमाणेंच याच्या इच्छा प्रबल होऊन दुःखदायक गोष्टीही त्याला सुखदायक वाटतात, व इंद्रलोक जरी प्राप्त झाला, तरी त्याची तृप्ति होत नाहीं. ६३ अशा प्रकारें विषयवासना वाढल्यावर, मेरु पर्वतही त्याच्या हस्तगत झाला, तरी त्यापेक्षांही अधिक मोठी वस्तु प्राप्त

लिया । तन्ही म्हणे एखादिया । दारुणा वळघो ६४ जीविताची कुरोंडी । वों-वाळूं लागे कवडी । मानी तृणाचिये जोडी । कृतकृत्यता ६५ आजि असतें वेंचिचेल । परि पाहे काय कीजेल । ऐसा पांगी वडील । व्यवसाय मांडी ६६ म्हणे स्वर्गा हन जावें । तरि काय तेथें खावें । इयालागीं धांवे । याग करूं ६७ व्रतापाठीं व्रतें । आचरे इष्टापूर्तें । काम्यावांचूनि हातें । शिवणें नाहीं ६८ पैं ग्रीष्मांतींचा वाग । विसांवो नेणे वी-ा । तैसा न म्हणे व्यापारा । रात्र दि-वस ६९ काय चंचळु मासा । कामिनीकटाक्षु जैसा । लवलाहो तैसा । विजूही नाहीं १७० तेतुलेनि गा वेगें । स्वर्गसंसारपांगें । आगीमाजीं रिगे । क्रियां-चिये ७१ ऐसा देहीं देहावेगळा । ले तृष्णेचिया सांखळा । खटाटोपु वाहे गळां । व्यापाराचा ७२ हें रजोगुणाचें दारुण । देहीं देहियासि बंधन । परिस आतां विंदाण । तमाचें तें ७३

तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्वदेहिनाम् । प्रमादालस्यनिद्राभिस्तन्निबध्नाति भारत ॥८॥

व्यवहाराचेहि डोळे । मंद जेणें पडळें । मोहरात्रीचें काळें । मेहुडें जें ७४ अज्ञानाचें जियालें । जया एका लागलें । जेणें विश्व भुललें । नाचत असे ७५ अविवेकमहामंत्र । जें मौढ्यमद्याचें पात्र । हें असो मोहनास्त्र । जीवांसि जें७६ पार्था तें गा तम । रचूनि ऐसें वर्म । चौखुरी देहात्म । मानियातें ७७ हें एकचि कीर शरीरीं । माजों लागे चराचरीं । आणि तेथ दुसरी । गोठी नाहीं ७८ सर्वें-द्रिया जाड्य । मनामाजि मौढ्य । माल्हाती दार्ढ्य । आलस्याचें ७९ आंगें आंग मोडामोडी । कार्यजातीं अनावडी । नुसती परवडी । जांभयांची १८० उघडियाची दिठी । देखणें नाहीं किरीटी । नाळवितांचि उठी । वो ह्मणौनि ८१ पडलिये घोंडी । नेणे कानीं मुरडी । तयाचि परी मुरकुंडी । उकलूं नेणें ८२ पृथ्वी पाताळीं जावो । कां आकाशही वरी येवो । परी उठणें हा भावो उपजों नेणे ८३ उचितानुचित आघवें । झांसुरतां नाठवे जीवें । जेथिंचा तेथ लोळावें । ऐसी मेधा ८४ उभऊनि करतळें । पडिघाये कपोळें । पायाचें शिरि-याळें । मांडूं लागे ८५ आणि निद्राविषयीं चांगु । जीवीं आथि लागु । झोंपीं जातां स्वर्गु । वावो म्हणे ८६ ब्रह्मायु होइजे । मा निजेलियाचि असिजे । हें वांचूनि दुजें । व्यसन नाहीं ८७ कां वाटे जातां वोघें । कल्हातांही डोलो लागे । अमृतही परी नेघे । जरी नीद आली ८८ तेविंचि आक्रोशबळें । व्या-

व्हावी असें म्हणतो. ६४ एका कवडीवरूनही आपलें जीवित ओंवाळून टाकण्यात तो मागेंपुढें पहात नाहीं, आणि तृणाइतकी जरी अल्प वस्तु प्राप्त झाली, तरी आपल्यास धन्य मानतो. ६५ आपल्या जवळ असलेलें द्रव्य जर आज संपविलें, तर उद्यां आपली काय वाट होणार, असें मानून तृष्णेच्या जोरावर मोठमोठे उद्योग सुरू करतो; ६६ आणि म्हणतो कीं, जर आपल्यास स्वर्गप्राप्ति झाली, तर त्या ठिकाणीं आपल्यास खावयास काय मिळणार ? याकरितां यज्ञयागादि क्रिया करतो. ६७ व्रतावर व्रतें करतो; इष्टापूर्त (विहिरी तलाव वगैरे बांधणें, यज्ञयागादि करणें) कर्में करतो, काम्य (कामनिक) व्रतांवांचून इतर व्रतांचें आचरण करीत नाहीं; ६८ ज्याप्रमाणें ग्रीष्मऋतूंतील अखेरचा आषाढ महिन्यांतला वारा रात्रंदिवस सारखा वहातो, त्याप्रमाणें अर्जुना, अशा प्रकारच्या व्यापारांत हा रात्रंदिवस खपत असतो. ६९ मासा किंवा कामिनी स्त्रीचें नेत्रकटाक्ष हे चंचल आहेत, व विजेला तर अति चंचल असें म्हणतात; परंतु त्यांची रजोगुणाच्या चंचलतेशी तुलना केली असतां ती कमी भरतील; १७० अशा अति वेगानें स्वर्ग व संसार यांच्या प्राप्तीकरितां हा अग्नींतही उडी टाकण्यास मागेंपुढें पहात नाहीं. ७१ याप्रमाणें देहांत असून देहावेगळा जो जीव,तो तृष्णेच्या सपाट्यांत सांपडल्यावर आपल्या गळ्यांत व्यापाराचा साखळदंड बागवितो. ७२ अशा रीतीनें देहांत राहाणारा जो जीव, त्याला रजोगुणाचें बळकट बंधन असतें. आतां तमोगुणाचें लक्षण ऐक. ७३

अन्वय-भारत, तमः तु सर्वदेहिनां मोहनं अज्ञानजं विद्धि; तत् (देहिनं) प्रमादालस्यनिद्राभिः निबध्नाति. ॥ ८

अर्थ-हे भारता, प्राणिमात्राला मोहून टाकणारा तमोगुण तर अज्ञानापासून उत्पन्न झाला आहे असें तूं समज. तो या देहांत आत्म्याला कर्तव्याविषयीं दुर्लक्ष, आळस व झोंप यांनीं बांधून टाकतो. ॥ ८ ॥

ज्याच्या पडद्यानें मनुष्याची व्यवहाराकडील दृष्टि मंद होते; जें मोहरूप रात्रीचें काळेंभोर असें आभाळच; ७४ जो तमोगुण अज्ञानानें वाढतो, तो सर्व विश्वास अज्ञानांत पाडून नाचविती. ७५ हा तमोगुण अविचाराचा सहचर होय. व अज्ञानरूपी सद्याचें पात्र होय. फार काय सांगावें, जीवास मोह घालणारें असें हें एक अस्त्रच होय. ७६ पार्था, ह्या लक्षणावरून तमोगुण असें म्हणतात, व जे देहालाच आत्मा मानतात, त्यांना हाच खालून टाकतो. ७७ हा तमोगुण एकटाच चराचराच्या अंगी बहु काळचा, म्हणजे त्या ठिकाणीं दुसऱ्या कोणाचाही शिरकाव होऊं देत नाहीं. ७८ हा सर्व इंद्रियांना जडत्व आणतो, मनाला मूढत्व आणतो, व याच्या योगानें आळस येतो. ७९ याच्या योगानें मनुष्य नेहमीं अंग मोडतो. काम करण्याची हौस नसते, आणि जांभयांची रेलचेल होते. १८० अर्जुना, त्या मनुष्याचे डोळे उघडे असूनही त्याला समोरील वस्तु दिसत नाहींत, आणि हांका मारल्याशिवाय तो मध्येंच ' ओ ' म्हणून अंथरुणांतून उठतो. ८१ मोठा एकादा धोंडा खालीं पडल्यावर तो जसा एका बाजूवरून दुसऱ्या बाजूवर फिरत नाहीं, त्याप्रमाणें हा मुरकुंडी मारून एकदा निजला, म्हणजे ह्या कुशीचा त्या कुशीवर होत नाहीं. ८२ पृथ्वी पाताळांत जावो,अथवा आकाश तुटून पडो, परंतु यान्या मनांत उठण्याची म्हणून इच्छा उत्पन्न होत नाहीं. ८३ हा स्वस्थ निजल्यावर आपल्या आन्हिक कर्मांची सुद्धां यास आठवण होत नाहीं; परंतु अंथरुणाच्या अंथरुणावरच लोळावें, अशी त्याची वळकट बुद्धि असते. ८४ हात वर करून, बोटांत बोटें अडकवून व ते डोक्यावर ठेवून हा गुडघ्यांत डोकें घालून बसतो; ८५ आणि मनांत निद्रेविषयीं पूर्ण इच्छा धरून, झोंप लागल्यावर तिच्यापुढें स्वर्ग देखील तुच्छ मानतो. ८६ मला ब्रह्मदेवाचें आयुष्य यावें, व मी असाच निजला रहावा, याशिवाय त्याला दुसरें व्यसन कांहीं नसतें. ८७ वाटेनें जातांना जर पाय घसरून पडला, तर त्या ठिकाणींही त्याला झोंप लागते, आणि झोंप जर आली असली, तर कोणी अमृत देऊं लागल्यास त्याचा देखील तो अव्हेर करतो. ८८ त्याचप्रमाणें, रागानें किंवा ब-

पारे कोणे एके वेळे । निगालें तरी आंधळें । रोवें जैसें ८९ केधवां कैसें राहाटावें । कोणेसीं काय बोलावें । हें ठाकतें कीं नागवे । हेंही नेणे १९० वणवामियां आघवा । पांखें पुसोनि घेयावा । पतंगु पां हांवा । घाली जेविं ९१ तैसा वळघे साहसा । अकरणींच धिंवसा । किंबहुना ऐसा । प्रमादु रुचे ९२ एवं निद्रालस्यप्रमादीं । तम इया त्रिबंधीं । बांधे निरुपाधी । चोखटातें ९३ जैसा वन्ही काष्ठीं भरे । तैं दिसे काष्ठाकारें । व्योम घटे आवरे । तें घटाकाश ९४ नाना सरोवर भरलें । तैं चंद्रत्व तेथें बिंबलें । तैसें गुणाभासीं बांधलें । आत्मत्व गमे ९५

सत्त्वं सुखे संजयति रजः कर्मणि भारत । ज्ञानमावृत्य तु तमः प्रमादे संजयत्युत ॥९॥
रजस्तमश्चाऽभिभूय सत्त्वं भवति भारत । रजः सत्त्वं तमश्चैव तमः सत्त्वं रजस्तथा ॥१०॥

पैं हरूनि कफवात । जैं देहीं आटोपे पित्त । तैं करी संतप्त । देह जेविं९६ कां वरिष आतप जैसें । जिणोनि शीतचि दिसे । तेव्हां होय हिंव ऐसें । आकाश हें ९७ नाना स्वप्न जागृती । लोपूनि ये सुषुप्ति । तैं क्षणु एक चित्तवृत्ती । तेचि होय ९८ तैसीं रजतमें हारवी । जैं सत्त्व माजु मिरवी । तैं जीवाकरवीं म्हणवी । सुखिया ना मी ९९ तैसेंचि सत्त्व रज । लोपूनि तमाचें भोज । वळघे तैं सहज । प्रमादी होय २०० तयाचि गा परिपाठीं । सत्त्व तमातें पोटीं । घालूनि जेव्हां उठी । रजोगुण १ तेव्हां कर्मावांचूनि कांहीं । आन गोमटें नाहीं । ऐसें मानी देहीं । देहराजु २ त्रिगुण वृद्धी निरूपण । तीं श्लोकीं सांगितलें जाण । आतां सत्त्वादि वृद्धिलक्षण । सादर परियेसी ३

सर्वद्वारेषु देहेऽस्मिन्प्रकाश उपजायते । ज्ञानं यदा तदा विद्याद्विवृद्धं सत्त्वमित्युत ॥११॥
लोभः प्रवृत्तिरारंभः कर्मणामशमः स्पृहा । रजस्येतानि जायंते विवृद्धे भरतर्षभ ॥१२॥
अप्रकाशोऽप्रवृत्तिश्च प्रमादो मोह एव च । तमस्येतानि जायंते विवृद्धे कुरुनंदन ॥१३॥
यदा सत्त्वे प्रवृद्धे तु प्रलयं याति देहभृत् । तदोत्तमविदाँल्लोकानमलान्प्रतिपद्यते ॥१४॥
रजसि प्रलयं गत्वा कर्मसंगिषु जायते । तथा प्रलीनस्तमसि मूढयोनिषु जायते ॥१५॥

पैं रजतमविजयें । सत्त्व गा देहीं इये । वाढतां चिन्हें तियें । ऐसी होती४ जे प्रज्ञा आंतुलीकडे न समाती बाहेरी वोसंडे । वसंतीं पद्मखंडें । दृती जैसी ५ सर्वेंद्रियांच्या आंगणी । विवेक करी राबणी । साचचि करचरणीं । होती

लाकारानें एकादा व्यापार करूं लागला, तर व तम यापेक्षां जेव्हां सत्त्वगुण अधिक वाढतो, आंधळ्यानें जसें चालावें, त्याप्रमाणें त्याचा तेव्हां 'मी सुखी आहें' असें तो या जीवास म्हव्यापार ज्ञानशून्य असतो. ८९ कारण, कोणच्या णावयास लावतो. ९९ त्याचप्रमाणें, सत्त्व व रज वेळेस कसें वागावें, कोणाबरोबर कसें बोलावें, व या गुणांचा लोप होऊन जेव्हां तमाचें प्राबल्य ज्याच्या बरोबर देवघेव करावयाची तो घरंदाज होतें तेव्हां साहजिकपणें प्रमाद घडून येतात. आहे अथवा कफल्लक आहे, ह्याचाही तो विचार २०० त्याच रीतीनें सत्त्व व तम या गुणांना दाकरीत नाहीं. १९० ज्याप्रमाणें, वणवा लागला अ- वून जेव्हां रजोगुण बळावतो, १ तेव्हां देहांत रहासतां तो मी आपले पंखांनीं स्वाधीन करून घेईन, णारा जो देहाचा राजा जीवात्मा, त्याला कर्मांवांचून अशी पतंगास अज्ञानमूलक इच्छा असते, ९१ त्या- दुसरें कांहीं चांगलें दिसत नाहीं. २ याप्रमाणें तीन प्रमाणें साहस कर्म करण्यास प्रवृत्त होऊन वेदबाह्य श्लोकांनीं तीन गुणांचें निरूपण केलें. आतां ह्या कर्मे करण्याची त्याला हौस असते; किंबहुना असले सत्त्वादि गुणांच्या वृद्धीचें लक्षण लक्षपूर्वक ऐक. ३

प्रमाद करणेंच त्याला गोड वाटतें. ९२ याप्रमाणें तमो- **अन्वय**–उत यदा अस्मिन् देहे सर्वद्वारेषु प्रकाशः ज्ञानं गुण हा निद्रा, आळस व प्रमाद या तीन पाशांनीं उपा- च उपजायते, तदा सत्त्वं विवृद्धं इति विद्यात् ॥ ११ ॥ भरधिरहित अशा जीवास बंधन करतो. ९३ ज्याप्रमाणें तर्षभ, लोभः, प्रवृत्तिः, कर्मणाम् आरंभः, अशमः, स्पृहा अग्नि काष्ठास लागला असतां काष्ठाच्या आकाराप्र- एतानि (चिन्हानि) रजसि विवृद्धे (सति) जायन्ते.॥१२॥ माणें दिसतो, किंवा आकाश हें घटांत त्या घटाच्या कुरुनंदन, अप्रकाशः, अप्रवृत्तिः च, प्रमादः च, मोहः एव, एतानि आकाराप्रमाणें भासतें, ९४ अथवा भरलेल्या सरोवरांत तमसि विवृद्धे (सति) जायन्ते. ॥१३॥ यदा तु सत्त्वे प्रवृद्धे चंद्राचें बिंब दिसतें, त्याप्रमाणें, जीव गुणपाशांनीं बद्ध (सति) देहभृत् प्रलयं याति, तदा उत्तमविदां अमलान् लोकान् झाल्यावर गुणांच्या लक्षणांसारखा दिसतो. ९५ प्रतिपद्यते. ॥१४॥ (देहभृत्) रजसि प्रलयं गत्वा कर्मसंगिषु

अन्वय–भारत, सत्त्वं (देहिनं) सुखे संजयति; रजः जायते; तथा (सः, तमसि प्रलीनः मूढयोनिषु जायते ॥१५॥ कर्मणि (संजयति; उत तमः तु ज्ञानं आवृत्य प्रमादे संजयति, ॥ ९ ॥ भारत, सत्त्वं, रजः तमः च अभिभूय (स्वयं) भवति; रजः, सत्त्वं तमः च (अभिभूय स्वयं भवति); तथा तमः, सत्त्वं रजः च (अभिभूय स्वयं भवति). ॥ १० ॥

अर्थ–हे भारता, सत्त्वगुण हा आत्म्याला सुखाचा संबंध करून देतो; रजोगुण हा आत्म्याला कर्माचा संबंध करून देतो; व तमोगुण तर ज्ञान आच्छादन करून आत्म्याला कर्तव्याविषयीं दुर्लक्षाचा संबंध करून देतो. ॥ ९ ॥ हे भारता, सत्त्वगुण हा रज व तम या गुणांना जिंकून आपण वाढतो; रजागुण हा सत्व आणि तम या गुणांना जिंकून आपण वाढतो; आणि तमोगुण हा सत्त्व आणि रज या गुणांना जिंकून आपण वाढतो ॥ १० ॥

हे पहा–कफ व वात यांस मागें सारून देहांत पित्त वाढलें असतां तें जसें शरीर तप्त करितें, ९६ किंवा उन्हाळा आणि पावसाळा निघून गेल्यावर थंडी पडूं लागली असतां, आकाश चहूंकडे थंड होऊन जातें. ९७ अथवा जागृति व स्वप्न ह्या अवस्था नाहींतशा होऊन गाढ झोंप लागली असतां जशी क्षणभर चित्तवृत्ति होते, ९८ त्याप्रमाणें रज

अर्थ–या देहामध्यें सर्व इंद्रियांच्या ठिकाणीं ज्ञानाचा प्रकाश पडतो, तेव्हां सत्त्वाची वृद्धि झाली आहे असें समजावें. ॥ ११ ॥ हे भरतश्रेष्ठा, लोभ, प्रवृत्ति, कर्मारंभ, उच्छृंखलपणा आणि इच्छा हीं चिन्हें [रजोगुणाची विशेष वृद्धि झाली असतां] उत्पन्न होतात. ॥ १२ ॥ विवेकाचा नाश, उद्योगाचा कंटाळा, दुर्लक्ष, आणि मोह हीं चिन्हें [तमोगुणाची विशेष वृद्धि झाली असतां]. उत्पन्न होतात. ॥ १३ ॥ सत्त्वाची वृद्धि झाली असतां जर प्राणी मृत्यु पावला, तर तो, महत्तत्त्वादिक जाणणाऱ्यांना जो उत्तम लोक प्राप्त होतो, त्या उत्तम लोकाप्रत [ब्रह्मलोकाप्रत] जातो. ॥ १४ ॥ रजोगुणाची वृद्धि झाली असतां जर प्राणी मृत्यु पावला, तर, कर्मांच्या ठायीं आसक्त असे जे जन, त्यांमध्यें तो जन्म पावतो; आणि तमोगुणाची वृद्धि झाली असतां जर प्राणी मृत्यु पावला, तर तो पशु इत्यादि मूढ योनींत जन्म पावतो. १५

हें पहा–रज व तम या गुणांना जिंकून जेव्हां सत्त्वगुण या देहांत वाढतो, तेव्हां जीं लक्षणें होतात तीं अशीं: ४ वसंत ऋतूमध्यें कमलें फुलल्यावर त्यांचा वास जसा चहूंकडे पसरतो, त्याप्रमाणें ज्ञान हें अंतर्यामीं ओतप्रोत भरून बाहेर निघतें, ५ सर्व इंद्रियांमध्यें विचार असतो, व खरोखर हा-

डोळे ६ राजहंसापुढें । चांचूचें आगरडें । तोडी जेविं झगडे । क्षीरनीराचे ७ तेविं दोषादोषविवेकीं । इंद्रियेंचि होती पारखीं । नियमु बारे पायिकीं । वोळगे तैं ८ नायिकणें तें कानचि वाळी । न पाहणें तें दिठीचि गाळी । अवाच्य तें टाळी । जीभचि गा ९ वाती पुढां जैसें । पळों लागे काळवसें । निषिद्ध इंद्रियां तैसें । समोर नोहे २१० धाराधरकाळें । महानदी उचंबळे । तैसी बुद्धि पघळे । शास्त्रजातीं ११ अगा पुनवेच्या दिवशीं । चंद्रप्रभा धांवे आकाशीं । ज्ञानीं वृत्ति तैसी । फांके सैंघ १२ वासना एकवटे । प्रवृत्ति वोहटे । मानस विटे । विषयांवरी १३ एवं सत्त्व वाढे । तैं हें चिन्ह फुडें । आणि निधनही घडे । तेव्हांचि जरी १४ कां पाहालेनि सुयाणें । जालया परगुणें । पढियंतें पाहुणें । स्वर्गोनियां १५ तरि जैसीचि घरींची संपत्ती । आणि तैसीच औदार्यधैर्यवृत्ती । मा परत्रा आणि कीर्तीं । कां नोहावें १६ मग गोमटेया तया । जावळी असे धनंजया । तेविं सत्त्वीं जाणें देहा । कें आथि गा १७ जे स्वगुणीं उद्भट । घेऊनि सत्त्व चोखट । निगे सांडूनि कोपट । भोगक्षेम हें १८ अवचटें ऐसा जो जाये । तो सत्त्वाचाचि नवा होये । किंबहुना जन्म लाहे । ज्ञानियांमाजीं १९ सांग पां धनुर्धरा । रावो रायपणें डोंगरा । गेलिया अपुरा होय काई २२० नातरि येथिंचा दिवा । नेलिया सेजिया गांवा । तो तेथें तरि पांडवा । दीपचि कीं २१ तैसी ते सत्त्वशुद्धी । आगळी ज्ञानेंसी वृद्धी । तरंगावों लागे बुद्धी । विवेकावरी २२ पैं महदादि परिपाठी । विचारूनि शेवटीं । विचारासकट पोटीं । जिरोनि जाय २३ छत्तिसां सदतिसावें । चोविसां पंचविसावें । तिन्ही नुरोनि स्वभावें । चतुर्थ जें २४ ऐसें सर्व जें सर्वोत्तम । जालें असे जया सुगम । तयासवें निरुपम । लाहे देह २५ इयाचि परि देख । तमसत्त्व अधोमुख । बैसोनि जैं आगळीक । धरी रज २६ आपलिया कार्याचा । धुमाड गांवीं देहाचा । माजवी तैं चिन्हांचा । उदयो ऐसा २७ पांजरली वाहटुळी । करी वेगळ वेंटाळी । तैसी विषयीं सरळी । इंद्रियां होय २८ परदारादि पडे । परि विरुद्ध ऐसें नावडे । मग शोळियेचेनि तोंडें । सैंघ चारी २९ हा ठायवरी लोभु । करी स्वैरत्वाचा राबु । वेंटाळितां अलाभु । तें तें उरे२३० आणि आड पडलिया । उद्यमा जाती भलतिया । प्रवृत्ति धनंजया । हातु न काढी ३१ तेवींचि एखादा प्रासादु । कां करावा अश्वमेधु । ऐसा अचाट छंदु ।

तांपायांनाही डोळे येतात. सत्कर्म कोणतें व दुष्कर्म कोणतें हें त्यांनाच समजतें; विचार करावयाची आवश्यकता नसते. ६ राजहंसापुढें दूध व पाणी मिसळून ठेवल्यावर, जसा त्याचे चोंचीच्या टोकानें त्या दोहोंचा निवाडा होतो, ७ त्याप्रमाणें बा अर्जुना, इंद्रियेंच बऱ्यावाईट कर्मांची पारख करतात, व नियम हा त्याची सेवा करतो; ८ न ऐकण्यासारख्या गोष्टी त्याचे कानच ऐकत नाहींत; न पाहण्यासारख्या वस्तु त्याचे डोळेच पहात नाहींत; जें भाषण बोलूं नये, तें त्याची जीभच बोलत नाहीं; ९ काळोख जसा दिव्यासमोर न येतां नाहींसा होतो; त्याप्रमाणें निषिद्ध व्यवहार त्याच्या इंद्रियांसमोर येतच नाहीं. २१० हें पहा, नदी जशी पर्जन्यकाळीं पाण्यानें उचंबळूं लागते त्याप्रमाणें त्याची बुद्धि सर्व शास्त्रांत वाढते ११ ज्याप्रमाणें पौर्णिमेचे दिवशीं सर्व आकाशांतच चंद्राचा प्रकाश पसरतो, त्याप्रमाणें त्याची वृत्ति सर्व ज्ञानामध्यें फांकते. १२ त्याच्या सर्व वासना एकत्र होऊन प्रवृत्तिमार्गाकडे त्याचें मन जात नाहीं. त्याचप्रमाणें त्याच्या मनाला विषयांचा वीट येतो. १३ याप्रमाणें सत्त्वगुण वाढून त्याचीं लक्षणें दिसत असतां जर त्याचा काळ झाला; १४ किंवा दुष्काळाचें दिवस गेल्यावर उत्तम पाऊस पडून सर्व सुबत्ता झाली, तशांत एकादा मोठा सण प्राप्त झाला, आणि अशा समयीं जसे आपले स्वगोंतील पूर्वज पाहुणे यावेत, इतक्या प्रीतीचा पाहुणा आल्यास परमानंद कां होणार नाहीं ? १५ त्याचप्रमाणें घरांत पुष्कळ संपत्ति असून दानधर्म करण्याविषयीं औदार्य असतें, तर त्यापासून इहलोकीं कीर्ति होऊन स्वर्ग लोकाची प्राप्ति कां होणार नाहीं ? १६ अर्जुना, अशा रीतीचें आचरण असलें म्हणजे मग त्याला दुसरी तोड कोठून असणार ? त्याचप्रमाणें सत्त्वगुण वाढला असतां मरणानंतर तो दुसरा कोठें जाईल ? १७ कारण, उत्तम आचरण करणारा, भोग भोग्याचें ठिकाण जें शरीर तें टाकून शुद्ध सत्त्वगुणाला बेऊन जातो. १८ अशा रीतीनें जो देह टाकतो. तो केवळ सत्त्वाची मूर्तिच बनून पुनः ज्ञान्यांत जन्म घेतो. १९ हे धनुर्धरा, राजा आपल्या गादीवर असतांना जर डोंगरावर जाऊन उभा राहिला, तर त्याला त्या ठिकाणींही कांहीं कमी पडतें का सांग बरें ? २२० किंवा, बाबारे, एका गांवाहून दुसऱ्या गांवास नेलेल्या दिव्याचा उजेड जसा सारखाच पडतो, २१ त्याप्रमाणें सत्त्वगुणाची वृद्धि झाल्यावर ज्ञान अधिक वाढतें, व बुद्धि विचारांत तरंगूं लागते; २२ नंतर महत्तत्त्वादि अनात्मक पदार्थांचा विचार करून तो त्या विचारासह आत्मस्वरूपांत निमग्न होतो. २३ तेराव्या अध्यायांत वर्णन केल्याप्रमाणें छत्तीस तत्त्वांहून सदतिसावें, सांख्यमताप्रमाणें चोविसांहून पंचविसावें, व तिन्ही गुणांहून निराळें असें जें चौथें; २४ सर्वांत उत्तम ब्रह्म तें ज्यांना प्राप्त झालें आहे, त्यांच्या कुलांत सर्वोत्कृष्ट देहप्राप्ति होते. २५ याचप्रमाणें पहा कीं, तमोगुण व सत्त्वगुण यांस दाबून ज्या वेळेस रजोगुण वाढतो; २६ व ज्या वेळीं तो शरीररूप गांवांत आपली कृति चोहोंकडे प्रगट करतो, तेव्हां त्याचीं लक्षणें अशीं असतात: २७ वावटळ सुटल्यावर ज्याप्रमाणें ती सर्व जिनसा एकत्र करून वर उडवते, त्याप्रमाणें इंद्रियें विषयांकडे मोकळीं सुटतात. २८ परस्त्री दृष्टीस पडल्यावर तिचा भोग भोगणें हें त्यास निषिद्ध न वाटतां शेळीच्या चरण्याप्रमाणें यथेच्छ भोग भोगतो. २९ लोभ इतका वाढतो कीं, जी वस्तु याच्या सपाट्यांत सांपडणार नाहीं, तेवढीच काय ती बाजूस उरते. २३० अर्जुना, हवा तो उद्योग याच्यापुढें आला असतां तो करण्यास हा मागें घेत नाहीं. ३१ त्याचप्रमाणें, एकादें अवाढव्य देऊळ बांधणें किंवा अश्वमेध यज्ञ करणें, अशा

वेऊनि उठी ३२ नगरेंचि रचावीं । जळाशयें निर्मावीं । महावनें लावावीं । नानाविधें ३३ ऐसेंसां अफाटीं कर्मीं । समारंभु उपक्रमी । आणि दृष्टादृष्टकामीं पुरे न म्हणे ३४ सागरुही सांडीं पडे । अगी न लाहे तीन कवडे । ऐसें अभिलाषीं जोडे । दुर्भरत्व ३५ स्पृहा मना पुढां पुढां । आशेचा घे दवडा । विश्व घापे चाडा । पायांतळीं ३६ इत्यादि वाढतां रजीं । इयें चिन्हें होती साजीं । आणि ऐशा समाजीं । वेंचे जरी देह ३७ तरि आघवाचि इहीं । परिवारला आनी देहीं । रिगे परि योनिही । मानुपीचि ३८ सुरवाडेंसि भिकारी । वसो पां राजमंदिरीं । तरी काय अवधारीं । रावो होईल ३९ बैल तेथें करबाडें । हें न चुके गा फुडें । नेइजो कां वन्हाडें । समर्थाचेनि २४० म्हणौनि व्यापारा हातीं । उसंतु दिहा ना राती । तैसयाचिये पांतीं । जुंपिजे तो ४१ कर्मजडाच्या ठायीं । किंबहुना होय देही । जो रजोवृत्तीच्या डोहीं । बुडोनि निमे ४२ मग तैसाचि पुढती । रजसत्त्ववृत्ती । गिळूनि ये उन्नती । तमोगुण ४३ तैंचि जियें लिंगें । देहींचीं सबाह्य सांगें । तियें परिस चांगें । श्रोत्रबळें ४४ तरी होय ऐसें मन । जैसें रविचंद्रहीन । रात्रींचें का गगन । अंवसेचिये ४५ तैसें अंतर असोस । होय स्फूर्तिहीन उद्दस । विचाराची भाष । हारपे तैं ४६ बुद्धि मेचवेना धोंडी । हा ठायवरी मवाळें सांडी । आठवो देशधडी । जाला दिसे ४७ अविवेकाचेनि माजें । सबाह्य शरीर गाजे । एकलेनि घेपे दीजे । मौळ्य तेथ ४८ आचारभंगाचीं हाडें । रूपती इंद्रियापुढें । मरे जरी तेणें कडे । क्रिया जाय ४९ पैं आणिकही एक दिसे । जे दुष्कृतीं चित्त उल्हासे । आंधारीं देखणें जैसें । डुडुळाचें २५० तैसें निषिद्धाचेनि नांवें । भलतेही भरे हांवे । तियेविषयीं धांवे । घेती करणें ५१ मदिरा न घेतां डुले । सन्निपातेंवीण बरळे । निष्प्रेमेंचि भुले । पिसें जैसें ५२ चित्त तरी गेलें आहे । परि उन्मनी ते नोहे । ऐसें माल्हातिजे मोहें । माजिरेनि ५३ किंबहुना ऐसैसीं । इये चिन्हें तम पोषी । जैं वाढे आयितीसी । आपुलिया ५४ आणि हेंचि होय प्रसंगें । मरणाचें जरी पडे खागें । तरि तेतुलेनि निगे । तमेंसीं तो ५५ राई राईपण बीजीं । सांठवूनियां अंग त्यजी । मग विरूढे तैं दुजी । गोठी आहे ५६ पैं होऊनि दीपकलिका । येरु आगी विझो कां । कां जेथ लागे तेथ असका । तोचि आहे ५७ म्हणोनि तमाचिये लोथे । बांधोनियां संकल्पातें । देह जाय तैं मागौतें । तमाचेचि होय

अचाट छंदाच्या मार्गे लागतो. २२ एकादें शहर वसवावें, किंवा मोठाले तलाव बांधावे, अथवा विस्तीर्ण अरण्यांत बागा कराव्या, २३ याप्रमाणें आचाट कृत्ये हातीं घेतो; आणि इहपरलोकप्राप्तीची त्याची इच्छा कधीं कमी होत नाहीं. २४ समुद्रही हार घेईल, व अग्नीला तीन कवड्याइतकी देखील किंमत येणार नाहीं. इतका याचा अभिलाष प्रबल होऊन बसतो. २५ याच्या इच्छेची धांव मनापुढें असते, व सर्व विश्वही याला फिरण्यास पुरेसें होत नाहीं. २६ याप्रमाणें रजोगुण वाढून लक्षणें दिसूं लागतात, आणि अशा स्थितींत जर देहावसान झालें, २७ तर दुसऱ्या देहांतही याच गुणांनीं युक्त होऊन मनुष्ययोनींत जन्म घेतो २८ एकादा भिकारी सर्व सुखासह जरी राजवाड्यांत बसला, तरी तो राजा होऊं शकेल का ? २९ बैल जरी श्रीमान् गृहस्थाच्या वऱ्हाडाबरोबर गेला, तरी त्याला कडबाच खावयास मिळतो. २४० ह्मणून, ज्या व्यापारांत रात्रंदिवस विसांवा नाहीं, त्याच्या पंक्तीला हा जाऊन बसतो. ४१ जो रजोवृत्तीच्या डोहांत बुडून मरतो, तो काम्य कर्म करणारांच्या घराण्यांतच जन्म घेतो. ४२ त्याचप्रमाणें, पुढें रज व सत्त्वगुण यांस नाहींतसे करून तमोगुणवृत्ति जास्त वाढते. ४३ त्या काली देहांत व बाह्यात्कारीं जीं चिन्हें दिसतात, तीं नीट लक्ष देऊन ऐक. ४४ तर, मन हे अज्ञानानें इतकें भरून जातें कीं, जणूं काय चंद्र व सूर्य दोन्ही हे नसलेल्या अमावास्येच्या रात्रीचें आकाशच. ४५ त्याचप्रमाणें, अंतःकरणपूर्वक अज्ञानभरित होऊन तेथें विचाराची गोष्टही निघत नाहीं. ४६ बुद्धि ही कठीणपणांत दगडालाही मार्गे सारते, आणि स्मृति देहोपयोगी लागल्या प्रमाणें दिसते. ४७ त्याचे शरीरावर अंतर्बाह्य अविचार दृष्टीस पडतो, व त्याचे सर्व व्यापार नृशंसपणाचे असतात. ४८ त्याच्या इंद्रियांसमोर अनाचार उभा असतो, आणि मेला असतांही जो अनाचाराच्या क्रिया करतो. ४९ ज्याप्रमाणें घुबडास अंधाऱ्या रात्रींही स्वच्छ दिसतें, त्याप्रमाणें इतर लोकांपेक्षां वाईट कर्मे करण्यास त्याच्या मनाला फार हौस असते. २५० त्याचप्रमाणें, निषिद्ध कर्मे करण्याची ह्याला फार हांव असून त्याचे इंद्रियांचीं धांवही तिकडेच असते. ५१ हा मद्य न पितांच गुंगतो. सन्निपात न होतांच बरळूं लागतो, आणि प्रेमाशिवायच वेड्याप्रमाणें रडतो. ५२ त्याचें चित्त तर ताळ्यावर नसतेंच, परंतु तो कांहीं समाधि नव्हे. याप्रमाणें मोहाच्या वाढीनें ज्ञानशून्य असतो. ५३ किंबहुना, आपल्या सर्व सामुग्रीसह तमोगुण वाढला ह्मणजे अशीं चिन्हें दिसूं लागतात. ५४ आणि प्रसंगानुसार अशाच स्थितींत मरण आलें, तर दुसऱ्या जन्मींही तो तमोगुणांतच जन्म घेतो. ५५ मोहरी पेरल्यावर आपलें रूप सोडून ज्या वेळेस तिचें झाड होतें, त्या वेळेसही तिला जीं फळें येतात तीं मोहरीशिवाय दुसरीं कोठून येणार ? ५६ त्याचप्रमाणें, दिवा पेटो किंवा विझो, परंतु तो ज्या ठिकाणीं लागला असेल त्या ठिकाणीं अग्निरूपानें तोच असतो. ५७ ह्मणून आपल्या संकल्पांत तमाचें गांठोडें बांधून देह ठेवल्यावर पुनः जन्म घेणें तो

५८ आतां काय येणें बहु हें । जो तमोवृद्धि मृत्यु लाहे। तो पशु कां पक्षी होये । झाड कां कृमी ५९

कर्मणः सुकृतस्याहुः सात्त्विकं निर्मलं फलम् । रजसस्तु फलं दुःखमज्ञानं तमसः फलम् १६

येणेंचि पैं कारणें । जें निपजे सत्त्वगुणें । तें सुकृत ऐसें म्हणे । श्रौतस्मो २६० म्हणौनि तया निर्मळा । सुखज्ञानी सरळा । अपूर्व ये फळा । सात्त्विक तें ६१ मग राजसा जिया क्रिया । तया इंद्रावणी फळलिया । जे सुखें चितारूनियां । फळती दुःखें ६२ कां निंबोळियेचें पिक । वरि गोड आंत विख। तैसें तें राजस देख । क्रियाफळ ६३ तामस कर्म जितुकें। अज्ञान फळेंचि पिके। विषांकुर विखें । जियापरी ६४

सत्त्वात्संजायते ज्ञानं रजसो लोभ एव च । प्रमादमोहौ तमसो भवतोऽज्ञानमेव च ॥ १७ ॥

म्हणौनि बारे अर्जुना । येथ सत्त्वचि हेतु ज्ञाना। जैसा कां दिनमाना। सूर्यू हा पैं ६५ आणि तैसेंचि हें जाण । लोभासि रज कारण । आपलें विस्मरण । अद्वैता जेवीं ६६ मोह अज्ञान प्रमादा । ययां मैळे ा दोषवृंदा । पुढती पुढती प्रबुद्धा। तमचि मूळ ६७ ऐसें विचाराच्या डोळां । तिन्ही गुण वेगळवेगळां । दाविले जैसा आंवळा । तळहातींचा ६८ तंव रजतमें दोन्हीं । देखिलीं प्रौढपतनीं । सत्त्वावांचूनि नाणी । ज्ञानाकडे ६९ म्हणौनि सात्त्विकवृत्ती। एक जाले गा जन्मव्रती । सर्वत्यागें चतुर्थी । भक्ति जैसी २७०

ऊर्ध्वं गच्छंति सत्त्वस्था मध्ये तिष्ठंति राजसाः । जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छंति तामसाः १८

तैसें सत्त्वाचेनि नटनाचें । असणें जाणें जयांचें । ते तनुत्यागीं स्वर्गींचे राय होती ७१ इयाचि परी रजें । जिहीं कांजीं जे मरिजे। तिहीं मनुष्य होइजे । मृत्युलोकीं ७२ तेथ सुखदुःखाचे खिचटें । जोविजे एकेचि ताटें । जेथ इये मरणवाटे । पाडिलें नुठी ७३ आणि तयाचि स्थिति तमीं । जे वाढोनि निमती भोगक्षमीं । ते घेती नरकभूमी । मूळपव ७४ एवं वस्तूचिया सत्ता । त्रिगुणासी पंडुसुता । दाविली सकारणता । आघवीचि ७५ पैं वस्तु वस्तुत्वें असिकें । तें आपणपें गुणासारिखें । देखोनि कार्यविशेखें। अनुकरे गा ७६ जैसें कां स्वप्नींचेनि राजें। जैं परचक्र देखिजे । तैं हारि जैत होइजे । आपणपांचि ७७ तैसे मध्योर्ध्व अध । जे हे गुणवृत्तिभेद । ते दृष्टीवांचूनि शुद्ध । वस्तुचि असे ७८

तमोगुणांतच येतो. ५८फार काय सांगावें ! तमोगुण वाढला असतां जो मृत्यु पावतो, तो पुनः पशु किंवा पक्षी अथवा झाड किंवा किडे यांचा जन्म पावतो. ५९

अन्वय–सुकृतस्य कर्मणः फलं सात्त्विकं निर्मलं, रजसः फलं तु दुःखं, तमसः (च) फलं अज्ञानं आहुः. ॥ १६ ॥

अर्थ–पुण्यकर्माचें फल सात्त्विक आणि निर्मल, रजोगुणाचें फल दुःख, आणि तमोगुणाचें फल अज्ञान हें आहे, असें म्हणतात. ॥ १६ ॥

याच कारणास्तव, सत्त्वगुणापासून जें उत्पन्न होतें, ते सुकृत होय,असें श्रुतीसमुदाय म्हणतो. २६० म्हणून, सत्त्वगुणापासून सहज सुख व ज्ञान अपूर्व फलास येतें. यास्तव त्याला सात्त्विक (सत्कर्म) फल असें म्हणतात. ६१ आतां रजोगुणापासून ज्या क्रिया उत्पन्न होतात, त्या कटू वृंदावनाप्रमाणें वाहेरून दिसण्यांत मात्र सुख असून अंतर्यामीं केवळ दुःख अशा फलद्रूप होतात. ६२ अथवा, निंबोळ्या ज्याप्रमाणें वरून दिसण्यांत पिवळ्या धमधमीत असून आंत विषाप्रमाणें कडू असतात, त्याप्रमाणें रजोगुणापासून होणारीं फळें आहेत. ६३ ज्याप्रमाणें, विषाचा कांदा लावला असतां त्याला विषाचा अंकूर फुटतो, त्याप्रमाणें तमोगुणापासून होणाऱ्या क्रिया अज्ञानमयच असतात. ६४

अन्वय–सत्त्वात् ज्ञानं संजायते, रजसः च लोभः एव (संजायते,); तमसः प्रमादमोहौ भवतः, अज्ञानं च एव भवति) १७

अर्थ–सत्त्वगुणापासून ज्ञान उत्पन्न होतें, रजोगुणापासून लोभ मात्र उत्पन्न होतो, आणि तमोगुणापासून प्रमाद, मोह आणि अज्ञान हीं मात्र उत्पन्न होतात. १७

म्हणून, बाबा अर्जुना, ज्याप्रमाणें दिवसाला सूर्य कारण आहे, त्याप्रमाणें ज्ञानास सत्त्वगुणच कारण आहे; ६५ आणि ज्याप्रमाणें अद्वैत होण्याला आपलें स्वतःचें विस्मरण व्हावें लागतें, त्याप्रमाणें लोभ उत्पन्न होण्यास रजोगुण कारण होतो. ६६ हे ज्ञानवंता, मोह, अज्ञान व प्रमाद या त्रिदोषसमुदायाला तमोगुणच कारण आहे. ६७ज्याप्रमाणें तळहातावर आंवळा घेऊन एकादे मनुष्यास प्रत्यक्ष दाखवावा, त्याप्रमाणें, विचारवंत मनुष्यास विचार करण्याकरितां तिन्ही गुण वेगवेगळे स्पष्ट करून सांगितले. ६८ तेव्हां रज व तम हे दोन्ही गुण म्हणजे नरकाचीं मोठीं साधनें मानलीं आहेत, आणि ज्ञानाची प्राप्ति सत्त्वावांचून व्हावयाची नाहीं, ६९ म्हणून ज्याप्रमाणें इतर भक्तींचा त्याग करून ज्ञानी चौथ्या भक्तीचा स्वीकार करतात, त्याप्रमाणें कोणी आजन्म सात्त्विक वृत्ति धारण करतात. २७०

अन्वय–सत्त्वस्थाः ऊर्ध्वं गच्छन्ति, राजसाः मध्ये तिष्ठन्ति जघन्यगुणवृत्तिस्थाः तामसाः अधः गच्छन्ति. ॥ १८

अर्थ–जे सत्त्वगुणी आहेत, ते देवयोनीला पावतात; जे रजोगुणी आहेत, ते मनुष्ययोनीला पावतात; आणि कनिष्ठ गुणामध्यें असणारे जे तामस, ते पश्वादि योनीला पावतात. ॥ १८ ॥

अशा प्रकारें जे सात्त्विक वृत्तीचें नेहमीं आचरण करितात, ते देह ठेवल्यावर स्वर्गांत वास करतात. ७१ त्याचप्रमाणें, जे राजस वृत्तीचें आचरण करीत असतां देहत्याग करतात, ते मृत्युलोकीं मनुष्ययोनींत जन्म घेतात. ७२ त्या मृत्युलोकांत सुख व दुःख यांची खिचडी एकाच ताटांत खावी लागते, (एकाच देहास सुखदुःख भोगावें लागतें) व तेथें कांहीं केल्यानें मृत्यु टळत नाहीं ७३ आणि त्याचप्रमाणें तमोगुणाचें जे आचरण करतात, ते देहांतील नरकभूमींत जाण्याची सनद मिळवितात. ७४ अर्जुना, याप्रमाणें वस्तूच्या सत्तेनें वाढणारे तिन्ही गुण त्यांच्या लक्षणांसह तुला स्पष्ट सांगितले. ७५ परंतु वस्तूच्या स्वरूपांत बदल न होतां, ती गुणांच्या उपाधीनें आपणच गुणलक्षणांप्रमाणें कार्य करते. ७६ आपण राजे झालों आहों, व आपल्यावर परचक्र आलें आहे. असें स्वप्नांत पहाणारा मनुष्य ज्याप्रमाणें आपला जय व अपजय आपल्याच ठिकाणीं पहातो, ७७ त्याप्रमाणें स्वर्ग, मृत्यु व पाताळ हे गुणांच्या वृत्तींचे भेद आहेत, गुणदृष्टि बाजूस ठेवून पाहिलें असतां ते शुद्ध वस्तूच होत. ७८

नान्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टाऽनुपश्यति । गुणेभ्यश्च परं वेत्ति मद्भावं सोऽधिगच्छति १९

परि हे वाहणी असो । तरि तुज आन न दिसो । परिसें तें सांगतसों । मागील गोठी ७९ तरि ऐसें जाणिजे । सामर्थ्यें तिन्ही सहजें । होती देहव्याजें । गुणचि हे २८० इंधनाचेनि आकारें । अग्नि जैसा अवतरे । कां आंगवे तरुवरें । भूमिरसु ८१ ना ना दहिंयाचेनि मिसें । परिणमे दूधचि जैसें । कां मूर्त होय उंसें । गोडी जेवीं ८२ तैसें हें स्वांतःकरण । देहाचि होती त्रिगुण । म्हणोनि बंधासि कारण । घडे कीर ८३ परि चोज हें धनुर्धरा । जे एवढा हा गुंफिरा । मोक्षाचा संसारा । उणा नोहे ८४ त्रिगुण आपुलालेनि धर्में । देहींचें माथीत साउमें । चाळितांही न खोमे । गुणातीतता ८५ ऐसी मुक्ति असे सहज । ते आतां परिसऊं तुज । जे तूं ज्ञानांबुज । द्विरेफु कीं ८६ आणि गुणीं गुणाजोगें । चैतन्य नोहे मागें । बोलिलों तें खागें । तेवींचि हें ८७ तरि पार्था जैं ऐसें । बोधलेनि जीवें दिसे । स्वप्न कां जैसें । चेइलेनि ८८ नातरी आपण जळीं । बिंबलों तीरेनि कळी । चलण होतां कल्लोळीं । अनेकधा ८९ कां नटलेनि लाघवें । नटु जैसा न झकवे । तैसें गुणजात देखावें । न होनियां २९० पैं ऋतुत्रय आकाशें । धरूनियांही जैसें । नेदिजेचिये वोंवसें । वेगळेपणा ९१ तैसें गुणीं गुणापरौतें । जें आपणपें असे आयितें । तिये अहं बैसे अहंते । मूळकेचिये ९२ पैं तेथूनि मग पाहतां । म्हणें साक्षी मी अकर्ता । हे गुणचि क्रियाजातां । नियोजित ९३ सत्त्वरजतमाच्या । भेदीं पसरु कर्माचा । होत असे तो गुणांचा । विकारु हा ९४ ययामाजि मी ऐसा । वनीं कां वसंतु जैसा । वनलक्ष्मीविलासा । हेतुभूत ९५ कां तारांगणीं लोपावें । सूर्यकांतीं उद्दीपावें । कमळीं विकासावें । जावें तमें ९६ यया कोणाचीं काजें कहीं । सवितिया जैसा नाहीं । तैसा अकर्ता मी देहीं । सत्तारूप ९७ मी दाऊनि गुण देखे । गुणता हे मियां पोखे । ययाचेनि निःशेषें । उरे तें मी ९८ ऐसेनि विवेकें जया । उदो होय धनंजया । ये गुणातीतत्व तया । अर्थपंथें ९९

गुणानेतानतीत्य त्रीन्देही देहसमुद्भवान् । जन्ममृत्युजरादुःखैर्विमुक्तोऽमृतमश्नुते ॥२०॥

आतां निर्गुण असे आणिक । तें तो जाणे अचुक । जे ज्ञानें केलें टीक । तयाचिवरी ३०० किंबहुना पंडुसुता । ऐसी तो माझी सत्ता । पावे जैसी सरिता । सिंधुत्व गा १ नाळिकेवरूनि उठिला । जैसा शुक शाखे बैसला । तैसा

अन्वय–यदा द्रष्टा गुणेभ्यः अन्यं कर्तारं न अनुपश्यति, गुणेभ्यः च परं (आत्मानं) वेत्ति, तदा मद्भावं अधिगच्छति.

अर्थ–जेव्हां जीव हा गुणांहून कर्ता निराळा नाहीं असें पाहतो, आणि आपण गुणांच्या पलीकडे आहे असें समजतो; तेव्हां तो माझ्या स्वरूपाला पावतो. ॥ १९ ॥

पण हें बोलणें आतां बाजूस टेवूं. मात्र तूं एवढें लक्षांत ठेव कीं, वस्तूवांचून दुसरे कांहीं नाहीं. आतां तुला मागील गोष्ट सांगतों, ती ऐक. ७९ तर तूं असें पक्कें समज कीं, वस्तुच्या सामर्थ्यानें हे तिन्ही गुण सहज देहाच्या निमित्तानें उत्पन्न होतात. २८० लाकडें पेटल्यावर जसा अग्नि त्यांच्या आकारासारखा दिसतो, किंवा भूमि व पाणी यांच्या रस जसा झाडांत दृष्टीस पडतो, [कारण, झाडांत भूमि व उदक हींच दोन तत्वें आहेत.] ८१ अथवा दूध विरजलें असतां जसें दह्याच्या आकारानें दिसतें; किंवा उंसाच्या आकारानें गोडी व्यक्त होते. ८२ त्याप्रमाणें, अंतःकरणासह सूक्ष्म देहच हे तिन्ही गुण बनतो, म्हणून त्यांच्या सपाट्यांत तो सांपडतो. ८३ परंतु, अर्जुना हें केवढें आश्चर्य आहे कीं, सूक्ष्म देहाची व गुणांची ही एवढी गुंतागुंत झाली असतांही ज्ञान्यांना मोक्षाचा व्यवहार कमी पडत नाहीं. ८४ तिन्ही गुण आपापल्या धर्माप्रमाणें देहाच्या माथ्यावर संपूर्ण व्यवहार करीत असतांही गुणांतर्ततेंत कमीपणा येत नाहीं. ८५ अशा प्रकारची सहज असणारी मुक्ती तुला आतां ऐकवूं. कारण, तूं ज्ञानकमळावरील भ्रमर आहेस, म्हणजे ऐकण्यास योग्य आहेस. ८६ आणि चैतन्य गुणांप्रमाणें न होतां गुणांपासून अलिप्त असतें, असें जें तत्व तुला मागें सांगितलें आहे तेंच हें होय. ८७ तर, पार्था, ज्ञानाचा बोध झाल्यावर गुणांपासून चैतन्य वेगळें आहे असे दिसतें. जागृत झाल्यावर जसें स्वप्न. ८८ किंवा नदीच्या कांठीं उभा राहिलेला मनुष्य आपलें प्रतिबिंब पाण्यांत पहातो. व पाणी हालविल्यावर तेंच प्रतिबिंब जसें पुष्कळ ठिकाणीं दृष्टीस पडतें; ८९ किंवा नटानें स्त्रीवेष घेतल्यावर ज्याप्रमाणें तो स्त्रीच्या गुणांनीं फसत नाहीं. आपण पुरुष आहों हें विसरत नाहीं, त्याप्रमाणें स्वस्वरूपीं सत्य बुद्धि कायम ठेवून गुण नुसतें पाहावे. २९० ज्याप्रमाणें आकाशावर तिन्ही ऋतु होतात व जातात, परंतु त्यांजपासून तें अलिप्त असतें, ९१ गुणांचे व्यवहार चालत असतांनाही गुणाहून पलीकडे आत्मरूप स्वतःसिद्ध आहे, त्या मूळ आत्मस्वरूपावरती ज्याचा अहंकार जाऊन बसतो; ९२ मग त्या ठिकाणाहून पाहूं लागला असतां म्हणतो कीं, मी कर्मकर्ता नसून फक्त साक्षिभूत आहें, आणि सर्व क्रिया गुणच उत्पन्न करणारे आहेत; ९३ सत्व, रज व तम या गुणापासून निरनिराळीं कर्में जीं होतात, तीं आपण न करितां त्याला गुणच कारण आहेत, ९४ वनश्रीमेळा जसा वसंत ऋतु कारण असतो, परंतु अलिप्त असतो, तसा मी सर्व क्रिया करीत असूनही अलिप्त आहें. ९५ अथवा नक्षत्रांचा लोप व्हावा, सूर्यकांत मण्यानें अग्नि उत्पन्न करावा, कमळानें विकसित व्हावें, तमाचा नाश व्हावा, या सर्व गोष्टी एका सूर्योदयापासून होतात. ९६ परंतु सूर्य त्यांकडे पहात नाहीं; त्याप्रमाणें माझ्याच सत्तेनें कर्में होत असूनही मी या देहांत सत्तारूप मात्र असून अकर्ता आहें. ९७ मी दाखविल्यानें गुण दृष्टीस पडतात, माझ्याच सत्तेनें गुण वाढतात, व ते नाहींतसे झाल्यावर जे बाकी रहातें, तेंही मीच होय. ९८ धनंजया, याप्रमाणें ज्याच्या हृदयांत ज्ञानाचा उदय झाला आहे, तो अर्थात् गुणातीत होय. ९९

अन्वय–देही एतान् देहसमुद्भवान् त्रीन् गुणान् अतीत्य जन्ममृत्युजरा दुःखैः विमुक्तः (सन्) अमृतं अश्नुते ॥ २० ॥

अर्थ–जीव हा देहापासून उत्पन्न झालेल्या तीन गुणांचा अतिक्रम करून, जन्म, मृत्यु व वार्धक्य या दुःखांपासून मुक्त होऊन मोक्षाप्रत प्राप्त होतो. ॥ २० ॥

मग तो निर्गुण असें ब्रह्म अचूकपणें जाणतो. कारण, ज्ञानाच्या योगानें त्यानें तेथेंच स्थिति केलेली असते ३०० किंबहुना अर्जुना, नदी ज्याप्रमाणें समुद्रत्व पावते, त्याप्रमाणें तो माझीच सत्ता पावतो. १ ज्याप्रमाणें नलिकेवरून उठून झाडाच्या दुसऱ्या फांदीवर बसल्यावर राघू बंधरहित होतो,

मूळअहंतें वेठिला । तो मी म्हणौनि २ अगा अज्ञानाचिया निदा । जो १९ रत होता बदबदा । तो स्वस्वरूपीं प्रबुद्धा । चेइला कीं ३ पैं बुद्धिभेदाचा जो । रिसा । तया हातोनि पडिला वीरेशा । म्हणौनि प्रति-मुखाभासा । मुकला देह- ४ देहाभिमानाचा वारा । आतां वाजों ठेला वीरा । तैं ऐक्य वीचिसागरां- जीवेशां हें ५ म्हणौनि मज्जावेंसीं । प्राप्ति पाविजे तेणेंसरिसी । वर्षांतीं अं । काशीं । घनजात जेवीं ६ तेविं मी होऊनि निरुता । मग देहींचिये असतत्रे- नागवे देहसंभूतां । गुणांसि तो ७ जैसा भिंगाचेनि घरें । दीपप्रकाशु नावंजे कां न विझेचि सागरें । वडवानळु ८ तैसा आलागेला गुणाचा । बोधु न मैनि तयाचा । तो देही जैसा व्योमींचा । चंद्र जळीं ९ तिन्ही गुण आपुलालिसी प्रौढी । देहीं नाचविती बागडीं । तो पाहोंही न धाडी । अहंतेतें ३१० हा ठाय६ वरी । नेहटोनि ठेला अंतरीं । आतां काय वर्ते शरीरीं । हेंही नेणे ११ सां- डूनि आंगींची खोळी । सर्प रिगालिया पाताळीं । ते त्वचा कोण सांभाळी । तैसें जालें १२ कां सौरभ्य जीर्णु जैसा । आमोदु मिळोनि जाय आकाशा । माघारा कमळकोशा । नयेचि तो १३ पैं स्वरूपसमरसें । ऐक्य गा जालें तैसें । तेथ किं धर्म हें कैसें । नेणे देह १४ म्हणौनि जन्मजरामरण । इत्यादि जे साही गुण । ते देहींचि ठेले कारण । नाहीं तयां १५ घटाचिया खापरिया । घट- भंगीं फेडिलिया । महदाकाश अपैसया । जालेंचि असे १६ तैसी देहबुद्धि जाये । जैं आपणपां आठौ होये । तैं आन कांहीं आहे । तेंवांचुनी १७ येणें थोर बोधलेपणें । तयासि गा देहीं असणें । म्हणूनि तो मी म्हणें । गुणातीत१८ यया देवाचिया बोला । पार्थु अतिसुखावला । मेघें संबोखिला । मोरु जैसा १९

अर्जुन उवाचः—

कैर्लिंगैस्त्रीन्गुणानेतानतीतो भवति प्रभो । किमाचारः कथं चैतांस्त्रीन् गुणानतिवर्तते ॥२१॥

तेणें तोषें वीर पुसे । जी कोण्हीं चिन्ही तो दिसे । जयामाजीं वसे । ऐसा बोधु ३२० तो निर्गुण काय आचरे । कैसेनि गुण निस्तरे । हें सांगिजो माहेरें । कृपेचेनि २१ यया अर्जुनाचिया प्रश्ना । तो षड्गुणांचा राणा । परिहारु आ- कर्णा । बोलतु असे २२ म्हणे पार्था तुझी नवाई । हें येतुलेंचि पुससी काई । तें नामाचि तया पाहीं । सत्य लटिकें २३ गुणातीत जया नांवें । तो गुणाधीन तरी नव्हे । ना होय तरी नागवे । गुणां यया २४ परि अधीन कां नागवे ।

अ[illegible]प्रमाणें गुणातीत झाला, तो गुणांच्या सपाट्यां- ३ न सांपडतां अहंब्रह्म जसें जाणतो. २ हे ज्ञान- [illegible]ता, जो अज्ञानरूप निद्रेत मोठमोठ्यानें घोरत [illegible]डलेला असतो, तो स्वस्वरूपाच्या ठिकाणा जागा होतो. ३ हें बघ—अर्जुना त्याच्या हातून बुद्धि- भेदरूपी आरसा खालीं पडल्यामुळें त्यांत दिसणा- ऱ्या सुखदुःखरूपी प्रतिबिंबापासून तो मुक्त होतो. ४ मग हे वीरा, देहाभिमानरूपी वारा वहावयाचा बंद होऊन, त्याच्यावरील जीव, व ईश एतद्रूपी लाटा आत्मस्वरूपरूपी सागरांत मिळतात. ५ ह्मणून, असें होण्याबरोबर ते मद्रूप होतात. ज्याप्र माणें वर्षाकाळाचें अखेरीस आकाशांत उत्पन्न हो- णारे ढग आकाशांतच लय पावतात, पर्जन्यवृष्टि करीत नाहींत, ६ त्याप्रमाणें मद्रूप झाल्यावर, तो जरी देहांत असला तरी गुणांनीं लिप्त होत नाहीं. ७ ज्याप्रमाणें दिवा भिंगाच्या घरांत ठेवला ह्मण जे त्याचा उजेड आंवरत नाहीं, अथवा वडवानल हा समुद्राच्या पाण्यानेंही विझत नाहीं, ८ त्याप्र- माणें गुणांच्या येण्याजाण्यानें त्याचें शुद्ध ज्ञान म- लीन होत नाहीं; आणि आकाशांतील चंद्राचें पा- ण्यांत बिंब पडलें, तरी तो जसा पाण्यापासून वे- गळा असतो, त्याप्रमाणें तो देहांत असूनही गुणां- नीं बद्ध होत नाहीं. ९ तिन्ही गुण त्याच्या देहांत आपापल्या इच्छेप्रमाणें जरी धुमाकूळ घालीत अ- सले, तरी त्यांकडे तो ढुंकूनही पहात नाहीं. ३१० इतक्या स्थितीपर्यंत तो अंतर्यामीं निश्चळ असतो अशा स्थितींत तें शरीर काय व्यवहार करितें, हेही जाणत नाहीं. ११ साप आपली कात टाकू- न बिळांत जातो, त्या वेळेस जसें आपल्या काती चें काय होईल इकडे लक्ष देत नाहीं, तसे ज्ञानी आपल्या शरीराविषयीं निष्काळजी असतात. १२ अथवा कमल उमलल्यावर त्याचा सुवास आकाशांत निघून गेल्यावर ज्याप्रमाणें माघारा कमलकोशांत येत नाहीं, १३ त्याप्रमाणें आत्मस्वरूपांत ऐक्य झाल्यावर मग हा देह कोणत्या धर्मानें वागतो, हें पहात नाहीं. १४ म्हणून, जन्म, जरा, मरण इ- त्यादि जे सहा गुण, त्यांचा संबंध देहाच्या ठिका- णीं असतो; ज्याला आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं नसतो. १५ वट फुटून त्याच्या ठिकऱ्या झाल्या ह्मणजे त्यांतील आकाश (घटाकाश) जसें सहज महदाकाशांत मिळतें, १६ तशी देहबुद्धि नाहींशी झाल्यावर जेव्हां आत्मस्वरूपची ओळख होते, तेव्हां अशा स्थितींत आत्मस्वरूपाशिवाय दुस- ऱ्या कशाची आठवण होणार? १७ याप्रमाणें ज्याच्या अंतःकरणांत बोध झाला आहे, तो जरी देहधारी असला तरी तो गुणातीत आहे असें मी ह्मणतों. १८ मेघाची गर्जना ऐकून जसा मोराला संतोष होतो, तसा या श्रीकृष्णांच्या भाषणानें पा- र्थास फार संतोष वाटला. १९

अन्वय—प्रभो एतान् त्रीन् गुणान् अतीतः जीवः) कैः लिंगैः (ज्ञातः भवति ? (सः) किमाचारः ? (सः) एतान् त्रीन् गुणान् कथं अतिवर्तते ? ॥ २१ ॥

अर्थ—अर्जुन ह्मणालाः—हे प्रभो, या तिन्ही गुणांना मागें टाकून पलीकडे गेलेला जीव कोणत्या चिन्हांनीं ओळखावा ? त्याचा आचार कसा असतो ? आणि तो या तीन गुणांना कसा ओलांडून जातो ? ॥ २१ ॥

अशा हर्षयुक्त अंतःकरणानें तो वीर अर्जुन श्रीकृष्णास म्हणाला, " ज्याच्या अंतःकरणांत असा बोध झाला आहे, त्याचीं लक्षणें काय अस- तात ? ३२० तो गुणातीत कशा रीतीनें वागतो? व गुणांचें निवारण कसें करतो ? देवा, आपण कृपेचें माहेर घर आहां, तेव्हां हें सर्व मला स्पष्ट करून सांगा. " २१ या अर्जुनाच्या प्रश्नास षड्- गुणैश्वर्यसंपन्न श्रीकृष्ण परमात्मा काय उत्तर देतात, तें ऐका. २२ ते म्हणतातः—पार्था, हाच का तुझा प्रश्न आहे ! कारण, गुणातीत हें नांव उच्चारण्या- बरोबरच त्याचें आचरण काय, हा प्रश्न संभवत नाहीं. २३ कारण, ज्याला गुणतीत ह्मणतात, तो गुणाधीन खास नसतो; अथवा गुणांत रहाटत असला तरी गुणांच्या सपाट्यांत सांपडत नाहीं. २४ पण त्याचा गुणांशीं संबंध असून तो गुणां- च्या अधीन आहे, किंवा नाहीं हें कसें

हेंचि कैसेनि जाणावें । गुणांचिये खरवे । माजि असतां २५ हा संदेह जरी वाहसी । तरि सुखें पुसों लाहसी । परिस आतां तयासी । रूप करूं २६

श्रीभगवानुवाच—

प्रकाशं च प्रवृत्तिं च मोहमेव च पांडव । न द्वेष्टि संप्रवृत्तानि न निवृत्तानि काङ्क्षति ॥२२॥

तरी रजाचेनि माजें । देहीं कर्माचें आणोजें । प्रवृत्ति जैं घेइजे । वेंटाळूनि २७ तैं मीचि कां कर्मठ । ऐसा नये श्रीमाठ । कां दरिद्रलिये बुद्धी वीट । तोही नाहीं २८ अथवा सत्त्वेंचि अधिकें । जैं सर्वेंद्रियें ज्ञान फांके । तैं सुविद्यता तोखें । उमेजही ना २९ कां बाडिनलेनि तमें । न गिळेजेचि मोहभ्रमें । तैं अज्ञानत्वें न श्रमे । घेणेंही नाहीं ३० पैं मोहाच्या अवसरीं । ज्ञानाची चाड न धरी । ज्ञानें कर्में नादरी । होतां न दुःखी ३१ सायंप्रातर्माध्यान्हा । या तिही काळांची गणना । नाहीं जेविं तपना । तैसा असे ३२ तया वेगळाचि काय प्रकाशें । ज्ञानित्व यावें असे । कायि जळार्णव पाउसें । साजा होय ३३ ना प्रवर्तलेंनि कर्में । कर्मठत्व तया का गमे । सांगें हिमवंतु हिमें । कांपे कायि ३४ नातरि मोह आलिया । काइ पां ज्ञाना मुकिजेल तया । हो मा आगीतें उन्हाळेया । जाळवत असे ३५

उदासीनवदासीनो गुणैर्यो न विचाल्यते । गुणा वर्तंत इत्येव योऽवतिष्ठति नेङ्गते ॥२३॥

तैसें गुणागुणकार्य हें । आघवेंचि आपण आहें । म्हणौनि एकेका नोहे । तडातोडी ३६ येवढेया गा प्रतीती । तो देहा आलासे वस्ती । वाटे जातां गुंती- । माजि जैसा ३७ तो जिणता ना हारवी । तैसा गुण नव्हे ना करवी । जैसी कां श्रोणवी । संग्रामींचि ३८ कां शरीराआं नील प्राणु । घरीं आतिथ्याचा ब्राह्मणु । नाना चोहटाचा स्थाणु । उदासु जैसा ३९ आणि गुणाचा यावाजावा । ढळे चळे ना पांडवा । मृगजळाचा हेलावा । मेरु जैसा ४० हें बहुत कायि बोलिजे । व्योम वारेनि न वचिजे । कां सूर्य ना गिळिजे । अंधकारें ४१ स्वप्न कां गा जियापरी । जागतयातें न सिंतरी । गुणी तैसा अवधारीं । न बंधिजे तो ४२ गुणांसि कीर नातुडे । परि दुरूनि जैं पाहे कोडें । तैं गुणदोष सायिखडें । सभ्यु जैसा ४३ सत्कर्में सात्त्विकीं । रज तें रजोविषयकीं । तम मोहादिकीं । वर्तत असे ४४ परिस तयाचिया गा सत्ता । होती गुणक्रिया समस्ता । हें फुडें जाणे सविता । लौकिका जेविं ४५ समुद्रचि भरती । सोमकांतची द्रवती । कुमुदें विकासती । चंद्रु तो गा ४६ कां वाराचि वाजे विझे । गगनें निश्चळ अ-

हेंचि कैसेनि जाणावें । गुणांचिये खरवे । माजि असतां २५ हा संदेह जरी वाहसी । तरि सुखें पुसों लाहसी । परिस आतां तयासी । रूप करूं २६

श्रीभगवानुवाच—

प्रकाशं च प्रवृत्तिं च मोहमेव च पांडव । न द्वेष्टि संप्रवृत्तानि न निवृत्तानि काङ्क्षति ॥२२॥

तरी रजाचेनि माजें । देहीं कर्माचें आणोजें । प्रवृत्ति जैं घेइजे । वेंटाळूनि २७ तैं मीचि कां कर्मठ । ऐसा नये श्रीमाठ । कां दरिद्रलिये बुद्धी वीट । तोही नाहीं २८ अथवा सत्त्वेंचि अधिकें । जैं सर्वेंद्रियें ज्ञान फांके । तैं सुविद्यता तोखें । उमेजही ना २९ कां बाडिनलेनि तमें । न गिळेजेचि मोहभ्रमें । तैं अज्ञानत्वें न श्रमे । घेणेंही नाहीं ३० पैं मोहाच्या अवसरीं । ज्ञानाची चाड न धरी । ज्ञानें कर्में नादरी । होतां न दुःखी ३१ सायंप्रातर्माध्यान्हा । या तिही काळांची गणना । नाहीं जेविं तपना । तैसा असे ३२ तया वेगळाचि काय प्रकाशें । ज्ञानित्व यावें असे । कायि जळार्णव पाउसें । साजा होय ३३ ना प्रवर्तलेंनि कर्में । कर्मठत्व तया का गमे । सांगें हिमवंतु हिमें । कांपे कायि ३४ नातरि मोह आलिया । काइ पां ज्ञाना मुकिजेल तया । हो मा आगीतें उन्हाळेया । जाळवत असे ३५

उदासीनवदासीनो गुणैर्यो न विचाल्यते । गुणा वर्तंत इत्येव योऽवतिष्ठति नेङ्गते ॥२३॥

तैसें गुणागुणकार्य हें । आघवेंचि आपण आहें । म्हणौनि एकेका नोहे । तडातोडी ३६ येवढेया गा प्रतीती । तो देहा आलासे वस्ती । वाटे जातां गुंती- । माजि जैसा ३७ तो जिणता ना हारवी । तैसा गुण नव्हे ना करवी । जैसी कां श्रोणवी । संग्रामींचि ३८ कां शरीराआं नील प्राणु । घरीं आतिथ्याचा ब्राह्मणु । नाना चोहटाचा स्थाणु । उदासु जैसा ३९ आणि गुणाचा यावाजावा । ढळे चळे ना पांडवा । मृगजळाचा हेलावा । मेरु जैसा ४० हें बहुत कायि बोलिजे । व्योम वारेनि न वचिजे । कां सूर्य ना गिळिजे । अंधकारें ४१ स्वप्न कां गा जियापरी । जागतयातें न सिंतरी । गुणी तैसा अवधारीं । न बंधिजे तो ४२ गुणांसि कीर नातुडे । परि दुरूनि जैं पाहे कोडें । तैं गुणदोष सायिखडें । सभ्यु जैसा ४३ सत्कर्में सात्त्विकीं । रज तें रजोविषयकीं । तम मोहादिकीं । वर्तत असे ४४ परिस तयाचिया गा सत्ता । होती गुणक्रिया समस्ता । हें फुडें जाणे सविता । लौकिका जेविं ४५ समुद्रचि भरती । सोमकांतची द्रवती । कुमुदें विकासती । चंद्रु तो गा ४६ कां वाराचि वाजे विझे । गगनें निश्चळ अ-

सिजे । तैसा गुणाचिये गजबजे । डोलेना जो ४७ अर्जुना येगें लक्षणें । तो गुणातीतु जाणणें । परिस आतां आचरणें । तयाचीं जीं ४८

समदुःखसुखः स्वस्थः समलोष्टाश्मकांचनः । तुल्यप्रियाप्रियो धीरस्तुल्यनिंदात्मसंस्तुतिः २४

तरि वस्त्रासि पाठीं पोटीं । नाहीं सुतावांचूनि किरीटी । ऐसें सुये दिठी । चराचर मद्रूपें ४९ म्हणोनि सुखदुःखासरिसें । कांटाळें आचरे ऐसें । रिपुभक्तां जैसें । हरीचें देणें ३५० एऱ्हवीं तरी सहजें । सुखदुःख तैंचि सेविजे । देहजळीं होइजे । मासोळी जैं५१ आतां तें तंव तेणें सांडिलें । आहे स्वस्वरूपेंसीचि मांडिलें । सस्यांतीं निवडिलें । बीज जैसें ५२ कां वोघ सांडूनि गांग । रिघोनि समुद्राचें आंग । निस्तरली लगबग । खळाळाची ५३ तेविं आपणपांचि जया । वस्ती झाली गा धनंजया । तया देहीं अपैसया । सुख तैसें दुःख ५४ रात्रि तैसें पाहलें । हें धारणा जेंवि एक जालें । आत्माराम देहीं आतलें । द्वंद्व तैसें ५५ पैं निद्रिताचेनि आंगेंसि । साप तैशी उर्वशी । तेंवि स्वरूपस्था सारिसीं । देहीं द्वंद्वें५६ म्हणौनि तयाच्या ठायीं । शेणा सोनया विशेष नाहीं । रत्ना गुंडेया कांहीं । नेणिजे भेदु ५७ घरा येवो पां स्वर्ग । कां वरिपडो वाघ । परि आत्मबुद्धीसि भंग । कदा नोहे ५८ निवटलें न उपवडे । जळीनलें न विरूढे । साम्यबुद्धी न मोडे । तयापरी ५९ हा ब्रह्मा ऐसेनि स्तविजो । कां नीच ह्मणोनि निंदिजो । परि नेणें जळों विझों । राखोंडी जैसी ३६० तैसी निंदा आणि स्तुती । नये कोण्हेचि व्यक्ती । नाहीं अंधारें कां वाती । सूर्या घरीं ६१

मानापमानयोस्तुल्यस्तुल्यो मित्रारिपक्षयोः । सर्वारंभपरित्यागी गुणातीतः स उच्यते ॥२५॥

ईश्वरु ह्मणोनि पूजिला । कां चोरु ह्मणोनि गांजिला । वृषगजीं वेढिला । केला रावो ६२ कां सुहृद पासीं आलें ! अथवा वैरी वरपडे जाले । परि नेणे राती पाहालें । तेज जेविं ६३ साही ऋतु येतां आकाशें । लिंपिजेचि ना जैसें । तेविं वैषम्य मानसें । जाणिजेना ६४ आणीकही येकु पाहीं । आचारु तयाच्या ठायीं । तरि व्यापारासि नाहीं । जालें दिसे ६५ सर्वारंभा उटकले प्रवृत्तीचें तेथ मावळलें । जळती गा कर्मफळें । ते तो आगी ६६ दृष्टादृष्ट नांवें । भावचि जीवीं नुगवे । सेवी जें कां स्वभावें । पैठें होय ६७ शिणे । पाषाणु का जेणें मानें । तैसीं सांडीमांडी मनें । वर्जिली असे किती हा विस्तारु । जाणें ऐसा आचारु । जयातें तोचि साचारु ।

आहे, त्याप्रमाणें गुणांनीं जरी पुष्कळ गडबड केली तरी त्यांच्या सपाट्यांत सांपडत नाहीं ४७ अर्जुना, याप्रमाणें गुणातीताचीं चिन्हें तुला सांगितलीं. आतां त्यांचें आचरण कसें असतें, तें सांगतों, ऐक. ४८

अन्वय– यः समदुःखसुखः, स्वस्थः, समलोष्टाश्मकांचनः तुल्यप्रियाप्रियः, धीरः, तुल्यनिंदात्मसंस्तुतिः; ॥ २४ ॥

अर्थ–जो सुखदुःख समान जाणणारा, आत्मस्वरूपीं स्थिर असणारा, माती, दगड व सोनें सारखें मानणारा, प्रिय व अप्रिय समान मानणारा, धैर्यवान्, आपल्या निंदा आणि स्तुति सारखी मानणारा; ॥ २४ ॥

अर्जुना, ज्याप्रमाणें वस्त्राच्या आंत बाहेर सुतावांचून दुसरें कांहीं नाहीं, त्याप्रमाणें जो मद्रूप झाला आहे, त्याला सर्व चराचरांत माझ्या रूपाशिवाय दुसरें कांहीं दिसत नाहीं. ४९ म्हणून, ज्याप्रमाणें ईश्वर आपल्या शत्रूंस व भक्तांस सारखीच मुक्ति देतो, त्याप्रमाणें सुख व दुःख प्राप्त झालें असतां ज्याचें मन ताजव्याप्रमाणें समतोल रहातें; ३५० बाकी देहरूप जलांत मनरूपी मासा खेळत असला म्हणजे सुख व दुःख यांची सहज बाधा होते; ५ आतां, तो तर देहाभिमान सोडून आत्मरूप झाल्यामुळें, बीज पेरून धान्य आल्यावर त्यांत जसा बीजाचा परिपाक होतो, ५२ किंवा गंगा ओघ संपून समुद्रांत मिसळून गेल्यावर जसा तिचा खळखळाट आपोआप बंद होतो, ५३ त्याप्रमाणें, अर्जुना, ज्यानें आत्मस्वरूपीं लय लावलें आहे, तो देहांत असला तरी सुख व दुःख यांपासून बाधा पावत नाहीं. ५४ घराच्या खांबास ज्याप्रमाणें रात्र किंवा दिवस हीं दोन्ही सारखींच आहेत, त्याप्रमाणें देहांतील आत्म्यास सुख व दुःख हीं दोन्ही सारखींच आहेत. कारण, तो गुणापासून अलिप्त असतो. ५५ ज्याप्रमाणें निजलेल्या मनुष्याचे एका अंगास साप व दुसऱ्या अंगास उर्वशी जरी असली, तरी त्या दोघांची सारखीच योग्यता असते, त्याप्रमाणें, जो आत्मस्वरूपीं लीन झाला आहे, त्यास सुख व दुःख यांची सारखीच योग्यता आहे. ५६ म्हणून त्याच्या ठिकाणीं शेण व सोनें यांची सारखीच किंमत आहे, आणि रत्न व धोंडा यांतही तो कांहीं भेद जाणत नाहीं; ५७ स्वर्गसुख घरीं चालत येवो, अथवा त्यास खाण्याकरितां वाघ त्याच्यावर धांवून येवो, परंतु त्याच्या आत्मस्वरूपाच्या बुद्धीस केव्हांही भंग होत नाहीं. ५८ मेलेले जसे जिवंत होत नाहीं, आणि जळालेलें पुनः उगवत नाहीं, त्याप्रमाणें याची आत्मस्वरूपाविषयीं जी साम्यबुद्धि झाली आहे, तिचा कशानेंही भंग होत नाहीं. ५९ 'हा ब्रह्मदेव आहे' म्हणून कोणी स्तुति करो, किंवा 'नीच आहे' म्हणून कोणी निंदा करो; परंतु राख झाल्यावर तिला ज्याप्रमाणें जाळण्याची अगर विझण्याची भीति राहत नाहीं, ३६० त्याप्रमाणें निंदा किंवा स्तुति केली असतां त्यापासून त्याला राग अथवा लोभ उत्पन्न होत नाहीं. हें पहा-सूर्याच्या घरीं अंधार किंवा दिवा यांची गोष्टच बोलण्यास नको. कारण तो सदोदित स्वयंप्रकाशच आहे.

अन्वय–(यः) मानापमानयोः तुल्यः, मित्रारिपक्षयोः तुल्यः, सर्वारंभपरित्यागी (च) (अस्ति), सः गुणातीतः उच्यते २५

अर्थ–ज्याला मान व अपमान हे सारखे आहेत, मित्र व शत्रु हेही सारखेच आहेत, आणि ज्यानें सर्व कर्मांचा त्याग केला आहे, त्याला गुणातीत असें म्हणावें ॥२५॥

ईश्वर समजून ज्याची पूजा केली, अथवा चोर समजून मार दिला, किंवा हत्ती, घोडे, रथ वगैरेंनीं वेष्टित करून त्याला राजा बनविला; ६२ अथवा आत जवळ येऊन वसले, किंवा वैरी जवळ येऊन बसला, तथापि त्याला सर्वच सारखे. ज्याप्रमाणें सूर्याचे तेजास रात्र व दिवस माहीत नसतात; ६३ आकाशावर सहा ऋतु जरी येऊन गेले तरी तें ज्याप्रमाणें अलिप्त असतें, त्याप्रमाणें त्याच्या बुद्धीला विषमता ही कधीं ठाऊक नसते ६४ त्याचे ठिकाणीं आणखी असें दिसतें कीं, तो कोणतेही व्यापार करीत नसतो, ६५ तो कोणतीही गोष्ट आरंभीत नाहीं; प्रवृत्तिमार्गापासून दूर रहातो, व तो ज्ञानवान् असल्यामुळें त्याच्या कर्मांचीं फळें जळून जातात. ६६ इहलोक अथवा परलोक यांच्याविषयीं ज्याच्या मनांत विचारही येत नाहींत, परंतु सहजानुसार जें जें प्राप्त होईल, तें तें तो सेवन करतो. ६७ पाषाणाप्रमाणें ज्याचें मन कठीण आहे, तो सुख झालें असतां आनंद मानीत नाहीं व दुःख झालें असतां शीण मानीत नाहीं; त्याचप्रमाणें जो मनानें कांहींएक व्यापार करीत नाहीं; ६८ आणखी तुला किती स्पष्ट सांगूं! तर असें ज्याचें आचरण असेल, तोच गुणातीत असें जाण. ६९

गुणांतें अतिक्रमणें। घडे उपायें जेणें। तो आतां आईक म्हणे। श्रीकृष्णनाथु७०

मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते । स गुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते ॥२६॥

तरि व्यभिचाररहित चित्तें । भक्तियोगें मातें । सेवी तो गुणातें । जाळूं शके ७१ तरि कोण मी कैसी भक्ती। अव्यभिचारा काय व्यक्ती । हे आघवीचि निरुती । होआवी लागे ७२ तरी पार्था परियेसा । मी तंव येथ ऐसा । रत्नीं किळावो जैसा । रत्नचि कीं तो ७३ कां द्रवपणचि नीर । अवकाशाचि अंबर । गोडी तेचि साखर । आन नाहीं ७४ वन्हि तेचि ज्वाळ । दळाचि नांव कमळ । रूख तेंचि डाळ । फळादिक ७५ अगा हिम जें आकर्षलें । तेंचि हिमवंत जेविं जालें । नाना दूध मुरालें । तेंचि दहीं ७६ तैसें विश्व येणें नांवें । हें मीचि पैं आघवें । घेईं चंद्रबिंब सोलावें । न लगे जेविं ७७ घृताचें थिजलेंपण । न मोडितां घृतचि जाण । कां नाटितां कांकण । सोनेंचि तें ७८ न उकलितां पटु । तंतुचि असे स्पष्टु । न विरवितां घटु । मृत्तिका जेविं ७९ म्हणोनि विश्वपण जावें । मग मातें घेयावें । तैसा नव्हे आघवें । सकटचि मी ३८० ऐसेनि मातें जाणिजे । ते अव्यभिचारी भक्ति म्हणिजे। येथ भेद कांहीं देखिजे । तरि व्यभिचारु तो ८१ याकारणें भेदातें । सांडूनि अभेदें चित्तें । आपणा सकट मातें । जाणावें गा ८२ पार्था सोनयाची टिका । सोनयासी लागली देखा । तैसें आपणपें आणिका । मानावें ना ८३ तेजाचा तेजौनि निघाला । परि तेजींचि असे लागला । तया रश्मी ऐसा भला । बोधु होआवा८४ पैं परमाणु भूतळीं । हिमकणु हिमाचळीं । मजमाजीं न्याहाळीं । अहं तैसें ८५ हो कां तरंगु लहानु । परि सिंधूसीं नाहीं भिन्नु । तैसा ईश्वरीं मी आनु । नोहेचि मा ८६ ऐसेनि बा समरसें । दृष्टि जे उल्हासे । ते भक्ति पैं ऐसे । आम्ही क्षणों ८७ आणि ज्ञानाचें चांगावें । इयेचि दृष्टि नांवें । योगाचेंही आघवें । सर्वस्व हें ८८ सिंधू आणि जळधरा- । माजी लागली अखंड धारा । तैसी वृत्ति वीरा । प्रवर्ते ते ८९ कां कुहेसीं आकाशा । तोंडीं सांदा नाहीं जैसा । तो परमपुरुषीं तैसा । एकवटे गा ३९० प्रतिबिंबौनि बिंबवरी । प्रभेची जैसी उजरी । ते सोहंवृत्ती अवधारीं तैसी होय ९१ ऐसेनि मम परस्परें । ते सोहंवृत्ति जैं अवतरे । तैं तियेंहि सकट सरे । अपैसया ९२ जैसा सैंधवाचा रवा। सिंधूमाजि पांडवा । विरालेया विरवावा । हेंही ठाके ९३ नातरि जाळूनि

श्रीकृष्ण म्हणतात-तो गुण किंवा गुणांचे धर्म यांना ज्या उपायानें ओलांडून जातो, तो उपायसांगतों, ऐक.

अन्वय-यः च मां अव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते, सः एतान् गुणान् समतीत्य ब्रह्मभूयाय कल्पते ॥ २६ ॥

अर्थ-आणि जो एकनिष्ठभक्तीनें माझी सेवा करतो, तो या तीन गुणांना उत्तम प्रकारें जिंकून ब्रह्मरूप होण्याला योग्य होतो. ॥ २६ ॥

जो अभेदबुद्धीनें माझी भक्ति करितो, तो या गुणांचा नाश करूं शकतो ! ७१ तर मी कोण, माझी भक्ति कशी करावयाची, अव्यभिचार भक्ति म्हणजे काय, या सर्व गोष्टी तुला स्पष्ट करून सांगितल्या पाहिजेत. ७२ तर, अर्जुना, ऐक. मी या जगांत असा आहे कीं, रत्नाचें तेज व रत्न हें जसें एकच आहे, ७३ अथवा पातळपणा व पाणी, अवकाश व आकाश, गोडी व साखर हीं जशीं भिन्न नसून एकच आहेत; ७४ विस्तव व ज्वाला हीं एकच आहेत, कमळाच्या पाकळ्या हेंच कमळ, झाड हेंच फांद्या, फळें व पानें; ७५ ज्याप्रमाणें थंडी, व ज्या ठिकाणीं थंडी वास करते तो हिमालय पर्वत, हीं दोन्ही एकच आहेत, व दूध विरजलें म्हणजे ज्याप्रमाणें त्यालाच दहीं म्हणतात, ७६ त्याप्रमाणें विश्व म्हटलें म्हणजे तें सर्व मद्रूपच आहे. पहा कीं, चंद्राची कला पाहणें झाल्यास ती जशी चंद्रापासून सोडून काढावी लागत नाहीं, कां कीं, दोन्ही एकच आहेत. ७७ तूप जरी थिजलें. तरी त्या स्थितींतही तें तूपच असतें; किंवा कंकण आटवून जरी त्याची लगड केली नाहीं, तरी तें जसें सोनेंच होय; ७८ वस्त्र फाडून त्यांतील तंतु जरी निराळे केले नाहींत, तरी तें जसे तंतुमयच आहे, व मडकें फोडून विरवलें नाहीं, तरी ती ज्याप्रमाणें मातीच होय, ७९ त्याप्रमाणें विश्व एका बाजूला सारून मी निराळा आहे, अशांतला प्रकार नसून, सर्व विश्वच मी आहें. ३८० अशा ऐक्यबुद्धीनें जें मला जाणणें त्यालाच माझी अव्यभिचारी म्हणजे अभेदभक्ति म्हणतात, आणि मी व विश्व ह्यांत यत्किंचित् भेदबुद्धि झाली, तर तोच व्यभिचार. ८१ याकरितां, भेद न मानतां एकनिष्ठ चित्तानें तूं आपल्या स्वरूपासुद्धां मीच आहें, असें समज; म्हणजे भक्तपणानें तूं माझ्याहून निराळा राहूं नकोस. ८२ पार्था, सोन्याची टीक करून जरी ती सोन्याच्या दागिन्यावर बसविली, तरी त्या दोहोंत ज्याप्रमाणें भेद नसतो, त्याप्रमाणें आपल्यापासून विश्व वेगळें आहे, असें समजूं नको. ८३ सूर्यापासून निघालेले किरण जसे तेजोमय असून सूर्यापासून निराळे झालेले नसतात ८४ तसा मी व विश्व यांबद्दल ऐक्यबोध व्हावा. भूमीवरील रजःकण आणि हिमालयावरील हिमकण हे ज्याप्रमाणें भूमि व हिमालय यांहून निराळे नाहींत, त्याप्रमाणें माझ्या ठिकाणीं सर्व विश्व आहे, असें जाण. ८५ लाट किती जरी लहान असली, तरी ती जशी समुद्राहून निराळी नाही. तसा ईश्वराहून मी निराळा नाहीं. ८६ अशा प्रकारें सर्वत्र ऐक्यता आहे, अशी जी दृष्टि फांकते, तिलाच आम्ही भक्ती असें म्हणतों. ८७ आणि याच दृष्टीनें ज्ञानही आम्ही सर्वांत उत्तम असें समजतों; व योगाचेंही सार हेंच आहे ८८ समुद्र आणि मेघ यांच्यामध्यें पाऊस पडूं लागल्यावर ज्याप्रमाणें अखंड धारा पडत असतात, त्याप्रमाणें, अर्जुना, भक्ति, भक्त, व भजन या त्रिपुटींत परमात्मा भरलेला आहे. ८९ विहिरीच्या तोंडाशीं असलेल्या आकाशास जसा जोड नाहीं, तसा जो आपल्यांत व परमात्मस्वरूपांत भेद न मानतां ऐक्य आहे असें जाणतो, ३९० त्याला, सूर्याची प्रभा प्रतिबिंबापासून सूर्यापर्यंत जशी सारखी नटलेली असते, त्याप्रमाणें अहंब्रह्म अशी वृत्ति बनल्यावर ब्रह्म व विश्व यांत अंतर दिसत नाहीं ९१ याप्रमाणें अहंब्रह्म अशी मनाची वृत्ति बनल्यावर तीही पुढें आपोआप लय पावते. ९२ हे पांडवा, ज्याप्रमाणें मिठाचा खडा समुद्रांत टाकला असतां तो विरल्यावर त्याचें विरणें आपोआपच रहातें, ९३ किंवा गवत जळल्यावर विस्तवही आपोआपच विझून

तृण । वन्हिही विझे आपण । तैसें भेदु नाशूनि जाण । ज्ञानही नुरे ९४ माझें पैलपण जाये । भक्त हें ऐलपण ठाये । अनादि ऐक्य जें आहे । तेंचि निवडे ९५ आतां गुणातें तो किरीटी । जिणे या नव्हती गोष्टी । जे एकपणाही मिठी । पडों सरली ९६ किंबहुना ऐसी दशा । तें ब्रह्मत्व गा सुदंशा । हें तों पावे जो ऐसा । मातें भजे ९७ पुढती इहीं लिंगीं । भक्तु जो माझा जगीं । हे ब्रह्मता तयालागीं । पतिव्रता ९८ जैसें गंगेचेनि वोघें । डळमळीत जळ जें निघे । सिंधुपद तयाजोगें । आन नाहीं ९९ तैसा ज्ञानाचिया दिठी । जो मातें सेवी किरीटी । तो होय ब्रह्मतेच्या मुकुटीं । चूडारत्न ४०० यया ब्रह्मत्वासीचि पार्था । सायुज्य ऐसी व्यवस्था । याचि नांवें चौथा । पुरुषार्थु गा १ परी माझें आराधन । ब्रह्मत्वीं होय सोपान । तेथ मी हन साधन । गमेन हो २ तरि झणी ऐसें । तुझ्या चित्तीं पैसे । पैं ब्रह्म आन नसे । मीवांचूनि ३

ब्रह्मणो हि प्रतिष्ठाऽहममृतस्याव्ययस्य च । शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्यैकांतिकस्य च ॥२७॥

इति श्रीभद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे गुणत्रयविभागयोगोनाम चतर्दशोऽध्यायः१

अगा ब्रह्म या नांवा । अभिप्रायो मी पांडवा । मीचि बोलिजे आघवा । शब्दीं इहीं ४ पैं मंडळ आणि चंद्रमा । दोनी नव्हती सुवर्मा । तैसा मज आणि ब्रह्मा । भेदु नाहीं ५ अगा नित्य जें निष्कंप । अनाव्रत धर्मरूप । सुख जें उमप । अद्वितीय ६ विवेकु आपलें काम । सारूनि ठाकी जें धाम । निष्कर्षाचें निःसीम । किंबहुना मी ७ ऐसेसें हो अवधारा । तो अनन्याचा सोयरा । सांगतसे वीरा । पार्थासी ८ येथ धृतराष्ट्र म्हणे । संजया हें तूतें कोणें । पुसलेनिविण वायाणें । कां बोलसी ९ माझी अवसरी ते फेडीं । विजयाची सांगे गुढी । येरु जीवीं म्हणे सांडीं । गोठी यिया १० संजयो विस्मयो मानसीं । आहा करूनी सरिसी । म्हणे कैसें पां दैवेंसीं । द्वंद्व यया ११ तरि कृपाळु तो तुष्टो । यया विवेकु हा घोंटो । मोहाचा फिटो । महारोगु १२ संजयो ऐसें चिंतितां । संवादु तो सांभाळितां । हरिखाचा येतु चित्ता । महापुरु १३ ह्मणोनि आतां येणें । उत्साहाचेनि अवतरणें । श्रीकृष्णाचें बोलणें । सांगिजेल १४ तया अक्षरा-आंतील भावो । पाववीन मी तुमचा ठावो । आइका म्हणे ज्ञानदेवो । निवृत्तीचा १५

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥ श्लोक २७, ओव्या ४१५.

जातो, त्याप्रमाणें ज्या ज्ञानापासून ब्रह्माचें ऐक्य होतें, तें ज्ञानही मागून नाहींसें होतें. ९४ मी पलीकडे फार मोठा आहें, व भक्त अलीकडे दीन आहेत, हें अज्ञान नष्ट होऊन देवभक्तांचें जें अनादि स्वाभाविक ऐक्य आहे, तेंच केवळ उरतें. ९५ हे किरीटी, अशा ठिकाणीं ऐक्य आहे हें सुद्धां बोलणें संभवत नाहीं. त्या ठिकाणीं गुणांना तो जिंकतो, असें म्हणणेंच उरत नाहीं. ९६ किंबहुना, हे मर्मज्ञा, याच दशेस ब्रह्मत्व असें म्हणतात; आणि जो माझी अव्यभिचार भक्ति करतो, त्यालाच ब्रह्मत्व प्राप्त होतें. ९७ अशा लक्षणांनीं या जगांत जो माझा भक्त होतो, त्याची ब्रह्मता ही पतिव्रता आहे. ९८ ज्याप्रमाणें गंगेचें पाणी वहात चाल-ल्यावर त्याला समुद्राशिवाय गत्यंतरच नसतें, ९९ त्याप्रमाणें, अर्जुना, ज्ञानाच्या दृष्टीनें जो माझी सेवा करतो, तो ब्रह्मतेच्या मुकुटावरील मणि होतो ४०० पार्था, या ब्रह्मप्राप्तीलाच सायुज्य मुक्ति म्हणतात. व हिलाच चौथा पुरुषार्थ (मोक्ष) असें म्हणतात. १ परंतु ब्रह्मत्व पावण्याकरितां माझी आराधना हा जिना होय; तेव्हां तें प्राप्त झाल्यावर, मी व माझ्या प्राप्तीकरितां करावयाचें साधन हीं दोन्हीं निराळीं आहेत, असें समजशील हो! २ तर माझ्यापासून ब्रह्म निराळें आहे, अशी तुझ्या मनांत कल्पनाही येऊं देऊं नको. ३

अन्वय—अमृतस्य अव्ययस्य च ब्राह्मणः, शाश्वतस्य च धर्मस्य, ऐकांतिकस्य सुखस्य च हि प्रतिष्ठा अहं (अस्मि). ॥ ७

अर्थ—कारण, अविनाशी व निर्विकार अशा ब्रह्माचें सनातन धर्माचें, व अखंड अशा सुखाचें स्थान मी आहें

हे पांडवा, ब्रह्म म्हणून ज्याला म्हणतात, तो मीच होय; व मलाच हीं नांवें आहेत. ४ पहा कीं, चंद्र व त्याचे मंडळ हीं ज्याप्रमाणें दोन नाहींत, त्याप्रमाणें, हे मर्मज्ञ अर्जुना, मी व ब्रह्म यांत भेद नाहीं, ५ तें ब्रह्म नित्य, निष्कंप, आवरण नसणारें, धर्मरूप व अपार सुख देणारें असें अद्वितीय आहे. ६ अज्ञानाचा नाश करून ज्ञान ज्या स्वरूपीं लय पावतें, तें सिद्धांतानें ठरलेलें शेवटचें स्वरूप मीच होय. ७ एकनिष्ठ भक्तांचा जो आवडता परमात्मा, तो शूर पार्थास याप्रमाणें सांगता झाला. ८ तेव्हां धृतराष्ट्र संजयास म्हणाला कीं, या गोष्टी तुला कोणीं पुसल्या होत्या? व त्या तूं मला व्यर्थ कां सांगतोस? ९ माझ्या मुलांच्या विजयाची गोष्ट मला सांगून माझी शंका फेड. त्या वेळेस संजय आपल्या मनांत म्हणतो, अरे, या गोष्टी सोडून दे.! ४१० संजय मनांत विस्मय पावून आपल्यास फार उत्तम गोष्ट ऐकण्यास सांपडली असें मानून म्हणाला, दैवगति काय विचित्र आहे, कीं, याला युद्धाचीच आवड आहे. ११ तरी कृपाळू भगवान् संतुष्ट होऊन याच्या मनांत विवेकरूपी औषध घालून, याचा मोहरूपी महारोग नाहींसा करो. १२ संजय अशा प्रकारें मनांत विचार करतो आहे, इतक्यांत कृष्णार्जुनांच्या संवादाकडे लक्ष जाऊन त्याच्या चित्तांत आनंदाचा महापूर आला. १३ म्हणून मनांत हर्षयुक्त होऊन, श्रीकृष्ण काय म्हणाले, तें तो सांगेल. १४ निवृत्तिदास ज्ञानदेव म्हणालेः—त्याच्या बोलण्याचा भाव मी तुमच्या हृदयांत ठसवीन तो ऐका. ४१५

या अध्यायांत सांगितल्याप्रमाणें गुणातीत होऊन शुद्ध झालेल्या चित्ताच्या ठिकाणीं श्रीगुरूंच्या पाऊलांची स्थापना करून पूजा करण्याचे मिष करून पुढील अध्यायास श्रीज्ञानेश्वरमहाराज प्रारंभ करितात.

ज्ञानेश्वरी.

अध्याय पंधरावा.

आतां हृदय हें आपुलें । चौफाळूनियां भलें । वरी बैसऊं पाउलें । श्रीगुरूचीं १ ऐक्यभावाची अंजुळी । सर्वेंद्रियकुड्मुळीं । भरूनियां पुष्पांजुळी । अर्घ्यु देवों २ अनन्योदकें धुवट । वासना जे तन्निष्ठ । तें लागलेंसें अबोट । चंदनाचें ३ प्रेमाचेनि भांगारें । निर्वाळूनि नूपुरें । लेवऊं सुकुमारें । पदें तियें ४ घणावली आवडी । अव्यभिचारें चोखडी । तिये घालूं जोडी । आंगोळिया ५ आनंदामोदबहुळ । सात्विकाचें मुकुळ । तें उमललें अष्टदळ । ठेऊं वरी ६ तेथें अहं हा धूप जाळूं । नाहं तेजें वोवाळूं । सामरस्यें पोटाळूं । निरंतर ७ माझी तनु आणि प्राण । इया दोनी पाउवा लेऊं श्रीचरण । करूं भोगमोक्ष निंबलोण । पायां तयां ८ इया गुरुचरणसेवा । हों पात्र तया दैवा । जे सकळार्थमेळावा । पाटु बांधे ९ ब्रह्मींचें विसवणेंवरी । उन्मेख लाहे उजरी । जें वाचेतें इये करी । सुधासिंधू १० पूर्णचंद्राचिया कोडी । वक्तृत्वा घापे कुरोंडी । तैसी आणी गोडी । अक्षरांतें ११ सूर्यें अधिष्ठिली प्राची । जगा राणीव दे प्रकाशाची । तैशी वाचा श्रोतयां ज्ञानाची । दिवाळी करी १२ नादब्रह्म खुजें ।। कैवल्यही तैसें न सजे । ऐसा बोलु देखिजे । जेणें दैवें १३ श्रवणसुखाच्या मांडवी । विश्व भोगी माधवी । तैसी सासिन्नली बरवी । वाचावल्ली १४ ठावो न पवता जयाचा । मनेंसी मुरडली वाचा । तो देवो होय शब्दाचा । चमत्कारु १५ जें ज्ञानासि न चोजवे । ध्यानासिही जें नागवे । तें अगोचर फावे । गोठोमाजीं १६ येवढें एक सौभग । वळघे वाचेचें आंग । श्रीगुरुपादपद्मपराग । लाहे जैं कां १७ तरि बहु बोलूं काई । आजि तें आनी ठाईं । मातेंवाचूनि नाहीं । ज्ञानदेवो म्हणे १८ जे तान्हेनि मियां अपत्यें । आणि माझे गुरु एकलौते । ह्मणोनि कृपेंसि एकहातें । जालें तिये १९ पाहा पां भरोवरी आघवी । मेघ चातकांसी रिचवी । मजलागीं गोसावी । तैसें केलें २० ह्मणोनि

ज्ञानेश्वरी.

अध्याय पंधरावा.

आतां आपलें हृदय चांगलें स्वच्छ करून त्यावर श्रीगुरूंच्या पादुकांची स्थापना करूं. १ नंतर एकनिष्ठपणाच्या ओंजळींत सर्वेंद्रियरूपी पुष्पांच्या कळ्या घेऊन श्रीगुरूंस अर्घ्य देऊं. २ अनन्यभावरूपी स्वच्छ उदकानें स्नान घालून त्यांच्याच ठिकाणीं असणाऱ्या एकनिष्ठ वासवारूप चंदनाचें श्रीगुरूंस अनामिकेनें गंध लावूं. ३ प्रेमरूपी शुद्ध सोन्याच्या घागऱ्या करून गुरूंच्या सुकुमार पायांत घालूं ४ गुरू यां ठिकाणीं असलेल्या एकनिष्ठ व सर्वोत्तम दृढ आवडीची रणजोडवीं करून गुरूंच्या अंगठ्यांत घालूं ५ अष्टभावरूपी पाकळ्या उमललेल्या आहेत, असें सात्विभावरूपी कमल आनंदरूपी वासासह त्यांच्या चरणांवर वाहूं. ६ त्या ठिकाणीं अहंकाराचा धूप करून निरभिमानाचा दीप ओंवाळूं; व निरंतर असणाऱ्या ऐक्यभावानें गुरूंस आलिंगन देऊं. ७ आपलें शरीर व प्राण या दोन पादुका करून श्रीगुरूंच्या चरणांत घालूं; व गुरूंच्या चरणावरून भोग व मोक्ष यांचें लिंबलोण करूं. ८ या प्रकारची श्रीगुरूंच्या चरणांची सेवा, जो कोणी परम भाग्यवान् असेल त्यालाच ती प्राप्त होईल. ज्या सेवेचें फल मोक्षासकट सर्व अर्थांची यथेच्छ प्राप्ती करून देते. ९ इतकेंच नाहीं तर, तो उपासक ब्रह्मस्वरूपी स्थित होण्यावरही त्याच्या ज्ञानाची इतकी परिपक्वता होते की, त्याची वाणी अमृताचा सागरच होऊन जाते. १० फार काय सांगावें, त्याच्या वक्तृत्वाला इतकी, गोडी येते कीं, आल्हाद देणारे पौर्णिमेचे कोट्यावधि चंद्र त्याच्यावरून ओंवाळून टाकावे. ११ तसेंच पूर्वेस सूर्य उगवल्याबरोबर ज्याप्रमाणें सर्व जगांत प्रकाशाची रेलचेल होते, त्याप्रमाणें त्यांच्या तोंडांतून निघणाऱ्या भाषणांनीं श्रोत्यांना ज्ञानाची दिवाळी होते १२ नारदब्रह्म त्याच्या बोलण्याच्या माधुर्यापुढें फिकें पडतें, व तसेंच मोक्षसुखही त्याची योग्यता पावत नाहीं. याप्रमाणें उत्तम असें जें भाषण तेंही ज्याला भाग्यानेंच प्राप्त होतें. १३ श्रवणसुखरूपी मांडवांत, वसंत ऋतूंत ज्याप्रमाणें चहूंकडे झाडें टवटवीत दिसतात, त्याप्रमाणें वाचरूप वेल चहूंकडे पसरतो. १४ काय चमत्कार सांगावा! ज्या परमात्म्याचा ठाव न लागतां वाणी मनासह माघारी फिरते, असाही परमात्मा गुरुचरणउपासकाच्या मुखवाटें जीं अक्षरें निघतील त्या शब्दाप्रमाणें नाचूं लागतो. १५ ज्ञानासही जाणण्यास कठीण व ध्यानासही सांपडण्यास कठीण असा जो न कळणारा परमात्मा तो त्याच्या सहज बोलण्यांत येतो. १६ एवढें जें ऐश्वर्य त्याच्या वाणीला प्राप्त होतें, तें केवळ श्रीगुरुपदकमलपरागाच्या प्राप्तीनेंच येतें. १७ श्रीज्ञानेश्वरमहाराज सद्गदीत होऊन म्हणतात, फार काय सांगूं! अशा प्रकारचें भाग्य आज माझ्याबांचून दुसऱ्या ठिकाणीं नाहींच. १८ याचें कारण असें कीं, मी माझ्या गुरूचें एकुलतें एक तान्हें लेंकरूं असल्यामुळें, त्यांच्या कृपेस दुसरीकडे जाण्यास जागाच नसल्यामुळें मी एकटाच पात्र झालों. १९ असें पहा, मेघ हा एका चातक पक्षास पाणी मिळावें, म्हणून आपल्याजवळ असलेल्या पाण्याचा वर्षाव करितो, (त्यांत जगाचें स्वाभाविकच कल्याण होतें.) त्याप्रमाणें श्रीगुरूंनीं मजवरच कृपा केली. २० म्हणून कृ-

रिकामें तोंड । करूं गेलें बडबड । कीं गीता ऐसें गोड । आतुडलें २१ होय अदृष्ट आपैतें । तैं वाळूचि रत्नें परते । उजू आयुष्य तैं मारितें । लोभु करी २२ आघणीं घातलिया हरळ । होती अमृताचे तांदुळ । जरी भुकेची राखे वेळ । श्रीजगन्नाथु २३ जयापरी श्रीगुरु । करिती जैं अंगीकारु । तैं होऊनि ठाके संसारु । मोक्षमा. आघवा २४ पाहा पां काई नारायणें । तया पांडवांचें उणें । कीजेचि ना पुराणें । विश्ववंद्यें २५ तैसें श्रीनिवृत्तिराजें । अज्ञानपण हें माझें । आणिलें वोजे । ज्ञानाचिया २६ परि हें असो आतां । प्रेम रुळतसे बोलतां । कें गुरुगौरव वर्णितां । उन्मेष असे २७ आतां तेणेंचि पसायें । तुम्हां संतांचे मी पाये । वोळगेन अभिप्रायें । गीतेचेनी २८ तरि तोचि प्रस्तुतीं । चौदाविया अध्यायाच्या अंतीं । निर्णयो कैवल्यपती । ऐसा केला २९ जें ज्ञान जयाच्या हातीं । तोचि समर्थु मुक्ती । जैसा शतमख संपत्ती । स्वर्गींचिये ३० कां शत एक जन्मां । जो जन्मेनि ब्रह्मकर्मा । करी तोचि ब्रह्मा । आनु नोहे ३१ नाना सूर्याचा प्रकाशु । लाहे जेवीं डोळसु । तेवीं ज्ञानेंचि सौरसु । मोक्षाचा तो ३२ तरि तया ज्ञानालागीं । कवणा पा योग्यता आंगीं । हें पाहतां जगीं । देखिला एकु ३३ जे पाताळींचेंही निधान । दावील कीर अंजन । परि होआवे लोचन । पायाळाचे ३४ तैसें मोक्ष देईल ज्ञान । येथ कीर नाहीं आन । परि तेंचि थारे ऐसें मन । शुद्ध होआवें ३५ तरी विरक्तीवांचूनि कहीं । ज्ञानासि तगणेंचि नाहीं । हें विचारूनि ठाईं । ठेविलें देवें ३६ आतां विरक्तीची कवण परी । जे येऊनि मनातें वरी । हेंही सर्वज्ञें श्रीहरी । देखिलें असे ३७ जे विषें रांधिली रससोये । जैं जेवणारा ठाऊवि होये । तैं तो ताटचि सांडूनि जाये । जियापरी ३८ तैसी संसारा या समस्ता । जाणिजे जैं अनित्यता । तैं वैराग्य दवडितां । पाठीं लागे ३९ आतां अनित्यत्व या कैसें । तेंचि वृक्षाकारमिषें । सांगिजत असे विश्वेशें । पंचदशीं ४० उपडिलें कवतिकें । झाड येरिमोहरा ठाके । तें वेगें जैसें सुके । तैसें हें नोहे ४१ यातें एकेपरी । रूपकाचिया कुसरी । सारीतसे वारी । संसाराची ४२ करूनि संसार वावो । स्वरूपीं अहंते ठावो । होआवया अध्यावो । पंधरावा हा ४३ आतां हेंचि आघवें । ग्रंथगर्भींचें चांगावें । उपलविजेल जीवें । आकर्णिजे ४४ तरि महानंद समुद्र । जो पूर्ण पूर्णिमा चंद्र । तो द्वारकेचा । नरेंद्र । ऐसें म्हणे ४५ अगा पैं पंडुकुमरा । येतां

पेची खूण ही आहे कीं, माझें रिकामें तोंड सहज बडबड करूं लागलें असतां, त्यांत गीतेसारखें गोड व्याख्यान सांपडलें. २१ यांत तरी विशेष आश्चर्य काय! अहो, प्रारब्ध अनुकूल असल्यावर वाळू हातांत घेतली असतां तींच रत्नें होतात, आणि आयुष्याची दोरी वळकट असल्यावर मारणाराही लोभ करतो; २२ ज्या वेळीं ईश्वराच्याच मनांत अन्न देऊन जगवावयाचें असतें, त्या वेळीं आवणांत खडे वैरले असतांही त्यांचे अमृततुल्य तांदूळ होतात; २३ त्याप्रमाणें, ज्याचा श्रीगुरूंनीं अंगीकार केला, त्याचा सर्व दुःखरूप संसारच मोक्षरूप म्हणजे आनंदरूप होतो. २४ पहा कीं, पांडवांचें सर्व प्रकारें उणें असूनही श्रीकृष्णानें त्यांच्या निंद्य कथेस पुराणाची योग्यता आणून ती सर्व जगास वंद्य अशी करून ठेविली नाहीं का! २५ त्याप्रमाणें, श्रीगुरु निवृत्ति महाराजांनीं माझ्या अज्ञानासच ज्ञानाच्या योग्यतेस आणून वसविलें. २६ परंतु, हें असो, अशा बोलण्यानें प्रेम अधिकच वाढत जातें. आणि श्रीगुरुमहात्म्य वर्णन करण्यास मला तरी ज्ञान आहे कोठें? २७ म्हणून आतां गुरूंच्याच प्रसादानें व तुम्हां संतांच्या पायांच्या दर्शनानें गीतेचा अभिप्राय वर्णन करण्याकडे मी वळतों. २८ चौदाव्या अध्यायाच्या शेवटीं, मोक्षदाते असे जे भगवान् श्रीकृष्ण त्यांनीं असा निर्णय केला कीं, २९ ज्याला ब्रह्मज्ञानप्राप्ति झाली आहे, त्यालाच मोक्ष प्राप्त होतो. ज्याप्रमाणें शंभर यज्ञ करणारास स्वर्गांतील संपत्ति (इंद्रपद प्राप्त होतें;३० किंवा जो शंभर जन्म ब्रह्मकर्मांत घालवितो, तोच निसंशय ब्रह्मदेवाचें पद मिळवितो; ३१ किंवा सूर्याचे प्रकाशाचा उपयोग एक डोळ्यासच होतो, त्याप्रमाणें जो ज्ञानी आहे, त्यालाच मोक्षप्राप्तीचें सुख मिळतें. ३२ तर हें ज्ञान मिळविण्याची कोणाच्या ठिकाणीं योग्यता आहे, हें पाहूं गेलें असतां जगांत एकच पुरुष दृष्टीस पडतो. ३३ ज्याप्रमाणें, भूनिहित द्रव्य अंजन घातलें असतां दृष्टीस पडतें, परंतु तें अंजन घालण्याचा प्रयत्न मनुष्यच अधिकारी आहे, ३४ त्याप्रमाणें, ज्ञान मोक्ष देईल यांत शंका नाहीं; परंतु तें ज्ञान टिकेल, अशी अंतःकरणाची भूमिका शुद्ध असली पाहिजे. ३५ ह्याचा स्पष्ट अर्थ असा आहे कीं, वैराग्याशिवाय ज्ञान रहाणारच नाहीं, असा देवांनीं विचारपूर्वक निश्चय करून ठेविला आहे. ३६ आतां वैराग्य आपण होऊन मनांत कसें शिरेल. याजबद्दलही सर्वज्ञ श्रीहरींनीं विचार केला आहे. तो प्रथम दृष्टांत देऊन सांगतात—३७ ज्याप्रमाणें एकादा मनुष्य भोजनास बसल्यावर अन्नांत विष घातलें आहे, असें समजतांच ताट टाकून उठून जातो, त्यास भोजनाविषयीं विरक्ती उत्पन्न होतेच; ३८ त्याप्रमाणें सर्व संसार अनित्य म्हणजे रज्जुसर्पवत् मिथ्या आहे, असा ज्या वेळेला दृढ निश्चय होईल, त्या वेळेस वैराग्य नको नको म्हणतां अंतःकरणांत बलात्कारेंकरून प्रवेश करील. ३९ आतां संसाराला मिथ्यात्व कसें आहे, तें या पंधराव्या अध्यायांत वृक्षाच्या रूपकानें भगवान् सांगत आहेत. ४० इतर झाडें स्वभावतः पडलीं असतां त्यांचीं बुडें वरतीं येऊन तीं जशीं सुकतात, त्याप्रमाणें हा संसारवृक्ष सुकणारा नाहीं. ४१ याप्रमाणें संसाराविषयीं झाडाचें कुशलतेनें रूपक करून श्रीकृष्ण भगवान् मुमुक्षूंस जन्ममरणांच्या येरझारांपासून सोडवितात. ४२ संसाराला मिथ्यात्व ठरवून ब्रह्मच मी आहें, असा निश्चय करून द्यावयाचा हाच या अध्यायाचा विषय आहे. ४३ हाच उत्तम विषय या गीताशास्त्रांतील या अध्यायांत आहे, तो मी उकलून सांगतों, आपण मनःपूर्वक ऐका. अशी महाराज संतांना प्रार्थना करून ४४ महानंदाचा समुद्र, सिद्धांचा पूर्णचंद्र, व द्वारकेचा राजा जो श्रीकृष्ण भगवान् अर्जुनास काय म्हणाला तें सांगतातः—४५ अरे अर्जुना, आत्मस्वरूपाच्या घरा-

स्वरूपाचिया घरा । करीतसे आडवारा । विश्वाभासु जो ४६ तो हा जगडंबरु। नोहे येथ संसारु । हा जाणिजे महातरु । थांवला असे ४७ परि येरां रुखांसारिखा । तळीं मुळें वरी शाखा । तैसा नोहे म्हणोनि लेखा । नयेचि कवणा ४८ आगी कां कुऱ्हाडी । होय रिगावा जरी बुडीं । तरी हो कां भलतेवढी । वरिचील वाढी ४९ जे तुटलिया मुळापासीं । उलंडेल कां शाखांसीं । परी तैसी गोठी कायसी । हा सोपा नव्हे ५० अर्जुना हें कवतिक । सांगतां असे अलौकिक । जे वाढी अधोमुख । रुखा यया ५१ जैसा भानु उंची नेणों कें । रश्मिजाळ तळीं फांके । संसार हें कावरुखें । झाड तैसें ५२ आणि आथी नाथी तितुकें । रुंधलें असे येणेंचि एकें । कल्पांतींचेनि उदकें । व्योम जैसें ५३ कां रवीच्या अस्तमानीं । आंधारेनि कोंदे रजनी । तैसा हाचि गगनीं । मांडला असे ५४ यया फळ ना चुंबितां । फूल ना तुरंबितां । जें कांहीं पंडुसुता । तें रुखुचि हा ५५ हा ऊर्ध्वमूळ आहे । परि उन्मूळिला नोहे । येणेंचि हा होये । शाड्वळु गा ५६ आणि ऊर्ध्वमूळ ऐसें । निगदिलें कीर असे । परी अर्धीही असोसें । मूळें यया ५७ बलवचेचि महामारी । पिंपळा कां वडाचिया परी । जे पारंबियांमाझारीं । डहाळिया असती ५८ तेविंचि गा धनंजया । संसारतरू यया । अर्धींचि आथी खांदिया । हेंही नाहीं ५९ तरी ऊर्ध्वाहीकडे । शाखांचे मांदोडे । दिसतांति अपाडें । सासिन्नले ६० जालें गगनाचिपा वेली ये । कां वारा मांडला रुखाचेनि आयें । नाना अवस्थात्रयें । उदयला असे ६१ ऐसा हा एकु । विश्वाकार विटंकु । उदयला जाण रुखु । ऊर्ध्वमूळु ६२ आतां ऊर्ध्व या कवण । येथें मूळ तें किं लक्षण । कां अधोमुखपण । शाखा कैसिया ६३ अथवा द्रुमा यया । अधीं जिया मुळिया । तिया कोण कैसिया । ऊर्ध्व शाखा ६४ आणि अश्वत्थु हा ऐसी । प्रसिद्धि कायसी । आत्मविदाविलासीं । निर्णयो केला ६५ हें आघवेंचि बरवें । तुझिये प्रतीतीसि फावे । तैसेनि सांगों सोलिंवें । विन्यासें गा ६६ परी ऐकें गा सुभगा । हा प्रसंगु असे तुजचि जोगा । कानाचि करी हो सर्वांगा । हिये आथिलिया ६७ ऐसें प्रेमरसें सुरफुरें । बोलिलें जंव यादवबीरें । तंव अवधान अर्जुनाकारें । मूर्त जालें ६८ देव निरुपिती तें थेंकुलें । येवढें श्रोतेपण फांकलें । जैसें आकाशा खेंव पसरिलें । दाहीं दिशीं ६९ श्री-

ला म्हणजे स्वस्वरूप प्राप्तीला येत असतां मध्यें जो विश्वाभास म्हणजे प्रपंच आड येतो, ४६ तो हा विश्वाभास म्हणजे प्रपंच नसून मोठा वळावलेला कोणी एक वृक्षच आहे, अशी कल्पना कर. ४७ पण इतर झाडांचीं मुळें खालीं असून वर फांद्या असतात तसा हा नाहीं, म्हणून याचें कोणालाही वर्णन करितां येत नाहीं. ४८ सामान्य वृक्षाच्या मुळाशीं कुऱ्हाड घातली, किंवा अग्नी लावला, तर वृक्षाचा वरचा विस्तार केवढाही असला तरी ४९ तो वृक्ष मुळापाशीं तुटल्यावर शाखासहवर्तमान उलथून पडतो, परंतु तशा प्रकारानें उलथून पडण्याइतका हा वृक्ष सोपा नाहीं. ५० या वृक्षाचें कौतुक काय सांगावें, कीं, ज्याचें मूळ वरच्या बाजूस असून या वृक्षाची वाढ खालच्या बाजूला आहे. ५१ ज्याप्रमाणें सूर्याची उंची किती आहे हें कळत नाहीं, पण त्याचीं किरणें खालच्या बाजूला पसरतात, त्याप्रमाणें संसाररूपी वृक्ष चमत्कारिक आहे. ५२ आणखी, या जगतांत जेवढें कांहीं आहे नाहीं, तेवढें सर्व या झाडाच्या पोटांत आहे, म्हणजे या झाडानें व्यापून टाकलें आहे. ज्याप्रमाणें कल्पांतसमयींच्या उदकानें जसें सर्व आकाश व्यापून जातें, ५३ किंवा सूर्य अस्तास गेल्यावर ज्याप्रमाणें रात्र अंधारानें कोंदलेली असते; त्याप्रमाणें, हा वृक्ष सर्व गगनांत भरलेला आहे. ५४ चाखावें म्हटलें तर याला फळ नाहीं; हुंगावें म्हटलें तर फूलही नाहीं; जें कांहीं आहे, तें सर्व हा वृक्षच. ५५ याचें मूळ वर आहे, तथापि हा उपटून टाकलेला नाहीं. अर्जुना, याच कारणास्तव हा नेहमीं टवटवीत असतो. ५६ आणि याचें वर मूळ आहे असें जरी म्हटलें आहे, तरी खालींही याला पुष्कळ मुळें आहेत. ५७ ह्याच्या महान् शक्तीच्या जोरानें पिंपळ किंवा वड यांच्याप्रमाणें चारंव्यासध्येंही डाहाळ्या पसरल्या आहेत; ५८ त्याप्रमाणें अर्जुना, संसाररूपी वृक्षास खालींच खांद्या आहेत, असाही प्रकार नाहीं. ५९ तर, वरही ह्याला अपार खांद्या असून त्या विस्तार पावलेल्या आहेत. ६० गगनच या झाडाचा वेल आहे, त्याच्या रूपानें हा वृक्षच आहे, किंवा अवस्थांचा म्हणजे जागृत, स्वप्न, सुषुप्ति किंवा उत्पत्ति, स्थिति, लय यांना आश्रयरूपानें उत्पन्न झालेला आहे. ६१ याप्रमाणें हा एक विश्वाच्या आकारानें वरच्या बाजूला मूळ व खालच्या बाजूला शाखा असा विलक्षण वृक्ष उदयास आलेला आहे. ६२ आतां याचें ऊर्ध्व कोणतें, मूळाचें लक्षण काय आणि खालच्या बाजूच्या शाखा कोणच्या, ६३ अथवा या वृक्षाला खालीं ज्या मुळ्या आहेत, त्यांपासून वर खांद्या कोणत्या व कशा उत्पन्न होतात, ६४ आणि या वृक्षास 'अश्वत्थ' हें नांव कशावरून प्राप्त झालें, या सर्वांचा आत्मवेत्त्याशीं विलास करणारा भगवान् श्रीकृष्ण, यांनीं निर्णय करून, अर्जुनास म्हणतातः ६५ हें सर्व तुझ्या प्रतीतीस चांगल्या प्रकारानें येईल, असें स्वच्छ विस्तारानें सांगतों. ६६ हे भाग्यवंता, हें निरूपण ऐकण्यास अधिकारसंपन्न तूंच आहेस; एवढ्याकरितां हे धैर्यवंता, सर्व अंगाला कानच कर, म्हणजे एकाग्र चित्त होऊन ऐक. ६७ यादववीर जो श्रीकृष्ण भगवान्, तो याप्रमाणें प्रेमरसानें भरलेलें असें भाषण बोलल्यावर, अर्जुनाच्या ठिकाणीं अवधान हें मूर्तिमंत दिसूं लागलें. ६८ ज्याप्रमाणें, आकाश मोठें असूनही त्यास दाही दिशांनीं आलिंगन दिलें आहे, त्याप्रमाणें अर्जुनाचा श्रोतेपणा एवढा वाढला कीं, देवांनीं कितीही निरूपण केलें तरी तें थोडेंच ! ६९ श्री-

कृष्णोक्तिसागरा । हा अगस्तीचि दुसरा । म्हणौनि घोंटु भरों पाहें एकदसरा । अवघेयाचा ७० ऐसी सोय सांडूनि खवळिली । आवडी अर्जुनीं देवें देखिलली । तथ जालेनि सुखें केली । कुरवंडी तया ७१

श्रीभगवानुवाचः—

ऊर्ध्वमूलमधःशाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् । छंदांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् ॥१॥

मग म्हणे धनंजया । तें ऊर्ध्व गा तरू यया । येणें रुखेंचि कां जायां । ऊर्ध्वता गमे ७२ एऱ्हवीं मध्योर्ध्व अध । हे नाहीं जेथ भेद । अद्वयासीं एकवद । जया ठायीं ७३ जो नाइकिजतां नादु । जो असौरभ्य मकरंदु । जो आंगाथिला आनंदु । सुरतेंविण ७४ जया जें आन्हां परौतें । जया जें पुढें मागौतें । दिसतेनविण दिसतें । अदृश्य जे ७५ उपाधीचा दुसरा । घालितां वोपसरा । नामरूपाचा संसारा । होय जयातें ७६ ज्ञातृज्ञेयाविहीन नुसधेंचि जें ज्ञान । सुखा भरलें गगन । गाळींव जें ७७ जें कार्य ना कारण । जया दुजें ना एकपण । आपणयां जें जाण । आपणचि ७८ ऐसें वस्तु जें साचें । तें ऊर्ध्व गा यया तरूचें । तेथ आर घेणें मूळाचें । तें ऐसें असे ७९ तरी माया ऐसी ख्याती । नसतीच यया आथी । कां वांझेची संतती । वानणें जैशी ८० तैसी सत् ना असत् होये । जे विचाराचें नाम न साहे । ऐसेया परीची आहे । अनादि म्हणती ८१ जे नानातत्त्वांची मांदुस । जे जगदभ्राचें आकाश । जे आकारजाताचें दुस । घडी केलें ८२ जे भवद्रुमबीजिका । जे प्रपंचाची भूमिका । विपरीतज्ञानदीपिका । सांचली जे ८३ ते माया वस्तूच्या ठायीं । असे जैसेनि नाहीं । मग वस्तुप्रभाचि पाहीं । प्रगट होय ८४ जेव्हां आपणया आली निद । करी आपणपें जेवीं मुग्ध । कां काजळी आणी मंद । प्रभा दीपीं ८५ स्वप्नीं प्रियापुढें तरुणांगी । निदेली चेवऊनि वेगीं । आलिंगिलेनिवीण आलिंगी । सकामु करी ८६ तैसी स्वरूपीं जाली माया । आणि स्वरूप नेणे धनं-

कृष्णाच्या भाषणरूपी समुद्राम अर्जुनाचें श्रोतेपण हाच कोणी एका आचमनांत संपविणारा दुसरा अगस्ती ऋषिच होय. म्हणून, श्रीकृष्ण जें सांगतील; त्या सर्वांचा एकच घोट करण्यास अर्जुन प्रवृत्त झाला ! ७० अर्जुनाच्या ठिकाणीं ऐकण्याची अशी अमर्याद इच्छा उत्पन्न झालेली पाहून श्रीकृष्णांनीं आपल्यास झालेलें समाधान त्याच्यावरून ओंवाळून टाकलें ! ७१

अन्वय–(इस संसारवृक्ष) अश्वत्थं ऊर्ध्वमूलं, अवाक्शाखं अव्ययं च प्राहुः. छंदांसि यस्य पर्णानि सन्ति; यः तं वेद, सः वेदवित्. ॥ १ ॥

अर्थ–श्रीभगवान म्हणालेः––ह्या संसाररूप अश्वत्थ वृक्षाचीं पालेंमुळें वर आहेत, व शाखा खालीं आहेत. आणि ह्याचा कधींही नाश होत नाहीं, असें म्हणतात; छंदोबद्ध वेद हीं ह्या वृक्षाचीं पानें होत; आणि ज्याला हें सर्व प्रकारें अवगत आहे, तोच वेदवित् ह्मणजे वेदवेत्ता [ज्ञाता] होय. ॥ १ ॥

मग श्रीकृष्ण भगवान् अर्जुनास म्हणतातः– धनंजया, ब्रह्म या वृक्षाला ऊर्ध्व आहे; [येथें ऊर्ध्व म्हणजे उंच, उंच म्हणजे श्रेष्ठ, श्रेष्ठ म्हणजे सर्वोत्तम, सर्वोत्तम म्हणजे ब्रह्म असा ऊर्ध्व शब्दाचा मुख्य अर्थ आहे.] आणि या वृक्षामुळेंच त्यास ऊर्ध्वता आली, असें म्हणावें लागतें. ७२ नाहीं तर, ज्याच्या ठिकाणीं एकत्वही लयाला जातें, त्याच्या ठिकाणीं मध्य, ऊर्ध्व व अध मध्यें वर व खालीं) हे भेद कोठून असणार ? ७३ व जें तंतुवाद्यापासून उत्पन्न होऊन ऐकूं येणाऱ्या नादाच्या पूर्वीचा जो मूळ नाद, तसेंच मकरंदांतून उत्पन्न होणाऱ्या सुगंधाच्या मूळाचा जो सुगंध, व जो विषयसेवनाशिवाय उत्पन्न होणारा स्वरूपानंद–असें आहे; ७४ ज्याला अलीकडे व पलीकडे, पुढें व मागें अशी मर्यादा नाहीं; व जें पाहणारा वांचूनच स्वयंप्रकाश असून जें अदृश्य असतें; ७५ मायारूप उपाधीचा ओपसरा (तोरमळ्याच्या तेजाला मदत करणारा पदार्थ) घातला असतां ज्या ब्रह्माच्या ठिकाणीं नामरूपादि प्रपंचाचा विस्तार होतो, तें ब्रह्म ७६ ज्ञाता व ज्ञेय या दोहींहून शुद्ध ज्ञानमात्र असून सर्व जगांत निरुपाधिक सुखानें व्याप्त असणारें, ७७ तसेंच जें कोणापासून झालेलें नाहीं, व ज्याच्यापासून कांहीं होत नाहीं, ज्याला दुसरेपणा नाहीं व एकपणाही नाहीं, व जें आपणच आपल्याला प्रकाशित करतें. ७८ याप्रमाणें जें तत्त्व ब्रह्म तें या तरूचे ऊर्ध्व आहे. ऊर्ध्वाच्या ठिकाणीं या वृक्षाचें मूळ जी माया तिचा आरंभ पुढें सांगतों अशा तऱ्हेचा आहे. ७९ आतां माया अशी जिला आम्ही आहे, ती वास्तविक नसून, आहे अशी प्रसिद्धि आहे बाकी तुलत्या पोकळ गोष्टी आहेत. जशी वांझेची संतति वर्णन करणें व्यर्थ आहे. ८० (जगद्रूपी कार्याच्या संगतीकरितां मानावी लागली, तर अनिर्वचनीय मानतात. अनिर्वचनीय ह्मणजे सतासतांहून विलक्षण)या प्रमाणें माया विचारानें नाश पावते म्हणून सत् नाहीं, जगद्कार्यरूपानें प्रतीत होते, म्हणून असत् नाहीं, अशा प्रकारें ही सतासतांहून विलक्षण असून अनादि आहे. ८१ शिवाय जी पंचभूतादि तत्त्वांची पेटी होय, जी जगद्रूप अभ्राला आधार होय, व विश्वाकाररूप वस्त्राची घडी होय, ८२ जी संसाररूप वृक्षाची बी, जी प्रपंचाचें चित्र काढण्याची भूमिका, व जी ब्रह्मज्ञानाविषय इतर ज्ञानाच्या प्रकाशानें भरलेली आहे; ८३ याप्रमाणें वर्णन केलेली माया, ब्रह्मवस्तूच्या ठिकाणीं नसल्यासारखी आहे. मग जितका ज्ञानव्यवहार दिसतो. तितका परमात्मवस्तूचा प्रकाशच प्रकट होतो, असें समज. ८४ तसें ज्ञान कांहीं हात नाहा, असें म्हणशील नर–– जागृत मनुष्यास निद्रा आली असतां तो जसा जागचे जागीं ज्ञानशून्य होतो; किंवा दिव्याच्या आश्रयानें असणारी काजळी दिव्याच्या प्रभेला मंद करिते; ८५ अथवा स्वप्नांत एकाद्या मनुष्याजवळ त्याच्याच कल्पनेनें उत्पन्न झालेली तरुण स्त्री येऊन याला निजलेला जागा करून आलिंगन दिल्यावांचून, आलिंगन देऊन पुरुषाला सकाम करिते. ८६ त्याप्रमाणें अर्जुना, ब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणीं माया असून ब्रह्मस्वरूपाला आच्छादन करण्याला कारण झाली. त्या वेळीं हिलाच अज्ञान असें म्हणतात, आणि

जया । तेंचि रुखा यया । मूळ पहिलें ८७ वस्तूसी आपुला जो अबद्धेधु । तो ऊर्ध्वीं आढुळैजे कंदु । वेदांतीं हाचि प्रसिध्दु । बीज भावो ८८ घन अज्ञान सुषुप्ती । तो बीजांकुरभावो म्हणती । येर स्वप्न हन जागृती । हा फळभावो तियेचा ८९ ऐसी यया वेदांतीं । निरूपणभाषाप्रतीती । परी तें असो प्रस्तुतीं अज्ञान मूळ ९० तें ऊर्ध्व आत्मा निर्मळें । अधोर्ध्व सूचिती मूळें । बळिया बांधोनि आळें । मायायोगाचें ९१ मग आधिलीं सदेहांतरें । उठती जियें अपारें । तें चौपासी घेऊनि आगारें । खोलावती ९२ ऐसें भवद्रुमाचें मूळ । हें ऊर्ध्वीं करी बळ । मग आणियांचें बेंचळ । अधीं दावी ९३ तेथ चिद्वृत्ती पाहिलें । महतत्त्व उमललें । तें पान वाल्हेंदुल्हें । एक निघे ९४ मग सत्त्वरजतमात्मकु । त्रिविध अहंकारु जो एकु । तो तिवणा अधोमुखु । डिरु फुटे ९५ तो बुद्धीची घेऊनि आगारी । भेदाची वृद्धि करी । तेथ मनाचें ढाळ धरी । साजेपणें ९६ ऐसा मूळाचिया गाढिका । विकल्परस कोंवाळिका । चित्तचतुष्टय डाहाळिका । कोंभैजेतो ९७ मग आकाश वायु द्योतक । आप पृथ्वी हे पांच फोंक । महाभूतांचे सरोख । सरळे होती ९८ तैसीं श्रोत्रादि तन्मात्रें । तियें अंगवसां गर्भपत्रें । लुळलुळितें विचिलें । उमळती गा ९९ तेथ शब्दांकुर वरिपडी । श्रोत्रा वाढी देव्हडी । होता करित कांडीं । आकांक्षेचीं १०० अंगत्वचेचे वेलपल्लव । स्पर्शांकुरीं घेती धांव । तेथें बांबळ पडे अभिनव । विकारांचें १ पाठीं रूपपत्र पालोवेलीं । चक्षुलांब तें कांडें घाली । ते वेळीं व्यामोहता भली । पाहाळीं जाय २ आणि रसाचें आंगवसें । वाढतां वेगें बहुवसें । जिव्हे आर्तीची असोसें । निघती बेंचें ३ तैसेंचि कोंभलेनि गंधें । घ्राणाची डिरी थांवु बांधे । तेथ तळु घे स्वानंदें । प्रलोभाचा ४ एवं महदहंबुद्धी । मनें महाभूतसंमृद्धि । इये संसाराचिया अवधि । शासन जें ५ किंबहुना इहीं आठें । आंगीं हा अधिक फांटे । परी शिंपीचि येवढें उमटे । रुपें जेविं ६ कां समुद्राचेनि पैसारें । वरी तरंगता आसारे । तैसें ब्रह्माचि होय वृक्षाकारें । अज्ञानमूळ ७ आतां याचा हाचि विस्तारु । हाचि यया पैसारु । जैसा आपणपें स्वप्नीं परिवारु । येकाकिया ८ परि तें असो हें ऐसें । कावरें झाड उससे । यया महदादि आरवसें । अधोशाखा ९ आणि अश्वत्थु ऐसें ययातें । म्हणती जे जाणते । तेंही परिस हो येथें । सांगिजेल ११० तरि श्वा म्हणिजे उखा । तोंवरि एकसा-

तें अज्ञानच या संसाररूप वृक्षाचें ऊर्ध्व जें ब्रह्म त्याच्या ठिकाणीं पहिलें मूळ आहे. ८७ ब्रह्मवस्तूला मायेच्या आवरणानें होणारें जें अज्ञान, तोच ऊर्ध्व जें ब्रह्म त्याच्या ठिकाणीं प्रथम कंद बळकट होतो, व त्यालाच वेदांतशास्त्रामध्यें संसाररूप वृक्षाचा बीजभाव असें प्रसिद्ध आहे. ८८ निबिड अज्ञान म्हणजे सुषुप्ति, ह्याला बीजांकूरभाव म्हणतात, आणि तिचाच परिणाम स्वप्न व जागृति या दोन अवस्थांना फलभाव म्हणतात. ८९ अशा रीतीनें मायेचें वर्णन भिन्न भिन्न प्रकारानें वेदांतशास्त्रांत केल्याचा अनुभव आहे, परंतु, तें असो. सध्यां संसाररूप वृक्षाचें मूळ अज्ञान आहे, असें समज. ९० निर्मळ ब्रह्मरूप आत्म्याचे ठिकाणीं सहज असणारी जी माया, तिच्या खालच्या व वरच्या बाजूस मुळें निघून, त्यांना मायारूपी आळ्यांत पाणी मिळून तीं मुळें बळकट होतात. ९१ मग खालच्या बाजूस अनंत देह उत्पन्न होतात. ते चार प्रकारचे अंकूर घेऊन जोरावतात. ९२ या प्रमाणें संसाररूपी झाडाचें मूळ, ब्रह्माचे ठिकाणीं बळकट होऊन नंतर लागलींच अंकुरांना जोर येतो. ९३ त्या अंकुरांत ज्ञानरूप वृत्ति अंतःकरणांत उत्पन्न होऊन तें प्रथमचें एक कोवळें लुसलुसीत पान निघतें. ९४ नंतर सत्वरजतमात्मक जो अहंकार, तो एक तीन पानांचा अंकुर खालच्या बाजूस फुटतो. ९५ त्यालाच बुद्धिरूप दुसरी डाहाळी फुटून भेदाची वृद्धि होते; त्या योगानें मनरूपी डाहाळीस ओलावा मिळून ती टवटवीत होते. ९६ याप्रमाणें मूळ बळकट झाल्यावर, विकल्परूपीरसाच्या योगानें, त्याला चित्तचतुष्टय ह्या चार कोंहळ्या फुटतात. ९७ मग आकाश, वायु, तेज, पाणी व पृथ्वी हे पंचमहाभूतांचे पांच फोंक वेगानें सरळ निघतात. ९८ त्याचप्रमाणें, त्या फोंकांला श्रोत्रादि पंचज्ञानेंद्रियें व त्यांचे विषय ही कोंवळी विचित्र पालवी फुटते. ९९ नंतर शब्दरूपी अंकुर कानांच्या व्याप्तीयेवढा फुटून ऐकण्याची इच्छा पूर्ण करतो. १०० मग अंग व त्वचा ही वेल आणि पानें फुटून त्याला स्पर्शरूपी अंकूर येतो, आणि मग नानाप्रकारच्या विकारांचें आधिक्य होतें. १ पुढें रूप हें पान फुटून डोळा हा भ्रमानें त्याची गोडी घेण्याविषयीं धांव घेतो, २ आणि रसरूपी फांदी वेगानें फुटून जिभेस अपार इच्छा उत्पन्न होते. ३ त्याचप्रमाणें, गंधरूपी कोंव येऊन नाकाची इच्छा प्रबळ होऊन लोभ उत्पन्न होतो. ४ याप्रमाणें मन, बुद्धि, अहंकार व पंचमहाभूतें अशी जी अष्टधाप्रकृति, ती या मायेपासून प्रपंचाच्या शेवटापर्यंत तयार होते. ५ फार काय ! परंतु हा वृक्ष ह्या आठ प्रकारांनीं अधिक वाढतो, पण शिंपीवर भासलेले रुपें जसें शिंपीच्या आकाराएवढेंच भासतें, ६ किंवा समुद्रावर उत्पन्न होणाऱ्या लाटा ज्याप्रमाणें समुद्राएवढ्या असून पोकळ असतात, त्याप्रमाणें, अज्ञानमूलक जो हा जगद्रुपी वृक्ष, तो ब्रह्मच बनतें, ७ म्हणून सर्व जग हा अज्ञानाचा विस्तार असून त्यावर त्याचा पसारा भासतो. ज्याप्रमाणें स्वप्नांत मनुष्य एकटा असून जें जें कांहीं पहातो, तें सर्व आपणच होतो; ८ परंतु या सर्व गोष्टी बाजूस ठेव. याप्रमाणें हें आश्चर्यकारक झाड वाढतें, व याला महत्तत्त्वादि अंकुर खालच्या बाजूस फुटतात; ९ आणि या झाडाला ज्ञाते लोक अश्वत्थ असें जे म्हणतात, त्याबद्दलही तुला सांगतों, तें ऐक. ११० तर श्वा (श्व) याचा अर्थ ' उद्यां असें म्हणे तोंपर्यंतही या प्रपंचरूपी झाडाचें एक स्वरूप रहात नाहीं, ' म्हणून याला ' अश्वत्थ ' असें म्हणतात.

रिखा । नाहीं निर्वाहो यया रुखा । प्रपंचरूपा ११ जैसा न लोटतां क्षणु । मेघु होय नानावर्णु । कां विजु नसे संपूर्णु । निमेषभरी १२ ना कांपतया पद्मदळा । वरीलिया वैसका नाहीं जळा । कां चित्त जैसें व्याकुळा । माणुसाचें १३ तैसीचि ययाची स्थिती । नासत जाय क्षणक्षणाप्रती । म्हणौनि ययातें म्हणती । अश्वत्थु हा १४ आणि अश्वत्थु येणें नांवें । पिंपळु म्हणती स्वभावें । परि तो अभिप्राय नोहे । श्रीहरीचा १५ एऱ्हवीं पिंपळु म्हणतां विखीं । मियां गति देखिली असे निकी । परि तें असो काय लौकिकीं । हेतु काज १६ म्हणौनि हा प्रस्तुतु । अलौकिकु परिसा ग्रंथु । तरी क्षाणिकत्वोंचि अश्वत्थु । बोलिजे हा १७ आणीकही येकु थोरु । यया अव्ययत्वाचा डगरु । आथी परी तो भीतरु । ऐसा आहे १८ जैसा मेघाचेनि तोंडें । सिंधु एके आंगें काढे । आणि नदी येरीकडे । भरितीचि असती १९ तेथ वोहटे ना चढे । ऐसा परिपूर्णुचि आवडे । परी ते फुली जंव नुघडे । मेघानदीची १२० ऐसें या रुखाचें होणें जाणें । न तर्के होतेंनि वहिलेपणें । म्हणौनि ययातें लोकु म्हणे । अव्ययु हा २१ एऱ्हवीं दानशीळु पुरुषु । वेंचकपणेंचि संचकु । तैसा व्ययेंचि हा रुखु । अव्ययो गमे २२ जातां वेगें बहुवसें । न वचे कां भूमी रुतलें असे । रथाचें चक्र दिसे । जिया परी २३ तैसें काळातिक्रमें जे वाळे । ते भूतशाखा जेथ गळे । तेथ कोडीवरी उमाळे । उठती आणिक २४ परी येकी केधवां गेली । शाखाकोडी केधवां जाली । हें नेणवे जेविं उमललीं । आषाढअभ्रें २५ महाकल्पाच्या शेवटीं । उदेलिया उमळती सृष्टी । तेसेंचि आणिखीचें दांग उठी । साासिन्नलें २६ संहारवातें प्रचंडें । पडती प्रळयांतींचीं सालडें । तंव कल्पादीचीं जुंबाडें । पाल्हेजती २७ रिगे मन्वंतर मनूपुढें । वंशावरी वंशांचें मांडे । जैसी इक्षुवृद्धी कांडेंनकांडें । जिंके जेविं २८ कलियुगांतीं कोरडीं । चहूं युगांचीं सालें सांडी । तंव कृतयुगाची पेली देव्हडी । पडे पुढती २९ वर्ततें वर्ष जाये । तें पुढिला मुळहारी होये । जैसा दिवसु जात कीं येत आहे । हें चोजवेना १३० जैशा वारियाचा झुळकां । सांदा ठाउवा नव्हे देखा । तैसिया उठती पडती शाखा । नेणों किती ३१ एकी देहाची डिरी तुटे । तंव देहांकुरी बहुवी फुटे । ऐसेनि भवतरु हा वाटे । अव्ययो ऐसा ३२ जैसें वाहतें पाणी जाय वेगें । तैं तेंचि आणिक मिळे मागें । येथ असंताचि असिजे जगें । मानिजे संत ३३ कां

(संस्कृतांत, क्षणभरही जो एकसारखा नसतो तो. अश्वत्थ.) ११ ज्याप्रमाणें एका क्षणांत मेघाचे नानातऱ्हेचे रंग बदलतात, किंवा बीज निमिषमात्र देखील पूर्णपणें टिकत नाहीं; १२ कमलाच्या हालणाऱ्या पानावर जसें पाणी ठरत नाहीं, किंवा व्याकूळ झालेल्या मनुष्याचें मन ज्याप्रमाणें स्थिर नसतें १३ त्याचप्रमाणें, या संसाररूपी झाडाची स्थिति असून प्रत्येक क्षणास तिचा नाश होतो, म्हणूनच याला 'अश्वत्थ' असें म्हणतात; १४ आणि व्यवहारांत 'अश्वत्थ' म्हणजे पिंपळ असें म्हणतात; परंतु श्रीहरींचा या ठिकाणीं तसा अभिप्राय नाहीं. १५ बाकी या झाडास पिंपळ म्हणावें असें लौकिकदृष्टीनें बरें, असें मला वाटलें, परंतु लौकिक अर्थ प्रतिपादन करण्याचें कारण नाहीं. १६ म्हणून सध्यां हा अलौकिक ग्रंथ ऐका. तर संसाररूपी वृक्ष हा क्षणिक आहे, म्हणूनच याला अश्वत्थ असें म्हणतात. १७ आणखी, हा वृक्ष अव्यय म्हणजे नित्य या नांवानें प्रसिद्ध आहे. परंतु ह्याचा गर्भित अर्थ असा आहे कीं, १८ ज्याप्रमाणें, समुद्राचें पाणी वाफेच्या रूपानें मेघ शोषण करितात, व तेच मेघ वर्षाव करून नदींत पडल्यावर त्या नद्या समुद्रास मिळतात; १९ समुद्र आटतही नाहीं, व वाढतही नाहीं, म्हणून परिपूर्ण असा दिसतो; परंतु जोंपर्यंत मेघाचें शोषण करणें किंवा नद्यांचें समुद्रास मिळणें या दोहोंपैकीं एकास फांटा मिळाला नाहीं, तोंपर्यंतच तो पूर्ण होय; १२० त्याप्रमाणें, या संसाररूपी झाडाची उत्पत्ति व लय हीं अतित्वरेनें होतात, म्हणून त्यांचा तर्क करितां येत नाहीं; यास्तव लोक याला 'अव्यय' असें म्हणतात. २१ एन्हवीं, दानशील पुरुष हा, जरी धर्म करून सर्व पैसा खर्च करून टाकतो असें दिसतें, तरी तो ज्याप्रमाणें पुढील जन्मीं आपल्यास ठेव जोडतो, त्याप्रमाणें हा वृक्ष अति वेगानें उत्पत्ति, स्थिति व लय पावत असल्यामुळें लोकांस नित्य असा भास होतो. २२ रथाचें चाक भूमीवर न टेंकता अति वेगानें चाललें असतां त्याची गति लोकांस न दिसल्यामुळें त्याप्रमाणें तें स्थिर आहे असें भासतें. २३ त्याप्रमाणें. कालातिकरानें ह्या झाडाची जी प्रतिक्षण दाढ पडून पडते, तींच पुनः तीन कोंब्याचीं अंकुर फुटतात. २४ परंतु एक खांदी केव्हां गळाली अथवा कोंब्या-यचि फांद्या केव्हां फुटल्या, हें, ज्याप्रमाणें आषाढ महिन्यांत अश्वांवर अश्वें येत असलीं म्हणजे कोणचीं आलीं व कोणचीं गेलीं हें कळत नाहीं, त्याप्रमाणें कळत नाहीं. २५ प्रलयकालाचे शेवटीं ह्या संसाररूपी वृक्षाच्या देहरूपी शाखा गळून पडतात, व पुनः जगोत्पत्तीच्या वेळीं नव्या फुटतात. २६ संहारकालच्या प्रचंड वाऱ्यानें प्रळयाच्या अंतीं शरीरें पडतात, व तींच कल्पाच्या सुरवातीस पुनः झुबक्यांचे झुबके उगवतात. २७ मग एका मन्वंतरापुढें दुसरें मन्वंतर, याप्रमाणें सूर्यवंश, चंद्रवंश असा विस्तार होतो; व ऊंस ज्याप्रमाणें पेऱ्यापेऱ्यांनीं वाढत जातो, त्याप्रमाणें हें सर्व विश्व वाढतें. २८ कलियुगाच्या अंतीं चारी युगांतील शरीरें खालीं पडतात, (झाडाच्या साली झडून तें वठतें,) इतक्यांत कृतयुग सुरू झालें, म्हणजे त्याची पुनः उत्पत्ति होऊन तें जास्त वाढतें. २९ चालू असलेलें वर्ष संपून तें जसें पुढील वर्षास आमंत्रण देतें, किंवा ज्याप्रमाणें दिवस जातो किंवा येतो, हें त्याच्या नित्य येण्याजाण्यानें कळत नाहीं, १३० ज्याप्रमाणें वाऱ्याच्या झुळकांवर झुळका येऊं लागल्या म्हणजे कोणची झुळुक संपली व कोणची आली हें समजत नाहीं, त्याप्रमाणें किती शरीरें उत्पन्न होतात व लय पावतात, हें समजत नाहीं. ३१ एक डिरी तुटून पडली न पडली, तों दुसऱ्या शेंकडों डिऱ्या फुटतात, त्या योगानें हा भवरूपी वृक्ष नित्य आहे, असा भासतो. ३२ नदीचें वहातें पाणी वेगानें चाललें म्हणजे त्याला ज्याप्रमाणें मागून येणारें पाणी वरचेवर मिळून वहातें, त्या योगानें जसा त्याचे ठिकाणीं स्थिरतेचा भास होतो, त्याप्रमाणें हें जग नाशवंत असून त्याला स्थिर असें समजतात. ३३

लागोनि डोळां उघडे । तंव कोडीवरी घडे मोडे । नेणतया तरंगु आवडे । नित्यु ऐसा ३४ वायसा एकें बुबुळें दोहींकडे । डोळा चाळितां अपाडें । दोन्ही आथी ऐसा पडे । भ्रमु जेविं जगा ३५ पैं भिंगोरी निधिये पडली । ते गमे भूमीसी जैसी जडली । ऐसा वेगातिशयो भुली । हेतु होय ३६ हें बहु असो झडती । आंधारें भोवंडितां कोलती । ते दिसे जैसी आयती । चक्राकार ३७ हा संसारवृक्षु तैसा । मोडतु मांडतु सहसा । न देखोनि लोकु पिसा । अव्ययो मानी ३८ परि ययाचा वेगु देखे । जो हा क्षणिक ऐसा वोळखे । जाणे कोडिवेळां निमिखें । होत जात ३९ नाहीं अज्ञानावांचूनि मूळ । ययाचें असिलेंपण टवाळ । ऐसें झाडचि सिनसाळ । देखिलें जेणें १४० तयातें गा पंडुसुता । मी सर्वज्ञुही म्हणें जाणता । पैं वाग्ब्रह्म सिद्धांता । वंद्यु तोचि ४१ योगजाताचें जोडलें । तया एकासीचि उपयोगा गेलें । किंबहुना जिरालें । ज्ञानही त्याचेनि४२ हें असो बहु बोलणें । वानिजेल तो कवणें । जो भवरुखु जाणे । उखि ऐसा४३

अधश्चोर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखा गुणप्रवृद्धा विषयप्रवालाः ।
अधश्च मूलान्यनुसंततानि कर्मानुबन्धीनि मनुष्यलोके ॥२॥

मग ययाचि प्रपंचरूपा । अधोशाखिया पादपा । डाहाळिया जाती उमपा । ऊर्ध्वाही उजू ४४ आणि अधीं फांकलीं डाळें । तियें होती मूळें । तयांही तळीं पघळे । वेल पालवु ४५ ऐसें जें आम्हीं । म्हणितलें उपक्रमीं । तेंही परिसें सुगमीं । बोलीं सांगों ४६ तरी बद्धमूळ अज्ञानें । महदादिकीं शासनें । वेदांचीं थोर वनें । घेऊनियां ४७ परि आधीं तंव स्वेदज । जारज उद्भिज अंडज । हे बुडौनि महाभुज । उठती चारी ४८ यया एकैकाचेनि आणगटें । चौऱ्यांशीं लक्षधा फुटे । ते वेळीं जीवशाखीं फांटे । सैंघचि होती ४९ प्रसवती शाखा सरळिया । नानासृष्टि डाहाळिया । आड फुटती माळिया । जातिचिया १५० स्त्री पुरुष नपूंसकें । हे व्यक्तिभेदांचे टके । आंदोळती आंगिकें । विकारभारभारें ५१ जैसा वर्षाकाळु गगनीं । पाल्हेजे नवघनीं । तैसें आकारजात अज्ञानीं । वेली जाय ५२ मग शाखांचेनि आंगभारें । लवोनि गुंफती परस्परें । गुणक्षोभाचे वारे । उदयजती ५३ तेथ तेणें अचाटें । गुणांचेनि झडझडाटें । तिहीं ठायीं हा फांटे । ऊर्ध्वमूळ ५४ ऐसा रजाचिया झुळुका । झडाडितां आगळिका । मनुष्यजातीं शाखा । थोरावती ५५ तिया ऊर्ध्वीं ना अधीं । माझारींचि कों-

किंवा डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच कोट्यावधि प्राण्यांची घडामोड होते; परंतु नदीवर ज्या लाटांवर लाटा येतात त्या नित्य भासतात, त्याप्रमाणें अज्ञान्याला संसार नित्य भासतो. ३४ कावळा आपलें एक बुबूळ एका क्षणांत दोन्ही डोळ्यांत फिरवितो, आणि त्या योगानें त्याला एक डोळा असतांही दोन आहेत असें लोकांस भासतें, त्याप्रमाणें, जग अनित्य असून नित्य आहे, असा भ्रम होतो. ३५ किंवा भोंवरा अतिवेगानें फिरूं लागला म्हणजे फिरत असून स्थिर आहे असा भास होतो, त्याप्रमाणें या जगाचा प्रकार आहे. ३६ हे पुष्कळ दाखले राहूं दे; परंतु एकादा मनुष्य हातांत कोलती घेऊन आपले भोंवतीं फिरवूं लागला, म्हणजे ती ज्याप्रमाणें अति वेगामुळें मोठ्या चक्राच्या आकाराप्रमाणें स्थिर दिसते, ३७ त्याप्रमाणें, हा संसाररूपी वृक्ष नेहमीं नाश पावतो व उत्पन्न होतो, हें न समजल्यामुळें, लोक वेडेपणानें यास नित्य मानतात. ३८ परंतु या संसाररूपी वृक्षाचा वेग जाणून हा क्षणीक आहे व हा एका निमिषांत कोट्यावधि वेळां उत्पन्न होतो व लय पावतो: ३९ आणि ह्याला अज्ञानावांचून दुसरें कारण नाहीं, व याचें अस्तित्व खोटें आहे. याप्रमाणें जो या संसाररूपी वृक्षास मुळापासून शेवटापर्यंत पूर्णपणें जाणतो, १४० त्यालाच मी सर्वज्ञ असून जाणता असें म्हणतों, आणि वैदिक सिद्धांतालाही पूज्य तोच आहे. ४१ योगापासून मिळणारें फळही त्यालाच मिळतें. फार काय सांगावें ! त्याच्याच योगानें ज्ञानालाही जीवन मिळतें. ४२ हें पुष्कळ बोलणें असो; अशा प्रकारें हा संसाररूपी वृक्ष अनित्य आहे असें ज्यानें जाणलें, त्याचें कोणाच्यानेंही वर्णन करवणार नाहीं. ४३

अन्वय—तस्य गुणप्रवृद्धाः विषयप्रवालाः शाखाः अधः ऊर्ध्वं च प्रसृताः (संति); अधः च मनुष्यलोके कर्मानुबंधीनि मूलानि अनुसंततानि (संति). ॥ २ ॥

अर्थ—त्या वृक्षाच्या सत्त्वादि गुणांनीं वाढलेल्या व शब्दादि विषयांच्या पालवींनें युक्त अशा अनुक्रमें [सत्यलोकापर्यंत] वर व [पातालोकापर्यंत] खालीं पसरलेल्या आहेत; आणि खालीं मनुष्यलोकांत ह्या वृक्षाचीं कर्मबंधनें सुद्धां एकसारखीं एक गुंतून राहिलीं आहेत. ॥ २ ॥

मग या प्रपंचरूपी वृक्षास खालीं शाखा येऊन, त्या जमिनींत गेल्यावर, पुनः त्यांना शाखा उत्पन्न होऊन, वरही सगळ शाखा उत्पन्न होतात; ४४ व ज्या डाहाळ्या खालीं येतात त्यांनाही मूळ फुटून, खालच्या बाजूस वेल वाढून पानें येतात ४५ याप्रमाणें, जें आधीं आरंभीं झाडलें आहे. तेंच अधिक स्पष्ट करून सांगतों. श्लो. ४६ तर मूळ अज्ञान असून, त्याच्यापासून अष्टधा प्रकृति उत्पन्न होऊन, ज्ञानरूप मोठालीं वनें उत्पन्न होतात. ४७ पण, आधीं या झाडाच्या बुडापासून स्वेदज, जारज, उद्भिज्ज व अंडज अशा चार मोठ्याल्या फांद्या फुटतात. ४८ ह्यांपैकीं एक एक फांदी बळावली म्हणजे त्यांच्या चौऱ्यांयशीं लक्ष योनिरूप फांद्या फुटतात; व फांद्यांस जीवरूपी फांटे फुटतात. ४९ या सरळ फांद्यांपासून ज्या डाहाळ्या आडव्या माळेसारख्या फुटतात, त्या निरनिराळ्या जाति होत. ५० मग स्त्री, पुरुष व नपुंसक असे व्यक्तीचे भेद उत्पन्न होऊन त्या विषयांच्या भारानें एकमेकांवर आदळतात. ५१ ज्याप्रमाणें वर्षाकालीं आकाशांत मेघ उत्पन्न होतात, त्याप्रमाणें अज्ञानामुळें पुष्कळ जातींचीं शरीररूपी वेली उत्पन्न होतात. ५२ मग गुणरूपी वारें सुटल्यावर खांद्या आपल्या भारानें लवून एकमेकांत गुंततात. ५३ ते गुण अति वाढल्यामुळें, ह्या ऊर्ध्वमूलाच्या वृक्षास खालीं, वर व मध्यें असे तीन भेद होऊन फांटे फुटतात. ५४ याप्रमाणें रजोगुणाची झुळूक सुटून ती जोरानें वाहूं लागल्यावर मनुष्यजातिरूपी शाखा थोरावते. ५५ त्या शाखेला वर किंवा खालीं शाखा

दाकोंदी। आड फुटती खांदी। चतुर्वर्णांच्या ५६ तेथ विधिनिषेध सपल्लव। वेदवाक्यांचे अभिनव। पालव डोलती बरव। नीच नवे ५७ अर्थु कामु पसरे। अग्रवनें घेती थारे। तेथ क्षणिकें पदांतरें। इहभोगाचीं ५८ तेथ प्रवृत्तीचेनि वृद्धिलोभें। खांकरेजती शुभाशुभें। नानाकर्माचे खांबे। नेणों किती ५९ तेवींचि भोगक्षीणें मागिलें। पडती देहांतींचीं बुडसळें। तंव पुढां वाढी पेले। नवेया देहांची १६० आणि शब्दादिक सुहावे। सहज रंगें हवावे। विषयपल्लव नवे। नित्य होती ६१ ऐसे रजोवातें प्रचंडें। मनुष्यशाखांचे मांदोडे। वाढती तो एथ रूढे। मनुष्यलोक ६२ तैसाचि तो रजाचा वारा। नावेक धरी वोसरा। मग वाजों लागे घोरा। तमाचा तो ६३ तेधवां याचिया मनुष्यशाखा। नीच वासना अधीं देखा। पाल्हेजती डाहाळिका। कुकर्माचिया ६४ अप्रवृत्तीचे खणुवाळे। कोंभ निघती सरळे। घेत पान पालव डाळें। प्रमादाचीं ६५ बोलती निषेधनियमें। जिया ऋचा यजुःसामें। तो पाला तया घुमे। टकेयावरी ६६ प्रतिपादिती अभिचार। आगम जे परमार। तिहीं पानीं घेती प्रसर। वासना वेली ६७ तंव तंव होती थोराडें। अकर्माचीं तळबुडें। आणि जन्मशाखा पुढेंपुढें। घेती धांव ६८ तेथ चांडाळादि निकृष्टा। दोषजातीचा थोर फांटा। जाळ पडे कर्मभ्रष्टां। मुलोनियां ६९ पशु पक्षी सूकर। व्याघ्र वृश्चिक विखार। हे आडशाखा प्रकार। पैसु घेती १७० पारि ऐशा शाखा पांडवा। सर्वांगींही नित्य नवा। निरयभोग यावा। फळाचा तो ७१ आणि हिंसाविषयपुढारी। कुकर्मसंगें धुरधरी। जन्मवरी आगारी। वाढतीचि असे ७२ ऐसे होती तरुतृण। लोह लोष्ठ पाषाण। इया खांदिया तेवींचि जाण। फळेंही हेंचि ७३ अर्जुना गा अवधारीं। मनुष्यालागोनि इया परी। वृद्धि स्थावरांतवरी। अधोशाखांची ७४ ह्मणोनि जीं मनुष्यढाळें। तियें जाणावीं अधींचीं मूळें। जे एथूनि हा पघळे। संसारतरु ७५ एन्हवीं ऊर्ध्वींचें पार्था। मुद्दल मूळ पाहातां। अधींचिया मध्यस्था। शाखा इया ७६ पारि नामसी सात्त्विकीं। सुकृतदुष्कृतात्मकी। विरूढती या शाखीं। अधोर्ध्वींचिया ७७ आणि वेदत्रयीचिया पाना। नये अन्यत्र लागों अर्जुना। जे मनुष्यावांचूनि विधाना। विषय नाहीं ७८ ह्मणोनि तनु मानुषा। इया ऊर्ध्वमूळौनि जरी शाखा। तरी कर्मवृक्षीसि देखा। इयेंचि मूळें ७९ आणि आनी तरी झाडीं। शाखा वाढतां

न फुटतां, मध्येंच (मृत्युलोकीं) चार वर्षांच्या चार फांद्या दाटीनें फुटतात. ५६ त्या फांद्यांत विधिनिषेधरूपी पानें व वेदवाक्यें हाच कोंवळा पाला फुटतो; ५७ आणि अर्थ व काम यांचा विस्तार होऊन, इहलोकींच्या क्षणिक सुखाचे कोंब येतात. ५८ नंतर, प्रवृत्तिमार्ग वाढावा, या हेतूनें शुभाशुभ कर्मांचे किती फांटे फुटतात हें समजत नाहीं. ५९ त्याचप्रमाणें, भोगांचा क्षय झाला म्हणजे मागले देह शुष्क होऊन खालीं पडतात, तों दुसरीकडे नव्या देहांचे फांटे फुटतात; १६० आणि पंचविषयांच्या साह्यानें इच्छा उत्पन्न होऊन विषयरूपी नवीं नवीं पानें नित्य येतात. ६१ याप्रमाणें रजोगुणाचा मोठा वारा सुटल्यावर मनुष्यरूपी शाखांचे समुदाय ज्या ठिकाणीं वाढतात, त्याला मनुष्यलोक म्हणतात. ६२ त्याचप्रमाणें हा रजोगुणरूपी वारा क्षणभर थांबल्यावर तमोगुणरूपी वारा मोठ्या सपाट्यानें वाहूं लागतो. ६३ मग याच मनुष्यरूपी शाखांना वाईट वासना उत्पन्न होऊन कुकर्मांच्या डाहळ्या खालीं फुटूं लागतात. ६४ अप्रवृत्तीचे (वाईट मार्गाचे) बळकट सरळ सोट निघून त्यांस प्रमादरूपी पानें व डाहळ्या फुटतात. ६५ ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद यांच्या ऋचांत जे नियमानें निषेध सांगितले आहेत, त्यांचा अग्रभागीं पाला फुटतो. ६६ अथर्वणवेदांत जें जारणमारण सांगितलें आहे, व ज्यांत परपीडा ही मुख्य धरली आहे, अशा तीन पानांचा वासनारूपी वेल पसरतो. ६७ नंतर वाईट कर्मांचीं मूळें मोठीं होऊन त्यांना जन्मरूपी शाखा पुष्कळ फुटतात. ६८ त्या वाईट कर्मांला सुटून गेल्यानें, त्याला चांडालादि नीच कर्मांचा मोठा फांटा फुटून कर्मभ्रष्टाचे जातींत जन्मावें लागतें. ६९ पशु, पक्षी, वाघ, डुकर, किंचू, सर्प याप्रमाणें आडव्या फांद्या पुष्कळ फुटतात. १७० अर्जुना, याप्रमाणें त्या वृक्षाच्या सर्वांगावर नित्य नव्या फांद्या फुटून त्यांना नरकभोगाची प्राप्ती होते; ७१ आणि हिंसाविषय पुढें करून वाईट संगतीच्या योगानें अनेक जन्म घ्यावे लागतात. ७२ याप्रमाणें झाडें, गवत, लोखंड, माती व दगड या खांद्यांनाही तसलींच फळें येतात.७३ अर्जुना, मनुष्यापासून स्थावरापर्यंत सगळ्या शाखांची वाढ खालींच आहे. ७४ म्हणून मनुष्यरूपी खांदीच खालीं जाणाऱ्या खांद्यांचें मूळ असून हिजपासूनच हा संसारवृक्ष वाढतो. ७५ एन्हवीं पार्था, वर जाणाऱ्या खांदीचें मूळ पाहूं गेलें असतां, वर व खालीं यांच्यामध्यें जी खांदी आहे तेंच (मनुष्यजन्मच) होय. ७६ परंतु तमोगुण व सत्त्वगुण यांच्या दुष्कर्म व सत्कर्म यांनीं भरलेल्या शाखा या मधल्या शाखेपासून खालीं व वर जातात. ७७ अर्जुना, वेदत्रयरूपी पानें दुसऱ्या कोणाला लागू नसून त्यांतील विधि केवळ मनुष्ययोनीलाच विषय करतात. ७८ म्हणून, मनुष्यरूप खांदी ही जरी वरच्या मुळापासून खालीं वाढली आहे, तरी कर्मवृद्धिरूप शाखा इच्यापासूनच उत्पन्न होतात. ७९ आणि दुसऱ्या झाडांचीं तरी हीच तऱ्हा आहे कीं, फांद्या वाढल्या म्हणजे मूळ दृढ

मुळें गाढीं । मूळ गाढें तंव वाढी । पैस आथी १८० तैसेंचि इया शरीरा । कर्म तंव देहा संसारा । आणि देह तंव व्यापारा । ना म्हणोंचि नये ८१ ह्मणोनि देहें मानुषें । इयें मूळें होती न चुके । ऐसें जगज्जनकें । बोलिलें तेणें ८२ मग तमाचें तें दारुण । स्थिरावलेया वाउधाण । सत्त्वाची सुटे सत्राण । वाहुटळी ८३ तैं याचि मनुष्याकारा । मुळीं सुवासना निघती आरा । घेऊनि फुटती कोंबारा । सुकृतांकुरीं ८४ उकलतेनि उन्मेखें । प्रज्ञाकुशलतेंचि तिखें । डिरिया निघती निमिखें । बाबळेजुनी ८५ मतीचे सोट वावे । घालिती स्फूर्तींचेनि । थांवे । बुद्धिप्रकाश घे धांवे । विवेकावरी ८६ तेथ मेधारसें सगर्भ । अस्थापत्रीं सबोंब । सरळ निघती कोंभ । सद्वृत्तीचे ८७ सदाचाराचिया सहसा । टका उठती बहुवसा । घुमघुमिती घोषा । वेदपद्याच्या ८८ शिष्टागमविधानें । विविधयागवितानें । इये पानावरी पानें । पालेजती ८९ ऐशा यमदमीं घोंसाळिया । उठती तपाचिया डाहाळिया । देती वैराग्यशाखा कोंवळिया । वेल्हाळपणें १९० विशिष्टां व्रतांचे फोंक । धीराच्या अणगटी तिख । जन्मवेगें ऊर्ध्वमुख । उंचावती ९१ माजि वेदाचा पाला दाट । तो करी सुविद्येचा झडझडाट । जंव वाजे अचाट । सत्वानिळु तो ९२ तेथ धर्मडाळ बाहाळी । दिसती जन्मशाखा सरळी । तिया आड फुटती फळीं । स्वर्गादिकीं ९३ पुढां उपरति रागें लोहिवी । धर्ममोक्षाची शाखा पालवी । पाल्हाजत नित्य नवी । वाढतीचि असे ९४ पैं रविचंद्रादि ग्रहवर । पितृ ऋषि विद्याधर । हे आडशाखाप्रकार । पैसु घेती ९५ याहीपासून उंचवडें । गुढले फळाचेनि बुडें । इंद्रादिक ते मांदोडे । थोर शाखांचे ९६ मग तयांही उपरी डाहाळिया । तपोज्ञानीं उंचावलिया । मरीचि कश्यपादि इया । उपरी शाखा ९७ एवं माळोवाळी उत्तरोत्तरु । ऊर्ध्वशाखांचा पैसारु । बुडीं साना अग्रीं थोरु । फळाढ्यपणें ९८ वरी उपरिशाखाही पाठीं । येती फळभार जे किरीटी । ते ब्रह्मेशांत अणगटीं । कोंभ निघती ९९ फळाचेनि वोझेपणें । ऊर्ध्वीं वोवांडें दुणें । जंव माघौतें बैसणें । मूळींचि होय २०० प्राकृताही तरी रुखा । जें फळें दाटली होय शाखा । ते वोवांडली देखा । बुडासि ये १ तैसें जेथूनि हा आघवा । संसारतरूचा उठावा । तियें मूळीं टेंकती पांडवा । वाढतेनि ज्ञानें २ म्हणौनि ब्रह्मेशानपरौतें । वाढणें नाहीं जीवातें । तेथूनि मग वरौतें । ब्रह्माचि कीं ३ परि हें असो ऐसें ।

होतें, व मूळ बळकट झालें ह्मणजे फांद्यांचा विस्तार होतो. १८० त्याचप्रमाणें या शरीराची गोष्ट होय; ह्मणजे कर्मशेष आहे तोंपर्यंत शरीर आहे, शरीर आहे तोंपर्यंत कर्म करणार नाहीं असें ह्मणण्याची सोय नाहीं. ८१ ह्मणून, मनुष्यदेह हा अन्यकर्मरूपी खांद्यांचें मूळ होय, यांत संशय नाहीं; असें त्या जगज्जनक श्रीकृष्णांनीं सांगितलें. ८२ मग ह्मणतातः—नंतर तमोगुणाचें वादळ स्थिर झाल्यावर सत्त्वगुणाचें वादळ जोरानें सुटतें, ८३ तेव्हां मात्र मनुष्याकाररूपी मूळास सद्वासनारूपी अंकुर फुटून त्याला सुकृतरूपी कोंब येतात. ८४ मग ज्ञानाच्या योगानें जाणतेपणाच्या तीक्ष्ण अशा जोरानें एके क्षणांत बुद्धीला डिन्या फुटतात. ८५ नंतर बुद्धीरूपी फोंक विस्तारून स्फूर्तीचे फांटे फुटतात; त्या योगानें बुद्धीस विचार सुचतो, ८६ त्या ठिकाणीं मेघारसानें भरलेलीं अशीं निष्ठारूपी पानें सुशोभित दिसून, सत्त्ववृत्तीचे कोंब सरळ निघतात. ८७ सदाचाररूपी पुष्कळ अंकूर सहज निघून, त्या योगानें चहूंकडे वेदघोष चालतो. ८८ शिष्टाचार, वेदोक्त आचरण, व नानाप्रकारचीं यज्ञयागादि कर्में अशीं पानांवर पानें फुटतात. ८९ याप्रमाणें यमदमरूपी घोंस व तपाच्या डाहळ्या फुटतात; आणि वैराग्यरूपी कोंवळ्या शाखा पुष्कळ फुटतात, १९० विशिष्ट व्रतांचे फोंक व धीराच्या तीक्ष्ण अणकुच्या फुटून वेगानें वर जातात. ९१ मध्यंतरीं वेदरूपी दाट पानें फुटून, त्या योगानें, सत्त्वरूपी प्रचंड वारा वाहात आहे, तोंपर्यंत सुविद्येचे चहूंकडे प्रकार होतो. ९२ मग धर्मरूपी एक सरळ शाखा निघते; व तिला स्वर्गादिक फळांचीं आडफांदी फुटते. ९३ दुसरी उपरतिरूप लाल शाखा फुटून तिला मोक्षरूपी नित्य नवी फलवी फुटतच असते. ९४ पुढें रवि, चंद्र इत्यादि ग्रह, व पितर, ऋषि, विद्याधर एतद्रूपी आडव्या फांद्या फुटतात. ९५ या शाखांपेक्षांही उंच अशा दुसऱ्या शाखा फुटून त्यांना इंद्रादि लोकरूपी फळें पुष्कळ येतात. ९६ मग त्या खांद्यांवर, तप व ज्ञान यांत श्रेष्ठ अशा मरीचि, कश्यप इत्यादिरूप दुसऱ्या उंच शाखा येतात. ९७ अशा प्रकारें मालिका लागल्यावर वरतीं शाखांचा विस्तार होऊन, हा वृक्ष बुडाशीं लहान असूनही वर ह्याला मोठालीं फळें येतात. ९८ त्यावरही आणखी ज्या दुसऱ्या फांद्या येतात, त्यांना अर्जुना, ब्रह्मदेव व शिव यांपर्यंत वर शाखा फुटतात. ९९ फळांच्या भारानें वरच्या खांद्या खालीं लवून मुळाशीं टेंकतात. २०० इतर झाडांचीही अशीच स्थिति आहे कीं, फांद्यांना पुष्कळ फळें आलीं, ह्मणजे त्या वांकून बुडाला लागतात; १ त्याचप्रमाणें, अर्जुना, हा संसाररूपी वृक्ष ज्या ठिकाणाहून उत्पन्न होतो, त्याच मुळाशीं ज्ञानाचे वाढीनें पुनः लवतो. २ म्हणून ब्रह्मा व शिव यांच्या पलीकडे जीवाची वाढ नसून, तेथून पुढें वरतीं ब्रह्मच लागतें. ३ परंतु हें असूं दे; या ब्रह्मा-

ब्रह्मादिक ते आंगवलें । ऊर्ध्वमूळामरिसें । न तुकती गा १ आणिकही शाखा उपरता । जिया सनकादिक नामें विख्याता । तिया फळीं मूळीं नाडळतां । भरलिया ब्रह्मीं ५ ऐसी मनुष्यापासूनि जाणावी । ऊर्ध्वीं ब्रह्मादिशेष पालवी । शाखांची वाढी वरवी । उंचावे पैं ६ पार्था ऊर्ध्वींचिया ब्रह्मादि । मनुष्यत्वचि होय आदि । म्हणौनि इयें अधीं । म्हणितलीं मूळें ७ एवं तुज अलौकिकु । हा अधोर्ध्वशाखु । सांगितला भवरुखु । ऊर्ध्वमुळु ८ आणि अधींचीं हीं मूळें । उपरती परिसविली सविवळें । आतां पारिस उन्मूळें । कैसेनि हा ९

न रूपमस्येह तथोपलभ्यते नांतो न चादिर्न च संप्रतिष्ठा ।
अश्वत्थमेनं सुविरूढमूलमसङ्गशस्त्रेण दृढेन छित्त्वा ॥३॥

पारि तुझ्या हन पोटीं । ऐसें गमेल किरीटी । जे येवढें झाड उत्पाटीं । ऐसें कायि असे २१० कीं ब्रह्मयाच्या शेवटवरी । ऊर्ध्व शाखांची थोरी । आणि मूळ तंव निराकारीं । ऊर्ध्वीं असे ११ हा स्थावराही तळीं । फांकत असे अधींच्या डाळीं । माजि धांवतसे दुजा मुळीं । मनुष्यरूपीं १२ ऐसा गाढा आणि अफाटु । आतां कोण करी यया शेवटु । तरि झणी हा हळुवटु । धरिसी भावो १३ तरि हा उन्मूळावया दोषें । येथ सायासाचि कायिसे । काय बाळा बागुल देशें । दवडावा आह १४ गंधर्वदुर्ग कायी पाडावे । काय शशविषाण मोडावें । होआवें मग तोडावें । खपुष्प कीं १५ तैसा संसारु हा वीरा । रूख नाहीं साचोकारा । मा उन्मूळणीं दरारा । कायिसा तरी १६ आह्मीं सांगितली जे परी । मूळडाळांची उजरी । ते वांझेचीं घरभरी । लेंकुरें जैसीं १७ काय कीजती चेइलेपणीं । स्वप्नींचीं तियें बोलणीं । तैसी जाण ते काहाणी । दुगळीचि ते १८ वांचूनि आह्मीं निरूपिलें जैसें । ययाचें अचळ मूळ असे तैसें । आणि तैसाचि जरी हा असे । साचोकारा १९ तरि कोणेनि संतानें । निपजती तया उन्मूळणें । काय फुंकिलिया गगनें । जाइजेल गा २२० झणौनि पैं धनंजया । आह्मीं वानिलें रूप तें माया । कासवीचेनि तुपें राया । वोगरिलें जैसें २१ मृगजळाचीं गा तळीं । तिये दिठी दुरूनि न्याहाळीं । वांचूनि तेणें पाणियें साळी केळी । लाविसी काई २२ मूळ अज्ञानाचि तंव लटिकें । मा तयाचें कार्य हें केतुकें । म्हणोनि संसाररुख सतुकें । वावोचि गा २३ आणि अंतु यया नाहीं । ऐसें बोलिजे जें कांहीं । तेंही साचचि पाहीं । येके परी २४

दिक खांद्या संसाररूप वृक्षाचें मूळ ज्या उर्ध्वाचे ठिकाणीं आहे, त्याची योग्यता पावत नाहींत. ४ आणखी, निवृत्तिमार्गाच्या ज्या वर सनकादिरूपी शाखा आहेत, त्यांना फळें व मुळें नसून त्या ब्रह्मरूपीच आहेत. ५ याप्रमाणें मनुष्यरूप खांदीपासून वरच्या बाजूस ज्या ब्रह्मादिरूप खांद्या आहेत, त्या फार उंच जातात. ६ पार्था, ब्रह्मादिरूप ज्या वरच्या उंच खांद्या आहेत, त्या मनुष्यरूप खांदीपासूनच उत्पन्न झाल्या आहेत, म्हणून तिला आम्ही वरच्या खांद्यांचें मूळ असें म्हटलें आहे. ७ याप्रमाणें, जो अलौकिक संसाररूपी वृक्ष उर्ध्वमूल असून, ज्याला खालीं वर अशा शाखा फुटलेल्या आहेत, त्याचें वर्णन तुला सांगितलें. ८ याप्रमाणें या झाडाला खालचीं व वरचीं मुळें असून त्यांविषयीं सर्व विवेचन तुला सांगितलें; आतां असा जो हा बळकट वृक्ष, तो कोणत्या उपायानें उपटून टाकतां येतो, तें ऐक. ९

अन्वय–(यथा अयं वर्णितः) तथा अस्य रूपं इह न उपलभ्यते; (अस्य) अन्तः न आदिः च न, संप्रतिष्ठा च न (उपलभ्यते), सुविरूढमूलं एनं अश्वत्थ दृढेन असंङ्गशस्त्रेण छित्त्वा, ॥ ३ ॥

अर्थ–या अश्वत्थ वृक्षाचें हें जें वर्णन केलें आहे, तसें त्याचें खरें रूप अनुभवास येत नाहीं; व याला अंत, आदि व स्थिती हींही नाहींत. अशा या बळकट मूळांच्या वृक्षाचा दृढवैराग्यरूप शस्त्रानें छेद करून, ॥ ३ ॥

परंतु, अर्जुना, तुझ्या मनांत अशी शंका येईल कीं, याप्रमाणें हा एवढा प्रचंड वाढलेला जो संसाररूपी वृक्ष, त्याला उपटून टाकील असें काय साधन आहे? २१० कारण, ज्याच्या वरच्या बाजूच्या शाखांची वाढ ब्रह्मलोकापर्यंत असून ज्याचें मूळ निराकार ब्रह्माचे ठिकाणीं आहे; ११ या वृक्षाच्या खालीं येणाऱ्या फांद्या स्थावरजंगमांच्या तळांत शिरलेल्या असून, याच्या मध्यभागांत मृत्युलोक भरलेला आहे; १२ याप्रमाणें हा वृक्ष अति बळकट व अफाट असून, याचा नाश कोणाच्यानें करवेल, अशी क्षुद्र भावना कदाचित् तूं आपले मनांत धरशील हो! १३ नर हें वद, हा वृक्ष उपटून टाकण्यास श्रम ते कसले आहेत? लहान मुलाला जे बगुलबोवा दाखवितात, तो हांकून देण्यास त्याला कोठें दुसऱ्या देशांत का घालवावा लागतो? १४ आकाशांत दिसणारे किडे काय पाडावे लागतात? तसेंच ससाच्या शिंगास काय मोडावें लागतें? आकाशास जर पुष्प येईल, तरच तें तोडतां येईल! तें मुळीं नाहीं, मग तोडण्याचे श्रम कसले? १५ त्याचप्रमाणें अर्जुना, हा तुला सांगितलेला संसाररूपी वृक्ष खरा नाहीं. मग तो उपटून टाकण्यास कसली भीति आली आहे? १६ आम्हीं त्या झाडाचीं मुळें व डाहळ्या यांविषयीं जो प्रकार सांगितला, तो वांझेच्या घरांत पुष्कळ मुलेंलेकरें आहेत असें सांगण्यापैकींच होय. १७ स्वप्नांत जीं आपण भाषणें करतों, त्यांचा जागें झाल्यावर कांहीं खरेपणा प्रत्ययास येतो का? त्याचप्रमाणें, या संसाररूपी वृक्षाची कहाणी स्वप्नाचें भावंडच आहे. १८ नाहींतर ज्याप्रमाणें आम्हीं या झाडाचें वर्णन केलें, त्याप्रमाणें जर याचीं मुळें भक्कम असून हा विस्तार पावलेला खरा असता, १९ तर कोणाची माय व्याली होती कीं, त्याला उपटून टाकील? हें पहा–फुंकर घातल्यानें आकाश कोठें नाहींसें होतें काय? २२० म्हणून, हे धनंजया, ज्याप्रमाणें कासवीच्या तुपाची राजास मेजवानी करणें असंभवनीय आहे, त्याप्रमाणें, आम्हीं जें या संसाररूपी वृक्षाच्या स्वरूपाचें वर्णन केलें, तें सर्व मिथ्या होय. २१ बाबारे, मृगजळाचे तलाव दुरून दृष्टीनें पाहण्यासच योग्य आहेत; बाकी त्यांच्या पाण्यावर कधीं साळी, केळी करशील काय? २२ अगोदर अज्ञान हें मिथ्या आहे, मग त्यापासून होणारें कार्य काय किंमतीचें असणार? म्हणून, संसाररूपी वृक्ष हा सर्व खोटा आहे; २३ आणि या वृक्षाला अंत नाहीं, असें म्हणणें हेंही एका प्रकारानें खरें आहे. २४ तर जोंपर्यंत मनुष्य जागा

तरी प्रबोधु जंव नोहे । तंव निद्रे काय अंतु आहे । कीं रात्री न सरे तंव न पाहे । तया अरौतें २५ तैसा जंव पार्था । विवेकु नुधवी माथा । तंव अंतु नाहीं अश्वत्था । भवरूपा या २६ वाजतें वारें निवांत । जंव न राहे जेथिंचें तेथ । तंव तरंगता अनंत । क्षणावीचि कीं २७ म्हणौनि सूर्य जैं हारपे । तैं मृगजळा भासु लोपे । कां प्रभा जाय दीपें । मालवलेनि २८ तैसें मूळ अविद्या खाये । तें ज्ञान जैं उभें होये । तैंचि यया अंतु आहे । एऱ्हवीं नाहीं २९ तेवींचि हा अनादी । ऐसी ही आथी शाब्दी । तो आळु नोहे अनुरोधी । बोलातें यया २३० जे संसारवृक्षाच्या ठायीं । साचोकार तंव नाहीं । मा नाहीं तया आदि काई । कोण होईल ३१ जो साच जेथूनि उपजे । तयातें आदि हें साजे । आतां नाहींचि तो म्हणिजे । कोठूनियां ३२ म्हणौनि जन्मेना आहे । ऐसिया सांगों कवण माये । यालागीं नाहींपणेंचि होये । अनादि हा ३३ वांझेचिया लेंका । कैंची जन्मपत्रिका । नभीं निळी भूमिका । कें कल्पूं पां ३४ व्योमकुसुमाचा पांडवा । कवणें देंठ तोडावा । म्हणौनि नाहीं ऐसिया भवा । आदि कैंची ३५ जैसें घटाचें नाहींपण । असतचि असे केलेनिवीण । तैसा समूळ वृक्षु जाण । अनादि हा ३६ अर्जुना ऐसेनि पाहीं । आद्यंतु ययासि नाहीं । माजि स्थिती आभासे कांहीं । परि टवाळ ते गा ३७ ब्रह्मगिरीहूनि न निगे । आणि समुद्रींही कीर न रिगे । माजि दिसे वाउगें । मृगांबु जैसें ३८ तैसा आद्यंतीं कीर नाहीं । आणि साचही नोहे कहीं । परि लटिकेपणाची नवाई । पडिभासे गा ३९ नाना रंगीं गजबजे । जैसें इंद्रधनुष्य देखिजे । तैसा नेणतया आपजे । आहे ऐसा २४० ऐसेनि स्थितीचिये वेळे । भुलवी अज्ञानाचे डोळे । लाघवी हरी मेखळे । लोकु जैसा ४१ आणि नसतीचि श्यामिका । व्योमीं दिसे तैसी दिसो कां । तरी दिसणेंही क्षणा एका । होय जाय ४२ स्वप्नींही मानिलें लटिकें । तरी निर्वाहो कां एकसारिखें । तेविं आभास हा क्षणिकें । रिताचि गा ४३ देखतां आहे आवडे । घेऊं जाइजे तरी नातुडे । जैसा टिकु कीजे माकडें । जळामाजीं ४४ तरंगभंगु सांडीं पडे । विजूही न पुरे होडे । आभासासि तेणें पाडें । होणें जाणें गा ४५ जैसा ग्रीष्मशेषींचा वारा । नेणिजे समोर कीं पाठीमोरा । तैसी स्थिती नाहीं तरुवरा । भवरूपा यया ४६ एवं आदि ना अंत स्थिती । ना रूप ययासि आथी । आतां कायसी कुंथाकुंथी । उन्मूळणीं गा ४७ आ-

झाला नाहीं, तोंपर्यंत निद्रेला शेवट आहे काय ? किंवा रात्र सरली नाहीं, तोंपर्यंत उजाडत नाहीं. २५ त्याप्रमाणें, हे पार्था, जोंपर्यंत ब्रह्मज्ञान उत्पन्न झालें नाहीं, तोंपर्यंत या संसाररूपी अश्वत्थास अंत नाहीं. २६ जोंपर्यंत वारा वाहतांना राहिला नाहीं, तोंपर्यंत समुद्रावरील लाटांना शेवट नाहीं, असें म्हणावें लागतें. २७ म्हणून, ज्या वेळेस सूर्य अस्तास जातो, त्या वेळेस मृगजलाचा भास नाहींसा होतो, किंवा दिव्याचा प्रकाश दिवा मालवल्यावर नाहींसा होतो; २८ त्याप्रमाणें या संसाररूपी वृक्षाचें मूळ जें अज्ञान, तें ब्रह्मज्ञानाचा उदय झाल्याशिवाय नाहींसें होत नाहीं. २९ त्याचप्रमाणें हा अनादि आहे असें लोक म्हणतात; तर खरोखर पाहूं गेलें असतां हा त्याच्यावर आळ आलेला नसून, ही गोष्ट त्याच्या लक्षणांस अनुसरूनच आहे. २३० कारण, संसारवृक्षाचे ठिकाणीं जर खरेपणाच नाहीं; मग जो मुळांत नाहीं, तर त्याचा आरंभ कोण होईल. ३१ जो खरोखर एकाद्या ठिकाणाहून उत्पन्न होतो,त्याला आदि आहे हें म्हणणें शोभतें, व जो वस्तुतः नाहींच, त्याला आदि कोठून असणार ? ३२ म्हणून, ज्याला जन्म नाहीं त्याची आई कोण ह्मणून म्हणावी ? यास्तव हा वृक्ष अभावरूपानें म्हणजे नाहींपणानेंच आहे, ह्मणून याला अनादि म्हटलें आहे इतकेंच ! ३३ वांझेच्या मुलाची जन्मपत्रिका कोठून असणार ? त्याचप्रमाणें, आकाशाचा रंग निळा आहे अशी कल्पना कशी करतां येईल ? ३४ अर्जुना, आकाशाच्या पुष्पाचा देंठ कोणास तोडतां येईल ? ह्मणून, ज्या संसाररूपी वृक्षास अस्तिस्व नाहीं, त्याला मूलारंभ कोठून असणार ? ३५ ज्याप्रमाणें घटोत्पत्तीच्या पूर्वी असणारा घटाचा अभाव, कोणीं केल्यावांचून अनादीच आहे, त्याप्रमाणें संसारवृक्षाचें मूळ जी माया, तिच्या सहवर्तमान हा संसार अभावरूपानें अनादि आहे असें जाण. ३६ अर्जुना, अशा रीतीनें हा अभावरूप आहे, म्हणून याला आदि नाहीं व अंतही नाहीं, असें असूनही व्यवहारदशेंत हा प्रत्यक्ष दिसतो. तथापि नें दिसणें मृगजलाप्रमाणें व्यर्थ होय. ३७ कारण, मृगजळाची एकाद्या ब्रह्मगिरीपासून उत्पत्ति होत नाहीं व एकाद्या समुद्राच्या ठिकाणीं लयही होत नाहीं, असें असूनही मध्यतरी दिसतें, म्हणून त्याही वेळेला तें वास्तविक नाहींच. ३८ त्याप्रमाणें संसारवृक्ष हा आदिकालीं नाहीं, अंतींही नाहीं. आणि मध्यें दिसला, तरी नाहीं. तात्पर्य कोणत्याही कालीं ह्याचें अस्तित्व नाहींच; परंतु याच्या लटकेपणाचा काय चमत्कार सांगावा कीं, हा नसून आहे असा भासतो. ३९ इंद्रधनुष्य ज्याप्रमाणें नानाप्रकारच्या रंगांनीं भरलेलें दिसतें, त्याप्रमाणें हा संसाररूपी वृक्ष अज्ञान्यासच आहे, असा दिसतो. २४० संसार आपल्या स्थितीच्या वेळेस अज्ञान्यांच्या डोळ्याला आपल्या सत्यत्वाची भूल पाडतो. जसा बहुरूपी लोकांच्या डोळ्याला आपल्या चातुर्यानें भुलवतो. ४१ आणि आकाशाच्या ठिकाणीं नसतांना निळा रंग दिसला तर दिसो, त्यांत तरी खरेपणा आहे काय ? तोही क्षणांत नष्ट होऊन जातो. ४२ स्वप्नांतले पदार्थ लटके असून सत्य मानले तरी त्यांच्यापासून कायमचा निर्वाह होतो का ? नाहीं. त्याप्रमाणें हा आभासमात्र संसार वस्तुतः नाहीं, दिसला तरी तो क्षणभरही एकरूपानें रहात नाहीं. ४३ हा संसार चांगला दिसतो, म्हणून विचार करून व्यायला गेलें असतां, कोठें आढळत नाहीं. जसें माकड चेष्टा करितें, त्याप्रमाणें जलांतही चेष्टा दिसतात, परंतु त्या खऱ्या नसतात. ४४ लाटांची एकामागून एक येण्याची त्वरा व विजेचें चमकणें यांच्यापेक्षांही या विश्वाभासरूपी झाडाचें होणें जाणें अति जलद आहे. ४५ ग्रीष्म ऋतूच्या शेवटचा वारा जसा समोरून किंवा पाठीमागून येतो, हें समजत नाहीं, तशी या नसणाऱ्या संसाररूपी वृक्षाची स्थिति आहे. ४६ याप्रमाणें या वृक्षास आदि, अंत, स्थिति व रूप हीं नाहींत, म्हणून हा उपटून टाकण्यास खटाटोप कशाला पाहिजे ? ४७ अर्जुना, आत्मस्वरूपाचे अ-

पुलिया अज्ञानासाठीं । नव्हता थांवला किरीटी । तरि आतां आत्मज्ञानाच्या लोटीं। खांडेनि गा ४८ वांचूनि ज्ञानेंवीण एकें। उपाय करिसी जितुके। तिहीं गुंफासि अधिकें । रुखीं इये ४९ मग किती खांदोखांदीं । यया हिंडावें ऊर्ध्वीं अधीं । ह्मणौनि मूळचि अज्ञान छेदीं । सम्यक्ज्ञानें २५० एन्हवीं दोरीचिया उरगा । डांगा मेळवितां पैं गा । तो शिणुचि वाउगा । केला होय ५१ तरावया मृगजळाची गंगा । डोणीलागीं धांवतां दांगा- । माजि वोहळें बुडिजे पैं गा । साच जेविं ५२ तेविं नाथिलिया संसारा । उपाईं जाचतया वीरा। आपणपें लोपे वारा । विकोपीं जाय ५३ ह्मणोनि स्वप्नींचेया घाया । ओखद चेवोचि धनंजया । तेविं अज्ञानमूळा यया । ज्ञानचि खड्ग ५४ परि तेचि लीला परजवे । तैसें वैराग्याचें नवें । अभंगबळ होआवें । बुद्धीसी गा ५५ उठिलेनि वैराग्यें जेणें। हा त्रिवर्गु ऐसा सांडणें । जैसें वमुनियां सुणें । आतांचि गेलें ५६ हा ठायवरी पांडवा । पदार्थजाती आघवा । विटवी तो होआवा। वैराग्य लाटु ५७ मग देहाहंतेचें दळें । सांडूनि ऐकेचि वेळे । प्रत्यक्बुद्धी करतळें । हातवसावे ५८ निसळें विवेकसाहणें । जे ब्रह्माहमस्मिबोधें सणाणें । मग पुरतेनि बोधें उटणें । एकलेंचि ५९ परि निश्चयाचें मुष्टिबळ । पाहावें एकदोन वेळ । मग तुळावें अति चोखाळ। मननवरी २६० पाठीं हतियेरां आपणयां । निदिध्यासें एक जालिया । पुढें दुजें नुरेल घाया- । पुरतें गा ६१ तें आत्मज्ञानाचें खांडें । अद्वैत प्रभेचे निवाडें । नेदील उरों कवणेकडे। भववृक्षासि ६२ शरदागमींचा वारा। जैसा केरु फेडी अंबरा। कां उदयला रवी आंधारा । घोंटु भरी ६३ नाना उपवढ होतां खेंवो । नुरे स्वप्नसंभ्रमाचा ठावो । स्वप्नतीतिधारेचा वाहो । करील तैसें ६४ तेव्हां ऊर्ध्वींचें मूळ । कां अधींचें हन शाखाजाळ । तें कांहींचि न दिसे मृगजळ । चांदिणा जेविं६५ ऐसेनि गा वीरनाथा आत्मज्ञानाचिया खड्गलता । छेदुनियां भवाश्वत्था । ऊर्ध्वमूळातें ६६

ततः पदं तत्परिमार्गितव्यम् यस्मिन् गता न निवर्तंति भूयः ।
तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी ॥ ४ ॥

मग इदंतेसि वाळलें । जें मीपणेंवीण डाहारलें । तें रूप पाहिजे आपलें। आपणचि ६७ परि दर्पणाचेनि आधारें । एकचि करून दुसरें । मुख पाहाती गव्हारें । तैसें नको हो ६८ हें पाहाणें ऐसें असे वीरा । जैसा न बोडलिया

ज्ञानामुळें हा नसलेला वृक्ष वळावला आहे, तर आतां आत्मज्ञानरूप शस्त्रानें हा तोडून टाक, म्हणजे झालें. ४८ कारण, (जें ज्याच्या अज्ञानेंकरून भासतें तें त्याच्याच ज्ञानेंकरून निवृत्त होतें, अन्य कशानेंही होत नाहीं, याकरितां) एक ब्रह्मज्ञानाशिवाय याला छेदण्याचे जेवढे असुरी उपाय करशील, तितका तूं या वृक्षांत–संसारांत अधिकाधिकच गुंतून पडशील. ४९ मग तूं किती खांद्यांवरून हिंडशील, आणि तसाच वर किंवा खालीं अशा अगणित खांद्यावर जाशील याचा नेम नाहीं. म्हणून, याचें मूळ जें अज्ञान, तें तूं यथार्थ छेदून टाक, २५० एरव्हीं, दोरीवर भासलेला सर्प मारण्याकरितां पुष्कळ काठ्या मिळविल्या म्हणजे तो जसा व्यर्थ शीण केल्याप्रमाणें होय. ५१ मृगजलाच्या मोठ्या नदींतून तरून जाण्याकरितां नाव शोधण्याची धांवाधांव करीत असतां, अरण्यांतील खऱ्या ओहोळांत जसा एकादा बुडतो, ५२ त्याप्रमाणें, वीरा अर्जुना, या लटक्या संसाराच्या निवृत्तीचा मनुष्य उपाय करीत असतां भ्रम पावतो; आणि आपल्या खऱ्या ज्ञानाचा लोप झाल्यामुळें त्याच्या अंगांत ' संसार सत्य ' असें जें वारें भरलेलें असतें, तें अधिकच होतें. ५३ धनंजया, स्वप्नांत लागलेल्या तरवारीचे वारास ज्याप्रमाणें जागृति हेंच औषध, त्याप्रमाणें, ज्या संसाराची अज्ञानापासून उत्पत्ति आहे, त्याचा छेद करण्यास ज्ञानच खड्ग पाहिजे. ५४ परंतु तेंच ज्ञानखड्ग सहज धारण करतां येईल असें बुद्धीस वैराग्याचें बळ असावें लागतें. ५५ जें वैराग्य उठल्याबरोबर, कुत्र्याच्या ओकीवर जितक्या जोरानें त्यागबुद्धि उत्पन्न होते, त्या प्रकारानें त्रैलोक्यांतील सर्व भोगावर त्यागबुद्धि झाली पाहिजे. ५६ अर्जुना, पदार्थमात्राबद्दल अशा तऱ्हेचा वीट उत्पन्न करणारा वैराग्याचा जोर असावा लागतो. (म्हणजे ज्ञानखड्ग सहज धरतां येतें.) ५७ मग देहाची अहंता हें म्यान, त्या वैराग्यरूप खड्गावरून एकदम काढून, तें विचारवंत बुद्धिरूपी हातांत घ्यावें. ५८ मग तें खड्ग विवेकरूप सहाणेवर पाजवून, अहंब्रह्म या बोधाची तीक्ष्ण धार लावावी, आणि त्यास अद्वैतरूपी पाणी द्यावें. ५९ इतकें झाल्यावर निश्चयरूपी दृढ हातांत घेऊन, व मनन करून, तें खड्ग एक दोन वेळ अजमावून पहावें. २६० नंतर ज्ञानखड्गाचें व आपलें निदिध्यासानें ऐक्य झाल्यावर आपल्यापुढें वार मारण्यापुरता मुद्धां तो दैवरूपी वृक्ष उरणारच नाहीं. ६१ तें आत्मज्ञानरूप शस्त्र अद्वैतप्रभेच्या तेजानें भवरूपी वृक्षास कोठेंही उरूं देणार नाहीं. ६२ शरदृतूच्या सुरवातीचा वारा ज्याप्रमाणें आकशांतील सर्व ढग नाहींसा करतो, अथवा सूर्योदय झाल्यावर सर्व अंधार नाहींसा होतो; ६३ किंवा जागें होण्याबरोबर स्वप्नांतील गोष्टी नाश पावतात, त्याप्रमाणें, आत्मज्ञानानुभवरूपी धारेच्या तिखटपणामुळें संसाररूप तरूचा नाश होतो. ६४ त्या वेळेस, ज्याप्रमाणें चांदणें पडल्यावर मृगजल दिसत नाहीं, त्याप्रमाणें संसाररूपी वृक्षाचीं वरचीं व खालचीं मुळें अथवा खालीं वाढलेला सर्व विस्तार हीं नाहींशीं होतात. ६५ याप्रमाणें, हे वीरोत्तमा अर्जुना, आत्मज्ञानरूपी खड्गानें हा संसाररूपी अश्वत्थवृक्ष मुळासुद्धां छेदून टाक. ६६

अन्वय–ततः, यस्मिन् गताः भूयः न निवर्तन्ति, तत् पदं परिमार्गितव्यं; यतः पुराणी प्रवृत्तिः प्रसृता (अस्ति,) तम् एव आद्यं पुरुषं अहं प्रपद्ये. ॥ ४ ॥

अर्थ–नंतर, ज्या पदाला प्राप्त झालेले लोक पुनः मागें येत नाहींत, तें पद शोधून काढावें [कसें ? तर,] ज्याच्यापासून अनादि प्रवृत्ति चालत आली आहे, त्याच आद्य पुरुषाला मी शरण आहें, अशा भावनेनें [त्या पदाचा शोध लावावा.] ॥ ४ ॥

म्हणजे इदं हें अशा सर्वनामानें जाणवलें जात नाहीं, व अहं अशा वृत्तीलाही विषय होत नाहीं, असें जें डाहारलें, म्हणजे संचलेलें आत्मरूप आपणच पहावें, ६७ परंतु वेडे लोक आपलेंच मुख आरशांत प्रतिबिंबित करून म्हणजे दुसरें करून पाहातात, तसें आत्म्याच्या ठिकाणीं द्वैत उत्पन्न करून पाहूं नकोस हो ! ६८ अर्जुना, आत्मस्वरूपाचें पहाणें असें आहे कीं, ज्याप्रमाणें विहीर न

ज्ञानामुळें हा नसलेला वृक्ष वळावला आहे, तर आतां आत्मज्ञानरूप शस्त्रानें हा तोडून टाक, म्हणजे झालें. ४८ कारण, (जें ज्याच्या अज्ञानेंकरून भासतें तें त्याच्याच ज्ञानेंकरून निवृत्त होतें, अन्य कशानेंही होत नाहीं, याकरितां) एक ब्रह्मज्ञानाशिवाय याला छेदण्याचे जेवढे असुरी उपाय करशील, तितका तूं या वृक्षांत–संसारांत अधिकाधिकच गुंतून पडशील. ४९ मग तूं किती खांद्यांवरून हिंडशील, आणि तसाच वर किंवा खालीं अशा अगणित खांद्यावर जाशील याचा नेम नाहीं. म्हणून, याचें मूळ जें अज्ञान, तें तूं यथार्थ छेदून टाक, २५० एरव्हीं, दोरीवर भासलेला सर्प मारण्याकरितां पुष्कळ काठ्या मिळविल्या म्हणजे तो जसा व्यर्थ शीण केल्याप्रमाणें होय. ५१ मृगजलाच्या मोठ्या नदींतून तरून जाण्याकरितां नाव शोधण्याची धांवाधांव करीत असतां, अरण्यांतील खऱ्या ओहोळांत जसा एकादा बुडतो, ५२ त्याप्रमाणें, वीरा अर्जुना, या लटक्या संसाराच्या निवृत्तीचा मनुष्य उपाय करीत असतां भ्रम पावतो; आणि आपल्या खऱ्या ज्ञानाचा लोप झाल्यामुळें त्याच्या अंगांत ' संसार सत्य ' असें जें वारें भरलेलें असतें, तें अधिकच होतें. ५३ धनंजया, स्वप्नांत लागलेल्या तरवारीचे वारास ज्याप्रमाणें जागृति हेंच औषध, त्याप्रमाणें, ज्या संसाराची अज्ञानापासून उत्पत्ति आहे, त्याचा छेद करण्यास ज्ञानच खड्ग पाहिजे. ५४ परंतु तेंच ज्ञानखड्ग सहज धारण करतां येईल असें बुद्धीस वैराग्याचें बळ असावें लागतें. ५५ जें वैराग्य उठल्याबरोबर, कुत्र्याच्या ओकीवर जितक्या जोरानें त्यागबुद्धि उत्पन्न होते, त्या प्रकारानें त्रैलोक्यांतील सर्व भोगावर त्यागबुद्धि झाली पाहिजे. ५६ अर्जुना, पदार्थमात्राबद्दल अशा तऱ्हेचा वीट उत्पन्न करणारा वैराग्याचा जोर असावा लागतो. (म्हणजे ज्ञानखड्ग सहज धरतां येतें.) ५७ मग देहाची अहंता हें म्यान, त्या वैराग्यरूप खड्गावरून एकदम काढून, तें विचारवंत बुद्धिरूपी हातांत घ्यावें. ५८ मग तें खड्ग विवेकरूप सहाणेवर पाजवून, अहंब्रह्म या बोधाची तीक्ष्ण धार लावावी, आणि त्यास अद्वैतरूपी पाणी द्यावें. ५९ इतकें झाल्यावर निश्चयरूपी दृढ हातांत घेऊन, व मनन करून, तें खड्ग एक दोन वेळ अजमावून पहावें. २६० नंतर ज्ञानखड्गाचें व आपलें निदिध्यासानें ऐक्य झाल्यावर आपल्यापुढें वार मारण्यापुरता मुद्धां तो दैवरूपी वृक्ष उरणारच नाहीं. ६१ तें आत्मज्ञानरूप शस्त्र अद्वैतप्रभेच्या तेजानें भवरूपी वृक्षास कोठेंही उरूं देणार नाहीं. ६२ शरदृतूच्या सुरवातीचा वारा ज्याप्रमाणें आकशांतील सर्व ढग नाहींसा करतो, अथवा सूर्योदय झाल्यावर सर्व अंधार नाहींसा होतो; ६३ किंवा जागें होण्याबरोबर स्वप्नांतील गोष्टी नाश पावतात, त्याप्रमाणें, आत्मज्ञानानुभवरूपी धारेच्या तिखटपणामुळें संसाररूप तरूचा नाश होतो. ६४ त्या वेळेस, ज्याप्रमाणें चांदणें पडल्यावर मृगजल दिसत नाहीं, त्याप्रमाणें संसाररूपी वृक्षाचीं वरचीं व खालचीं मुळें अथवा खालीं वाढलेला सर्व विस्तार हीं नाहींशीं होतात. ६५ याप्रमाणें, हे वीरोत्तमा अर्जुना, आत्मज्ञानरूपी खड्गानें हा संसाररूपी अश्वत्थवृक्ष मुळासुद्धां छेदून टाक. ६६

अन्वय–ततः, यस्मिन् गताः भूयः न निवर्तन्ति, तत् पदं परिमार्गितव्यं; यतः पुराणी प्रवृत्तिः प्रसृता (अस्ति,) तम् एव आद्यं पुरुषं अहं प्रपद्ये. ॥ ४ ॥

अर्थ–नंतर, ज्या पदाला प्राप्त झालेले लोक पुनः मागें येत नाहींत, तें पद शोधून काढावें [कसें ? तर,] ज्याच्यापासून अनादि प्रवृत्ति चालत आली आहे, त्याच आद्य पुरुषाला मी शरण आहें, अशा भावनेनें [त्या पदाचा शोध लावावा.] ॥ ४ ॥

म्हणजे इदं हें अशा सर्वनामानें जाणवलें जात नाहीं, व अहं अशा वृत्तीलाही विषय होत नाहीं, असें जें डाहारलें, म्हणजे संचलेलें आत्मरूप आपणच पहावें, ६७ परंतु वेडे लोक आपलेंच मुख आरशांत प्रतिबिंबित करून म्हणजे दुसरें करून पाहातात, तसें आत्म्याच्या ठिकाणीं द्वैत उत्पन्न करून पाहूं नकोस हो ! ६८ अर्जुना, आत्मस्वरूपाचें पहाणें असें आहे कीं, ज्याप्रमाणें विहीर न

उकरतांना तिचा झरा आपल्या उगमाच्या ठिकाणीं भरलेलाच असतो. ६९ किंवा पाणी आटल्यावर जसें त्यांतील प्रतिबिंब मुख्य बिंबाशीं ऐक्य पावतें, अथवा घट फुटल्यावर घटांतील आकाश महदाकाशास मिळतें; २७० किंवा लांकडें नाहींतशीं झाल्यावर त्यांतील अग्नि जसा स्वस्वरूपीं लय पावतो, तसें, अर्जुना, आपलें स्वरूप हें आपल्या स्वरूपांत पहावें लागतें. ७१ जसें जिव्हेनें आपली स्वतःची चव पहाणें, किंवा डोळ्यांनीं आपलें बुबुळ पहाणें, तसें आपलें स्वरूप आपण पहाणें हें होय. ७२ किंवा प्रभा जशी प्रभेस मिळते, आकाश आकाशावरच असतें, अथवा पाणी ज्याप्रमाणें पाण्याचे खोळींत भरावें, ७३ त्याप्रमाणें अद्वैतदृष्टीनें आपलें स्वरूप आपण पहाण्याची रीत आहे. हें तुला निश्चयपूर्वक सांगतों: ७४ ती अशी: पहाणारा (द्रष्टा), पहाण्याचा पदार्थ (दृश्य) यांच्यावाचून जें ज्ञान, ह्मणजे कांहीं विशेष भावानें न जाणणें, आणि ज्ञान मात्रत्वानें असणें, यांचें नांव आत्मस्वरूपाचें जाणणें; यालाच आद्यपुरुष असें म्हणतात. ७५ त्याच्या ठिकाणीं उपाधीचा आश्रय करून श्रुती लांब लांब जिभा काढून नामरूपाची व्यर्थ वडवड करितात, असो. ७६ परंतु अशा स्वरूपाच्या ठिकाणीं प्राप्त होण्याकरितां स्वर्ग व संसार ह्यांना कंटाळूनजे मुमुक्षु पुनः माघारे येणार नाहींत, अशा पैजेनें योगज्ञानाकडे निघाले, ७७ आणि संसाराच्या हातावर हात मारून त्याच्यापुढें वैराग्यसंपन्न धूम ठोकीत असतां, कर्मानें प्राप्त होणारें अत्यंत मोठें ऐश्वर्य जें ब्रह्मपद, त्यालाही ओलांडून मागें टाकतात. ७८ अशा स्थितींतही वैराग्य किंवा ज्ञानसंपन्न आपण आहोंत अशा तऱ्हेचा सूक्ष्म अभिमान रहाण्याचा संभव आहे; त्याचाही झाडा देऊन, जे विचारवान मुमुक्षु आपल्या मूळ घराप्रत ह्मणजे निजस्वरूपाप्रत प्राप्त होण्याकरितां दाखला घेतात. ७९ ज्या निजस्वरूपाच्या ठिकाणीं एवढा विश्वपरंपरेचा वेल वाढला आहे, असें सामान्य शास्त्रें किंवा लोक म्हणतात, परंतु तें म्हणणें व्यर्थ आहे. ज्याप्रमाणें भाग्यहीन पुरुषाच्या आशेचा वेल वाढत असतो, त्याचप्रमाणें निजस्वरूपाच्या ठिकाणीं विश्वपरंपरेची काहाणी आहे. २८० कारण, ज्या परमात्मवस्तूचें न जाणणें ह्मणजे अज्ञान हेंच विश्वाच्या ज्ञानास धोरण्या आणतें, आणि त्या अज्ञानानेंच कालत्रय नसणारा नीतृष्णा जगतांत नांदविला आहे. ८१ अर्जुना, ह्या रीतीनें विश्वाच्याही पूर्वी असलेलें जें ब्रह्म तेंच आपलें निजस्वरूप आहे, असें पाहिलें पाहिजे. ज्याप्रमाणें थंडीनें थंडीलाच विषय करायचा त्याप्रमाणें होय. ८२ हे धनंजया, तें निजपद (आत्मस्वरूप) ओळखण्याची आणखी एक नूतन अशी आहे कीं, ज्या स्वरूपाची भेट झाली असतां त्या ठिकाणाहून पुनः परत येणें घडत नाहीं. ८३ महाप्रलयकालीं जसें सर्वत्र जलमय होतें, तसें जे ज्ञानाच्या योगानें सर्वच परिपूर्ण सच्चिदानंद परब्रह्मास आत्मरूपानें जाणतात; तदव्यतिरिक्त दुसरी प्रतीति त्यांना होतच नाहीं, अशा रीतीनें ब्रह्मस्वरूपास भेटतात. ८४

अन्वय—निर्मानमोहाः, जितसंगदोषाः, अध्यात्मनित्याः, विनिवृत्तकामाः, सुखदुःखसंज्ञैः द्वंद्वैः विमुक्ताः, अमूढाः, तत् अव्ययं पदं गच्छन्ति. ॥ ५ ॥

अर्थ—ज्यांचा अभिमान आणि मोह गेला आहे, ज्यांनीं विषयासक्तिरूप दोष जिंकले आहेत, जे आत्मचिंतनांत सदैव रममाण असतात, ज्यांच्या सर्व वासना नाहींतशा झाल्या आहेत, आणि जे सुखदुःखरूप द्वंद्वापासून मुक्त झाले आहेत, असे जे ज्ञाते जन, ते त्या शाश्वत पदाला जाऊन मिळतात. ॥ ५ ॥

वर्षाऋतूच्या अखेरीस ज्याप्रमाणें मेघ आकाशास सोडून जातात, त्याप्रमाणें ज्या पुरुषाचे मनाला मोह व अभिमान आपण होऊन सोडून जातात; ८५ निर्धन व निष्ठुर अशा मनुष्यास ज्याप्रमाणें त्याचे आप्त सोडतात, त्याप्रमाणें जे विकारांचें सपाट्यांत सांपडत नाहींत; ८६ केळीला केळीं आल्यावर ती जशी उन्मळून पडते, तशा आत्मस्वरूपलाभाच्या प्रबलतेनें ज्यांच्या क्रिया हळूहळू बंद पडूं लागतात, ८७ वृक्षाला आग लागल्यावर त्यावर बसणारे पक्षी ज्याप्रमाणें तो सोडून जातात, त्याप्रमाणें ज्यांना सर्व विकल्प सोडून जातात; ८८ ज्या भेदबुद्धिरूप पृथ्वीवर सर्वदोषरूप तृणाचे अं-

उकरतांना तिचा झरा आपल्या उगमाच्या ठिकाणीं भरलेलाच असतो. ६९ किंवा पाणी आटल्यावर जसें त्यांतील प्रतिबिंब मुख्य बिंबाशीं ऐक्य पावतें, अथवा घट फुटल्यावर घटांतील आकाश महदाकाशास मिळतें; २७० किंवा लांकडें नाहींतशीं झाल्यावर त्यांतील अग्नि जसा स्वस्वरूपीं लय पावतो, तसें, अर्जुना, आपलें स्वरूप हें आपल्या स्वरूपांत पहावें लागतें. ७१ जसें जिव्हेनें आपली स्वतःची चव पहाणें, किंवा डोळ्यांनीं आपलें बुबुळ पहाणें, तसें आपलें स्वरूप आपण पहाणें हें होय. ७२ किंवा प्रभा जशी प्रभेस मिळते, आकाश आकाशावरच असतें, अथवा पाणी ज्याप्रमाणें पाण्याचे खोळींत भरावें, ७३ त्याप्रमाणें अद्वैतदृष्टीनें आपलें स्वरूप आपण पहाण्याची रीत आहे. हें तुला निश्चयपूर्वक सांगतों: ७४ ती अशी: पहाणारा (द्रष्टा), पहाण्याचा पदार्थ (दृश्य) यांच्यावाचून जें ज्ञान, ह्मणजे कांहीं विशेष भावानें न जाणणें, आणि ज्ञान मात्रत्वानें असणें, यांचें नांव आत्मस्वरूपाचें जाणणें; यालाच आद्यपुरुष असें म्हणतात. ७५ त्याच्या ठिकाणीं उपाधीचा आश्रय करून श्रुती लांब लांब जिभा काढून नामरूपाची व्यर्थ वडवड करितात, असो. ७६ परंतु अशा स्वरूपाच्या ठिकाणीं प्राप्त होण्याकरितां स्वर्ग व संसार ह्यांना कंटाळूनजे मुमुक्षु पुनः माघारे येणार नाहींत, अशा पैजेनें योगज्ञानाकडे निघाले, ७७ आणि संसाराच्या हातावर हात मारून त्याच्यापुढें वैराग्यसंपन्न धूम ठोकीत असतां, कर्मानें प्राप्त होणारें अत्यंत मोठें ऐश्वर्य जें ब्रह्मपद, त्यालाही ओलांडून मागें टाकतात. ७८ अशा स्थितींतही वैराग्य किंवा ज्ञानसंपन्न आपण आहोंत अशा तऱ्हेचा सूक्ष्म अभिमान रहाण्याचा संभव आहे; त्याचाही झाडा देऊन, जे विचारवान मुमुक्षु आपल्या मूळ घराप्रत ह्मणजे निजस्वरूपाप्रत प्राप्त होण्याकरितां दाखला घेतात. ७९ ज्या निजस्वरूपाच्या ठिकाणीं एवढा विश्वपरंपरेचा वेल वाढला आहे, असें सामान्य शास्त्रें किंवा लोक म्हणतात, परंतु तें म्हणणें व्यर्थ आहे. ज्याप्रमाणें भाग्यहीन पुरुषाच्या आशेचा वेल वाढत असतो, त्याचप्रमाणें निजस्वरूपाच्या ठिकाणीं विश्वपरंपरेची काहाणी आहे. २८० कारण, ज्या परमात्मवस्तूचें न जाणणें ह्मणजे अज्ञान हेंच विश्वाच्या ज्ञानास धोरण्या आणतें, आणि त्या अज्ञानानेंच कालत्रय नसणारा नीतृष्णा जगतांत नांदविला आहे. ८१ अर्जुना, ह्या रीतीनें विश्वाच्याही पूर्वी असलेलें जें ब्रह्म तेंच आपलें निजस्वरूप आहे, असें पाहिलें पाहिजे. ज्याप्रमाणें थंडीनें थंडीलाच विषय करायचा त्याप्रमाणें होय. ८२ हे धनंजया, तें निजपद (आत्मस्वरूप) ओळखण्याची आणखी एक नूतन अशी आहे कीं, ज्या स्वरूपाची भेट झाली असतां त्या ठिकाणाहून पुनः परत येणें घडत नाहीं. ८३ महाप्रलयकालीं जसें सर्वत्र जलमय होतें, तसें जे ज्ञानाच्या योगानें सर्वच परिपूर्ण सच्चिदानंद परब्रह्मास आत्मरूपानें जाणतात; तदव्यतिरिक्त दुसरी प्रतीति त्यांना होतच नाहीं, अशा रीतीनें ब्रह्मस्वरूपास भेटतात. ८४

अन्वय—निर्मानमोहाः, जितसंगदोषाः, अध्यात्मनित्याः, विनिवृत्तकामाः, सुखदुःखसंज्ञैः द्वंद्वैः विमुक्ताः, अमूढाः, तत् अव्ययं पदं गच्छन्ति. ॥ ५ ॥

अर्थ—ज्यांचा अभिमान आणि मोह गेला आहे, ज्यांनीं विषयासक्तिरूप दोष जिंकले आहेत, जे आत्मचिंतनांत सदैव रममाण असतात, ज्यांच्या सर्व वासना नाहींतशा झाल्या आहेत, आणि जे सुखदुःखरूप द्वंद्वापासून मुक्त झाले आहेत, असे जे ज्ञाते जन, ते त्या शाश्वत पदाला जाऊन मिळतात. ॥ ५ ॥

वर्षाऋतूच्या अखेरीस ज्याप्रमाणें मेघ आकाशास सोडून जातात, त्याप्रमाणें ज्या पुरुषाचे मनाला मोह व अभिमान आपण होऊन सोडून जातात; ८५ निर्धन व निष्ठुर अशा मनुष्यास ज्याप्रमाणें त्याचे आप्त सोडतात, त्याप्रमाणें जे विकारांचें सपाट्यांत सांपडत नाहींत; ८६ केळीला केळीं आल्यावर ती जशी उन्मळून पडते, तशा आत्मस्वरूपलाभाच्या प्रबलतेनें ज्यांच्या क्रिया हळूहळू बंद पडूं लागतात, ८७ वृक्षाला आग लागल्यावर त्यावर बसणारे पक्षी ज्याप्रमाणें तो सोडून जातात, त्याप्रमाणें ज्यांना सर्व विकल्प सोडून जातात; ८८ ज्या भेदबुद्धिरूप पृथ्वीवर सर्वदोषरूप तृणाचे अं-

कूर फुटतात, त्या भेदबुद्धीची ज्याला गोष्ट सुद्धां माहीत नाहीं, ८९ सूर्योदय होण्यावरोबर रात्र जशी आपोआप नाहींशी होते, तसा आत्मस्वरूपाचा लाभ झाल्यावर ज्यांचा देहविषयक अभिमान अज्ञानासह नाहींसा होतो; २९० हें पहा—आयुष्यहीन जीवास ज्याप्रमाणें शरीर अवचित सोडतें. त्याप्रमाणें मोह पाडणारे द्वैत ज्यांना सोडून जातें: ९१ परिसाला जसें लोखंड दुर्मिळ आहे, किंवा सूर्याची व अंधकाराची ज्याप्रमाणें गांठ पडत नाहीं, त्याप्रमाणें दैतबुद्धीचा ज्यांच्यापाशीं सदोदीत तोटा असतो; ९२ अरे, या देहाचा अभिमान धरल्यावर, सुख-दुःखाकाररूपी जें द्वैत (द्वंद्व) दृष्टीस पडतें, तें ज्यांच्यापुढें सुद्धां येत नाहीं, ९३ ज्याप्रमाणें जागें झाल्यावर स्वप्नांत मिळालेलें राज्य अथवा प्राप्त झालेलें मरण यांजपासून हर्ष किंवा शोक होत नाहीं, ज्याप्रमाणें गरुडापुढें सर्प येत नाहीं, त्याप्रमाणें, सुखदुःखरूपी पुण्य व पाप उत्पन्न करणारें जें द्वैत, तें ज्यांना जिंकीत नाहीं; ९५ आणि असद्वस्तुरूपी पाणी टाकून विचारी राजहंस ज्याप्रमाणें सद्वस्तुरूप दुधाचें सेवन करतात; ९६ ज्याप्रमाणें सूर्य पृथ्वीवर पाऊस पाडून तेंच पाणी आपल्या किरणद्वारां आपल्या ठिकाणींच शोषण करून घेतो, ९७ त्याप्रमाणें, आत्मस्वरूपाची भ्रांति पडल्यामुळें जें ब्रह्म चहूंकडे फांकलें असतें, तें ज्ञानदृष्टि झाल्यावर आपल्या स्वरूपांत नेहमीं ऐक्य पावतें. ९८ फार काय सांगावें ! ज्याप्रमाणें गंगेचा ओघ समुद्रास मिळाल्यावर नाहींसा होतो, त्याप्रमाणें आत्मस्वरूपाचा निर्धार करणारा जो विचार, तोही त्या निर्धारांत म्हणजे आत्मस्वरूपांत लीन होतो. ९९ ज्याप्रमाणें आकाशाची सर्वत्र व्याप्ति असल्यामुळें त्याला एका गांवाहून दुसरे गांवास जाणें शक्य नाहीं; त्याप्रमाणें सर्वच आपलें रूप झाल्यामुळें अमुक एका पदार्थाचा अभिलाष आहे, असें त्यास उरत नाहीं. ३०० ज्याप्रमाणें अग्नीच्या डोंगरावर कसलेंही बीं पेरलें असतां उगवत नाहीं, त्याप्रमाणें, ज्याचे मनांत ज्ञानाचा उदय झाला आहे, त्यें कोणतेही विकार उद्भवत नाहींत. १ समुद्रमंथनसमयीं क्षीरसमुद्रांत बुडालेला मंदराचल यांतून काढून बेटावर तो समुद्र स्थिर झाला, त्याप्रमाणें, आत्मप्राप्ति झाल्यामुळें ज्याचे मनांत कामवासना उत्पन्न होत नाहीं; २ ज्याप्रमाणें चंद्र पोडश कलांनीं पूर्ण झाल्यावर कोणतेही काहूनें कमी किंवा नाहीं, त्याप्रमाणें आत्मप्राप्ति झाल्यामुळें ज्याचे मनांत कोणतीच इच्छा उत्पन्न होत नाहीं; ३ अशा निरुपम गोष्टी तुला किती सांगूं ? ज्याप्रमाणें वायूच्या पुढें परिमाणु टिकत नाहीं; त्याप्रमाणें विषयांचें नांवही ज्याला आवडत नाहीं. ४ अशा प्रकारें, हृत लक्षण करणारा जो ज्ञानाग्नि, त्यांत ज्यांनीं सर्व विषय जाळून टाकले आहेत ते पुरुष सुवर्णांत सुवर्ण मिळाल्याप्रमाणें त्या ठिकाणीं प्राप्त होतात. ५ त्या ठिकाणीं म्हणजे कोटें असें म्हणशील तर, ज्या पदाचा कधींही नाश होत नाहीं, अशी जी परमात्मवस्तु तेथें प्राप्त होतात. ६ दृश्यत्वानें पहावें, किंवा ज्ञेयत्वानें जाणावें, किंवा हें अमुक आहे असें म्हणावें, इत्यादि व्यवहार ज्याच्या ठिकाणीं होतात, ती वस्तु ब्रह्म नव्हे, त्याला कोणीही दाखवूं शकत नाहीं. ७

अन्वय—न सूर्यः, न शशांकः, न पावकः (च) यत् (पदं) भासयते, यत् गत्वा न निवर्तन्ते, तत् मम परमं धाम. ॥ ६ ॥

अर्थ—त्या पदाला प्रकाशित करण्यास सूर्य, चंद्र किंवा अग्नि हे समर्थ नाहींत. ज्या पदाला प्राप्त झालेले लोक पुनः परत येत नाहींत, तें माझें परम धाम [उत्तम पद] होय.

परंतु दिव्याच्या मोठ्या उजेडानें अथवा चंद्राच्या प्रकाशानें—फार तर काय ! परंतु ज्या सूर्यापासून सर्व जग प्रकाशित होतें, त्याच्या प्रकाशानें —८ ह्या सर्वांच्या प्रकाशानें जें दृष्टीस पडतें, तेंच काय, परंतु सर्व विश्व परमात्मस्वरूपाच्या अज्ञानांत अज्ञानामुळें दृष्टीस पडतें. ९ जसजसा शिंपीपणाचा लोप होतो, तसतसा रुप्याचा भास वाढतो; किंवा दोरीचा लोप झाल्यावर सापाची प्रतीति येऊं लागते. ३१० त्याप्रमाणें, चंद्रसूर्यादिकांचें जे प्रखर तेज, तें ज्या स्वरूपाच्या अंधकारांत प्रकाशित होतें, ११ अशी जी वस्तु, ती अति ते-

भूतात्मक सारिसी । चंद्रसूर्यांच्या मानसीं । प्रकाशे जे १२ ह्मणौनि चंद्रसूर्य कडवसां । पडती वस्तूच्या प्रकाशा । यालागीं तेज जें तेजसा । तें वस्तूचें आंग १३ आणि जयाच्या प्रकाशीं । जग हारपे चंद्रार्केसीं । सचंद्र नक्षत्रें जैसीं । दिनोदयीं १४ नातरी प्रबोधलिये वेळे । ते स्वप्नींची डिंडीमा मावळे । कां नुरेचि सांजवेळे । मृगतृष्णिका १५ तैसा जिये वस्तूच्या ठायीं । कोण्हीच कां आभासु नाहीं । तें माझें निजधाम पाहीं । पाटाचें गा १६ पुढती जे तेथ गेले । ते न घेतीचि माघौतीं पाउलें । महोदधीं कां मिनले । स्रोत जैसे १७ कां लवणाचीं कुंजरी । सूदलिया लवणसागरीं । होयचि ना माघारी । परती जैसी १८ नाना गेलिया अंतराळा । न येतीचि वन्हिज्वाळा । नाहीं तप्तलोहौनि जळा । निघणें जेविं १९ तेविं मजसीं एकवाट । जे जाले ज्ञानें चोखट । तयां पुनरावृत्तीची वाट । मोडली गा ३२० तेथ प्रज्ञापृथ्वीचा रावो । पार्थु म्हणे जी जी पसावो । परि विनंती एकी देवो । चित्त देतु २१ तरी देवेंसि स्वयें एक होती । मग माघौते जे न येती । ते देवेंसि भिन्न आथी । कीं अभिन्न जी २२ जरि भिन्नचि अनादिसिद्ध । तरी न येती हें असंबद्ध । जे फुलां गेलें षट्पद । ते फुलेंचि होती पां २३ पैं लक्षाहूनि अनारिसे । बाण लक्षीं शिवोनि जैसे । मागुते पडती तैसे । येतीचि ते २४ नातरि तूंचि ते स्वभावें । तरि कोण कोणेंसि मिळावें । आपणयासी आपण रुपावें । शस्त्रें केविं २५ ह्मणौनि तुजसी अभिन्नां जीवां । तुझा संयोगवियोगु देवा । नये बोलों अवयवां । शरीरेंसीं २६ आणि जे सदां वेगळे तुजसीं । तयां मिळणी नाहीं कोणे दिवसीं । मा येती न येती हे कायसी । वायबुद्धि २७ तरि कोण गा ते तूतें । पावोनि न येती माघौते । हे विश्वतोमुखा मातें । बुझावीं जी २८ इये आक्षेपीं अर्जुनाच्या । तो शिरोमणि सर्वज्ञांचा । तोषला बोध शिष्याचा । देखोनियां २९ मग म्हणे गा महामती । मातें पावोनि न येती पुढती । ते भिन्नाभिन्न रिती । आहाती दोनी ३३० जैं विवेकें खोलें पाहिजे । तरि मी तोचि ते सहजें । ना आहाचवाहाच तरि दुजे । ऐसेही गमती ३१ जैसे पाणियावरी वेगळ । तळपतां दिसती कल्लोळ । एन्हवीं तरी निखिळ । पाणीचि तें ३२ कां सुवर्णाहुनि आनें । लेणीं गमती भिन्नें । मग पाहिजे तंव सोनें । अघवेंचि तें ३३ तैसें ज्ञानाचिये दिठी । मजसीं अभिन्नाचि ते किरीटी । येर भिन्नपण तें उठी ।

जस्वी असून, सर्व भूतांना व्यापून चंद्र व सूर्य यांनांही प्रकाश देते. १२ म्हणून, या वस्तूच्या प्रकाशापुढें चंद्र व सूर्य यांच्या तेजाचा कवडसा पडतो, याकरितां, सर्व तेजस्वी वस्तूंस तेज देणारें असें या वस्तूचें (ब्रह्माचें) त्यास साह्य आहे. १३ आणि या वस्तूचा (ज्ञानकालांत) प्रकाश झाला असतां चंद्रसूर्यासह जगाचा लोप होतो. ज्याप्रमाणें सूर्योदय झाल्यावर नक्षत्रांसह चंद्र निस्तेज होतो, १४ किंवा जागें झाल्यावर स्वप्नांत भासलेला सर्व पसारा मावळतो, अथवा संध्याकाल झाल्यावर मृगजल आपोआप नाहींसें होतें, १५ त्याप्रमाणें, ज्या वस्तूचें ठिकाणीं कसलाच भास रहात नाहीं, तें माझें मुख्य स्थान होय. १६ त्या ठिकाणीं जे गेले, ते, ज्याप्रमाणें पाण्याचे ओघ समुद्रास मिळाल्यावर माघारे येत नाहींत, त्याप्रमाणें संसाराकडे माघारे येत नाहींत. १७ किंवा मिठाची तयार केलेली हत्तीण समुद्रांत बुडविल्यावर जशी माघारी येत नाहीं. १८ किंवा आकाशांत गेलेल्या अग्नीच्या ज्वाला जशा खालीं परतून येत नाहींत, किंवा तापलेल्या लोखंडावर टाकलेलें पाणी जसें नाहींसें होतें (माघारीं येत नाहीं.), १९ तसें शुद्धज्ञान झाल्यामुळें जे माझें ऐक्य पावतात, ते पुनर्जन्मापासून मुक्त होतात. ३२० (येथपासून ३४२ ओंवीपर्यंतच्या ओंव्या पुढच्या श्लोकाचें अवतरण म्हणून महाराजांनीं दिल्या आहेत.) भगवंताचें असें बोलणें ऐकून बुद्धिरूप पृथ्वीचा राजा जो अर्जुन, तो म्हणाला, " प्रभो, आपला आज मजवर प्रसाद झाला आहे; परंतु एक माझी विनंती आहे, तिकडे लक्ष द्यावें. २१ तर जे देवांच्या स्वरूपांत जाऊन मिळाल्यावर माघारी येत नाहींत, ते पूर्वी देवांच्या स्वरूपापासून भिन्न होते, किंवा एकरूपच होते ? २२ जर ते अनादिसिद्ध भिन्न असतील, तर ते माघारी येत नाहींत, हें म्हणणें असंभवनीय होय. कारण, असें पहा—भ्रमर फुलांतील मकरंद सेवन करण्यास गेले असतां कधीं फुलेंच होतात काय ? २३ दुसरें असें पहा—लक्ष्याहून वेगळें असे जे बाण, ते सोडल्यावर ज्या प्रदेशीं लक्ष्यास भेदून पुनः खालीं पडतानच. (ऐक्य पावत नाहींत.) त्याप्रमाणें ते परत येतानच. तुमच्या स्वरूपांत मिळाले असतांही माघारे येत नाहींत, हें म्हणणें शोभत नाहीं. २४ नाहीं तर, तुम्हीं तेच ते असें जर वस्तुतः असेल, तर कोणीं कोणास मिळावयाचें ? असें पहा—शस्त्रानें शस्त्राचा (आपला स्वतःचा छेद) होतो काय ? २५ म्हणून, देवा, तुमच्या स्वरूपाशीं ज्यांचें ऐक्य आहे. त्यांना तुमचा संयोग किंवा वियोग होतो, असें कसें म्हणतां येईल ? अवयव आणि शरीर कधीं एकमेकांपासून वेगळीं आहेत. असें म्हणतां येत नाहीं. २६ वरें, जे नेहमीं तुमच्या स्वरूपापासून भिन्न आहेत, ते केव्हांही तुमच्या स्वरूपांत ऐक्य पावावयाचे नाहींत; मग ते माघारी येतात किंवा येत नाहींत, हें व्यर्थ बोलणें तरी कशाला हवें ? २७ तर, श्रीकृष्णा, ज्या तुम्हांला सर्वत्र सुखें आहेत, त्या तुमच्या स्वरूपांत मिळाल्यावर कोण माघारी येत नाहींत, ते मला नीट समजावून सांगा. " २८ अर्जुनाची ही शंका ऐकून आपण सांगितलेलें त्याच्या मनांत पूर्णपणें बिंबलें, असें पाहून सर्वज्ञशिरोमणि भगवान् श्रीकृष्ण यांस संतोष वाटला. २९ मग भगवान् म्हणतातः—हे महामते अर्जुना, मला प्राप्त झाल्यानंतर जीव माघारे येत नाहींत, तेव्हां जीव माझ्याशीं भिन्न आहेत कीं अभिन्न आहेत, असा तुझा प्रश्न आहे. त्याचें उत्तर असें कीं, ते माझ्या स्वरूपाशीं अभिन्नही म्हणतां येतील व भिन्नही म्हणतां येतील. ३३० जर विचारदृष्टीनें पूर्ण लक्ष देऊन पाहिलें, तर माझे व त्यांचे स्वरूपांत स्वभावतःच ऐक्य असतें; आणि वरवर विचार करून पाहिलें, तर ते माझ्यापासून भिन्न आहेत असेंही दिसतें. ३१ ज्याप्रमाणें पाणी हाललें असतां त्यावर येणाऱ्या लाटा पाण्यापासून वेगळ्या दिसतात, बाकी वस्तुतः तें निवळ पाणीच होय; ३२ किंवा सोन्याचे दागिने सोन्याहून भिन्न दिसतात; पण मग विचारपूर्वक पाहिलें असतां तें सर्व सोनेंच आहे; ३३ त्याप्रमाणें, हे किरीटी, ज्ञानदृष्टीनें पाहिलें अ-

आज्ञानास्तव ३४ आणि साचोकारेनि वस्तुविचारें। कैंचें मज एकासि दुसरें। जें भिन्नाभिन्न व्यवहारें। उमसिजेल ३५ आघवेंचि आकाश सूनि पोटीं। बिंबचि जैं आते खोटी। तैं प्रतिबिंब कें उठी। कें रश्मि शिरे ३६ कां कल्पांतींचिया पाणिया। काय वोत भरिती धनंजया। म्हणौनि कैंचे अंश अविक्रिया। एका मज ३७ परि ओघाचेनि मेळें। पाणी उजू परि वांकुडें जालें। रवी दुजेपण आलें। तोयबागें ३८ व्योम चौफळें कीं वाटोळें। हें ऐसें कायिसयाही मिळे। परि घटमठीं वेंटाळें। तैसेंही आथी ३९ हां गा निद्रेचेनि आधारें। काय एकलेनि जग न भरे। स्वप्नींचेनि जैं अवतरे। रायपणें ३४० कां मिनलेनि किडाळें। वानिभेदासि ये सोळें। तैसा स्वमायें वेंटाळें। शुद्ध जैं मी ४१ तैं अज्ञान एक रूढे। तेणें कोहंविकल्पाचें मांडे। मग विवरूनि कीजे फुडें। देहो मी ऐसें ४२

ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः। मनःषष्ठानीन्द्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति ॥ ७ ॥

ऐसें शरीराचि येवढें। जैं आत्मज्ञान वेगळें पडे। तैं माझा अंशु आवडे। थोडेपणें ४३ समुद्र कां वायुवशें। तरंगाकार उल्हसे। तो समुद्रांशु ऐसा दिसे। सानिवा जेविं ४४ तेविं जडातें जीववितां। देह अहंता उपजविता। मी जीव गमें पंडुसुता। जीवलोकीं ४५ पैं जीवाचिया बोधा। गोचरु जो हा धांदा। तो जीवलोक शब्दा। अभिप्रायो ४६ अगा उपजणें निमणें। हें साचचि जें कां मानणें। तो जीवलोकु मी म्हणें। संसारु हन४७एवंविध जीवलोकीं। तूं मातें ऐसा अवलोकीं। जैसा चंद्रु कां उदकीं। उदकातीत ४८ पैं काश्मीराचा रवा। कुंकुमावरी पांडवा। आणिका गमे लोहिवा। तो तरी नव्हे ४९ तैसें अनादिपण न मोडे। माझें अक्रियत्व न खंडे। परि कर्ता भोक्ता ऐसें आवडे। ते जाण गा भ्रांती ३५० किंबहुना आत्मा चोखटु। होऊनि प्रकृतीसी एकवटु। बांधे प्रकृतिधर्माचा पाटु। आपणपयां ५१ पैं मनादि साही इंद्रियें। श्रोत्रादि प्रकृतिकार्यें। तियें माझीं म्हणौनि होये। व्यापारारूढ ५२ जैसें स्वप्नीं परिव्राजें। आपणपयां आपण कुटुंब होईजे। मग तयाचेनि धांविजे। मोहें सैरा ५३ तैसा आपलिया विस्मृती। आत्मा आपणचि प्रकृती-। सारिखा गमोनि पुढती। तियेसीचि भजे ५४ मनाच्या ठायीं वळघे। श्रवणाच्या द्वारें निघे। मग शब्दाचिया रिघे। रानामाजीं ५५

सतां ते मद्रूपच आहेत; एऱ्हवीं त्यांच्यांत व माझ्यांत जो भिन्नपणा वाटतो, तो अज्ञानामुळें; ३४ आणि वास्तविक परमात्मदृष्टीनें विचार केला तर भिन्नाभिन्न प्रश्न उद्भवेल इतकें द्वैत माझ्या ठिकाणीं कोठून येणार? सूर्यबिंबानें सर्व आकाश व्यापून पोटांत घातल्यावर त्याचें प्रतिबिंब कोठें दिसणार? व किरणें तरी कशावर पडतील? ३६ किंवा, अर्जुना, कल्पांतींच्या पाण्यानें सर्वच जलमय करून टाकल्यावर खाड्या भरल्या जातात असा व्यवहार होतो का? म्हणून अविक्रिय एकरस जो मी, त्या मला अंश कोठून असणार? व ते भिन्न आहेत कीं अभिन्न आहेत हा प्रश्न तरी कसा संभवणार? म्हणून जीव माझ्याशीं अभिन्नच आहेत. ३७ परंतु भिन्न दिसतात याचें कारण, ओघाच्या अनुरोधानें जसें पाणी उजू असूनही वांकडें होतें, किंवा पाण्याच्या उपाधीनें जसा सूर्याच्या बिंबास त्याच्या प्रतिबिंबानें दुजेपणा येतो; ३८ आकाश हें चौकोनी किंवा वाटोळें आहे, हें कोणत्याही रीतीनें ठरवितां येणार नाहीं, परंतु तेंच घट व मठ यांच्या उपाधीनें तसेंही दिसतें. ३९ अरे हें पहा— निद्रेच्या उपाधीनें स्वप्नांत ज्या वेळीं मनुष्य राज्यपदावर आरूढ होतो, त्या वेळीं राजा, प्रजा इत्यादि सर्व जग त्या एकट्यानेंच व्याप्त होत नाहीं काय? ३४० किंवा सोळाच्या दराच्या उत्तम सोन्यांत किडाळ मिळविल्यावर तें कसास कमी उतरतें, त्याप्रमाणें, शुद्धस्वरूप असा मी जेव्हां मायेनें परिवेष्टित होतों, तेव्हां माझे ठिकाणीं मायेच्या उपाधीनें जीव व ईश्वर हे भाव उत्पन्न होतात. ४१ त्या वेळीं एक अज्ञानच चहूंकडे रूढ होतें, आणि त्यायोगानें मी कोण, असा विकल्प उत्पन्न होऊन देहच मी आहें, असा विचारांतींही निश्चय होतो. ४२

अन्वय—जीवलोके मम एव सनातनः जीवभूतः अंशः (अस्तिसः) प्रकृतिस्थानि मनःषष्ठानि इंद्रियाणी कर्षति. ॥७

अर्थ—मनुष्यलोकीं माझाच सनातन असा जीवरूप अंश आहे. तो प्रकृतीमध्यें असलेलीं पंचज्ञानेंद्रियें व मन यांना आकर्षित करितो. ॥ ७ ॥

अशाप्रकारें आपल्या शरीरांत व्याप्त असणाऱ्या परमात्म्याच्या ठिकाणीं शरीरात्मबुद्धीनें आत्मा आहे, असा निश्चय होतें तेव्हां जीव माझा अंश आहे, असें भासतें. ४३ वाऱ्यामुळें समुद्रावर लाटा उत्पन्न होतात, त्या जरी समुद्राचा एक लहानसा अंश असें दिसतें, ४४ त्याप्रमाणें, हे पांडुसुता, देहाचा अहंकार उत्पन्न झाल्यावर, त्या जड देहाचा जो चालक, तो या मृत्युलोकांत जीवरूपी मीच होय. ४५ त्याच जीवाच्या दृष्टीनें, जो हा अखंड व्यापार चालतो, त्याला जीवलोक सृष्टि असें म्हणतात. ४६ अरे, ज्या ठिकाणीं जन्म व मृत्यु हे खरे म्हणून मानले जातात, त्या ठिकाणाला मी जीवलोक किंवा संसार असें म्हणतों. ४७ अशा प्रकारच्या या जीवलोकांत, ज्याप्रमाणें चंद्र हा पाण्यापासून वेगळा असतांही पाण्यांत प्रतिबिंब पडल्यावर त्यांत आहे असा भासतो, त्याप्रमाणें मी आहें असें समज. ४८ अर्जुना, स्फटिकाचा मणि कुंकुमावर ठेवला असतां तो पहाणाराला तांबडा दिसतो, तथापि तो कांहीं तांबडा नव्हे; ४९ त्याप्रमाणें, माझें अनादिपण मोडत नाहीं, आणि अक्रियत्वही भंगत नाहीं; तथापि मला कर्ता, भोक्ता असें जें म्हणतात, ती केवल त्यांची भ्रांती आहे, असें समज. ३५० किंबहुना, शुद्ध असा हा आत्मा प्रकृतीशीं ऐक्य पावून, प्रकृतीचे उपाधीनें तिच्या धर्मओघांत आपल्याला बांधून घेतो. ५१ मग मन व श्रोत्रादि पांच इंद्रियें हीं माझीं आहेत असें म्हणून, व्यापार करावयास लागतो. ५२ ज्याप्रमाणें स्वप्नांत संन्यासानें आपणच आपलें कुटुंब बनून संसार थाटावा, व त्याच्या मोहानें सैरावैरा धांवावें, संसारांतील सुखदुःख भोगावें) ५३ त्याप्रमाणें आपली विस्मृति झाल्यावर, आत्मा हा आपलें स्वरूपही तिजसारखेंच आहे असें मानून, तिच्या अनुरोधानें तिचींच कार्यें करतो; ५४ मनरूपी रथावर बसून श्रवणाच्या द्वारानें बाहेर निघून शब्दरूपी रानांत संचार करतो; ५५ तोच प्रकृतीचा लगाम हातांत धरून

तोचि प्रकृतीचा वागोरा । करी त्वचेचिया मोहरा । आणि स्पर्शाचिया घोरा। वना जाय ५६ कोणे एके अवसरीं । रिघोनि नेत्राच्या द्वारीं । मग रूपाच्या डोंगरीं । सैरा हिंडे ५७ कां रसनेचिया वाटा । निघोनि गा सुभटा । रसाचा दरकुटा । भरोंचि लागे ५८ नातरि येणेंचि घ्राणें । जैं देहांशु करी निघणें । मग गंधाचीं दारुणें । आडवें लंघी ५९ ऐसेनि देहेंद्रियनायकें । धरूनि मन जवळिकें । भोगिजती शब्दादिकें । विषयभरणें ३६०

शरीरं यदवाप्नोति यच्चाप्युत्क्रामतीश्वरः । गृहीत्वैतानि संयाति वायुर्गंधानिवाशयात् ॥ ८ ॥

परि कर्ता भोक्ता ऐसें । हें जीवाचें तैंचि दिसे । जैं शरीरीं कां पैसे । ये-काधिये ६१ जैसा आथिला आणि विलासिया । तैंचि वोळखों ये धनंजया । जैं राजसेव्या ठाया । वस्तीसि ये ६२ तैसा अहंकर्तृत्वाचा वाढु । कां विष-येंद्रियांचा धुमाडु । हा जाणिजे तैं निवाडु । जैं देह पाविजे ६३ अथवा श-रीरातें सांडी । तऱ्ही इंद्रियांची तांडी । हे आपणपयांसवें काढी । घेऊनि जाय ६४ जैसा अपमानिला अतिथी । ने सुकृताची संपत्ति । कां साइखडे-याची गति । सूत्रतंतू ६५ ना ना मावळतेनि तपनें । नेइजती लोकांचीं द-र्शनें । हें असो द्रुती पवनें । नेईजे जैसीं ६६ तेविं मनःषष्ठां ययां । इंद्रियांतें धनंजया । देहराजु ने देहा- । पासुनि गेला ६७

श्रोत्रं चक्षुः स्पर्शनं च रसनं घ्राणमेव च । अधिष्ठाय मनश्चायं विषयानुपसेवते ॥९॥

मग येथ अथवा स्वर्गीं । जेथ जे देह आपंगी । तेथ तैसेंचि पुढती पांगी। मनादिक ६८ जैसा मालवलिया दिवा । प्रभेसि जाय पांडवा । मग उजळिजे तेथ तेधवां । तैसाचि फांके ६९ तरि ऐसैसिया राहाटी । अविवेकियांचे दिठी। येतुलें हें किरीटी । गमेचि गा ३७० जे आत्मा देहासि आला। आणि विषयो येणेंचि भोगिला। अथवा देहोनि गेला। हें साचाचि मानिती ७१ एऱ्हवीं येणें आणि जाणें । कां करणें हन भोगणें । हें प्रकृतीचें तेणें । मानियेलें ७२

उत्क्रामंतं स्थितं वापि भुंजानं वा गुणान्वितम् । विमूढा नानुपश्यंति पश्यंति ज्ञानचक्षुषः १०
यतंतो योगिनश्चैनं पश्यंत्यात्मन्यवस्थितम् । यतंतोऽप्यकृतात्मानो नैनं पश्यंत्यचेतसः ११

परि देहाचें मोटकें उभें । आणि चेतना तेथ उपलभे । तिये चळवळेचेनि लोभें । आला म्हणती ७३ तैसेंचि तयां संगती । इंद्रियें आपलाला अर्थीं व-र्तती । तया नांव सुभद्रापती । भोगणें जया ७४ पाठीं भोगक्षीण आपैसें। देह गेलिया तें न दिसे । तेथें गेला गेला ऐसें । बोभाती गा ७५पैं रुखु डोलतु देखावा।

त्वचेच्या द्वारानें स्पर्शरूपी घोर वनांत जातो; ५६ एकाद्या वेळेस नेत्राच्या द्वारानें बाहेर पडून रूपविषयाच्या डोंगरावर स्वच्छंदानें हिंडतो; ५७ किंवा हे सुभटा, जिव्हेच्या द्वारानें बाहेर पडून रसाच्या गुहेंत हिंडतो; ५८ किंवा, माझा अंश जो हा जीव, तो नाकाच्या द्वारानें बाहेर पडून सुगंधाच्या अरण्यांत हिंडतो. ५९ याप्रमाणें, देह व इंद्रियें यांचा नायक जें मन, तें धरून, पंचेंद्रियांचे विषय जे शब्दादिक, त्यांचा उपभोग घेतो. ३६०

अन्वय–यत् (यदा) ईश्वरः शरीरं अवाप्नोति अपि च यत् (यस्मात्) (तत्) उत्क्रामति; (तत्–तदा) वायुः आशयात् गंधान् इव एतानि गृहीत्वा संयाति. ॥ ८ ॥

अर्थ–[केव्हां ? तर] जेव्हां शरीरस्वामी शरीर प्राप्त करून घेतो आणि मग तें सोडून जातो, तेव्हां तो, वायु जसा पुष्पादिकांपासून सुगंध घेऊन जातो तसा, मन व इंद्रियें आपल्याबरोबर घेऊन जातो. ॥ ८ ॥

पण जीवाचें कर्तृत्व किंवा भोक्तृत्व तेव्हांच दृष्टीस पडतें, कीं, जेव्हां तो एकाद्या शरीरांत प्रवेश करितो. ६१ ज्याप्रमाणें एकाद्या संपन्न व विलासी पुरुषाचें ऐश्वर्य तेव्हांच दृष्टीस पडतें, कीं जेव्हां तो एकाद्या राजवाड्यांत रहावयास येतो, ६२ त्याप्रमाणें ज्या वेळेस जीव देह धारण करतो, त्या वेसळेच जीवाच्या अहंकाराची वाढ किंवा विषयेंद्रियांची धामधूम दिसण्यांत येते. ६३ अथवा शरीर जर टाकलें, तर जीव आपल्याबरोबर नेहमीं असणारें मन व इंद्रियांचा तांडा ही आपली संपत्ति घेऊन जातो. ६४ ज्याप्रमाणें अतिथि भोजनास आला असतां त्याचा अपमान करून त्यास माघारा लावल्यावर तो यजमानाचें पुण्य घेऊन जातो, किंवा दोऱ्या काढून घेतल्यावर कळसूत्री बाहुल्यांची गति नाहींशी होते; ६५ अथवा, सूर्य मावळला असतां तो लोकांची दृष्टि आपल्या बरोबर घेऊन जातो. फार काय सांगावें ! वारा ज्याप्रमाणें आपल्या बरोबर पुष्पांतील सुवास घेऊन जातो, ६६ त्याप्रमाणें, हें धनंजया जीव देहाला सोडून गेला म्हणजे आपल्याबरोबर पांच ज्ञानेंद्रियें व सहावें मन यांना घेऊन जातो. ६७

अन्वय–अयं (जीवः) श्रोत्रं, चक्षुः, स्पर्शनं च, रसनं, घ्राणं, मनः एव च अधिष्ठाय विषयान् उपसेवते. ॥ ९ ॥

अर्थ–हा जीव, कर्ण, नेत्र, त्वचा, जिव्हा, घ्राण व तसेंच मन यांचा आश्रय करून विषयांचा उपभोग घेतो.

मग एथें अथवा स्वर्गलोकांत–ज्या ज्या ठिकाणीं जो जो देह धारण करील, त्या त्या ठिकाणीं मनादिक सहा इंद्रियांचा पुनः पसारा घालतो. ६८ अर्जुना, दिवा मालवल्यावर जसा आपल्या तेजासह नाहींसा होतो, तसाच तो फिरून लावल्यावर आपल्या तेजासह फांकतो; ६९ तर अर्जुना, अशा प्रकारच्या व्यवहारांत आज्ञान्याचे दृष्टीला पुढें सांगितल्याप्रमाणें वाटूं लागतें. ३७० आत्माच या देहामध्यें आला, आणि यानेंच विषयांचा उपभोग घेतला, अथवा तोच हा देह सोडून गेला, हेंच खरें असें मानितात. ७१ एन्हवीं जन्म घेणें अथवा मरणें, किंवा क्रिया करणें अथवा विषयांचा उपभोग घेणें, हे वास्तविक प्रकृतीचे धर्म असून त्यांनीं हें आत्म्याचे मानिले आहेत. ७२

अन्वय–उत्क्रामन्तं, स्थितं वा, भुंजानं गुणान्वितं वा अपि (तं) विमूढाः न अनुपश्यन्ति; ज्ञानचक्षुषः पश्यन्ति. ॥ १० ॥ यतन्तः योगिनः आत्मनि अवस्थितं एनं पश्यन्ति; अचेतसः अकृतात्मानः च यतन्तः अपि एनं न पश्यन्ति. ॥ ११ ॥

अर्थ–देहापासून वियुक्त होणारा किंवा देहामध्येंच असणारा, शब्दादि विषयांचा उपभोग घेणारा अथवा सुखदुःखादिकांनीं युक्त असणारा जो जीव, त्याचें सत्स्वरूप मूढजनांना दिसत नाहीं; ज्यांना ज्ञानचक्षु आहेत त्यांनाच दिसतें. ॥ १० ॥ यत्न करणारे योगी आपले ठिकाणीं स्थित असलेल्या जीवाला [आत्म्याला] पाहतात; आणि जे शास्त्रसंस्काररहित व अविचारी आहेत, त्यांना यत्न करूनही जीवाचें स्वरूप दृष्टीस पडत नाहीं.

परंतु देह उत्पन्न होऊन त्यांत चलनवलन दिसलें कीं, त्यावरून आत्मा आला असें म्हणतात. ७३ त्याचप्रमाणें, हे सुभद्रापते, त्याच्या संगतीनें इंद्रियें आपआपले विषय सेवीत असतां जीव उपभोग घेतो, असें म्हणतात. ७४ अरे, शरीर क्षीण होऊन भोग घेणें आपोआप राहिल्यावर देह पडून नाहींसा झाला म्हणजे जीव गेला असा बोभाट करतात. ७५ हे पांडवा, झाड हालत असलें म्हणजे-

तरी वारा वाजतु मानवा । रुखु नसे तेथें पांडवा । नाहीं तो गा ७६ कां आरसा समोर ठेविजे । आणि आपणपें तेथ देखिजे । तरि तेधवांचि जालें मानिजे । काय आधीं नाहीं ७७ कां परता केलिया आरसा । लोपु जाला तया आभासा । तरी आपणपें नाहीं ऐसा । निश्चयो करावा ७८ शब्द तरि आकाशाचा । परि कपाळीं पिटे मेघाचा । कां चंद्रीं वेगु अभ्राचा । आरोपिजे ७९ तैसें होइजे जाइजे देहें । तें आत्मसत्ते अविक्रिये । निष्टंकिती गा मोहें । आंधळे ते ३८० येथ आत्मा आत्मयाच्या ठायीं । देखिजे देहींचा धर्मु देहीं । ऐसे देखणें ते पाहीं । आन आहाती ८१ ज्ञानें कां जयाचे डोळे । देखोनि न राहाती देहींचे खोळे । सूर्यरश्मी आणियाळे । ग्रीष्मीं जैसे ८२ तैसी विवेकाचेनि पैसें । जयांची स्फूर्ती स्वरूपीं बैसे । ते ज्ञानिये देखती ऐसें । आत्मयातें ८३ जैसें तारांगणीं भरलें । गगन समुद्रीं बिंबलें । परि तें तुटोनि नाहीं पडिलें । ऐसें निवडे ८४ गगन गगनींचि आहे । हें आभासे तें वाये । तैसा आत्मा देखती देहें । गंवसिलाही ८५ खळाळाच्या लगबगी । फेडूनि खळळाच्या भागीं । देखिजे चंद्रिका कां उगी । चंद्रीं जेवीं ८६ कां नाडरचि भरे शोषे । सूर्यु तो जैसा तैसाचि असे । देह होतां जातां तैसें । देखती मातें ८७ घट मठु घडले । तेचि पाठीं मोडले । परि आकाश तें संचलें । असतचि असे ८८ तैसें अखंडे आत्मसत्ते । अज्ञानदृष्टि कल्पितें । हें देहचि होतें जातें । जाणती फुडें ८९ चैतन्य चढे ना वोहटे । चेष्टवी ना चेष्टे । ऐसें आत्मज्ञानें चोखटें । जाणती ते ३९० आणि ज्ञानही आपैतें होईल । प्रज्ञा परमाणुही उगाणा घेइल । सकळ शास्त्रांचें येईल । सर्वस्व हाता ९१ परी ते व्युत्पत्ती ऐसी । जरी विरक्ती न रिगे मानसीं । तरी सर्वात्मका मजसीं । नव्हेचि भेटी ९२ पैं तोंड भरो कां विचारा । आणि अंतःकरणीं विषयांसी थारा । तरी नातुडें धनुर्धरा । त्रिशुद्धी मी ९३ हां गा वोसणतयाच्या ग्रंथीं । काइ तुटती संसारगुंती । कीं परिवसिलिया पोथी । वाचिली होय ९४ ना ना बांधोनियां डोळे । घ्राणीं लाविजती मुक्ताफळें । तरी तयांचें काय कळे । मोल मान ९५ तैसा चित्तीं अहंते ठावो । आणि जिभे सकळशास्त्रांचा सरावो । ऐसेनि कोडी एक जन्म जावो । परि न पविजे माते ९६ जो एक मी कां समस्तीं । व्यापकु असें भूतजातीं । ऐक तिये व्याप्ती । रूप करूं ९७

च वारा वाहतो आहे असें समजावें, आणि ज्या ठिकाणीं वृक्षच नाहीं, त्या ठिकाणीं वारा नुळींच नाहीं, असें समजावें का ? ७६ किंवा आरसा समोर ठेवून आपलें रूप त्यांत दिसेल, तेव्हांच आपण आहोंत, आणि त्याच्या आधीं नव्हतो का ? ७७ अथवा तो आरसा बाजूस केल्यावर आपल्या रूपाचा लोप झाला, ह्मणून आपण या जगांतून नाहींसें झालों असा निश्चय करावा का ? तर, होणें जाणें हें आरशांतल्या प्रतिबिंबाचें आहे, आपलें नाहीं. ७८ आकाशांत होणारा गडगडाट हा जरी खरोखरी आकाशापासूनच होतो, तरी तो मेघांपासून होतो, असा लोक त्याच्यावर आरोप करतात; अथवा ढग वेगानें इकडून तिकडे जाऊं लागले, ह्मणजे त्यांतून दिसणारा चंद्र जरी स्थिर आहे, तरी तोच वेगानें धांवतो आहे, असा लोक आरोप करतात; ७९ त्याप्रमाणें, मोहानें अंधळे झालेले ते लोक, देह उत्पन्न होतो किंवा नाहींसा होतो, ह्मणजे अविक्रय असा आत्माच उत्पन्न होतो, किंवा नाहींसा होतो, असा निश्चय करतात. ३८० या व्यवहारांत आत्मा आत्मपणानें असून, कर्तृत्व भोक्तृत्व धर्म देहाचेच आहेत, असें पहाणारे विचारवान् निराळे आहेत. ८१ देह हा जीवाची राहण्याची पिशवी आहे, असें ज्ञानाच्या प्रकाशानें पाहून, ज्यांचे डोळे त्यांत गुंतत नाहींत; ज्याप्रमाणें ग्रीष्म ऋतूंत पुष्कळ ढग आले तरी त्यांतून सूर्याचे किरण बाहेर आल्याशिवाय रहात नाहींत, ८२ त्याप्रमाणें, ज्ञानाच्या प्रभेनें ज्यांची स्फूर्ति स्वरूपाच्या ठिकाणापर्यंत पोहोंचली आहे, ते ज्ञानी, आत्मा हा अकर्ता आहे, असें मानतात. ८३ ज्याप्रमाणें, नक्षत्रांनीं भरलेलें आकाश प्रतिबिंब पडल्यावर समुद्रांत दिसलें, ह्मणून तें वरून गळून खालीं पडलें नाहीं, हें खचीत आहे. ८४ आकाश आकाशाचे जागीं आहे; व जें समुद्रांत दिसतें, तें प्रतिबिंब खोटें आहे; त्याप्रमाणें, आत्मा देहांत कर्ताभोक्ता दिसला, तरी अकर्तृत्व रूपानेंच आहे. ८५ खळाळाची लगबग खळाळाच्या ठिकाणींच ठेवून त्यासंबंधानें चंद्राच्या ठिकाणीं चांचल्य दिसलें, तरी चंद्र जसा स्वस्थ असतो, ८६ किंवा डबक्यांत पाणी सांचल्यावर त्यांत सूर्य दिसतो, व तेंच पाणी अडवून धरलें तरी दिसत नाहीं; परंतु सूर्य पाहूं गेलें असतां असलें ठिकाणींच असतो; त्याप्रमाणें. देह उत्पन्न झाल्यावर व नाहींसा झाल्यावर मी उत्पन्न होत नाहीं, व मरतही नाहीं, मी अविनाशच आहे, अशा दृष्टीनें जे सदा राहतात, ८७ मातीचें घट अथवा मठ तयार करून पुनः जरी मोडून टाकले, तरी त्या घटमठांत दिसणारें आकाश, हें जसेंच्या तसेंच कायम असतें; ८८ त्याप्रमाणें, अखंड जी आत्मसत्ता, त्या सत्तेच्या आधारावर, अज्ञान दृष्टीनें कल्पित देह होतात व जातात, असें स्पष्ट समजतात. ८९ आत्मा हा वाढत नाहीं व ओहोटही पावत नाहीं, चेष्टा करवीत नाहीं व करीतही नाहीं, हें ज्यांना यथार्थ आत्मज्ञान झालें आहे, तेच जाणतात; ३९० आणि ज्ञान प्राप्त होईल, बुद्धि परमाणूंचाही झाडा घेईल व तो सकल शास्त्रांत निपुण होईल; ९१ परंतु इतका शास्त्रसंपन्न होऊनही जर त्या मनुष्याच्या मनांत वैराग्याचा लेश नसला, तर सर्व व्यापक असा जो मी, त्या माझी भेट त्याला होणार नाहीं. ९२ त्याचप्रमाणें, सर्व शास्त्रें जरी मुखोद्गत असलीं, आणि अंतःकरणांत जर विषयांचें चिंतन असलें, तर अर्जुना, खचीत खचीत त्याला माझी प्राप्ती व्हावयाची नाहीं ! ९३ अरे, असें पहा—स्वप्नांत सर्व ग्रंथ जरी मुखोद्गत झाले, तरी त्या योगानें संसारांतून मुक्त होतां येईल, का ? किंवा घरांत असलेले वडिलोपार्जित ग्रंथ रक्षण करून ठेवल्यानें ते वाचले असें ह्मणतां येईल का ? ९४ अथवा डोळे वांधून मोतीं जर नाकास लावलीं, तर त्यांचें पाणी व किंमत कळेल का ? ९५ त्याचप्रमाणें चित्तांत अभिमान बाळगून तोंडानें सर्व शास्त्रें जरी पाठ म्हटलीं, आणि असे कोट्यवधि जन्म गेले, तरी त्यास माझी प्राप्ती होणार नाहीं. ९६ जो मी एकच असून प्राणिमात्रांत व्यापून राहिलों आहे, त्या माझी व्याप्ति कशी आहे, तें तुला स्पष्ट करून सांगतों, ऐक. ९७

यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम् । यच्चंद्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम् ॥१२॥

तरी सूर्यासकट आघवी । हे विश्वरचना जे दावी । ते दीप्ति माझी जाणावी । आद्यंतीं आहे ९८ जल शोषूनि गेलिया सविता । ओलांशु पुरवीतसे जे माधौता । ते चंद्रीं पंडुसुता । ज्योत्स्ना माझी ९९ आणि दहनपाचनसिद्धी। करीतसे जे निरवधी । ते हुताशीं तेजोवृद्धी । माझीचि गा ४००

गामाविश्य च भूतानि धारयाम्यहमोजसा । पुष्णामि चौषधीः सर्वाः सोमोभूत्वा रसात्मकः १३

मी रिगालों असें भूतळीं । म्हणौनि समुद्र महाजळीं । हे पांसूची ढेंपुळी । विरोचिना १ आणि भूतेंही चराचरें । हे धरितसे जिये अपारें । तियें मीचि धरी धरे । रिगोनियां २ गगनीं मी पंडुसुता । चंद्राचेनि मिसें अमृता । भरला जालों चालता । सरोवरु ३ तेथूनि फांकती रश्मिकर । ते पाट पेलूनि अपार । सर्वौषधींचे आगर । भरित असें मी ४ ऐसेनि सस्यादिकां सकळां । करी धान्यजाती सुकाळा । दें अन्नद्वारा जिव्हाळा । भूतजातां ५ आणि निपजविलें अन्न । तरि तैसें कैंचें दीपन । जेणें जिरूनि समाधान । भोगिती जीव ६

अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः । प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधं १४

म्हणौनि प्राणिजाताच्या घटीं । करूनि कंदावरी आगिठी । दीप्त जठरींही किरीटी । मीचि जालों ७ प्राणापानाच्या जोडभातीं । फुंकफुंकोनियां अहोराती । आटीतसें नेणों किती । उदरामाजीं ८ शुष्कें अथवा स्निग्धें । सुपक्वें कां विदग्धें । एवं मीचि गा चतुर्विधें । अन्नें पचीं ९ एवं मीचि आघवें जन । जनानिरवितें मीचि जीवन । जीवनीं मुख्य साधन । वन्हिही मीचि ४१० आतां ऐसियाहीवरी काई । सांगों व्याप्तीची नवाई । येथ दुजें नाहींचि घेईं । सर्वत्र मी गा ११ तरि कैसेंनि पां वेखें । सदा सुखियें एकें । एकें तियें बहुदुःखें । क्रांत भूतें १२ जैसी सगळिये पाटणीं । एकेचि दीपें दिवेलावणी । जालिया कां न देखणी । उरलीं एकें १३ ऐसी हन उखिविखी । करित आहासी मानसीं कीं । तरि परिस तेही निकी । शंका फेडूं १४ पैं आघवा मीचि असे । येथ नाहीं कीर अनारिसें । परि प्राणियांचिया उल्हासें । बुद्धी ऐसा १५ जैसें एकचि आकाशध्वनी । वाद्यविशेषीं आनानीं । वाजावें पडे भिन्नीं । नादांतरीं १६ कां लोकचेष्टीत वेगळाला । जो हा एकुचि भानु उदैला । तो आनानी परी गेला । उपयोगासी १७ ना ना बीजधर्मानुरूप । झाडीं उपजविलें आप।

अन्वय–यत् आदित्यगतं तेजः अखिलं जगत् भासयते, यत् च चद्रमसि यत् च अग्नौ (स्थितं अस्ति), तत् मामकं तेजः विद्धि. ॥ १२ ॥

अर्थ–जें सूर्याच्या ठिकाणीं असलेलें तेज सर्व जगाला प्रकाशित करितें, आणि जें अग्नि व चंद्र यांचे ठिकाणीं आहे, तें तेज माझें आहे, असें समज. ॥ १२ ॥

तर ज्या सूर्याच्या तेजानें सर्व विश्वरचना दृष्टीस पडते, तें तेज सूर्यासकट माझें आहे, असें जाण. ९८ हे पांडुसुता, सूर्याच्या तेजानें पाणी शोषण करून घेतल्यावर पुनः पृथ्वीस जो ओलावा येतो, तो आणणारी जी चंद्राचे ठिकाणची प्रभा, ती माझी होय. ९९ आणि दहन करणें किंवा पाचन करणें, ही जी अग्नीचे ठिकाणीं असलेली अमर्याद तेजोवृद्धि, ती माझीच आहे. ४००

अन्वय–अहं च गाम् आविश्य ओजसा भूतानि धारयामि रसात्मकः सोमः भूत्वा च सर्वाः औषधीः पुष्णामि, ॥ १३ ॥

अर्थ–आणि मी या पृथ्वीमध्यें प्रवेश करून आपल्या सामर्थ्यानें सर्व भूतें धारण करितों; व रसात्मक चंद्र होऊन सर्व औषधींचें पोषण करितों. ॥ १३ ॥

मी पृथ्वीमध्यें शिरून तिला आधारभूत झालों आहे, म्हणूनच, ही जरी रजःकणांची बनलेली मोटी ढेप आहे, तरी समुद्राच्या अपार पाण्यांत असूनही विरघळून जात नाहीं; १ आणि ही आपल्या पृष्ठभागावर अपरिमित चराचर भूतें धारण करते, तीं भूतेंही मीच तिच्यामध्यें शिरून धारण करतों. २ हे पांडुसुता, मी आकाशांत चंद्राच्या रूपानें जणूं काय अमृताचें चालतें सरोवरच झालों आहें, ३ आणि तेथून चंद्राच्या किरणरूपी ओघानें सर्व वनस्पतींचें पोषणही मीच करतों. ४ अशा प्रकारें सर्व धान्यादिकांचें पोषण करून व नानाप्रकारच्या धान्याची समृद्धि करून अन्नद्वारां प्राणिमात्राचें रक्षण मीच करतों. ५ आणि अन्न जरी उत्पन्न केलें तरी प्राणिमात्रास तें असें कसें पचेल, कीं ज्याच्या योगानें जिवास समाधान होईल. ६

अन्वय–अहं प्राणिनां देहं आश्रितः प्राणापानसमायुक्तः वैश्वानरः भूत्वा चतुर्विधं अन्नं पचामि. ॥ १४ ॥

अर्थ–मी प्राण्यांच्या देहांमध्यें शिरून आणि प्राण, अपान इत्यादि वायूंत मिसळून, जठराग्नि होऊन [भक्ष्य, भोज्य, लेह्य व चोष्य अशा] चतुर्विध अन्नाचें पचन करितों. ॥ १४ ॥

म्हणून अर्जुना प्राणिमात्राच्या शरीरांत नाभिकंदावर शेगडी पेटवून जठरामध्यें मीच प्रदीप्त झालों ! ७ प्राण व अपान या वायूंच्या जोडभात्याच्या वाऱ्यानें रात्रंदिवस तो जठराग्नि पेटून या उदरांत किती अन्नाचा फन्ना करतो याचा पत्ता नाहीं ! ८ कोरडें, स्निग्ध, शिजलेलें व कच्चें अशा चतुर्विध अन्नाचे पचनही मीच करतों. ९ अशा प्रकारें सर्व जग मी, जगाचा निर्वाह ज्यावर होतो, तें धान्य मी, व जीवनाचें मुख्य साधन जो जठराग्नि, तोही मीच आहें. ४१० आतां यापेक्षां माझ्या व्यापकणाचें नवल तुला काय सांगूं ! तर तूं हें पक्कें लक्षांत ठेव कीं, या जगांत द्वैत नाहींच; सर्वत्र मीच भरलेला आहें. ११ तर मग, "या जगांत कांहीं प्राणी सर्वदा सुखी असे दिसतात, व कांहीं दुःखानें अगदीं व्याप्त झालेले दिसतात, ते कशानें ?" १२ जसें एकाद्या शहरांत एकाच दिव्यानें सर्व दिवे लावले तर त्यांपैकीं कांहीं दिवे प्रकाश करतात व कांहीं करीत नाहींत, असें कसें होईल ? १३ अशा प्रकारचे तर्कवितर्क जर तूं आपल्या मनांत करीत बसला असशील, तर त्यांचेंही चांगलें निवारण करतों, ऐक. १४ हें पहा–सर्वत्र मी भरलेला आहे, ही गोष्ट तर अगदीं निर्विवाद आहे; परंतु प्राण्यांच्या बुद्धीच्या कल्पनेप्रमाणें मी त्यांस भासतों. १५ ज्याप्रमाणें एकाच आकाशध्वनीचे निरनिराळ्या वाद्यांच्या अनुरोधानें निरनिराळे नाद ऐकूं येतात; १६ किंवा सूर्य एकच आहे, पण तो उगवल्यावर लोकांच्या व्यापारांस निरनिराळ्या प्रकारें उपयोगी पडतो; १७ अथवा पाणी एकच असून, बीजांच्या निरनिराळ्या धर्मांप्रमाणें झाडांमध्यें उत्पन्न होतें, (निरनिराळीं झाडें

तैसें परिणमलें स्वरूप । माझें जीवां १८ अगा नेणा आणि चतुरा । पुढां निळयांचा दुसरा । नेणा सर्पत्वें जाला येरा । सुखालागीं १९ हें असो स्वातीचें उदक । शुक्तीं मोतीं व्याळीं विख । तैसा सज्ञानांसी मी सुख । दुःख तों अज्ञानासी ३२०

सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टो मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च ।
वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो वेदांतकृद्वेदविदेव चाहम् ॥१५॥

एऱ्हवीं सर्वांच्या हृदयदेशीं । मी अमुका आहें ऐसी । जे बुद्धि स्फुरे अहर्निशीं । ते वस्तु गा मी २१ परि संतांसवें वसतां । योगज्ञानीं पैसतां । गुरुचरण उपासितां वैराग्येंसीं २२ येणेंचि सत्कर्में । अशेषही अज्ञान विरमे । जयांचें अहं विश्रामे । आत्मरूपीं २३ ते आपेआप देखोनि देखीं । मियां आत्मेनि सदा सुखी । येथें मीवांचून अवलोकीं । आन हेतु असे २४ अगा सूर्योदयो जालिया । सूर्यें सूर्यचि पहावा धनंजया । तेविं मातें मियां जाणावया । मीचि हेतु २५ ना शरीरपरातें सेवितां । संसारगौरवचि ऐकतां । देहीं जयांची अहंता । बुडोनि ठेली २६ ते स्वर्गसंसारालागीं । धांवतां कर्ममार्गीं । दुःखाच्या सेलभागीं । विभागी होती २७ परि हेंही होणें अर्जुना । मजचिस्तव तया अज्ञाना । जैसा जागताचि हेतु स्वप्ना । निद्रेतें होय २८ पैं अभ्रें दिवसु हरपला । तोही दिवसेंचि जाणों आला । तेविं मी नेणोनि विषयो देखिला । मजचिस्तव भूतीं २९ एवं निद्रा कां जागणिया । प्रबोधुचि हेतु धनंजया । तेविं ज्ञाना अज्ञाना जीवां यां । मीचि मूळ ४३० जैसें सर्पत्वा कां दोरां । दोरुचि मूळ धनुर्धरा । तैसा ज्ञाना अज्ञानाचिया संसारा । मियांचि सिध्दु ३१ म्हणोनि जैसा असें तैसया । मातें नेणोनि धनंजया । वेदु जाणों गेला तंव तया । जालिया शाखा ३२ तरि तिहीं शाखाभेदीं । मीचि जाणिजे त्रिशुद्धी । जैसा पूर्वापरा नदी । समुद्रुचि ठी ३३ आणि महासिद्धांतापासीं । श्रुति हारपती शब्दें सीं । जैसिया सगंधा आकाशीं । वातलहरी ३४ तैसें समस्तही श्रुतिजात । ठाके लाजिलें ऐसें निवांत । तें मीचि करीं यथावत । प्रकटोनियां ३५ पाठीं श्रुतीसहित अशेष । जग हारपे जेथ निःशेष । तें निजज्ञानही चोख । जाणता मीचि ३६ जैसें निदेलिया जागिजे । तेव्हां स्वप्नींचें कीर नाहीं दुजें । परि एकत्वही देखों पाविजे । आपलेंचि ३७ तैसें आपलें अद्वयपण । मी जाणतसें दुजेनवीण ।

उत्पन्न होतात,) त्याप्रमाणें मी एकच असून निरनिराळ्या प्राण्यांचे ठिकाणीं माझें स्वरूप परिणाम पावलें आहे. १८ अरे, एक अज्ञान व एक चतुर अशा दोघां वाटसरांच्या दृष्टीस दोन सरांचा नीलमण्यांचा एक हार पडला, तेव्हां जो अज्ञानी होता, त्याला तो सर्प असें वाटून भीति उत्पन्न झाली, व दुसरा जो चतुर होता, त्याला तो हार आहे असें वाटून सुख झालें. १९ हें असो; स्वातीं नक्षत्राचें पाणी सारखेंच असून तें शिंपल्यांत पडलें असतां त्याचीं मोत्यें होतात, व सर्पाच्या तोंडांत पडलें असतां विष उत्पन्न होतें; त्याप्रमाणें, जे ज्ञानी आहेत, त्यांना मजपासून सुख उत्पन्न होतें, व अज्ञानी आहेत, त्यांना दुःख होतें. ४२०

अन्वय–अहं च सर्वस्य हृदि सन्निविष्टः (अस्मि), मत्तः सर्वस्य स्मृतिः ज्ञानं अपोहनं च (अस्ति); अहं च एव सर्वैः वेदैः वेद्यः (अस्मि); अहं एव वेदांतकृत् वेदवित् च (अस्मि). १५

अर्थ–मी सर्वांच्या हृदयामध्यें प्रवेश करून राहतों; मजपासून सर्वांना स्मृति, ज्ञान आणि या दोहोंचा अभाव [विस्मरण व अज्ञान] हीं उत्पन्न होतात; सर्व वेदांनीं जाणण्यास मीच योग्य आहें; आणि वेदांताचा सिद्धांत करणारा व त्याचा ज्ञाताही मीच आहें. ॥ १५ ॥

एऱ्हवीं, सर्व प्राण्यांच्या हृदयांत, 'मी अमुक आहें' अशी जी बुद्धि (ज्ञान) रात्रंदिवस स्फुरण पावत असते, तीही मीच आहें. २१ परंतु साधूंच्या समागमानें, ब्रह्मात्मैक्य ज्ञानाचे अभ्यासानें, आणि वैराग्यासहवर्तमान गुरुचरणांच्या सेवेनें–२२ ह्मणजे ह्याच सदाचरणानें सर्व अज्ञान नाहींसें होऊन, त्याचा मीपणा आत्मस्वरूपांत लय पावतो. २३ मग आत्मस्वरूपाकडे दृष्टि गेल्यावर, मज आत्माच्या योगानें तो नेहमीं सुखांतच असतो. अशी स्थिति होण्यास माझ्याशिवाय दुसरा कोणीं कारणीभूत आहे काय? २४ हे धनंजया, सूर्य उगवल्यावर सूर्याच्या तेजानेंच सूर्य पहावा लागतो; त्याप्रमाणें, मला जाणण्यास मीच कारण आहें. २५ नाहीं तर, व्यावहरिक लोकांची सेवा करून संसाराचा चांगुलपणा ऐकतांना देहाच्या ठिकाणींच ज्यांची अहंबुद्धी नष्ट झाली आहे. २६ ते स्वर्ग व संसार या सुखांच्या प्राप्तीकरितां कर्ममार्गाचें आचरण करतात, त्यामुळें त्यांना दुःखाचा शेवटचा वांटा प्राप्त होतो. २७ परंतु, अर्जुना, हीही स्थिति या अज्ञानी लोकांस प्राप्त होण्यास कारण मीच आहें. ज्याप्रमाणें जागा असणारा मनुष्यच स्वप्न व निद्रा या अवस्थांचा कारण असतो; २८ परंतु, दिवसा डोळ्यांनीं आकाश व्यापलें ह्मणजे उजेड कमी होतो, हेंही दिवसाच्या उजेडानेंच जसें समजतें; त्याप्रमाणें, मला न जाणून प्राणी विषयांचें सेवन करतात, हेंही माझ्याच सत्तेनें होतें. २९ याप्रमाणें, हे धनंजया, निद्रेला किंवा जागृतीला जसें मूळ ज्ञानच कारण आहे, त्याप्रमाणें, या ज्ञानी व अज्ञानी अशा जीवांना मीच मूळ आहें. ४३० हे धनुर्धरा ज्याप्रमाणें, सर्पाच्या किंवा दोरीच्या भासास मूळ दोरीच कारण आहे, त्याप्रमाणें ज्ञान व अज्ञान यांच्या व्यवहारास मीच कारण आहें, हें सिद्ध आहे ३१ ह्मणून, हे धनंजया, माझें खरें स्वरूप न समजल्यामुळें वेद मला जाणण्याकरितां खटपट करूं लागला, तों त्याच्या शाखा झाल्या. ३२ तथापि त्या वेदाच्या तीनही शाखांनीं (ऋक्, यजु व साम यांनीं) माझेंच वर्णन केलें आहे. ज्याप्रमाणें पूर्वपश्चिमवाहिनी नद्यांस समुद्रच प्राप्य स्थान होय; ३३ आणि ज्याप्रमाणें महासिद्धांताजवळ (ब्रह्माजवळ) श्रुती शब्दासहवर्तमान लय पावतात, जसा वाऱ्याच्या झुळका गंधासहवर्तमान आकाशांत लय पावतात. ३४ त्याप्रमाणें, सर्व श्रुति ज्या ठिकाणीं लाजून स्तब्ध रहातात, तें ब्रह्मस्वरूप मीच यथार्थ प्रकट करतों. ३५ नंतर, श्रुतीसह सर्व जग ज्या ठिकाणीं लय पावतें, तें शुद्ध आत्मज्ञान जाणणारा मीच आहें. ३६ ज्याप्रमाणें निजलेला मनुष्य जागा झाल्यावर स्वप्नांत भासलेल्या वस्तु आपणच झालों होतों असें तो समजतो, त्याप्रमाणेंच जागृदवस्थेंतही आपण एकटेच आहों, हेंही तोच समजतो. ३७ त्याप्रमाणें, जें माझें आत्मस्व-

तयाही बोधाकारण । जाणता मीचि ३८ मग आगी लागलिया कापुरा । ना काजळी ना वैश्वानरा । उरणें नाहीं वीरा । जयापरी ३९ तेविं समूळ अविद्या खाये । तें ज्ञानही जैं बुडोनि जाये । तन्ही नाहीं कीर नोहे । आणि न साहे असणेंही ४० पैं विश्व घेऊनि गेला मागेंसीं । तया चोरातें कवण कें गिवसी । जे कोणी एकी दशा ऐसी । शुद्ध ते मी ४१ ऐसी जडाजडव्याप्ती । रूप करितां कैवल्यपती । ठी केली निरुपहितीं । आपुल्या रूपीं ४२ तो आघवाचि बोधु सहसा । अर्जुनीं उमटला कैसा । व्योमींचा चंद्रोदयो जैसा । क्षीरार्णवीं ४३ कां प्रतिबिंबितीं चोखटे । समोरील चित्र उमटे । तैसा अर्जुनें आणि वैकुंठें । नांदतसे बोधु ४४ तरि बाप वस्तुस्वभावो । फावे तंव तंव गोडिये थांवो । ह्मणौनि अनुभवियांचा रावो । अर्जुन म्हणे ४५ जी व्यापकपण बोलतां । निरुपाधिक जें आतां । स्वरूप प्रसंगता । बोलिले देवो ४६ तें एक वेळ अव्यंगवाणें । कीजो कां मजकारणें । तेथ द्वारकेचा नाथु म्हणे । भलें केलें ४७ पैं अर्जुना आह्मांहि वाडेंकोडें । अखंड बोलों आवडे । परि काय कीजे न जोडे । पुसतें ऐसें ४८ आजि मनोरथांसि फळ । जोडलासि तूं केवळ । जे तोंड भरूनि निखळ । आलासि पुसों ४९ जें अद्वैतावरीही भोगिजे । तें अनुभवींच तूं विरजें । पुसोनि मज माझें । देतासि सुख ४५० जैसा आरिसा आलिया जवळां । दिसे आपणपें आपला डोळा । तैसा संवादिया तूं निर्मळा । शिरोमणी ५१ तुवां नेणोनि पुसावें । मग आह्मीं परिसऊं बैसावें । तो गा हा पाडु नव्हे । सोयरेया ५२ ऐसें ह्मणौनि आलिंगिलें । कृपादृष्टी अवलोकिलें । मग देवो काय बोलिले । अर्जुनेंसीं ५३ पैं दोहीं वोठीं एक बोलणें । दोहीं चरणीं एक चालणें । तैसें पुसणें सांगणें । तुझें माझें ५४ एवं आह्मी तुम्ही येथें । देखावें एका अर्थातें । सांगतें पुसतें येथें । दोन्ही एक ५५ ऐसा बोलत देवो भुलला मोहें । अर्जुनातें आलिंगूनि ठाये । मग बिहाला म्हणे नोहे । आवडी हे ५६ जाले इक्षुरसाचे ढाळ । तरि लवण देणें किडाळ । जे संवादसुखाचें रसाळ । नासेल थितें ५७ आधींच आम्हां यया कांहीं । नरनारायणासी भिन्न

रूप, त्याचा बोध होण्यास दुसऱ्यावांचून मीच कारण आहें; व त्या आत्मस्वरूपाचा जाणणारा मीच आहें. ३८ वीरा अर्जुना, ज्याप्रमाणें कापुर जळल्यावर मागें त्याची काजळी रहात नाहीं व अग्निही रहात नाहीं, ३९ त्याप्रमाणें, अज्ञानाचा समूळ नाश करणारें जें ज्ञान, तेंही ज्या वेळेस लय पावतें, त्या वेळेस कांहीं नाहीं असेंही ह्मणतां येत नाहीं, व आहे असेंही म्हणणें ज्या स्थितीमध्यें सहन होत नाहीं, ह्मणजे ज्ञानाज्ञानाचा लय झाल्यावर जें शुद्ध स्वरूप उरतें, त्याच्या ठिकाणीं शब्दाचा साक्षात् प्रवेश होत नाहीं; म्हणून आहे किंवा नाहीं, अशा शब्दानें ती स्थिति सांगतां येत नाहीं. ४४० हें पहा—विश्वाचें कारण जें अज्ञान, त्यासहवर्तमान सर्व विश्वाचा नाश करून टाकणार, त्याच्या विश्वांतर्गत साधनांनीं कोण व कोठें पत्ता लावणार. अशा तऱ्हेची जी कांहीं विशेष स्थिति, तें माझें शुद्ध स्वरूप आहे. ४१ कैवल्यपती भगवान् यांनीं जडाजड पदार्थांमध्यें आपल्या व्याप्तीचें रूप करितां करितां आपल्या निरुपाधिक स्वरूपाच्या ठिकाणीं मजल पोंचविली. ४२ ज्याप्रमाणें आकाशांत चंद्रोदय झाल्यावर क्षीरसमुद्रांत त्याचें पूर्ण प्रतिबिंब दिसतें, त्याप्रमाणें श्रीकृष्णांनीं केलेला हा सर्व बोध अर्जुनाच्या मनांत प्रतिबिंबित झाला. ४३ चित्रें काढलेल्या भिंतीच्या समोरील भिंत घोंटून गुळगुळीत केल्यावर, तींत ज्याप्रमाणें त्या चित्रांचें प्रतिबिंब दिसतें, त्याप्रमाणें वैकुंठनायक जो श्रीकृष्ण परमात्मा, त्याच्या मनांतील बोध अर्जुनाच्या शुद्ध अंतःकरणामध्यें प्रतिबिंबित झाला. ४४ धन्य ! धन्य !! परमात्म स्वभाव !!! जशी जशी त्याची प्राप्ति होईल, तशी तशी आनंदाची प्राप्ति वाढते. अशा अनुभवाचा राजा जो अर्जुन तो पुनः देवाला ह्मणतो. ४५ देवा, आपल्या व्यापकपणाचें वर्णन करतांना आपण प्रसंगानुसार जें निरुपाधिक स्वरूपाचें वर्णन केलें. ४६ तें निरुपाधिक स्वरूप एक वेळ मजकरितां स्पष्ट करा. तेव्हां द्वारकानाथ ह्मणाले, " चांगलें विचारलेंस " ४७ हें पहा अर्जुना, आतांताही कोडकौतुकानें तेहमीं हेंच बोलावेंसें वाटतें, पण काय करावें, कोणी असें विचारणाराच भेटत नाहीं. ४८ तूं आज नवीन म्हणून मोठ्या आस्थेनें पुनः निरुपाधिक स्वरूप सांगा, ह्मणून विचारलेंस म्हणून मला असें वाटतें, आजपर्यंत माझ्या मनांत असा विचारणारा कोणी तरी भेटावा, अशी फार इच्छा होती, त्या इच्छेचें फळ आज तूं मला प्राप्त झालास. ४९ अद्वैत अनुभवानंतर जो सुखाचा उपयोग व्यावा, तो देण्यास आज मला तूं साह्य झाला आहेस. कारण, माझें निरुपाधिक स्वरूप मला पुनः सांगा असें विचारूनच मला सुख देत आहेस. ४५० ज्याप्रमाणें आरशात पाहिल्यावर आपलें स्वरूप आपल्या नेत्रांनीं दिसतें, त्याप्रमाणें तुझ्यावरोबर संवाद केल्यामुळें मला सुख झालें आहे, म्हणून तूं संवाद करणारांत शिरोमणि आहेस. ५१ मित्रा अर्जुना, तुला समजत नाहीं म्हणून त्वां आम्हांस विचारावें, आणि आह्मीं तुझी समजूत करून द्यावी, अशी तुझी योग्यता ! नाहीं बरें !" ५२ असें ह्मणून देवाला आनंदातिशयामुळें अर्जुनास आलिंगन देऊन व कृपादृष्टीनें पाहून मग भगवान् अर्जुनाला असें म्हणाले ५३ कीं, ओंठ जरी दोन असले तरी बोलणें जसें एक, दोन पाय असले तरी चालणें जसें एक, त्याप्रमाणें तुझें पुसणें व माझें सांगणें दोन्ही एक आहेत. ५४ याप्रमाणें तुझें व माझें स्वरूप एकच आहे असें समज; आणि मी सांगणारा व तूं पुसणारा हे आपण दोघेही एकच आहों." ५५ असें बोलतां बोलतां मोहानें भुलून जाऊन अर्जुनास आलिंगन देऊन स्तब्ध झाले. इतक्यांत चकित होऊन म्हणाले:—इतकें प्रेम चांगलें नाहीं ! ५६ उंसाच्या रसाची गुळाची ढेप करतेवेळीं त्यांत ज्याप्रमाणें हीन असा क्षार घालावा लागतो, त्याप्रमाणें आमच्या संवादरूपी सुखांत द्वैत उत्पन्न केलें नाहीं, तर त्याज आलेलें प्रेम नाहींसें होईल. ५७ अर्जुन नर, व मी नारायण असल्यामुळें आम्हां दोघांत आधींच भेद नाहीं. पण मला आलेलें हें प्रेमाचें भरतें आतां माझ्या ठिका-

नाहीं । परी आतां जिरो माझ्या ठाईं । वेगु हा माझा ५८ इया बुद्धी सहसा। श्रीकृष्ण म्हणे वीरेशा । पैं गा तो तुवां कैसा । प्रश्नु केला ५९ जो अर्जुन श्रीकृष्णीं विरत होता। तो परतोनियां मागुता । प्रश्नावळीची कथा । ऐकों आला ४६० तेथ सद्गदें बोलें । अर्जुनें जी जी ह्मणितलें । निरुपाधिक आपुलें । रूप सांगा ६१ यया बोला तो शार्ङ्गीं । तेंचि सांगावयालागीं । उपाधी दोहीं भागीं । निरूपीत असे ६२ पुसिलिया निरुपहित । उपाधि कां सांगे यथ । हें कोण्हाही प्रस्तुत । गमे जरी ६३ तरि ताकाचें अंश फेडणें । याचि नांव लोणी काढणें । चोखाचिये शुद्धी तोडणें । कीडाचि जेवीं ६४ बाबुळीचि सारावी हातें । परि पाणी तंव असे आइतें । अभ्रचि जावें गगन तें । सिद्धचि कीं ६५ वरिल कोंडियाचा गुंडाळा । झाडूनि केलिया वेगळा । कणु घेतां विरंगोळा । असे काई ६६ तैसा उपाधि उपहितां । शेवटु जेथ विचारितां । तें कोणातेंही न पुसतां । निरुपाधिक ६७ जैसें न सांगणेवरी । बाळा पतीसी रूप करी । बोल निमालेपणें विवरी । अचर्चातें ६८ पैं सांगणेयाजोगें नव्हे । तेथिंचें सांगणें ऐसें आहे । ह्मणौनि उपाधि लक्ष्मीनाहें । बोलिजे आदि६९पाडिव्याची चंद्ररेखा । निरुती दावावया शाखा । दाविजे तेवीं औपाधिका। बोली इया४७०

द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च । क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते ॥१६॥

मग तो म्हणे गा सव्यसाची । पैं इये संसारपाटणींची । वस्ती साविया टांची । दुपुरुषीं ७१ जैसी आघवांचि गगनीं । नांदत दिवोरात्री दोन्ही । तैसे संसारराजधानीं । दोन्हीचि हे ७२ आणिकही तिजा पुरुषु आहे । परि तो या दोहीचें नांव न साहे । जो उदेला गांवेंसीं खाये । दोहींतें ययां ७३ परि ते तंव गोठी असो । आधीं दोहींची हे पारियेसों । जे संसारग्रामा वसों । आले असती ७४ एक आंधळा वेडा पंगु । येर सर्वांगें पुरता चांगु । परि ग्रामगुणें संगु । घडला दोघां ७५ तया एका नाम क्षरु । येरातें ह्मणती अक्षरु । इहीं दोहींचि परि संसारु । कोंदला असे ७६ आतां क्षरु तो कवणु । अक्षरु तो किंलक्षणु । हा अभिप्रावो संपूर्णु । विवंचूं गा ७७ तरी महदहंकारा-।

णींच जिरूं द्या. ५८ याप्रमाणें बुद्धि स्थिर करून श्रीकृष्ण भगवान् ह्मणाले हे वीरश्रेष्ठा, " तूं मला काय प्रश्न केलास ? " ५९ इकडे अर्जुन जो श्रीकृष्णांच्या स्वरूपांत लीन होत होता, तो देहभानावर येऊन आपल्या प्रश्नाचें उत्तर ऐकण्यास तयार झाला. ४६० तेव्हां सद्गदित वाणीनें अर्जुनानें म्हटलें: " देवा, आपलें निरुपाधिक रूप कोणतें तें सांगा. " ६१ अर्जुनाचें हें भाषण ऐकून, तें निरुपाधिक स्वरूप सांगण्याकरितां, श्रीकृष्ण भगवान् अगोदर दोन प्रकारें करून उपाधींचें वर्णन करितात. ६२ आपलें निर्गुणरूप सांगा म्हणून विचारलें असतां, उपाधींविषयीं भगवान् अगोदर वर्णन कां करतात, अशी जर कोणास शंका येईल, ६३ तर असें पहा कीं, कोणीं लोणी मागावयास आला तर, ताक अगोदर करून त्यांतून तें त्याला काढून द्यावें लागतें, किंवा शुद्ध सोनें पाहिजे असल्यास तें जसें अगोदर तावून त्यांतील वाईट धातू काढावी लागते; ६४ पाण्यावरील शेंवाळच काढून टाकावयाचें असतें, ह्मणजे मग पाणी शुद्धच आहे; अथवा अभ्र नाहींसें झाल्यावर आकाश स्वच्छच असतें; ६५ तांदुळावरील भाताचा कोंडा काढून टाकल्यावर तांदूळ हातीं येण्यास कांहीं हरकत असते काय ? ६६ त्याप्रमाणें स्वरूपावरील उपाधि काढून टाकल्यावर, विचार केला तर जें बाकी रहातें, तेंच शुद्ध स्वरूप, हें कोणास विचारावयास नको. ६७ ज्याप्रमाणें लहान मुलीला तिच्या पतीचें नांव विचारल्यावर, जें नांव घेतलें असतां ती गप्प रहाते, तेंच तिच्या पतीचें नांव समजावयाचें, त्याप्रमाणें जेथें शब्दांची गति कुंठीत होते, तेंच अवर्णनीय असें निरुपाधिक शुद्ध स्वरूप होय. ६८ म्हणून, ज्याचें स्वरूप शब्दानें सांगतां येत नाहीं, त्याच स्वरूपाच्या ठिकाणचें वर्णन अजुबाजूच्या गोष्टीनेंच करावें लागतें, ह्मणून लक्ष्मीपती भगवान् अगोदर उपाधी सांगूं लागले; ६९ शुद्ध प्रतिपदेच्या चंद्राची कोर दाखविते वेळीं ज्याप्रमाणें एखाद्या झाडाच्या खांदीच्या आधारानें तीं दाखवावी लागते, त्याप्रमाणें निरुपाधिक स्वरूपाचें लक्षण सांगते वेळीं उपाधींचें स्वरूप सांगावें लागतें. ४७०

अन्वय–लोके क्षरः अक्षरः च एव इमौ द्वौ पुरुषौ (स्तः) सर्वाणि भूतानि क्षरः (उच्यते), अस्थः अक्षरः उच्यते. १६

अर्थ–या लोकीं क्षर आणि अक्षर हे दोनच पुरुष [पदार्थ] आहेत. सर्व भूतांना क्षर ह्मणतात, आणि कूटस्थाला [मायोपाधियुक्त जीवाला] अक्षर ह्मणतात.

मग श्रीकृष्ण ह्मणतात:–हे सव्यसाची, या संसाररूपी नगरांत खरोखर मोजकी दोन पुरुषांची वस्ती आहे. ७१ ज्याप्रमाणें सर्व आकाशांत कायतीं दिवस (उजेड) व रात्र (काळोख) हींच नांदतात, त्याप्रमाणें संसाररूपी राजधानींत हे दोघेच रहातात. ७२ आणखीही एक तिसरा पुरुष आहे, परंतु त्याला या दोघांचें नांव देखील सहन होत नाहीं. कारण, तो येथें आला असतां नगरासह त्या दोघांचा नाश करतो. ७३ परंतु त्या तिसऱ्याची गोष्ट सध्यां राहूं दे. अगोदर जे या संसाररूपी नगरांत वस्ती करण्याकरितां आले आहेत, त्या दोघांविषयीं सांगतों, तें ऐक. ७४ त्यांपैकीं एक अंधळा, बेडा व पंगू असा आहे. आणि दुसरा सर्व अवयवांनीं परिपूर्ण आहे. परंतु हे त्यांचे धर्म स्वत:चे नसून ज्या गांवांत ते वस्तीला आले आहेत, त्या गांवाच्या संगतीमुळें आले आहेत. ७५ त्या एकाचें नांव ' क्षर ' व दुसऱ्याचें नांव ' अक्षर.' या दोघांनींच हें संसाररूपी नगर व्यापून टाकिलें आहे. ७६ आतां ' क्षर ' म्हणून आहे तो कोण, व ' अक्षर ' म्हणतात त्याचीं लक्षणें काय हें सर्व तुला फोड करून सांगतों.–ह्या ठिकाणीं शुद्ध परमात्म्यालाच क्षराक्षराची संज्ञा केली आहे. क्षर पुरुष संज्ञा करते वेळेस मायाकार्य महत्तत्त्वापासून तृणापर्यंत जो प्रपंच तो ' क्षर ' म्हणजे प्रतिक्षणीं नाश पावणारा आहे. त्याची उपाधी परमात्म्याला घेऊन क्षर पुरुष असें म्हटलें आहे; आणि येथून सर्व क्षर उपाधींचें वर्णन केलें आहे, हें लक्षांत घेऊन ग्रंथ वाचावा, म्हणजे समजण्यास कठीण जाणार नाहीं.–७७ तर, अर्जुना, महत्तत्त्वापासून ग-

लागुनियां धनुर्धरा । तृणांतीचा पांगोरा- । वरी पैं गा ७८ जें कांहीं सानें थोर । चालतें अथवा स्थिर । किंबहुना गोचर । मनबुद्धीसि जें ७९ जेतुलें पांचभौतिक घडतें । जें नामरूपा सांपडतें । गुणत्रयाच्या पडतें । कामठां जें ४८० भूताकृतीचें नाणें । घडत भांगारें जेणें । काळासि जूं खेळणें । जिहीं कवडा ८१ जाणणेंचि विपरीतें । जें जें कांहीं जाणिजेतें । जें प्रतिक्षणीं निमतें । होऊनियां ८२ अगा काढूनि भ्रांतीचें दांग । उभवी सृष्टीचें आंग । हें असो बहु जग । जया नाम ८३ पैं अष्टधा भिन्न ऐसें । जें दाविलें प्रकृतिमिसें । जें क्षेत्रद्वारा छत्तिसें । भागीं केलें ८४ हें मागील सांगों किती । अगा आतांचि जें प्रस्तुतीं । वृक्षाकार रूपाकृति निरूपिली ८५ तें आघवेंचि साकारें । कल्पुनी आपणपयां पुरें । जालें असे तदनुसारें । चैतन्याचि ८६ जैसा कुहां आपणचि बिंबे । सिंह प्रतिबिंब पाहतां क्षोभे । मग क्षोभला समारंभें । घाली तेथ ८७ कां सलिलीं असतचि असे । व्योमावरी व्योम बिंबे जैसें । अद्वैत होऊनि तैसें । द्वैत धेपे ८८ अर्जुना गा यापरी । साकार कल्पूनि पुरीं । आत्मा विस्मृतीची करी । निद्रा तेथ ८९ पैं स्वप्नीं सेजार देखिजे । मग पहुडणें जैसें तेथ कीजे । तैसें पुरीं शयन देखिजे । आत्मयासी ४९० पाठीं तिये निद्रेचेनि भरें । मी सुखी दुःखी म्हणत घोरें । अहंममतेचेनि थोरें । वोसणाये सादें ९१ हा जनकु हे माता । हा मी गौर हीन पुरता । पुत्र वित्त कांता । माझें हें ना ९२ ऐसिया वळघोनि स्वप्ना । धांवत भवस्वर्गाचिया राना । तया चैतन्य नाम अर्जुना । क्षर पुरुषु गा ९३ आतां ऐक क्षेत्रज्ञु येणें । नामें जयातें बोलणें । जग जीवु कां म्हणे । जिये दशेतें ९४ जो आपुलेनि विसरें । सर्व भूतत्वें अनुकरें । तो आत्मा बोलिजे क्षरें । पुरुषनामें ९५ जे तो वस्तुस्थिती पुरता । ह्मणोनि आली पुरुषता । वरी देहपुरीं निदैजतां । पुरुषनामें ९६ आणि क्षरपणाचा नाथिला । आळु यया ऐसेनि आला । जे उपाधींचि आतला । ह्मणोनियां ९७ जैसी खळाळींचिया उदका । सरसीं आंदोळे चंद्रिका । तैसा विकारां औपाधिकां । ऐसाचि गमे ९८ कां खळाळु मोटका शोषे । आणि चंद्रिका तैं सरिसीच भ्रंशे । तैसा उपाधिनाशीं न दिसे । उपाधिकु ९९ ऐसें उपाधीचेनि पाडें । क्षणिकत्व यातें जोडे । तेणें खोंकरपणों घडे । क्षर हें नाम ५०० इतें जीवचैतन्य आघवें । हें क्षर पुरुष जाणावें । आतां रूप करूं बरवें ।

वताच्या काडीपर्यंत सर्व ७८ जें कांहीं लहान व थोर चालणारें अथवा स्थिर, किंवा मन व बुद्धि यांस समजणारें; ७९ जें पंचमहाभूतांनीं बनलेलें, नांवारूपांत येणारें, आणि सत्त्व, रज व तम या तीन गुणांच्या कमावणींत आलेलें, ४८० ज्या सोन्यानें म्हणजे पंचमहाभूतानें भूताकृतीचें नाणें तयार होतें, व ज्या शरीररूपी कवड्यानें काळाला जुगार खेळतां येतें; ८१ विपरीत ज्ञानानें जें जाणतां येतें, व जें प्रतिक्षणीं उत्पन्न होऊन लय पावतें; ८२ अरे, भ्रांतिरूपी अरण्यांत (मायेंत) शिरून जें सृष्टिरूपी अवयव उत्पन्न करतें; फार काय सांगावें ! ज्याला 'जग' असें म्हणतात; ८३ जें सातवे अध्यायांत आठ प्रकारच्या प्रकृतीनें वर्णन केलें आहे;व तेराव्या अध्यायांत छत्तीस प्रकारांनीं क्षेत्राच्या रूपानें वर्णन केलें आहे; ८४ या मागील गोष्टी कशास पाहिजेत ? अरे, आतां याच अध्यायांत वृक्षाकार रूपाकृतीनें जें तुला सांगितलें; ८५ तें सर्व साकार पदार्थ आपलीं रहाण्याचीं गांवें आहेत, अशी कल्पना करून, त्यांत व्याप्त होऊन त्या त्या आकारानें चैतन्यच बनलें आहे. ८६ विहिरींत पडलेलें आपलें प्रतिबिंब पाहून हा कोणीं दुसरा सिंह आहे असें मानून, रागानें त्याचा नाश करण्याकरितां जसा सिंह विहिरींत उडी घालतो, ८७ किंवा उदकामध्यें आकाश व्याप्त असूनही पुनः त्याच्यावर आकाशाचें प्रतिबिंब दिसतें, तसें चैतन्य आपण स्वतः अद्वैत असून उपाधींच्या योगानें द्वैतरूप बनतें. ८८ अर्जुना, याप्रमाणें आकारयुक्त नगरीची कल्पना करून आत्मा आपल्या स्वरूपाच्या विस्मृतीची त्या ठिकाणीं निद्रा करतो. ८९ मग, स्वप्नांत जसा एकादा मनुष्य अंथरूण पाहून त्यावर निजतो, तसा आत्मा या जगांत स्वस्थ झोंप घेतो. ४९० मग, त्या निद्रेच्या भरांत, मी सुखी आहें, मी दुःखी आहें, अमका बोलत नाहीं; अशी अहंकार व ममता यांच्या तत्त्वांत सांपडून बसतो. ९१ हा माझा बाप, ही माझी आई, मी गोरा, मी काळा, मी पुरुष आहें, सुलक्षण, संदरि व स्त्री ही माझी नव्हत का ! ९२ याप्रमाणें स्वप्नाच्या आधारानें स्वर्ग व संसार यांतच धांवणारें जें चैतन्य, त्याला अर्जुना, 'क्षर' पुरुष असें म्हणतात. ९३ आतां, ज्याला क्षेत्रज्ञ असें म्हणतात, व ज्या दशेस सर्व जग जीव म्हणतें,९४ आणि जो आत्मस्वरूपाच्या विस्मृतीनें सर्व भूतांत संचार करतो, त्या जीवात्म्याला 'क्षर' पुरुष, असें म्हणतात. ९५कारण, तो वस्तुतः स्वरूपानें परिपूर्ण आहे, म्हणून त्याला 'पुरुष' हे नांव प्राप्त झालें. शिवाय तो देहांत वास करतो म्हणूनही त्याला 'पुरुष' असें नांव आहे; ९६ आणि उपाधी तादात्म्यसंबंधानें त्याच्यावर क्षरपणाचा खोटा आळ आला आहे. ९७ ज्या प्रमाणें हालणाऱ्या पाण्यांत चंद्राचें प्रतिबिंब हालतें असें वाटतें, त्याप्रमाणें विकाराच्या उपाधींनीं आत्मा उपाधियुक्त भासतो. ९८ नंतर तेंच हालणारें पाणी नाहींसें झाल्यावर त्यांत दिसणारें चंद्रप्रतिबिंबही नाहींसें होतें. त्याप्रमाणें, उपाधींचा नाश झाल्यावर चैतन्य दिसेनासें होतें. ९९ याप्रमाणें उपाधींच्या योगानें चैतन्यास क्षणिकत्व प्राप्त होतें, आणि असा कमीपणा आल्यानें त्याला 'क्षर' असें म्हणतात. ५०० अशा प्रकारें सर्व जीवचैतन्यास 'क्षर' असें म्हणावें. आतां अक्षरांचीं लक्षणें कोणतीं, तें उत्तम प्रकारें सांगतों.—येथून अक्षरपुरुषांचें वर्णन करण्याकरितां, ज्ञानावांचून नाश न पावणारी जी माया किंवा अज्ञान, तिला अक्षर असें म्हणतात. त्या उपाधीशीं युक्त जो परमात्मा त्याला अक्षर पुरुष असें म्हटलें आहे. येथून अगोदर त्या उपाधींचें

अक्षरासी १ तरि अक्षरु जो दुसरा । पुरुषु पैं धनुर्धरा । तो मध्यस्थु गा गिरिवरां । मेरु जैसा २ जे तो पृथ्वी पाताळ स्वर्गीं। इहीं न भेदे तिहीं भागीं। तैसा दोहीं ज्ञानज्ञानांगीं । पडेना जो ३ ना यथार्थज्ञानें एक होणें । ना अन्यथात्वें दुजें घेणें । ऐसें निखिळ जें नेणणें । तेंचि तें रूप ४ पांसुता निःशेष जाये । ना घटभांडादि होये । तया मृत्पिडा ऐसें आहे । मध्यस्थ जें ५ पैं आटोनि गेलिया सागरु । मग तरंगु ना नीरु । तया ऐशी अनाकारु । जे दशा गा ६ पार्था जागणें तरी बुडे । परि स्वप्नाचें कांहीं न मांडे । तैसिये निद्रे सांगडें । न्याहाळणें जें ७ विश्व आवघेंचि मावळे । आणि आत्मबोधु तरी नुजळे। तिये अज्ञानदशे केवळे । अक्षरु नामें ८ सर्वां कळीं सांडिलें जैसें । चंद्रपण उरे अंवसे । रूप जाणावें तैसें । अक्षराचें ९ पैं सर्वोपाधिविनाशें । हे जीवदशा जेथ पैसे । फळपाकांत जैसें । झाड बीजीं ५१० तैसें उपाधी उपहित । थोकोनि ठाके जेथ । तयातें अव्यक्त । बोलती गा ११ घन अज्ञान सुषुप्ती । तो बीजभावो म्हणती । येर स्वप्न हन जागृती । फळभावो तयाचा १२ जयासी कां बीजभावो । वेदांतीं केला ऐसा आवो । तो तया पुरुषा ठावो । अक्षराचा१३ जेथुनी अन्यथा ज्ञान । फांकोनि जागृती स्वप्न । नानाबुद्धीचें ज्ञान । रिगालें असे १४ जीवत्व जेथुनी किरीटी । विश्व उठतचि उठी । ते उभय भेदांची मिठी । अक्षरु पुरुषु १५ येरु क्षरु पुरुषु कां जनीं । जिहीं खेळे जागृतीं स्वप्नीं। तिया अवस्था जो दोन्ही । वियाला गा १६ पैं अज्ञानघनसुषुप्ती । ऐसैसी जे कां ख्याती । या उणी येकी प्राप्ती । ब्रह्माची जे १७ साचचि पुढती वीरा । जरि न येतां स्वप्न जागरा । तरी ब्रह्मभावो साचोकारा । ह्मणों येता १८ परि प्रकृतिपुरुषें दोनी । अभ्रें जालीं जिये गगनीं । क्षेत्रक्षेत्रज्ञु स्वप्नीं । देखिला जियें१९ हें असो अधोशाखा । या संसाररूपा रुखा । मूळ तें रूप पुरुषा । अक्षराचें५२० हा पुरुषु कां ह्मणिजे । जे पूर्णपणेंचि निजें । पैं मायापुरीं पहुडिजे । तेणेंही बोलें २१ आणि विकारांची जे वारी । ते विपरीत ज्ञानाची परी । नेणिजे जिये माझारीं । ते सुषुप्ती गा हा २२ ह्मणौनि यया आपैसें । क्षरणें या नसे । आणि केंही हा न नाशे । ज्ञानाउणें २३ यालागीं हा अक्षरु । ऐसा वेदांतीं डगरु । केला देशीं थोरु । सिद्धांताच्या २४ ऐसें जीवकार्य कारण । जया मायासंगुचि लक्षण । अक्षर पुरुषु जाण । चैतन्य तें २५

वर्णन करितात, हें लक्षांत ठेवावें.— १ तर अर्जुना, दुसरा जो 'अक्षर पुरुष,' तो मध्यस्थ आहे; ज्याप्रमाणें, सर्व पर्वतांत मेरु पर्वत मध्यस्थ आहे, त्याप्रमाणें परमात्मा व मायाकार्य यांच्यामध्यें अक्षर पुरुषाची उपाधि जें अज्ञान तें मध्यें आहे, ह्मणून तद्विशिष्ट अक्षर पुरुषाला मध्यस्थ ह्मटलें आहे, २ कारण तो मेरु पर्वत पृथ्वी, पाताल व स्वर्ग या तिन्ही लोकांत सारखाच आहे; त्याप्रमाणें जो ज्ञान किंवा अज्ञानकार्य यांना समानच आहे. ३ यथार्थ ज्ञानानें ऐक्य होणें किंवा विपरीत ज्ञानानें द्वैत पावणें या दोन स्थितींमधील जी केवळ अज्ञान स्थिति तेंच ज्याचें स्वरूप होय; ४ माती भिजवून तिचा गोळा करावा, मग तिचें भांडें घडावयाचे पूर्वी तिचा मातीपणा तर गेलेला असतो, व तिला मडक्याचाही आकार नसतो; त्या गोळ्याप्रमाणें या अक्षर पुरुषाची मधली स्थिति आहे. ५ समुद्र आटल्यावर त्यांत लाटाही नसतात किंवा पाणीही नसतें, त्याप्रमाणें जी आकाररहित स्थिति; ६ पार्था, जागृदवस्था जाऊन स्वप्नावस्था ही आली नाहीं अशी जी निद्रावस्था, त्याप्रमाणें ज्याचें स्वरूप आहे; ७ आणि जगाचा भास नाहींसा होणें, व आत्मज्ञानाचा बोध न होणें, या दोहोंमधील जी केवळ अज्ञानदशा, तिलाच "अक्षर" असें म्हणतात.८ अमावास्येच्या दिवशीं सर्व कला नाहींतशा होऊन जसें चंद्राचें स्वरूप असतें, त्याप्रमाणें शुद्ध ज्ञान व विपरीत ज्ञान याविरहित केवळ अज्ञान असें अक्षराचें रूप आहे. ९ हें पहा, सर्व उपाधींचा नाश झाल्यावर ज्या अज्ञानांत जीवात्मा लय पावतो. ज्याप्रमाणें फल आल्यावर झाड त्यांत बीजरूपानें असतें, ५१० त्याप्रमाणें उपाधि व उपाधीचा स्वीकार करणारा जेथें विश्रांति घेतो, त्या स्थानाला अव्यक्त असें म्हणतात. ११ पूर्ण अज्ञान ज्या निद्रावस्थेंत असतें, तिला 'बीजभाव' असें म्हणतात; व स्वप्न व जागृति ह्यांना 'फलभाव' असें ह्मणतात. १२ वेदांतशास्त्रांत ज्या स्थितीला 'बीजभाव' असें ह्मणतात, त्या स्थितीलाच 'अक्षर पुरुष' असें म्हणतात. १३ आपली जेथून विपरीत ज्ञान उत्पन्न होऊन जागृति व स्वप्न या दशा नाहींशा होतात; आणि अनेकबुद्धिसंगतून हे न जेथून निवर्तें. १४ अर्जुना, जीवधर्म जेथून उत्पन्न होतो, तसेंच अनंत विश्व जेथें उत्पन्न होतात, आणि त्या जीवांचा व विश्वाचा प्रलयकाळीं जेथें साम्यावस्था होते त्या उपाधीच्या ठिकाणीं ह्मणजे अज्ञानाच्या ठिकाणीं असणाऱ्या चैतन्याला अक्षर पुरुष म्हणतात.१५ दुसरा क्षर पुरुष जो जागृत-स्वप्नावस्थेंत खेळतो, त्या जागृत-स्वप्न या दोन अवस्था ज्याच्यापासून उत्पन्न होतात, १६ किंवा ज्या अवस्थेला पूर्ण अज्ञानानें भरलेली अशी निद्रावस्था ह्मणतात, व जिला ब्रह्मस्थिती ह्मणण्याला एकच उणेपणा आहे. १७ वीरा अर्जुना. खरोखर या निद्रावस्थेपासून जर स्वप्न किंवा जागृति या अवस्था प्राप्त न होतील, तर या सुषुप्तीलाच ब्रह्मस्थिति असें ह्मटलें असतें. १८ पण या निद्रारूपी आकाशांत प्रकृतिपुरुषरूपी ढग येऊन क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ असे जिच्या स्वप्नांत दिसतात. १९ हें असो, खालच्या बाजूला विस्तार पावणाऱ्या संसाररूपी वृक्षाचें जें मूळ म्हणजे अज्ञान, तेंच या अक्षर पुरुषाचें रूप होय.५२० याला पुरुष कां ह्मणावयाचें? तर हा पूर्णपणें निद्रा घेतो म्हणून, व मायारूपी नगरांत शयन करतो ह्मणून; २१ आणि ज्या गाढ निद्रेंत विकार अथवा विपरीत ज्ञान यांचा भास नसतो, तें याचें रूप होय. २२ ह्मणून याचा स्वभावतः किंवा ज्ञानावांचून दुसऱ्या कशानेंही नाश होत नाहीं. २३ ह्मणून वेदांत शास्त्राच्या सिद्धांतांत याच्यावर 'अक्षर' असा आरोप केला आहे. २४ याप्रमाणें जीव कार्य व कारण हे व्यवहार होण्यास परमात्म्याशीं मायेच्या संबंधाचीच जरूरी आहे. ह्मणून त्या मायेचा संबंध असलेल्या चैतन्यालाच 'अक्षर' पुरुष ह्मणतात, असें समज. २५

उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः । यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः ॥१७॥

आतां अन्यथाज्ञानी। या दोनी अवस्था जया जनीं। तया हरपती घनीं। अज्ञानत्वीं २६ तें अज्ञान ज्ञानीं बुडालिया। ज्ञानें कीर्तिमुखत्व केलिया। जैसा वन्हि काष्ठ जाळूनियां। स्वयें जळें २७ तैसें अज्ञान ज्ञानें नेलें। आपण वस्तु देऊनि गेलें। ऐसें जाणणेंनिवीण उरलें। जाणतें जें २८ तें तो गा उत्तम पुरुषु। जो तृतीय कां निष्कर्षु। दोहींहून आणिकु। मागिला जो २९ सुषुप्तीं आणि स्वप्ना-। पासूनि बहुवें अर्जुना। जागणें जैसें आना। बोधाचेंचि २३० कां रश्मी हन मृगजळा-। पासूनि अर्कमंडळा। अफाडु तेविं वेगळा। उत्तमु गा ३१ हें ना काष्ठींचा काष्ठाहुनी। अनारिसा जैसा वन्ही। तैसा क्षराक्षरापासुनी आनचि तो ३२ पैं ग्रासूनि आपली मर्यादा। एक करीत नदीनदां। उठी कल्पांतीं उदावादा। एकार्णवाचा ३३ तैसें स्वप्न ना सुषुप्ती। ना जागराची गोठी आथी। जैसी गिळिली दिवोराती। प्रळयतेजें ३४ मग एकपण ना दुजें। असें नाहीं हें नेणिजे। अनुभऊ निर्बुजे। बुडाला जेथें ३५ ऐसें आथि जें कांहीं। तें तो उत्तम पुरुषु पाहीं। जें परमात्मा इहीं। बोलिजे नामीं ३६ तेंही एथ न मिसळतां। बोलणें जीवत्वें पंडुसुता। जैसी बुडणेयाची वार्ता। थडियेचा कीजे ३७ तैसें विवेकाचिये कांठीं। उभें ठाकलिया किरीटी। परावराचिया गोठी। करणें वेदां ३८ ह्मणौनि पुरुषु क्षराक्षरु। दोन्ही देखोनि अवरु। यातें म्हणतीं परु। आत्मरूप ३९ अर्जुना ऐसिया परी। परमात्मा शब्दवरी। सूचिजे गा अवधारीं। पुरुषोत्तमु २४० एन्हवीं न बोलणेनि बोलणें। जेथिंचें सर्व नेणिवा जाणणें। कांहींच न होनि होणें। जे वस्तु गा ४१ सोहं तेही अस्तवलें। जेथ सांगतेंचि सांगणें जालें। द्रष्टृत्वेंसी गेलें। दृश्य जेथ ४२ आतां बिंबा आणि प्रतिबिंबा-। माजि कैंची हें ह्मणों नये प्रभा। जन्ही कैसेनि हे लाभा। जायेचि ना ४३ कां घ्राणा फुला दोहीं। द्रुती असे जे माझारिला ठायीं। ते न दिसे तरी नाहीं। ऐसें बोलों नये ४४ तैसें द्रष्टा दृश्य हें जाये। मग कोण म्हणे काय आहे। होंचि अनुभवें तेंचि पाहे। रूप तया ४५ जो प्रकाश्येंवीण प्रकाशु। जो ईशितव्येंवीण ईशु। आपणेंनीचि अवकाशु। वसवीत असे जो ४६ जो नादें ऐकिजत नादु। स्वादें चाखिजता स्वादु। जो भोगिजतसे आनंदु। आनंदेंचि ४७ जो पूर्णतेचा परिणामु। पुरुषु गा पुरुषोत्तमु। विश्रांती-

अन्वय–उत्तमः पुरुषः तु अन्यः (अस्ति), सः परमात्मा इति उदाहृतः; यः अव्ययः ईश्वरः लोकत्रयं आविश्य तत् बिभर्ति. १७

अर्थ–उत्तम पुरुष तर या दोहोंहून निराळा आहे. त्याला परमात्मा म्हणतात. तो अविनाशी ईश्वरस्वरूप होऊन या जगत्रयांत शिरून त्याचें धारण व पोषण करतो. ॥ १७ ॥

आतां विपरीत ज्ञानानें या विश्वांत उत्पन्न होणाऱ्या ज्या जागृति व स्वप्न या अवस्था, त्या ज्या गाढ अज्ञानांत लय पावतात; २६ तें अज्ञान ज्ञानांत बुडून ज्ञानही पलीकडे गेल्यावर, ज्याप्रमाणें अग्नि लांकडास जाळून मागाहून आपणही नाहींसा होतो, २७ त्याप्रमाणें ज्ञानानें अज्ञान नाहींसें केलें, आणि ब्रह्मस्वरूपाची प्राप्ति करून देऊन तें आपणही नष्ट झालें. मग असें जें जाणणेपणाशिवाय जाणणें उरतें, २८ तें अर्जुना, तो उत्तम पुरुष होय, कीं जो शेवटचा तिसरा ह्मणून सांगितला; आणि जो मागें सांगितलेल्या दोघांहून निराळा होय. २९ अर्जुना, निद्रा आणि स्वप्न यापेक्षां जागृदवस्था जशी निराळ्याच बोधाची असते, ५३० किंवा सूर्यकिरण आणि मृगजल यांहून जसें सूर्यमंडल अगदींच वेगळें,तसा हा उत्तम पुरुष त्या दोघांहून अगदींच वेगळा होय. ३१ इतकेंच नव्हे, तर लांकडांत असलेला अग्नि जसा लांकडापासून वेगळा आहे, तसा क्षर व अक्षर यांहून तो वेगळा आहे. ३२ कल्पांतसमयीं ज्याप्रमाणें समुद्राची मर्यादा नाहींशी होऊन सर्वत्र जलमय झालें म्हणजे नदी व नद सर्व एकत्र होतात. ३३ त्याप्रमाणें, स्वप्न, गाढ झोंप किंवा जागृति यांचा जेथें भास उरत नाहीं; कसा उरत नाहीं ? तर, प्रळयकालच्या तेजानें रात्र व दिवस हीं गिळून टाकावीं, त्याप्रमाणें. ३४ मग अद्वैत किंवा दैत हा भाव रहात नाहीं; असणें व नसणें हेंही उरत नाहीं; आणि जेथें अनुभव घाबरा होऊन नष्ट होतो; ३५ असें जें कांहीं तत्त्व आहे; तें ह्मणजे तो उत्तम पुरुष समज, कीं ज्याला परमात्मा असें म्हणतात. ३६ पण, अर्जुना, तें बोलणेंही येथें न मिळतां जीवदशा पतकरूनच होय. ज्याप्रमाणें कांठावर उभें असलेल्या मनुष्यानें बुडाल्याची वार्ता सांगावी, त्या बुडणाऱ्यावरोबरच जो बुडाला तो काय सांगणार ? ३७ त्याप्रमाणें, अर्जुना, विचाररूपी कांठावर जोंपर्यंत वेद उभे आहेत, तोंपर्यंतच अलीकडच्या किंवा पलीकडच्या गोष्टी बोलण्यास त्यांस शक्ति असते. ३८ म्हणून क्षर व अक्षर पुरुष हे दोन्ही अलीकडचे आहेत, असें पाहून या आत्मस्वरूपाला पर पुरुष असें ह्मणतात. ३९ अशा प्रकारें, अर्जुना, परमात्मा या शब्दानें पुरुषोत्तम ओळखावा, असें तूं समज. ५४० एऱ्हवीं ज्या ठिकाणीं शब्द मावळतो,ज्ञान लोप पावतें, व सर्व व्यापार बंद रहातात अशी जी वस्तु आहे;४१ अहंब्रह्म हा भावही जेथें नाहींसा होतो,तेथें सांगणाराच जें सांगावयाचें तें होतो; आणि द्रष्ट्यासह दृश्य नाहींसें होतें; ४२ आतां, बिंब व त्याचें पाण्यांत पडलेलें प्रतिबिंब यांच्यामध्यें असणारी प्रभा जरी आपल्यास दिसत नाहीं, तरी ती नाहीं असें म्हणतां येत नाहीं; ४३ किंवा नाक व फूल या दोहोंमध्यें जो फुलांचा सुगंध असतो, तो जरी आपल्यास न दिसला तरी नाहीं असें म्हणतां येत नाहीं ! ४४ त्याप्रमाणें द्रष्टा व दृश्य नष्ट झाल्यावर, अमुक वस्तु आहे असें कोण म्हणेल ? पण हेंच अनुभवानें पहाणें तेंच त्याचें रूप होय. ४५ जो प्रकाशित होणाऱ्या वस्तूशिवाय प्रकाशक, व जो नियम्य पदार्थाशिवाय नियमन करणारा असा जो ईश्वर तो आपले स्वरूपांतच आपण असतो. ४६ जो नादब्रह्माला ऐकण्याची शक्ति देणारा नाद, स्वादाला स्वादाची शक्ति देणारा मूळ स्वाद, व जो ब्रह्मानंदाला आनंदाची शक्ति देणारा आनंद; ४७ जो पूर्णत्वाचा शेवट, व सर्व पुरुषांमध्यें श्रेष्ठ पुरुष व

चाही विश्रामु । विराला जेथें ४८ सुखासि सुख जोडिलें । जें तेज तेजा सांपडलें । शून्यही बुडालें । महाशून्यीं जिये ४९ जो विकासाही वरी उरतौं। ग्रासातेंही ग्रासूनि पुरता । जो बहुतें पाडे बहुतां-। पासूनि बहु ५५० पैं नेसा तयाप्रती । रुपेपणाची प्रतीती । रुपें न होनि शुक्ती । दावी जेवीं ५१ कां स्वप्नाअलंकारदशे । सोनें न लपत लपालें असे । विश्व न होनियां तैसें । बिंबु जो धरी ५२ हें असो जलतरंगा । नाहीं सिनानेंपण जेविं गा । तेविं दिसतीं प्रकाशु जगा । आपणचि जो ५३ आपलिया संकोचविकासा । आपणचि रु° वीरेशा । हा जळीं चंद्रु हन जैसा । समग्रु गा ५४ तैसा विश्वपणें कांहीं होयें विश्वलोपीं कहीं न जाये । जैसा रावी दिवसें नोहे। द्विधा रवि ५५ तैसा कांहींचि कोणीकडे । कायिसेनिहि वेंचीं न पडे । जयाचें सांगडें । जयासीचि ५६

यस्मात्क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः । अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितःपुरुषोत्तमः ॥१८॥

जो आपणपेंचि आपणया । प्रकाशीतसे धनंजया। काय बहु बोलों जया। नाहीं दुजें ५७ तो गा मी निरुपाधिकु । क्षराक्षरोत्तमु एकु म्हणोनि म्हणे वेद लोकु । पुरुषोत्तमु ५८

यो मामेवमसंमूढो जानाति पुरुषोत्तमम् । स सर्वविद्भजति मां सर्वभावेन भारत ॥१९॥

पारि हें असो ऐसिया । मज पुरुषोत्तमातें धनंजया । जाणे जो पाहलेया । ज्ञानमित्रें ५९ चेइलिया आपुलें ज्ञान । जैसें नाहींचि होय स्वप्न । तैसें स्फुरतें त्रिभुवन । वावों जालें ५६० कां हातीं घेतलिया माळा । फिटे सर्पाभासाचा कांटाळा । तैसा माझेनि बोधें टवाळा । नागवे तो ६१ लेणें सोनेंचि जो जाणे । तो लेणेंपण तें वावो म्हणे । तेविं मी जाणोनि जेणें । वाळिला भेदु ६२ मग म्हणे सर्वत्र सच्चिदानंदु । मीचि एकु स्वतःसिध्दु । जो आपणेनसीं भेदु । नेणोनियां जाणे ६३ तेणेंचि सर्व जाणितलें । हेंही म्हणणें थेंकुलें । जे तया सर्व उरलें । द्वैत नाहीं ६४ म्हणोनि माझिया भजना । उचितु तोचि अर्जुना । गगन जैसें आलिंगना । गगनाचिया ६५ क्षीरसागरा परगुणें । कीजे क्षीरसागरपणें । अमृतचि होऊनि मिळणें । अमृतीं जेविं ६६ साडेपंधरा मिसळावें । तैं साडेपंधरेंचि होआवें । तेविं मी जालिया संभवे । भक्ति माझी ६७ हां गा सिंधूसि आनी होती । तरि गंगा कैसेनि मिळती । म्हणौनि मी न होतां [illegible] । अन्वयो आहे ६८ ऐसियालागीं सर्व प्रकारीं । जैसा कल्लोळु अनन्यु

विश्रांतीला विश्रांतीचें स्थान; ४८ जें सुखास सुखच जोडलें, तेजास तेज प्राप्त झालें, व शून्य महाशून्यांत लय पावलें; ४९ जो उदय झाल्यावरही यापासून दूर असतो, व लय झाल्यावरही त्याप्रतीकडे असतो. फार काय सांगावें! जो सर्वांहून दूर आहे; ५५० ज्याप्रमाणें शिंपी आपण रुपें नसून अज्ञान्याला रुप्याचा भास करते, ५१ किंवा अलंकाराच्या रूपानें सोनें नाहींसें न होतां नाहीं असें भासतें, त्याप्रमाणें, आपण विश्व न होतां जो विश्व धारण करितो; ५२ हें असो; पाणी व लाटा यांत कांहीं वेगळेपणा आहे का? त्याचप्रमाणें जग व परमात्मस्वरूप वेगळें नाहीं. ५३ हे वीरेशा, जगाच्या संकोचाला व विस्ताराला जो कारण आहे; ज्याप्रमाणें पाण्यांत पडणाऱ्या प्रतिबिंबास सर्वथैव चंद्र कारण असतो. ५४ त्याप्रमाणें, जगाची उत्पत्ति झाली असतां ज्याच्यांत फरक होत नाहीं, व लय झाला असतां जो कोठें जात नाहीं; ज्याप्रमाणें रात्र व दिवस हीं आलीं असतां सूर्यांत कांहीं फरक पडत नाहीं, ५५ त्याप्रमाणें तो कोणांत नसतो, कोणाच्यानेंही नाश पावत नाहीं, आणि ज्याची तुलना करावयास तो स्वतःच योग्य आहे: ५६

अन्वय–यस्मात् अहं क्षरं अतीतः, अक्षरात् अपि च उत्तमः; अतः अहं लोके वेदे च पुरुषोत्तमः इति प्रथितः अस्मि. ॥ १८ ॥

अर्थ–ज्या अर्थी मी क्षराच्या पलीकडला आणि अक्षराहूनही उत्तम आहें; त्या अर्थी मी लोकांमध्यें व वेदांमध्यें पुरुषोत्तम या नांवानें प्रसिद्ध आहें. ॥ १८ ॥

हे धनंजया, जो आपणच आपल्याला प्रकाशित (स्वयंप्रकाश आहे) करितो, फार काय सांगावें! ज्याचे ठिकाणीं द्वैतसंबंध नाहीं, ५७ तें माझें निरुपाधिक रूप असून, क्षर व अक्षर यांच्या पलीकडचा मी आहें. म्हणून मला वेद आणि लोक हे 'पुरुषोत्तम' असें म्हणतात. ५८

अन्वय–भारत, यः असंमूढः मां पुरुषोत्तमं एवं जानाति, सः सर्ववित् (भूत्वा) मां सर्वभावेन भजति. ॥ १९ ॥

अर्थ–अर्जुना, जो ज्ञानी या प्रकारें मला पुरुषोत्तम असें समजतो, तो सर्वज्ञ होऊन सर्वभावेंकरून मला भजतो.

पण हें असो; अर्जुना, अशा मज पुरुषोत्तमाला तोच पुरुष जाणतो, कीं ज्याला ज्ञानरूपी सूर्याचा उजेड झाला आहे. ५९ ज्याप्रमाणें जागृत झाल्यावर आपल्यास स्वप्न भासत नाहीं, त्याप्रमाणें ज्ञानाचा उदय झाल्यावर सर्व जग (बाधीत होऊन जातें) व्यर्थ भासतें. ५६० किंवा माळ हातीं घेतली, ह्मणजे ज्याप्रमाणें तीवर झालेला सर्पाचा भास नाहींसा होतो, त्याप्रमाणें माझें स्वरूपज्ञान झाल्यानें जगाचा मिथ्याभास नाहींसा होतो. ६१ जो सोन्याच्या अलंकाराला सोन्याच्या दृष्टीनें पहातो, तो त्याचें अलंकारत्व व्यर्थ मानतो; त्याप्रमाणें, ज्याला माझें ज्ञान प्राप्त होतें, त्याला ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान ही त्रिपुटी नाहींशी होते. ६२ मग म्हणतो, 'मीच एक स्वतःसिद्ध सच्चिदानंद सर्वत्र आहें.' अशा अद्वैतदृष्टीनें आपला सुद्धां भेद न ठेवतां जो मला जाणतो, ६३ त्यानेंच सर्व जाणलें हें ह्मणणें देखील शोभत नाहीं. कारण, त्याला सर्व शब्दाला विषय जें द्वैत तेंही उरलें नाहीं. ६४ ह्मणून, अर्जुना, तोच माझें भजन करण्यास अधिकारी होय. ज्याप्रमाणें आकाशास आलिंगन देण्यास आकाशच योग्य होय; ६५ क्षीरसागराला ज्याप्रमाणें क्षीरसागरपणानेंच मेजवानी करणें योग्य होय; अथवा ज्याप्रमाणें अमृतरूप होऊनच अमृतास मिळावें लागतें; ६६ उत्तम सोन्यांत उत्तम सोनेंच मिसळल्यावर त्याची एक किंमत लागते; त्याप्रमाणें मद्रूप झाल्यावरच माझी भक्ति करण्यास पुरुष योग्य होतो. ६७ असें पहा कीं, समुद्राहून गंगा जर निराळी असती, तर ती समुद्राला कशी मिळाली असती? म्हणून मद्रूप झाल्याशिवाय माझी भक्ति करणें शक्य आहे काय? ६८ याप्रमाणें, समुद्रांतील लाटा जशा सर्व प्रकारें समुद्राहून भिन्न नाहींत, त्याप्रमाणें जो माझें भजन क-

सागरीं । तैसा मातें अवधारीं । भजिन्नला जो ६९ सूर्या आणि प्रभे । एकवंकी जेणें लोभें । तो पाडु मानूं लाभे । भजना तया ५७०

इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ । एतद्बुध्वा बुद्धिमान्स्यात्कृतकृत्यश्च भारत ॥२०॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे पुरुषोत्तमयोगो नाम पंचदशोऽध्यायः १५

एवं कथिलयादारभ्य । जें हें सर्व शास्त्रैकलभ्य । उपनिषदां सौरभ्य । कमळदळां जेविं ७१ हें शब्दब्रह्माचें मथितें । श्रीव्यासप्रज्ञेचेंनि हातें । मथूनि काढिलें आयितें । सार आह्मीं ७२ जे ज्ञानामृताची जान्हवी । जे आनंदचंद्रींची सतरावी । विचारक्षीरार्णवींची नवी । लक्ष्मी जे हे ७३ ह्मणोनि आपुलेनि पदें वर्णें । अर्थाचेनि जीवेंप्राणें । मीवांचोनि हों नेणें । आन कांहीं ७४ क्षराक्षरत्वें समोर जाले । तयाचें पुरुषत्व वाळिलें । मग सर्वस्व मज दिधलें । पुरुषोत्तमीं ७५ ह्मणौनि जगीं गीता । मियां आत्मेनि पतिव्रता । जे हे प्रस्तुत तुवां आतां । आकर्णिली ७६ साचाचि बोलाचें नव्हे हें शास्त्र । पैं संसारु जिणें हें शस्त्र । आत्मा अवतरवी ते मंत्र । अक्षरें इयें ७७ परि तुजपुढां सांगितलें । तें अर्जुना ऐसें जालें । जें गौप्यधन काढिलें । माझें आजि ७८ मज चैतन्यशंभूचा माथा । जो निक्षेपु होता पार्था । तया गौतमु जालासि आस्था- । निधी तूं गा ७९ चोखटिवा आपुलिया । पुढिला उगाणा घेयावया । तया दर्पणाचीचि परी धनंजया । केली आम्हां ५८० कां भरलें चंद्रतारांगणीं । नभ सिंधू आपणयामाजि आणी । तैसा गीतेंसीं मी अंतःकरणीं । सूदला तुवां ८१ जे त्रिविधमळिकटा । तूं सांडिलासि सुभटा । ह्मणौनि गीतेंसीं मज वसौटा । जालासि गा ८२ परि हें बोलों काय गीता । जे हे माजी उन्मेषलता । जाणे तो समस्ता । मोहा मुके ८३ सेविली अमृतसरिता । रोगु दवडूनि पंडुसुता । अमरपण उचितां । देऊनि घाली ८४ तैसी गीता हे जाणितलिया । काय विस्मयो मोह जावया । परि आत्मज्ञानें आपणपयां । मिळिजे येथ ८५ जया आत्मज्ञानाच्या ठायीं । कर्म आपुलेया जीविता पाहीं । होऊनियां उतराई । लया जाय ८६ हरपलें दावूनि जैसा । माग सरे वीरविलासा । ज्ञानचि कळस वळघे तैसा । कर्मप्रासादाचा ८७ ह्मणौनि ज्ञानिया पुरुषा । कृत्य करूं सरलें देखा । ऐसा अनाथाचा सखा । बोलिला तो ८८ तें श्रीकृष्णवचनामृत । पार्थीं भरोनि असे वोसंडत । मग व्यासकृपा प्राप्त संज-

रतो, त्याच्यांत व माझ्यांत द्वैत नसतें. ६९ सूर्य आणि प्रभा यांच्यांत जसें ऐक्य आहे, तसें माझें भजन केलें असतां माझ्यांत व भक्तांत अंतर रहात नाहीं. ५७०

अन्वय–अनघ, इति इदं गुह्यतमं शास्त्रं मया उक्तम् ; भारत, एतत् बुद्ध्वा (जीवः) बुद्धिमान् कृतकृत्यः च स्यात् ॥ २० ॥

अर्थ–हे निष्पापा, याप्रमाणें असें हें अत्यंत गुह्य शास्त्र मीं तुला सांगितलें; अर्जुना, हें जाणल्यानें मनुष्य बुद्धिमान् आणि कृतकृत्य होईल. ॥ २० ॥

याप्रमाणें पंधराव्या अध्यायांत सांगावयास आरंभ केल्यापासून सर्व शास्त्रांनींच प्राप्त होणारा असा उपनिषद्रूपी कमलदलांतून गीतारूपी सुवास सर्व जगभर फांकला; ७१ जी गीता वेदांचें मंथन करून श्रीव्यास मुनींच्या ज्ञानरूप हातानें काढलेल्या लोण्याप्रमाणें होय; ७२ जी गीता ज्ञानामृतानें भरलेली दुसरी भागीरथी नदीच होय; व आनंदरूपी चंद्राची सतरावी कला होय व विचाररूपी क्षीरसागराचें मंथन करून काढलेली नवीन लक्ष्मीच होय. ७३ ह्मणून ही गीता आपल्या पदानें, वर्णानें किंवा अर्थाच्या जीवप्राणानें माझ्यावांचून दुसऱ्याला मिळत नाहीं, मद्रूपच होते, ७४ हिच्यासमोर क्षर व अक्षर पुरुष प्राप्त झालें असतां त्यांचें पुरुषत्व गीतारूप लक्ष्मीला पटलें नाहीं, ह्मणून त्यांना एके बाजूस सारून तिनें आपलें सर्वस्व पुरुषोत्तमाला अर्पण केलें ७५ म्हणून, हल्लीं जी तूं गीता ऐकलीस, तिनें मलाच वरल्यामुळें जगतांत पतिव्रता हें नांव मिळविलें. ७६ खरोखर, ही गीता म्हणजे बोलून वर्णन करण्याजोगें शास्त्र नाहीं; परंतु संसाराला जिंकण्याचे एक शस्त्रच आहे. गीतेचीं अक्षरें हीं आत्मभाव उत्पन्न करणारे मंत्रच होत. (आत्मप्राप्ति करून देण्याची हिच्या अक्षरांत शक्ति आहे. ७७ अर्जुना, तुला जी ही गीता सांगितली, तो प्रकार कसा झाला ह्मणशील, तर माझे जवळील गुप्त ठेवा तूं आज बाहेर काढलास. ७८ ज्याप्रमाणें गौतम मुनींनीं तपश्चर्या करून शंकराचे जटेंतून गंगा वर काढली, त्याप्रमाणें जो चैतन्यशंभु मी, त्या माझे जटेंतून गीतारूपी गंगा काढण्यास श्रद्धावान् तूं गौतम झालास. ७९ आपले चांगलेपणाचा अनुभव घेण्यास जना आरसा समोर द्यावा लागतो, तसा हे धनंजया, आत्मस्वरूप पहाण्यास तूं हा गीतारूप आरसाच केलास. ५८० ज्याप्रमाणें आकाशांतील चंद्र व नक्षत्रें हीं सर्व समुद्रांत प्रतिबिंबित होतात, त्याप्रमाणें गीतेसह मला तूं आपल्या अंतःकरणांत प्रतिबिंबित केलेंस. ८१ अर्जुना, तुझ्या ठिकाणचा त्रिविधतापरूपी मळ गेल्यामुळें तूं गीतेसह माझें रहाण्याचें ठिकाण झाला आहेस. ८२ परंतु, फार काय सांगावें ! गीता ही केवळ माझी ज्ञानवल्ली आहे; व तिला जो जाणतो, तो या संसारमोहापासून मुक्त होतो. ८३ हे पांडुसुता, ज्याप्रमाणें अमृतरूपी नदीचें पाणी प्याल्यावर रोग नाहींसा होऊन योग्य असें अमरपण प्राप्त होतें, ८४ त्याप्रमाणें गीता पूर्णपणें समजल्यावर मोहाचा नाश होतो, यांत आश्चर्य तें काय ? परंतु, आत्मज्ञानाच्या प्राप्तीनें आत्मस्वरूपाशीं ऐक्य होतें. ८५ जें आत्मज्ञान प्राप्त झालें असतां कर्मच आपोआप निष्कर्म होतें, व तें ज्ञानाचें उतराई होऊन लय पावतें; ८६ हे वीरविलासा अर्जुना, ज्याप्रमाणें हरवलेली जिन्नस दाखवून माग नाहींसा होतो, त्याप्रमाणें कर्मरूपी देवळाचा ज्ञानच कळस होतो. ८७ म्हणून, ज्ञान प्राप्त झालेल्या पुरुषांचीं कर्में सर्व संपतात. अनाथाचा सखा जो श्रीकृष्ण भगवान् तो याप्रमाणें बोलला. ८८ असें जें श्रीकृष्णवदनांतील अमृतरूपी भाषण पार्थाचे मनांत ठसून वर उतूं आलें, तेंच व्यासांच्या कृपेनें संजयास प्राप्त झालें.

यासी ८९ तो धृतराष्ट्र राया । सूतसे पान करावया । म्हणौनि जीवितांतया । नोहेचि भारी ५९० एऱ्हवीं गीताश्रवण अवसरीं । आवडों लागतां अनधिकारी । परि सेखीं तेचि उजरी । पातला भली ९१ जेव्हां द्राक्षीं दूध घातलें । तेव्हां वायां गेलें गमलें । परि फळपाकीं दुणावलें । देखिजे जेविं ९२ तैसीं श्रीहरिवक्त्रींचीं अक्षरें । संजयें सांगितलीं आदरें । तिहीं अंधु तोही अवसरें । सुखिया जाला ९३ तेंचि मऱ्हाटेनि विन्यासें । मियां उन्मेषें ठसेंठोंबसें । जी जाणें नेणें तैसें । निरोपिलें ९४ सेवंतीये अरिसि कांहीं । आंग पाहतां विशेषु नाहीं । परि सौरभ्य नेलें तिहीं । भ्रमरीं जाणिजे ९५ तैसें घडतें प्रमेय घेइजे । उणें तें मज देइजे । जें नेणणें हेंचि सहजें । रूप कीं बाळा ९६ तरि नेणतें जऱ्ही होये । तऱ्ही देखोनि बाप कीं माये । हर्ष केंही न समाये । चोज करिती ९७ तैसें संत माहेर माझें । तुम्हीं मिनलिया मी लाडें जें । तेंचि ग्रंथाचेनि व्याजें । जाणिजो जी ९८ आतां विश्वात्मकु हा माझा । स्वामी श्रीनिवृत्तिराजा । तो अवधारु वाक्यपूजा । ज्ञानदेवो म्हणे ५९९

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥ श्लोक २०, ओंव्या ५९९.

८९ तें अमृत धृतराष्ट्र राजास संजय पाजीत असतां, तें योग्यतेचें आहे असें त्याला वाटलें नाहीं. ५९० एन्हवीं, अनधिकारी धृतराष्ट्रास सहज गीता-श्रवण झालें, तरी त्याचा शेवट गोड झाला. ९१ द्राक्षाचे वेलास पाण्याचे ऐवजीं दूध घालते वेळीं तें ज्याप्रमाणें व्यर्थ गेलेंसें वाटतें, परंतु तेंच त्या वेलास द्राक्षांचे घोंस आले, म्हणजे परिणाम गोड दिसतो. ९२ त्याप्रमाणें, श्रीहरींच्या मुखांतील अक्षरें संजयानें अति आदरानें धृतराष्ट्रास सांगिल्यावर कांहीं कालानें तोही सुखी झाला. ९३ तींच अक्षरें मी ओवडधोबड मराठी भाषेंत, ज्याप्रमाणें मला समजलीं, त्याप्रमाणें सांगितलीं. ९४ कांटे सेवतीचें आंग पाहिलें असतां त्यांत कांहीं विशेष दिसत नाहीं, परंतु त्यांतील विशेष सुगंध नेणाऱ्या भ्रमरांनाच माहिती आहे. ९५ त्याप्रमाणें, माझ्या बोलण्यांत जे योग्य सिद्धांत असतील तेच आपण घ्यावे, व उणे असतील ते टाकून द्यावे; कारण लहान बाळाला कांहीं न समजणें हेंच त्याचें स्वरूप होय, ९६ परंतु नेणतें जरी बाळ असलें, तरी त्याचें तें अज्ञान पाहून, आईबापांस अति हर्ष होऊन ते कौतुक मानितात. ९७ त्याचप्रमाणें, तुम्ही संत माझे आईबाप आहां, तुमचीं प्रार्थी झाल्यावरोवर मी जें तुमच्यापुढें कौतुकानें बागतों, तोच हा ग्रंथ आहे, असें तुम्हीं समजा. ९८ महाराज म्हणतात:—आतां, विश्वव्यापक असे जे माझे गुरु श्रीनिवृत्तिनाथ, ते ही माझी वाक्यरूपी पूजा सेवन करोत. ५९९.

ज्ञानेश्वरी.

अध्याय सोळावा.

मावळवीत विश्वाभासु । नवल उदयला चंडांशु । अद्वयाब्जिनीविकाशु । वंदूं आतां १ जो अविद्यारातीं रुसोनियां । गिळी ज्ञानाज्ञानचांदणियां । जो सुदिनु करी ज्ञानियां । स्वबोधाचा २ जेणें विवळतिये सवळे । लाहोनि आत्मज्ञानाचे डोळे । सांडिती देहाहंतेचीं अविसाळें । जीवपक्षी ३ लिंगदेह कमळाचा । पोटीं वेंचु तया चिद्भ्रमराचा । बंदि मोक्षु जयाचा । उदैला होय ४ शब्दाचिया आसकडीं । भेदनदीच्या दोहीं थडीं । आरडा ते विरहवेडीं । बुद्धिबोधु ५ तया चक्रवाकांचें मिथुन । सामरस्याचें समाधान । भोगवी जो चिद्गगन । भुवनदिवा ६ जेणें पाहालिये पाहांटे । भेदाची चोर वेळ फिटे । रिघती आत्मानुभववाटे । पांथिक योगी ७ जयाचेनि विवेककिरणसंगें । उन्मेखसूर्यकांत फुणगे । दीपले जाळिती दांगें । संसाराचीं ८ जयाचा रश्मिपुंजु निबरु । होता स्वरूप उखरीं स्थिरु । ये महासिद्धीचा पूरु । मृगजळ तें ९ जो प्रत्यग्बोधाचिया माथया । सोहंतेचा मध्यान्हीं आलिया । लपे आत्मभ्रांति छाया । आपणपां तळीं १० ते वेळीं विश्वस्वप्नासहितें । कोण अन्यथामती निद्रेतें । सांभाळी नुरेचि जेथें । मायाराती ११ म्हणौनि अद्वयबोधपाटणीं । तेथ महानंदाची दाटणी । मग सुखानुभूतीचीं घेणीं देणीं । मंदावों लागती १२ किंबहुना ऐसैसें । मुक्तकैवल्य सुदिवसें । सदा लाहिजे कां प्रकाशें । जयाचेनि १३ जो निजधामव्योमींचा रावो । उदैलाचि उदैजतखेंवो । फेडी पूर्वादि दिशांसि ठावो । उदोअस्तूचा १४ न दिसणें दिसणेंनसीं मावळवी । दोहीं झांकिलें तें सैंघ पालवी । काय बहु बोलों ते आघवी । उखाचि आनी १५ तो अहोरात्रांचा पैलकडु । कोणें देखावा ज्ञानमार्तंडु । जो प्रकाश्येंवीण सुरवाडु । प्रकाशाचा १६ तया चित्सूर्या श्रीनिवृत्ती । आतां नमो म्हणों पुढतपुढती । जे बाधका येइजतसे स्तुती । बोलाचिया १७ देवाचें महिमान पाहोनियां ।

ज्ञानेश्वरी.

अध्याय सोळावा.

श्रीसद्गुरूला सूर्याची उपमा देऊन महाराज ह्मणतात:—जगाचा भास नाहींसा करणारा व अद्वैतरूप कमलाला उमलविणारा असा चमत्कारिक सूर्योदय झाला आहे, त्याला माझा नमस्कार असो. १ जो सूर्य उगवल्यामुळें अज्ञानरूप रात्रीचा नाश करून व ज्ञानाज्ञानरूपी चांदण्या नाहींतशा करून ज्ञानी लोकांस आत्मबोधाचा सुदिन करतो; २ जो सूर्य उगवल्यामुळें आत्मज्ञानाचा प्रकाश होऊन जीवरूप पक्षी देहाभिमानरूप घरटीं सोडून जातात; ३ वासनात्मक सूक्ष्मदेहरूपी कमलांत जीवचैतन्यरूपी भ्रमर जो अडकलेला असतो, तो ज्या सूर्याच्या उगवण्यामुळें बाहेर पडतो; ४ शास्त्रादिकांच्या शब्दरूप अडचणींमध्यें सांपडतांच अज्ञानरूप सायंकाळ झाल्यामुळें ज्या बुद्धि व ज्ञान या चक्रवाक पक्ष्यांच्या जोड्याची फुटाफूट होऊन तीं उभयतां जीवेश्वरभेदरूप नदीच्या दोन्ही कांठांवर वियोगदुःखानें ओरडत असतात, ५ त्या बुद्धिबोधरूपी चक्रवाक पक्ष्यांचें जोडपें ब्रह्मरूप आकाशांत ह्या सूर्योदयाच्या प्रकाशामुळें एकत्र होऊन समाधान पावतें. ६ ज्या श्रीगुरुरूप सूर्याचा उदय झाल्यावर भेदरूपी चोरांची भीति नाहींशी होऊन, योगी हेच पांथस्थ आत्मानुभवरूप वाट चालावयास लागतात; ७ ज्या सूर्याच्या विवेकरूपी किरणानें ज्ञानरूपी सूर्यकांत प्रदीप्त होऊन संसाररूपी वनें जाळून टाकतो; ८ ज्या सूर्याच्या प्रखर किरणांनीं आत्मस्वरूपी माळ जमीनीवर मृगजळाप्रमाणें महासिद्धींचा दूर आलेला दिसतो; ९ जो आत्मबोधाच्या माध्यावर मोहरूपी माध्यान्हाच्या वेळीं आल्यामुळें देहात्मभावाची ह्मणजे 'मी देह आहें' ही भ्रांतीची छाया पायाखालीं नाहींशी होते. १० ज्या वेळेस मायारूपी रात्र नाहींशी झाल्यामुळें विश्वरूपी स्वप्नासह विपरीत ज्ञानरूपी निद्रेची आठवण कोठून राहणार? ११ ह्मणून, अद्वयबोधरूपी नगरांत महानंदाची गर्दी होऊन आनंदानुभवाची देववेवही मंद होऊं लागते, १२ किंबहुना याप्रमाणें मोक्षकैवल्य सुदिन नेहमीं ज्या सूर्याच्या तेजामुळें प्रकाशित होतो; १३ जो सूर्य आत्मस्वरूपी आकाशाचा राजा असून नेहमीं बोधाचा उदय करणारा आहे, तो पूर्वादि दिशांसह उदय व अस्त यांचें अस्तित्व नाहींसें करतो. १४ ज्ञानासकट अज्ञान नाहींसें करून, शेवटीं ज्ञानाचाही लोप करून आत्मज्ञानाचा उजेड करितो. फार काय सांगावें! तो उदय कांहीं निराळाच आहे. १५ ज्या सूर्याच्या तेजापुढें दिवस व रात्र यांचा भास होत नसून, जो दुसऱ्या प्रकाशाशिवाय स्वयंप्रकाशित असतो; १६ असे चैतन्यरूपी सूर्य जे निवृत्ति महाराज, त्यांना वारंवार माझा नमस्कार असो. श्रीज्ञानेश्वरमहाराज आणखी ह्मणतात, त्यांचीं वाणीनें स्तुति करणें शोभत नाहीं. १७ ज्या वेळेस स्तुति करणारा, स्तोत्र व स्तुत्य ही त्रिपुटी नाहींशी होते,

स्तुती तरि येइजे चांगावया । जरि स्तव्यबुद्धीसीं लया । जाइजे कां १८ जो सर्वनेणिवां जाणिजे । मौनाचिया मिठीया वानिजे । कांहींच न होनि आणिजे। आपणपयां जो १९ तया तुझिया उद्देशासाठीं । पश्यंती मध्यमा पोटीं । सूनि परेसींही पाठीं । वैखरी विरे २० तया तूतें मी सेवकपणें । लेववीं बोलकेया स्तोत्राचें लेणें । हें उपहासावेंही म्हणतां उणें । अद्वयानंदा २१ परि रंकें अमृताचा सागरु । देखिलिया उचिताचा पडे विसरु । मग करूं धांवे पाहुणेरु । शाकांचा तया २२ तेथ शाकुही कीर बहुत म्हणावा । तयाचा हर्षवेगुचि तो घ्यावा । उजळोनि दिव्यतेजा हातिवा । ते भक्तीचि पाहावी २३ बाळा उचित जाणणें होये । तरि बाळपणाचि कें आहे । परि साचचि येरी माये । म्हणोनि तोषे २४ हां गा गावरसें भरलें । पाणी पाठीं पाय देत आलें । तें गंगा काय म्हणितलें । परतें सर २५ जी भृगूचा कैसा अपकारु । कीं तो मानूनि प्रियोपचारु । तोषेचिना शार्ङ्गधरु । गुरुत्वासी २६ कीं आंधारें खतेलें अंबर । झालेया दिवसनाथासमोर । तेणें तयातें पन्हां सर । म्हणितलें काई २७ तेवीं भेदबुद्धीचिये तुळे । घालूनि सूर्यश्लेषाचे कांटाळें । तुकिलासि तें येकी वेळे । उपसाहिजो जी २८ जिहीं ध्यानाचा डोळां पाहिलासी । वेदादि वाचां वानिलासी । जें उपसाहिलें तयांसी । तें आह्मांही करीं २९परि मी आजि तुझ्या गुणीं। लांचावलों अपराधु न गणीं । भलतें करीं परी अर्धघणीं । नुठीं कदा ३० मियां गीता येणें नांवें । तुझें पसायामृत सुहावें । वानूं लाधलों तें दुणेन थावें । दैवलों दैवें ३१ माझिया सत्यवादाचें तप । वाचा केलें बहुत कल्प । तया फळाचें हें महाद्वीप । पातली प्रभु ३२ पुण्यें पोशिलीं असाधारणें । तियें तुझे गुण वानणें । देवूनि मज उत्तीर्णें । जालीं आजि ३३ जी जीवित्वाच्या आडवीं । आतुडलों होतों मरणगांवीं । ते अवदसाचि आघवी । फेडिली आजी ३४ जे गीता येणें नांवें नावाणिगी । जे अविद्या जिणोनि दाटुगी । ते कीर्ति तुझी आह्मांजोगी । वानावया जाली ३५ पैं निर्धना घरीं वानिवसें । महालक्ष्मी येऊनि बैसे । तयातें निर्धन ऐसें । म्हणों ये काई ३६ कां अंधकाराचिया ठाया । दैवें सूर्यु आलिया । तो अंधारुचि जगा यया । प्रकाशु नोहे ३७ जया देवाची पाहतां थोरी । विश्व परमाणुही दशा न धरी । तो भावाचिये सरोभरी । नव्हेचि काई ३८ तैसा मी गीता वाखाणीं । हे खपुष्पाची तुरंबणी । परि समर्थें तुवां

तेव्हांच देवाच्या योग्यतेचे मानानें खरी स्तुति होते' १८ सर्व वस्तूंचें ज्ञान नाहींसें होणें हेंच ज्याला जाणणें होय, व मौन धरून कांहींएक वर्णन न करणें हेंच ज्याचें वर्णन करणें होय; आणि जेव्हां आपलेपणाची आठवण नाहींशी होते, त्या वेळेस ज्याची प्राप्ति होते, १९ त्या तुमची स्तुति करण्याकरितां पश्यंती व मध्यमा ह्या परेसह वैखरीस पाठीं घालून लय पावतात. २० त्या तुम्हांला, हे अद्वयानंदरूपी गुरो, मी सेवक या नात्यानें स्तुतिरूप अलंकार घालतों. हें घालणें जरी आपल्या योग्यतेच्या मानानें कमी आहे, तरी त्याचा आपण स्वीकार करावा. २१ एकाद्या दरिद्र्यानें अमृताचा सिंधु पाहिल्यावर त्याच्या योग्यतेनुसार त्याचा काय पाहुणचार करावा, ह्याचें भान न राहून तो जसा भाजीपाल्याचीच मेजवानी करतो; २२ त्या ठिकाणीं, भाजीपाला हेंच पक्वान्न समजून त्याची पाहुणचार करण्याची पूर्ण इच्छा, तींच विशेष मानली पाहिजे; अथवा सूर्याला काडवातीनें त्याच्या दिव्य तेजापुढें कोणी ओवाळूं लागला असतां, त्या ठिकाणीं काडवातीच्या उजेडाचा कमीपणा मनांत न आणतां, त्याची भक्तिच विशेष मानली पाहिजे. २३ लहान बालकाला योग्य व अयोग्य हें जर समजलें, तर मग बाळपण तें काय? म्हणून, त्याच्या कृत्याचेच मातुश्री कौतुक मानून संतोष पावते. २४ असें पहा—नाल्याच्या पाण्याचे लोट गंगेच्या पाण्यावर पाय देऊन आंत घुसले, तर ती त्याला नको येऊं किंवा परत जा असें म्हणते का? २५ भृगु ऋषींनीं श्रीकृष्णांच्या हृदयावर लाथ मारली, हा खरोखर पाहूं गेलें असतां केवढा अन्याय त्यांनीं केला? परंतु उलटा तोच प्रेमानें अलंकार समजून श्रीकृष्णांनीं आपल्या हृदयावर गुरुप्रसाद म्हणून श्रीवत्सलांच्छन चिन्ह बाळगलें! २६ किंवा अंधारानें भरलेलें जग सूर्योदय झाल्याबरोबर उजेडानें भरतें, त्या वेळेस सूर्यानें अंधारास 'मागें सर' म्हणून म्हटलें आहे का? २७ त्याचप्रमाणें, तुमच्या ठिकाणीं भेदबुद्धीची तराजू करून तुम्हांस सूर्याबरोबर पारड्यांत घालून तुलना केली, हा माझे हातून घडलेल्या अपराधाची, गुरो, आपण क्षमा करा. २८ योग्यांनीं ध्यान करून तुमची प्राप्ति करून घेतली, व वेदांनीं आपल्या वाचेनें तुमचें वर्णन केलें, ह्या गोष्टी जशा तुम्हीं सहन केल्या, त्याप्रमाणें, मीं जी तुमची तुलना केली, त्याची क्षमा करा. २९ परंतु तुमचे गुणानुवाद वर्णन करण्यास प्रवृत्त झालों आहें, तर तो माझा अपराध न समजतां, काय पाहिजे तें करा, परंतु मी अर्धपोटीं उठणार नाहीं. ३० मी गीतारूप प्रसादामृताचें आवडीनें वर्णन करूं लागलों, तों तुमच्या कृपेनें मला दुप्पट बळ आलें. ३१ प्रभो, माझ्या वाचेनें अनंत जन्मीं सत्यभाषणरूप तप केलें. त्याचें फळ हें गीतानामक महाद्वीप मला मिळालें. ३२ मीं आजपर्यंत जी बहुत पुण्याई केली, तिनें तुमचे गुणानुवाद वर्णन करणें, हेंच फळ मला देऊन ती माझी उतराई झाली. ३३ मी देह संबंधाच्या अरण्यांत—जेथें जन्ममरण घ्यावें लागतें, तेथें सांपडलों होतों. ती सर्व माझी पीडा आज दूर झाली. ३४ जी 'गीता' या नांवानें प्रसिद्ध आहे, व अविद्येचा नाश करून बळवान् झाली आहे, ती तुमची कीर्ति आम्हीं वर्णन करण्यासारखी आहे. ३५ दरिद्र्याचे घरीं अकस्मात् महालक्ष्मी आली, तर मग त्याला दरिद्री म्हणतां येईल काय? ३६ अथवा अंधाराच्या घरीं दैवयोगानें सूर्य पाहुणा आला, तर तोच अंधकार जगाला प्रकाशमय होत नाहीं का? ३७ ज्या ईश्वराच्या योग्यतेपुढें जग हें परमाणूएवढेंही दिसत नाहीं, तो ईश्वर मक्तीनें पाहिजे तें रूप धारण करीत नाहीं काय? ३८ त्याप्रमाणें, माझें गीतेचें व्याख्यान म्हणजे आकाशाच्या पुष्पाचा वास घेण्यासारखी अघटित करणी होय; परंतु आपण समर्थ अ-

शिरयाणी । फेडिली ते ३९ ह्मणौनि तुझेनि प्रसादें । मी गीतापद्यें अगाधें । निरूपीन जी विशदें । ज्ञानदेवो म्हणे ४० तरि अध्यायीं पंधरावा । श्रीकृष्णें तया पांडवा । शास्त्रसिद्धांतु आघवा । उगाणिला ४१ जे वृक्षरूपक पारिभाषा । केलें उपाधिरूप अशेषा । सद्वैद्यें जैसें दोषा । अंगलीना ४२ आणि कूटस्थु जो अक्षरु । दाविला पुरुषप्रकारु । तेणें उपहिताही आकारु । चैतन्या केला ४३ पाठीं उत्तम पुरुष । शब्दाचें करूनि मिष । दाविलें चोख । आत्मतत्त्व ४४ आत्मविषयीं आंतुवट । साधन जें आंगदट । ज्ञान हेंही स्पष्ट । चावळला ४५ ह्मणौनि इये अध्यायीं । निरूप्य नुरेचि कांहीं । आतां गुरुशिष्यां दोहीं । स्नेहो लाहणा ४६ एवं इयेविषयीं कीर । जाणते बुझावले अपार । परि मुमुक्षु इतर । साकांक्ष जाले ४७ त्या मज पुरुषोत्तमा । ज्ञानें भेटे जो सुवर्मा । तो सर्वज्ञु तोचि सीमा । भक्तीचीही ४८ ऐसें हें त्रैलोक्यनायकें । बोलिलें अध्यायांत श्लोकें । तेथें ज्ञानचि बहुतेकें । वानिलें तोषें ४९ भरूनि प्रपंचाचा घोंटु । कीजे देखतांचि देखतया द्रष्टु । आनंदसाम्राज्यीं पाटु । बांधिजे जीवा ५० येवढेया लाठेपणाचा उपावो । आनु नाहींचि म्हणे देवो । हा सम्यक् ज्ञानाचा रावो । उपायांमाजि ५१ ऐसे आत्मजिज्ञासु जे होते । तिहीं तोषलेनि चित्तें । आदरें तया ज्ञानातें । वोंवाळिलें जीवें ५२ आतां आवडी जेथ पडे । तयाची अवसरी पुढें पुढें । रिगों लागे हें घडे । प्रेम ऐसें ५३ ह्मणौनि जिज्ञासूंच्या पैकीं । ज्ञानी प्रतीति होय ना जंव निकी । तंव योग क्षेमु ज्ञानाविखीं । स्फुरेलचि कीं ५४ ह्मणोनि तेंचि सम्यक् ज्ञान । कैसेनि होय स्वाधीन । जालिया वृद्धियत्न । घडेल केवीं ५५ कां उपजोंचि जें न लाहे । जें उपजलेंही अव्हांटा सूये । तें ज्ञानीं विरुद्ध काय आहे । हें जाणावें कीं ५६ मग जाणतया जें विरू । तयाची वाट वाहती करूं । ज्ञानाहित तेंचि विचारूं । सर्वभावें ५७ ऐसा ज्ञानजिज्ञासु तुम्ही समस्तीं । भावो जो धरिला असे चित्तीं । तो पुरवावया लक्ष्मीपती । बोलिजेल ५८ ज्ञानासि सुजन्म जोडे । आपली विश्रांतिही वरी वाढे । ते संपत्तीचे पवाडे । सांगिजेल दैवी ५९ आणि ज्ञानाचेनि कामाकारें । जे रागद्वेषांसि दे थारे । तिये आसुरियेहि घोरे । करील रूप ६० सहज इष्टानिष्टकरणी । दोघींचि इया कवतुकिणी । हे नवमाध्यायीं उभारणी । केली होती ६१ तेथ साउमा घेयावया उवावो । तंव वोडवला आन प्रस्तावो । तरी तया प्रसंगें आतां देवो ।

सल्यामुळें माझी हौस पूर्ण केली. ३९ म्हणून, महाराज म्हणतात, तुमच्या प्रसादानें गीतेंतील सर्व श्लोकांचा अर्थ मी स्पष्ट सांगेन. ४० तरी पंधराव्या अध्यातांत श्रीकृष्णांनीं अर्जुनास सर्व शास्त्रसिद्धांत स्पष्ट करून सांगितला. ४१ ज्याप्रमाणें अंगांत मुरलेल्या रोगाची उत्तम वैद्यानें चिकित्सा करून निदान ठरवावें, त्याप्रमाणें, ब्रह्म हें मायेच्या उपाधीनें जगद्रूप धारण करतें, त्याची वृक्षाबरोबर तुलना केली; ४२ आणि अविनाशी असा जो देहांतील जीवात्मा, तो पुरुष या शब्दानें स्पष्ट करून सांगितला. त्यानें उपाधियुक्त जें चैतन्य त्याचेंही ज्ञान करून दिलें. ४३ नंतर, केवळ शुद्ध जें आत्मतत्त्व (ब्रह्म) त्याला उत्तम पुरुष या शब्दानें स्पष्ट केलें. ४४ आत्मप्राप्तीकरितां बळकट साधन जें ज्ञान, तेंही स्पष्ट करून सांगितलें. ४५ म्हणून या अध्यायांत निरूपण करण्याचें कांहीं उरलें नाहीं, परंतु गुरु व शिष्य यांच्या स्नेहातिशयामुळें बोललेलीच गोष्ट पुनः बोलण्यांत येते. ४६ याप्रमाणें, पंधराव्या अध्यायांत सांगितलेल्या सर्व गोष्टी ज्ञान्यांना पूर्ण रीतीनें समजल्या, परंतु इतर जे मुमुक्षु होते, त्यांची शंका निवारण झाली नाहीं. ४७ ' असा जो मी पुरुषोत्तम, त्याला जो मर्मज्ञ ज्ञानाची प्राप्ति करून घेऊन भेटतो, तो सर्वज्ञ, व तोच माझा खरा भक्त होय. ' ४८ असें त्रैलोक्यनायक भगवान् श्रीकृष्णांनीं पंधराव्या अध्यायाच्या शेवटल्या श्लोकांत परम संतोषानें ज्ञानाचें विशेष वर्णन केलें आहे. ४९ संसाराचा घोट घेऊन ब्रह्माचें दर्शन होण्याबरोबर, पहाणारा ब्रह्मरूप होऊन जीवाला आनंदरूपी राज्याचा पट्टाभिषेक होतो, ५० असा ज्ञानप्राप्तीचा दुसरा बलवत्तर उपाय नाहीं, व सर्व उपायांत यथार्थ ज्ञान हा राजा आहे, असें श्रीकृष्ण म्हणाले. ५१ याप्रमाणें, आत्मज्ञानप्राप्तीची इच्छा करणारे जे होते, त्यांना संतोष होऊन त्यांनीं आपले प्राण ज्ञानावरून ओंवाळून टाकले. ५२ आतां, ज्यावद्दल आवड उत्पन्न होते, त्या वस्तूवद्दल अधिकाधिकच विचार उत्पन्न होतात, असें प्रेमाचें लक्षणच आहे. ५३ म्हणून, जिज्ञासूंपैकीं ज्यांना केवळ ज्ञानाचा अनुभव नव्हता, त्यांना, ज्ञान प्राप्त करून घेऊन त्याचें रक्षण कसें करावें, अशी काळजी उत्पन्न होणें साहजिक आहे. ५४ म्हणून, तेंच अपरोक्ष ज्ञान आपल्यास कसें प्राप्त होईल, व पुढें कसें वृद्धिंगत होईल; ५५ किंवा जें ज्ञान प्राप्त न व्हावें, व प्राप्त झालें असतांही आडमार्गास लावावें, अशी ज्ञानास विघ्न करणारी कोणती गोष्ट आहे ती समजावी. ५६ मग ज्ञानप्राप्तीच्या विरुद्ध अशी जी गोष्ट असेल, ती सोडून देऊन ज्ञानप्राप्तीस हितकर अशी कोणती गोष्ट आहे, ती मनोभावानें, विचारावी; ५७ याप्रमाणें, ज्ञानप्राप्तीची इच्छा करणाऱ्या, तुम्हीं जी मनांत शंका आणली आहे, तिचें निवारण करण्याकरितां श्रीकृष्ण उपाय सांगतील. ५८ ज्ञानाची उत्तम वेळेवर प्राप्ति होऊन त्याचे योगानें स्वरूपाची प्राप्ति होईल, अशी जी दैवी संपत्ति तिचें वर्णन करतील; ५९ आणि ज्या आसुरी संपत्तिमुळें रागद्वेषांस थारा मिळून ज्ञानाचा नाश होतो, तिचेंही वर्णन करतील. ६० अशी दैवी व आसुरी संपत्ति, ज्यांचे योगानें इष्ट व अनिष्ट कृत्यें घडतात, तें सांगण्याची नवव्या अध्यायांत सुरवात केली होती, ६१ त्या वेळेस सगळा विचार करावयाचा होता, परंतु दुसरा प्रसंग उद्भवल्यामुळें तो तसाच राहिला. म्हणून तो प्रसंग

निरूपीत असे ६२ तया निरूपणाचेनि नांवें । अध्याय पद सोळावें । लावणी पाहतां जाणावें । मागिलावरी ६३ परि हें असो आतां प्रस्तुतीं । ज्ञानाच्या हिताहितीं । समर्था संपत्ती । इयाचि दोन्ही ६४ जे मुमुक्षुमार्गींची बोळावी । जे मोहरात्रीची धर्मदिवी । ते आधीं तंव दैवी । संपत्ती ऐका ६५ जेथ एक एकातें पोखी । ऐसे बहुत पदार्थ येकीं । संपादिजती ते लोकीं । संपत्ति म्हणिजे ६६ ते दैवी सुखसंभवी । तेथ दैवगुणें येकोपजीवी । जाली ह्मणौनि दैवी । संपत्ति हे ६७

श्रीभगवानुवाचः—

अभयं सत्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः । दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ॥१॥

आतां तयाचि दैवगुणां- । माजि धुरेचा बैसणा । बैसे तया आकर्णा । अभय ऐसें ६८ तरि न घलूनि महापुरीं । न घेपे बुडणयाची शियारी । कां रोगु न गणिजे घरीं । पथ्याचिया ६९ तैसा कर्माकर्मांचिए भरवोहरा । उठूं नेदूनि अहंकारा । संसाराचा दरारा । सांडणें येणें ७० अथवा बुंधिभावाचेनि पैसें । दुजे मानूनि आत्मा ऐसें । भयवार्ता देशें । दवडणें जें ७१ पाणी बुडऊं ये मिठातें । तंव मीठचि पाणी आतें । तेविं आपण जालेनि अद्वैतें । नाशे भय ७२ अगा अभय येणें नांवें । बोलिजे तें हें जाणावें । सम्यक्ज्ञानाचें आधवें । धांवणें हें ७३ आतां सत्त्वशुद्धी जे म्हणिजे । ते ऐशा चिन्हीं जाणिजे । तरी जळे ना विझे । राखोंडी जैसी ७४ कां पाडिवा वाढी न मगे । अंवसे तुटी सांडूनि मागें । माजी अतिसूक्ष्म अंगें । चंद्रु जैसा राहे ७५ नातरी वार्षिया नाहीं मांडिली । ग्रीष्में नाहीं सांडिली । माजि निजरूपें निवडली । गंगा जैसी ७६ तैसी संकल्पविकल्पाचि वोढी । सांडूनि रजतमाची कावडी । भोगितां निजधर्माची आवडी । बुद्धि उरे ७७ इंद्रियवर्गीं दाखविलिया । विरुद्धा अथवा भलीया । विस्मयो कांहीं केलिया । नुठी चित्तीं ७८ गांवा गेलिया वल्लभु । पतिव्रतेचा विरहक्षोभु । भलतेसणी हानिलाभु । न मनीं जेवीं ७९ तेविं सत्स्वरूप रुचलेपणें । बुद्धी जें ऐसें अनन्य होणें । ते सत्वशुद्धी म्हणे । केशिहंता ८० आतां आत्मलाभाविखीं । ज्ञानयोगामाजी एकीं । जे आपुलिया ठाकीं । हांवे भरे ८१ तेथ सगळिये चित्तवृत्ती । त्यागु करणें या रीती । निष्कामें पूर्णाहुती । हुताशीं जैसी ८२ का सुकुळीनें आपुली । आ-

आतां देव निरूपण करतील, ६२ त्या निरूपणाच्या संबंधानें मागील पंधरा अध्याय झाले, त्याचे पुढचा हा सोळावा अध्याय होय. ६३ परंतु हें असो; या दोन संपत्ति (दैवी व आसुरी) ज्ञानाची प्राप्ति व हानि करून देण्यास समर्थ आहेत. ६४ जी दैवी संपत्ति मुमुक्षूला मोक्षमार्गांत सोबत करणारी व मोहरूप रात्रीं वाट चालण्यास धर्मरूप मशाल होय, तिचें आधीं वर्णन करतों, तें ऐका. ६५ ज्या ठिकाणीं एक दुसऱ्याला साह्य करितो, असे पुष्कळ पदार्थ एके ठिकाणीं जमतात, त्याला संपत्ति असें ह्मणतात. ६६ अशी जी दैवयोगानें एके ठिकाणीं जमलेल्या सर्वांस, सुख देणारी संपत्ति तिलाच दैवीसंपत्ति असें म्हणतात. ६७

अन्वय–अभयं, सत्वसंशुद्धिः, ज्ञानयोगव्यवस्थितिः, दानं दमः च यज्ञः च, स्वाध्यायः, तपः, आर्जवम् ॥ १ ॥

अर्थ–श्रीभगवान् म्हणाले.—अभय, चित्तशुद्धि, ज्ञान व योग यांचे ठिकाणीं एकनिष्ठता, दातृत्व, बाह्य इंद्रियांचा संयम, यज्ञ, वेदाचें सार्थ पठण, तप, सरळपणा,१

आतां, त्या दैवगुणांमध्यें ज्याला प्रमुखत्व प्राप्त होतें, त्याला अभय असें म्हणतात. ६८ जो महापुरांत उडी घालीत नाहीं, त्याला बुडण्याचें भय नसतें; किंवा जो पथ्यानें वागतो, त्याला रोग उत्पन्न होत नाहींत, ६९ त्याचप्रमाणें, जो कोणतेंही कर्म करते वेळीं अहंकार उत्पन्न होऊं देत नाहीं, त्याला संसाराचें भय कोठून असणार ? ७० अथवा अद्वैतभावाच्या विस्तारानें जो सर्व जग आत्मस्वरूप आहे असें समजतो, त्याला भयाची गोष्टही ऐकूं येत नाहीं. ७१ पाणी मिठास बुडविण्यास लागलें असतां जसें मिठाचेंच पाणी होतें, त्याप्रमाणें आपली अद्वैतभावना झाल्यावर भयाचा नाश होतो. ७२ अरे, अभय ज्याला म्हणतात त्याचीं हीं लक्षणें होत, व हें अभय सम्यक्ज्ञानाची इच्छा करणाराचें पहिलेंच लक्षण होय. ७३ आतां, शुद्ध बुद्धि जिला म्हणतात, तीं अशा चिन्हांनीं ओळखावीं: ज्याप्रमाणें राखोंडी जळतही नाहीं, व विझतही नाहीं, त्याप्रमाणें ज्या बुद्धीच्या ठिकाणीं संकल्प व विकल्प हे दोन्ही नसतात; ७४ किंवा प्रतिपदेस सुरवात होण्याच्या पूर्वी व अमावास्या संपल्यावर मधल्या वेळांत चंद्राचें जसें निजरूप असतें; ७५ अथवा ग्रीष्म ऋतूच्या अंतीं व वर्षाऋतु सुरू होण्याच्यापूर्वी गंगेच्या पाण्याचें स्वरूप निवळ त्याप्रमाणें असतें; ७६ त्याप्रमाणें, संकल्प व विकल्प हे दोन्ही ज्या ठिकाणीं उरले नाहींत; व रजोगुण व तमोगुण हेही ज्या ठिकाणीं नाहींतसे झाले आहेत, व ज्या बुद्धीस स्वरूपाचें ध्यान करण्याची आवड उत्पन्न झालेली आहे; ७७ इंद्रियवर्गांनीं आवडते किंवा नावडते विषय दाखविले असतांही ज्या बुद्धीच्या ठिकाणीं इच्छा उत्पन्न होत नाहीं; ७८ पतिव्रता स्त्रीचा पति गांवास गेल्यामुळें ती विरहानें विव्हळ झाली असतां, तिला पाहिजे तेवढी हानि किंवा लाभ यांची वार्ता सांगितली, तरी त्याकडे जसें तिचें मन जात नाहीं, ७९ त्याप्रमाणें स्वस्वरूपाची आवड उत्पन्न होऊन बुद्धि एकनिष्ठ होणें, याला सत्वशुद्धि म्हणतात, असें केशी दैत्यास मारणारे श्रीकृष्ण म्हणाले. ८० आतां, आत्मलाभाकरितां, ज्ञान किंवा योग या दोहोंपैकीं आपली बुद्धि ज्यावर स्थिर होईल, ८१ त्याठिकाणीं आपली चित्तवृत्ति स्थिर करावी. ज्याप्रमाणें पुढें कोणतीही आहुति देणें राहिली नाहीं, म्हणजे पूर्णाहुति देतात; ८२ किंवा कुलीन मनुष्यानें आपली कन्या उत्तम कुळांत अर्पण केल्यावर जशी तिजविषयीं त्याची कांहींएक इच्छा उरत

त्मजा सत्कुळींचि दिधली । हें असो लक्ष्मी स्थिरावली । मुकुंदीं जैसी ८३ तैसें निर्विकल्पपणें । जें योगज्ञानींच या वृत्तिक होणें । तो तिजा गुण म्हणे । कृष्णनाथु ८४ आतां देहवाचाचित्तें । यथासंपन्नें वित्तें । वैरी जालियाही आर्तीतें । न वंचणें जें कां ८५ पत्र पुष्प छाया । फळ मूळ धनंजया । वाटेचा न चुके आलिया । वृक्षु जैसा ८६ तैसें मनौनि धनधान्यवरी । विद्यमानें आल्या । अवसरीं । श्रांतांचिये मनोहारीं । उपयोगा जाणें ८७ तया नांव जाण दान । जें मोक्षनिधानाचें अंजन । हें असो आयिक विन्ह । दमाचें तें ८८ तरि विषयेंद्रियां मिळणी । करूनि घापे वितुटणी । तैं तोडिजे खड्गपाणी । पारकया ८९ तैसा विषयजातांचा वारा । वाजों नेणिश्च यज्ञश्च स्त्यद्वारां । इयें बांधोनि प्रत्याहारा । हातीं वोपी ९० आंतुला चित्ताचे अंगणा । बैसेनि पळे पर बाहेरीं । आगी सुयिजे दाहींही द्वारीं । वैराग्याची ९१ श्वासोश्वासाहुनी बहुवसें । व्रतें आचरे खरपुसें । वोसंतिता रात्रिदिवसें । नाराणुक जया ९२ पैं दमु ऐसा म्हणिपे । तो हा जाण स्वरूपें । यागार्थुही संक्षेपें । सांगों ऐक ९३ तरि ब्राह्मण करूनि धुरे । स्त्रियादिक पैल मेरे । माझारी अधिकारें । आपुलालेनि ९४ जया जे सर्वोत्तम । भजनीय देवताधर्म । ते तेणें यथागम । विधी यजिजे ९५ जैसा द्विज षट्कर्में करी । शूद्र तयातें नमस्कारी । कीं दोहींसिही सरोभरी । निपजे यागु ९६ तैसें अधिकारपर्यालोचें । हें यज्ञ करणें सर्वांचें । परि विषयविष फळाशेचें । न घापे माजीं ९७ आणि मी कर्ता ऐसा भावो । नेदिजे देहाचेनि द्वारें जावों । ना वेदाज्ञेसि तरी ठावो । होइजे स्वयें ९८ अर्जुना एवं यज्ञु । सर्वत्र जाण साज्ञु । कैवल्यमार्गींचा अभिज्ञु । सांगाती हा ९९ आतां चेंडुवें भूमी हाणिजे । हे नव्हे तो हाता आणिजे । कीं शेतीं बीं विखुरिजे । परी पिकीं लक्ष १०० नातरी ठेविलें देखावया । आदर कीजे दिविया । कां शाखा फळें यावया । सिंपिजे मूळ १ हें बहु असो आरिसा । आपणपें देखावया जैसा । पुढतपुढती बहुवसा । उटिजे प्रीती २ तैसा वेदप्रतिपाद्यु जो ईश्वरु । तो होआवयालागीं गोचरु । श्रुतीचा निरंतरु । अभ्यासु करणें ३ तेंचि द्विजांसीच ब्रह्मसूत्र । येरां स्तोत्र कां नाममंत्र । आवर्तवणें पवित्र । पावावया तत्त्व ४ पार्था गा स्वाध्यावो । बोलिजे तो हा म्हणे देवो । आतां तप शब्दाभिप्रावो । आईक सांगों ५ तरी दानें सर्वस्व देणें । वेंचणें तें व्यर्थ करणें । जैसें फळोनि

नाहीं; अथवा समुद्रमंथन करून लक्ष्मी वर आ- ल्यावर तिनें सर्व देवांस सोडून एक विष्णुसच वरलें, ८३ त्याप्रमाणें, विकल्परहित होऊन योग किंवा ज्ञान यांच्या ठिकाणीं वतनदार होणें हा तिसरा 'ज्ञानयोग' आहे,असें श्रीकृष्ण म्हणाले. ८४आतां, कायावाचामनेंकरून शक्त्यनुसार आपल्यास जें दान करावयाचें, तें, आपला शत्रु असून जर खरोखर अडलेला असेल, तर त्यासही विमुख लावूं नये, हेंच खरें दान होय. ८५ धनंजया, वृक्ष ज्याप्रमाणें आपलीं फुलें, फळें, छाया, मुळ्या, पानें यांपैकीं कांहींही वाटेनें जाणारापासून लपवून ठेवीत नाहीं, (पाहिजे त्यास आपल्या सर्वस्वाचा उपभोग घेण्यास मनाई करीत नाहीं,) ८६ त्याप्रमाणें मनापासून संपत्तीपर्यंत प्रसंगानुसार हवें तें देऊन दमलेल्याचें त्याच्या मनोरथाप्रमाणें समाधान करणें,८७ त्यालाच दान असें म्हणतात व तें मोक्षरूपी ठेवा दृष्टीस पडण्याचें अंजन आहे. हें असो; आतां दमाचीं लक्षणें सांगतों, तीं ऐक. ८८. ज्याप्रमाणें शस्त्र धारण करणारा शत्रूचा नाश करितो, त्याप्रमाणें विषय व इंद्रियें यांचें जें ऐक्य झालेलें असतें, त्याचा जो वियोग करतो; ८९ त्याचप्रमाणें, इंद्रियद्वारांनीं येणाऱ्या विषयांचा वारा देखील लागूं देत नाहीं, व सर्व इंद्रियें प्रत्याहाराच्या ताब्यांत बांधून देतो; ९० चित्ताच्या आंत गढून गेलेली जी प्रवृत्ति ती दहा इंद्रियांच्या द्वारांनीं वैराग्यरूप अग्नि आंत घालवून बाहेर काढतो. ९२ श्वासोच्छ्वास बंद करण्याहूनही योग्यांचीं जीं अति काठिण व्रतें, त्यांचें उत्तम रीतीनें जो रात्रंदिवस आचरण करतो, ९२ हें दम म्हणून ज्याला म्हणतात,त्याचें लक्षण आहे. आतां यज्ञ म्हणजे काय, तें संक्षेपानें सांगतों,ऐक. ९३ तर ब्राह्मण व स्त्रियादिक यांच्यामधील सर्वांनीं आपापल्या अधिकारानुरूप, ९४ ज्याला ज्या उक्त दैवतांचें पूजन व धर्म असतील, ते यथाशास्त्र विधीनें आचरावे. ९५ ज्याप्रमाणें ब्राह्मणानें षट्कर्मांचें आचरण करावें, व शूद्रानें त्यांस वंदन करावें, हाच त्यांचा यज्ञ होय, आणि त्या दोघांसही त्यांच्या यज्ञाचें सारखें फल मिळतें. ९६ त्याचप्रमाणें अधिकारपरत्वें विचार करून सर्वांनीं आपापले यज्ञ करावे, परंतु फलाशेचें विष त्यांत घालूं नये; ९७ आणि या यज्ञाचा मी कर्ता, असा देहाचे द्वारानें मनांत भाव उत्पन्न होऊं देऊं नये, तथापि वेदांच्या सर्व आज्ञा स्वतः पाळाव्या. ९८ अर्जुना, यालाच सशास्त्र यज्ञ म्हणतात,व हा मोक्षमार्गाचा जाणता असून सोबती होय.९९आतां, चेंडू भुईवर आपटतो असें नव्हे, तर तो पुनःआपले हाताकडे आणतो. किंवा शेतांत जें धान्य फेंकतों, तो नाश नव्हे, तें पिकाकडे लक्ष देऊन जमिनींत टाकणें आहे. १०० किंवा ठेवलेली जिन्नस दृष्टीस पडावी, या हेतूनें जसा कोणी हातांत दिवा घेतो, अथवा झाडांच्या मुळांशीं, त्याला फांद्या व फळें यावीं म्हणून जसा कोणी पाणी घालतो. १ फार काय ! परंतु आपलें स्वरूप आरशांत पहाण्याच्या हेतूनें जसा वरचेवर प्रीतीनें एकादा मनुष्य तो स्वच्छ पुसतो, २ त्याचप्रमाणें, वेदांनीं ज्या ईश्वराचें वर्णन केलें आहे, तो आपल्यास प्राप्त व्हावा, म्हणून वेदांचा सतत अभ्यास करतो. ३ ब्रह्मप्राप्ति होण्याकरितां ब्राह्मणांनीं वेदांतील ब्रह्मसूत्र, व इतरांनीं स्तोत्र किंवा ईश्वराचें नांव, हेंच वरचेवर म्हणावें. ४ देव म्हणतात, पार्था, ज्याला स्वाध्याय म्हणतात, तो हाच होय. असो; आतां तुला तप शब्दाचा अभिप्राय सांगतों, तो ऐक. ५ तर आपलें सर्वस्व दान करणें, यालाच दान म्हणतात; व द्रव्य उडविणें तें दान नसून व्यर्थ खर्च करणें होय. ज्याप्रमाणें कडू वृंदावनाचें फळ झाडास लागूनही कोणाच्या उप-

स्वयें सुकणें । इंद्रावणी जेवीं ६ ना ना धूपाचा अग्निप्रवेशु । कनकीं तुकाचा नाशु । पितृपक्षु पोषितां हारासु । चंद्राचा जैसा ७ तैसा स्वरूपाचिया प्रसरा-। लागीं प्राणेंद्रियशरीरां । आटणीं करणें जें वीरा । तेंचि तप ८ अथवा अनारिसे । तपाचें रूप जरी असे । तरि जाण जेविं दुधीं हंसें । सूदली चांचू ९ तैसें देह-जीवाचिये मिळणीं । जो उदयजत सूये पाणी । तो विवेकु अंतःकरणीं । जाग-वीजे ११० पाहतां आत्मयाकडे । बुद्धीचा पैसु सांकडे । सनिद्र स्वप्न बुडे । जा-गणा जैसें ११ तैसा आत्मपर्यालोचु । प्रवर्तें जो साचु । तपाचा हा निर्वेचु । धनुर्धरा १२ आतां बाळाच्या हितीं स्तन्य । जैसें नानाभूतीं चैतन्य । तैसें प्रा-णिमात्रीं सौजन्य । आर्जव तें १३

अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शांतिरपैशुनम् । दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ह्रीरचापलम् ॥२॥

आणि जगाचिया सुखोद्देशें । शरीरवाचामानसें । राहाटणें तें अहिंसे । रूप जाण १४ आतां तीख होउनी मवाळ । जैसें जातीचें मुकुळ । कां तेज परी शीतळ । शशांकाचें १५ शके दावितांही रोगु फेडूं । आणि जिभे तरि नव्हे कडु । तें वोखदु नाहीं मा घडु । उपमे कैंची १६ तरि मऊपणें बुबुळें । झगड-तांही परि नाडळे । एऱ्हवीं फोडी कीराळें । पाणी जैसें १७ तैसें तोडावया सं-देह । तीख जैसें कां लोह । श्राव्यत्वें तरि माधुर्य । पायीं घालीं १८ ऐकों ठातां कौतुकें । कानातें निघती मुखें । जें साचारिवेचेनि बिकें । ब्रह्मही भेदी १९ किंबहुना प्रियपणें । कोणातेंही झकऊं नेणे । यथार्थ तरी खुपणें । नाहीं कवणा १२० एऱ्हवीं गोरी कीर काना गोड । परि साचाचा पाखाळीं कीड । आगिचें करणें उघड । परि जळो तें साच २१ कानीं लागतां महुर । अर्थें विभांडी जि-व्हार । ते वाचा नव्हे सुंदर । लांवचि पां २२ परि अहितीं कोपोनि सोप । ला-लनीं मऊ जैसें पुष्प । तिये मातेचें स्वरूप । जैसें कां होय २३ तैसें श्रवण-मुख चतुर । परिणमोनि साचार । बोलणें जें अविकार । तें सत्य येथें २४ आतां घालितांही पाणी । पाषाणीं न निघे आणी । कां मथिलिया लोणी । कांजी नेदी २५ त्वचा पायें शिरीं । हालेयाही फडे न करी । वसंतीही अंबरीं । न होती फुलें २६ ना ना रंभेचेनिही रूपें । शुकीं नुठिजेचि कंदर्पें । कां भस्मी

योगास न येतां व्यर्थ मुकून जातें; पण औदार्यरूपानें सर्व जगाच्या उपयोगीं पडतें. ६ किंवा भून अग्नींत पडून स्वतांचा नाश करून घेतो, पण सर्वांस सुगंध देतो. किंवा सोनें जों जों शुद्ध करावें, तों तों तें वजनांत कमी भरतें, पण कसास जास्त चढतें; किंवा कृष्णपक्षामध्यें चंद्र एकेक कलेनें कमी होतो, पण कृष्णपक्षाचें पोषण करितो. (सर्व औषधींचें पोषण करितो.) ७ त्याप्रमाणें, हे वीरा, ब्रह्मस्वरूपाची प्राप्ति होण्याकरितां प्राण, इंद्रियें व शरीर यांचें जें झिजवणें, त्यालाच तप असें ह्मणतात. ८ अथवा इतर जीं तपें आहेत, तीं ह्या तपाप्रमाणें शुद्ध नाहींत. म्हणून, हंस पक्षी जसें दुधांत आपली चोंच घालून दूध व पाणी वेगळें करतो, ९ त्याप्रमाणें, देह व जीव यांचें ऐक्य मोडून टाकण्याकरितां तो जन्मतःच हात घालून विवेकानें निराळें करण्याचा विचार नेहमीं अंतःकरणांत बाळगतो, व ११० आत्मविचार झाला असतां बुद्धीचे विषयांकडील मार्ग कुंठित होतात. ज्याप्रमाणें मनुष्य जागा झाला असतां निद्रा व स्वप्न हीं दोन्ही आपोआप नाहींतशीं होतात. ११ त्याप्रमाणें, धनुर्धरा, आत्मप्राप्ति करून घेण्याकरितां जो अंतःकरणांत विवेक उत्पन्न होतो, त्यालाच तप ह्मणतात. १२ ज्याप्रमाणें दूध हें मुलांस हितकारक आहे, व प्राण हा जसा सर्व भूतांचें ठायीं सारखाच आहे, त्याप्रमाणें, ज्याचें प्राणिमात्रांशीं सौजन्य आहे, त्यालाच "आर्जव" असें म्हणतात. १३

अन्वय–अहिंसा, सत्यं, अक्रोधः, त्यागः शांतिः, अपैशुनम्, भूतेषुदया, अलोलुप्त्वं, मार्दवं, ह्रीः, अचापलम् २

अर्थ–अहिंसा, सत्य भाषण, राग न येणें, संन्यास, अंतःकरणाचा उपशम, चहाडी न करणें, प्राणिमात्रावर दया करणें, विषयलंपट न होणें, नम्रता, जनलज्जा आणि स्थिरपणा, ॥ २ ॥

आणि कायावाचामनानें जगाला सुख व्हावें, या हेतूनें जें वर्णन करणें, तेंच अहिंसेचें खरें लक्षण जाण. १४ आतां, तीक्ष्ण असून मऊ झटलें ह्मणजे जसें कमळ–तें पाण्याचा भेद करून वर येतें, परंतु मऊ असतें, किंवा चंद्राचें तेज पडतें परंतु तें शीतळ असतें; १५ जें औषध रोग्याला दाखवितां क्षणींच रोगाचा नाश करील, आणि खाल्लें तर जिवेसही कडू लागणार नाहीं, असें औषधच नाहीं, मग उपमा कशी द्यावी? १६ तर मऊपणा झटला ह्मणजे डोळ्यांतील बुबुळांवर बांसलें असतांही जें खुपत नाहीं, व कठोरपणा पाहूं गेलें असतां जें पाणी पर्वताचा कडाही फोडून बाहेर पडतें. १७ त्याप्रमाणें संशयनिवृत्ति करण्यांत जें लोखंडाप्रमाणें तीक्ष्ण असतें, व ऐकिलें असतां माधुर्याला लाजवितें; १८ जें ऐकलें असतां कानासही त्याचें सेवन करावें असें वाटतें, व सत्यपणाच्या बळानें ब्रह्मापर्यंत जाऊन ठेपतें; १९ फार काय! परंतु त्याची गोडी इतकी असते कीं, कोणीही फसत नाहीं व त्यांतील अर्थ पाहूं गेलें असतां त्यापासून कोणाच्या मनालाही धक्का बसावयाचा नाहीं. १२० ऐन्हवीं पारध्याचें गाणें कानास गोड लागतें; परंतु खरेपणाच्या दृष्टीनें पाहिलें असतां तें मृगास घातक असतें, अथवा अग्नि हा आपलें कृत्य उघड रीतीनें करतो, परंतु ह्या त्याच्या खरेपणास आग लागो! २१ कानास मधुर लागणारें असून अर्थ पाहूं गेलें असतां जें काळीज भेदतें, तें भाषण नसून सुंदर विवर्शीच होय. २२ परंतु रागावल्यावर अहित होण्याबद्दल बोलणें पोकळ असून, लालन करण्यांत पुष्पाप्रमाणें मऊ असतें, असें आईचें जें स्वरूप, २३ त्याप्रमाणें, ऐकलें असतां ज्यापासून सुखाची प्राप्ति होते, व परिणामीं गोड असून कोणाचाही मर्मभेद न करणारें जें बोलणें, त्यालाच सत्य बोलणें असें बोलतात. २४ आतां, दगडावर पाणी घातलें असतांही त्यास अंकूर फुटत नाहींत, किंवा ताकाची निवळ घुसळली असतां त्यास लोणी येत नाहीं; २५ सापाच्या कातीच्या डोक्यावर पाय दिला असतां, ती फडा वर करीत नाहीं, व वसंत ऋतु प्राप्त झाला असतांही आकाशास जशीं फुलें येत नाहींत; २६ अथवा रंभेच्या स्वरूपानें शुकास ज्याप्रमाणें विषयवासना झाली नाहीं, किंवा भस्मांत तूप ओ-

वन्हि न उद्दीपे । घृतेंही जेवीं २७ तेविंचि कुमारु क्रोधें भरे । तैसिया मंत्राचीं बीजाक्षरें । तियें निमित्तेंही अगारें । मीनलिया २८ पैं धातृयाही पायां पडतां । नुठी गतायु पंडुसुता । तैसी नुपजे उपजवितां । क्रोधोमीं गा २९ अक्रोधत्व ऐसें । नांव तें ये दशे । जाण ऐसें श्रीनिवासें । म्हणितलें तया १३० आतां मृत्तिकात्यागें वडु । तंतुत्यागें पटु । त्यजिजे जेवीं वडु । बीजत्यागें ३१ कां त्यजूनि भितिमात्र । त्यजिजे आघवींचि चित्र । कां निद्रात्यागें विचित्र । स्वप्नजाळ ३२ ना ना जळत्यागें तरंग । वर्षात्यागें मेघ । त्यजिजती जैसे भोग । धनत्यागें ३३ तेविं बुद्धिमंतीं देहीं । अहंता सांडून पाहीं । सांडिजे अशेषही संसारजात ३४ तया नांव त्यागु । म्हणे तो यज्ञांगु । हें मानूनि सुभगु । पार्थु पुसे ३५ आतां शांतीचें लिंग । तें व्यक्त मज सांग । देवो म्हणती चांग । अवधान देईं ३६ तरी गिळोनि ज्ञेयातें । ज्ञाता ज्ञानही माघौतें । हारपे निरुतें । ते शांति पैं गा ३७ जैसा प्रळयांवूचा उभडु । बुडवूनि विश्वाचा पवाडू । होय आपणपें निबिडु । आपणचि ३८ मग उगम ओघ सिंधु । हा नुरेचि व्यवहार भेदु । परि जलैक्याचा बोधु । तोही कवणा ३९ तैसी ज्ञेया देतां मिठी । ज्ञातृत्वही पडे पोटीं । मग उरे तेंचि किरीटी । शांतीचें रूप १४० आतां कदर्थवित व्याधी । बळीकरणाचिया आधीं । आपपरु न शोधी । सद्वैद्यु जैसा ४१ कां चिखलीं रुतली गाये । धड भाकड न पाहे । जो तियेचिया ग्लानी होये । कालाभुला ४२ ना ना बुडतयातें सकरुणु । न पुसे अंत्यजु कीं ब्राह्मणु । काढूनि राखे प्राणु । हेंचि जाणे ४३ कीं महावनीं पापिये । उघडी केली विपार्थें । ते नेसविल्यावीण न पाहे । शिष्टु जैसा ४४ तैसें अज्ञानप्रमादादिकीं । कां प्राक्तनही सदोषीं । निंद्यत्वाच्या सर्वविषीं । खिळिले जे ४५ तयां आंगीक आपुलें । देऊनियां भलें । विसरविजती सलें । सलतीं तियें ४६ अगा पुढिलाचा दोषु । करूनि आपुलिये दिठी चोखु । मग घापे अवलोकु । तयावरी ४७ जैसा पुजूनि देवो पाहिजे । पेरूनि शेता जाइजे । तोषौनि प्रसादु घेइजे । अतिथीचा ४८ तैसें आपुलेनि गुणें । पुढिलाचें उणें । फेडुनियां पा-

तळें असतां जसा अग्नि पेटत नाहीं, २७ त्याप्रमाणें, ज्या अक्षरांनीं काम व क्रोध उत्पन्न होतो, त्यांचा उच्चार केला असतां, २८ किंवा हे पांडुसुता, ज्याचें आयुष्य संपलें आहे, त्याला उठविण्याकरितां ब्रह्मदेवाच्या जरी पायां पडलें, तरी तो ज्याप्रमाणें उठत नाहीं, त्याप्रमाणें, त्याच्या ठिकाणीं क्रोध आणण्याविषयीं खटपट केली असतां क्रोध येत नाहीं. २९ याच स्थितीला "अक्रोधत्व" म्हणतात, असें श्रीकृष्णांनीं अर्जुनास सांगितलें. १३० मृत्तिकेचा त्याग केला असतां जसा घटाचा त्याग आपोआप होतो, व तंतूचा त्याग केला असतां वस्त्राचा त्याग, तसेंच, बीजाचा त्याग केला असतां वृक्षाचा त्याग सहज होतो; ३१ किंवा भिंतीचा त्याग केला असतां त्यावरील सर्व चित्रांचा त्याग आपोआप होतो, अथवा झोंपेचा त्याग केला असतां नानातऱ्हेच्या स्वप्नांचा त्याग जसा आपोआप होतो; ३२ किंवा जलाचा त्याग केला असतां लाटांचा त्याग, व वर्षाकालाचा त्याग केला असतां मेघांचा, व धनाचा त्याग केला असतां ज्याप्रमाणें विषयोपभोगांचा आपोआप त्याग होतो, ३३ त्याप्रमाणें जे ज्ञानी आहेत, ते, देहच मी अशा अहंतेचा त्याग करून सर्व संसाराचा त्याग करितात. ३४ त्यालाच त्याग म्हणतात, असें यज्ञभोक्ता श्रीकृष्ण परमात्मा यानें सांगितलेलें मनांत उमजून भाग्यवान् जो पार्थ, त्यानें प्रश्न केला: ३५ "हे प्रभो, शांतीचीं लक्षणें काय आहेत, तीं मला उघड करून सांगा." तेव्हां देव म्हणाले, "तूं फार उत्तम गोष्ट विचारलीस; तर तीं सांगतों, तिकडे लक्ष दे. ३६ ज्ञात्यानें जी वस्तु जाणावयाची, ती पूर्णपणें जाणल्यावर मागून ज्ञाता व ज्ञान हीं ज्या ठिकाणीं लय पावतात, त्यालाच (ब्रह्माला) शांति असें म्हणतात. ३७ ज्याप्रमाणें प्रलयकालचें उदक वाढल्यावर सर्व विश्व बुडून आपले स्वरूपांत आपण लय पावतें. ३८ मग उगम, प्रवाह, व समुद्रास मिळणें ह्या अवस्था रहात नाहींत; व सर्वत्र जलमय आहे. याचाही बोध कोणास होत नाहीं; ३९ त्याप्रमाणें, ज्ञेयाचें ऐक्य ज्ञानावर ज्ञातृत्वही आपोआप नाहींसें होतें. मग, अर्जुना, बाकी जें ज्ञान उरतें, तेंच शांतीचें रूप होय. १४० आतां, पीडा देणाऱ्या व्याधींनें किंवा एकादी बाहेर बातमी ऐकून उत्पन्न होणाऱ्या चिंतेनें जो भ्रम झाला असे, तो आपला आहे किंवा परका आहे हें मनांत न आणतां जसा चांगला वैद्य त्याच्या दुःखाचें निवारण करितो; ४१ किंवा एकादी गाय चिखलांत रुतल्यावर तिचें दुःख पाहून ज्याचे मनांत कासाविशी होते, तो ती दुभती आहे, किंवा भाकड आहे, इकडे लक्ष न देतां तिला वर काढतो; ४२ किंवा बुडणाऱ्या मनुष्याकडे पाहून ज्याच्या मनांत करुणा उत्पन्न होते, तो ज्याप्रमाणें बुडणारा ब्राह्मण आहे, किंवा अंत्यज आहे, याची चौकशी न करितां त्यास बाहेर काढून त्याचें प्राणरक्षण करतो; ४३ अथवा महावनांत दुष्टांनीं एकाद्या पतिव्रता स्त्रीस लुबाडून तिला वस्त्रहीन करून सोडून दिलें आहे, अशी स्त्री एकाद्या संभावित मनुष्याच्या दृष्टीस पडल्यावर, तो जसा प्रथम तिच्या अंगावर आपलें वस्त्र टाकून नंतर तिची पुसतपास करितो, ४४ तसेंच, जे अज्ञान व प्रमाद यांनीं व्याप्त आहेत, किंवा पूर्वकर्मानुरूप ज्यांस कांहीं व्याधि जडलेली आहे, व जे सर्वांच्या निंदेस पात्र झाले आहेत, ४५ त्यांना आपण स्वतः साह्य करून, त्यांना ज्या व्याधीपासून दुःख होत असतें, तिचा विसर पाडतात. ४६ अरे, त्यांच्यापुढें येणाऱ्या मनुष्यांचे दोष ते आपल्या दृष्टीनें नाहींतसे करून मग त्यांचेकडे अवलोकन करतात. ४७ ज्याप्रमाणें शालिग्राममूर्तीस वस्त्रालंकार घालून व उत्तम पुष्पें वाहून मग आपलें चित्त तिच्याकडे लावावें, किंवा शेतांत धान्य पेरून उत्तम रीतीचें पीक आल्यावर, जसें त्याजकडे पाहून समाधान मानावें, अथवा आपल्या घरीं अतिथि आला असतां, त्यास अन्नदान देऊन संतोषित केल्यावर ज्याप्रमाणें त्याचा आशीर्वाद घ्यावयाचा, ४८ त्याप्रमाणें, आपल्या पुढें येणाऱ्या मनुष्याचा कमी-

हणें । तयाकडे ४९ वांचूनि न विंधिजे वर्मीं । नातुडविजे अकर्मीं । न बोलविजे नामीं । सदोषीं तिहीं १५० वारि कोणे एके उपाये । पडिलें तें उभें होये । तेंचि कीजे परि घाये । नेदावे वर्मीं ५१ पैं उत्तमाचियासाठीं । नीच मानिजे किरीटी । हें वांचोनि दिठी । दोपु न घेपे ५२ अगा अपैशून्याचें लक्षण । अर्जुना हें फुडें जाण । मोक्षमार्गींचें सुखासन । मुख्य हें गा ५३ आतां दया ते ऐसी । पूर्णचंद्रिका जैसी । निर्वावितां न कडसी । सानें थोर ५४ तैसें दुःखिताचें शिणणें । हिरतां सकणवपणें । उत्तमाधम नेणे । विवंचूं गा ५५ पैं जगीं जीवनासारिखें । वस्तु अंगवरी उपखे । परि जातें जीवित राखे । तृणाचेंही ५६ तैसे पुढिलाचेनि तापें । कळवळलिये कृपे । सर्वस्वेंसीं दिधलेंही आपणपें । थोडेंचि गमे ५७ नि भरलियाविणें । पाणी ढळोंचि नेणें । तेविं श्रांत तोषौनि जाणें । सामोरें पां ५८ पैं पायीं कांटा नेहटे । तंव व्यथा जीवीं उमटे । तैसा पोळे संकटें । पुढिलांचेनि ५९ कां पावो शीतळता लाहे । कीं ते डोळयाचिलागीं होये । तैसें परसुखें जायें । सुखावतु १६० किंबहुना तृषितालागीं । पाणी आरायिलें असे जगीं । तैसें दुःखितांचे सेलभागीं । जिणें जयाचें ६१ तो पुरुष वीरराया । मूर्तिमंत जाण दया । मी उदयजतांचि तया । ऋणिया लाभें ६२ आतां सूर्यासि जीवें । अनुसरलिया राजीवें । परि तें तो न शिवे । सौरभ्य जैसें ६३ कां वसंताचिया वाहाणीं । आलिया वनश्रीच्या अक्षौहिणी । ते न करीतुचि घेणी । निगाला तो ६४ हें असो महासिद्धींसी । लक्ष्मीही आलिया पाशीं । परि महाविष्णु जैसी । न गणीच ते ६५ तैसे ऐहिकींचे कां स्वर्गींचे । भोग पाइक जालिया इच्छेचे । परि भोगावें हें न रुचे । मनामाजीं ६६ बहुवें काय कौतुकीं । जीव नोहे विषयाभिलाखी । अलोलुप्त्वदशा ठाउकी । जाण ते हे ६७ आतां माशियां जैसें मोहळ । जळचरां जेविं जळ । कां पक्षियां अंतराळ । मोकळें हें ६८ नातरी बाळाकोदेशें । मातेचें स्नेह जैसें । कां वसंतींच्या स्पर्शें । मऊ मलयानिलु ६९ डोळयां प्रियाची भेटी । कां पिलियां कूर्मींची दिठी । तैसी भूतमात्रीं राहटी । मवाळ ते १७० स्पर्शें अतिमृदु । मुखीं घेतां सुस्वादु । घ्राणासि सुगंधु । उजाळु आंगें ७१ तो आवडे तेवढा घेतां । विरुद्ध जरी न होता । तरी उपमे येता । कापुर कीं ७२ परी

पणा आपल्या गुणसामर्थ्यानें दूर करून नंतर त्याजकडे दयार्द्र दृष्टीनें पहातात. ४९ इतकेंच नव्हे, तर त्याच्या वर्मावर डाग देऊं नये, अथवा त्यांच्या पापकर्मांचा उच्चार करून त्यांस दुःख देऊं नये; व त्यांस असणाऱ्या व्याधीचें नांव घेऊन तूं व्याधिष्ट आहेस, असें म्हणूं नये. १५० परंतु ज्या उपायानें कोणीही मनुष्य वाईट स्थितींतून उत्तम स्थितींत येईल, तेच उपाय जो करतो. पण त्याच्य वर्मीं डाग देत नाहीं; ५१ तर अर्जुना, उत्तम मनुष्याच्या मानानें जो दुसऱ्यास कनिष्ठ मानीत नाहीं, व त्याचे दोष मनांत आणीत नाहीं, ५२ तेंच 'अपैशून्याचें' खरें लक्षण होय. आणि अर्जुना, मोक्षमार्गाचें सुखावह मुख्य साधन हेंच होय. ५३ आतां दया अशी असावी कीं, ज्याप्रमाणें पौर्णिमेचा चंद्र हा शांति देण्यांत लहान अथवा थोर, असा पर्याय न ठेवितां सर्वांस सारखीच शांति देतो ५४ त्याप्रमाणें, दयार्द्र अंतःकरणानें दुःखित मनुष्याचें दुःख हरण करिते वेळेस तो उत्तम आहे, किंवा अधम आहे, हें मनांत न आणतां सर्वांचें दुःख निवारण करतो.५५ जगतांत पाण्यासारखी वस्तु दुसरी कोणती आहे, कीं गवत सुकूं लागलें असतां जें आपला स्वतः नाश करून घेऊन त्याचें आपल्या ओलाव्यानें रक्षण करितें! ५६ त्याप्रमाणें, आपल्यासमोर पीडित मनुष्य आला असतां, त्याच्या कळवळीनें त्यास जरी आपलें सर्वस्व दिलें, तर आपण त्यास कांहींच दिलें नाहीं, असें जो मानतो; ५७ पाणी वाहात असतांना वाटेंत खळगा आला असतां, तो भरून टाकल्याशिवाय जसें तें पुढें जात नाहीं, तसा आपल्या समोरील श्रमलेल्या मनुष्यास संतोषित केल्याशिवाय जो पुढें जात नाहीं; ५८ ज्याप्रमाणें पायांत कांटा बोंचला असतां जीव कळवळतो, त्याप्रमाणें दुसऱ्याचें संकट पाहिलें असतां ज्याचें मन कळवळतें; ५९ किंवा पायास थंड पदार्थ चोळल्यावर डोळ्यांस जसा गारवा येतो, तसें दुसऱ्याचें सुख पाहून ज्याला सुख होतें; १६० किंबहुना, तहान लागलेल्या मनुष्याची तृषा भागण्याकरितां जसें जगांत पाणी निर्माण केलें आहे, त्याप्रमाणें दुःखित मनुष्याचें दुःख हरण करण्याकरितांच जो या जगांत रहातो; ६१ अशा गुणांनीं युक्त जो पुरुष असतो, तो देवची केवळ मूर्तिच होय; आणि हे वीरोत्तमा, त्याचा जन्मतःच मी ऋणी आहें. ६२ सूर्योदय होण्याबरोबर कमळाचें फूल उमलतें, परंतु सूर्य जसा त्याच्या सुगंधाचा उपभोग घेत नाहीं; ६३ किंवा वसंतऋतूंतून वनांत पुष्कळ झाडें टवटवीत होतात, तथापि त्यांतील एकाही झाडाचा उपभोग न घेतां तो जसा चालता होतो; ६४ फार काय! लक्ष्मी महासिद्धीसह जरी श्रीविष्णूंजवळ प्राप्त झाली, तरी जसें त्यांचें तिच्याकडे लक्ष जात नाहीं; ६५ तसे आपल्यास आवडणारे इहलोकींचे किंवा परलोकींचे भोग जरी चाकर झाले, तरी त्यांच्या मनांत त्यांचा उपभोग व्यावा असें येत नाहीं. ६६ फार काय सांगावें! ते कौतुकानें देखील विषयाची इच्छा करीत नाहींत. अशी जी दशा, तिला 'अलोलुपत्व' असें ह्मणतात. ६७ मधमाशीस जसें तिचें मोहोळ सुखकारक आहे, किंवा जलचरांस जसें पाणी प्रिय आहे, किंवा पक्ष्यांना आकाश फिरण्यास मोकळें आहे; ६८ किंवा बाळकाला सुख व्हावें या दृष्टीनें आईचें जसें त्यावर प्रेम असतें अथवा वसंतऋतु सुरू झाल्यावर जसा मलय पर्वतावरील वारा मंद सुगंध वहातो, ६९ प्रीय वस्तु पाहिली असतां जसें डोळ्यांस समाधान होतें, किंवा ज्याप्रमाणें कासवी आपल्या दृष्टीनें पिलांचें पोषण करतें,त्याप्रमाणें ज्यांची दृष्टी भूतमात्राच्या ठिकाणीं प्रेमयुक्त असतें, १७०हात लावला असतां मऊ लागतो, तोंडांत घातला असतां रुचकर लागतो, नाकास ज्याचा सुगंध येतो, व रूपानें पाहिला असतां जो पांढरा स्वच्छ आहे, ७१ असा जो कापूर, तो वाटेल तितका खाल्ला असतां जर त्याजपासून बाधा झाली नसती, तर तो उपमेस पात्र झाला असता; ७२ परंतु ज्याच्या पोटांत पं-

महाभूतें पोटीं वाहे । तेवींचि परमाणूमाजि सामाये । या विश्वानुसार होये । गगन जैसें ७३ काय सांगों ऐसें जिणें । जें जगाचेनि जीवें प्राणें । तयां नांव म्हणे । मार्दव मी ७४ आतां पराजये राजा । जैसा कदर्थिजे लाजा । कां मानिया निस्तेजा । निकृष्टान्तव ७५ ना ना चांडाळमंदिराशीं । अवचटें आलिया संन्यासी । मग लाज होय जैसी । उत्तमा तया ७६ क्षत्रियां रणीं पळोनि जाणें । ते कोण साहे लाजिरवाणें । कां वैधव्यें पाचारणें । महासतियेतें ७७ रूपसा उदयलें कुष्ट । संभावितां कुटीचें वोट । तया लाजा प्राण संकट । होय जैसें ७८ तैसें औटहातपणें । जें शव होऊनि जिणें । उपजों उपजों मरणें । नावानावा ७९ तियें गर्भभेदमुसें । रक्तमूत्ररसें । वोंतीव होऊनि असे । तें लाजिरवाणें १८० हें बहु असो देहपणें । नामरूपासि येणें । नाहीं गा लाजिरवाणें । तयाहूनि ८१ ऐसैसिया अवकळा । घेपे शरीराचा कंटाळा । ते लाज पैं निर्मळा । निसुगा गोड ८२ आतां सूत्रतंतु तुटलिया । चेष्टाचि ठाके सायखेडिया । तैसी प्राणजयें कर्मेंद्रियां । खुंटे गती ८३ कीं मावळलिया दिनकरु । सरे किरणांचा प्रसरु । तैसा मनोजयें प्रकारु । ज्ञानेंद्रियांचा ८४ एवं मनपवननियमें । होती दाही इंद्रियें अक्षमें । तें अचापल्य वर्में । येणें होय ८५

तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता । भवंति संपदं दैवीमभिजातस्य भारत ॥ ३ ॥

आतां ईश्वरप्राप्तीलागीं । प्रवर्तता ज्ञानमार्गीं । धिंवसेयाच्या आंगीं । उणीव नोहे ८६ वोखटें मरणाऐसें । तेंही आलें अग्निप्रवेशें । परी प्राणेश्वरोदेशें । न गणीचि सती ८७ तैसें आत्मनाथाचिया आधीं । लाऊनि विषयविषाची बाधी । धांवों आवडे पाणधीं । शून्याचिये ८८ न ठाके निषेधु आड । न पडे विधीची भीड । नुपजेचि जीवीं कोड । महासिद्धीचें ८९ ऐसें ईश्वराकडे निज । धांवे आपसया सहज । तया नांव तेज । अध्यात्मिक तें १९० आतां सर्वही साहातिया गरिमा । गर्वा न ये तेचि क्षमा । जैसें देह वाहोनि रोमा । वाहणें नेणें ९१ आणि मातलिया इंद्रियांचे वेग । कां प्राचीनें खवळले रोग । अथवा योगवियोग । प्रियाप्रियाचे ९२ यया आघवियाचाचि थोरु । एके वेळे आलिया पुरु । तरी अगस्त्य कां होऊनि धीरु । उभा ठाके ९३ आकाशीं धूमाची रेखा । उठिली बहुवा आगळिका । ते गिळी येकीं झुळुका । वारा जेवीं ९४ तैसें अधिभूताधिदैवां । अध्यात्मादि उपद्रवां । पातलेया पांडवा । गिळूनि

चमहाभूतांचा समावेश होतो, त्याचप्रमाणें जो परमाणूंतही सामावतो, व गगन जसें विश्वाच्या आकाराप्रमाणें आकारास येतें; ७३ फार काय सांगावें ! जें जगाच्या जीवनकारितांच वांचतात; अशी जी स्थिति तिला "मार्दव" असें मी म्हणतों. ७४ पराजित झालेला राजा जसा लज्जेनें दुःखी होतो, अथवा निकृष्ट स्थिति प्राप्त झाली असतां, मानी पुरुष जसा निस्तेज होतो; ७५ किंवा एकादा उत्तम संन्यासी अकस्मात् एकाद्या चांडाळाच्या घरांत गेला असतां त्यास जशी लज्जा उत्पन्न होते;७६ क्षत्रियाला रणांतून पळून जाण्याचा प्रसंग आला असतां, तो सहन करण्यास जशी त्याला लाज वाटते; किंवा पतिव्रता स्त्रीस 'गंगाभागीरथी' या नांवानें हांक मारली असतां जसें तिला दुःख होतें; ७७ सुंदर मनुष्यास कोड उत्पन्न झालें, अथवा संभावितावर वाईट आळ आला, तर त्यांना ज्याप्रमाणें लज्जेनें प्राणसंकट उत्पन्न होतें, ७८ त्याप्रमाणें साडेतीन हात शरीर धारण करून निरनिराळ्या योनींत उत्पन्न होणें, व मरणें याची, ७९ आणि गर्भभेदरूपी मुशींत रक्त व मूत्र यांच्या रसांचें ओतीव शरीर धारण करण्याची ज्यांना लाज वाटते; १८० फार काय सांगावें ! तर ज्यांना देह धारण करून नांवारूपास येण्यापेक्षां दुसरी कोणतीही लाजिरवाणी गोष्ट वाटत नाहीं, ८१ अशा दुःचिन्हांनीं युक्त असें जें शरीर, तें धारण करण्याचा साधूंना कंटाळा असून लाज उत्पन्न होते; व इतर जे कोडगे लोक आहेत, त्यांना तेंच शरीर धारण करण्याची गोडी वाटते. ८२ ज्याप्रमाणें कळसूत्री बाहुल्यांच्या दोऱ्या तुटल्यावर त्यांची चेष्टा बंद होते, त्याप्रमाणें प्राणाचा जय केला असतां कर्मेंद्रियांची गति बंद होते; ८३ किंवा सूर्य मावळल्यावर त्याच्या किरणांची प्रभा बंद होते, त्याप्रमाणें मनाचा जय केला असतां ज्ञानेंद्रियांची गति कुंठित होते, ८४ याप्रमाणें मन व प्राण यांचा जय केला असतां दहा इंद्रियें पंगु होतात,त्यालाच 'अचापल्य' असें म्हणतात ८५

अन्वय—अर्जुन, निर्भयता, क्षमा, धैर्य, शुचिर्भूतपणा, दुसऱ्याचा द्वेष न करणें व मानीपणाचा अभाव हीं लक्षणें दैवी संपत्तीत उत्पन्न झालेल्या पुरुषाचे ठिकाणीं असतात.

आतां, ईश्वरप्राप्तीकरितां ज्ञानमार्गाचें मनापासून अवलंबन केलें असतां त्याला उणीव पडत नाहीं. ८६ पतिव्रता स्त्री पतीच्या मरणानंतर अग्निप्रवेश करून मरणासारखा वाईट प्रसंग आला, तरी सहगमन करण्यास मागेंपुढें पहात नाहीं, ८७ त्याप्रमाणें जो आत्म्याची चिंता लागल्यामुळें विषयांस विषयवत् मानून आत्मप्राप्तीकरितां सुषुम्ना नाडींतून प्राणवायु नेण्यासारख्या कठीण मार्गाचेंही अवलंबन करतो; ८८ त्याला शास्त्रांत सांगितलेल्या विधिनिषेधांचा अडचण व भीड नसते; व महासिद्धि प्राप्त झाली असतां तिचेंही त्यास कौतुक वाटत नाहीं. ८९ याप्रमाणें ज्याचें मन आपण होऊन ईश्वराकडे धांव घेतें, त्याला शारीरिक तेज असें म्हणतात. १९० आतां, सर्व सहन करणाऱ्यांत मी श्रेष्ठ, असा ज्याला गर्व उत्पन्न होत नाहीं त्यालाच क्षमा असें म्हणतात. ज्याप्रमाणें देह हा सर्व रोग धारण करीत असूनही त्याचा गर्व बाळगीत नाहीं; ९१ आणि विषयसेवनाविषयीं इंद्रियांची अति प्रवृत्ति, किंवा पूर्वकर्मानें रोगाची प्राप्ति, अथवा अप्रिय वस्तुचा योग, किंवा प्रिय वस्तूचा वियोग. ९२ या सर्व गोष्टी जरी एकसमयावच्छेदेंकरून प्राप्त झाल्या, तरी जो अगस्ती ऋषीप्रमाणें धीर धरून त्या सहन करतो; ९३ आकाशांत धुराचा मोठा लोट गेला, तरी ज्याप्रमाणें वाऱ्याची एक झुळुक त्यास नष्ट करते, ९४ त्याप्रमाणें, अर्जुना, आध्यात्मिक, आधिदैविक व आधिभौतिक हे उपद्रव जरी एकदम उत्पन्न झाले,

वाली ९५ ऐसें चित्तक्षोभाच्या अवसरीं । उचलूनि धैर्या जें चांगावें करी । धृती म्हणिपे अवधारीं । तियेतें गा ९६ आतां निर्वाळूनि कनकें । भरिला गांगें-पीयूखें । तया कलशाचियासारिखें । शौच असे ९७ जे आंगीं निष्काम आचारु । जीवीं विवेकु साचारु । तो सबाह्य घडला आकारु । शुचित्वाचाचि ९८ कां फेडित पाप ताप । पोखीत तीरींचे पादप । समुद्रा जाय आप । गंगेचें जैसें ९९ कां जगाचें आंध्य फेडितु । श्रियेचीं राउळें उघडितु । निघे जैसा भास्वतु । प्रदक्षिणें २०० तैसीं बांधलीं सोडिता । बुडालीं काढिता । सांकडीं फेडिता । आर्तांचिया १ किंबहुना दिवसराती । पुढिलांचें सुख उन्नति । आणित आणित स्वार्थीं । प्रवेशिजे २ वांचूनि आपुलिया काजालागीं । प्राणिजाताच्या अहितभागीं । संकल्पाचीही आडवंगी । न करणें जें ३ पैं अद्रोहत्व ऐशिया गोष्टी । ऐकसी जिया किरीटी । तें सांगितलें हें दिठी । पाहों ये तैसें ४ आणि गंगा शंभूच्या माथां । पावोनि संकोचे जेवीं पार्था । तेविं मान्यपणें सर्वथा । लाजणें जें ५ तें हें पुढत पुढती । अमानित्व जाण सुमती । मागां सांगितलेंसें किती । तेंचि तें बोलों ६ एवं इहीं सव्विसें । ब्रह्मसंपदा हे वसत असे । मोक्षचक्रवर्तीचें जैसें । अग्रहार होय ७ ना ना हे संपत्ति दैवी । या गुणतीर्थांची नीच नवी । निर्विण्णसगराची दैवी । गंगाचि आली ८ कीं गुणकुसुमांची माळा । हे घेऊनि मुक्तिबाळा । वैराग्यनिरपेक्षाचा गळा । गिंवसीत असे ९ कीं सव्विसेंगुणज्योती । इहीं उजळूनि आरती । गीता आत्मया निजपती । नीरांजना आली २१० उगळितें निर्मळें । गुण इयेंचि मुक्ताफळें । दैवी शुक्ति कळें । गीतार्णवींची ११ काय बहु वानूं ऐसी । अभिव्यक्ती ये अपैसी । केलें दैवी गुणराशी । संपत्तिरूप १२ आतां दुःखाची आंतुवट वेली । दोषकाटयांची जरी भरली । तरी निजाभिधानीं घालीं । आसुरी ते १३ पैं त्याज्य त्यजावयालागीं । जाणावी जरी अनुपयोगी । तरी ऐका ते चांगी । श्रोत्रशक्ती १४ तरी नरकव्यथा थोरी । आणावया दोषींघोरीं । मेळू केला ते आसुरी । संपत्ति हे १५ ना ना विषवर्गु एकवटु । तया नांव जैसा बासटु । आसुरी संपत्ति हा खोटु । दोषांचा तैसा १६

दंभो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च । अज्ञानं चाभिजातस्य पार्थ संपदमासुरीम् ॥ ४ ॥

तरी तयाचि आसुरां । दोषांमाजीं जया वीरा । वाडपणाचा डांगोरा । तो

तरी जो ते सर्व गिळून टाकतो; ९५ आणि याप्रमाणें चित्तांत राग उत्पन्न होण्याचे वेळीं धैर्य कायम ठेवितो, त्यालाच धृति असें म्हणतात. ९६ आतां, सुवर्णकलश स्वच्छ करून त्यांत गंगारूपी अमृत भरलें असतां, तें जसें सर्वच शुद्ध असतें, त्याप्रमाणें 'शौच' होय. ९७ ज्या मनुष्याचें आचरण निष्काम असतें व ज्याच्या अंतर्यामीं विवेक जागृत असतो, तो जसा अंतर्यामीं व बाहेरूनही शुद्ध असतो, त्याप्रमाणें 'शौच' होय. ९८ गंगेचें उदक जसें समुद्राकडे जातांना सहज तीरावरील वृक्षांचें पोषण करितें, व स्नान करणारांचेंही पाप व ताप नाहींसें करतें;९९किंवा ज्याप्रमाणें सूर्य आपली रोजची प्रदक्षिणा करण्यास निघाला म्हणजे अंधकाराचा नाश करतो, व जगांतील संपत्तीचीं मंदिरें उघडून व्यापार सुरू होतो, २०० त्याप्रमाणें, जे बद्ध असतील त्यांना मुक्त करून व जे संसारसागरांत बुडाले आहेत, त्यांना तारून, जे पीडित आहेत त्यांचें दुःख निवारण करतो; १ किंबहुना रात्रंदिवस स्वार्थ साधीत असतांही जो दुसऱ्याचें सुख वाढवितो; आणि २ स्वार्थ साधण्याकरितां दुसऱ्याचा नाश करण्याविषयीं ज्याच्या अंतःकरणांत संकल्पही उत्पन्न होत नाहींत, ३ त्यालाच,अर्जुना, 'अद्रोहत्व' असें म्हणतात; व तें मीं तुला तुझ्या दृष्टीस उघड रीतीनें पडेल असें सांगितलें आहे. ४ आणि पार्था, भगीरथानें गंगेची प्रार्थना करून तिला मृत्युलोकांत आणिते वेळीं तिला शंकरांनीं आपले जटेंत धारण केल्यावर तिचा आपले वेगाचा गर्व हरण होऊन ती लज्जित झाली, त्याप्रमाणें, लोकांनीं मान दिला असतां जो संकोचित होतो, ५ त्यालाच, हे सुमते अर्जुना, 'अमानित्व' असें म्हणतात; याबद्दल तुला मागें पुष्कळ वेळां सांगितलें आहे. तेंच तें पुनः किती सांगूं ! ६याप्रमाणें दैवी संपत्ति या सव्वीस गुणांना चक्रवर्ती परमात्म्यानें अग्रहार करून दिली आहे. ७किंवा ही दैवी संपत्ति या सर्व्वांस गुणरूपी तीर्थांनीं नित्य नवी असून, वैराग्यरूपी सगराचा उद्धार करण्याकरितां जणूं काय भगवती गंगाच प्राप्त झाली आहे. ८ किंवा ही गुणरूपी पुष्पांची माळ हातांत घेऊन मुक्तिरूप वधू निरपेक्ष वैराग्यरूप वराचा गळा शोधीत आहे; (त्याला वरण्याकरितां पहात आहे;) ९ अथवा या गुणरूपी वाती लावून, गीता आपल्या आत्मरूपी पतीस ओंवाळण्याकरितां आरती घेऊन आली आहे. २१० किंवा गीतारूप समुद्रांतील हीं सगुणरूपी मोत्यें दैवी संपत्तिरूप शिंपल्यांत उत्पन्न झालीं आहेत. ११ दैवी संपत्तीचीं जीं हीं लक्षणें सांगितलीं, त्यांपेक्षां अधिक किती म्हणून सांगूं ! १२ आतां, आसुरी संपत्ति ही दुःखरूपी वेली असून दोषरूपी कांद्यांनीं जरी भरलेली आहे, तरी तूं आपले मनांत ती समजून घे. १३ कारण असें पहा—जी वस्तू त्याज्य आहे, ती आपल्या उपयोगाची नाहीं हें खरें; पण तिचा त्याग करण्याकरितांच ती फार सावधपणें ऐकून घे. १४ हें बघ—जीवांना भयंकर अशी नरकप्राप्ति करून देण्याकरितां घोर दोषांनीं जी आपली जूट केली आहे, तीच ही आसुरी संपत्ति. १५ किंवा, सगळीं विषें एकत्र झालीं म्हणजे ज्याप्रमाणें त्यास काळकूट हें नांव द्यावें, त्याप्रमाणें आसुरी संपत्ति म्हणजे दोषांचा गोळाच होय. १६

अन्वय—पार्थ, दंभः, दर्पः, अतिमानः, क्रोधः, पारुष्यं एव च, अज्ञानं च (एतानि लक्षणानि) आसुरीं संपदम् अभिजातस्य (पुरुषस्य भवन्ति). ॥ ४ ॥

अर्थ—अर्जुना, ढोंगीपणा, गर्व, मानीपणा, क्रोध, मर्मभेदक भाषण, आणि अज्ञान हीं लक्षणें आसुरी संपत्तींत उत्पन्न झालेल्या पुरुषाचे ठिकाणीं असतात. ॥४॥

हे वीरा, ह्या असुर दोषामध्यें जो मुख्य म्हणून प्रसिद्ध आहे, तो दंभ असा आहे:

दंभु ऐसा १७ जैसी आपुली जननी । नग्न दाविलिया जनीं । तें तीर्थांचि पगी पतनीं । कारण होय १८ कां विद्या गुरूपदिष्टा । बोभाइलिया चोहटां । तरी इष्टदा परि अनिष्टा । हेतु होती १९ पैं आंगें बुडतां महापूरीं । जे वेगें काढी पैलतीरीं । ते नांवचि बांधिलिया शिरीं । बुडवी जैसी २२० कारण जें जीविता । तें वानिलें जरि सेवितां । तरि अन्नचि पंडुसुता । होय विष २१ तैसा दृष्टादृष्टाचा सखा । धर्मु जाला तो फोकारिजे देखा । तरि तारिता तोचि दोखा- । लागीं होय २२ ह्मणौनि वाचेचा चौबारा । घातलिया धर्माचा पसारा । धर्मुचि तो अधर्मु होय वीरा । तो दंभु जाणें २३ आतां मूर्खांचिये जिभे । अक्षराचा आंबुखा सुभे । आणि तो ब्रह्मसभे । न रिझे जैसा २४ कां मादुरी लोकांचा घोडा । गजपतिही मानी थोडा । कां कांटियेवरिल्या सरडा । स्वर्गुही नीच २५ तृणाचेनि इंधनें । आगी धांवे गगनें । थिल्लरबळें मीनें । न गणिजे सिंधू २६ तैसा माजे स्त्रिया धनें । विद्या स्तुती बहुतें मानें । एकें दिवसींचेनि परान्नें । अल्पकु जैसा २७ अभ्रच्छायेचिया जोडी । निदैवु घर मोडी । मृगांबु देखोनि फोडी । पाणियाडे मूर्ख २८ किंबहुना ऐसैसें । उतणें जें संपत्तिमिसें । तो दर्पु गा अनारिसें । न बोलें घेईं २९ आणि जगा वेदीं विश्वासु । आणि विश्वासीं पूज्य ईशु । जगीं एक तेजसु । सूर्युचि हा ३३० जग स्पृहे आस्पदु । एक सार्वभौमपद । न मरणें निर्विवाद । जगा पढियें ३१ ह्मणौनि जग उत्साहें । यातें वानूं जाये । कीं ते आइकोनि मत्सरु वाहे । फुगों लागे ३२ म्हणे ईश्वरातें खायें । तया वेदा विष सूयें । गोखामाजीं त्राये । भंगीत असे ३३ पतंगा नावडे ज्योती । खद्योता भानूची खंती । टिटिभेनें अपांपती । वैरी केला ३४ तैसा अभिमानाचेनि मोहें । ईश्वराचेंही नाम न साहे । बापातें म्हणे मज हे । सवती जाली ३५ ऐसा मान्यतेचा पुष्टगंडु । तो अभिमानी परमलंडु । रौरवाचा रूढु । मार्गुचि पैं ३६ आणि पुढिलांचें सुख । देखणियांचें होय मिष । चढे क्रोधाग्नीचें विख । मनोवृत्ती ३७ शीतळाचिये भेटी । तातला तेलीं आगीं उटी । चंद्रु देखोनि जळे पोटीं । कोल्हा जैसा ३८ विश्वाचें आयुष्य जेणें उजळे । तो सूर्यु उदैला देखोनि सबळे । पापिया फुटती डोळे । डुडुळाचे ३९ जगाची सुखपहांट । चोरां मरणाहूनि निकृष्ट । दुधाचें काळकूट । होय न्याळीं २४० अगाधें समुद्रजळें । प्राशितां अधिक जळे । व-

१७ ज्याप्रमाणें आपल्या आईची निंदा करून तिचे दोष लोकांस उघड केले असतां ती तीर्थप्रमाणें आपल्यास पावन करणारी असूनही आपल्या पतनास तीच कारणीभूत होते; १८ किंवा गुरूकडून संपादन केलेली ब्रह्मविद्या जर चव्हाट्यावर उघड करीत बसलें, तर ती आपलें हित करणारी असूनही तिजपासून आपलें अहितच होतें. १९ हें पहा—जो स्वतः महापुरांत पाण्यांत बुडून दुसऱ्यास वेगानें पलीकडील तीरास नेते, तीच नाव जर आपल्या डोक्यावर घेतली, तर ज्याप्रमाणें आपल्यास बुडविते; २२० हे पांडुसुता, जीवाचें रक्षण करणारें जें अन्न तेंच उत्तम म्हणून जर अधिक सेवन केलें, तर तें अन्न खरें—परंतु विषाप्रमाणें घातक होतें, २१ त्याप्रमाणें, इहपरलोकींचा सखा जो धर्म, तो जर चव्हाट्यावर उघडा केला, तर तो आपल्यास तारणारा खरा—परंतु त्याजपासून दोष घडतात. २२ म्हणून, हे वीरा, आपण केलेला धर्म जर चहूंकडे आपल्या वाचेनें प्रसिद्ध केला,तर तो धर्मच अधर्म होतो,आणि त्यालाच दंभ असें म्हणतात. २३ आतां, मूर्ख मनुष्यास चार अक्षरें येण्याबरोबर तो जसा ब्रह्मदेवाचे सभेस तुच्छ मानतो, २४ किंवा मद्यपान केलेल्या मनुष्याचा घोडा जसा राजाचे स्वारीसही तुच्छ मानतो; अथवा कांटेरी झाडांवरील सरडा झाडाच्या वरच्या टोंकावर बसला, म्हणजे आपण स्वर्गालाही नीच मानतो. २५ तृण हेंच इंधन मिळालें तरी अग्नीच्या ज्वाला ज्याप्रमाणें आकाशाला जाऊन पोहोंचतात; किंवा डबक्यांतील मासा त्याच्या जोरावर समुद्र तुच्छ मानतो; २६ अथवा ज्याप्रमाणें एक दिवस परान्न मिळालें, कीं तेवढ्यानें दरिद्री उन्मत्त होतो, त्याप्रमाणें जो स्त्री, धन, विद्या, स्तुति व बहुमान यांनीं उन्मत्त होतो. २७ एकादे दिवशीं अभ्रच्छाया पडलेली पाहून, आतां आपल्याला वसावयास सावली काय करावयाची आहे,अशा विचारानें दैवहीन मनुष्य ज्याप्रमाणें आपलें घर मोडून टाकतो, किंवा जसा मृगजल पाहून एकादा मूर्ख मनुष्य आपल्या घरांतील आड बुजवून टाकतो; २८ किंवहुना याप्रमाणें संपत्तीच्या योगानें जे उन्मत्त होतें, त्याला दरे असें म्हणतात, असें तुला मी निःसंशय सांगतों. २९ आणि सर्व जगाचा वेदावर भरंवसा आहे; व ईश्वर सर्व जगास पूज्य आहे; आणि सर्व जगांत सूर्याप्रमाणें तेजस्वी दुसरा कोणी नाहीं; २३० सर्व जगास एका सार्वभौमपदाची इच्छा असते; व आपल्यास मरण येऊं नये, हे सर्व जगास आवडतें हें निर्विवाद आहे; ३१ म्हणून लोक मोठ्या उत्साहानें वेदाचें व ईश्वराचें वर्णन करतात; पण तें ऐकल्याबरोबर ज्याचे मनांत मत्सर उत्पन्न होऊन जो रागावतो; ३२ व ह्मणतो कीं, मी ईश्वरास खाऊन टाकीन, वेदांस विष घालून ठार करीन, व जो सर्वांचें रक्षण करणारा त्याची सत्ता हरण करीन ! ३३ पतंगाला दिव्याचा उजेड सहन होत नाहीं, काजव्याला सूर्याचा तिटकारा येतो, व टिटवी समुद्राशीं वैर मांडते; ३४ त्याप्रमाणें, ईश्वराची कोणीं स्तुति केली असतां अभिमानाच्या मदानें त्याला सहन होत नाहीं: व बाप, आपल्या संपत्तीचा अंश मागेल, या भीतीनें म्हणतो कीं, ही मला सवतच उत्पन्न झाली आहे ! ३५ याप्रमाणें ज्याचे अंगांत मानाचा अतिशय ताठा भरला आहे, तोच ' अभिमानी ' होय. तो उन्मत्त पुरुष रौरव नरकाचा हमरस्ताच होय. ३६ आणि दुसऱ्याचें सुख पहाण्याचें निमित्त होण्याबरोबर ज्याच्या मनोवृत्तीस क्रोधरूप अग्नीचें विष चढतें; ३७ ज्याप्रमाणें तापलेल्या तेलांत थंड पाणी टाकलें असतां तें जास्त भडकतें, किंवा चंद्राला पहातांच कोल्हा आपल्या मनांत जळफळायास लागतो; ३८ ज्याच्या योगानें सर्व विश्वाचे व्यापार सुरू होतात, तोच सूर्य सकाळीं उगवलेला पाहून पापी घुबडाचे मात्र डोळे फुटतात; ३९ जी पहांट झाली ह्मणजे सर्व लोकांस सुख होतें, तिच्याचपासून चोरांस मरणाहूनही जास्त दुःख होतें; आणि सर्पास दूध घातलें तरी त्याचें भयंकर असें विषच होतें. २४० अगाध अशा

डवाग्नी न मिळे । शांति कहीं ४१ तैसा विद्याविनोदविभवें । देखे पुढिलांचीं दैवें । तंव तंव रोपु दुणावे । क्रोधु तो जाण ४२ आणि मन सर्पाची कुटी । डोळे नाराचांची मुटी । बोलणें ते वृष्टी । इंगळांची ४३ येर जें क्रियाजात । तें तिखयाचें कर्वत । ऐसें सवाह्य खसासित । जयाचें गा ४४ तो मनुष्यांत अधमु जाण । पारुष्याचें अवतरण । आतां आइक खूण । अज्ञानाची ४५ तरी शीतोष्णस्पर्शा । निवाडु नेणे पाषाणु जैसा । कां रात्री आणि दिवसा । जात्यंधु तो ४६ आगी उठिला आरोगणें । जैसा खाद्याखाद्य न म्हणे । कां परिस पाडु नेणे । सोनया लोहा ४७ नातारि ते नानारसीं । रिघोनि दवीं जैसी । परि रसस्वादासी । चाखों नेणें ४८ कां वारा जैसा पारखी । नव्हेचि गा मार्गामार्गाविखीं । तैसें कृत्याकृत्य विवेकीं । अंधपण जें ४९ हें चोख हें मैळ । ऐसें नेणोनियां बाळ । देखे तें केवळ मुखींचि धाली २५० तैसें पापपुण्याचें खिचटें । करोनि खातां बुद्धिचेष्टे । कडु मधुर न वाटे । ऐसी जे दशा ५१ तिये नाम अज्ञान । या बोला नाहीं आन । एवं साही दोषांचें चिन्ह । सांगितलें ५२ इहींच साही दोषांगीं । हे आसुरी संपत्ति दाटुगी । जैसें थोर विषय सुभगे अंगीं । अंग सानें ५३ कां तिघां वन्हींच्या पाती । पाहतां थोडे ठाय गमती । परि विश्वही प्राणाहुती । करूं न पुरे ५४ धातयाही गेलिया शरण । त्रिदोषीं न चुके मरण । तया तिहींची दुणी जाण । साही दोष हे ५५ इहीं साही दोषीं संपूर्णीं । जाली इयेचि उभारणी । ह्मणौनि आसुरी उणी । संपदा नव्हे ५६ परि क्रूरग्रहांची जैसी । मांदी मिळे एकेचि राशी । कां येती निंदकापासीं । अशेष पापें ५७ मरणाराचें आंग । पडिघाती अवघेचि रोग । कां कुमुहूर्तीं दुर्योग । एकवटती ५८ विश्वासला आतुडवीजे चोरा । शिणला सुइजे महापुरा । तैसें दोषीं इहीं नरा । अनिष्ट कीजे ५९ कां आयुष्य जातिये वेळे । शेळिये सातवेउळि मिळे । तैसे साही दोष सगळे । जोडती तया २६० मोक्षमार्गाकडे । जैं ययाचा आंबुखा पडे । तैं न निघे म्हणौनि बुडे । संसारीं जो ६१ अधमां योनींच्या पाउटीं । उतरत जो किरीटी । स्थावरांही तळवटीं । बैसणें घे ६२ हें असो तयाच्या ठायीं । मिळोनि साही दोषीं इहीं । आसुरी संपत्ति पाहीं । वाढविजे ६३ ऐसिया या दोनी । संपदा प्रसिद्धा जनीं । सांगितलिया चिन्हीं । वेगळाल्या ६४

समुद्रजलाचें प्राशन करीत असतांही वडवाग्नि उलटा अधिकच प्रदीप्त होतो, आणि त्याला शांतता म्हणून कसली ती नाहींच; ४१ त्याप्रमाणें, दुसऱ्याचें विद्याविनोदवैभव आणि सभाग्यता हीं पाहून ज्याच्या अंगाचा अगदीं तीळपापड होऊन जातो, त्याला 'क्रोध' असें म्हणतात. ४२ ज्याचें मन सर्पाच्या वारुळाप्रमाणें असून दृष्टि बाणांच्या अग्रांप्रमाणें तीक्ष्ण असते, व ज्याचें भाषण अग्नीच्या वर्षावाप्रमाणें प्रखर असतें; ४३ आणि ज्याच्या इतर क्रिया पोलादी कर्वताप्रमाणें इतरांना त्रासदायक आहेत; अशा प्रकारें जो दुसऱ्याचे मनास भेद होणाऱ्या क्रियांनीं अंतर्बाह्य भरलेला आहे, ४४ तो मनुष्यांत अधम असें समज. याप्रमाणें पारुष्याचें लक्षण होय; आतां अज्ञानाचीं लक्षणें सांगतों, तीं ऐक. ४५ ज्याप्रमाणें दगडास थंडी व ऊन यांच्या स्पर्शाची समज नसते; किंवा जन्मांधास रात्र व दिवस समजत नाहींत, ४६ अग्नि भडकल्यावर तो जसा कोणत्या वस्तूचा नाश करावा; किंवा कोणतीचा करूं नये, हें जाणत नाहीं; अथवा परिसास सोनें किंवा लोखंड यांत जसा भेद नसतो; ४७ किंवा पळी ज्याप्रमाणें नानातऱ्हेच्या रसांत फिरविली, तरी तिला रस किंवा स्वाद यांचा उपभोग घेतां येत नाहीं; ४८ अथवा वारा वाहूं लागला ह्मणजे हा लहान किंवा मोठा रस्ता न समजतां सर्वत्र वहातो, त्याप्रमाणें चांगल्या किंवा वाईट कृत्याच्या विचाराविषयीं जो अंधळा असतो; ४९ ही वस्तु चांगली किंवा वाईट हें न जाणतां, लहान मूल जसें जी वस्तु पाहील, ती तोंडांत घालतें, २५० त्याप्रमाणें पापपुण्यांची खिचडी करून ती खाते वेळीं (कोणतेंही कृत्य करतेवेळेस) बुद्धि व्यापारास कडू किंवा मधुर (बरें किंवा वाईट) न समजणें अशी जी दशा, ५१ तिला अज्ञान असें म्हणतात, यांत संशय नाहीं. याप्रमाणें सहाही दोषांचीं लक्षणें तुला सांगितलीं. ५२ हे सहाही दोष अंगीं असल्यामुळेंच ही आसुरी संपत्ति मोठी बलाढ्य झालेली आहे. ज्याप्रमाणें मडकातळ स्त्रीचें शरीर बारीक स्वरें, परंतु तिच्या ठिकाणीं विषय अधिक असतो. ५३ किंवा प्रलयाग्नि, विद्युदग्नि व वडवाग्नि या तीन अग्नींची संख्या पाहूं गेलें असतां थोडी आहे, पण ते भडकल्यावर त्यांना प्राणाहुति करण्याला हें विश्वही पुरणार नाहीं; ५४ ब्रह्मदेवास शरण गेलें असतांही ज्या त्रिदोष झालेल्या मनुष्याचें मरण चुकत नाहीं, त्या तीन दोषांच्या दुप्पट हे सहा दोष आहेत. असें समज. ५५ या संपूर्ण सहा दोषांनीं ह्या आसुरी संपत्तीची उभारणी झाली असल्यामुळें, ही कमी आहे, असें नाहीं. ५६ परंतु दुष्ट ग्रहांचा समुदाय एकादे वेळीं एकाच राशीला येतो, किंवा निंदा करणाराला जशी सर्व पापें लागतात; ५७ मरण समीप आलेल्या मनुष्यास ज्याप्रमाणें सर्व रोग ग्रस्त करतात, किंवा कुमुहूर्ताचे वेळीं कुयोग एकत्र होतात; ५८ दुसऱ्यावर विश्वास ठेवणारा मनुष्य चोरांच्या तावडींत सांपडावा, किंवा थकला भागलेला मनुष्य महापुरांत पडावा, ह्मणजे त्याचे वाईट परिणाम होतात. त्याप्रमाणें, या दोषांनीं मनुष्याचें अतिशय अनिष्ट होतें ५९ किंवा शेळी चरतांना सात नांग्यांची इंगळी चावली असतां मरते, त्याप्रमाणें हे सहाही दोष त्या मनुष्यास प्राप्त होतात, २६० ज्याला मोक्षमार्गास जाण्याचे उपाय माहीत नसल्यामुळें जो संसारसागरांत बुडून रहातो वाहेर निघत नाहीं; ६१ आणि अर्जुना, अधम योनींच्या पायऱ्यांनीं उतरत उतरत जो स्थावर योनीच्या तळापर्यंत येऊन ठेपतो. ६२ हें असो; त्याच्या ठिकाणीं हे सहा दोष एकत्र होऊन आसुरी संपत्ति वाढवितात. ६३ याप्रमाणें जगांत ज्या ह्या दोन संपत्ति प्रसिद्ध आहेत, त्यांचीं निरनिराळीं लक्षणें तुला सांगितलीं ६४

दैवी संपद्विमोक्षाय निबंधायासुरी मता । मा शुचः संपदं दैवीमभिजातोऽसि पांडव ॥५॥

इया दोन्हींमाजीं पहिली । दैवी जे म्हणितली । ते मोक्षसूयें पाहली । उ-
खाचि जाण ६५ येरी जे दुसरी । संपत्ति कां आसुरी । ते मोहलोहाची खरी ।
सांखळी जीवां ६६ परि हें आइकोनि झणें । भय धेसी हो मनें । काय रात्रीचा
दिनें । धाकु धरिजे ६७ हे आसुरी संपत्ति तया । बंधालागीं धनंजया । जो
साहीं दोषां ययां । आश्रयो होय ६८ तूं तंव पांडवा । सांगितलेया दैवा ।
गुणनिधी वरवा । जन्मलासी ६९ म्हणोनि पार्था तूं या । दैवी संपत्ती स्वा-
मिया । होऊनि यावें उवाया । कैवल्याचिया २७०

द्वौ भूतसर्गौ लोकेऽस्मिन्दैव आसुर एव च । दैवो विस्तरशः प्रोक्त आसुरं पार्थ मे शृणु ६

आणि दैवां आसुरां । संपत्तिवंतां नरां । अनादिसिद्ध उजगरा । राहा-
टीचा आहे ७१ जैसें रात्रीच्या अवसरीं । व्यापारिजे निशाचरीं । दिवसा सु-
व्यवहारीं । मनुष्यादिकीं ७२ तैसिया आपुलालिया राहाटीं । वर्तती दोनी सृष्टी ।
दैवी आणि किरीटी । आसुरी येथ ७३ तेवींचि विस्तारूनि दैवी । ज्ञानकथ-
नादि प्रस्तावीं । मागील ग्रंथीं बरवी । सांगितली ७४ आतां आसुरी जे सृष्टि ।
तेथिंची उपलऊं गोठी । अवधानाची दिठी । दे पां निकी ७५ तरी वाद्येंवीण
नादु । नेदी कवणाही सादु । कां अपुष्पीं मकरंदु । न लभे जैसा ७६ तैसी प्र-
कृति हे आसुर । एकली नोहे गोचर । जंव एकाधें शरीर । माल्हातीना ७७
मग आविष्करला लांकुडें । पावकु जैसा जोडे । तैसी प्राणिदेहीं सांपडे । आ-
टोपली हे ७८ ते तेळीं जे वाढी उंसा । तेचि आंतुला रसा । देहाकारु होय
तैसा । प्राणियांचा ७९ आतां तयाचि प्राणियां । रूप करूं धनंजया । घडले
जे आसुरीया । दोषवृंदीं २८०

प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुरासुराः । न शौचं नापि चाचारो न सत्यं तेषु विद्यते ७

तरि पुण्यालागीं प्रवृत्ती । कां पापाविषयीं निवृत्ती । या जाणणेयाची राती ।
तयांचें मन ८१ निगणेया आणि प्रवेशा । चित्त नेदीतु आवेशा । कोशकिटु
जैसा । जाचिन्नला पैं ८२ कां दिधलें मागुती येईल । कीं नये हें पुढील । न
पाहातां दे भांडवल । मूर्ख चोरां ८३ तैसिया प्रवृत्ति निवृत्ति दोनी । नेणिजती
आसुरीं जनीं । आणि शौच तें स्वप्नीं । देखती ना ते ८४ काळिमा सांडील
कोळसा । वरि चोखी होईल वायसा । राक्षसही मांसा । विटों शके ८५ परि

अन्वय–दैवी संपत् विमोक्षाय आसुरी संपत् च निबंधाय मता पाण्डव, (त्वं दैवीं संपदं अभिजातः असि, (तस्मात्) मा शुचः. ॥ ५ ॥

अर्थ–दैवी संपत्तीच्या योगें संसारांतून मुक्ता होते, आणि आसुरी संपत्तीच्या योगें संसारबंधन प्राप्त होतें. अर्जुना, तूं दैवी संपत्तींत जन्मला आहेस, तेव्हां तूं शोक करूं नको. ॥ ५ ॥

या दोन संपत्तींपैकीं पहिली जी दैवि संपत्ति तुला सांगितली, ती म्हणजे मोक्षरूपी सूर्याच्या उदयानें झालेली पहांटच आहे, असें समज. (सूर्योदयाच्यापूर्वी जशी पहांट होते, तशी ह्या दैवी संपत्तीची प्राप्ति म्हणजे मोक्षापूर्वीची स्थिति होय.) ६५ दुसरी जी आसुरी संपत्ति, ती जीवास मोहरूपी लोखंडाची बिडीच होय. ६६ पण हें ऐकून तूं मनांत धास्ती घेशील हो ! हें पहा–सूर्यानें रात्रीचा का धाक बाळगावा ? ६७ हे धनंजया, या आसुरी संपत्तीच्या सपाटयांत तोच सांपडतो, कीं जो या सहा गुणांस आश्रय होतो. ६८ अर्जुना, तूं तर असा जन्म पावला आहेस कीं, आतां सांगितलेल्या या दैवी गुणांचा उत्तम असा समुद्रच. ६९ म्हणून पार्था, तूं या दैवी संपत्तीचा स्वामी होऊन मोक्षसुख घेण्यास ये. २७०

अन्वय–पार्थ, अस्मिन् लोके दैवः असुरः च एव द्वौ भूतसर्गौ (स्तः; तत्र) दैवः विस्तरशः प्रोक्तः; आसुरं मे शृण. ६

अर्थ–अर्जुना, या लोकीं देव आणि आसुर असे दोन प्रकारचेच मनुष्यांचे वर्ग आहेत. त्यांपैकीं, दैववर्ग पूर्वी तुला विस्तारानें सांगितलाच आहे; आतां आसुरवर्गाचीं लक्षणें सांगतों, तीं ऐक. ॥ ६ ॥

आणि या दैवी व आसुरी संपत्तींनीं युक्त अशा लोकांच्या वागणुकीचे अनादिसिद्ध मार्ग चालत आलेले आहेत. ७१ ज्याप्रमाणें रात्रीं निशाचरांचे व्यापार चालू असतात, व दिवसा मनुष्यादिकांचे उत्तम व्यापार चालत असतात, ७२ त्याप्रमाणें, अर्जुना, आपापल्या मार्गानें ही दैवी व आसुरी संपत्तीचे व्यवहार जगांत चालू आहेत, ७३ त्याचप्रमाणें ज्ञान सांगते वेळीं दैवी संपत्ति मागें विस्तारेंकरून सांगितली. ७४ आतां, आसुरी संपत्तींत वागणारे जे लोक, त्यांजविषयीं तुला सांगतों, तिकडे पूर्ण लक्ष असूं दे. ७५ तर नाद ज्याप्रमाणें वाद्याशिवाय कोणास ऐकूं येत नाहीं, किंवा पुष्पाशिवाय मकरंद मिळत नाहीं, ७६ त्याप्रमाणें ह्या आसुरी संपत्तीनें एकादा शरीराचा आश्रय केल्याशिवाय ती दृष्टीस पडत नाहीं. ७७ मग लांकडावर लांकूड वांसल्यानें जसा त्या ठिकाणीं अग्नि दृष्टीस पडतो, तशी मनुष्याच्या देहांत ओतप्रोत भरलेली ही दृष्टोत्पत्तीस येते. ७८ या वेळीं, ऊंस ज्याप्रमाणें वाढत जाईल, तसा त्यांतील रसही वाढतो. त्याप्रमाणें, जसजसा प्राण्याचा देह वाढेल, तसतशी तीही वाढते. ७९ आतां, अर्जुना, आसुरी संपत्तीच्या दोषांनीं युक्त असे जे प्राणी जन्मलेले आहेत, त्यांचीं लक्षणें तुला सांगतों. २८०

अन्वय–आसुराः जनाः प्रवृत्तिं च निवृत्तिं च न विदुः; तेषु च न शौचं, न आचारः अपि न सत्यम् विद्यते. ॥ ७ ॥

अर्थ–आसुरी संपत्तीच्या लोकांना, कोणतें कान करावें व कोणतें करूं नये, हें समजत नाहीं; आणि त्यांचे ठिकाणीं अंतर्बाह्य शुचिभूतपणा आणि त्याचप्रमाणें आचार व सत्य हीं नसतात. ॥ ७ ॥

तर, पुण्याचरणाविषयीं प्रवृत्ति किंवा पापाचरणाविषयीं निषेध या ज्ञानाचा ज्यांचे अंतःकरणांत काळोख असतो; ८१ कोशकिडा आवेशानें आपलें घरटें बांधूं लागला, म्हणजे ज्याप्रमाणें आपल्यास बाहेर निघण्याला किंवा आंत प्रवेश करण्याला वाट आहे किंवा नाहीं, इकडे लक्ष न देतां आंत कोंडला जातो; ८२ अथवा आपण दिलेलें भांडवल वसूल होईल किंवा नाहीं, हा पुढील विचार न पहातां मूर्ख मनुष्य चोरास कर्जाऊ पैसे देतो, ८३ त्याप्रमाणें, आसुरी संपत्तीचा आश्रय करणारे जे लोक आहेत, ते प्रवृत्ति व निवृत्ति हे दोन्ही मार्ग जाणीत नाहींत; आणि शुचित्व कसें तें त्यांना स्वप्नांत देखील माहीत नसतें. ८४ कोळसाही आपला काळेपणा टाकील, कावळाही पांढरा होईल, आणि राक्षसही मांस खाण्याचा वीट मानतील; ८५

आसुरां प्राणिया । शौच नाहीं धनंजया । पवित्रत्व जेविं भांडिया । मद्याचिया ८६ वाढविती विधीची आस । कां पाहाती वडिलांची वास । आचाराची भाष । नेणतीचि ते ८७ जैसें चरणें शेळियेचें । कां धांवणें वारियाचें । जाळणें आगीचें । भलतेउतें ८८ तैसें पुढां सूनि स्वैर । आचरती ते गा आसुर । सत्येंसि कीर वैर । सदाचि तयां ८९ जरी नांगिया आपुलिया । विंचू करी गुदगुलिया । तरी साचा बोली बोलिया । बोलती ते २९० आपानाचेनि तोंडें । जरि सुगंधा येणें घडे । तरि सत्य तयां जोडे । आसुरांतें ९१ ऐसें ते न करितां कांहीं । आंगेंचि वोखटें पाहीं । आतां बोलती ते नवाई । सांगिजेल९२एऱ्हवीं करेयाच्या ठायीं चांग । तें तयासि कैंचें नीट आंग । तैसा आसुरांचा प्रसंग । प्रसंगें परिस ९३ उधवणीचें जेविं तोंड । उभळी धुवाचे उभड । हें जाणिजे तेविं उघड । सांगों ते बोल ९४

असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरम् । अपरस्परसंभूतं किमन्यत्कामहैतुकम् ॥ ८ ॥

तरि विश्व हा अनादि ठावो । येथ नियंता ईश्वररावो । चावडिये न्यावो अन्यावो । निवडी वेदु ९५ वेदीं अन्यायी पडे । तो निरयभोगें दंडे । संन्यायी तो सुरवाडें स्वर्गीं जिये ९६ ऐसी हे विश्वव्यवस्था । अनादि जे पार्था । इयेतें ह्मणती ते वृथा । अवघेंचि हें ९७ यज्ञमूढ ठकिले यागीं । देवपिसे प्रतिमालिंगीं । नागवले भगवे योगी । समाधिभ्रमें ९८ येथ आपलेनि बळें । भोगिजे जें जें वेंटाळे । हेंवांचोनि वेगळें । पुण्य आहे ९९ ना अशक्तपणें आंगिकें । वेगळ वेंटाळीं न टके । ऐसा गादिजेवीण विषयसुखें । तेंचि पाप ३०० प्राण घेपती संपन्नांचे । हें पाप जरी साचें । तरी सर्वस्व हाता ये तयांचें । हें पुण्यफळ कीं १ बळी अबळातें खाय । हेंचि बाधित जरी होय । तरी मासयां कां न होय । निसंतान २ आणि कुळें शोधूनि दोन्ही । कुमारींचि शुभलग्नीं । मेळवीजती प्रजासाधनीं । हेतु जरी ३ तरी पशुपक्षादि जाती । जया मिती नाहीं संतती । तयां कोणें प्रतिपत्तीं । विवाह केले ४ चोरियेचें धन आलें । तरि तें कोणासि विष जालें । वालभें परद्वार केलें । कोढी कोणी होय ५ ह्मणोनि देवो गोसावी । तो धर्माधर्मु भोगवी । आणि परत्राच्या गांवीं । करी तो भोगी ६ परि परत्र ना देवो । न दिसे ह्मणोनि तें वावो । आणि कर्ता निमे मा ठावो । भोग्यासि कवणु ७ येथ उर्वशिया इंद्र सुखी । जैसा कां स्वर्गलोकीं । तैसाचि

पण अर्जुना, ज्याप्रमाणें मद्याच्या पात्रास पवित्रपणा येत नाहीं, त्याप्रमाणें या आसुरी प्राण्यास सुचित्व येणार नाहीं. ८६ ज्यांना शास्त्रोक्त कर्माची इच्छा नसते, जे वडिलांच्या आज्ञेची वाट पहात नाहींत, आणि आचाराची ज्यांना ओळखही नसते; ८७ ज्याप्रमाणें शेळी हवा तो पाला खाते, किंवा वारा वाटेल तिकडे वाहतो, तसाच अग्नि एकदां भडकल्यावर हवा तो पदार्थ जाळून टाकतो, ८८ त्याप्रमाणें, आपले इच्छेला पुढें करून आसुरी संपत्तीचे लोक आचरण करितात, व सत्याबरोबर त्यांचें नेहमीं हाडवैर असतें. ८९ जर विंचू आपली नांगी मारून त्या योगानें लोकांस गुदगुल्या करूं शकेल, तरच त्यांच्या बोलण्यांत सत्य आढळेल! २९० गुदद्वारांतून निघणारा वारा जर सुगंधयुक्त निघेल, तरच आसुरी संपत्तीच्या लोकांजवळ सत्य सांपडेल! ९१ अशा प्रकारें कांहीं न करतांही ते स्वभावतःच वाईट असतात. समजलास? आतां, त्यांचे बोलण्याचा नवलाव तुला सांगतों. ९२ एरव्हीं, उंटाच्या ठिकाणीं पाहूं गेलें तर त्याचा कोणता अवयव नीट आहे म्हणून सांगता येणार? त्याप्रमाणें आसुरी संपत्तीच्या लोकांची स्थिति आहे. परंतु प्रसंगानुसार सांगतों, ती ऐक. ९३ आतां, जीं आम्ही त्यांचीं भाषणें सांगणार आहों तीं म्हणजे धुराड्याच्या तोंडांतून ज्याप्रमाणें धुराचे लोट बाहेर निघतात, त्याप्रमाणें असतात, असें समज. ९४

अन्वय–' (इदं) जगत् असत्यं, अप्रतिष्ठं, अनीश्वरम्, अपरस्परसंभूतं, कामहैतुकं (च) (अस्ति), अन्यत् किम्?' (इति ते) आहुः. ॥ ८ ॥

अर्थ–' हें जग लबाड, धर्माधर्माची स्थिति ज्यांत नाहीं असें, ईश्वररहित, स्त्रीपुरुषसंयोगजन्य आणि ज्याला काम हेंच मूळ कारण, असें आहे, दुसरें काय?' असें ते म्हणतात. ॥ ८ ॥

तर विश्व हें अनादि चालत आलेलें आहे, व त्या ठिकाणीं ईश्वर हा सर्वांत श्रेष्ठ असून तेथील नियंता आहे, आणि तेथील चावडीवर वेद हे न्याय व अन्याय यांचा उलगडा करतात; ९५ वेद ज्याला अन्यायी ठरवितात, त्याला नरकयोगाची शिक्षा होते, व न्यायी ठरवितात तो सुखानें स्वर्गवास करतो. ९६ पार्था, अनादिकालापासून चालत आलेली जी ही विश्वाची व्यवस्था, तिला, हें सर्व खोटें आहे, असें ते म्हणतात. ९७ ज्यांना यज्ञाचें वेड लागलें आहे, ते यज्ञ करून फसतात; ज्यांना देवांची पूजा करण्याचें वेड लागलें आहे; ते मूर्तिपूजा करतात; व जे समाधियोगानें भ्रम पावले आहेत, ते हा संसार टाकून भगवीं वस्त्रें पांघरून योगी होतात. ९८ या जगांत आपल्या सामर्थ्यानें ज्याचा उपभोग घेतां येईल त्यांवांचून दुसरें पुण्य आहे काय? ९९ सर्व विषयोपभोग एकत्र करून अंगांत शक्ति नसल्यामुळें त्यांचा उपभोग ज्याला घेतां येत नाहीं, तेंच पाप होय. ३०० श्रीमान् लोकांचे प्राण हरण करणें हें जर खरोखर पाप म्हणावें, तर त्यांचें सर्व धन आपले हातांत येतें, हें पुण्यफळ नाहीं का? १ जो बलवान् असतो तो अशक्ताचा नाश करतो, हें जर पाप म्हणावें तर मोठे मासे लहान माशांस खातात तर त्यांचें निसंतान कसें होत नाहीं? २ आणि दोन्हीकडील कुळें शोधून प्रजा उत्पन्न करण्याच्या हेतूनें जर मुलामुलींच्या विवाहास सुमुहुर्तच लागतो, असें जर असेल ३ तर पशुपक्ष्यादिकांस जी अनिवार संतति होते त्यांचीं सुमुहूर्त पाहून पावलोपावलीं कोण लग्नें लावितो? ४ चोरून आणिलेल्या धनाचा कोणीं उपभोग केला असतां, कोणास तें विषाप्रमाणें बाधलें आहे काय? किंवा आवडीनें व्यभिचार केला असतां कोणास कोड उत्पन्न झालें आहे काय? ५ म्हणून, ईश्वर जो जगाचा स्वामी आहे, तो धर्माधर्मानें वागणाऱ्यास सुख आणि दुःख हीं फळें भोगवतो, आणि या लोकीं केलेल्या कर्माचा भोग परलोकामध्यें, जो करतो, त्यासच भोगावा लागतो. ६ हें शास्त्राचें म्हणणें खरें असें मानावें, परंतु परलोक व ईश्वर दिसत नाहींत, म्हणून त्याविषयीं बोलणें व्यर्थ होय; आणि पुण्य किंवा पाप करणारा मरण पावला तर, त्याचीं फळें भोगण्यास कोण उरतो? ७ हें पहा–

कृमिही नरकीं । लोळतु श्लाघे ८ म्हणौनि नरक स्वर्गु । नव्हे पापपुण्यभागु । जे दोहीं ठायीं सुखभोगु । कामाचाचि तो ९ याकारणें कामें । स्त्रीपुरुषयुग्में । मिळती तेथ जन्मे । आघवें जग ३१० आणि जें जें अभिलाषें । स्वार्थालागीं हें पोषे । पाठीं परस्परद्वेषें । कामचि नाशी ११ एवं कामावांचूनि कांहीं । जगा मूळचि आन नाहीं । ऐसें बोलती पाहीं । आसुर गा ते १२ आतां असो हें किडाळ । बोली न करूं पघळ । सांगतांचि सफोल । होतसे वाचा १३

एतां दृष्टिमवष्टभ्य नष्टात्मानोऽल्पबुद्धयः । प्रभवंत्युग्रकर्माणः क्षयाय जगतोऽहिताः ॥९॥

आणि ईश्वराचिया खंती । नुसधियाचि करिती चांथी । हेंही नाहीं चित्तीं । निश्चयो एकु १४ किंबहुना उघड । आंगीं लाऊनियां पाखांड । नास्तिकपणाचें हाड । रोंविलें जीवीं १५ ते वेळीं स्वर्गालागीं आदरु । कां नरकाचा अडदरु । या वासनांचा अंकुरु । जळोनि गेला १६ मग केवळ ये देहखोडां । अमेध्योदकाचा बुडबुडा । विषयपंकीं सुहाडा । बुडाले गा १७ जैं आटावे होती जळचर । तैं डोहीं मिळती ढीवर । कां पडावें होय शरीर । तैं रोगा उदयो १८ उदैजणें केतूचें जैसें । विश्वा अनिष्टोद्देशें । जन्मती ते तैसे । लोकां आटुं १९ विरूढलिया अशुभ । फुटती तैं ते कोंभ । पापाचे कीर्तिस्तंभ । चालते ते३२० आणि मागां पुढां जाळणें । वांचूनि आगी कांहीं नेणे । ब्वैसें विरुद्धचि एक करणें । भलतेयां २१ परि तेंचि गा करणें । आदरिती संभ्रमें जेणें । तो आयिक पार्था म्हणे । श्रीनिवासु २२

काममाश्रित्य दुष्पूरं दंभमानमदान्विताः । मोहाद्गृहीत्वाऽसद्ग्रहान्प्रवर्तंतेऽशुचिव्रताः ॥१०॥

तरि जाळ पाणियें न भरे । आगी इंधनें न पुरे । तयां दुर्भरांचिये धुरे । भुकाळु जो २३ तया कामाचा वोलावा । जीवीं धरूनि पांडवा । दंभमानाचा मेळावा । मेळविती २४ मातलिया कुंजरा । आगळी जाली मदिरा । तैसा मदाचा ताठा तंव जरा । चढतां आंगीं २५ आणि आग्रहा तोचि ठावो । वरि मौढ्याऐसा सावावो । मग काय वानूं निर्वाहो । निश्चयाचा २६ जिहीं परोपतापु घडे । परावा जीवु रगडे । तिहीं कर्मीं होऊनि गाढे । जन्मवृत्ती २७मग आपुलें केलें फोकारिती । आणि जगातें धिक्कारिती । दाहीं दिशीं पसरिती । स्पृहा- [illegible]ऐसेनि गा आटोपें । थोरिये जाणिती पापें । धर्म धेनू खुरपें । सुकलें जैसें २९

स्वर्गलोकीं ज्याप्रमाणें उर्वशीच्या उपभोगानें इंद्र सुखी असतो, त्याप्रमाणें नरकांतील किडेही त्यांतच संतोष मानतात. ८ म्हणून नरक किंवा स्वर्ग हें पापकर्माचें किंवा पुण्यकर्माचें फल नाहीं.कारण दोन्ही, ठिकाणीं कामाचाच सुखोपभोग प्राप्त होतो. ९ यास्तव कामाच्या इच्छेनें स्त्रीपुरुष एकत्र झाले असतां, सर्व जगाची उत्पत्ति होते; ३१० आणि आपल्या हिताकरितां जी जी इच्छा करून आपण कांहीं मिळवितों, त्याचा आपल्यास वीट आल्यावर द्वेष उत्पन्न होऊन आपली इच्छाच त्याचा नाश करिते. ११ याप्रमाणें, जगाच्या उत्पत्तीस कामावांचून दुसरें कांहीं नाहीं, असें असुर लोक म्हणतात. १२ आतां ह्या निंद्य बोलण्याचा जास्ती विचार नको. कारण याविषयीं चर्चा करणें केवळ व्यर्थ होय. १३

अन्वय–एतां दृष्टिम् अवष्टभ्य नष्टात्मानः अल्पबुद्धयः, उग्रकर्माणः, अहिताः जगतः क्षयाय प्रभवन्ति. ॥ ९ ॥

अर्थ–या पूर्वोक्त दृष्टीचा आश्रय करून, आत्मघातकी, अल्पबुद्धि, भयंकर कर्में करणारे, व सर्वांचे वैरी, असे आसुरी संपत्तीतील लोक जगाचा नाश करण्यास उत्पन्न झालेले असतात. ॥ ९ ॥

आणि ईश्वरासंबंधानें नुसत्या चांथी म्हणजे गप्पा सुद्धां मारीत नाहीत, त्यांच्या चित्तांत कोणत्याही प्रकारचा एक निश्चय नसतो. १४ फार काय सांगावें ! उघड रीतीनें आपण नास्तिक आहोंत,असा आपल्या ठिकाणीं बाणा बाळगतो. जशी महारवाडा समजण्याची खूण हाड रोवणें ही असते, त्याप्रमाणें ज्ञानावांचून पापपुण्यासंबंधानें निर्धास्तता बाळगणें, हें एक नास्तिकपणाचें हाडच होय. १५ अशा स्थितींत स्वर्गाविषयीं श्रद्धा किंवा नरकाचें भय यांविषयीं त्याचे मनांत कांहींएक वागत नाहीं.१६ मग, वीरा अर्जुना, हे आसुरी लोक देहरूपी खोड्यांत सांपडून अपवित्र जलाच्या नाशवंत बुडबुड्याप्रमाणें विषयरूपी चिखलांत बुडतात.१७ ज्या वेळेस जलचरांचा मृत्यु ओढवतो,त्या वेळेस त्यांना धरण्याकरितां डोहावर कोळी लोक जमून जाळीं टाकतात; किंवा शरीरपतनाची वेळ आल्यावर रोग उद्भवतात; १८ किंवा प्रजेला पीडा व्हावयाची अशी सर्व जगाची ज्याप्रमाणें दुर्गेकडे आकर्षण उत्पन्न होतें, त्याप्रमाणें लोकांचा नाश होण्याची वेळ आली म्हणजे आसुरी संपत्तीच्या लोकांचा उदय होतो.१९ ज्याप्रमाणें अशुभ केलें असतां त्याला अशुभच फोव येतात, त्याप्रमाणें हे पापाचे चालतेबोलते कीर्तिस्तंभच आहेत. ३२० आणि ज्याप्रमाणें अग्नीला मागें अथवा पुढें आलेली वस्तु जाळण्याशिवाय दुसरें कर्तव्य नसतें, त्याप्रमाणें त्यांच्याजवळ येणारा मनुष्य चांगला असो, अथवा वाईट असो, त्याचा हे नाशच करतात. २१ परंतु ज्या समारंभानें ते आपलीं कृत्यें करतात,त्याचें वर्णन करतों, तें ऐक, असें श्रीनिवास पार्थास म्हणाले. २२

अन्वय–दुष्पूरं कामम् आश्रित्य मोहात् असद्ग्राहान् गृहीत्वा अशुचिव्रताः दम्भमानमदान्विताः प्रवर्तन्ते. ॥ १० ॥

अर्थ–अनिवार कामाचा स्वीकार करून व मोहानें भलताच ग्रह धरून ते दुराचारी, आणि दंभ, मान व मद यांनीं युक्त असे लोक कर्मे करण्यास उद्युक्त होतात.

तर जाळ्यांत कधीं पाणी सांठवितां येत नाहीं, व अग्नीला काष्टें कधीं पुरीं होत नाहींत, अशा दुर्भर वस्तूंप्रमाणें जो नेहमीं बुभुक्षित असतो, २३ त्या कामाला आपला मनांत आश्रय देऊन, हे पांडवा, जे दंभ व मान यांची त्यांत भर घालतात; २४ माजलेल्या हत्तीस ज्याप्रमाणें दारू पाजल्यावर तो अधिक उन्मत्त होतो, त्याप्रमाणें अंगांत मदाचा ताठा भरलेले ते आसुरी संपत्तीनें युक्त असे लोक, जों जों वृद्ध होतात, तों तों आपणांस मोठे दुढ्ढाचार्य असें समजतात; २५ आणि ते कोणतीही गोष्ट दुराग्रहानें तडीस नेल्याशिवाय ठेवीत नाहींत, तशांत मूर्खपणाची भर पडल्यावर मग निश्चयाची दाद कोठें लागणार?२६ ज्या योगानें दुसऱ्यास पीडा होईल किंवा दुसऱ्याची प्राणहानि होईल तीं कर्मे करण्याविषयीं जे नेहमीं प्रवृत्त असतात; २७ आपण केलेलें कृत्य चहूंकडे प्रसिद्ध करतात व जगाला तुच्छ मानतात; आणि त्यांच्या इच्छेस धांव घेण्यास दशदिशाही पुरत नाहींत ! २८ ज्याप्रमाणें गाय शेतांत मोकळी सोडल्यावर ती हवी तिकडे चरते, त्याप्रमाणें अभिमानानें पापाचरणाची वृद्धि करतात. २९

चिंतामपरिमेयां च प्रलयांतामुपाश्रिताः । कामोपभोगपरमा एतावदिति निश्चिताः ॥ ११ ॥

याचि येका आयती । तयाचिया कर्मप्रवृत्ती । आजि जिणियाही परौती । वाहती चिंता ३३० पाताळाहूनि निम्न । जियेचिये उंचिये सानें गगन । जें पाहतां त्रिभुवन । अणुही नोहे ३१ ते योगपटाची मवणी । जीवीं अनियम चिंतवणी । जे सांडूं नेणे मरणीं । वल्लभा जैसी ३२ तैसी चिंता अपार । वाढविती निरंतर । जीवीं सूनि असार । विषयादिक ३३ स्त्रिया गाइलें आइकावें । स्त्रीरूप डोळां देखावें । सर्वेंद्रियें आलिंगावें । स्त्रियेतेंचि ३४ कुरवंडी कीजे अमृतें । ऐसें सुख स्त्रियेपरौतें । नाहींचि ह्मणौनि चित्तें । निश्चयो केला ३५ मग तयाचि स्त्रीभोगा- । लागीं पाताळ स्वर्गा । धांवती दिग्विभागा- । परौतेही ३६

आशापाशशतैर्बद्धाः कामक्रोधपरायणाः । ईहंते कामभोगार्थमन्यायेनार्थसंचयान् ॥ १२ ॥

आमिषकवळु थोरी आशा । न विचारितां गिळी मासा । तैसें कीजे विषयाशा । तयांसि गा ३७ वांछित तंव न पवती । मग कोरडियेचि आशेची संतती । वाढऊं वाढऊं होती । कोशकिडे ३८ आणि पसरिला अभिलाषु । अपूर्णु होय तोचि द्वेषु । एवं कामक्रोधांहूनि अधिकु । पुरुषार्थु नाहीं ३९ दिहा खोलणें रात्रीं जागोवा । ठाणांतरिया जैसा पांडवा । अहोरात्रिही विसांवा । भेटेचिना ३४० तैसें उंचौनि लोटिलें कामें । नेहटती क्रोधाचिये ढेमे । तरी रागद्वेष प्रेमें । न माती केंही ४१ तेविंचि जीवींचिया हांवा । विषयवासनांचा मेळावा । केला परी तो भोगावा । अर्थें कीं ना ४२ ह्मणोनि भोगावयाजोगा । पुरता अर्थु पैं गा । आणावया जगा । झोंबती सैरा ४३ एकातें साधूनि मारिती । एकाचि सर्वस्वें हरिती । एकालागीं उभारिती । अपाययंत्रें ४४ पाशिकें पोतीं वागुरा । सुणीं ससाणे चिकाटी खोंचारा । घेऊनि निघती डोंगरा । पारधी जैसे ४५ ते पोसावया पोट । मारूनि प्राणियांचे संघाट । आणिती ऐसें निकृष्ट । तेंही करीती ४६ परप्राणघातें । मेळविती वित्तें । मिळाल्या चित्तें । तोषणें ४७

इदमद्य मया लब्धामिमं प्राप्स्ये मनोरथम् । इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम् ॥१३॥

ह्मणे आजि मियां । संपत्ति बहुतेकांचिया । आपुल्या हातीं केलिया ।

अन्वय-(ते) अपरिमेयां प्रलयांतान् चिंतां उपाश्रिताः कामोपभोगपरमाः च एतावत् इति निश्चिताः ॥ ११ ॥

अर्थ-जिचें मोजमाप करितां येत नाहीं, व मरणापर्यंत जिचा अंत होत नाहीं, अशा चिंतेचा आश्रय केलेल्या आणि कामोपभोगांमध्येंच मग्न झालेल्या पुरुषांचा, [कामशांति] हाच पुरुषार्थ होय, असा निश्चय झालेला असतो. ॥ ११ ॥

याच एका साधनानें ते आपलीं कर्मे करतात, आणि मरण पावल्यावरही आपल्यास सुख मिळावें, म्हणून काळजी वहातात. ३३० जी चिंता पाताळाहूनही खोल व गगनाहूनही उंच, आणि जिच्याशीं तुलना केली असतां त्रिभुवन अणूएवढेंही दिसत नाहीं; ३१ संन्याशास घालून दिलेल्या नियमाप्रमाणें हे आपला कित्ता वळवून मनांत अनियमित चिंता धारण करतात; आणि ज्याप्रमाणें पतिव्रता स्त्री संकटसमयींही आपल्या नवऱ्यास सोडीत नाहीं, त्याप्रमाणें ती चिंताही यांना सोडीत नाहीं. ३२ त्याचप्रमाणें, असार अशा विषयादिकांविषयीं नेहमीं मनांत लालसा वाळगून त्यांच्या प्राप्तीविषयीं अपार चिंता वहातात; ३३ स्त्रियांचें गाणें नेहमीं ऐकावें, स्त्रियांचें स्वरूप डोळ्यांनीं पहावें, सर्व इंद्रियांना स्त्रियांचेंच आलिंगन करण्यास सांपडावें; ३४ आणि स्त्रीपासून होणाऱ्या मुखावरून अमृतही ओंवाळून टाकावें; अशा प्रकारें, स्त्रीपेक्षां अधिक असें दुसरें सुखच नाहीं. असा त्यांचे मनानें निश्चय केलेला असतो. ३५ मग त्याच स्त्रीभोगाकरितां स्वर्गांत,पाताळांत किंवा दिशांचे सीमेपलीकडेही धांव घेण्यास ते तयार असतात. ३६

अन्वय-आशापाशशतैर्बद्धाः कामक्रोधपरायणाः कामभोगार्थं अन्यायेन अर्थसंचयान् ईहन्ते. ॥ १२ ॥

अर्थ-शतशः आशापाशांनीं बद्ध झालेले व कामक्रोधांचे ठिकाणीं तत्पर असलेले ते लोक आपल्या इच्छेप्रमाणें भोग भोगण्याकरितां अन्यायानें पुष्कळ द्रव्य मिळविण्याची इच्छा करितात. ॥ १२ ॥

गळास लाविलेल्या अमिषाच्या आशेनें मासा जसा तें खावयास जाऊन मरण पावतो, तसे हे विषयांच्या आशेनें मरण पावतात. ३७ इच्छित गोष्ट प्राप्त न होतां नेहमीं विषयांची कोरडी आशाच करून शेवटीं हे आपल्यास कोशकिड्याप्रमाणें बंधन करून घेतात; ३८ आणि ज्या वस्तूची इच्छा करावी, ती जर पूर्ण झाली नाहीं, तर लागलीच द्वेष उत्पन्न होतो. याप्रमाणें नेहमीं वस्तुलाभापासून तृप्ति मानून नीच वस्तु न मिळाल्यामुळें क्रोधयुक्त होतात. एवंच कामक्रोध बाह्यविषयांपलीकडे ज्यांना कर्तव्य नसतें; ३९ अर्जुना, ज्याप्रमाणें ठाण्यांतील स्वारास दिवस कामगिरीकरितां फिरावें लागतें, व रात्रीं गस्त घालावी लागते. म्हणून त्याला रात्रंदिवस विसांवा नसतो, ३४० त्याप्रमाणें, उंच शिखरावरून कामानें ढोसून दिल्यामुळें (ज्या वस्तूविषयीं अतिशय इच्छा धरली ती न मिळाल्यामुळें) क्रोधाच्या डेंकडीवर आदळतात. (क्रोधाविष्ट होतात.) तरी त्यांचें कामक्रोधांविषयींचें प्रेम कमी होत नाहीं. ४१ त्याचप्रमाणें, मनांत उत्पन्न झालेली विषयांची इच्छा पैशाशिवाय पूर्ण कोठून होणार? ४२ म्हणून विषयवासना पूर्ण होण्यापुरतें द्रव्य मिळविण्याकरितां जगांतील लोकांस त्रास देतात. ४३ एकाद्याला आडरानांत गांठून मारतात, एकाद्याचें सर्वस्व हरण करतात, व एकाद्याचा नाश करण्याकरितां उपायांची योजना करितात. ४४ पारधी लोक डोंगरावर शिकारीस जाते वेळीं ज्याप्रमाणें आपल्याजवळ पाश, पोतीं, जाळीं, शिकारी कुत्रे, वहिरी ससाणे, चिकाट्या व भाले घेतात; ४५ आणि आपलें पोट भरण्याकरितां पुष्कळ प्राणी मारून आणतात, त्याप्रमाणें हेही अशींच वाईट कर्मे करतात; ४६ दुसऱ्याचा प्राणघात करून द्रव्य मिळवितात; आणि तें मिळाल्यावर त्यांच्या चित्तास कसा संतोष होतो, तें ऐक. ४७

अन्वय-अद्य इदम् मया लब्धं, इमं मनोरथं (श्वः) प्राप्स्ये, इदम् धनं (अधुना) मे अस्ति, (इदम्) अपि धनम् च पुनः भविष्यति. ॥ १३ ॥

अर्थ-हें मीं आज मिळविलें, हा मनोरथ मी उद्यां साध्य करीन, हें इतकें धन आतां मजपाशीं आहे आणि हेंही पुनः आणखी मिळेल, [असें मनोराज्य ते करितात].

तो ह्मणतो,"आज बहुतेकांची संपत्ति मी स्वाधीन करून घेतली आहे, तेव्हां मी आतां धन्य

धन्यु ना मी ४८ ऐसा श्लाघों जंव जाये । तंव मन आणीकही वाहे । सवेंचि म्हणे पाहे । आणिकांचेंही आपूं ४९ हें जेतुलें असे जोडिलें । तयाचेनि भांडवलें । लाभा घेईन उरलें । चराचर हें ३५० ऐसेनि धना विश्वाचिया । मीचि होईन स्वामिया । मग दिठी पडे तया । उरों नेदीं ५१

असौ मया हतः शत्रुर्हनिष्ये चापरानपि । ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान्सुखी ॥१४॥

हे मारिले वैरी थोडे । आणीकही साधीन गाढे । मग नांदेन पवाडें । येकलाचि मी ५२ मग माझी होतील कामारीं । तियेंवांचूनि येरें मारीं । किंबहुना चराचरीं । ईश्वरु तो मी ५३ मी भोगभूमीचा रावो । आजि सर्वसुखासी ठावो । म्हणोनि इंद्रुही वावो । मातें पाहूनि ५४ मी मनें वाचा देहें । करीं तें कैसें नोहे । कें मजवांचूनि आहे । आज्ञासिद्ध आन ५५ तंवचि बळिया काळु । जंव न दिसें मी अतुर्बळु । सुखाचा कीर निखिळु । रासिवा मीचि ५६

आढ्योऽभिजनवानस्मि कोऽन्योऽस्ति सदृशो मया ॥
यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इत्यज्ञानविमोहिताः ॥ १५ ॥

कुबेरु आथिला होयें । परी तो नेणे माझी सोये । संपत्ती मजसम नव्हे । श्रीनाथाही ५७ माझिया कुळाचा उजाळु । कां जातिगें [illegible]वा । मेळु । पाहतां ब्रह्माही हळु । उणाचि दिसे ५८ म्हणोनि मिरविती [illegible]नेहटती क्रो[illegible]यां ईश्वरादि आघवे । नाहीं मजसीं सरी पावे । ऐसें कोण्ही ५९ आतां लोपला अभिचारु । त्याचा करीन मी जीर्णोद्धारु । प्रतिष्ठीन परमारु । यागवारि ३६० मातें गाती वानिती । नटनाचें रिझविती । तयां देईन मागती । ते ते वस्तु ६१ माजिरा अन्नपानीं । [illegible]पदांच्या आलिंगनीं । मी होईन त्रिभुवनीं । आनंदाकारु ६२ काय बहु सांगों ऐ[illegible]क । ते आसुरीप्रकृती पिसें[illegible]वागुरे । तुरंबिती असोसें[illegible]गगनौळें तियें६३

अनेकचित्तविभ्रांता मो[illegible]लसमावृताः । प्रसक्ताः कामभोगेषु पतंति नरकेऽशुचौ ॥ १६ ॥

ज्वराजेनि आटोपें । रोगी भलतैसें जल्पे । चावळती संकल्पें । जाण ते तैसे ६४ अज्ञान आतुले धुळी । म्हणौनि आशा वाहटुळी । भोवंडीजती अंतराळीं । मनोरथांच्या ६५ अनियम आषाढ मेघ । कां समुद्रोर्मीं अभंग । तैसे कामिती अनेग । अखंड काम ६६ मग पैं कामनाचि तया । जिवीं जाल्या वेलरिया । [illegible]वाढिली कांटिया । कमळें जैसीं ६७ कां पाषाणाचिया माथां । हांडी फुटली

नाहीं बरें ?" ४८ याप्रमाणें आपणच आपली प्रौढी मिरवीत आहे, तों त्याचे मनांत लागलीच इच्छा उत्पन्न होते कीं, " आणखीही दुसऱ्या लोकांचें द्रव्य हरण करून आणूं. ४९ जेवढें कांहीं आज आपण मिळविलें आहे, तेवढ्या भांडवलावर, कांहीं जें आणखी चराचरांपैकीं शिल्लक असेल तेवढें मिळवीन. " (लुबाडावयाजोग्या श्रीमंतांजवळ आणखी कांहीं जी स्थावरजंगम संपत्ति शिलक असेल, तीही हरण करून आणीन.)३५०याप्रमाणें या विश्वांतील सर्व संपत्तीचा मीच मालक होईन. मग ज्याच्याकडे दृष्टि फिरवीन, त्याचा नाश करीन ! ५१

अन्वय–असौ शत्रुः मया हतः; अपरान् च अपि हनिष्ये; अहं ईश्वरः अहं भोगी; अहं सिद्धः; बलवान् सुखी (च अहं अस्मि). ॥ १४ ॥

अर्थ–हा शत्रु मीं मारला, व दुसरे आणखी देखील मारीन. मी मोठा समर्थ, मी विषयोपभोग घेणारा, मी संपन्न, मी बलवान, व मीच सुखी, [आहें असें ते मानितात.]१४

" हे आजपर्यंत नष्ट केलेले शत्रु थोडे आहेत, तर आणखी दुसरे जे बलाढ्य आहेत, त्यांनाही जिंकीन, आणि मग मी एकटाच मोठ्या लौकिकानें नांदेन, ५२ मग माझे जे सेवक होतील, त्यांखेरीज इतरांचा मी नाश करीन; फार काय सांगावें ! या सर्व जगाचा ईश्वर जर कोणी असला, तर तों मी. ५३ मी भोगरूपी पृथ्वीचा राजा असून सर्व सुखांच्या उपभोगाचें ठिकाणही मीच; माझें ऐश्वर्य पाहून इंद्रही फिका !! ५४ मी कायावाचामनेंकरून जें करीन तें सिद्धीस कसें जाणार नाहीं ? आणि माझ्यावांचून दुसरा आज्ञा करणारा कोण असणार ? ५५महाबलवान् असा जो मी,त्या मला पाहिलें नाहीं तोंपर्यंतच कालाच्या बलाची प्रतिष्ठा आहे; आणि मी तर सुखाची केवळ रासच होय. ५६

अन्वय–आढ्यः; अभिजनवान् अस्मि, मया सदृशः कः अन्यः अस्ति ! अहं यक्ष्ये, दास्यामि, मोदिष्ये. इति ते अज्ञानविमोहिताः (संतः). ॥ १५ ॥

अर्थ–धनाढ्य मी, कुलीन मी, या जगांत मजसारखा दुसरा कोण आहे ! मी यज्ञ करण्याच्या कामांत सर्वांवर कडी करीन, नट वगैरे लोकांना विशेष देणग्या देईन, व आनंद पावेन, [अशा प्रकारें अतिशय मूढ होऊन ते बडबड करितात]. १५ ॥

" कुबेर सेवक आहे ज्या, तोंतु च त्यानें नाहीं बरोबरी करणार नाहीं: आणि माझ्या वैभवाप्रमाणें श्रीविष्णूचीही संपत्ति नाहीं. ५७ माझ्या कुळाचा सांवलौकिक किंवा अन्यकोणाचा असूया यांच्या मानानें सृष्टिकर्ता ब्रह्मदेवही थोडा कमीच होईल. ५८ म्हणून, लोक जे ईश्वरादिकांचा लौकिक गातात, तो व्यर्थ असून माझी बरोबरी करणारा कोणीही सांपडणार नाहीं. ५९ आतां, जारणमारणादिकांचा जो लोप झाला आहे, त्यांचा मी जीर्णोद्धार करीन, व लोकांस थोडा करणारे जे यज्ञयाग ते करीन. ३६० माझ्या ऐश्वर्याचें जे वर्णन करतील, किंवा माझी स्तुति करतील, आणि नाचतनाचे करून जे मला संतोषवितील, त्यांना तें नागतील त्या वस्तु मी देईन. ६१ माझक अन्न खाऊन व मद्य वगैरे पिऊन स्त्रियांना आलिंगन देण्यांत या त्रिभुवनांत मी तल्लीन होईन. ६२ असें आणखी काय काय म्हणून सांगूं ? ज्यांना आसुरी प्रकृतीचें वेड लागलें आहे, ते अशा प्रकारें आकाशपुष्पांचा अपरिमित इच्छेनें वास घेतात ! ६३

अन्वय–अनेकचित्तविभ्रांताः, मोहजालसमावृताः, कामभोगेषु प्रसक्ताः, ते अशुचौ नरके पतंति. ॥ १६ ॥

अर्थ–अशा प्रकारें अनेक मनोरथांनीं ज्यांचें चित्त विक्षिप्त झालेलें आहे, मोहजालानें वेढलेले जे आहेत, आणि कामभोगांमध्यें जे अत्यंत आसक्त झालेले आहेत, ते पुरुष अमंगल नरकामध्यें पडतात. ॥ १६ ॥

ज्याप्रमाणें सन्निपात झालेला रोगी हवें तें बरळतो, त्याप्रमाणें आसुरी संपत्तीनें वेडे झालेले लोक हव्या त्या कल्पना तोंडानें बकतात, असें समज ६४ अज्ञानरूपी धूळ आशारूपी वावटळीच्या सपाट्यांत सांपडल्यावर मनोरथरूपी आकाशांत वाटोळी फिरत जाते. ६५ ज्याप्रमाणें आषाढाचे महिन्यांत एकावर एक असे ढग पुष्कळ येतात, किंवा समुद्रांत [illegible]र लाटा येतात, त्याप्रमाणें ते अखंड कामाची इच्छा करतात. ६६ मग मनोरथरूपी वेल मनांत पसरल्यावर, ज्याप्रमाणें कांड्यांवरून कमळें ओढलीं असतां फाटून जातात, ६७ किंवा पार्था, ज्याप्रमाणें दगडावर हंडी आपटली असतां

पार्था । जीवीं तैसें सर्वथा । कुटके जाले ६८ तेव्हां चढतिये रजनीं । तमाची होय पुरवणी । तैसा मोहो अंतःकरणीं । वाढोंचि लागे ६९ आणि वाढे जंव जंव मोहो । तंव तंव विषयीं रोहो । विषय तेथ ठावो । पातकासी ३७० पापें आपलेनि थांवें । जंव करिती मेळावे । तंव जितांचि आघवे । येती नरकां७१ ह्मणौनि गा सुमती । जे कुमनोरथां पाळिती । ते आसुर येती वस्ती । तया ठाया ७२ जेथ असिपत्रतरुवर । खदिरांगाराचे डोंगर । तातला तेलीं सागर । उततातीं ७३ जेथ यातनांची श्रेणी । हे नित्य नवी यमजाचणी । पडती तिये दारुणीं । नरकलोकीं ७४ ऐसे नरकाचिये सेले । भागीं जे जे जन्मले । तेही देखों भुलले । यजिती यागीं ७५ एन्हवीं यागादिक क्रिया । आहाणतेची धनंजया । परि विफळती आचरोनियां । नाटकी जैसे ७६ वल्लभाचिया उजरिया । आपणयाप्रति कुस्त्रिया । जोडोनि तोषिती जैसिया । अहेवपणें ७७

आत्मसंभाविताः स्तब्धा धनमानमदान्विताः । यजंते नामयज्ञैस्ते दंभेनाऽविधिपूर्वकम् ॥१७॥

तैसें आपणयां आपण । मानिता महंतपण । फुगती असाधारण । गर्वें तेणें ७८ मग लवों नेणती कैसे । आटिवा लोहाचे खांब जैसे । कां उधवले आकाशें । शिळाराशी ७९ तैसे आपुलिये बरवे । आपणचि रिझतां जीवें । तृणाहीहूनि आघवें । मानिती नीच ३८० वरि धनाचिया मदिरा । माजूनि धनुर्धरा । कृत्याकृत्यविचारा । सवतें केलें ८१ जया आंगीं आयती ऐसी । तेथ यज्ञाची गोठी कायसी । तरि काय काय पिसीं । न करिती गा ८२ म्हणौनि कोणे एके वेळे । मौढ्यमद्याचेनि बळें । यागाचींही टवाळें । आदरिती ८३ ना कुंड मंडप वेदी । ना उचित साधनसमृद्धी । आणि तयांसी तंव विधी । द्वंद्वचि सदा ८४ देवां ब्राह्मणांचेनि नांवें । आडवारेनहि नोहावें । ऐसें आथी तेथ यावें । लागे कवणा ८५ पैं वासरुवाचा भोंकसा । गाईपुढें ठेवूनि जैसा । उगाणा घेती क्षीररसा । बुद्धिवंत ८६ तैसें यागाचेनि नांवें । जग वाऊनि हांवें । नागविती आघवें । अहेरावारीं ८७ ऐशा कांहीं आपुलिया । होमिती जे उजरिया । तेणें कामिती प्राणिया । सर्वनाशु ८८

अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं च संश्रिताः । मामात्मपरदेहेषु प्रद्विषंतोऽभ्यसूयकाः ॥१८॥

मग पुढां भेरी निशाण । लाउनी ते दीक्षितपण । जगीं फोकारिती आण । वावो वावो ८९ तेव्हां महत्त्वें तेणें अधमा । गर्वा चढे महिमा । जैसे लेवे दि-

फुटते, त्याप्रमाणें त्यांच्या मनोरथांचे तुकडे तुकडे होतात ! ६८ तेव्हां, जों जों रात्र वाढेल तों तों काळोखही वाढतो, त्याप्रमाणें (जों जों अज्ञान वाढेल तों तों) त्यांचे अंतःकरणांत मोह वाढतो; ६९ आणि जों जों मोह वाढेल, तों तों विषय वासनेची वृद्धि होते; आणि विषय तर पातकाला कारण आहेत. ३७० पापें वळावून जों जों वाढतील, तों तों जिवंतपणींच नरकयातना भोगाव्या लागतात ! ७१ म्हणून, हे सुबुद्धिमंता, जे वाईट वासना मनांत आणतात, ते आसुर त्या ठिकाणीं वस्तीला येतात, ७२ कीं ज्या ठिकाणीं तरवारीच्या धारेसारख्या तीक्ष्ण पानांचीं झाडें असून खैराच्या निखाऱ्यांचे डोंगर आहेत, व तापलेल्या तेलाचे समुद्र उतू येतात; ७३ आणि जेथें यातनांची ओळची ओळच असून यमाची नित्य नवी जाचणी असते. अशा घोर नरकलोकांत ते पडतात. ७४ अशा नरकाच्या शेलक्या भागांत जे जन्म घेतात, तेही पहावें तों यज्ञयागादिक कर्मे करण्यांत निमग्न झालेले असतात. ७५ बाकी, अर्जुना, त्यांच्या यज्ञादिक क्रिया जरी आहाण ह्मणजे पोकळ असतात, तरी नाटकी लोकांप्रमाणें त्यांचें आचरण असल्यामुळें त्या निष्फळ होतात. ७६ वेश्या ज्याप्रमाणें आपल्या यजमानाच्या आश्रयानें आपल्यास सौभाग्यवती मानून संतोष मानतात, ७७

अन्वय—आत्मसंभाविताः, स्तब्धाः, धनमानमदान्विताः, ते दंभेन अविधिपूर्वकम् नामयज्ञैः यजन्ते. ॥ १७ ॥

अर्थ—आपणच आपली प्रशंसा करणारे, ताठ्यानें वागणारे, व धनाच्या आणि थोरपणाच्या गर्वानें उन्मत्त झालेले, ते लोक शास्त्रविधीला सोडून दांभिकपणानें केवळ नांवाचे यज्ञ करितात. ॥ १७ ॥

**त्याप्रमाणें, मी सर्वांत श्रेष्ठ आहे, असें आपणच आपल्यास मानून, ज्यांचे अंगांत गर्वाचा ताठा भरतो; ७८ मग, बिडाचे खांब वांकत नाहींत, त्याप्रमाणें हे लवत नाहींत, किंवा आकाशांत उंच गेलेले पर्वत ज्याप्रमाणें खालीं लवत नाहींत, ७९ त्याप्रमाणें, आपणच आपल्या ऐश्वर्यानें मनांत संतोष मानून, इतरांस तृणाहूनही कमी लेखितात. ३८० अर्जुना, संपत्तीच्या मदानें उन्मत्त होऊन हे योग्यायोग्य विचारास फांटा देतात. ८१ अरे, ज्यांच्या अंगांत असा ताठा भरलेला आहे, त्यांच्या ठिकाणीं यज्ञाची काय किंमत आहे ? तथापि मूर्ख लोक काय करीत नाहींत ? ८२ म्हणून, एकादे वेळेस मौढ्यरूप मद्याच्या बळानें आभास मात्र यज्ञही करण्यास तयार होतात ! त्या यज्ञाची तऱ्हा काय म्हणशील तर, ८३ त्यांना कुंड, मंडप, वेदी किंवा तत्संबंधी लागणारी सर्व सामुग्री यांची जरूर नसते; आणि विधीचें कोणतेंही कर्म यथाविधि करण्याचें तर त्यांशीं सदाच वैर असतें. ८४ देवब्राह्मणांचें नांव नुसतें वाऱ्याच्या झुळकेबरोबर जरी यांच्या कानांवर पडलें, तरी तेंही त्यांना खपत नाहीं अशी जेथें स्थिति आहे, तेथें देवब्राह्मण कशाला येतील ? ८५ परंतु ज्याप्रमाणें शहाणे लोक मेलेल्या वांसराचे पोटांत पेंढा भरून तें गाईचे पुढें उभें करून तिचें दूध काढून घेतात, ८६ त्याप्रमाणें यज्ञाच्या मिषानें सर्व लोकांस आमंत्रण करून आपल्यास कांहीं मिळेल या आशेनें ते आलें असतां उलट त्यांजपासूनच अहेर उपटून त्यांस नागवितात ! ८७ याप्रमाणें यज्ञाचा दांभिकपणा माजवून ते प्राण्यांच्या नाशाची इच्छा करतात. ८८

अन्वय—अहंकारं, बलं, दर्पं, कामं, क्रोधं च संश्रिताः, आत्मपरदेहेषु (स्थितं) मां प्रद्विषंतः, अभ्यसूयकाः च, १८

अर्थ—मीपणा, बल, गर्व, काम व क्रोध यांचा आश्रय केलेले, आपल्या व दुसऱ्याच्या शरीरामध्यें असणारा मी परमेश्वर त्या माझा द्वेष करणारे, आणि दुसऱ्यांचा [साधूंचा] उत्कर्ष सहन न करणारे [असे ते हे लोक असतात.] ॥ १८ ॥

मग आपल्या पुढें डंकानिशाण लावून आम्ही दीक्षित आहों अशी जगांत व्यर्थ प्रसिद्धि करतात; ८९ त्या वेळीं त्या अधमांस अशा दीक्षितपणाच्या महत्त्वानें अधिकच गर्व चढतो. ज्याप्रमाणें अंधकाराला काजळाचीं पुटें द्यावीं, ह्मणजे तो

धले तमा । काजळाचे ३९० तैसें मौढ्य घणावे । औद्धत्य उंचावे । अहंकारु दुणावे । अविवेकुही ९१ मग दुजयाची भाष । नुरवावया निःशेष । बळीयेपणा अधिक । होय बळ ९२ ऐसा अहंकार बळा । जालिया येकवळा । दर्पसागरु मर्यादवेळा । सांडूनि उते ९३ मग वोसंडिलेनि दर्पें । कामाही पित्त कुरुपे । तया धगीं सैंध पळिपे । क्रोधाग्नि तो ९४ तेथ उन्हाळा आगी खरमरा । तेलातुपाचिया कोठारा । लागला आणि वारा । सुटला जैसा ९५ तैसा अहंकारु बळा आला । दर्पु कामक्रोधीं गूढला । या दोहींचा मेळु जाला । जयांच्या ठायीं ९६ ते आपुलियासवेशा । मग कोणी कोणी हिंसा । या प्राणियांतें वीरेशा । न साधिती गा ९७ पहिलें तंव धनुर्धरा । आपुलिया मांसरुधिरा । वेंचु करिती अभिचारा-। लागोनियां ९८ तेथ जाळिती जियें देहें । यामाजि जो मी आहें । तया आत्मया मज घाये । वाजती ते ९९ आणि अभिचारकीं तिहीं । उपद्रविजे जेतुलें कांहीं । तेथ चैतन्य मी पाहीं । सीणु पावे ४०० आणि अभिचारावेगळें । विपायें जें अवगळे । तया टाकिती इटाळें । पैशुन्याचीं १ सती आणि सत्पुरुख । दानशीळ याज्ञिक । तपस्वी अलौकिक । संन्यासी जे २ कां भक्त हन महात्मे । इयें माझीं निजाचीं धामें । निर्वाळलीं होमधर्में । श्रौतादिकीं ३ तयां द्वेषाचेनि काळकूटें । बासटोनि तिखटें । कुबोलांचीं सदटें । सूति कांडें ४

तानहं द्विषतः क्रूरान्संसारेषु नराधमान् । क्षिपाम्यजस्रमशुभानासुरीष्वेव योनिषु ॥१९॥

ऐसे आघवाचि परी । प्रवर्तले माझ्या वैरी । तयां पापियां जें मी करी । तें आइक पां ५ तरी मनुष्यदेहाचा तागा । घेऊनि रुसती जे जगा । ते पदवी हिरोनि पैं गा । ऐसे ठेवीं ६ जे क्लेशगांवींचा उकरडा । भवपुरींचा पानवडा । ते तमोयोनि तयां मूढां । वृत्तिचि दें ७ मग आहाराचेनि नांवें । तृणही जेथ नुगवे । ते व्याघ्र वृश्चिक आडवे । तैसिये करीं ८ तेथ क्षुधादुःखें बहुतें । तोडूनि खाती आपणयातें । मरमरों मागुतें । होताचि असती ९ कां आपला गरळजाळीं । जाळिती आंगाची पेंदळी । ते सर्पचि करीं बिळीं । निरुधला ४१० परी घेतला श्वासु घापें । येतुलेनही मापें । विसांवा तयां नाटोपे । दुर्जनांसी ११ ऐसेनि कल्पांचिया कोडी । गणितांही संख्या थोडी । तेतुला वेळु न काढीं । क्लेशौनि तयां १२ तरि तयांसी जेथ जाणें । तेथिंचें हें पहिलें पेणें । तें पावोनि येरें दारुणें । न होती दुःखें १३

अधिक काळेपणा पावतो, ३९० त्याप्रमाणें, त्यांचें मूर्खत्व वळावून उद्धटपणा वाढतो, व अहंकारानें अज्ञानही वाढतें ९१ मग आपल्यापेक्षां जगांत दुसरा कोणी बलवान् नाहीं, असें त्यांस वाटतें. ९२ याप्रमाणें अहंकार एकदां प्रबल झाल्यावर दर्परूपी सागर आपली मर्यादेची वेल सोडून वाढूं लागतो. ९३ मग याप्रमाणें दर्प वाढला ह्मणजे कामाचेंही पित्त खवळतें; आणि त्याच्या धगीनें क्रोधाग्नि अधिकच पेटतो. ९४ मग जसा उन्हाळ्यांत प्रखर अग्नि तेलातुपाच्या कोठारास लागावा, आणि तशांत वारा सुटावा, ९५ तसा अहंकार प्रबल झाल्यावर, व दर्प कामक्रोधांत गुरफटून गेल्यावर या दोहोंचें ऐक्य ज्यांचे ठिकाणीं होतें, ९६ ते, अर्जुना, आपल्या इच्छेप्रमाणें कोणत्या कोणत्या हिंसा करून प्राण्याचा नाश करणार नाहींत ? ९७ हे धनुर्धरा, प्रथम हे दीक्षित अभिचाराकरितां ह्मणजे जारणमारणांच्या नादास लागून आपल्या रक्तमांसांचा व्यय करतात; ९८ ते आपल्या देहास जो त्रास करून घेतात, त्याचे घाव त्या देहांत जो वास करणारा मी, त्या मज आत्म्याला बसतात; ९९ आणि जारणमारणादि क्रियांनीं ज्याला ज्याला ह्मणून पीडा देतात, त्यांच्यांत वास करणारें जें जीवचैतन्य त्याला त्रास होतो; ४०० आणि कदाचित् त्यांच्या जारणमारण क्रियेच्या सपाट्यांतून कोणी बचावलेच, तर त्यांचीं वर्में काढून त्यांच्या मनास ते त्रास देतात. १ सती, सत्पुरुष, दानशील, यज्ञ करणारे, जे अलौकिक तप करणारे, व संन्याशी, २ किंवा भक्त, महात्मे पुरुष किंवा ज्यांचीं घरें श्रोतादिक होमधर्मानें पवित्र झालीं आहेत, हीं जीं माझीं आवडतीं व रहाण्याचीं स्थळें आहेत. ३ त्यांना द्वेषरूपी काळकूट विषानें तीक्ष्ण केलेले दुःशब्दरूपी बळकट बाण मारतात ! ४

अन्वय—तान् द्विषतः क्रूरान्, अशुभान् नराधमान् संसरेषु आसुरीषु एव योनिषु अजस्रं अहं क्षिपामि ॥१९॥

अर्थ—त्या साधुद्वेषी व क्रूर अशा पापी नराधमांना संसारांतील [अनिश्चय दुःखदायक आशा] आसुरीयोनींमध्येंच मी निरंतर जन्मास घालितों. ॥ १९ ॥

याप्रमाणें जे सर्व प्रकारें मजशीं वैर करण्यास प्रवृत्त होतात, त्या पाप्यांना मी कोणती शिक्षा देतों, ती ऐक. ५ तर, मनुष्यदेह धारण करून जे या जगांत आपलें कर्तव्य काय तें विसरतात, त्यांची मनुष्यदेहरूप पदवी हरण करून मी त्यांना अशा स्थितींत ठेवतों ६ कीं, जी क्लेशरूपी गांवाचा उकीरडा, व संसारपुरीचा पाणवठा ! अशी जी तमोयोनि, तेथील त्या मूर्खांस वतनदार करतों. ७ मग, भूक लागली असतां, ज्यांना गवतही खाण्याची सोय नाहीं, अशा वाघ, विंचू इत्यादि रानांत राहणाऱ्या योनींत त्यांना घालतों. ८ त्या योनींत ते भुकेनें अतिग्रस्त झाले ह्मणजे आपल्या अंगाचे लचके तोडतोडून खातात, व मरतात, आणि पुनः त्याच योनींत कित्येक वेळां जन्म घेतात. ९ किंवा आपल्या विषाच्या दाहानें ज्याच्या शरीराचा दाह होतो, असा त्याला सर्प करून बिळांत कोंडून टाकतों. ४१० परंतु आंत घेतलेला श्वास बाहेर टाकतां येईल इतका थोडा वेळही त्या दुर्जनांस मी विश्रांति मिळूं देत नाहीं, ११ याप्रमाणें, ज्यांचे माप करतां येत नाहीं, असे कल्पचे कल्प त्यांना अशा क्लेशदायक योनींत ठेवतों. १२ परंतु त्यांना ज्या ठिकाणीं जावयाचें आहे, त्या मार्गांतील हा पहिला मुक्काम होय. मग त्या ठिकाणीं गेल्यावर त्यांना यांहीपेक्षां भयंकर अशीं दुःखें होणार नाहींत का ? १३

आसुरीं योनिमापन्ना मूढा जन्मनि जन्मनि । मामप्राप्यैव कौंतेय ततो यांत्यधमां गतिम् २०

हा ठायवरी । संपत्ति ते आसुरी । अधोगति अवधारीं । जोडिली तिहीं १४ पाठीं व्याघ्रादि तामसा । योनी तो अळुमाळु ऐसा । देहाधाराचा उसासा । आथी जोही १५ तोही मी वोल्हावा हिरें । मग तमचि होती एकसरें । जेथ गेलें आंधारें । काळवंडेजे १६ जयांची पापा चिळसी । नरक घेती विवसी । शीण जाय मूर्च्छीं । शिणें जेणें १७ मळु जेणें मैळे । तापु जेणें पोळे । जयाचेनि नांवें सळे । महाभय १८ पापा जयाचा कंटाळा । उपजे अमंगळ अमंगळा । विटाळुही विटाळा । बिहे जया १९ ऐसें विश्वाचे या वोखटेया । अधम जे धनंजया । तें ते होती भोगूनियां । तामसा योनि ४२० अहा सांगतां वाचा रडे । आठवितां मन खिरडे । कटारे मूर्खीं केवढे । जोडिले निरय २१ कायिसया ते आसुर । संपत्ति पोषिती वाउर । जिया दिधलें घोर । पतन ऐसें २२ म्हणौनि तुवां धनुर्धरा । नोहावें गा तिया मोहरा । जेउता वासु आसुरा । संपत्तिवंता २३ आणि दंभादि दोष साही । हे संपूर्ण जयांच्या ठायीं । ते त्यजावे हें काई । म्हणो कीर २४

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः । कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ॥२१॥

परि काम क्रोध लोभ । या तिहींचेंचि थोंब । थांवे तेथें अशुभ । पिकलें जाण २५ सर्व दुःखां आपुलिया । दर्शना धनंजया । पाढाऊ हे भलतया । दिधलें आहाती २६ कां पापियां नरकभोगी । सुवावयालागीं जगीं । पातकांची दाटुगी । सभाचि हे २७ ते रौरव गा तंवचिवरी । आइकिजती पटांतरीं । जंव हे तिन्ही अंतरीं । उठती ना २८ अपाय तिहीं आसलग । यातना इहीं सवंग । हाणी हाणी नोहे हे तिघ । हेचि हाणी २९ काय बहु बोलों सुभटा । सांगितलिया निकृष्टा नरकाचा दारवंटा । त्रिशंकु हा ४३० या कामक्रोध लोभां- । माजि जीवें जो होय उभा । तो निरयपुरीची सभा । सन्मानु पावे ३१ म्हणौनि पुढतपुढतीं किरीटी । हे कामादिदोषत्रिपुटी । त्यजावीचि गा वोखटी । आघवा विषयीं ३२

एतैर्विमुक्तः कौंतेय तमोद्वारैस्त्रिभिर्नरः । आचरत्यात्मनः श्रेयस्ततो याति परां गतिम् ॥२२॥

धर्मादिकां चौंहीआंतु । पुरुषार्थांची तैंचि मातु । करावी जैं संघातु । सांडील हा ३३ हे तिन्ही जीवीं जंव जागती । तंववरी निकियाची प्राप्ती । हे

अन्वय–कौन्तेय, आसुरीं योनिम आपन्नाः जन्मनि जन्मनि मूढाः (सन्तः) माम अप्राप्य एव ततः अधमां गतिं यान्ति. २०

अर्थ–अर्जुना, आसुरी योनीला पावलेले ते पुरुष जन्मोजन्मीं [अधिकाधिकच] मूढ होत्साते मला न पावतां उत्तरोत्तर अधम गतीला प्राप्त होतात. ॥ २० ॥

अशा प्रकारें, या आसुरी संपत्तीचा महिमा असा आहे कीं, ज्याच्या योगानें अधोगति प्राप्त होते. १४ नंतर व्याघ्रादि तामस योनींत देहाचे आधारानें जी थोडी स्वस्थता प्राप्त होते, १५ तीही स्वस्थता हिरावून घेऊन, जेथें अंधेर गेला असतांही काळवंडतो, अशा तमाच्या योनींत त्यांना मी घालतों. १६ ज्या तमाची पापालाही किळस उत्पन्न होते, नरकही ज्याला भितो, व जेथील श्रमानें श्रमही मूर्च्छित होतो; १७ ज्याच्या योगानें मल मलिन होतो, तापालाही ताप होतो, व ज्याचें नांव काढलें असतां महाभयही भीति पावतें; १८ ज्या तमाचा पापालाही कंटाळा येतो, अमंगळ वस्तूसही ज्याच्या स्पर्शानें अमंगळपणा वाटतो, व विटाळही ज्याच्या विटाळाची भीति मानतो; १९ धनंजया, अशी जी या साऱ्या जगांतील निकृष्ट अवस्था, ती भोगून हे अधम तामस योनींत जन्म घेतात. ४२० अरे, त्या योनीचें वर्णन करतांना वाचेस अश्रु येतात, व त्या योनीची आठवण होण्याबरोबर मन मागें फिरतें. अरे ! अरे ! त्या मूर्खांनीं काय ही नरकवासाची जोड करून घेतली! २१ ज्या आसुरी संपत्तीनें असें घोर पतन प्राप्त होतें, ती ते वावुर म्हणजे व्यर्थ कां वाढवितात ? २२ अर्जुना, ज्या आसुरी संपत्तिवंतांना असा नरकवास भोगावा लागतो, त्या मार्गाकडे तूं जाऊं नको;२३ आणि ज्या आसुरी संपत्तीच्या अंगीं दंभ आदिकरून सहा दोष भरलेले असतात,तिचा त्याग कर, हें खरोखर तुला सांगावयाला का पाहिजे ? २४

अन्वय–कामः क्रोधः, तथा लोभः इदं त्रिविधं आत्मनः नाशनं नरकस्य द्वारं (अस्ति); तस्मात् एतत् त्रयं त्यजेत्.

अर्थ–काम, क्रोध आणि लोभ हीं जीवाला कोणत्याही पुरुषार्थाची प्राप्ति करून न देणारीं नरकाचीं तीन द्वारें आहेत; यास्तव या तिहींचा त्याग करावा. ॥ २१ ॥

परंतु काम, क्रोध व लोभ या तिघांचें बूड जेथें जोरावलें आहे, तेथें अशुभ निकलें, असें समज. २५ हे धनंजया, आपल्यास सर्व दुःखांचा अनुभव येण्यास हे वाटेल त्याला वाटाडेच झालेले आहेत; २६ किंवा पापी लोकांस नरकभोग प्राप्त करून देण्यास पातकांची ही मोठी थोरली सभाच आहे. २७ रौरवनरक ह्मणून ज्याची पुराणांतरीं आपण ख्याति ऐकतों, त्या रौरव नरकाची तोंपर्यंतच प्रतिष्ठा आहे, कीं जोंपर्यंत हे तिन्हीं दोष अंतर्यामीं उठले नाहींत ! २८ यांच्यामुळें अपाय फार लवकर प्राप्त होतो, यातना फार सवंग होतात, व हानि हानि म्हणून जिला म्हणतात ती हानि नसून हे तिन्हीं दोषच हानिरूप होत. २९ अर्जुना, यांची जी अति निकृष्ट अवस्था सांगितली, तिच्यापेक्षां काय अधिक वर्णन करूं ! फार काय सांगावें ! हा त्रिदोषसमुदाय ह्मणजे नरकाच्या दरवाजांचा उंबरठाच होय.५३० काम, क्रोध व लोभ यांना जो मनःपूर्वक अनुकूल होतो, तो नरकपुरीच्या सभेंत सन्मानास पात्र होतो. ३१ ह्मणून, हे किरीटी, तुला वारंवार सांगतों कीं, काम क्रोध व लोभ यांची ही त्रिपुटी—जी सर्व विषयांत अति वाईट आहे, तिचा त्याग करावा. ३२

अन्वय–कौन्तेय, एतैः त्रिभिः तमोद्वारैः विमुक्तः नरः आत्मनः श्रेयः आचरति, ततः परां गतिं याति. ॥ २२ ॥

अर्थ–हे कौंतेया, नरकाच्या या तिन्ही द्वारांपासून जो मनुष्य मुक्त होतो, तो आपलें कल्याण करून घेण्याचे मार्गाला लागतो; आणि नंतर उत्तम गतीला पोहोंचतो. ॥ २२ ॥

धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चारही पुरुषार्थांची गोष्ट तेव्हांच काढतां येईल, कीं ज्या वेळेस काम, क्रोध व लोभ हे तिन्ही सुटतील. ३३ काम, क्रोध व लोभ हे तिन्ही जोंपर्यंत अंतर्यामीं वास करीत आहेत, तोंपर्यंत, एकाद्याचें कल्याण होईल,

माझे कान नाइकती। देवोही म्हणे ३४ जया आपणपें पढिये । आत्मनाशा जो बिहे। तेणें न धरावी हे सोये । सावधु होइजे ३५ पोटीं बांधोनि पाषाण। समुद्रीं बाहीं आंगवण । कां जियावया जेवण । काळकूटाचें ३६ इहीं काम-क्रोधलोभेंसीं । कार्यसिद्धि जाण तैसी । ह्मणोनि ठावोचि पुसीं । ययांचा गा ३७ जैं कहीं अवचटें। हे तिकडी सांखळ तुटे। तैं सुखें आपलिये वाटे। चालों लाभे ३८ त्रिदोषीं सांडिलें शरीर । त्रिकुटीं फिटलिया नगर । त्रिदाह निमालिया अंतर । जैसें होय ३९ तैसा कामादिकीं तिघीं । सांडिला सुख पावोनि जगीं । संगु लाहे मोक्षमार्गीं। सज्जनाचा ४० मग सत्संगें प्रबळें । सच्छास्त्राचेनि बळें । जन्ममृत्यूचीं निमाळें । निस्तरें रानें ४१ ते वेळीं आत्मानंदें आघवें । जें सदा वसतें बरवें । तें तैसेंचि पाटण पावे । गुरुकृपेचें ४२ तेथ प्रियाची परमसीमा । तो भेटे माउली आत्मा । तये खेंवीं आटे डिंडिमा । सांसारिक हे ४३ ऐसा जो कामक्रोधलोभां । झाडी करूनि ठाके उभा । तोचि येवढिया लाभा । गोसावी होय ४४

यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः । न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम् २३

ना हें नावडोनि कांहीं । कामादिकांच्याचि ठायीं । दाटिली जेणें डोई। आत्मचोरें ४५ जो जगीं समान सकृपु । हिताहित दाविता दीपु । तो अमान्यु केला बापु । वेदु जेणें ४६ न धरीचि विधीची भीड । न करीचि आपली चाड। वाढवीत गेला कोड । इंद्रियांचें ४७ कामक्रोधलोभांची कास । न सोडीच पाळिली भाष । स्वैरचोराचें असोस । वळघला रान ४८ तो सुटकेचिया वाहिणीं। मग पिवों न लाहे पाणी । स्वप्नींही ते काहाणी । दूरीचि तया ४९ आणि परत्र तंव जाये । हें कीर तया आहे । परि ऐहिकही न लाहे । भोग भोगूं ४५० तरि माशालागीं भुलला । ब्राह्मण पाणबुडा रिघाला । कीं तेथही पावला । नास्तिकवादु ५१ तैसें विषयांचेनि कोडें । जेणें परत्रा केलें उबडें । तंव तोचि आणिकीकडे । मरणें नेला ५२ एवं परत्र ना स्वर्गु । ना ऐहिकही विषयभोगु । तेथ केउता प्रसंगु । मोक्षाचा तो ५३ ह्मणौनि कामाचेनि बळें । जो विषय सेऊं पाहे सळें । तया विषयो ना स्वर्गु मिळे । ना उद्धरे तो ५४

तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ । ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ॥२४॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे दैवासुरसंपद्विभागयोगो नाम षोडषोऽध्यायः

हें ह्मणणें माझे तर कान ऐकत नाहींत, असें भगवान् श्रीकृष्ण सुद्धां म्हणतात ! ३४ ज्याला आपल्या कल्याणाची इच्छा आहे, किंवा आपला नाश होईल ह्मणून जो भितो, त्यानें सावध होऊन या तिघांची संगत करूं नये. ३५ पोटाला दगड बांधून समुद्रांत बाहूंनीं तरून जाणें, किंवा जगण्याकरितां काळकूट विषाचें सेवन करणें, ३६ त्याप्रमाणें ह्या कामक्रोधलोभांच्या संगतीनें कार्यसिद्धि होते ! ह्मणून यांचा मनांतून मागमूस नाहींसा करून टाक. ३७ ज्या वेळेस सहजगत्या ही तीन कड्यांची सांखळी पायांतून तुटून जाईल, त्या वेळेस आपल्या हिताची वाट सुखानें चालतां येईल. ३८ कफ, वात व पित्त हे तिन्ही दोष जोंपर्यंत शरीरांत उत्पन्न झाले नाहींत, किंवा चहाडी, चोरी व शिंदळकी यांपासून जोंपर्यंत एकादें शहर अलिप्त आहे; आणि जोंपर्यंत आध्यात्मिक, आधिदैविक व अधिभौतिक ह्या त्रिविध तापांपासून अंतःकरण मुक्त आहे, तोंपर्यंत जसें सुख प्राप्त होतें, ३९तसें काम, क्रोध व लोभ हे ज्यानें सोडले आहेत,त्याला या जगतांत सुख प्राप्त होतें; आणि सज्जानांचे संगतीनें मोक्षमार्गाची प्राप्ति होते. ४० मग तो सत्संगतीच्या बलानें व सच्छास्त्रांच्या योगानें जन्ममृत्यूंचीं माळरानें उल्लंघन करितो. ४१ त्या वेळेस, ज्या ठिकाणीं आत्मानंद नेहमीं वास करतो असें जें गुरुकृपेचें स्थान, तें त्याला प्राप्त होतें. ४२ प्रीतीच्या पलीकडील स्थान जी आत्मरूपी माउली, तिची त्या ठिकाणीं भेट होते; व तिला आलिंगन दिल्यावर संसाराचा ताप आपोआप नाहींसा होतो. ४३ याप्रमाणें जो काम, क्रोध व लोभ यांचा त्याग करून मोकळा होतो, तोच आत्म्याची प्राप्ति करून घेण्यास समर्थ होतो. ४४

अन्वय–यः शास्त्रविधिं उत्सृज्य कामकारतः वर्तते, सः न सिद्धिम् न सुखं न च परां गतिं अवाप्नोति. ॥ २३ ॥

अर्थ–जो शास्त्रोक्त विधीला सोडून आपल्या इच्छेप्रमाणें वागतो, त्याला सिद्धि, सुख आणि उत्तम गति हीं मिळत नाहींत. ॥ २३ ॥

किंवा आत्मप्राप्तीचा लाभ न आवडून जो कामादिकांच्या ठिकाणींच डोकें देऊन रहातो,तो आत्मघात करणारा होय. ४५ या जगांत सर्वांना सारखे असून सर्वांवर सारखी कृपा करणारे, व आपलें हित किंवा अनहित दाखविणारे केवळ दीपच, असे जे सर्वांचे गुरु वेद, त्यांची आज्ञा जो पाळीत नाहीं; ४६ जो शास्त्रांत सांगितलेल्या विधिनिषेधांची भीड धरीत नाहीं, व आपलें हित न पहातां इंद्रियांचें सर्व कोड पुरवितो; ४७ काम, क्रोध व लोभ यांची कास सोडीत नाहीं, आणि त्यांनीं घातलेली शपथ मोडीत नाहीं, व आपल्या इच्छेस येईल, त्याप्रमाणें विषयाच्या रानांत हिंडतो, ४८ त्याची त्यांच्यापासून क्षणभर देखील सुटका होत नाहीं; सुखाची गोष्ट तर स्वप्नांत देखील त्याजपासून दूर असते; ४९ आणि परलोकास तो अंतरतो, यांत शंका नाहीं. परंतु त्याला या लोकीचेही भोग भोगण्यास मिळत नाहींत. ४५० तर एकादा ब्राह्मण नदीच्या तीरी स्नानसंध्या करीत असतां माशावर मन जाऊन तो धरावयास गेला असतां, त्याचें कृत्य लोकांनीं पाहिल्यावर जसें त्यास ते नास्तिक असें ह्मणतात; ह्मणून अर्थात् त्याची माशाविषयीं इच्छाही पुरी होत नाहीं, व तो ब्राह्मणत्वासही मुकतो; ५१ त्याप्रमाणें, विषयांच्या नादाला लागून ज्यानें परलोक पालथा घातला, व इहलोकींही पाहूं गेलें असतां जो मृत्यूच्या सपाट्यांत सांपडला; ५२ याप्रमाणें त्याला परलोक नाहीं व स्वर्गही नाहीं ! आणि ज्याला इहलोकींही विषयांचा भोग भोगावयास सांपडत नाहीं,तेथें मोक्षप्राप्तीची गोष्ट कशास बोलावयास पाहिजे ? ५३ म्हणून,कामाच्या वृद्धीनें जो विषयांचें सेवन करूं पहातो,त्याला विषय भोगावयास मिळत नाहींत; स्वर्गही प्राप्त होत नाहीं; आणि तो उद्धरूनही जात नाहीं ! ५४

अन्वय–तस्मात्, कार्याकार्यव्यवस्थितौ ते शास्त्रं प्रमाणम् (अस्ति) शास्त्रविधानोक्तं कर्म ज्ञात्वा (तत् त्वं) इह कर्तुं अर्हसि. ॥ २४ ॥

अर्थ–यास्तव; कार्य अथवा अकार्य यांचा निर्णय करण्याच्या कामीं तुला शास्त्र हेंच प्रमाण आहे. शास्त्रानें सांगितलेलें कर्म समजून घेऊन तें या लोकीं करणें तुला योग्य आहे. ॥ २४ ॥

याकारणें पैं बापा । जया आथी आपली कृपा । तेणें वेदांचिया निरोपा । आन न कीजे ५५ पतीचिया मता । अनुसरोनि पतिव्रता । अनायासें आत्महिता । भेटेचि ते ५६ नातरी श्रीगुरुवचना । दिठी देतु जतना । शिष्य आत्मभुवना- । माजि पैसे ५७ हें असो आपुला ठेवा । हाता आथी जरी यावा । तरी आदरें जेविं दिवा । पुढां कीजे ५८ तैसा अशेषांही पुरुषार्था । जो गोसावी हो म्हणे पार्था । तेणें श्रुतिस्मृति माथां । बैसणें घापे ५९ शास्त्र म्हणेल जें सांडावें । तें राज्यही तृण मानावें । जें घेववी तें न म्हणावें । विषही विरु ४६० ऐसिया वेदैकनिष्ठा । जालिया जरी सुभटा । तरि कें आहे अनिष्टा । भेटणें गा ६१ पैं अहितापासूनि काढिती । हित देउनी वाढविती । नाहींगा श्रुतीपरौती । माउली जगा ६२ म्हणौनि ब्रह्मेंशीं मेळवी । तंव हे कोणें न सांडावी । अगा तुवांही ऐसीचि भजावी । विशेषेंसी ६३ जे आजि अर्जुना तूं येथें । करावया सत्य शास्त्रें सार्थें । जन्मलासि बळार्थें । धर्माचेनि ६४ आणि धर्मानुज हें ऐसें । ओघेंचि आलें अपैसें । म्हणौनि अनारिसें । करूं नये ६५ कार्याकार्यविवेकीं । शास्त्रोंचि करावीं पारखीं । अकृत्य तें कुडें लोकीं । वाळावें गा ६६ मग कृत्यपणें खरें निगे । तें तुवां आपलेनि आंगें । आचरोनि आदरें चांगें । सारावें गा ६७ जे विश्वप्रामाण्याची मुदी । आजि तुझ्या हातीं असे सुबुद्धी । लोकसंग्रहासि त्रिशुद्धी । योग्यु होसी ६८ एवं आसुरवर्गु आघवा । सांगोनि तेथिंचा निगावा । तोही देवें पांडवा । निरूपिला ६९ इयावरी तो पंडूचा । कुमरु सद्भावो जीवींचा । पुसेल तो चैतन्याचा । कानीं ऐका ४७० संचयें व्यासाचिया निरोपा । तो वेळु फोडिला तया नृपा । तैसा मीही निवृत्तिकृपा । सांगेन तुम्हां ७१ तुम्ही संत माझिया कडा । दिठीचा कराल बहुडा । तरि तुम्हां माने येवढा । होईन मी ७२ म्हणोनि निज अवधान । मज वोळगे पसायदान । दीजो जी सनाथु होईन । ज्ञानदेवो म्हणे ४७३

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥ श्लोक २४, ओंव्या ४७३.

वास्तव, बापा अर्जुना, ज्याला आपलें कल्याण व्हावें अशी इच्छा आहे, त्यानें वेदांत सांगितलेल्या गोष्टींची अवज्ञा करूं नये. ५५. पतीच्या मर्जीप्रमाणें पतिव्रता स्त्री वागून अनायासानें आपले हित करून घेते; ५६ किंवा श्रीगुरूंच्या आज्ञेकडे लक्ष देऊन जो वागतो, तो शिष्य आत्मप्राप्ति करून घेतो; ५७ फार काय ! परंतु आपणच टेवलेली ठेव हातीं येण्याकरितां ज्याप्रमाणें दिव्याचा उजेड अगत्य पुढें करावा लागतो ५८ त्याप्रमाणें पार्था, सर्व पुरुषार्थाचा स्वामी होण्याची ज्याला इच्छा असेल, त्यानें श्रुति व स्मृति यांना शिरसा वंद्य मानलेंच पाहिजे. ५९ जें टाकून द्यावें ह्मणून शास्त्रानें सांगितलें आहे, तें राज्यही असलें तरी सोडून द्यावें, व ज्या गोष्टींचें सेवन करावें असें सांगितलें आहे, तें मारक विष जरी असलें, तरी घ्यावें. ४६० हे सुभटा, याप्रमाणें जो वेदांची एकनिष्ठपणें आज्ञा पाळतो, त्याची व अनिष्टाची गांठ कोठून पडणार? ६१ हें बव-अहितापासून सोडविणारी, आणि हित करून वाढविणारी श्रुतीप्रमाणें जगांत दुसरी माउली नाहीं बरें. ६२ ह्मणून जिच्या योगानें ब्रह्मप्राप्ति होते, त्या ह्या श्रुतीची कोणीं अवज्ञा करूं नये; व तूंही विशेषेंकरून श्रुतीचीच आज्ञा पाळ. ६३ अर्जुना, मागील जन्मीं धर्माचरण केल्यामुळें या जन्मीं सच्छास्त्रें यथार्थ करण्यास तूं उत्पन्न झाला आहेस; ६४ आणि धर्मराजाचें राज्य अमलांत आल्यामुळें धर्मानुज हें नांव तुला सहज प्राप्त झालें आहे. तेव्हां तूं वेदवाद वर्तन करूं नको. ६५ हें कार्य आहे, किंवा अकार्य आहे, याची चाड शास्त्रदृष्टीनेंच करावी, शास्त्रांनीं जें अकार्य म्हणजे निषिद्ध असें ठरविलें असेल, तें वाईट म्हणून टाकून द्यावें, ६६ मग खरोखर जें उत्तम कर्तव्य आहे, तें स्वतः अगत्यपूर्वक आचरावें. ६७ हे सुबुद्धिमंता, आज तुझ्या हातांत जगानें प्रमाण मानण्याजोगा शिक्का असल्यामुळें. खरोखर लोकांनीं तुझे आचरणाचा कित्ता वळवावा, अशी तुझी योग्यता होईल. ६८ महाराज ह्मणतात, याप्रमाणें आसुरवर्गाचीं सर्व लक्षणें सांगून, त्यांचा निर्णयही देवांनीं अर्जुनास सांगितला. ६९ यावर तो अर्जुन अंतर्यामीं सद्भाव ठेवून जें कांहीं विचारील, तें सावधान चित्तानें ऐका. ४७० श्रीव्यासांनीं आज्ञा केल्याप्रमाणें संजयानें धृतराष्ट्र राजाचा वेळ घालविला. त्याप्रमाणें निवृत्ति महाराजांचे कृपेनें मीही तुम्हांला सांगेन. ७१ तुम्ही संत मंडळी जर माझ्यावर कृपादृष्टि कराल, तर तुमच्यासारखा मी होईन. ७२ म्हणून, महाराज म्हणतात:—आपलें अवधान देऊन शिष्यावर प्रसाद करावा, ह्मणजे मी कृतकृत्य होईन. ४७३